सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# पाचव्या महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाचा अहवाल

जुलै, २०१९

सत्यमेव जयते

पाचवा राज्य वित्त आयोग
खंबाटा ट्रस्ट बिल्डींग,
ईरॉस थिअटरच्या मागे, ३ रा मजला,
चर्चगेट, मुंबई- ४०००२०
दिनांक: ऑगस्ट २०१९

विश्वनाथ गिरिराज,
अध्यक्ष

---

महामहीम

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल,
राजभवन,
मुंबई.

महोदय,

संविधानाच्याअनुच्छेद २४३(आय) आणि अनुच्छेद (वाय) अनुसार अधिसुचना क्रमांक राविआ.२०१७/प्र.क्र.३३/एफ़सीसी दिनांक २८ मार्च २०१८अन्वये पाचवा महाराष्ट्र राज्य वित्त आयोग गठीत करण्यात आला आहे. पंचायत राज संस्था आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या वित्तीय स्थितीचा त्यांना सक्षम करणाच्या दृष्टीने अभ्यास आणि विश्लेषण करून, एकंदरीत सर्वसाधारण स्त्रोतांची स्थिती तसेच राज्यशासनाच्या एकंदरीत बांधिलकी लक्षात घेऊन स्त्रोतांच्या वाटपासंदर्भात आयोगाने शिफारशी करावयाच्या आहेत.

सखोल विचार विनिमय आणि विचारविमर्श करून आयोगाने अहवालाला अंतिम स्वरुप दिले आहे. अनेक व्यक्ती आणि संस्थानी आयोगाला त्यांच्या अमुल्य सुचना व महत्वाची माहिती दिली आहे. आयोगाच्या इतर सदस्यासह मी त्यांच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करतो.

हे अत्यंत महत्वाचे काम करण्याची संधी आम्हाला दिल्याने आम्ही सन्मानित झालो आहोत. या पत्रासोबत पाचवा राज्य वित्त आयोग अहवाल सादर करतांना मला आनंद होत आहे.

आपला विश्वासू

(विश्वनाथ गिरिराज)
अध्यक्ष

टीप :- पाचव्या महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाच्या इंग्रजी अहवालाचे मराठी भाषांतर मराठी भाषा संचालनालयाच्या अभिप्रायानुसार शासन निर्णय,मराठी भाषा विभाग क्र.नामिका-२०१७/प्र.क्र.८३/भाषा-२, दि.२५जानेवारी,२०१८ अन्वये शासनाने नियुक्त केलेल्या नामिकेतील तज्ञ अनुवादक श्रीम.सुमिता बोरसे यांच्याकडून करून घेण्यात आले आहे. मराठी भाषेतील मजकुराबाबत अथवा अर्थाबाबत काही शंका/ संभ्रम निर्माण झाल्यास त्यासंदर्भात इंग्रजी अहवालातील अर्थ अंतिम समजण्यात यावा.

अनुक्रमाणिका


| प्रकरण क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | १ |
| २ | यापूर्वीचे राज्य वित्त आयोग- संरचना आणि शिफारशी | ४ |
| ३ | राज्य वित्त आयोग- स्वीकृत कार्यपद्धती | ६ |
| ४ | राज्य वित्त आयोग- स्वीकृत दृष्टीकोन | १३ |
| ५ | राज्य वित्त व्यवस्था | २१ |
| ६ | जिल्हा परिषद आणि ग्राम पंचायतींचे वित्त व्यवस्थेचे/अर्थव्यवस्थेचे मुल्यांकन | ३३ |
| ७ | ग्राम पंचायतींचे वित्त व्यवस्थेचे /अर्थव्यवस्थेचे मुल्यांकन | ११८ |
| ८ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वित्त व्यवस्थेचे / अर्थव्यवस्थेचे मुल्यांकन | १६१ |
| ९ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचे लेखा, लेखा परिक्षण आणि वित्तीय माहिती सुव्यवस्थित करणे | २६३ |
| १० | सर्वसाधारण आलोचना आणि अंतिम निष्कर्ष | २८८ |
| ११ | महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील उल्लेखनीय कार्यप्रणाली (पुनरावृत्ती करण्याजोगे आदर्श नमुने) | २९५ |
| १२ | संक्षिप्त शिफारशी | ३२० |
| १२अ आणि ब | सरकारला अतिरिक्त वित्तीय वचनबध्द शिफारशी<br>शिफारशींचे वर्गीकरण(धोरण, प्रक्रिया आणि क्षमता संवर्धन) | ३४७<br>३५२ |
| परिशिष्ट | १.महाराष्ट्र वित्त आयोग अधिनियम, १९९४ | ३९१ |
| | २. पाचव्या महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाच्या स्थापनेबाबतची अधिसूचना- दि.२८.०३.२०१८ | ३९४ |
| | ३. पाचव्या महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाच्या कामकाजाकरीता पदनिर्मिती - शासन निर्णय दि.२२.०५.२०१८ | ३९८ |
| | ४. ५ व्या मराविआ च्या सदस्य सचिवांना पदसिद्ध सचिवांचा दजा देण्याबाबतचा शा. नि. दि.२९.०८.२०१८ | ४०१ |
| | ५. ५ व्या मराविआ च्या सदस्यांची नियुक्ती- अधिसूचना दि.१४.११.२०१८ | ४०३ |
| | ६. ५ व्या मराविआस मुदतवाढ- अधिसूचना दि.१७.०१.२०१९ | ४०५ |
| | ७. ५ व्या मराविआत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांची यादी | ४०७ |
| | ८.जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची यादी | ४०८ |
| | ९.नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची यादी | ४२० |
| ऋणनिर्देश | १.मौल्यवान मार्गदर्शन करणा-या अशासकीय अधिका-यांची यादी | ४३२ |
| | २.तांत्रिक कार्यशाळेतील सहभागी अधिका-यांची यादी | ४३५ |
| | ३.विशेष ऋणनिर्देश-अधिकारी व विभाग | ४३७ |

# संक्षेपाक्षरांची यादी

| संक्षेपाक्षर | वर्णन |
|---|---|
| AG | Aaccountant General महालेखापाल |
| ARV | Annual Rateable Value वार्षिक दर देय मुल्य |
| AVO | Assistant Valuation Officer सहाय्यक मुल्यांकन अधिकारी |
| BDO | Block Development Officer गटविकास अधिकारी |
| BPL | Below Poverty Line दारिद्र्य रेषे खालील |
| BPMC Act | Bombay Provincial Municipal Corporation Act मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम |
| CAG | Comptroller and Auditor General of India भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक |
| CAGR | Compound Annual Growth Rate संयुक्त वार्षिक विकास दर (सीएजीआर) |
| CEO | Chief Executive Officer मुख्य कार्यकारी अधिकारी |
| CFC | Central Finance Commission केंद्रिय वित्त आयोग |
| CIDCO | City and Industrial Development Corporation शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ |
| CMAM | Chief Municipal Auditor, Mumbai मुख्य महानगरपालिका लेखापरीक्षक, मुंबई |
| Corporation Act | Maharashtra Municipal Corporation Act महाराष्ट्र महानगरपालिका कायदा |
| CP Tax | Consolidated Property Tax संकलित मालमत्ता कर |
| CPS | Central Plan Schemes केंद्रिय नियोजित योजना |
| CSS | Centrally Sponsored Scheme केंद्र सरकार प्रायोजित योजना |
| CST | Central Sales Tax केंद्रिय विक्री कर |
| CV Method | Capital Value Method भांडवली मुल्य पद्धती |
| DA डिए | Dearness Allowance महागाई भत्ता |
| EGS रोहयो | Employment Guarantee scheme रोजगार हमी योजना |
| FD | Fiscal Deficit वित्तीय तूट |
| FRBM Act | Financial Responsibility and Budget Management Act राजकोषीय उत्तरदायित्त्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम |
| GDP | Gross Domestic Product स्थुल दरडोई उत्पादन |
| GFD | Gross Fiscal Deficit स्थूल वित्तीय तूट |
| GIS | Geographical Information System भौगोलिक माहिती प्रणाली |
| GP | Grampanchayat ग्राम पंचायत |
| GP Act | Maharashtra Village Panchayat॰s Act, १९५९ महाराष्ट्र ग्राम पंचायत कायदा, १९५९ |
| GSDP | Gross State Domestic Product स्थुल राज्यातंर्गत उत्पादन |
| HP | Horse Power अश्व शक्ती |
| HUDCO | Housing and Urban Development Corporation गृहनिर्माण आणि नागरी विकास महामंडळ |

| | |
|---|---|
| IR | Inspection Reports तपासणी अहवाल |
| JNNURM | Jawarharlal Nehru National Urban Renewal Mission जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नुतनीकरण अभियान |
| KBMC | Kulgaon- Badlapur Municipal Corporation कुळगाव बदलापूर महानगरपालिका |
| LIC | Life Insurance Corporation जीवन विमा निगम |
| MDR | Major District Roads प्रमुख जिल्हा रस्ते |
| MERC | Maharashtra Electricity Regulatory Commission महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग |
| MIDC | Maharashtra Industrial Development Corporation महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ |
| MJP | Maharashtra Jeevan Pradhikaran महाराष्ट्र जीवन प्राधिकरण |
| MMCAct | Mumbai Municipal Corporation Act मुंबई महानगरपालिका अधिनियम |
| MMRDA | Mumbai Metropolitan Region Development Authority मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| MoU | Memorandum of Understanding सामंजस्य करार |
| MRTP Act | Maharashtra Regional and Town Planning Act महाराष्ट्र क्षेत्रीय आणि नगर नियोजन कायदा |
| MSEB | Maharashtra State Electricity Board महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ/मंडळ |
| MTRFP | Medium Term Fiscal Reform Program मध्यम मुदतीचा राजकोषीय सुधारणा कार्यक्रम |
| Municipality Act | Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Township Act महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती आणि औद्योगिक नगर रचना कायदा,१९६५ |
| NA | Non Agriculture बिगर शेती |
| NGO | Non Government Organisation गैर शासकीय संस्था / सामाजिक संस्था |
| NOC | No Objection Certificate ना हरकत प्रमाणपत्र |
| NSDP | Net State Domestic Product निव्वळ राज्य ऐत्तदेशीय उत्पादन |
| O & M | Operations and Maintenance प्रचालन आणि देखभाल |
| ODR | Other District Roads इतर जिल्हा रस्ते |
| OPD | Out Patient Department बाह्यरुग्ण विभाग |
| PAC | Public Accounts Committee सार्वजनिक लेखा समिती |
| PHC | Public Health Centre सार्वजनिक आरोग्य केंद्र |
| PMC | Pune Municipal Corporation पुणे महानगरपालिका |
| POL | Petrol, Oil and Lubricants पेट्रोल, तेल आणि वंगण |
| PRI | Panchayat Raj Institution पंचायत राज संस्था |
| PS | Panchayat Samiti पंचायत समिती |
| PSU | Public sector undertaking सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम |
| PPP | Public Private Partnership सार्वजनिक खाजगी भागिदारी |
| PWD | Public Work Department सार्वजनिक बांधकाम विभाग |
| RBI | Reserve Bank Of India भारतीय रिझर्व बँक |

| | |
|---|---|
| RD | Revenue Deficit महसुली तूट |
| RDD | Rural Development Department ग्राम विकास विभाग |
| RDP | Rural Development Plan ग्राम विकास योजना |
| RLB | Rural Local Body ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था |
| RR | Revenue Receipt महसूल प्राप्ती |
| SC | Scheduled cast अनुसूचित जाती |
| SLR | Statutory Liquidity Rate वैधानिक तरलता (रोकड सुलभता) दर |
| SPV | Special Purpose vehicle विशेष उद्देश वाहन |
| ST | Scheduled Tribe अनुसूचित जमाती |
| SWM | Solid Waste Management घन कचरा व्यवस्थापन |
| TCS | Tata consultancy Services टाटा कन्सल्टंसी सर्व्हिसेस |
| TDR | Transfer of Development Rights विकास हक्काचे हस्तातंरण |
| TISS | Tata Institute of Social Sciences टाटा इन्स्टीट्यूट ऑफ सोशल सायन्सेस |
| TOR | Terms of Reference संदर्भ अटी |
| UDD | Urban Development Department नागरी विकास विभाग |
| ULB | Urban Local bodies नागरी स्थानिक स्वराज्य संस्था |
| VAT | Value Added Tax मुल्यवर्धित कर |
| VP | Village Panchayat गाव पंचायत |
| VP ACT | Maharashtra village Panchayats Act,१९५९ महाराष्ट्र गाव पंचायत कायदा, १९५९ |
| VR | Village Road गाव रस्ते |
| WSS | Water Supply Scheme पाणी पुरवटा योजना |
| YASHADA-यशदा | Yashwantrao Chavan Academy of Development Administration, Pune यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे |
| ZP | Zilla Parishad जिल्हा परिषद |
| ZP Act | Maharashtra Zilla Parishad and Panchayat Samitis Act, १९६१ महाराष्ट्र जिल्हापरिषद आणि पंचायत समिती कायदा,१९६१ |

<u>तक्ता यादी</u>

| अनुक्रमांक | तपशील |
|---|---|
| १ | पूर्वीच्या राविआंचा तपशील |
| २ | आधीच्या राविआच्या शिफारशी |
| ३ | ५ व्या राविआने भेट दिलेल्या नागरी संस्था |
| ४ | राविआच्या प्रत्यक्ष भेटींचा तपशील |
| ५ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाची  नमुना संख्या/आकारमान |
| ६ | पंचायत राज्य संस्थाची  नमुना संख्या/आकारमान |
| ८ | २०१९-२०२५ या कालावधीतील वित्तीय प्रक्षेपण |
| ९ | जिपच्या विविध सेवामार्गाकडून मिळालेला निधी |
| १० | पंचायत राजचे वर्तमान स्थापत्य |
| ११ | जमीन महसूल उत्पन्नातील जिप आणि पंस उपकर तरतूद |
| १२ | सुयोग्य अनुदाना संबंधितची मार्गदर्शक तत्वे |
| १३ | जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचा जमीन महसुलावरील हक्क |
| १४ | जिप उपकर वसुली आणि वितरणाच्या पायऱ्या |
| १५ | जमीन महसूल उपक**रा**साठी **अवलंबावयाचे** नवीन तत्व |
| १६ | दिलेल्या  मुद्रांक शुल्काचा हिस्सा |
| १७ | मुद्रांक शुल्काचे सरासरी वितरण |
| १८ | कमकुवत जिल्हा परिषदेसाठी सुचविलेली मुद्रांक शुल्क वितरणाची गणणा |
| १९ | सुधारित १% हिस्सा विभागणी सूत्र |
| २० | जिल्हा परिषदेसाठी वितरित वन अनुदान रक्कम |
| २१ | या वर्षामध्ये वन अनुदानामध्ये आलेला उतार |
| २२ | टप्प्यानुसार वन अनुदान मिळणाऱ्या जिल्ह्यांची संख्या |
| २३ | वन महसूल आणि परिमोचित (प्रत्यक्ष मुक्त) केलेला निधी |
| २४ | जिल्हा परिषदेचे करेतर उत्पन्नाचे स्त्रोत |
| २५ | जिल्हा परिषद एकूण उत्पन्न व जिल्हा परिषद व्याज उत्पन्न |
| २६ | जिप, पंस आणि ग्रामपंचायत यांच्यासाठी १३व्या केंविआ अनुदान |
| २७ | जिल्हा परिषद उपकर उत्पन्नाच्या विविध स्त्रोतांचे घटक |
| २८ | जिल्हा परिषदेचे अनिवार्य खर्च (क्षेत्रनिहाय) |
| २९ | जिल्हा परिषद अनिवार्य खर्च तीन वर्षाची सरासरी ( २०१५-१८) |
| ३० | जिल्हा परिषदचा तीन वर्षाचा सरासरी वार्षिक खर्च (२०१५-१६,२०१६-१७ आणि २०१७-१८) |
| ३१ | क्षेत्रीय पाणी पुरवठा योजनांची संख्या आणि क्षेत्रीय पाणी पुरवठा योजनेत सामाविष्ट ग्राम पंचायती |
| ३२ | हातपंप आणि उर्जा पंप यांच्या वापराचा खर्च आणि कर संकलन |
| ३३ | जिल्हा परिषदेकडून वर्ग केलेल्या एकूण योजनांची रक्कम |
| ३४ | रस्ते देखभालीसाठी जिल्हा परिषदेस दिलेले अतिरिक्त अनुदान |

| | |
|---|---|
| ३५ | मुख्यमंत्री ग्राम सडक  योजना आणि प्रधानमंत्री ग्राम सडक योजनांसाठी दिलेला निधी |
| ३६ | संक्षिप्त शिफारशी |
| ३७ | जिल्हा परिषद व पंचायत समिती अशासकीय सदस्य विद्यमान मानधन |
| ३८ | पंचायत समितिच्या स्वत:च्या उत्पन्नाचे स्त्रोत |
| ३९ | पंचायत समितीच्या तीन वर्षाच्या उत्पन्नाची सरासरी (२०१५-१८) |
| ४० | लोकसंख्येनुसार ग्रामपंचायतींचे प्रवर्ग |
| ४१ | ३००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींमधील मालमत्ता करातील बदल |
| ४२ | ३०००-५००० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींमधील मालमत्ता करातील बदल |
| ४३ | ५०००-१०००० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींमधील मालमत्ता करातील बदल |
| ४४ | १०००० पेक्षा जास्त  लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींमधील मालमत्ता करातील बदल |
| ४५ | परिनगरीय (पेरी अर्बन) ग्रामपंचायतींमधील मालमत्ता करातील बदल |
| ४६ | पंचायती उपबंध अनुसार विस्तारित करण्यात आलेल्या अनुसूचित क्षेत्रांतील (PESA- पंचायती संबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम,१९९६) ग्रामपंचायतींमधील मालमत्ता करातील बदल |
| ४७ | महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम कलम १२४ मध्ये तरतुद करण्यात आलेले करांचे प्रकार |
| ४८ | किरकोळ खनिजे -२०१३-१४ ते २०१५-१६ पासून देण्यात आलेले मानधन |
| ४९ | निवडक ग्रामपंचायतींना दिली जाणारी जुनी भरपाई अनुदाने |
| ५० | ग्रामपंचायतींचा प्रति वर्ष विद्युत यूनिटस वापर आणि एमएसइडीसीएल कंपनीला अदा केलेल्या रकमांचा तपशील |
| ५१ | सरपंचांचे सध्याचे मानधन आणि शिफारशी करण्यात आलेले मानधन |
| ५२ | शासनाद्वारे ग्रामपंचायतींसाठी वेतनाची प्रतिपूर्ती |
| ५३ | एमएसईडीसीएलद्वारे कळविण्यात आलेली विद्युत शक्तीची देयके |
| ५४ | केंद्र शासनाद्वारे ग्रामपंचायतींना अदा करण्यात आलेली केंद्र वित्त आयोगाची अनुदाने |
| ५५ | निम्नलिखित वर्षांमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना (MGNREGS) अंर्तगत करण्यात आलेला खर्च |
| ५६ | ३००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची संरचना |
| ५७ | ३०००-५००० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची संरचना<br>(तीन वर्षे -२०१५-२०१६ ते २०१७-२०१८) |
| ५८ | ५०००-१०००० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची संरचना<br>(तीन वर्षे -२०१५-२०१६ ते २०१७-२०१८) |
| ५९ | १०००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची संरचना<br>(तीन वर्षे -२०१५-२०१६ ते २०१७-२०१८) |
| ६० | उपनगरीय सीमेलगतच्या ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची संरचना<br>(तीन वर्षे -२०१५-२०१६ ते २०१७-२०१८) |
| ६१ | पंचायती उपबंध अनुसार विस्तारित करण्यात आलेल्या अनुसूचित क्षेत्रांतील (पेसा-पंचायती संबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम,१९९६) ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची संरचना<br>(तीन वर्षे -२०१५-२०१६ ते २०१७-२०१८) |

| | |
|---|---|
| ६२ | **३००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीच्या खर्चाची संरचना**<br>**(तीन वर्षे -२०१५-२०१६ ते २०१७-२०१८)** |
| ६३ | **३०००-५००० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीच्या खर्चाची संरचना**<br>**(तीन वर्षे -२०१५-२०१६ ते २०१७-२०१८)** |
| ६४ | **५०००-१०००० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीच्या खर्चाची संरचना**<br>**(तीन वर्षे -२०१५-२०१६ ते २०१७-२०१८)** |
| ६५ | **१०००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीच्या खर्चाची संरचना**<br>**(तीन वर्षे -२०१५-२०१६ ते २०१७-२०१८)** |
| ६६ | **उपनगरीय सीमेलगतच्या ग्रामपंचायतीच्या खर्चाची संरचना**<br>**(तीन वर्षे -२०१५-२०१६ ते २०१७-२०१८)** |
| ६७ | **पंचायती उपबंध अनुसार विस्तारित करण्यात आलेल्या अनुसूचित क्षेत्रांतील (PESA- पंचायती संबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम,१९९६) ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची संरचना**<br>**(तीन वर्षे -२०१५-२०१६ ते २०१७-२०१८)** |
| ६८ | **तामिळनाडू आणि गुजरात राज्यांची व्यावसायिक कर संकलन आकडेवारी** |
| ६९ | **प्रत्येक जिल्हयात वितरित करण्यात आलेली जिल्हा ग्राम विकास निधीची (DVDF) रक्कम** |
| ७० | **स्वच्छतागृहांच्या देखभालीसाठी दरमहा लागणाऱ्या निधींचे व्यापक अंदाज** |
| ७१ | **ग्रामसेवकांच्या क्षमता विकासासाठी खर्च करण्यात आलेला निधी** |
| ७२ | अधिनियमित अंमलबजावणी |
| ७३ | नागरी क्षेत्रांचे लोकसंख्येवर आधारित वर्गीकरण |
| ७४ | महानगरपालिकांचे वर्गीकरण (दिनांक ०१-०९-२०१४ च्या शासननिर्णयानुसार ) |
| ७५ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रकार आणि त्यांचा २०११ च्या जनगणनेनुसार नागरी लोकसंख्येतील वाटा |
| ७६ | मुंबई महानगर क्षेत्रातील लोकसंख्या |
| ७७ | वेगवेगळ्या श्रेणींतील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकसंख्येची दशकातील वाढ |
| ७८ | महानगरपालिकांमधील लोकसंख्येची घनता |
| ७९ | **लोकसंख्या आणि कर्मचारी संख्या / १०० व्यक्ती** |
| ८० | महानगरपालिकांना वस्तू व सेवा कर नुकसान भरपाई (जीएसटी) |
| ८१ | एकत्रित मालमत्ता कर उत्पन्न आणि अन्य कर उत्पन्न |
| ८२ | महानगरपालिकांचा करेतर महसूल |
| ८३ | नगरपरिषदांचा करेतर महसूल |
| ८४ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतील नियुक्त करांची गत चार वर्षांतील सरासरी |
| ८५ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरित केलेले अतिरिक्त मुद्रांक शुल्क |
| ८६ | स्थानिक संस्था कर (एलबीटी) रद्द केल्याच्या बदल्यात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात आलेली अनुदाने |

| | |
|---|---|
| ८७ | चार वर्षांसाठी वितरीत करण्यात (२०१४-१५ ते२०१७-१८) आलेली साहाय्यक अनुदान आणि महसुली अनुदाने |
| ८८ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात आलेली केंद्रीय वित्त आयोग अनुदाने |
| ८९ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या महसुली उत्पन्नाचे सर्वकष विश्लेषण |
| ९० | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची सरासरी भांडवली अनुदाने |
| ९१ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा सरासरी महसुली खर्च |
| ९२ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे सरासरी उत्पन्न आणि खर्च (आय-व्यय) |
| ९३ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा दरडोई उत्पन्न आणि खर्च |
| ९४ | पूर्ण पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मानकानुसार किंमत |
| ९५ | मानकानुसार किंमतीच्या वितरणासाठी शहरे निवडीसाठीचे निकष |
| ९६ | मागील तीन वर्षांसाठीचा अर्थसंकल्पीय खर्च |
| ९७ | नागरी स्थानिक संस्थांना दिलेली भांडवली अनुदाने |
| ९८ | नागरी स्थानिक संस्थांना दिलेली महसुली अनुदाने |
| ९९ | अ + आणि अ वर्ग महानगरपालिकांना मेट्रो रेल्वे प्रकल्पांसाठी कर्ज |
| १०० | स्वच्छ भारत कार्यक्रमासाठी  दिलेला निधी |
| १०१ | केंद्रीय वित्त आयोगाने दिलेले निधी |
| १०२ | नागरी स्थानिक संस्थांना मिळालेले संयुक्त निधी |
| १०३ | व्यवसाय कराचे वर्तमान संकलन |
| १०४ | वडोदरा महानगरपालिकेने केलेली व्यवसाय कर वसुली |
| १०५ | पेटलाड नगरपालिकेने केलेली व्यवसाय कर वसुली |
| १०६ | गुजरातमधील व्यवसाय कर वसुली |
| १०७ | गुजरातमधील वसुली यंत्रणांची व्यवसाय कर रक्कमेची धारणा |
| १०८ | **व्यवसाय करासाठीचे प्रस्तावित बदलाचा सारांश** |
| १०९ | शिक्षण आणि रोजगार हमी योजना उपकर वसुली |
| ११० | शिफारस केलेले सवलत दर |
| १११ | प्रत्यक्ष देण्यात आलेले सहायक अनुदान |
| ११२ | साहाय्यक अनुदानाचा  वार्षिक सीएजीआर |
| ११३ | शिक्षकांच्या वेतनाच्या प्रतिपूर्तीची शिफारस केलेली टक्केवारी |
| ११४ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी नळाद्वारे पाणी पुरवठ्याचा खर्च |
| ११५ | पंपाने पाणी खेचण्यासाठी ऊर्जेचा वापर |
| ११६ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासाठी शिफारस केलेले निर्लेखन |
| ११७ | निवडणूक खर्चासाठी शिफारस केलेला खर्च |
| ११८ | तिर्थस्थळांसाठी थेट सरकारी अनुदान |
| ११९ | MUINFRA कडून वितरीत झालेली कर्जे |
| १२० | (MUIF )द्वारे वितरीत झालेली अनुदाने |
| १२१ | स्वच्छ भारत अभियानासाठी वितरीत झालेले अनुदान |
| १२२ | अग्निशमन सेवांच्या बळकटीकरणासाठी वितरीत करण्यात आलेले निधी |
| १२३ | १३ व्या केविआच्या शिफारशींवर सरकारने केलेली कार्यवाही |

| | |
|---|---|
| १२४ | १४ व्या केविआच्या शिफारशींवर सरकारने केलेली कार्यवाही |
| १२५ | पंचायत राज संस्था आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या बाबतीत लेखापरिक्षण संस्थांची विद्यमान स्थिती |
| १२६ | केविआने केलेले अनुदान वाटपाकरीताचे सूत्र |
| १२७ | पंचायत राज संस्थाच्या विमुक्त निधीचा सारांश |
| १२८ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या विमुक्त निधीचा सारांश |

# <u>आलेख यादी</u>

| | |
|---|---|
| १ | तूटी चा कल (राज्यातंर्गत स्थुल उत्पादन %) (२००५-०६ ते२०१८-१९ (अर्थसंकल्पीय अंदाज) |
| २ | प्राप्तीतील कल (रुपये कोटी) (२००३-०४ ते २०१३-१४(अर्थसंकल्पीय अंदाज) |
| ३ आणि ४ | महसूलप्राप्तीचा कल ( रुपये कोटी) आणि एकूण महसूलप्राप्ती मधील हिस्सा |
| ५ आणि ६ | स्वत:च्या कर महसुलाचे घटक (स्वत:चा कर महसूलातील २०१६-१७ आणि २०१८-१९ (अर्थसंकल्पीय अंदाज) मधील % हिस्सा) |
| ७ | स्वत:च्या कर महसुलाचा कल (रु.कोटी) |
| ८ | करेतर महसूल (रुपये कोटी) आणि एकूण महसूलातील (२००५-०६ ते २०१८-१९) टक्केवारी |
| ९ | केंद्रिय करांच्या हस्तांतरणामधील कल (रुपये कोटी) |
| १० आणि ११ | केंद्र सरकारकडून येणाऱ्या सहायक अनुदानातील कल (रुपये कोटी मध्ये) आणि वृद्धी (%, वार्षिक) |
| १२ | महसुली आणि भांडवली खर्चाचा कल (स्थूल राज्यातंर्गत उत्पादनाची % ) |
| १३ | वेतन, निवृत्ती वेतन आणि व्याज देयकाचा महसुली प्राप्तीतील % हिस्सा (२००८-०९ ते २०१८-१९ (अर्थसंकल्पीय अंदाज)) |
| १५ | कर्ज संरचना(%, २०१७-१८) |
| १६ | महसूल प्राप्तीतील व्याजाच्या % चा कल |
| १७ | जिल्हा परिषद § सरासरी स्वत:चे उत्पन्न |
| १८ | जिल्हा परिषदेच्या जिल्हा निधी साठी उत्पन्नाची साधने |
| १९ | जिल्हा परिषदेची स्वउत्पन्नाची साधने |
| २० | वन अनुदानाची वितरण प्रक्रिया |
| २१ | टक्केवारी नुसार जिल्हा परिषदेच्या स्वत:च्या एकूण उत्पन्नाचे भाग |
| २२ | जिप खर्च § घटक |
| २३ | ग्रामपंचायतींचे विश्लेषण -लोकसंख्येच्या आकारमानावर आधारित |
| २४ | ग्रामपंचायतींच्या विविध प्रवर्गात राहणाऱ्या ग्रामीण लोकसंख्येची टक्केवारी |
| २५ | ग्रामपंचायतींच्या उत्पन्नाचे स्रोत |
| २५अ | योजनांची प्रातिनिधीक यादी ज्यासाठी ग्रामपंचायतीला निधी प्राप्त होतात. |
| २६ | विविध ग्रामपंचायतींच्या प्रवर्गांमधील नियुक्त कर उत्पन्नाचा हिस्सा |
| २७ | वेगवेगळ्या नागरी श्रेणींतील लोकसंख्येचा वाटा दर्शवणारी वेन आकृती |
| २८ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नाचे स्रोत |
| २९ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अन्य उत्पन्नाचे स्रोत |
| ३० | स्वकर उत्पन्नाचे विश्लेषण |
| ३१ | अ वर्ग नगरपरिषदांमधील नियुक्त करांचे विश्लेषण |
| ३२ | ब वर्ग नगरपरिषदांमधील नियुक्त करांचे विश्लेषण |
| ३३ | क वर्ग नगरपरिषदांमधील नियुक्त करांचे विश्लेषण |

| | |
|---|---|
| ३४ | नगरपंचायतींमधील नियुक्त करांचे विश्लेषण |
| ३५ | महानगरपालिकांद्वारे मिळालेली अनुदाने |
| ३६ | विविध श्रेणीच्या नगर परिषदांना मिळलेल्या एकूण सहाय्यक अनुदानाचा भाग |
| ३८ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकूण सरासरी उत्पन्नात १४व्या वित्त आयोगाच्या अनुदानांचा वाटा |
| ३९ | ड वर्ग महानगरपालिकांच्या महसुलाचे विश्लेषण |
| ४० | अ वर्ग नगरपरिषदांच्या महसुली योगदानाचे विश्लेषण |
| ४१ | ब वर्ग नगरपरिषदांच्या महसुली योगदानाचे विश्लेषण |
| ४२ | क वर्ग नगरपरिषदांच्या महसुलाचे विश्लेषण |
| ४३ | ड वर्ग महानगरपालिकेचा महसुली खर्च |
| ४४ | अ वर्ग नगर परिषदेचा महसुली खर्च |
| ४५ | ब वर्ग नगर परिषदेचा टक्केवारीनिहाय महसुली खर्च |
| ४६ | क वर्ग नगर परिषदेचा टक्केवारीनिहाय महसुली खर्च |
| ४७ | नगर पंचायतींचा महसुली खर्च |
| ४८ | MUINFRA  ने दिलेली कर्जे – क्षेत्रीय विश्लेषण |

# प्रकरण १

## प्रस्तावना

भारतीय संविधानाच्या कलम २४३(आय) आणि २४३ (वाय) अंतर्गत राज्य वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतुदी) कायदा, १९९४ अन्वये महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाची स्थापना, कालावधी आणि पद्धती देण्यात आली आहे. महाराष्ट्राच्या राज्यपालांनी अधिसूचना क्रमांक एसएफसी.२०१७/प्र.क्र. ३३/ एफ़सीसी दिनांक २८ मार्च, २०१८ अन्वये पाचव्या महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाची स्थापना केली आहे.

पाचव्या राज्य वित्त आयोगाची स्थापनेच्या आदेशामध्ये श्री. विश्वनाथ गिरिराज, (निवृत्त भाप्रसे) यांची अध्यक्ष म्हणून नियुक्तीचा अंतर्भाव केला होता. तसेच या आदेशान्वये सदस्य सचिव हे पद निर्माण केलेले होते. श्रीमती(डॉ.) निधी पांडे (भाप्रसे) यांच्याकडे ऑगस्ट, २०१८ मध्ये सदस्य सचिव या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला. त्यानंतर नोव्हेंबर, २०१८ मध्ये आयोगामध्ये खालील तीन अर्ध वेळ सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आणि अशा प्रकारे आयोग पूर्ण स्वरुपात स्थापन झाला.

१) प्रधान सचिव, नगर विकास विभाग
२) प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग
३) प्राध्यापक अभय पेठे, अर्थतज्ज्ञ, अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरण शाळा मुंबई, मुंबई विद्यापीठ, मुंबई

आयोगाचा सुरुवातीचा कालावधी अधिसूचना जारी करण्यात आली त्या दिवसापासून म्हणजेच तद्नंतर दि.२८ फेब्रुवारी, २०१८ पासून दहा महिन्यांचा होता.दि.१७ जानेवारी, २०१९ च्या अधिसुचनेनुसार हा कालावधी दि.२० एप्रिल,२०१९ पर्यंत वाढविण्यात आला, अशा प्रकारे एकूण कालावधी १३ महिन्यांचा करण्यात आला .

शासनाने मे,२०१८ मध्ये आयोगाच्या कर्मचारी पदांना मंजूरी दिली होती. कर्मचारी मंजूरी आदेशामध्ये निवृत्त व्यक्ती तसेच बाहेरील व्यक्ती आणि समान संवर्गातून नेमणूकींची तरतूद करण्यात आलेली असून आयोगाला आवश्यक ती मुभा देण्यात आली होती. राज्य वित्त आयोग (राविआ) यांस पूर्ण वेळ नियमित कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्यात येणार नाही याची जाणीव असल्याने कर्मचा-यांची पदे निवृत्त व्यक्ती तसेच समान संवर्गातून भरण्यात आली आहेत. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था तसेच गोखले अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र संस्था यांनी बाह्यस्रोत आधारे काही विशेषज्ज्ञ पुरविले आहेत. आम्ही प्राईस वॉटर हाऊस कुपर्स खाजगी संस्थे मधून काही सल्लागार नेमले आहेत. अगदी शेवटच्या क्षणापर्यंत सर्व पदे भरली गेली नाहीत.

आयोगाचे कामकाज ३रा मजला, खंबांटा ट्रस्ट बिल्डींग, चर्चगेट, मुंबई-४०००२० येथून केले गेले.

**आयोगाच्या संदर्भ अटी:**

२८ मार्च,२०१८ रोजीच्या शासकीय अधिसूचनेनुसार पाचवा राज्य वित्त आयोग गठीत करतांना आयोगाने खालील बाबींच्या संदर्भाने शिफारशी करणे आवश्यक केले आहे:

आयोग पंचायती आणि महानगरपालिकांच्या वित्तीय स्थितीचा आढावा घेईल आणि राज्यपालांना शिफारशी करेल

१. संचलना करीताची तत्वे...

   i. राज्याला कर, शुल्क, टोल व फी यांमुळे होणारे निव्वळ उत्पन्नाचे राज्य, नगरपालिका आणि पंचायतीमधील वाटप संविधानाच्या भाग नऊ आणि नऊ-अ (ए) अन्वये आणि अशा उत्पन्नाच्या आपापल्या वाटणीच्या स्तरावर पंचायत व नगरपालिकांमध्ये हेउत्पन्न विभागण्यात येईल.

   ii. कर, शुल्क, टोल व फी यांचे निर्धारण हे पंचायतीद्वारे किंवा प्रकरणपरत्वे नगरपालिकांद्वारे विनियोजित किंवा नेमून दिलेले असेल.

   iii. राज्याच्या संकलित उत्पन्नातून पंचायती आणि नगरपालिकांना सहाय्यक अनुदान देण्यात येते.

   स्थानिक स्वराज्य संस्थांची वित्तीय स्थिती सुधारण्याकरीता आवश्यक उपाययोजना.

शिफारशी करीत असतांना इतर बाबींसोबतच आयोग खालील बाबींचा विचार करेल...

   i. १ एप्रिल,२०१९ पासून पुढील पाच वर्षांकरीता राज्यातील पंचायती आणि नगरपालिका यांच्या करस्तराच्या आधारे त्यांचा जमा महसूल आणि महसूल खर्च यांमधील प्रकल्पित दरी/ तफावत.

   ii. ग्रामपंचायती आणि नगरपालिकांनी त्यांच्या उपलब्ध आणि संभाव्य महसूल स्त्रोतांचा कितपत वापर केला तसेच त्याबाबत केलेली उपाययोजना.

   iii. राज्य शासनाचे स्त्रोत आणि विशेषत: नागरी प्रशासन, पोलीस, सामाजिक आणि वित्तीय सेवा तसेच इतर सर्व अनिवार्य खर्च किंवा दायित्वावरील खर्च आणि अनियोजित महसुली खर्च याबाबतीतील मागण्या;

   iv. पंचायती आणि नगरपालिका यांच्या भांडवली मत्तांचे परिरक्षण आणि निगा तसेच पुरेशा देखभालीकरीता/ निगेकरीता निकष तयार करणे.

पुर्वोक्त विविध बाबींवर शिफारशीं करण्याकरीता, आयोग सन २०११ च्या जनगणनेमधील लोकसंख्येची आकडेवारी वर आधारी असून कर आणि कर्तव्ये तसेच अनुदान यांच्या विचलन(विचलन) निश्चितीकरीता लोकसंख्या हा महत्वाचा घटक मानण्यात येईल.

खालील बाबींच्या संदर्भातही आयोग शिफारशी करेल.

i. स्थानिक संस्थाकरीता कार्यक्षमता अनुदान आणि प्रोत्साहनपर अनुदान
ii. स्थानिक संस्थामध्ये निधी व्यवस्थापनाचे अधिक चांगले व्यवस्थापन

क. स्थानिक संस्थामध्ये दूरदर्शी/सुजाण वित्तीय व्यवस्थापना संदर्भात संबंधित इतर बाबी

आयोग कोणत्या बाबींच्या आधारे अनुमानापर्यंत पोहचले त्या निदर्शनास आणून देईल. आयोग कोणत्या माहितीच्या आधारे शिफारशी करीत आहे याबाबतची सर्व संबंधित माहिती उपलब्ध करुन देईल.

हा आयोग १४ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशींच्या आधारे देखील शिफारशी करू शकतो.

**राविआच्या अहवालाचे स्वरुप:**

राविआने अहवाल तयार करतांना १३ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या अहवालातील परिशिष्ट १०.५ मध्ये दिलेल्या स्वरुपाचे जास्तीत जास्त अनुसरण केले आहे.

पाचव्या राविआच्या संदर्भातील सर्व अधिसूचना या अहवालाच्या परिशिष्टामध्ये उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

# प्रकरण २

## यापूर्वीचे राज्य वित्त आयोग- संरचना आणि शिफारशी

२.१पूर्वीच्या राज्य वित्त आयोगांची(राविआ) संरचना आणि शिफारशी खालील प्रमाणे आहेत:

संरचना

**तक्ता१: पूर्वीच्या राविआंचा तपशील**

| राज्य वित्त आयोग | राविआ-१ | राविआ-२ | राविआ-३ | राविआ-४ |
|---|---|---|---|---|
| राविआ स्थापनेची तारीख | २३.०४.१९९४ | २२.०६.१९९९ | १५.०१.२००५ | १०.०२.२०११ |
| राविआ अहवाल सादर केल्याची तारीख | ३१.०१.१९९७ | ३०.०३.२००२ | ३०.०६.२००६ | १६.०७.२०१५ |
| कार्यवाही अहवाल सादर केल्याची तारीख | ३१.०१.१९९७ | ३०.०३.२००२ | २०.१२.२०१३ | २३.०३.२०१८ |
| शिफारस कालावधी | १९९६-९७ ते २०००-०१ | २००१-०२ ते २००५-०६ | २००६-०७ ते २०१०-११ | २०११-१२ ते २०१५-१६ |
| आयोगाचे सदस्य | **अध्यक्ष:**<br>१)श्री.शांताराम घोलप<br>२)श्री.सुरेश प्रभु<br>३)श्री.मकरंद हेरवडकर<br>**सदस्य सचिव**<br>१)श्री.आर.सी. सिन्हा<br>२) श्री.पी.पी.महाना<br>**सदस्य:**<br>१)श्री.डी.एम.सुकटनकर<br>२)श्रीमती.प्रभावती झाडबुके<br>३)श्री.संतोषराव गोडे<br>४)श्री.दिवाकर कळसुळकर<br>५)श्री.विजय तातेड<br>६)श्री. श्रीपाद पटवारी | **अध्यक्ष:**<br>१)श्री.के.सी.श्रीवास्तव<br>२)श्री.आर.वासुदेवन<br>३)श्री.एस.हबीबउल्ला<br>**सदस्य सचिव**<br>१)डॉ.मुन्शिलाल गौतम<br>२) श्रीमती.रंजना सिन्हा<br>३) श्री.एम.रामस्वामी<br>४) श्री जी. एस.संधु<br>**सदस्य:**<br>१)श्री.नारायनराव मराठे<br>२)श्री.चुन्निलाल ठाकूर<br>३)डॉ.माया लाडवाणी<br>४)प्रिंसीपाल पी.बी.पाटील<br>५)प्रो.मुकुन्द घैसास<br>६)श्री.विजय भैसे<br>७)श्री.विजय नवल पाटील | **अध्यक्ष:**<br>१)श्री.व्ही.एम.लाल<br>२)श्री.सतिश त्रिपाठी<br>**सदस्य सचिव**<br>१) श्री.एस.के.श्रीवास्तव<br>**सदस्य:**<br>१)प्रो.प्रदीप आपटे<br>२)श्री.जीवनराव गोरे | **अध्यक्ष:**<br>१) श्री.जे.पी.डांगे<br>**सदस्य सचिव**<br>१)एस.के.बिस्वास<br>२) श्री.अरविंद कुमार<br>३) श्री.पी.ई.गायकवाड<br>**सदस्य:**<br>**(आधिकारपरत्वे):**<br>१)प्रधान सचिव न वि (२)<br>२) प्रधान सचिव ग्राम विकास विभाग<br>३) सचिव लेखा आणि कोषागरे, वित्त विभाग |
| | | | | |
| आयोगाचे सदस्य | **अध्यक्ष:**<br>१)श्री.शांताराम घोलप<br>२)श्री.सुरेश प्रभु<br>३)श्री.मकरंद हेरवडकर<br>**सदस्य सचिव**<br>१) श्री. आर.सी.सिन्हा<br>२) श्री.पी.पी.महाना<br>**सदस्य:**<br>१)श्री.डी.एम.सुकटनकर<br>२)श्रीमती.प्रभावती झाडबुके | **अध्यक्ष:**<br>१)श्री.के.सी.श्रीवास्तव<br>२)श्री.आर.वासुदेवन<br>३)श्री.एस.हबीबउल्ला<br>**सदस्य सचिव**<br>१)डॉ.मुन्शिलाल गौतम<br>२) श्रीमती.रंजना सिन्हा<br>३) श्री.एम.रामस्वामी<br>४) श्री जी. एस.संधु<br>**सदस्य:**<br>१)श्री.नारायनराव मराठे | **अध्यक्ष:**<br>१)श्री.व्ही.एम.लाल<br>२)श्री.सतिश त्रिपाठी<br>**सदस्य सचिव**<br>१) श्री.एस.के.श्रीवास्तव<br>**सदस्य:**<br>१)प्रो.प्रदीप आपटे<br>२)श्री.जीवनराव गोरे | **अध्यक्ष:**<br>१) श्री.जे.पी.डांगे<br>**सदस्य सचिव**<br>१)एस.के.बिस्वास<br>२) श्री.अरविंद कुमार<br>३)श्री.पी.ई. गायकवाड<br>**सदस्य:**<br>**(आधिकारपरत्वे):**<br>१)प्रधान सचिव न वि (२)<br>२) प्रधान सचिव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ३)श्री.संतोषराव गोडे<br>४)श्री.दिवाकर कळसुळकर<br>५)श्री.विजय तातेड<br>६)श्री. श्रीपाद पटवारी | २)श्री.चुन्निलाल ठाकूर<br>३)डॉ.माया लाडवाणी<br>४)प्रिंसीपाल पी.बी.पाटील<br>५)प्रो.मुकुन्द घैसास<br>६)श्री.विजय भैसे<br>७)श्री.विजय नवल पाटील | | ग्राम विकास विभाग<br>३) सचिव<br>लेखा आणि कोषागरे, वित्त विभाग |

## २.२ आधीच्या वित्त आयोगाने केलेल्या सूचना

तक्ता २: आधीच्या राविआच्या शिफारशी:

| अनु.क्र. | राविआ आयोग | एकूण सुचनांची संख्या | थेट वित्तीय भार | अप्रत्यक्ष वित्तीय भार | | प्रशासकीय सुधारणा | इतर सूचना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वित्तीय संबंधातील | प्रशासकीय सुधारणा | | |
| १ | प्रथम | १२८ | २१ | ८ | १५ | ७० | १४ |
| २ | द्वितीय | २२७ | ३१ | ३३ | ३८ | ६९ | ५६ |
| ३ | तृतीय | ११४ | २३ | ८ | ३ | ६६ | १४ |
| ४ | चतुर्थ | ११८ | २३ | | ३८ | ५७ | ० |

# प्रकरण ३

## राज्य वित्त आयोग- स्वीकृत कार्यपद्धती

आयोगाने आवश्यक ती माहिती मिळविण्याकरीता आणि तिचे विश्लेषण करण्याकरीता बहुआयामी धोरण स्वीकारले आहे. प्रत्येक पद्धती दुसऱ्या पद्धतीला पूरक होती आणि आम्हाला प्राप्त झालेले निष्कर्ष तसेच आमच्या शिफारशी या सर्व प्रयत्नावर आधारित आहेत.

### ३.१ पुर्वीच्या अहवालांचे आणि संबंधित दस्त-ऐवजांचे विश्लेषण:

आयोगाने विविध अधिकृत अहवाल जमवून त्यांचा अभ्यास करण्यापासून त्यांच्या कामाची सुरुवात केली, सदर अहवाल तयार करत असतांना स्थानिक संस्थाबाबत माहिती जमा करण्याचा तोच ◦प्रवास◦ करण्यात आला आहे. ऐतिहासिक बाबी आणि उचित यथार्थदर्शन समजून घेण्याकरीता खालील अहवाल उपयुक्त ठरले आहेत.

- १२ व्या केंद्रिय वित्त आयोगाचा अहवाल (२००५-१०), १३ व्या केंद्रिय वित्त आयोगाचा अहवाल (२०१०-१५), १४ व्या केंद्रिय वित्त आयोगाचा अहवाल (२०१५-२०) विशेषत: या अहवालातील स्थानिक संस्थावरील प्रकरण.
- १५व्या केंद्रिय वित्त आयोगाचा अहवालाकरीता (२०२०-२५) नुकतीच पाठवलेली माहिती.
- महाराष्ट्राचा तिसरा राज्य वित्त आयोग आणि चौथा राज्य वित्त आयोगावरील अहवाल. विशेषत: तिसऱ्या वित्त आयोगाने खूप चांगले विश्लेषण केले असून अनेक अंतर्दृष्टीकोन दिले आहेत. आमच्या कामकाजाच्या संपूर्ण वर्षामध्ये आम्ही सदर अहवालास वस्तुत: संदर्भ पुस्तक म्हणून वापरले.
- ओरीसा, कर्नाटक आणि तामिळनाडूचे राविआचे अहवाल. यामध्ये तामिळनाडूचा अहवाल अगदी सुबोधरित्या सादर करण्यात आलेला आहे आणि या अहवालाचा देखील आम्ही हस्तपुस्तिका म्हणून उपयोग केला.
- इतर विविध विद्वत्तापूर्ण अहवाल जसे की भारत शासनाने प्रसिध्द केलेला ◦नागरी धोरणाचा आराखडा मसुदा, प्रोफे.अभय पेठे(मुंबई विद्यापीठ) आणि इतरांचे विद्वत्तापूर्ण प्रबंध आणि अभ्यास.

### ३.२ नागरी स्वराज्य संस्था आणि पंचायत राज संस्था यांच्या पदाधिकाऱ्यांना त्यांच्या प्रतिनिधीत्वाबद्दल पाठवलेली पत्र:

आयोगाने सुरुवातीच्या काळात (ऑगस्ट, २०१८) सर्व महानगरपालिकांच्या महापौरांना, नगरपालिकांच्या अध्यक्षांना आणि जिल्हापरिषदेच्या अध्यक्षांना त्यांच्या प्रतिनिधीत्वाकरीता तसेच राज्य वित्त आयोगाला शिफारशी द्याव्यात म्हणून औपचारीक पत्र पाठविली होती, त्यांना निवेदने सादर करण्याकरिता पुरेसा वेळ दिला होता. आम्हाला कोणताही लेखी प्रतिसाद मिळालेला नाही परंतु

वेळोवेळी केलेल्या क्षेत्रीय भेटीच्यावेळी अनेक पदाधिकाऱ्यांनी बैठकींमध्ये निवेदने सादर केली आणि अनेकांनी लेखी सादरीकरण देखील करण्यात आले.

### ३.३ पूर्वपहाणी भेटी आणि काळजीपूर्वक तयार केलेल्या प्रश्नावलीमधून माहिती गोळा करणे:

आयोगाने अगदी विस्तृत स्वरुपाची प्रश्नावली तयार केली आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना (महानगर पालिका, नगर पालिका आणि नगर पंचायतीं सर्वांना स्वतंत्र प्रश्नावली) तसेच पंचायत राज्य संस्थांना (जिल्हा परिषद आणि ग्राम पंचायती करीता स्वतंत्र प्रश्नावली) पाठविली. प्रश्नावली तयार करण्यापूर्वी आयोगाने खाली दिलेल्या विविध नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायत राज्य संस्थांना “पूर्वपहाणी” भेटी देऊन त्यांची कार्यपद्धती तसेच त्यांच्या समोरील आव्हाने समजून घेतली. याउपर प्रश्नावलीस अंतिम स्वरुप द्यायच्या प्रक्रियेदरम्यान देखील तसेच प्राप्त माहितीच्या सुसंगततेची पडताळणी करतांना आणि सदर माहिती इतरत्र उपलब्ध आहे की नाही हे पाहण्याकरीता आयोगाने स्थानिक संस्थांच्या अन्य भागांना भेटी दिल्या आहेत. सदर प्रक्रिया करतांना सुरुवातीच्या महिन्यांमध्ये आम्ही भेटी दिलेल्या स्थानिक संस्थांची यादी खाली दिली आहे (जून ते ऑक्टोबर, २०१८)

**तक्ता ३:५ व्या राविआने भेट दिलेल्या नागरी संस्था**

| अनु.क्र. | स्थानिय संस्थांची वर्गवारी | राविआ ने भेटी दिलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था |
|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद | नाशिक, यवतमाळ |
| २ | पंचायत समिती | दिंडोरी (नाशिक) आणि यवतमाळ ( यवतमाळ) |
| ३ | ग्रामपंचायत | ठाणे जिल्ह्यातील कसारा, आणि अवनखेड, नाशिक जिल्ह्यातील वाडीवऱ्हे |
| ४ | महानगर पलिका | नवी मुंबई, मिरा-भाईंदर, जळगाव |
| ५ | नगर पालिका | जळगाव जिल्हा- एरंडोल, जामनेर, भुसावळ, यवतमाळ, बदलापूर, कर्जत, खोपोली |
| ६ | नगर पंचायत | बाभुळगाव ( यवतमाळ जिल्हा)<br>बोदवड ( जळगाव जिल्हा) |

राविआने तयार केलेल्या मराठी प्रश्नावलीची सर्वत्र प्रशंसा करण्यात आली होती.

### ३.४. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यामधील प्रत्यक्ष भेटी (क्षेत्रीय भेटी)

आयोगाने ऑक्टोबर, २०१८ ते जानेवारी, २०१९ दरम्यान महाराष्ट्र राज्याचे सर्व क्षेत्र पूर्ण करीत विविध भागांना भेटी दिल्या. यामुळे स्थानिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना आम्हाला प्रत्यक्ष भेटण्याची तसेच या प्रत्यक्ष भेटी दरम्यान सादरीकरण करण्याची तसेच विचार मांडण्याची संधी प्राप्त झाली. आम्ही भेटी दिल्या त्या ठिकाणांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारी, कर्मचारी आणि (ऑक्टोबर, २०१८ ते जानेवारी, २०१९) पदाधिकारी तसेच भेट दिलेले जिल्हे याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

तक्ता ४: राविआच्या प्रत्यक्ष भेटींचा तपशील.

| अ.क्र. | विभाग | भेटीचे स्थान | जिल्हे |
|---|---|---|---|
| १ | कोकण | ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय | ठाणे आणि पालघर |
| | | पनवेल महानगर पालिका | रायगड |
| | | रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालय | रत्नागिरी (गणपतीपुळे ग्रामपंचायत क्षेत्र भेट) |
| | | सिन्धुदुर्ग जिल्हाधिकारी कार्यालय | सिन्धुदुर्ग-(मालवण,वेंगुर्ला, सावंतवाडी आणि देवगड येथील क्षेत्र भेटी सुध्दा) |
| २ | नाशिक | नाशिक विभागीय आयुक्त कार्यालय | नाशिक मधील सर्व जिल्हे |
| ३ | अमरावती | अमरावती विभागीय आयुक्त कार्यालय | अमरावती मधील सर्व जिल्हे |
| ४ | नागपूर | नागपूर विभागीय आयुक्त कार्यालय | नागपूर मधील सर्व जिल्हे |
| ५ | औरंगाबाद | औरंगाबाद विभागीय आयुक्त कार्यालय | औरंगाबाद, जालना, बीड आणि उस्मानाबाद |
| | | नांदेड जिल्हाधिकारी कार्यालय | नांदेड, परभणी, हिंगोली आणि लातूर |
| ६ | पुणे | पुणे विभागीय जिल्हाधिकारी कार्यालय | पुणे आणि सोलापूर |
| | | सातारा जिल्हाधिकारी कार्यालय | सातारा, सांगली आणि कोल्हापूर |

राविआच्या प्रत्यक्ष भेटी फारच यशस्वी ठरल्या आणि जिल्हापरिषद अध्यक्ष, महानगरपालिका महापौर तसेच नगर पालिका अध्यक्ष यांच्याकडून चांगलाच प्रतिसाद मिळाला. विशेषत: नगरपालिकांच्या महिला अध्यक्षांची मोठ्या प्रमाणातील उपस्थिती पाहून महिलांचा स्थानिक स्वराज्य संस्थेमधील सहभागाने आम्हाला समाधान वाटले. राविआच्या क्षेत्रीय भेटी दरम्यानच्या परस्पर संवादामध्ये त्यांनी खूप उत्साहाने भाग घेतला आणि  त्यांचे मुद्दे अगदी ठासून सांगितले. लोक प्रतिनिधीकडून आम्हाला अतिशय बहुमुल्य माहिती मिळाली, ज्यामुळे रविआचा दृष्टीकोन अधिक व्यापक झाला. आम्ही क्षेत्रीय भेटी दरम्यान ज्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला त्यांची यादी परिशिष्टामध्ये दिली आहे.

राविआने क्षेत्रीय भेटींमध्ये ॰उत्तम काम॰ करणाऱ्या स्थानिक संस्थांना भेटी दिल्या जसे की वेंगुर्ला, सांवतवाडी, मालवण, गणपतीपुळे,  मलकापूर (सातारा) आणि इतर काही ठिकाणे. राविआने प्रत्यक्ष भेटी दरम्यान प्रश्नावलीला मिळालेली उत्तरेही संकलित केली.

### ३.५ महाराष्ट्राबाहेरील ठिकाणांना प्रत्यक्ष भेटी:

अध्यक्षांनी (नोव्हेंबर २०१८) मध्ये तामिळनाडूच्या ४ थ्या राज्य वित्त आयोगाचे माजी अध्यक्ष श्री एस. क्रिष्णन, भाप्रसे यांच्याशी संवाद साधण्याकरीता तामिळनाडूला भेट दिली. त्यांनी नुकताच त्यांचा ४ था राज्य वित्त आयोग अहवाल सादर केला होता. यामुळे तुलनात्मक विचार करण्याससहाय झाले.

राविआचे अध्यक्ष आणि सदस्यांनी बडोदरा येथील व्यवसाय कराचा आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कामकाजाचा अभ्यास करण्याकरीता गुजराथमधील वडोदरा येथे भेट दिली. वडोदरा क्षेत्राच्या क्षेत्रीय संचालकांनी मुख्य अधिकाऱ्यासोबत आयोजित केलेली बैठक देखील फारच उपयुक्त ठरली.

### ३.६ तज्ञ, विभाग प्रमुख यांच्याशी फोनवर साधलेला संवाद आणि त्यांनी राविआच्या कार्यालयाला दिलेली वैयक्तिक भेट:

आयोगाने अनेक विभाग प्रमुख वा त्यांच्या प्रतिनिधींना राविआच्या कार्यालयात भेटीचे निमंत्रण दिले होते. यामध्ये महानगरपालिका प्रशासनाचे संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षणाचे संचालक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महावितरणचे मुख्य अभियंता, नगर विकास विभाग व ग्राम विकास विभाग तसेच महसूल आणि इतर विभागांचे सह/उप सचिव या महत्वाच्या अधिकाऱ्यांचा अंतर्भाव होता. आयोगाने विख्यात नागरी व्यवस्थापन विशेषज्ञांचे सहाय्य घेतले यामध्ये श्री.रामनाथ झा (निवृत्त भाप्रसे अधिकारी), श्री.ए. के. जैन (निवृत्त भाप्रसे अधिकारी), श्री.सुधीर श्रीवास्तव (निवृत्त भाप्रसे अधिकारी), श्री.जयराज फाटक (निवृत्त भाप्रसे अधिकारी) आणि इतरांचा समावेश होता. आयोगाने निमंत्रित केलेल्या आणि सल्ला घेतलेल्या सर्वांची यादी परिशिष्टामध्ये दिलेली आहे.

### ३.७ "वित्त, लेखापरिक्षण आणि वित्तीय माहिती (डेटा)" याबाबत तांत्रिक कार्यशाळांचे आयोजन:

आयोगाने ३ डिसेंबर, २०१८ रोजी लेखा आणि वित्त विषयाशी संबंधित समस्यावरील कार्यशाळेचे आयोजन केले होते. महालेखापाल यांनी या कार्यशाळेचे उदघाटन केले होते. या कार्यशाळेमध्ये नगर विकास विभाग व ग्राम विकास विभाग यांचे अधिकारी, महानगरपालिकांचे आयुक्त, मुख्य अधिकारी आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी सहभागी झाले होते. संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षक आणि त्यांच्या सहायक अधिकाऱ्यांनी देखील या कार्यशाळेमध्ये भाग घेतला होता. या कार्यशाळेमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखा विषयक समस्यांचे विविध पैलू समजण्यास मदत झाली.

### ३.८ नमुने संदर्भातील आव्हाने आणि समस्या:

आपले काम करतांना अवलंबनक्षम आणि विश्वासाहार्य माहिती (डेटा) मिळविणे ही राविआ समोरील सर्वात मोठी अडचण वा समस्या होती. आमच्या समोरील समस्या स्पष्टकरण्याकरीता आम्ही ग्राम पंचायतीमधून मिळालेल्या माहितीचा दाखला देतो. महाराष्ट्रामध्ये २८००० पेक्षाही जास्त ग्राम पंचायती

आहेत. आम्ही त्यांची सहा श्रेणींमध्ये विभागणी केली, १०,००० आणि त्याहून जास्त लोकसंख्या असलेल्या ग्राम पंचायती म्हणजे सर्वात मोठ्या ग्राम पंचायती, ५००० ते १०००० लोकसंख्या असलेल्या ग्राम पंचायती, ३००० ते ५००० लोकसंख्या असलेल्या ग्राम पंचायती, ३००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्राम पंचायती, परिनगरीय गावे आणि पेसा [पंचायती (अनुसुचित भागासाठी विस्तार) कायदा, १९६६] गावे. त्यानंतर आम्ही अर्थशास्त्र आणि सांख्यिकी संचालक यांच्याशी संवाद साधला, त्यांनी प्रत्येक श्रेणीतील महाराष्ट्राच्या सर्व भागातून ५% नमुने निवडावे असे सुचविले. यानुसार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पसरलेल्या १५०० ग्राम पंचायतीची निवड करण्यात आली.

तथापि, नंतर आम्ही जी प्रश्नावली परिसंचारित केली ती प्रश्नावली संबंधित ग्राम पंचायतीकडून भरून घेण्यात बराच वेळ गेला. बऱ्याचशा ग्रामपंचायतींनी ती चुकीची भरली होती, अयोग्य आणि अपुरी भरली होती. काही बाबतीत काही भाग बरोबर भरलेला होता तर काही भाग चुकीचा होता. अनेक अहवालामधील आकडेवारीमध्ये अंतर्गत विरोधाभास होता, त्यामुळे आम्हाला ती वापरताच आली नाही. आम्हाला असे आढळून आले की जिल्हापरिषद अधिकाऱ्यानीं क्षेत्रामधून भरून आलेल्या प्रश्नावल्या कोणत्याही प्रकारची तपासणी न करता तशाच पुढे पाठवून दिल्या होत्या, आम्ही वारंवार विनंत्या केल्या की आलेली माहिती तपासून मगच पाठवावी पण तसे काही झाले नाही. आमचा बराचसा वेळ क्षेत्रावरील अधिकाऱ्यांशी फोनवर पाठपुरावा करण्यातच खर्ची पडला, प्रश्नावली भरून पाठविण्याच्या प्रक्रियेला वेग द्या असे सांगण्यात गेला. एका जिल्ह्यातून तर चक्क पाच महिन्यांनी प्रतिसाद आला, खरं म्हणजे तेव्हा तर काम जवळ जवळ पूर्णत्वाला पोहचले होते.

यामुळे १५०० ग्राम पंचायती चे उददीष्ट ठेवले होते त्यापैकी आम्ही केवळ ३६ ग्राम पंचायतींचाच अभ्यास अगदी सखोलपणे करू शकलो, या ग्राम पंचायतींनी प्रश्नावली व्यवस्थित भरून दिली होती आणि त्यांचा प्रतिसाद आम्हाला सर्वार्थाने समाधानकारक वाटला.

राविआला इतर श्रेणीतील स्थानिक संस्थांच्या बाबतीतही अशाच प्रकारच्या अडचणींना तोंड द्यावे लागले. केवळ कमी संख्येने असलेल्या जिल्हा परिषदांच्या बाबतीत आम्हाला गुणवत्तापूर्ण माहिती सहज प्राप्त झाली.

यामुळेच कमी नमुन्यांसोबत काम करण्याखेरीज राविआकडे पर्याय नव्हता मात्र व्यवस्थित विश्लेषण करण्यासाठी मिळालेली माहिती सर्वांगाचे सुयोग्यपणे प्रतिनिधीत्व करेल याची दक्षता घेतली.

**३.९ विश्लेषण करण्याकरीता आम्ही नमुना म्हणून वापरलेल्या नागरी स्थानिक संस्थांची अंतिम संख्या:**

**तक्ता ५ : नागरी स्थानिक स्वराज्य संस्था नमुना संख्या/आकारमान**

| अनु.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची श्रेणी | निवड केलेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| १ | "ड" वर्ग महानगर पालिका | ०६ | महसूल विभागा नुसार प्रत्येकी एक |
| २ | "अ"वर्ग नगरपालिका | १२ | महसूल विभागा नुसार प्रत्येकी दोन |
| ३ | "ब" वर्ग नगरपालिका | १२ | महसूल विभागा नुसार प्रत्येकी दोन |
| ४ | "क" वर्ग नगरपालिका | १२ | महसूल विभागा नुसार प्रत्येकी दोन |
| ५ | नगर पंचायत | १२ | महसूल विभागा नुसार प्रत्येकी दोन |

**३.१० विश्लेषण करण्याकरीता आम्ही नमुना म्हणून वापरलेल्या पंचायत राज्य संस्थांची अंतिम संख्या:**

**तक्ता ६: पंचायत राज्य संस्था नमुना संख्या**

| अनु.क्र. | पंचायत राज संस्थाश्रेणी | निवड केलेल्या पंचायत राज संस्थांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद | ०६ | महसूल विभागा नुसार प्रत्येकी एक |
| २ | पंचायत समीती | १३ | महसूल विभागा नुसार प्रत्येकी दोन (औरंगाबाद विभागातील तीन) |
| ३ | ग्रामपंचायत | ३६ | प्रत्येक श्रेणीतील प्रत्येकी सहा (महसूल विभागातील प्रत्येकी सहा) |

*विश्लेषणाच्या उद्देशाने, ग्राम पंचायतींचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात आले होते.

# १०००० आणि त्यापेक्षा जास्त लोकसंख्या

#५०००-१०००० लोकसंख्या

#३०००-५००० लोकसंख्या

#३००० पेक्षा कमी लोकसंख्या

# परिनगरीय ग्राम पंचायती

# पेसा [पंचायती (अनुसुचित भागासाठी विस्तार) कायदा, १९६६] ग्राम पंचायती

नमुन्याचे एकंदर संख्या कमी असल्याचे दिसून येत असले तरी आम्हाला प्राप्त झालेले निष्कर्ष आम्ही क्षेत्रांना प्रत्यक्ष भेटी दिल्यानंतर आढळलेल्या नमुन्या बरोबर खातरजमा केले. तसेच आम्हाला अधिकारी आणि अधिकारेतर जनांकडून मिळालेल्या मौखिक प्रतिसादाशी देखील जुळतात का हे पाहिले.

**३.११ स्थानिक संस्थाकडून माहिती प्राप्त करण्यात येणाऱ्या अडचणी- एक सार्वत्रिक समस्या:**

सर्व राज्यामध्ये स्थानिक संस्थाकडून विश्वसनीय माहिती (डेटा) प्राप्त होणे ही सार्वत्रिक समस्या आहे. अनेक केंद्रिय वित्त आयोगांनी स्थानिक संस्थांच्या प्रकरणामध्ये याबाबत टिप्पणी केली आहे. पाचवा राज्य वित्त आयोग, तामिळनाडू (२०१७) यांनी त्यांच्या पद्धती प्रकरणामध्ये म्हंटले आहे, ॰आयोगाने सर्वोतोपरी सर्वोत्तम प्रयत्न करुनही गुणवत्तापूर्ण माहिती (डेटा) मिळविणे काळजीचे कारण ठरले.॰ महाराष्ट्राच्या तिसऱ्या वित्त आयोगाच्या अहवालामध्येही याबाबत विस्तृतपणे नोंद केलेली आहे. ही समस्या लेखा, लेखापरिक्षण आणि वित्तीय माहिती (डेटा) या प्रकरणामध्ये परिपूर्णतेने मांडण्यात आली आहे.

# प्रकरण ४

## राज्य वित्त आयोग- स्वीकृत दृष्टीकोन

**आ**योगाने त्यांच्या एक वर्षाच्या कार्य कालावधीमध्ये विविध प्रकारच्या हितैषींशी संवाद साधला व त्यांचे विचार व सूचना ऐकल्या आणि त्यांना प्रकर्षाने असे जाणवले की हा प्रकार म्हणजे सहा आंधळे आणि एक हत्ती यांच्या गोष्टी सारखा आह, स्थानिक स्वराज्य संस्थांतील हितैषींनी त्याच्या अनुभवानुसार किंवा त्यांना जाणवलेल्या प्राधान्यक्रमांनुसार सूचना केलेल्या आहेत. त्यांच्या सूचना चुकीच्या नाहीत परंतु त्या पुरेशा नाहीत, तसेच सर्वसमावेशकही नाहीत किंवा गोष्टींच्या दुसऱ्या बाजूबद्दल काहीही स्पष्टीकरण देत नाहीत.

उदाहरणर्थ, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना वाटत होते की स्थानिक स्रोतांच्या उभारणीकरीता अधिक लक्ष देणे आणि सहाय्य करावे मात्र कर्मचाऱ्यांना कामात अधिक स्वायत्तता असावी आणि शासनाकडून अधिक अनुदान मिळावे अशा दोन्हीही गोष्टी सुचविल्या. महानगरपालिका, नगरपरिषदांच्या अनेक महापौर आणि अध्यक्षांनी असे सुचविले की नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या अचल मत्ता उपयोगात आणून निधी उभारणीची अनुमती देण्यात यावी. छोट्या नगरपालिकेमधील कर्मचारी वारंवार या मुद्दयावर भर देत होते की वेतन, निवृत्ती वेतन आणि इतर गरजाकरीता शासनाने अधिकाधिक सहाय्यक अनुदान द्यावे. थोडक्यात काय तर प्रत्येक वर्गाचे प्राधान्य वेगवेगळे होते.

आयोगासमोर अशा विविध तसेच परस्पर विरोधी घटकांना योग्य ते महत्व (पासंग) देणे आणि या सर्व घटकांचा अहवालात समावेश करण्याचे फारच आव्हानात्मक काम होते.

आमच्या दृष्टीकोनाला आकार देणारे तसेच आम्हाला शिफारशी सुचविण्याकरीता सहायक ठरलेले घटक खालीलप्रमाणे आहेत.

### ४.१ राविआचा दृष्टीकोनाला आकार देणारे आणि परिलिखित करणारे घटक:

#### ४.१.१ आयोगाकरीताच्या संदर्भ अटी:

राविआच्या शिफारशी निर्धारीत करणारा सर्वात पहिला आणि महत्वाचा घटक म्हणजे आयोगाकरीताच्या संदर्भ अटी होय. संदर्भ अटी औपचारीक भाषेत ("अधिसूचना") अन्यत्र दिलेल्या आहेत पण साध्यासरळ भाषेत आमच्याकरीता खालील संदर्भ अटी स्थापित करण्यात आल्या आहेत:

अ. खालील बाबींकरीता तत्व सुचविणे:

- राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये कर विभागणी आणि त्यांच्यातील आंतर वाटप.
- स्थानिक स्वराज्य संस्थांना नेमून देता येतील किंवा योग्य ठरतील असे कर शोधणे.
- राज्याच्या एकत्रित निधिमधून सहाय्यक अनुदान देणे.

ब. स्थानिक संस्थांची आर्थिक स्थिती सुधारण्याकरीता आवश्यक उपाययोजना सुचविणे.

उपरोक्त अ आणि ब संदर्भात शिफारशी देत असतांना आयोगाने खालील बाबींचा विचार करावा.

- स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांना उपलब्ध असलेल्या आर्थिक स्त्रोतांचा कितपत उपयोग केला आहे.
- १.०४.२०१९ पासून पुढील पाच वर्षाकरीता स्थानिक स्वराज्य संस्थांचे महसुली उत्पन्न (आय) आणि खर्च (व्यय) यामधील दरी.
- स्थानिक संस्थांच्या मत्ताच्या देखभालीचा अभ्यास करणे आणि पुरेशा देखभालीकरीता निकष निश्चित करणे.
- राज्य शासनाची एकंदरीत वित्तीय स्थिती आणि दायित्वे (जबाबदाऱ्या) (म्हणजेच आर्थिक /वित्तीय वसुली उपलब्धतता)

शिफारशी देताना आम्ही आम्हाला दिलेल्या या मुलभूत आदेशांना धरून राहिलो आहोत. काही शिफारशी प्रशासकीय स्वरुपाच्या आहेत परंतु त्यामुळे स्थानिक संस्थांची वित्तीय परिस्थिती सुधारण्याकरीता मदत होईल किंवा त्यांची एकदंरीत स्थिती सुधारण्यास मदत होईल.

### ४.१.२: ७३ व्या आणि ७४ व्या सुधारणांच्या परिणामी संविधानातील तरतूदी

इतर राज्यांच्या राज्य वित्त आयोगाच्या अहवालाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की काही अहवालामध्ये संविधानांच्या तरतुदींच्या संदर्भात सविस्तर निरिक्षण केलेली दिसून येतात. या अहवालांमध्ये समर्पित, राज्याच्या निव्वळ करातील हिस्सा आणि स्वायत्तता देऊन स्थानिक स्वराज्य संस्थांना “शासनाचा तिसरा स्तर” करण्यावर भर दिला आहे. इतर अनेक विद्वानांचे अहवाल, अभ्यास समित्या आणि आयोगांनी देखील याबाबत त्यांची निरीक्षणे नोंदविली आहेत. थोडक्यात काय तर त्यांना संविधानाच्या भाग ९ आणि ९-ए मधील तरतुदींची अक्षरश: आणि तत्वत: अंमलबजावणी अपेक्षित आहे, जरी अनेक ठिकाणी करता येईल असा शब्दप्रयोग असला तरी निधी व वित्तीय आणि प्रशासकीय विचलनाची व्याप्ती किती असेल ते राज्यावर सोपविले आहे.

खरोखरीच, पंचायत राज्य मंत्रालय, भारत शासना दर वर्षी “विचलन निर्देशांक” प्रकाशित करते, यामध्ये पंचायत राज्य संस्थांना हस्तांतरित करण्यात येणारा, “निधी, कार्य आणि कार्यकारी” याची प्रत्येक राज्याकडून तुलना माहिती असते. करातील अधिकचा हिस्सा देणाऱ्या राज्यांना पुरस्कारही देण्यात येतात.

१. राविआला देण्यात आलेल्या आदेशामधील प्राधान्य आदेशापैकी एक म्हणजे उभे आणि आडवे असंतुलन हाताळण्याकरीता विचलन सूत्राची शिफारस करणे. तथापि याकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्था/पंचायत राज संस्था पातळीवर विश्वसनीय सातत्यता असणारी भौतिक आणि वित्तीय माहितीची उपलब्धता गृहित धरलेली आहे. परंतु असे झाले नाही तसेच

इतर काही शासकीय पूर्व-अटींची देखील पूर्तता झालेली नाही त्यामुळे आम्हाला संमजस स्वीकाराहार्य आणि तर्कसंगत विचलन सूत्र मांडता आले नाही. त्याऐवजी आम्हाला नियामक प्रक्रियांचे सरलीकरण, सुलभीकरण करावे आणि प्राचीन प्रक्रिया तसेच वर्षानुवर्षे चालत असलेल्या आकारणी यामध्ये दुरुस्ती करुन चांगल्या प्रशासनाकरीता पुरक वातावरण तयार करणे याकडे केंद्रीत करणे जास्त आवश्यक वाटले. येथे चांगले प्रशासन म्हणजे आमच्या मते प्रोत्साहन अनुरुप धोरण आराखडा, प्रक्रियेचे आणि शिष्टाचारांचे सुसुत्रीकरण तसेच क्षमतांचे, संयुक्तिक निर्णय घेण्याकरीता चांगल्या माहितीचा समावेश आहे.

या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याच्या ग्राम विकास विभागाने यापुर्वीच श्री सुधीर ठाकरे, माजी सचिव,ग्राम विकास यांच्या अध्यक्षतेखाली जुलै, २०१६ मध्ये राज्य पंचायत तज्ज्ञ समिती स्थापन केली आहे. या समितीला पंचायत राज संस्था यांचे राज्याच्या करातील हि कामे सोपविले होते. व्याप्तीचा अभ्यास करून त्याबाबतची मते आणि शिफारशी करण्याचा आदेश होता. या समितीने तिचा अहवाल शासनाला सादर केल्याचे समजले आहे.

त्याचप्रमाणे नगर विकास विभागाने देखील नागरी प्रशासनामध्ये "पारदर्शकता" उत्तरदायित्व आणि कार्य क्षमता॰ वाढविण्याकरीता उपाययोजनांची शिफारस करण्याकरीता तीन सदस्यीय समिती (मार्च, २०१७), श्री शरद काळे, भा.प्र.से निवृत्त भारतीय प्रशासकीय सेवायांच्या अध्यक्षतेखाली अन्य दोन तज्ञ व आदरणीय निवृत्त अधिकारी श्री रामनाथ झा, सेवा निवृत्त भारतीय प्रशासकीय आणि श्री गौतम चटर्जी, भारतीय प्रशासकीय सेवानिवृत्त यांची नियुक्ती केली आहे. असे समजले आहे की या समितीने देखील त्यांचा अहवाल शासनास सादर केला आहे.

या दोन समित्यांची व्याप्ती (ज्यांनी त्यांचे अहवाल सादर केले असल्याने) व्यापक आणि सर्वसमावेशक आहे. आम्ही असे मानतो की राज्य शासन या अहवालांवर विचार करीत आहे.

यामुळेच, अगदी जाणीवपूर्वक आम्ही वर्तमान व्यवस्था "दिलेली" आहे असे मानले आहे आणि आम्ही आमच्या शिफारशी राज्याच्या निधीचे, विचलन कार्य आणि कार्यकारी यांच्या सध्याच्या चौकटीमध्येच केलेल्या आहेत.

### ४.१.३ आयोगाला अनुभवास आलेली प्रत्यक्ष आव्हाने- निकृष्ट दर्जाचे वित्तिय अभिलेख किंवा अभिलेखांची अनुपलब्धता:

राविआने पुर्वीच्या कार्यपद्धती या प्रकरणामध्ये या समस्येबाबत सविस्तर उल्लेख केला आहे. राविआने या अहवालात अनेक ठिकाणी या समस्येचा पुन्हा पुन्हा उल्लेख केला आहे. विश्वसनीय माहितीच्या अनुपलब्धतेमुळे राविआला वित्तीय माहितीचे सखोल विश्लेषण करून अनुमान करणे आणि केवळ माहितीच्या आधारे शिफारशी करण्याबाबत मर्यादा होत्या. त्यामुळेच आमच्या शिफारशी आम्हाला उपलब्ध करुन दिलेली माहिती तसेच क्षेत्रीय अधिकारी आणि अधिकारेतर जनांकडून मिळालेला प्रतिसाद, आधीच्या अहवालांचा अभ्यास तसेच त्यावरून आम्ही काढलेले ठराविक निष्कर्ष अशा

दोन्हीही गोष्टीवर आधारित आहेत. आम्ही अंगिकारलेली प्रत्येक पद्धती दुसरीस पूरक ठरेल याबाबत आम्ही खातरजमा करण्याचा प्रयत्न केला आहे.

**४.१.४ स्थानिक स्वराज्य संस्थांचे विभिन्न श्रेणीमध्ये विभाजन करण्याची आवश्यकता:**

राविआला लागलीच लक्षात आले की एका श्रेणीतील स्थानिक स्वराज्य संस्थांबाबत जे लागू असेल ते दुसऱ्या श्रेणीतील स्थानिक स्वराज्य संस्थेबाबत लागू असेलच असे नाही. यामध्ये अनेक घटकांची भूमिका असते. उदाहरणार्थ काही नगर पालिका (खोपोली- रायगड जिल्ह्यासारख्या) करीता सहाय्यक अनुदान केवळ वेतनाकरीताच नाहीत तर प्राधान्य यादीमध्ये नमूद केलेल्या इतर खर्चाकरीता देखील पुरेसे असते. तर राज्यातील इतर नागरी स्थानिक संस्थांच्या बाबतीत सहाय्यक अनुदान केवळ त्यांच्या प्रमुख वेतन खर्चाकरीता देखील पुरेसे नसते.

त्याचप्रमाणे सातत्याने वाढणाऱ्या आणि व मोठया परिनगरीय ग्राम पंचायती (पुण्याजवळील किंवा इतर मोठ्या शहरांजवळील) यांच्यासमोरील आव्हाने दुर्गम आदिवासी पेसा ग्राम पंचायतीपेक्षा फार वेगळी आहेत.

याचाच अर्थ असा होतो की, सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था किंवा अगदी ग्राम पंचायतींच्या देखील सरासरी आकडेवारी नेहमीच्या पध्दतीने घेणे योग्य होणार नाही. ते म्हणजे केवळ फळे आहेत म्हणून सफरचंदांची आणि संत्र्यांच्या संख्येची सरसकट बेरीज करण्यासारखे होईल. त्यामुळेच राविआने जाणीवपूर्वक सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था किंवा पंचायतीराज संस्थांच्या आकडेवारीची बेरीज केली नाही. स्थानिक स्वराज्य संस्थाचे अधिक सखोल विश्लेषण करण्याकरीता आणि संस्थाबद्दल अधिक व्यवस्थितपणे समजून घेण्याकरीता प्रत्येक श्रेणीनुसार स्थानिक संस्थाची स्वतंत्रपणे माहिती/आकडेवारी जमविली आणि प्रदर्शित करण्यात आली आहे.

**४.१.५ शिफारशीवर आधारित ॰प्रमाणक/ प्रमाणपद्धती॰ संबंधित आव्हाने:**

आधीच्या केंद्रिय वित्त आयोगांनी त्यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या प्रकरणामध्ये राविआंना सूचित केले होते की, त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांना द्यावयाच्ये अनुदान वर्तमान माहिती ऐवजी प्रमाणकावर आधारुन रक्कम निर्धारीत करावी. उदाहरणार्थ १२ व्या केंद्रिय वित्त आयोगाने निरिक्षण नोंदविले आहे की, ॰राविआंनी ऐतिहासिक अभिलेखांच्या आधारे अगाउ अंदाज करण्याऐवजी (स्थानिक संस्थाच्या) महसूल आणि खर्चाचे मुल्यांकन करतांना प्रमाणकस्थापक दृष्टीकोन ठेवावा॰(परिच्छेद ८.३१)

१३ व्या केंद्रिय वित्त आयोगाने देखील सेवा पातळीवरील निकष स्थापित करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला होता, इतकेच नाही तर वास्तवात कार्यात्मक अनुदानाकरीता कामगिरीची अट टाकली होती.

या राविआने महाराष्ट्रातील विविध श्रेणीतील नमुन्या दाखल घेतलेल्या शहरांमधील सेवांच्या सेवा स्तरांवरील निकषांपर्यंत पोहचण्याकरीता अंदाजे किती भांडवली गुंतवणूक आवश्यक ठरू शकते याची

परिगणना केली आहे. सदर रक्कम आश्चर्यकारक असल्याचे आपल्या निदर्शनास येईलच. (प्रकरण-८ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे अर्थव्यवस्थेचे मुल्याकंन- परिच्छेद ८.३२पहा)

राविआची भूमिका अशी आहे की, कितीही इच्छा असली तरी वित्तीय आवश्यकताबाबतचा विचार करता प्रमाणक दृष्टीकोन स्थापित करण्याकरीता आपल्याला अधिक प्रतिक्षा करावी लागेल.

### ४.१.६ उपलब्ध राजकोषीय अवकाश जागा तसेच वस्तू आणि सेवा कर संबंधित समस्या:

स्थानिक स्वराज्य संस्था स्वत: किती निधि निर्माण करतात या व्यतिरिक्त त्यांना किती संसाधनांची आवश्यकता आहे याबाबतची शिफारस करणे, ही राविआची भूमिका आहे. राविआला दिलेल्या आदेशानुसारआम्ही विशेषत: राज्य शासनाच्या वित्तीय आवश्यकता (गरजा) आणि भविष्यातील दायित्वांचा विचार करणे देखील आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर वस्तू आणि सेवा करासंबंधात काही निरीक्षणे करणे आवश्यक होते. १जुलै,२०१७रोजी ऐतिहासिक वस्तू आणि सेवा कर लागू करण्यात आला. यामध्ये अनेक कर (जसे की जकात, स्थानिक स्वराज्य संस्था कर, करमणूक कर) अंतर्भूत करण्यात आले आहेत आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकरीता केवळ मालमत्ता कर हे एकमेव उत्पन्नाचे साधन शिल्लक राहिले आहे. वस्तू आणि सेवा कर लागू करुन केवळ सन २०१८-१९ हे एकच वर्ष पूर्ण झाले.

कर पध्दतीमधील वस्तू आणि सेवा कर  हा मोठा बदल आहे.  पहिल्या दोन वर्षामध्ये महसूलामध्ये ८% वाढ झाली. तथापि, आमचा असा दृष्टीकोन आहे की, ही सुरुवातीची वर्षे आहेत आणि वस्तू आणि सेवा कराच्या परिणामाचे चित्र स्पष्ट होण्याकरीता कमीत कमी तीन ते पाच वर्षांच्या कालावधीची आवश्यकता आहे.

### ४.२ शिफारशी करण्याकरीता आम्ही अवलंबलेला दृष्टीकोन:

### ४.२.१ धोरणात्मक दृष्टीकोन- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विभिन्न श्रेण्यांना आधार देणे:

पंचायत राज स्वराज्य संस्था आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची विविधता, आकारमान आणि अंतर्भूत स्थानिक घटक या सर्वांचा विचार करता, राविआचा दृष्टीकोन असा आहे की सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व श्रेणीकरीता एक उपाय अथवा एक धोरण सहाय्यभूत ठरणार नाही. याकरीताच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रत्येक श्रेणीला आवश्यक असणाऱ्या सहाय्य प्रकारामध्ये राविआने अगदी जाणीवपूर्वक भेद केला आहे.

केवळ मुद्दा स्पष्ट करण्याकरीता उदाहरण-  भौगोलिक दृष्ट्या प्रतिकुल परिस्थितीमधील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थासाठी आम्ही दूर अंतरावरील स्त्रोतावरून पाणी आणण्याच्या खर्चासाठी अनुदान देण्याची शिफारस केली आहे. असे आम्ही केवळ ड वर्गातील किंवा त्याखालच्या नगर पालिकाकरीता केलेले असून आम्ही दिलेले सूत्र (हे सूत्र महाराष्ट्र जीवन  प्राधिकरणाच्या तांत्रिक

सल्ल्यावर आधारित आहे.) अंतराशी संलग्न आहे. (प्रकरण-८ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे अर्थव्यवस्थेचे मुल्यांकन- परिच्छेद ८.४७)

अशाच प्रकारे आम्ही केवळ ब श्रेणीच्या नगर परिषदा, क श्रेणीच्या नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या अत्यावश्यक असलेल्या केवळ सहा प्रमुख उपक्रमांकरीता जमीन अधिग्रहणाचा खर्च शासनाने करण्याची शिफारस केली आहे.

ज्या जिल्हा परिषदांचे मुद्रांक शुल्काचे उत्पन्न (अभिहस्तांकित कर) सरासरीपेक्षाही कमी आहे, केवळ अशाच जिल्हापरिषदांना सहाय्यक अनुदान देऊन अतिरिक्त आधार देण्याची शिफारस केली आहे, सरसकट सर्वच जिल्हापरिषदांसाठी नाही.

### ४.२.२ मोठ्या आकारमानाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकरीताचा दृष्टीकोन (क वर्गीय महानगरपालिका आणि त्यावरील):

महाराष्ट्रामध्ये एकूण २७ महानगरपालिका आहेत. यापैकी सर्वोच्च दहा महानगरपालिका म्हणजे बृहन्मुंबई (अ+ श्रेणी), पुणे आणि नागपूर (अ श्रेणी), नाशिक, पिंपरी-चिंचवड आणि ठाणे (ब श्रेणी), औरंगाबाद, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली आणि नवी मुंबई (क श्रेणी) या आहेत. नागरी स्थानिक स्वराज्य संस्था वरील प्रकरणामधील ८.१८ आणि ८.१९ परिच्छेदामध्ये आम्ही मोठ्या आकाराच्या महानगर पालिका छोट्या आकाराच्या महानगर पालिकांपेक्षा कशा भिन्न आहेत हे मुद्देवारपणे स्पष्ट केले आहे. मोठ्या महानगरपालिकांना (क श्रेणीपर्यंतच्या महानगरपालिका) विभिन्न प्रकारचे सहाय्य आवश्यक असते जसे की, दुहेरी लेखा नोंदी करण्याकरीता क्षमता संवर्धनसाठी मदत करणे, करपात्र मालमत्ता शोधून काढण्याकरीता भौगोलिक माहिती प्रणाली (जी आय एस) चा उपयोग करणे, सल्लागार नेमण्याकरीता तांत्रिक सहाय्य, खुल्या बाजारातून कर्ज प्राप्त करण्याकरीता चांगल्या क्षमता इत्यादी. आम्ही केवळ ड श्रेणीच्या आणि त्याखालील म्हणजेच जेथे एकूण लोकसंख्येपैकी ४३% नागरी लोकसंख्या राहते अशा महानगरपालिकाकरीता तपशीलवार संसाधन विश्लेषण दिलेले आहे.

### ४.२.३: विद्यमान पध्दतीत सातत्यता आणि लहान बदल:

शिफारशी करतांना आम्ही फ़ारमोठे मुलगामी बदल करण्याऐवजी विद्यमान पध्दतीत थोडे फेरफार करून सातत्य ठेवण्याचा दृष्टिकोन अंगिकारला आहे. उदाहरणार्थ आम्ही नगरपालिका करातील कलम १०८ मध्ये छोटासा बदल सुचविला आहे आणि ॰पर्यावरण व्यवस्थापन शुल्क॰ या वाक्प्रचाराचा अंतर्भाव केला आहे. या छोट्याशा बदलाने त्या शहरात पर्यटनाकरीता येणाऱ्या किंवा यात्रेनिमित्त वा इतर निमित्ताने मोठ्या संख्येने येणाऱ्याकडून घेतलेल्या छोट्या नियमित शुल्काच्या माध्यमातून अनेक छोट्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकरीता नियमित शुल्क उत्पन्नाचे कवाड खुले होणार आहे. अगदी आम्ही सुचविलेल्या मोठ्या बदलांमध्ये देखील जसे की, व्यवसाय कर स्थानिक स्वराज्य संस्थाकडे वळविण्याकरीताच्या शिफारशी देखील टप्प्याटप्याने करण्यास सुचविले आहे.

### ४.२.३: कैझन (सुधारणा) दृष्टीकोन- छोट्या, वाढीव सुधारणा:

वरील परिच्छेदामध्ये दर्शविलेल्या दृष्टीकोनासोबत अगदी जवळून संलग्नित, आम्ही “कैझन” दृष्टीकोन देखील अंगिकारला आहे- म्हणजे करता येण्यासारख्या छोट्या वाढीव सुधारणा सुचविणे. जसे की नगरपालिका कायद्याच्या कलम १४९ अ मध्ये आम्ही “विक्रीकरीता करार” हा शब्द जोडण्याची सूचना केली आहे. आम्ही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचे सर्व विद्यमान उपकायदे आणि विशिष्ट आदर्श उपकायदे अदयावत करण्याचे तसेच दंड, शुल्क आणि इतर आकारणीचे न्युनतम आणि अधिकतम दराची पुनर्निश्चिती करण्याची सुद्धा शिफारस केली आहे. अशाच प्रकारे आम्ही ग्रामपंचायतीकरीता विविध शुल्क आणि दंडाच्या आकारासंबंधातील नियमामध्ये सुधारणांची शिफारस केली आहे. या छोट्या उपक्रमामुळे स्थानिक स्वराज्य संस्थाकरीता लगेचच महसूल वृद्धीची कवाडे खुली होणार आहेत.

### ४.२.४ अव्यवस्थितपणा दूर करण्याची आवश्यकता:

आमचा आणखी एक दृष्टीकोन म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांना निधि वितरीत करण्यासंदर्भातील पद्धती आणि प्रक्रियामधील अव्यवस्थितपणा दूर करण्यावर भर देण्याचा आहे. उदाहरणार्थ, अजूनही काही जिल्हा परिषदांना, ग्रामपंचायतींना आणि नागरी स्वराज्य संस्थाना भरपाई अनुदान वार्षिक वित्तीय अंदाजपत्रकामधून देण्यात येते. आता शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांचे वाहन कर, जकात आणि इतर काही कर वसुलीचे अधिकार काढून घेतले आहेत. जे १९६० किंवा त्याआधी निश्चित करण्यात आले होते. आता या रकमा अगदी क्षुल्लक आहेत. याचप्रमाणे, वन अनुदान किंवा जमीन महसूल अनुदान देण्याच्या पद्धतीदेखील क्लिष्ट आहेत. आम्ही कायदा, नियम आणि शासन निर्णयामधील जुनी कोळीष्टके आणि अव्यवस्थितपणा काढून टाकण्याकरीता सुयोग्य शिफारशी केल्या आहेत.

### ४.२.५: स्वत:चा निधी आणि शासकीय निधिमधून येणारा निधी यामधील भेद दर्शविणे:

आमचा आणखी एक दृष्टीकोन म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांचा स्वत:चा निधी आणि शासनाकडून येणारा निधी यामध्ये भेद करणे. जिल्हा परिषदांच्या बाबतीत हा भेद अगदी लक्षणीय आहे, त्यांचा स्वत:चा निधी अवघा ३% असून अंमलबजावणीकरीता शासनामार्फत येणारा एकूण निधी ९७% इतका आहे. आम्ही स्वायत्त निधी आणि त्यांना संस्था॰ म्हणून प्राप्त झालेला निधी असा भेद केला आहे. आम्ही केवळ ॰स्वत:चा निधी॰ यावरच लक्ष केंद्रित केले आहे कारण इतर निधी म्हणजे विविध उद्देशाकरीताचे अनुदान आहे आणि आमच्या दृष्टीने ते आमच्या अधिकाराच्या क्षेत्रा बाहेरचे आहे.

### ४.२.६: उपलब्ध स्त्रोतांच्या सर्वोत्तम वापराकरीता केंद्रित दृष्टीकोन:

आमचा आणखी एक दृष्टीकोन म्हणजे आम्ही त्यांना सर्वाधिक आवश्यकता असलेल्या विशिष्ट क्षेत्रामध्ये सहाय्य देण्याची शिफारस केली आहे. यामुळे मर्यादित सार्वजनिक स्त्रोत सर्वत्र देण्याऐवजी

त्याचा सर्वोत्तम उपयोग होण्यास मदत होईल. उदाहरणार्थ छोट्या नगरपालिका आणि नगर पंचायतीकरीता आम्ही निवडक सार्वजनिक सोयीसुविधाकरीता जमीन अधिग्रहणाचा खर्च देण्याची शिफारस केली आहे.

## ४.२.७:उत्तम कार्यपद्धती शक्य करून दाखविणाऱ्या विशेष प्रकरणांचा अभ्यास:

क्षेत्र निरिक्षणामध्ये आढळलेल्या अनेक ठिकाणच्या उत्तम कार्यपद्धती आम्ही सांगितल्या आहेत, जेणे करून विद्यमान चौकटीमध्ये देखील काही स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये सर्जनात्मक, पोषक उपाय शोधून काढले आहेत. या उत्तम कार्यपद्धती अनुसरण्यायोग्य आहेत आणि इतर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी यांचा अवलंब करणे आवश्यक आहे.

### ४.२.८: दीर्घकालीन क्षमता संवर्धन

अंतिमत: आम्हाला असे वाटते की काही विशिष्ट बाबतीमध्ये दीर्घकालीन क्षमता संवर्धन आवश्यक आहे जेणे करून स्थानिक स्वराज्य संस्था स्वत:च स्वत:च्या समस्या हाताळू तसेच सोडवू शकतील. हा एकच उपाय दीर्घकालीन ठरू शकतो. क्षमता संवर्धनाच्या या श्रेणीमध्ये आम्ही लेखा आणि वित्तीय माहिती (डेटा) सुधारण्याच्या दृष्टीने एक समर्पित मिशन सुरु करण्याची आणखी एक सूचना केली आहे.

# प्रकरण ५

## राज्य वित्त व्यवस्था

महाराष्ट्राने केंद्रिय राजकोषीय उत्तरदायित्व आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायदा, २००५ च्या मार्गदर्शक तत्वानुसार महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन नियम २००६ (सुधारणा २००८) मध्ये राज्याची महसुली तूट कमी करणे, खर्चाची गुणवत्ता सुधारणे, वित्तीय तुटीचे मर्यादा राखणे आणि सार्वजनिक कर्ज विहित मर्यादेत ठेवणे अशा वित्तीय सुधारणावर भर देण्यात येतो. अनिवार्य खर्च कमी करून, भांडवली खर्चात वाढ करून सामाजिक आणि आर्थिक पायाभूत संरचनामध्ये अधिक गुंतवणुकीची खातरजमा करणे आणि अधिक चांगल्या पद्धतीने रोख रकमेचे तसेच कर्जाचे व्यवस्थापन करणे, अशा प्रकारे वित्तीय सुधारणा करण्याचे धोरण आहे.

५.१विद्यमान वित्तीय स्थिती

सन २००९-१० पासून राज्याची वित्तीय तूट ३ टक्क्यापेक्षाही कमी आहे म्हणजेच राज्याला वित्तीय उत्तरदायित्व आणि अंदाजपत्रकीय व्यवस्थापन कायद्यातंर्गत दिलेल्या विहित पातळीमध्ये वित्तीय तूट ठेवण्यात यश आले आहे. शासनाला २००९-१० मध्ये स्थूल राज्यातंर्गत उत्पादनामधील सर्वोच्च पातळीवरील (-)३.१ टक्के वित्तीय तूट सन २०१६-१७ पर्यंत (-)१.७ टक्क्यापर्यंत कमी करणे शक्य झाले आहे. सन २०१७-१८ मध्ये हीच वित्तीय तूट (-)०.९६ टक्के इतकी झाली . सन २०१८-१९ मध्ये राज्यातंर्गत स्थूल उत्पादनात वित्तीय तूट (-)२ टक्के इतकी होती. महसूल तूटीच्या बाबतीत, अशीही काही उदाहरणे आहेत की २००६-०९ आणि २०११-१२ दरम्यान महसूल अधिकचा आहे. तथापि, या मागील काही वर्षांमध्ये महसुली खर्च वाढल्याने महाराष्ट्र महसुली तूट वाढली आहे.

आलेख १: तूटी चा कल (राज्यातंर्गत स्थुल उत्पादन %) (२००५-०६ ते२०१८-१९ (अर्थसंकल्पीय अंदाज)




स्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखा आणि अंदाजपत्रके

सन २०१६-१७ मध्ये, महसुली तूट साधारण (-) ०.३८ टक्के इतकी होती, यामध्ये सुधारणा होऊन सन २०१७-१८ ती (+)०.०८ टक्के इतकी झाली. सन २०१८-१९ मध्ये महसुली तूट (-)०.५४ टक्के इतकी होती.

### ५.२ प्राप्तीतील कल

सन २००५-०६ दरम्यान राज्य शासनाच्या प्राप्तीमध्ये चक्रवाढ वार्षिक वृद्धी दर (सीएजीआर) च्या १२.७ टक्के वृद्धी झाली आणि २०१७-१८ वर्षाला महसूल प्राप्तीमधील वृद्धी सहाय्यभूत ठरली. सन २०१७-१८ मध्ये राज्याची एकूण प्राप्तीरुपये ३,०६,११३ कोटी रुपये होती आणि २०१८-१९ मध्ये सदर रक्कम रुपये ३,३८,९२० कोटी रुपये इतकी होण्याचा अंदाज आहे. तथापि, एकूण प्राप्तीचा स्थूल राज्यातंर्गत उत्पादनामधील हिस्सा उतरता कल दर्शवित आहे. २००५-०६ मधील हिस्सा १४.९% इतका होता तो २०१७-१८ मध्ये त्यात घट होऊन १२.३% इतका झाला आहे. सदर घट राज्याच्या आर्थिक प्रगतीच्या प्रमाणात राज्याच्या उत्पन्नात वाढ झाली नाही हे दर्शविते. यामागील प्रमुख कारण म्हणजे सेवाक्षेत्रातील वृद्धीने राज्याच्या वृद्धीला चालना दिली आहे तसेच वस्तू आणि सेवा कराच्या अंमलबजावणीपूर्वी सेवा क्षेत्रावरील कर आकारणी केंद्र शासनाच्या अखत्यारीत होती. भांडवली प्राप्तीचा एकूण प्राप्तीतील हिस्सा २०-२४ टक्के इतका आहे.

आलेख २: प्राप्तीतील कल (कोटीरुपये) (२००३-०४ ते २०१३-१४(अर्थसंकल्पीय अंदाज)




स्रोत: संबंधित वर्षाचे वित्तीय लेखा आणि अंदाजपत्रके

## ५.३ महसूल वाढ

राज्याचे महसूल उत्पन्न सन २००५-०६ मधील रुपये ३९,४७४ कोटी (एकूण प्राप्तीच्या ५४.४%) चक्रवाढ वार्षिक वृद्धी दराच्या १३.८ टक्के एवढ्या वरुन सन २०१८-१९(सुधारित अंदाज) मध्ये रुपये ३,०१,४६० कोटी इतकी झाली आहे. सन २०१८-१९ करीता राज्याचा स्वत:चा महसूल प्राप्तीचा हिस्सा ६२.७ टक्के असून महत्वाचा घटक आहे, त्यापाठोपाठ केंद्रीय कर (१४ टक्के) आणि अनुदान (१२.७६%) इतके आहे.

आलेख ३आणि ४ : महसूल प्राप्तीचा कल ( रुपये कोटीत) आणि एकूण महसूल प्राप्ती मधील हिस्सा




आलेख ४ एकूण प्राप्ती मधील हिस्सा



**स्वत:चा कर महसूल:** स्वत:च्या कर महसुलामधील वृद्धीमध्ये मोठा बदल झालेला आहे. राज्याचा कर महसूलाने सन २०१७-१८ मध्ये रुपये १,६७,९४७ कोटीहून सन २०१८-१९ (सु.अं.) मध्ये थेट १,.८८,९३१ कोटी इतकी झेप घेतली आहे, १२.५ टक्क्याने वृद्धी झाली आहे.

आलेख ५ आणि ६: स्वत:च्या कर महसूलाचे घटक (स्वत:चा कर महसूलातील २०१६-१७ आणि २०१८-१९ (सुधारित अंदाज) मधील % हिस्सा)







स्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखा आणि अंदाजपत्रके

वस्तू आणि सेवा कर लागू होण्यापूर्वी राज्याच्या स्वत:च्या करामध्ये विक्री कर हा, ६०% सहभागासह प्रमुख घटक होता. कर संरचनेत बदल झाल्याने, वस्तू आणि सेवा कर राज्याच्या स्वत:च्या करामध्ये प्रमुख घटक बनला आहे. सन २०१८-१९ मध्ये वस्तू आणि सेवा कराची वसुली ७७% म्हणजेच रुपये ९०, १४० कोटी (परतावा पूर्व स्थूल वसुली) इतकी वाढली, सन २०१७-१८ मध्ये सदर रक्कम रुपये ५०,९७७ कोटी इतकी होती. वस्तू आणि सेवा कराच्या वसुलीतील वृद्धीच्या कारणापैकी एक म्हणजे सन २०१७-१८ मध्ये सदर वसुली केवळ ९ महिन्याकरीताच करण्यात आली होती. तथापि नोंदणीकृत दात्यांची संख्या वृद्धीगंत झाल्याने राज्याला वस्तू आणि सेवा कर वसुलीमध्ये लक्षणीय झेप दिसण्याची अपेक्षा आहे.

आलेख ७: स्वत:चा महसूलीचा कल (रुपये कोटी)




स्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखा आणि अंदाजपत्रके

### ५.३.२ वस्तू आणि सेवा कर

वस्तू आणि सेवा कर: ऐतिहासिक वस्तू आणि सेवा कर १ जुलै २०१७ रोजी लागू करण्यात आला. महाराष्ट्रामध्ये तेरा वेगवेगळे कर वस्तू आणि सेवा करामध्ये विलीन करण्यात आले आहेत. यामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जकात कराचाही समावेश केला आहे. असे दिसून आले आहे की पहिल्या वर्षामध्ये (१.७.२०७ ते ३०.६.२०१८) मुल्य वर्धित कराच्या(वॅट) आणि इतर समाविष्ट करांच्या वसुलीमध्ये ८% वाढ झाली आहे. प्राप्तीकर विवरण भरणा आणि प्रत्यक्ष प्राप्ती यामध्ये अंतर आहे. त्याच प्रमाणे २०१८-१९ मध्ये मागील वर्षापेक्षा ८% वृद्धी आहे. ही सुरुवातीची वर्षे असल्याने त्याचा महसूलावरील प्रभावाबाबत टिप्पणी करणे अकालिक होईल. वस्तू आणि सेवा कर ही एक सातत्याने सुरु असलेली प्रक्रिया असून त्यामध्ये कायम सुधारणा होत आहेत.

तथापि या कालावधीमध्ये करदात्यांची (वितरक) संख्या २०% नी वाढली आहे आणि आता प्रत्येक महिन्यामध्ये ३०,००० नवीन नोंदण्या होत आहेत. हे एक सकारात्मक निदर्शक असून यामधून कराचा पाया व्यापक आणि सखोल होत असल्याचे दिसून येते, भविष्याकरीता सकारात्मक कलाचे निदर्शक आहे.

### ५.३.३ करेतर महसूल

करेतर महसूल: महाराष्ट्राच्या स्वत:च्या करेतर महसूलामध्ये सन २००५-०६ च्या रुपये ५,९३५ कोटी पासून ते सन २०१८-१९ (सु.अं.) रुपये १७,०५०कोटी इतकी म्हणजेच जवळ जवळ चौपट वृद्धी झाली आहे. तथापि करेतर महसूलाच्या हिश्श्यामध्ये आता क्षय होत आहे.

आलेख ८: करेतर महसूल (रुपये ₹ कोटी मध्ये) आणि % एकूण महसूलातील (२००५-०६ ते २०१८-१९)




स्त्रोत: संबंधित वर्षांची वित्तीय लेखा आणि अंदाजपत्रके.

व्याज प्राप्ती, लाभांश आणि नफा, वित्तीय सेवा, सर्वसाधारण सेवा आणि सामाजिक सेवा हे करेतर महसूलाचे मुख्य घटक आहेत. वित्तीय सेवा करेतर महसूलाचा प्रमुख घटक असून त्या सेवांचा सरासरी हिस्सा ४०% इतका आहे.  व्याज प्राप्ती, लाभांश आणि नफा मिळून राज्याच्या करेतर महसूलामध्ये एकत्रितपणे जवळपास २०% योगदान देतात. करेतर महसूल कमी असण्याचे मुख्य कारण म्हणजे वित्तीय आणि सामाजिक सेवां पुरवठ्यामधून होणारी तुटपुंजी वसुली हे आहे. वित्तीय सेवा पुरवठ्यामधून होणारी वसुली २००५-१० दरम्यान ४.३९% इतकी होती ती आता २०१५-१८ दरम्यान अवघी २.४९% इतकी कमी झाली आहे. टोल रद्द केल्याने आणि लाभांशात घट झाल्याने राज्याच्या करेतर महसूल वसुलीवर विपरीत परिणाम झाला आहे.

### ५.३.४ केंद्रिय करातील हिस्सा आणि सहायक अनुदान

१३ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या  शिफारशीनुसार  केंद्रिय निव्वळ करांमधील राज्य हिस्सा  ३२%  वरुन १४ व्या वित्त आयोगाने  ४२% इतका वाढविला आहे. यामुळे राज्य शासनाच्या एकंदरीत केंद्रीय करांच्या हिश्यामध्ये सुधारणा झाली आहे. केंद्रिय करामध्ये राज्याच्या स्थूल राज्यातंर्गत उत्पादनाची टक्केवारी १३व्यावित्तीय आयोग मधील २.०२ % पासून १४व्या वित्तीय आयोगानुसार २.५२ % अशी वाढ झाली आहे.

आलेख ९ केंद्रिय निव्वळ करांतील राज्य हिस्सा कल (रुपये कोटीमध्ये)




स्रोत: संबंधित वर्षांची वित्तीय लेखा आणि अंदाजपत्रके.

५.३.५ सहायक अनुदान: दुसरीकडे, केंद्रीय कराच्या राज्य हिश्श्याच्या वृद्धीमुळे केंद्राकडून राज्याला मिळणारे सहायक अनुदान कमी झाले आहे. याचे कारण म्हणजे काही केंद्र पुरस्कृत योजना खंडीत करण्यात आल्या आहेत आणि उर्वरीत केंद्र पुरस्कृत योजनांच्या खर्चाच्या बाबतीत राज्याच्या वाट्याचे गुणोत्तर पुन्हा निर्धारीत करण्यात येऊन राज्यांवरील भार वाढविण्यात आला आहे.

आलेख १० आणि ११: केंद्र शासनाकडून येणाऱ्या सहायक अनुदानातील कल (रुपये कोटी मध्ये) आणि वृद्धी (%, वार्षिक)







स्रोत: संबंधित वर्षांची वित्तीय लेखा आणि अंदाजपत्रके.

### ५.१ खर्च व्यवस्थापन

राज्याच्या एकूण खर्चामध्ये सन २००५-०६ मध्ये रुपये ७२,३६२ कोटीवरुन सन २०१८-१९ (अर्थसंकल्पीय अंदाज) मध्ये रुपये ३,३८,३१९ कोटी रुपये इतकी वृद्धी झाली आहे. तथापि स्थूल राज्यांतर्गत उत्पादनाची टक्केवारी मात्र २००५-०६ मधील १४.९ टक्के वरून २०१८-१९ (अर्थसंकल्पीय अंदाज) मधील १२.१ टक्के इतकी कमी झाली आहे. हे राज्याच्या सुधारित वित्तीय स्थितिचे प्रमुख कारण आहे. राज्याचा प्रमुख खर्च हा महसुली खर्च आहे.

आलेख १२: महसुली आणि भांडवली खर्चाचा कल (स्थूल राज्यांतर्गत उत्पादनाची % )




स्रोत: संबंधित वर्षांची वित्तीय लेखा आणि अंदाजपत्रके.

५.४.१ महसुली खर्च: मागील एका दशकामध्ये एकूण खर्चात महसुली खर्चाचा हिस्सा वाढला आहे, २००८-०९ मध्ये ७५.१ % वरून २०१८-१९ (अर्थसंकल्पीय अंदाज) मध्ये थेट ८८.९% इतका झाला आहे. या वाढीमागे विशेषत: २००९-१० ते २०१३-१४ या कालावधीतील वेतन आणि निवृत्ती वेतन यावर होणार खर्च आणि सामाजिक सेवांवर होणारा खर्च कारणीभूत आहे. तथापि, सन २०१५ मध्ये शासनाने नवीन नियुक्त्या गोठवल्याने आणि नवीन निवृत्ती वेतन योजनेची अंमलबजावणी केल्याने वेतन तसेच निवृत्ती वेतनावर होणारा खर्च कमी होत आहे. राज्याचा शिक्षण तसेच आरोग्य या सारख्या सामाजिक सेवावरील खर्चात कालौघात थोडी वृद्धी झाली आहे.

५.४.२ बांधील/अनिवार्य खर्च: राज्याच्या महसूल प्राप्तीमधील ५०% पेक्षा अधिक भाग वेतन, निवृत्ती वेतन आणि व्याजामध्ये खर्च होतो. ७व्या वेतन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी केल्यानंतर वित्तीय वर्ष २०१८-१९ मध्ये वेतन आणि निवृत्ती वेतन यावरील खर्चात वाढ होणार आहे. तथापि, राज्यात २००९-१० या वर्षात व्याज अदा करण्यासाठी महसूल प्राप्तीचा १७% हिस्सा खर्च होत असे त्यावरून तो २०१८-१९ (अर्थसंकल्पीय अंदाज) मध्ये १२.० % इतका कमी झाला ही राज्याच्या सकारात्मक बाबींपैकी एक आहे. राज्याकडून ऋण/कर्ज व्यवस्थापन व्यवस्थित होत असल्याचे हे निदर्शक आहे.

आलेख १३: वेतन, निवृत्ती वेतन आणि व्याज देयकाचा महसुली प्राप्तीतील हिस्सा टक्केवारी (२००८-०९ ते २०१८-१९ (अर्थसंकल्पीय अंदाज))




स्रोत: संबंधित वर्षांची वित्तीय लेखा आणि अंदाजपत्रके.

**५.४.३ भांडवली खर्च:** भांडवली खर्चाचा हिस्सा जवळ जवळ निम्मा झाला आहे, सन २००८-०९ मध्ये २४% असलेला भांडवली खर्च सन २०१८-१९ (सुधारित अंदाज) मध्ये ११% वर आला आहे. स्थूल राज्यातंर्गत उत्पादनाच्या टक्केवारीनुसार भांडवली खर्चाचा उतरता कल चिंतेची बाब आहे. राज्य शासना नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायत राज स्वराज्य संस्थांना विशिष्ट भांडवली मत्ता निर्माण करण्याकरीता लक्षणीय प्रमाणात अनुदान दिले आहे, कदाचित त्याच्याशी ही सुसंबंद्धित असावी. राज्य शासनाच्या लेखामध्ये सदर खर्च महसुली खर्च म्हणून योग्यपणे परावर्तीत झालेला आहे, तथापि परिणामी राज्यात भांडवली मालमत्ता निर्माण झाली.

याशिवाय मोठ्या संख्येने राज्य संमातर जसे कि मुंबई महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरण (एमएमआरडीए), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास प्राधिकरण (एमएसआरडीसी), नगर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) इत्यादी पायाभूत सोयीसुविधांच्या संरचना निर्माणाकरीता रुपये २ लाख कोटींची गुंतवणूक करीत आहेत, जे राज्याच्या अंदाजपत्रकामध्ये परावर्तित झालेले नाहीत.

### ५.१ कर्ज व्यवस्थापन

राज्य शासना सन २००५ ते २०१८ या कालावधी दरम्यान कर्ज संरचनेत महत्वपूर्ण बदलासहीत कर्ज स्थितीतील सुधारणेचे साक्षीदार झाले आहे. एकूण कर्जाचे स्थूल राज्यातंर्गत उत्पादनाशीच्या गुणोत्तरामध्ये २००५-०६ मधील २५.५% ते २०१८-१९ (सुधारित अंदाज) मधील १४.८२% अशी स्थिरपणे घट झाली आहे. २०१८-१९ च्या अखेरीस एकूण थकीत ऋण रुपये ४,१४,४११ कोटी इतके होते. राज्याच्या ऋणाचे प्रमुख घटक खुल्या बाजारपेठेतून घेतलेले कर्ज त्यानंतर राष्ट्रीय अल्प बचत फंड हे होत.

आलेख १५: कर्ज संरचना(%, २०१७-१८)




स्रोत: (२०१७-१८) चे वित्तीय लेखा आणि अंदाजपत्रक महाराष्ट्र

महसूल प्राप्तीतील व्याज टक्केवारी कर्ज संरचनेमध्ये महत्वपूर्ण बदलासह सन २००५-०६ मधील अत्युच्च २१% वरून २०१८-१९ (सुधारित अंदाज) मध्ये ११.८४% अशी उत्तरोत्तर घटत गेली आहे.

आलेख १६: महसूल प्राप्तीतील व्याजाच्या % चा कल




स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे आणि अंदाजपत्रके

**५.५.१ कर्ज व्यवस्थापनाकरीता शासनाचे उपक्रम:** राज्यावरील कर्जाचे ओझे कमी करण्याकरीता अनेक उपक्रम सुरु करण्यात आले आहेत. सन २०१७-१८ पासून शासनाने पुर्वी दिलेल्या कर्जरोख्यांना पुन्हा: जारी करून दुय्यम बाजारातील रोकड सुलभतेमध्ये सुधारणा आणण्याकरीता बाजारातून कर्ज घेण्याच्या प्रक्रियेमध्ये वदल केले आहेत. महाराष्ट्राच्या सुधारित दुय्यम बाजार रोकडसुलभतेने राज्य विकास ऋणाने राज्याला चांगले उत्पादन मिळविण्यास मदत झाली आहे, त्यामुळेच रुपये ९०४ कोटी इतक्या रुपयांचा राज्यावरील कर्ज आणि व्याजाचा भार कमी झाला आहे.

या व्यतिरिक्त, खुल्या बाजारातील उसनवारी/कर्ज (ओएमबी) बाबतचे त्रैमासिक निदर्शक दिनदर्शिकेमुळे गुंतवणूकदारांना राज्य विकास कर्ज गुंतवणूकीबाबत नियोजन करता येते. या दिनदर्शिकेमध्ये तारण रक्कम, तारण कालावधी आणि ते नव्याने जारी केले आहे की पुन: जारी केले आहे याबाबतची माहिती असते.राज्याने या कर्ज दिनदर्शिकेचे बहुतांशी अनुपालन केले आहे आणि यामुळेच गुंतवणूकदारांमध्ये महाराष्ट्र राज्य विकास कर्जाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण होण्यास आणि तुलनात्मक दृष्ट्या कमी व्याजदराने कर्ज मिळण्यास मदत झाली आहे.

### ५.६ सन २०१९-२५ या कालावधीकरीता वित्तीय प्रक्षेपण

तक्ता ८: २०१९-२०२५ या कालावधीतील वित्तीय प्रक्षेपण

| जीएसडीपीच्या % नुसार | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९७ (सु.अ.) | २०१९-२०(प्रक्षेपित) | २०२०-२१(प्र) | २०२१-२२(प्र) | २०२२-२३(प्र) | २०२३-२४(प्र) | २०२४-२५(प्र) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण महसूल प्राप्ती | ९.१% | ९.७६% | १०.७८% | १०.६७% | ९.६% | ९.४% | ९.२% | ८.९% | ८.७% |
| राज्याचा स्वत:चा कर महसूल | ६.६% | ६.७२% | ६.७५% | ६.७३% | ७.१% | ७.०% | ६.८% | ६.७% | ६.६% |
| राज्य करेतर महसूल | ०.६% | ०.६६% | ०.६१% | ०.५३% | ०.६% | ०.५% | ०.५% | ०.५% | ०.४% |
| केंद्राच्या करातील हिस्सा | १.५% | १.५% | १.६% | १.५% | १.५% | १.५% | १.४% | १.४% | १.४% |
| केंद्राचे सहायक अनुदान | १.०% | १.४% | १.१% | १.१% | १.०% | ०.९% | ०.९% | ०.८% | ०.८% |
| महसुली खर्च | ९.४% | ९.६७% | १०.७८% | १०.६८% | १०.३% | १०.२% | १०.१% | १०.०% | ९.९% |
| वेतन निवृत्ती वेतन | ०.७% | ०.७% | ०.७% | ०.८% | ०.८% | ०.७% | ०.७% | ०.७% | ०.७% |
| व्याज | १.३% | १.३% | १.२% | १.३% | १.३% | १.२% | १.२% | १.२% | १.२% |
| महसुली तूट | ०.४% | (+)०.०८ | ०.५४% | ०.६३% | ०.६% | ०.८% | ०.९% | १.०% | १.२% |
| एकूण भांडवली प्राप्ती | १.८% | १.९% | १.९% | १.९% | २.०% | २.०% | २.१% | २.१% | २.२% |
| भांडवली खर्च | १.४% | १.३% | १.३% | १.४% | १.३% | १.२% | १.१% | १.१% | १.०% |
| वित्तीय तूट | १.७% | ०.९६% | २% | १.९२% | १.९% | १.९% | २.०% | २.०% | २.१% |
| प्राथमिक तूट | ०.४% | ०.५% | ०.६% | ०.६% | ०.६% | ०.७% | ०.७% | ०.८% | ०.९% |
| कर्ज साठा | | | | | | | | | |
| एकूण महसूल प्राप्ती* वरील अ % व्याज | १३.९% | १३.५५% | ११.८४% | ११.१९% | १३.०% | १३.२% | १३.४% | १३.६% | १३.८% |

### ५.७ राविआचे सन २०२०-२५ कालावधी दरम्यानच्या वित्तीय स्थितीबाबतचे मुल्याकंन:

राविआ सन २०२०-२५ दरम्यानच्या कालावधीकरीता हा अहवाल सादर करीत आहे. राज्याच्या या कालावधीच्या वित्तीय मुल्याकंनाबाबत खालील घटकांचा विचार करणे आवश्यक आहे:

**अ. ७ व्या वेतन आयोगाच्या प्रदानाचा प्रभाव:** राज्य शासनाने ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींची राज्य शासनाच्या कर्मचाऱ्याकरीता तसेच २०१९ च्या सुरुवातीला सहाय्यक अनुदान पात्र संस्थाच्या कर्मचाऱ्याकरीता अंमलबजावणी करण्याचे जाहीर केले आहे. परिणामत: उच्च वेतन श्रेणीमुळे वेतन आणि निवृत्ती वेतनाकरीता दरवर्षी रुपये १४,००० कोटी इतका निधिचा बहिर्गामी प्रवाह होईल. याखेरीज १.१.२०१६ पासून रुपये ३८,६५५ कोटी इतके थकीत वेतन असेल, जे पाच वर्षांच्या कालावधीत देय असेल. अशा प्रकारे दरवर्षी रुपये २१,७३१ कोटी ((१४०००+ ३८६५५)/५) इतका बहिर्गामी प्रवाह वेतन आणि थकीत वेतनाच्या हप्त्याकरीता पुढील काही वर्षे करावा लागेल.

**ब. वस्तू आणि सेवा कर:** उपरोक्त स्पष्टीकरणानुसार, वस्तू आणि सेवा कराने ३१.३.२०१९ रोजी १ वर्ष ९ महिन्यांचा कालावधी पूर्ण केला आहे. सदर करात ८% इतकी पोषक वृद्धी झाली आहे, परंतु अजूनही राज्यात तसेच देशात वस्तू आणि सेवा करास स्थिरस्थावर होण्यास काही कालावधी आवश्यक आहे.

सध्यातरी केंद्र शासनाकडून सर्व राज्य शासनांना तफावतीची रक्कम भरपाई म्हणून देण्याची व्यवस्था केलेली आहे. सन २०१५-१६ स पायाभूत कर वर्ष धरून १४% वार्षिक वृद्धीची गणना करण्यात आली आहे.जर राज्याची कर वसुली कमी असेल तर राज्याकडून तफावतीची रक्कम अदा करण्यात येईल. तथापि अशा प्रकारचे सहाय्य वस्तू आणि सेवा कर लागू झाल्यापासून पहिल्या पाच वर्षाकरीता असेल. सदर सहाय्य ३०.०६.२०२२ ला समाप्त होईल. त्यामुळेच हे सहाय्य काढून घेतल्यावर राज्याच्या अर्थव्यवस्थेवर / वित्त व्यवस्थेवर काय परिणाम होईल हे आत्ता सांगता येणार नाही. त्याच वेळी राज्य शासना महानगरपालिकांना प्रक्षेपित ८% वृद्धीनुसार नुकसान भरपाई देण्यास वचनबद्ध आहे.

**क. पुढील काही वर्षामध्ये मोठ्या संख्येने निवृत्त्या होणार आहेत:** याउपर, सन २०२०-२५ दरम्यान मोठ्या संख्येने शासकीय कर्मचारी निवृत्त होणे अपेक्षित आहे. याचाच अर्थ राज्याचा निधी अंतिम लाभाच्या स्वरुपात लक्षणीय वापरला जाणार आहे.

**५.८ राविआचे एकदंरीत मुल्यांकन:** या सर्वांचा विचार करता, आगामी काही वर्षामध्ये उपलब्ध स्वेच्छाधीन वित्तीय खर्च करण्याची लवचिकता सातत्याने कमीच राहील.

त्याच वेळी, राज्य शासनाची राजकोषीय उत्तरदायित्व अंदाजपत्रक व्यवस्थापन कायद्याच्या चौकटीनुसार अंदाजपत्रकीय तूट, कर्ज निकष आणि महसुली तूट किरकोळ आहे, हे विचारात घेता स्थानिक स्वराज्य संस्थांकडे केंद्रित राहून आवश्यकतेनुसार सहाय्य करण्यास जागा आहे. त्याचप्रमाणे, स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी तातडीने अथवा दीर्घ कालावधीत अधिक लाभ देण्याची क्षमता असलेल्या काही महत्वपूर्ण गुंतवणूक करण्यासही वाव आहे.

---

# प्रकरण ६

# जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या अर्थव्यवस्थेचे मुल्यांकन

## ६.१ जिल्हा परिषद- कायदेशीर स्थिती:

महाराष्ट्रामध्ये पंचायत राज प्रशासन आणि व्यवस्थापन याकरीता दोन कायदे आहेत. त्यातील एक जिल्ह्यातील पंचायतीकरीता म्हणजे जिल्हा परिषदा (यांस जिल्हापरिषदा- झेडपी) आणि मध्यवर्ती स्थानी पंचायत असून (यांस पंचायत समिती- पीएस) यांच्यासाठीचा महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती कायदा,१९६१ हा आहे. याशिवाय दुसरा ग्रामपंचायतीसाठीचा महाराष्ट्र ग्राम पंचायत कायदा, १९५९ आहे. आम्ही या प्रकरणामध्ये जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या आर्थिक समस्यांचा मागोवा घेणार आहोत.

पंचायत राज संस्थेच्या तीन स्तरामधील जिल्हा पातळीवर जिल्हा परिषदा आहेत, महाराष्ट्रामध्ये या आर्थिक दृष्ट्या आणि प्रशासकीय दृष्ट्या सर्वाधिक मजबूत आहेत. राज्यात आता ३४ जिल्हा परिषदा आहेत. मधल्या पातळीवरील पंचायत राज संस्थांना महाराष्ट्रामध्ये पंचायत समिती म्हणून ओळखण्यात येते. त्या महसूली तहसीलाच्या (तालुका) क्षेत्र हद्दीत असतात. राज्यात एकूण ३५१ पंचायत समित्या आहेत.

जिल्हा परिषद ही संयुक्त संस्था असून जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती कायदा, १९६१ मध्ये दिलेल्या व्याख्येनुसार तिला अधिकार प्राप्त आहेत तसेच कर्तव्ये निर्देशित केलेली आहेत. जिल्ह्यातील निवडणूक विभागाकडून घेतलेल्या थेट निवडणूकीद्वारे निवडून आलेल्या सदस्यांचा समावेश असतो. जिल्हा परिषदेच्या सदस्य पदासाठी आणि पंचायत समितीच्या सदस्य पदाकरीता आता फिरते आरक्षण असते. या व्यतिरिक्त जिल्हा परिषद अध्यक्ष आणि पंचायत समिती सभापती अशा पदांकरीता विविध वर्गांचे फिरते आरक्षण असते. याउपर, सर्व जागा आणि पदावर महिलांकरीता ३०% आरक्षण असते (अक्षीय आरक्षण).

जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती कायदा, १९६१ (कलम १००) च्या पहिल्या अनुसूचीला जिल्हा यादी म्हणतात. यामध्ये राज्य शासनाने जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत केलेल्या विषयांची यादी असते. जिल्हा

परिषदेला जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती कायदा, १९६१ च्या कलम १३० अनुसार 'जिल्हा निधी' ठेवावा लागतो. शासनाकडून किंवा त्यांच्या स्वत:च्या स्त्रोतातून आलेला निधी या जिल्हा निधिमध्ये जमा करण्यात येतो आणि नंतर खर्च करण्यात येतो.

### ६.२ पंचायत समिती- कायदेशीर स्थिती:

पंचायत समित्या या काही स्वतंत्र कायदेशीर संस्था नाहीत. त्या जिल्हापरिषदेच्या 'अंमलबजावणी यंत्रणा ' प्रमाणे आहेत. त्यांनी जिल्हा परिषदेचा निर्णयांची अंमलबजावणी करणे अपेक्षित असते.एकल जिल्हा परिषद कर्मचारी संवर्ग तसेच मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी (सीएएफओ) पंचायत समितींच्या वित्तीय बाबींवर देखील नियंत्रण करतात. जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती यांकरीता एकत्रितपणे वित्तीय विवरणपत्र आणि अंदाजपत्रक तयार करण्यात येते. त्यांचे उत्पन्नाचे स्त्रोत अत्यंत मर्यादित असतात (पुढे यावर तपशीलवार चर्चा केलेली आहे) आणि त्यांना त्यांच्या कामात अगदी थोडी स्वायत्तता असते.

### ६.३ इतर राज्यातील पंचायत राज संस्थांची स्थिती:

महाराष्ट्र राज्य पंचायत राज संस्थाच्या प्रशासनामध्ये अग्रेसर असल्याचे मानण्यात येत होते. सन १९९० पर्यंत अनेक राज्ये महाराष्ट्राच्या खूपच मागे होती. तथापि, संविधानाच्या ७३ व्या ऐतिहासिक सुधारणेमुळे (दि.२४.४.१९९३ पासून कार्यान्वित) संविधानाच्या कलम २४३ मध्ये विविध सुधारणा करण्यात आल्या आणि त्यान्वये पंचायत राज संस्थांना 'संविधानात्मक दर्जा' प्राप्त झाला आहे. या संविधानात्मक सुधारणांची प्रमुख वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत:

अ. सर्व राज्यामध्ये पंचायत राज व्यवस्थेमध्ये तीन स्तरीय रचना करण्यात आली. (काही छोटी राज्य यांस अपवाद आहेत.)

ब. त्यांच्याकरीता राज्य निवडणूक आयुक्ताकडून पर्यवेक्षित केलेल्या नियमित निवडणूका.

क. पंचायतीच्या तीनही स्तरावर अध्यक्षाच्या जागेसाठी अनु.जाती/जमाती आणि महिला (अक्षीय आरक्षण) यांच्याकरीता आरक्षण.

ड. राज्य वित्त आयोग संस्थेची ओळख.

या संविधानात्मक सुधारणांचा परिणाम म्हणजे, अनेक राज्य सरकारांनी सन १९९० मध्ये त्यांच्या राज्याच्या कायद्यामध्ये सुधारणा करून पंचायत राज प्रशासनांचे पुनर्व्यवस्थापन केले. काही राज्यांनी

भक्कम जिल्हा पंचायतीची व्यवस्था कायम ठेवली किंवा निर्माण केली (जसे की महाराष्ट्र, कर्नाटक), काहींनी मधली पंचायत व्यवस्था मजबूत करण्याचा पर्याय निवडला (जसे की आंध्र प्रदेश किंवा तामिळनाडू - आंध्र प्रदेश मध्ये त्यांस मंडल पंचायत तर तामिळनाडूमध्ये त्यांस पंचायत युनियन असे म्हणतात) आणि काहींनी ग्राम पंचायत व्यवस्था मजबूत करण्याचा पर्याय निवडला (केरळ, पश्चिम बंगाल). अशा प्रकारे, पुढे ७३ वी संविधानात्मक सुधारणा करेपर्यंत व सन १९९३ नंतर पंचायत राज प्रशासनाची अंमलबजावणी करण्याची, महाराष्ट्र आणि इतर राज्यातील दरी, टप्प्या टप्प्याने कमी होत गेली.

### ६.४ मागील ६० वर्षांमधील महाराष्ट्रातील जिल्हा परिषद आणि पंचायती समित्यांची बदलती भूमिका:

महाराष्ट्रात जिल्हा परिषदांच्या स्थापनेपासून नंतरच्या वर्षामध्ये त्यांच्या भूमिकेत उल्लेखनीय बदल दिसून आला आहे. जिल्हा परिषदा अस्तित्वात आल्यापासूनच्या पहिल्या दोन दशकांमध्ये (सन १९६०-८०), आपण जर सर्व स्रोतांच्या एकूण उत्पन्नाची टक्केवारी पाहिली तर त्यांचे स्वत:चे उत्पन्न (नियुक्त कर आणि इतर स्रोतामधून) तुलनात्मकदृष्ट्या अधिक आहे. सन १९६०-८०च्या टप्प्यात जि.प. चे स्वत:चे उत्पन्न जास्त होते (वर नमुद केल्याप्रमाणे) व राज्य शासन किंवा केंद्र शासनाच्या जास्त विकास योजना नव्हत्या. या कालावधी दरम्यान, त्यांच्या स्वत:च्या उत्पन्नांने अनेक जिल्हा परिषदांनी स्वत:च्या योजना सुरु केल्या होत्या जसे की शेती, पशुपालन आणि इतर संबंधित समस्याबाबत जाणीव जागृतीच्या मोहिमा सुरु केल्या होत्या. काही जिल्हा परिषदांनी स्वत:चे छापखाने काढले होते (उदा. सातारा, सांगली, यवतमाळ इत्यादी), काहींनी त्यांचा स्वत:चा पशुखाद्य कारखाना (उदा. चंद्रपूर) काढला आणि अनेक ग्राम विकासाचे उपक्रम करून दाखविले होते.

सन १९८० नंतर शासनाच्या योजनांचा झपाट्याने विस्तार झाला त्याचवेळी जिल्हा परिषदांच्या एकूण उत्पन्नात त्यांच्या स्वत:च्या उत्पन्नाची टक्केवारीत घट झाली. याचे एक कारण म्हणजे जिल्हा परिषदांना कराचा अधिकार नाही, त्या संपूर्णत: राज्य शासनाने नियुक्त केलेल्या कराच्या उत्पन्नावर अवलंबून आहेत. नियुक्त करांपैकी अनेक इतके फलदायी राहिले नाहीत. याबाबत या प्रकरणात पुढे चर्चा केली आहे.

अशा प्रकारे, पुढील वर्षांमध्ये जिल्हा परिषदा त्यांना जिल्हा परिषद आणि पंचायत संस्था कायद्यानुसार प्राप्त विशिष्ट प्रशासकीय मंजूरीच्या आणि संनियंत्रणाच्या अधिकारासह शासनाच्या योजनांच्या 'अंमलबजावणी संस्था' बनल्या आहेत. शासनाच्या बहुतांशी योजनांची मार्गदर्शक तत्वे अगदी काटेकोर आहेत, त्यामुळे जिल्हा परिषदांना स्वत:च असं काही ठरविण्यास अगदी कमी वाव असतो. याउपर

शासनाकडून प्राप्त होणारा बराचसा निधी शिक्षकांचे वेतन, अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे वेतन किंवा आरोग्य कर्मचाऱ्यांचे वेतन अशा आस्थापना शीर्षांवर खर्च (यापूर्वी यांस योजनेतर खर्च म्हंटले जायचे) होतो.  येथे देखील सारे काही शासन निर्णयानुसारच करायचे असते आणि जिल्हा परिषदेच्या निर्वाचित सदस्यांची यामध्ये अगदी नगण्य भूमिका असते.

तक्ता ९- **जि.प च्या विविध सेवा मार्गाकडून मिळालेला निधी :**

(रुपये लाखात)

| अनु. क्र. | जिल्हा | हस्तांतरित योजनां मधून प्राप्त निधी (कलम १००) | संस्थां योजनांतर्गत प्राप्त निधी (कलम १२३) | जिप स्वत:चे उत्पन्न (उपकरा सहीत) | एकूण उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| १ | पालघर | ८६,३१० | ६,८०८ | ३,७२० | ९६,८३८ |
| | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | ८९% | ७% | ४% | |
| २ | नाशिक | १,५७,३०८ | १३,५८२ | ४,६८१ | १,७५,५७२ |
| | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | ९०% | ८% | ३% | |
| ३ | सातारा | १,१६,३५७ | ६,६३१ | ३,२२५ | १,२६,२१४ |
| | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | ९२% | ५% | ३% | |
| ४ | लातुर | ७१,०१० | ४,३९८ | १,०२२ | ७६,४३० |
| | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | ९३% | ६% | १% | |
| ५ | अमरावती | ९७,८३३ | ७,१५९ | २,२२४ | १,०७,२१६ |
| | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | ९१% | ७% | २% | |
| ६ | वर्धा | ४०,६४९ | ३,२८१ | २,५७४ | ४६,५०३ |
| | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | ८८% | ७% | ६% | |
| ७ | सरासरी | ९४,९११ | ६,९७७ | २,९०८ | १,०४,७९५ |
| | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | ९०% | ७% | ३% | |

आलेख १७ : **जिल्हा परिषद सरासरी स्वत:चे उत्पन्न**




## ६.५ जिल्हा परिषदा- 'जिल्हा निधी' च्या उत्पन्नाचे स्त्रोत

जसे की, परिच्छेद १.१ मध्ये नमूद केले आहे, कोणत्याही स्त्रोतातून आलेले जिल्हा परिषदेचे उत्पन्न जिल्हा निधिमध्ये जमा करणे अनिवार्य आहे. जिल्हा निधिच्या उत्पन्नाची बाजू खालील आकृतीन्वये दर्शविता येईल.

आलेख १८: जिल्हा परिषदेच्या जिल्हा निधी साठी उत्पन्नाची साधने



### ६.५.१ राज्य शासनाच्या हस्तांतरित किंवा संस्था योजनाकरीता प्राप्त निधी- उद्देशित अनुदान.

जिल्हा परिषदांना राज्य किंवा केंद्र शासनाकडून त्यांच्या योजनांच्या अंमलबजावणीकरीता निधी प्राप्त होतो. सदर निधी राज्य शासनाने (जिप आणि पंस कायद्याच्या कलम १०० नुसार) हस्तांतरित केलेले विषय जसे की प्राथमिक शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, पशुपालन, महिला आणि बाल कल्याण, १०० हेक्टर क्षेत्रापर्यंत लाभदायक ठरणारे लघु सिंचन प्रकल्प किंवा गाव रस्ते इत्यादीशी संबंधित असू शकतात. अशाही काही योजना असतात ज्या राज्य शासनाच्या अधीन असतात परंतु त्यांची अंमलबजावणी संस्था योजना(जिप आणि पंस कायद्याच्या कलम १२३ नुसार) म्हणून जिल्हा परिषदेकडून केली जाते. आपण या दोन्ही प्रकारच्या निधिला जिप आणि पंस कायद्याच्या कलम १८२ अंतर्गत शासनाकडून प्राप्त 'उद्देशित अनुदान' असे संबोधू शकतो.

या व्यतिरिक्त, राज्य शासनाने हस्तांतरित केलेल्या योजनांच्या अंमलबजावणीकरीता (कलम १८३) जिल्हा परिषदांना लक्षणीय स्थापना अनुदान सुद्धा प्राप्त होते. जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांच्या कर्मचाऱ्यांचे वेतन जसे की प्राथमिक शाळेचे शिक्षक, प्राथमिक आरोग्य केंद्र कर्मचारी आणि इतर संवर्ग जसे की एकात्मिक बाल विकास सेवामधील अंगणवाडी सेविका इत्यादींचे वेतनाकरीता हा निधी उपयोगात येतो.

योजना अनुदान आणि स्थापना अनुदान ही दोन्हीही अनुदाने जिल्हापरिषदेचे विशिष्ट किंवा बांधिल अनुदाने असून जिल्हा परिषदेने शासकीय मार्गदर्शक तत्वानुसार त्यांची अमंलबजावणी करणे अपेक्षित आहे. या बाबतीत जिल्हा परिषदेच्या निर्वाचित सदस्यांना केवळ सदर बाबी प्रशासकीय मान्यतेकरीता जिपच्या विविध समित्यांसमोर मांडणे किंवा कंत्राटदार किंवा पुरवठादार यांना मान्यता देण्याव्यतिरिक्त स्वत:च काही ठरविण्यास वाव नसतो. जसे की परिच्छेद १.४ मध्ये नमूद केल्यानुसार वर्तमान स्थितीमध्ये जिल्हा परिषदेच्या एकूण उत्पन्नामध्ये उद्देशित अनुदानाचा वाटा ९७% इतका आहे. जिल्हा परिषदा शासनाच्या योजनांकरीता माध्यम किंवा अंमलबजावणी संस्था बनल्या आहेत.

### ६.५.२ 'स्वत:चे उत्पन्न' म्हणून प्राप्त निधी- यांस 'जिप उपकर उत्पन्न' म्हणून ओळखले जाते:

जिपचे स्वत:चे उत्पन्न अत्यंत मर्यादित असते आणि जिपचे निर्वाचित सदस्य (तत्वत:) त्यांना वाटलेल्या प्राधान्या नुसार खर्च (राज्य शासनाच्या ढोबळ मार्गदर्शक तत्वांच्या किंवा निर्देशांच्या अधीन राहून) करु शकतात. हे उत्पन्न विद्यमान स्थितीमध्ये जिल्हा परिषदेच्या एकूण उत्पन्नापैकी केवळ ३% इतकेच आहे. (परिच्छेद ६.४ मधील विश्लेषण पाहा). जिपच्या अधिकारेतर जनांमध्ये हे 'उपकर उत्पन्न' म्हणून ओळखले

जाते. मात्र वास्तवात जिल्हा परिषदेच्या स्वत:च्या उत्पन्नामध्ये उपकर उत्पन्न (नियुक्त कर), करेतर आणि इतर उत्पन्नाचाही समावेश होतो.

### ६.६ संपूर्ण जिप आणि पंस कायद्याच्या पुनरावलोकनाची आवश्यकता:

विद्यमान पंचायत राज संस्थांची संरचना जिल्हापरिषद (जिल्हा) केंद्रित आहे तर प्रशासकीय तसेच आर्थिक दृष्ट्या पंचायत (पंचायत समिती) फार कमकुवत आहे.

**महाराष्टातील पंचायत राज चे विद्यमान स्थापत्य:**

तक्ता १०: पंचायत राजचे वर्तमान स्थापत्य:

| अनु. क्र. | कार्य | जिल्हा परिषद | पंचायत समिती | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | संबंधित प्रशासकीय क्षमता | मजबूत | कमकुवत, संपूर्णपणे जिपवर अवलंबून | -- |
| २ | मुख्य भूमिका | केंद्रिय आणि शासकीय योजनांच्या हस्तांतरित विषयाकरीता अंमलबजावणी संस्था | जिपची अंमलबजावणीसाठी विस्तारीत शाखा होय | जिपला प्राप्त होणारा किमान ९०% निधी आणि काम हे या श्रेणीमध्ये येते. |
| ३ | हस्तांतरीत योजनामधील स्वायत्तता | विशेष नाही, निधी प्राप्त झाल्यावर विविध जिप समित्या प्रशासकीय आणि तांत्रिक मंजुऱ्या देतात, निविदा काढतात, कंत्राटदार निश्चित करतात इत्यादी. | प्रशासकीय मंजूरी आणि निविदा जिप पातळीवर होत असल्याने पंसला काही भूमिका नसते | त्यांची विद्यमान शासकीय मार्गदर्शक तत्वांच्या चौकटीमध्ये अंमलबजावणी करायची असते. |
| ४ | आस्थापना बाबी | जिप कर्मचाऱ्यांचे ६० संवर्ग असून त्यांना शासनाकडून १००% वेतन मिळते आणि ते शासकीय नियमांना बांधील असतात. | पंसकडे स्वतंत्र कर्मचारी संवर्ग नसतो. | आस्थापना धोरणा संदर्भातील बाबींबाबत जिपला जिप कर्मचाऱ्यांना कामाचे वाटप व बदल्या या व्यतिरिक्त आस्थापना धोरणामध्ये कोणतीही भूमिका नसते. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | स्वत:च्या निधिचा स्वत:च्या योजनाकरीता वापर करण्याची क्षमता (उपकर निधी) | अत्यंत मर्यादित. जवळ जवळ सर्व रक्कम नियुक्त कर किंवा सहाय्यक अनुदान यातून प्राप्त होते. इतर कोणत्याही स्त्रोतातून अतिरिक्त संसाधने निर्माण करण्याची क्षमता मर्यादित आहे, जिपला कर करण्याचे अधिकार नाहीत. | अगदी सुमार. जमीन महसूल अनुदानातील हिश्याव्यतिरिक्त त्यांना क्वचित इतर सहाय्यक अनुदान प्राप्त होते. यामुळेच पंसचे स्वत:च्या निधितील कार्यक्रम जवळ जवळ नाहीतच. | |
| ६ | स्वत:च्या उपकर निधिच्या वापरास प्राधान्य देण्याचे स्वातंत्र्य | केवळ अंशत: कारण स्वत:च्या उत्पन्नातील ५५% निधी शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार अगोदर अनिवार्यपणे प्रथम महिला आणि बाल कल्याण, दुर्बल घटकांचे कल्याण, शारीरिकदृष्ट्या अपंगाचे कल्याण, पिण्याचे पाणी इत्यादी उपक्रमाकरीता वापरला जातो. | पंचायत समित्यांना देखील काही विशिष्ट उपक्रम जसे की महिला आणि बाल कल्याण, दुर्बल घटकांचे कल्याण, शारीरिकदृष्ट्या अपंगाचे कल्याण, पिण्याचे पाणी इत्यादीकरीता निधी अनिवार्यपणे खर्च करावा लागतो. | कायद्याच्या कलम २६१ अंतर्गत अनेक आदेश निर्देशांनी जिप कार्यकारी मंडळाच्या विवेकाधीन अत्यल्प बाबी ठेवल्या आहेत. |
| ७ | शासनाची तिसरी श्रेणी म्हणून जिपची भूमिका, उत्पन्नाचे स्वायत्त स्त्रोत तसेच ते उत्पन्न कोणत्या रितीने आणि पद्धतीने खर्च करण्याचे स्वातंत्र्य | अत्यल्प. जसे यापूर्वीच निदर्शनास आणून दिल्याप्रमाणे की अगदी ३ ते ५% निधिच हा स्वत:चा निधी असतो. ते शासनाच्या नियुक्त केलेल्या कराच्या वितरणासाठी सुध्दा शासनावर अवलंबून असतात. त्यांच्याकडे ग्रामपंचायातीप्रमाणे कर वसुली अथवा स्वत:चे उत्पन्न निर्माण करण्याचे अधिकार नाहीत. खर्चाच्या बाबतीतही ते विविध आदेश आणि मार्गदर्शक तत्वांनी बांधिल आहेत. | पंचायत समितीला स्वातंत्र्य जवळ जवळ नाहीच कारण त्यांना त्यांचे स्वत:चे उत्पन्न म्हणून जमीन महसूल उपकरातील त्यांचा हिस्सा व्यतिरिक्त काही नाहीच. | जिपला आपण निर्वाचित अधिकारेतर जनांच्या सनियंत्रणाखाली अंमलबजावणी संस्था म्हणू शकतो. त्यांना लोकशाही प्रशासनाची स्वतंत्र संस्था म्हणता येणार नाही कारण त्यांचे वित्तीय आणि प्रशासकीय अधिकार अत्यंत मर्यादित आणि बांधिल स्वरुपाचे आहेत. |

ग्राम विकास विभागाने यापुर्वीच सुधीर ठाकरे समिती स्थापन केली असून सदर समितीने पंचायत राज प्रशासनामधील सुधारणाबाबतचा त्यांचा अहवाल शासनाला सादर केला आहे.

राविआचे असे मत आहे की महाराष्ट्रातील (१९६० ला निर्माण केलेली) पंचायत राज संरचनेची संपूर्णपणे नव्याने नव्या दृष्टीकोनातून रचना करणे आवश्यक आहे.

### ६.७ जिप आणि पंस च्या संसाधनाबाबत राज्य वित्त आयोगाची भूमिका:

राविआला दिलेल्या आदेशाप्रमाणे त्यांचे काम करावयाचे आहे. त्यांना जिप आणि पंसच्या कायदयाच्या वर्तमान चौकटीमध्येच त्यांच्या शिफारशी करावयाच्या आहेत. त्यामुळेच या पुढे देण्यात आलेल्या शिफारशी दिलेल्या परिस्थितीवरच आधारलेल्या आहेत. या उपर राविआ जिप मार्फत अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या ९५ ते ९७ टक्के योजना तसेच आस्थापना निधिवर जाणीवपूर्वक भाष्य केले नाही. या राज्य आणि केंद्र शासनाच्या प्राथमिक शिक्षण, प्राथमिक आरोग्य आणि पशुपालन, शेती, एकात्मिक बाल विकास योजना संबंधित आणि इतर योजना आहेत. तसेच यामध्ये मोठ्या प्रमाणात आस्थापना अनुदान देखील आहे. प्रत्येक जिप मध्ये जवळ जवळ १०,००० शिक्षक आहेत. सर्व आस्थापना आणि योजनांमध्ये जिपला प्राप्त झालेले अनुदान जिप निधी मध्ये जमा करण्यात येतो. त्याबाबत कडक मार्गदर्शक तत्वे आहेत आणि जिप पातळीवर अगदी मर्यादित वित्तीय स्वातंत्र्य आहेत. जिप केवळ अंमलबजावणी करणारी संस्था आहे. त्यामुळेच राज्य शासनाच्या योजना किंवा आस्थापना अनुदानाबाबत टिप्पणी करणे, आमच्या मते राविआला दिलेल्या निर्देशांच्या चौकटी बाहेरचे आहे. त्यामुळे आम्ही आखून दिलेल्या निर्देशाच्या मर्यादेला बांधिल आहोत.

यामुळेच या प्रकरणामध्ये केवळ जिप आणि पंस चे स्वत:चे ‘मुक्त’ उत्पन्न या बाबीवरच विचार करण्यात येत आहे. जिपचे हे उत्पन्न शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेश आणि कायद्या अन्वये प्राप्त होते. हे स्वत:चे उत्पन्न जिप आणि पंस मार्फत दोन उद्देशाकरीता उपयोगात आणले जाते:

अ. जिपला शासकीय योजनांच्या अंमलबजावणीकरीता उपलब्ध होणाऱ्या ९५% निधिचे सनियंत्रण करणे सुलभ व्हावे यासाठी त्यांच्या स्वत:च्या अधिकृत नसलेल्या आणि संबंधित आस्थापनांच्या खर्चाची पूर्तता करणे,

ब. स्थानिक संबंधित आणि आवश्यक वाटलेल्या योजनांकरीता.

थोडक्यात, यापुढील आमचे विश्लेषण आणि शिफारशी या जिल्हा परिषदा आणि पंचायत समितींच्या स्वत:च्या उत्पन्नाचे मजबूत व्यवस्थापन कशाप्रकारे करावे ‘केवळ या संबंधीच’ असतील.

## ६.८ **जिल्हा परिषदांचे स्वत:च्या उत्पन्नाचे स्त्रोत:**

जिल्हा परिषदांच्या स्वत:च्या उत्पन्नाचे स्त्रोत पुढीलप्रमाणे आहे :

अ. नियुक्त कर

ब. करेतर उत्पन्न

क. राज्य शासनाचे विशिष्ट सहायता अनुदान

आम्ही जिल्हा परिषदांचे स्वत: चे उत्पन्न खालील आकृतीप्रमाणे दर्शवू शकतो:

आलेख १९: जिल्हा परिषद स्वउत्पन्नाची साधने




## ६.९ **नियुक्त कर:**

नियुक्त कर म्हणजे राज्य शासनाने तयार केलेले आणि वसूल केलेले कर आणि कार्यान्वित राहाण्याकरीता त्या करांमधील वाटा जिल्हा परिषदांना सोपविण्यात येतो.

जिल्हा परिषदांकरीताच्या नियुक्त करांचे चार स्त्रोत पुढीलप्रमाणे आहेत:-

i. जमीन महसूल अनुदान
ii. मुद्रांक शुल्क उपकर
iii. वन महसुलातील हिस्सा
iv. सिंचन उपकर

वर नमूद केलेले (i) ते (iv) सर्व जिल्हा परिषद कायद्यामध्ये आढळून येतात, याचाच अर्थ ते विधिमंडळाने संमत केलेले आहेत. सन १९६० मध्ये कायदा तयार करण्यात आला तेव्हा नियुक्त कर कायद्यान्वये देण्यामागे विधिमंडळाचा हेतू हा की जिल्हा परिषदांना खात्रीशीर रक्कम प्राप्त व्हावी, जो त्या त्या वेळच्या शासनाला बदलता येणार नाही. येथे एक लक्षात घ्यायला हवे की त्या काळात राज्य वित्त आयोग नव्हता त्यामुळे अशा प्रकारे नियुक्त कर दिल्याने जिप आर्थिक दृष्टया कार्यरत राहिल हा विचार कदाचित होता. आम्ही त्यांचे खालीलप्रमाणे तपशीलवार विश्लेषण केले आहे:

६.९.१ **जमीन महसूल हिस्सा उत्पन्न:**

१९६१ मध्ये जेव्हा जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायदा करण्यात आला तेव्हा अर्थव्यवस्था प्रामुख्याने कृषीप्रधान होती. राज्यात विशेषत: ग्रामीण भागात जमीन महसूल हा उत्पन्नाचा अत्यंत महत्वाचा स्त्रोत होता. जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या ग्रामीण भागाकरीताच तयार करण्यात आल्या होत्या. यामुळेच राज्य शासनाला ग्रामीण लोकसंख्या (किंवा शेतकरी) (राज्य शासनाला) जो मूळ जमीन महसूल देत असत त्याव्यतिरिक्त अधिकची रक्कम स्वत:च्या पंचायत राज संस्था चालविण्याकरीता देण्याचे निर्देश त्यांना देण्यात आले होते. यांस जिप आणि पंस उपकर म्हणून ओळखले जात होते. याकरीताची तरतूद खुद्द जिप आणि पंस कायद्यामध्येच करण्यात आली होती. ती खालीलप्रमाणे आहे:

तक्ता ११ : जमीन महसूल उत्पन्नातील जिप आणि पंस उपकर तरतूद:

| अनु. क्र. | पंचायत राज संस्थांचे नाव | नियुक्त उपकर/ स्वत:चे उत्पन्न | जिप आणि पं. स.कायदा आणि /किंवा शासकीय निर्णय | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद (जिप) | जमीन महसूल उपकर | कलम १४४ | रुपये १ जमीन महसूलावर रुपये दोन- याचाच अर्थ सर्वसामान्य जमीन महसुलावर २००% उपकर- महसूल विभाग (म्हणजेच जिल्हाधिकारी) हा वसूल करतो आणि शासनामार्फत जिपला हस्तांतरित करतो. |
| २ | जिल्हा परिषद आणि पंचायत समिती ( जिप आणि पंस) | अतिरिक्त जमीन महसूल उपकर | कलम १५५ | जिप ठराव मंजूर करुन रुपये १ जमीन महसूलावर रुपये २ पेक्षा अधिक पण रु.५ पर्यंत उपकर आकारु शकते. ही रक्कम जिप आणि संबंधित पंस यांनी ४०:६० या गुणोत्तरानुसार वाटून घ्यायची, म्हणजेच जिपला रुपये २ आणि |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | पंसला रुपये ३. सर्व जिपंनी सदर ठराव दशकांपूर्वीच मंजूर केले आहे. |
| ३ | जिप आणि पंस | सापेक्ष अनुदान | कलम१८५, ग्राम विकास विभागाच्या दिनांक २२ जून १९९४ च्या शासना निर्णयासह वाचावे. | ग्राम विकास विभागाच्या दिनांक २२ जून १९९४ च्या शासन निर्णयाअन्वये अनुदानाचे गुणोत्तर निश्चित केले आहे (खाली पाहा). याची प्रमाणके खाली स्वतंत्रपणे दिलेली आहेत. त्यानुसार असे दिसून येईल की मूळ जमीन महसुलाच्या रुपये १ संकलनावर रुपये ८ आकारण्याच्या जिपला हक्क आहे. |
| ४ | जिप | प्रोत्साहन अनुदान | कलम१८६, ग्राम विकास विभागाच्या दिनांक २२ जून १९९४च्या शासना निर्णया सह वाचावे. | उत्तम कामगिरी करणाऱ्या जिपला शासन प्रोत्साहनपर अनुदान देण्याचे ठरवू शकते. शासन कामगिरीचे निकष आणि कितपत प्रोत्साहनपर अनुदान द्यायचे ते निश्चित करू शकते. हे अनुदान शासन त्यांच्या अधिकाराप्रमाणे ऐच्छीक देत असून ते अनिवार्य नाही. ग्राम विकास विभागाच्या दिनांक २२ जून १९९४च्या शासन निर्णयान्वये रुपये २ संकलनावर रुपये १.३७ इतक्या प्रोत्साहनपर अनुदानाची परिगणना करण्यात आली आहे. |
| ५ | जिप आणि पंस | जिल्हा परिषदेस जमीन महसूल प्रतिग्रह भरपाई | शासकीय निर्णयानुसार १९७७-७८ पासून अल्प भू धारकांना दिलेल्या महसूल सुटीशी संलग्न | शासनाने वेळोवेळी रुपये ५ पर्यंत महसूल आणि जिप उपकर देणाऱ्या छोट्या शेतकऱ्यांना आणि केवळ रुपये १० पर्यंत महसूल देणाऱ्या (परंतु त्यांना जिप उपकर देय अनिवार्य असेल) महसूलात संपूर्ण सूट देण्याचे धोरणात्मक निर्णय घेतले आहेत.तथापि छोट्या शेतकऱ्यांकडून जिप उपकर वसूल केला नसल्याने शासन पुढे येऊन जिपची देय रक्कम अदा करते. |

**६.९.२ सापेक्ष अनुदान (कलम १८५)- विद्यमान मार्गदर्शक तत्वे:**

२२ जून १९९४ च्या नियम क्रमांक एलसिएम/१०९२/प्र,क्र.१९८९ जी/२४ अन्वये सुयोग्य अनुदाना संदर्भातील मार्गदर्शक तत्वांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्याचा तक्ता खाली दिला आहे.

**तक्ता १२: सुयोग्य अनुदानासंबंधीची मार्गदर्शक तत्वे:**

| अनु.क्र. | जमीन महसूला वरील उपकर | स्थानिय उपकर दर | सापेक्ष अनुदान रक्कम |
|---|---|---|---|
| १ | पहिल्या २०० पैसे | - | - |
| २ | २००-३०० पैसे | ७५% | ७५ पैसे |
| ३ | ३०१-३५० | १००% | ५० पैसे |
| ४ | ३५०-४०० पैसे | १५०% | ७५ पैसे |
| ५ | ४००-७०० पैसे | २००% | ६०० पैसे |
| | **एकूण सापेक्ष अनुदान** | | ८०० पैसे |

उपरोक्त विविध श्रेणींचा सारांश जिल्हा परिषद आणि ग्राम पंचायतींना रुपये १ च्या मूळ जमीन महसुलावर (मूळ शेतसारा किंवा मूळ आकार) एकत्रितपणे खालीलप्रमाणे मिळण्याचा हक्क आहे:

तक्ता १३ : **जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचा जमीन महसुलावरील हक्क**:

| | |
|---|---|
| मूळ जमीन महसुलावरील उपकर- कलम १४४ | २ रुपये |
| अतिरिक्त उपकर- कलम १५५ | ५ रुपये |
| सापेक्ष अनुदान- कलम १८५ | ८ रुपये ( शासन निर्णय १९९४ अन्वये) |
| प्रोत्साहनपर अनुदान - कलम १८६ | १ रुपये ३७ पैसे (शासन निर्णय १९९४ अन्वये) |
| एकूण | १६ रुपये ३७ पैसे |
| + अल्पभूधारक शेतकऱ्यांना दिलेल्या जमीन महसुलीच्या सुटीवरील उपकर | ३ रुपये ( अंदाजे)<br>प्रत्यक्ष जमीन महसूल सुटीवर आधारित |
| एकूण बेरीज | २० रुपये ( कमीत कमी) (१६.३७+३ जवळील पूर्णांक २० केला) |

**६.९.३ जमीन महसूल उपकराबाबतची आमची निरीक्षणे:**

जमीन महसूलावर आधारित नियुक्त उपकर हे जिल्हा परिषदांच्या उत्पन्नाचा सर्वात जुने स्रोत आहे. आम्ही त्यांस 'आश्वासित' म्हणतो कारण जिल्हा परिषद कायद्यामध्येच त्याची तरतूद करण्यात आलेली आहे. तथापि, या अनेक वर्षामध्ये यावर अनेक गंभीर आघात झाले आहेत. आमची निरिक्षणे खालीलप्रमाणे आहेत:

अ. जिल्हा परिषदेला कलम १४४ अंतर्गत केलेल्या तरतूदीनुसार मागणीप्रमाणे अदा करण्याऐवजी प्रत्यक्ष वसुलीनुसार उपकर अदा करण्यात येतात.

जिप आणि पंस कायदा, १९६१ चे कलम १४४ पुढील प्रमाणे आहे, राज्य शासन जिल्ह्यातंर्गत दोनशे पैसे ते अधिकतम सातशे पैसे जसे संबंधित विभागीय आयुक्त कलम १५५ 'राज्य शासनाला सर्वसाधारण जमीन महसूल म्हणून देय असलेल्या प्रत्येक रुपयाकरीता' निश्चित करतील त्यानुसार उपकराच्या अटी आणि पद्धती निश्चित करेल. अशाप्रकारे हे स्पष्ट आहे की जिपला 'देय' असलेली रक्कम 'मागणीवर आधारित असेल आणि प्रत्यक्ष जमेवर नाही'. प्रत्यक्ष वसुली अनेक बाह्य घटकांवर अवलंबून असते. एखाद्या जिल्ह्यात १००% वसुली होत असेल तर दुसऱ्यात जेमतेम ८०%. हे महसूल अधिकाऱ्यांच्या क्षमतेवर देखील अवलंबून असते. तसेच दुष्काळ वा हवामानाच्या विपरीत स्थितिमुळे बऱ्याचदा राज्यशासना राज्यामध्ये अंशत: अथवा संपूर्णपणे जमीन महसुलात सूट देते. परंतु जिप उपकर ही भिन्न श्रेणी आहे आणि जिप आणि पंस कायदा, १९६१ अन्वये प्रत्यक्ष महसूल विभाग केवळ वसुली अभिकर्ता आहे. अशा प्रकारे जमीन महसुलात सूट दिलेली असो वा नसो, तरी जिप उपकर वसूल करायला हवा. अगदी जिप उपकर वसूल केला गेला नाही तरी कायद्याच्या तरतूदीनुसार राज्याने जिपला देय द्यायला हवे. याउपर सर्वात महत्वाचे म्हणजे,जसे की वर आधीच सांगितले आहे की जिपला हे सर्व उपकर 'मागणी' आधारे द्यावेत आणि 'वसुली' आधारे नाहीत.

तथापि, मात्र प्रत्यक्षामध्ये जिपंना विशिष्ट वर्षाला झालेल्या प्रत्यक्ष वसुलीच्या आधारे देय देण्यात येते, जे कायद्याच्या तरतुदींना अनुसरून नाही. तिसऱ्या राज्य वित्त आयोगाने हे स्पष्टपणे निदर्शनास आणून देतांना म्हंटले आहे, 'हे तर अगदी स्पष्ट आहे की वसुली होवो अथवा न होवो निश्चित केलेले उपकर अदा केलेच पाहिजेत. याउपर कोणत्याही कारणास्तव जमीन महसूलामध्ये राज्याने जरी सूट दिलेली असली तरी जिप उपकरामध्ये कोणतीही सवलत देण्यात येणार नाही.' (पाहा ३ रा राविआ अहवाल परिच्छेद ५.१३) तिसऱ्या राविआने त्यांचा अहवाल जून, २००६ मध्ये सादर केलेला असला तरी मागील तेरा वर्षामध्ये या गंभीर निरिक्षणाबाबत काहीही कारवाई करण्यात आलेली नाही.

ब. **जिल्हा परिषदांना देण्यात येणाऱ्या जमीन महसूल उपकराच्या तपशीलाबाबत गोंधळाची स्थिती असून सुस्पष्टतेचा अभाव आहे.**

जि. प. ला जमीन महसूल वितरणाची कार्यपध्दत आलेखाद्वारे पुढीलप्रमाणे दर्शविता येईल:

आकृती १: महसूल जिप उपकर वसुली आणि संकलनाच्या पायऱ्या.




खालील तक्ता जमीन महसूल उपकर संकलन कसे केले जाते आणि जिपंना वितरण करण्याच्या पायऱ्या दर्शवितो.

तक्ता १४: जिप उपकर संकलन आणि वितरणाचे टप्पे

| टप्पे क्रमांक | टप्प्यांचा तपशील | शेरा |
|---|---|---|
| १ | प्रत्येक गावाकडे (तलाठी) मूळ जमीन महसूल (मूळ आकार) नमुना ८ ब चा तपशील असतो. याची देखभाल तलाठी करतात. | मूळ जमीन महसूल दर ‘जमाबंदी’ च्या वेळी म्हणजेच १९३०-३५ शेवटचे निश्चित करण्यात आले आहेत आणि त्यानंतर त्यात वाढ करण्यात आलेली नाही. जमीन महसूलाबाबतची नमुना ८ ब (गाव नमुना) माहिती तहसीलदार पातळीवर समाप्त होते. |

| | | |
|---|---|---|
| २ | मूळ जमीन महसूल पायाभूत मानून, तलाठी त्यामध्ये जिप उपकर (दुप्पट), अतिरिक्त उपकर (५पट) आणि रुपये ५ ते रुपये १० जमीन महसूल सूट देण्यात आलेल्या महसूलावरील उपकर यांची बेरीज करुन जमीनधारकाकडून वसूल करतो. जरी दुष्काळ पडला असेल आणि जमीन महसूल माफ करण्यात आला असेल तरी उपरोक्त जिप उपकरामध्ये ॰सैध्दांतिक॰ दृष्ट्या सूट देण्यात येत नाही. | तलाठ्याकडून करण्यात आलेली ही परिगणना आणि वसुली तहसीलदार पातळीवर संकलित करण्यात येते आणि जिल्ह्याकडे पाठविण्यात येते. |
| ३ | जिल्हा पातळीवर संकलित करण्यात येते. सापेक्ष अनुदान, प्रोत्साहन अनुदान आणि रुपये ५ पर्यंत जमीन महसूल माफ करण्यात आलेल्या जमिनीवरील उपकराची सुद्धा जिल्हाधिकारी कार्यालयात सर्वसाधारणपणे चिटणीस यांच्याकडून बेरीज करण्यात येते (महसूल शाखा). | तहसीलदाराने दिलेला जिप उपकर वसुलीच्या आकडेवारीचा अहवाल जिल्हा पातळीवर तांत्रिकपणे संकलित करण्यात येतो. सापेक्ष अनुदान, प्रोत्साहन अनुदान आणि रुपये ५ पर्यंत जमीन महसूल माफ करण्यात आलेल्या जमीनीवरील उपकराची गणना जिल्हाधिकारी कार्यालयाने करावयाची असते, परंतु असे निदर्शनास आले आहे की सदर गणना नियमितपणे करण्यात येत नाही आणि या रकमांची बेरीज न करताच विभागीय आयुक्तांच्या कार्यालयामध्ये संकलित आकडेवारी पाठविण्यात येते.<br>मागील २५ वर्षांमध्ये या विषयावर कोणतीही महत्वपूर्ण मार्गदर्शक तत्वे नाहीत त्यामुळे सदर काम परिपाठानुसार करण्यात येतात. |
| ४ | जिल्हाधिकारी कार्यालय जिप उपकराच्या आकडेवारीचे संकलन करून विभागीय आयुक्तांना पाठविते, जेथे जिल्ह्यांच्या आकडेवारीचे संकलन करून मंत्रालयामध्ये (ग्राम विकास विभाग) पाठविते. | येथे पुन्हा एकदा असे आढळले की विभागीय आयुक्तांच्या कार्यालयातील महसूल शाखा आकडेवारीचे विश्लेषण करत नाहीत. वास्तविकत: सदर बाब जिप संबंधित असल्याने महसूल श्रेणीतील उपायुक्त (महसूल) याची हाताळत नाहीत तर जिप श्रेणीतील उपायुक्त (विकास) हाताळतात आणि त्यांना प्रत्यक्ष क्षेत्रामध्ये महसूल विभाग कशा प्रकारे उपकर वसुली करते याबाबत काहीही माहिती नसते. |

| | | |
|---|---|---|
| ५ | ग्राम विकास विभागात आकडेवारीचे विश्लेषण केले जात नाही. तेथे संकलन करुन अंदाजपत्रकीय उद्देशाकरीता वित्त विभागाकडे पाठवून देण्यात येते. | शासकीय पातळीवर आकडेवारीचे विश्लेषण अथवा तपासणी करण्यात येत नाही. मागील २५ वर्षामध्ये या विषयामध्ये कोणताही बदल नसल्याने केवळ आकडेवारीची बेरीज करून वित्त विभागाला पाठविण्यात येते. |
| ६ | ग्राम विकास विभागाला विभागीय आयुक्त जिप उपकर, अतिरिक्त जिप उपकर, सापेक्ष अनुदान, प्रोत्साहन अनुदान इत्यादी तपशीलासह माहिती पाठवितात. तथापि, अर्थसंकल्प तयार करतांना ग्राविवि सर्व माहिती एकाच लेखाशीर्षातंर्गत असल्याप्रमाणे हाताळतात. | ग्राविवि सर्व एकाच लेखाशीर्षातंर्गत म्हणजे सीआरसी संकेत ३६०४०७०९ नुसार वितरीत करते, त्यामुळे मुलभूत उपकर, अतिरिक्त उपकर, प्रोत्साहन अनुदान आणि सापेक्ष अनुदानासाठी किती वितरीत केले हे कळणे शक्य होत नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर शासन त्यांची स्वत:ची मार्गदर्शक तत्व पाळते की नाही, हे समजणे शक्य होत नाही. |
| ७ | वित्त विभाग रकमेचे अंदाजपत्रक अर्थसंकल्पीय कपाती सह करते. ते त्यास परिपाठाचे विकास कार्य म्हणून पाहते आणि संसाधनांच्या स्थितीनुसार निधी वितरित करण्यात येतो. | जिप उपकरास कायद्यान्वये देण्यात येणारी रक्कम म्हणून पाहण्यात येत नाही, परंतु अर्थसंकल्पीय कपातीस सुलभ असे विकास अनुदान म्हणून हाताळले जाते. |

थोडक्यात, तलाठी पातळीवर जिप उपकराच्या घटकांची (मूलभूत उपकर, अतिरिक्त उपकर आणि रुपये ५-१० पर्यंत मर्यादा असलेल्या शेतक-यांचे जमीन महसूल माफ करण्यात आलेल्या जमीनीवरील उपकर) गणना करण्यात येते आणि त्यांच्या स्वत:च्या विषयानुरुप गणनेनुसार वसुली करण्यात येते. अखेर जिल्हाधिकारी कार्यालयात (महसूल शाखा) सापेक्ष अनुदान, प्रोत्साहन अनुदान आणि रुपये ५ पर्यंत जमीन महसूल माफ करण्यात आलेल्या जमीनीवरील उपकर हे घटक संकलित केले जातात. संपूर्ण आकडेमोड तलाठी आणि जिल्हा पातळीवर चिटणीस करतात आणि सर्व प्रकारच्या जिप उपकरांचा समावेश करणे त्यांच्या अधिकारात असते. या संदर्भातील अनेक शासन निर्णय दिर्घकाळापासून अद्ययावत/पुनर्निरक्षित करण्यात आलेले नाहीत.

मार्गदर्शक तत्वांचा अंतिम संच २५ वर्षापूर्वी जारी करण्यात आला होता आणि त्यांच्याकडे बहुदा दुर्लक्षच करण्यात येते आणि तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, आयुक्त कार्यालय यामध्ये तसेच शासकीय पातळीवर देखील तांत्रिकपणे आकडेवारीचे संकलन करण्यात येते. पद्धती अगदी गुंतागुंतीची आहे आणि सर्व आकडेमोड क्षेत्रीय अधिकाऱ्यावर सोपविण्यात आलेली असल्याने, जिल्ह्या जिल्ह्यातील आकडेमोडीच्या पद्धतीमध्ये भिन्नता आहे. इतकेच काय जिल्हयात प्रत्येक तलाठी तलाठ्यानुसार ही

पद्धती भिन्न असू शकते. एकाच प्रति संदर्भ संकेतांक (सीआरसी) ३६०४०४७९ खाली सर्व निधी देण्यामुळे समस्येत वाढच होते कारण त्याचे विश्लेषण करणेच शक्य नाही.

राविआला हे अत्यंत कठीण वाटले आणि भेट दिलेल्या प्रत्येक कार्यालयातील पद्धती समजून घेण्याकरीता प्रचंड मेहनत घ्यावी लागली; त्यांच्या पातळीवर कोणत्याही प्रकारे बुद्धीक्षमतेचा वापर न करता खालील कार्यालयातून संकलित केलेली आकडेवारी तांत्रिकपणे उपलब्ध करून देण्यात आली. वर्षानुवर्षापासून काम करणारे अधिकारी अगदी वरवर काम करत होते आणि त्यांना त्या आकडेमोडीमागील तत्वेच सखोलपणे ठाऊक नव्हती. नेमके काय होत आहे हे समजून घेण्यासाठी आणि पडताळणी करण्यासाठी आम्हाला जवळ जवळ दोन महिन्यांचा कालावधी लागला.

अर्थातच या सर्व प्रक्रियेमध्ये निधी प्राप्त करणारी संस्था म्हणजेच जिल्हा परिषद कुठेही नव्हती, हे सांगण्याची आवश्यकता नाही.

अ. जिप उत्पन्नाचा स्त्रोत म्हणून असलेल्या जमीन महसूल उपकरांव्दारे मिळणाऱ्या महसुलाची वाढ थांबली आहे:

सन १९६१ मध्ये जेव्हा जिप आणि पंस कायदा करण्यात आला तेव्हा जमीन महसूल हा राज्याच्या उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत होता आणि त्यामुळेच जिप उपकर जमीन महसूलाशी नैसर्गिकत: जोडला गेला. राज्याच्या सामाजिक-आर्थिक स्वरुपामध्ये आमुलाग्र बदल झाल्याने, जमीन महसूल खऱ्या अर्थाने ‘महसूल’ म्हणून वसूल न करता केवळ नोंदींकरीता आणि सातत्य राखण्याकरीता वसूल करण्यात येत आहे. जमीन महसूल स्वातंत्र्यपूर्व काळात (सन १९३०-३५) मध्ये निश्चित करण्यात आला होता, तेव्हापासून वाढविण्यात आलेला नाही आणि केवळ नोंदीकरीताच वसूल करण्यात येत आहे. राज्याच्या एकूण उत्पन्नाच्या तुलनेत महसुलाची टक्केवारी दरवर्षी कमी कमी होत जाते आहे. तथापि, जिप उपकर जमीन महसूलासोबत जोडला गेल्याने, त्याची वाढ देखील थांबली असून जिल्हा परिषदेचे नुकसान होत आहे.

**ब. वित्त विभागाकडून स्वछंद कपात**

वित्त विभागाने कायद्याच्या (ज्याचे पालन करणे आवश्यक आहे) तरतूदीनुसार नियुक्त कर आणि विकास योजना यामध्ये तफावत केलेली नाही. त्यामुळेच वित्त विभागाने जमीन महसूल उपकरास देखील विकास योजनेप्रमाणे हाताळले जाते. ज्याला अर्थसंकल्पीय कपात लागू असते.

**६.९.४ निष्कर्षांचा सारांश:**

सारांश असा की, जिप जमीन महसूल उपकर उत्पन्नाचा स्त्रोत म्हणून कुठींत झालेला आहे कारण तो जुन्या महसूल स्त्रोत म्हणजेच जमीन महसूलाशी संलग्न आहे. याउपर मागणी अनुसार देण्याऐवजी हा निधी जमीन महसूलाच्या प्रत्यक्ष वसुलीनुसार देण्यात येतो. जेव्हा आकडेवारी पाच स्तरांवरील कार्यालयांमधून जाते (तलाठी- तहसील- जिल्हाधिकारी कार्यालय- आयुक्त कार्यालय- मंत्रालय) त्यानंतर अत्यंत क्लिष्ट अशा अर्थसंकल्पीय आणि वितरण प्रक्रियेतून जाते, सर्व मिश्रित केली जाते आणि जिपंना त्यांच्या जिल्हयातून त्यांच्याकडून किती वसुली करण्यात आली आणि कालातंराने त्यांना काय मिळाले हे कळतच नाही.

जिल्हा परिषदांना जिप आणि पंस कायद्याच्या कलम १४४, १५५, १८६ आणि १८५, अशा प्रत्येक कलमानुसार किती प्राप्ती होते, याबद्दल अधिकृत आकडेवारी नाही. याउपर वित्त विभाग, ग्राविवि ने जमा केलेल्या जमीन महसुलाची मागणी नेहमीच्या पध्दतीने अर्थसंकल्पीय कपात लावण्यात येते.

अशाप्रकारे या महत्वाच्या नियुक्त कराऩ्वये दरवर्षी जिल्हापरिषदेला मिळणारे उत्पन्न कमी कमी होत जाते आहे आणि तलाठी अन त्यावरील कार्यालयात आकडेवारीचे संकलन केल्याने कोणीही त्याचे विश्लेषण करण्याच्या स्थितिमध्ये नाही.

**६.९.५ जमीन महसूल अनुदानात सुधारणा करण्याकरीता राविआच्या शिफारशी:**

**(अ.) जिप आणि पंस कायद्याच्या कलम १४४, १५५, १८६ आणि १८५ अनुसार नियुक्त उपकरासंबंधातील सर्व निधि वसुली आधारे देण्याऐवजी मागणीनुसार देण्यात यावा.**

यापूर्वी सन २००६ मध्ये तिसऱ्या राविआने ठासून निदर्शानस आणून दिले आहे,जिप व पंस कायदयाच्या कलम १४४ मधील तरतुदीनुसार असे स्पष्ट केले आहे की, **नियुक्त जमीन महसूल उपकरासंबंधातील सर्व निधि मागणीनुसार देण्यात यावा. प्रत्यक्ष वसुलीच्या आधारे करण्यात यावा असा अर्थ काढणे योग्य नाही.** जर प्रत्यक्ष वसुली आधारे करण्यात आले तर मग जिल्हा महसूल प्रशासनाच्या संकलनाच्या अकार्यक्षमतेमुळे किंवा शासनाने दुष्काळ वा अन्य परिस्थितीने दिलेल्या वार्षिक सूटीमुळे जिल्हा परिषदेचे नुकसान होऊ शकते. त्यामुळेच कायद्याच्या तरतुदीप्रमाणे, प्रत्येक वर्षी जिल्हाधिकाऱ्याने केलेल्या मागणीच्या आधारे (जमाबंदी) जिल्हा परिषदेला सर्व निधी देण्यात यावा असे निश्चित करण्यात यावे.

**(ब.) कालमर्यादेचे पालन करणे.**

दरवर्षी ऑगस्ट महिन्याच्या दरम्यान कधीतरी जिल्हाधिकारी जमीन महसूलाची मागणी निश्चित करतात. यामुळे वित्तीय वर्ष २०१९-२० करीता ऑगस्ट, २०१९ मध्ये ते निश्चित करण्यात येईल. त्यानंतर लगेचच जिल्हाधिकारी यांनी विविध जिप उपकरांची विहिती पध्दतीनुसार परिगणना करावी (खालील तक्ता क्रमांक १५ पाहा) आणि ती विभागीय आयुक्तांकडे पाठवून द्यावी. विभागीय आयुक्तांनी त्यांच्या विभागातील सर्व जिल्हाधिकारी यांनी पाठविलेल्या आकडेवारी एकत्रित करावी आणि ग्राम विकास विभाग मंत्रालयाकडे ऑक्टोबर पर्यंत पाठवून द्यावी, जेणे करून ग्राम विकास विभाग सर्व आकडेवारी नोव्हेंबरपर्यंत वित्त विभागाला पाठवून देईल, साधारणत: पुढील वित्तीय वर्षाकरीता फेब्रुवारीमध्ये अर्थसंकल्प सादर करण्यात येतो. अशा प्रकारे त्याकरीता वापरण्यात आलेली आकडेवारी अगदी अद्ययावत असेल.

**(क.) जिपला उपकर देण्याबाबत नवीन तत्वे किंवा सूत्र अवलंबण्याची आवश्यकता आहे:**

जिप उपकराची परिगणना करण्याची विद्यमान पद्धती बरीच गुंतागुंतीची आहे. आम्ही जिप आणि पंस कायद्याच्या कलमातील चौकटीमध्ये असलेले एक नवे सूत्र मांडत आहोत. आम्ही जिपना उपकर देतांना खालील सूत्र अवलंबविण्याची शिफारस करतो;

तक्ता १५ : जमीन महसूल उपकर साठी नवीन तत्व अंगिकारणे:

| अनु.क्र. | जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायदा कलम | श्रेणी | प्रस्तावित केलेली तत्वे | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | १४४ | मूळ जिप उपकर | जमीन महसूल उपकर X मागणीच्या दुप्पट | वर्षासाठी निर्धारित जमाबंदीच्या प्रमाणात मागणी असावी |
| २ | १५५ | वाढीव जिप उपकर | जमीन महसूल उपकर X मागणीच्या ५ पट | सर्व जिल्हा परिषदांनी या उद्देशांसाठी बऱ्याच वर्षापूर्वीच ठराव मंजूर केलेले आहेत. जिल्हा परिषदांनी सुचित केले होते की नवीन ठराव मंजूर करुन दशकांपूर्वी जे ठरले आहे त्यावर शिक्का मोर्तब करावे. |
| ३ | १८५ | सापेक्ष अनुदान | जमीन महसूल उपकर X मागणीच्या ८ पट | शासन निर्णय क्र. एलसीएम/१०९२/प्र.क्र.१९८९जी/२४ दिनांक २२ जून १९९४ अन्वये आहे. |

अशा प्रकारे उपरोक्त कलम १४४, १५५ आणि १८५ अनुसार जिपला देय असलेला एकूण उपकर मूळ जमीन महसूल मागणीच्या १५ पट होतो. या व्यतिरिक्त प्रोत्साहन अनुदानासंबंधातील १९९४ च्या शासन निर्णय (कलम १८६) अनुसार रुपये २ वर रुपये १.३७ प्रोत्साहन अनुदान, अशा प्रकारे उपकर १५ पट + १.३७ पट प्रोत्साहन अनुदान= मूळ जमीन महसूल मागणीच्या एकूण १६.३७ पट होते. या व्यतिरिक्त या जमीन धारकांना (रुपये ५ ते रुपये १० आणि त्या खालील श्रेणीच्या) मूळ जमीन महसूलामध्ये संपूर्णपणे सुट देण्यात आली आहे, त्यांच्याकडून करण्यात आलेली जिप उपकर वसुली. या नुकसानाची निश्चित आकडेवारी सांगणे कठीण आहे. आम्ही असे गृहीत धरले आहे की हे साधारण मूळ जमीन महसूलाच्या ३ पट आहे. अशा प्रकारे मूळ जमीन महसूलाच्या १६.३७ पट(जास्त) + ३ पट= १९.३७ पट किंवा २० पट जिप उपकर देय होईल.

यामुळेच राविआ अशी शिफारस करतो की:

- जिपंना जमीन महसूल उपकर परिगणनेबाबतची आकडेवारी करण्याकरीता अगदी सोपी पर्यायी पद्धती आवश्यक आहे.
- या पद्धतीमध्ये कायद्याच्या कलम १४४, १५५, १८५ आणि १८६ मधील तरतुदींचा अंतर्भाव असावा.
- ही पद्धती अगदी तलाठी पातळीपासून सर्वांना समजेल तसेच अंमलबजावणी करता येईल अशी हवी.
- बहुदा उंल्लघन करण्यात येणारी अशी विद्यमान गुंतागुंतीची आणि गोंधळात टाकणारी पद्धत बदलून नवीन पद्धत आणावी.

तर आम्ही वर निर्देशित केलेल्या कामानुसार अशी शिफारस करतो की जिप आणि पंस यांना देण्यात येणारा जिप उपकर मूळ शेतसारा किंवा मूळ आकार (शेती + बिनशेती) म्हणजेच मूळ जमीन महसूलाच्या मागणीच्या २० पट असावा. जमीन महसूल वसूल केला आहे किंवा नाही यांवर तो अवलंबून नसावा.

आम्ही खालील पायऱ्यांची शिफारस करतो:

अ. तलाठी दर वर्षी ऑगस्ट महिन्यात देय जमीन महसूल निश्चित करतात. याची नोंद नमुना ८ ब मध्ये करण्यात येते.

ब. यामध्ये महसुली गावातील शेती आणि बिनशेती जमिनीवरील महसुलाचा समावेश असतो.

क. सर्व ८ब मधील आकडेवारीची बेरीज (शेती आणि बिनशेती) प्रमाण आकडेवारी असेल. तालुका स्तरावर याचे संकलन करून आकडेवारी जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात यावी.

ड. जिल्हाधिकाऱ्यांनी संपूण जिल्ह्याच्या ८ब आकडेवारीची बेरीज (एकूण मागणी) करावी आणि त्यांस २० ने गुणावे. याची विशेषत्वाने **मागणी** X २० पट अशी नोंद करावी आणि **वसुली**X २० पट अशी नोंद करू नये. वसुली हा मुद्दाच वेगळा आहे.

इ. सर्व गावांच्या नोंदीचे संगणकीकरण होत आहे, यामुळे भविष्यात जिल्हा पातळीवर ८ब संकलनाचे काम सोपे आणि जलद गतीने होणे अपेक्षित आहे.

ई. ही संकलित केलेली आकडेवारी म्हणजे जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेला द्यावयाचा उपकर असेल.

ए. या जिल्ह्याची आकडेवारी आयुक्त पातळीवर एकत्रित करावी आणि ग्राम विकास विभागाला कळाविण्यात यावी.

ऐ. ग्राम विकास विभागाने सदर रक्कम पूर्णत: अर्थसंकल्पित करावी आणि कोणत्याही प्रकारची कपात होणार नाही याची खातरजमा करावी.

उ. वरील अ ते ऐ पायऱ्यांकरीता शासन निर्णय करण्यापूर्वी, विदयमान पद्धतीने आकडेमोड करण्याऐवजी या नवीन सूचित सुत्रान्वये काही जिल्ह्यांतील जिपंना किती रक्कम मिळेल याची चाचपणी करावी. त्यानंतर नवीन शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा.

### (ड.) ग्राविविने सर्व विद्यमान मार्गदर्शक तत्व निरसित करुन सर्व समावेशक नवा शासन निर्णय निर्गमित करणे

ग्राम विकास विभागाने वरीलप्रमाणे एक सर्व समावेशक, नवीन शासन निर्णय निर्गमित करुन सदर विषयावरील सर्व विद्यमान मार्गदर्शक तत्वे निरसित करावीत. यामुळे या क्षेत्रातील क्लिष्ट आणि गुंतागुंतीच्या प्रणालीत सुस्पष्टता येईल तसेच सर्व जिल्ह्यामधील कार्य पद्धतीमध्ये एकसूत्रता येईल. या सुचविलेल्या शासन निर्णयाच्या परिशिष्टामध्ये जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त यांच्या उपयोगाकरीता प्रमाणित नमुने दिले पाहिजेत, विद्यमान परिस्थितीमध्ये असे दिसून येते की प्रत्येक जिल्ह्याचा नमुना विभिन्न स्वरूपाचा आहे. सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे उपयोगामध्ये आणावयाच्या जमीन महसूल मागणीवर आधारित असावा आणि वसुलीवर नाही. शासन निर्णयामध्ये वर निर्देशित केल्याप्रमाणे प्रत्येक

उपक्रमाकरीता कालमर्यादा आखून दिली पाहिजे. हा प्रस्तावित शासन निर्णय वित्त विभाग आणि महसूल विभागाच्या सल्ल्याने निर्गमित करण्यात यावा.

**(इ.) जिप उपकरांमध्ये आणि वितरणात कोणत्याही प्रकारची अर्थसंकल्पीय कपात करू नये.**

जिप उपकर या देशाच्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायदा, १९६१ या कायद्यान्वये आकारण्यात येतो. महसूल यंत्रणा जिल्हा परिषदेच्या वतीने आणि करीता त्यांची वसुली करते. यामुळेच यामध्ये कोणत्याही प्रकारची "अर्थसंकल्पीय कपात" राज्य शासन (वित्त विभाग) पातळीवर करता येणार नाही कारण ते कायद्याचे उल्लंघन ठरेल.

**ई. जिल्हा परिषदांना म्हणजेच वापरकर्त्यांना त्यांना देण्यात येणाऱ्या निधीबाबत जाणीव असणे आवश्यक आहे.**

विद्यमान परिस्थितीमध्ये जिल्हा परिषदांना त्यांना मिळणारे जमीन महसूला संदर्भातील उपकर कोणत्या पद्धतीने किंवा सूत्राने प्राप्त होतात हे माहिती नसते. शासनाने आता असा शासन निर्णय निर्गमित करावा की, जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रतिनिधीने जिप संचालक मंडळासमोर प्रत्येक वर्षी ऑक्टोबर मध्ये जिप देय गणनेची पद्धती आणि रित यांचे सादरीकरण करणे इष्ट होईल.

**फ. दीर्घकालाकरीता सर्व संबंधित कलम जसे की, १४४, १५५, १८५ आणि १८६ यांच्यात सुधारणा करून सोपे सूत्र विकसित करण्याची आवश्यकता आहे:**

जिप आणि पंस कायदा १९६० साली तयार करण्यात आला, त्याला आता ६० वर्षापेक्षा अधिक कालावधी लोटला आहे. त्यावेळच्या सामाजिक-आर्थिक परिस्थिती अत्यंत भिन्न होत्या आणि त्यावेळी महाराष्ट्र प्रामुख्याने कृषिप्रधान समाज होता, त्यावेळी जमीन महसूल हा इतर सर्व देयके गणनेकरीता मुलभूत आधारभूत प्रमाण होते. आता राज्याच्या महसुलामध्ये जमीन महसुलाचे प्रमाण अगदी नगण्य झाले आहे. बदलत्या काळात जिप उपकर जमीन महसुलाशी (कारण बहुदा जमीन महसूल दुष्काळ वा अन्य कारणाने माफ करण्यात येतो.) संलग्नित ठेवणे निरर्थक झाले आहे. जिप आणि पंस कायदा, १९६१ चे पुनर्विलोकन करणे इष्ट होईल आणि जिप करीता नवीन सूत्राने निधी देणे संयुक्तिक होईल. राविआ कलम १४४, १५५, १८५ आणि १८६ मध्ये सुधारणांची (किंवा अगदी निरसित करण्याची देखील) आणि कायद्यामध्ये नव्या आणि सोप्या सुत्राचा समावेश करण्याची शिफारस करत आहे. याला विधीमंडळाची मान्यता आवश्यक आहे. हे होईपर्यंत वरील अ ते इ मधील शिफारशींची अंमलबजावणी करता येईल.

### ६.१० मुद्रांक शुल्कातील हिस्सा (कलम १५८, जिप आणि पंस कायदा, १९६१)

जिल्हा परिषदेकरीता नियुक्त केलेला आणखी एक कर म्हणजे मुद्रांक शुल्क होय.

महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायदा, १९६१ कलम १५८ च्या तरतुदीनुसार जेथे व्यवहार झाला आहे त्या संबंधित जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायतीला राज्य शासनाने जे वसूल केले त्याच्या व्यतिरिक्त १% मुद्रांक शुल्क/उपकर देण्यात येतो (५०:५० भागीदारीमध्ये, म्हणजेच प्रत्येकी अर्धा टक्का). हे जिल्हा परिषदेच्या अधिकारक्षेत्रातील गैर-नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील मालमत्तेच्या संबंधातील व्यवहारावर आहे. अशा प्रकारे हा कर अथवा उपकर राज्य शासनाकडून लादण्यात येतो तसेच मुद्रांक व नोंदणी महानिरीक्षकांकडून वसूल करण्यात येतो आणि त्यानंतर जिल्हापरिषद तसेच संबंधित ग्रामपंचायतीला १% हस्तांतरित करण्यात येतो. कलम १५८ (४) मध्ये या उपर अशी तरतूद करण्यात आली आहे की जिल्हा परिषदेला प्राप्त झालेल्या १% मधील ५०% हे व्यवहार झाला तेथील संबंधित ग्रामपंचायतीला देण्यात यावा.

अर्थसंकल्पीय अंदाजाच्या दस्त-ऐवजामधून असे दिसून आले आहे की, ग्राम विकास विभागाकडून (ग्राविवि) जिल्हा परिषदा आणि ग्रामपंचायतीना खालील रकमा देण्यात आल्या आहेत:

तक्ता १६ : दिलेल्या मुद्रांक शुल्काचा हिस्सा :

| अनु.क्र. | वर्ष | रक्कम ( रुपये कोटीमध्ये) |
|---|---|---|
| १ | २०१४-१५ | ६४० |
| २ | २०१५-१६ | ५२२ |
| ३ | २०१६-१७ | ५४० |
| ४ | २०१७-१८ | ६०० |
| ५ | २०१८-१९ | ५३२ ( पहीले नऊ महीने) |

**६.१०.१ आमची निरीक्षणे खालीलप्रमाणे आहेत:**

अ. जिल्ह्या जिल्ह्यातील मुद्रांक शुल्क म्हणून जमा होणाऱ्या रकमेमध्ये भरपूर तफावत आहे:

असे निदर्शनास आले आहे की जिल्ह्या जिल्ह्यातून वसूल केल्या जाणाऱ्या १% मुद्रांक शुल्काच्या रकमेमध्ये प्रचंड प्रमाणात तफावत असून काही जिल्हे खूप मोठ्या प्रमाणात वसुली करतात आणि त्यांना मोठी रक्कम प्राप्त होते.

वित्तीय वर्ष २०१५-१६, २०१६-१७ आणि २०१७-१८ या वित्तीय वर्षाकरीता जिल्हा परिषदांना (ग्राम पंचायतींचा हिस्सा वगळून) वितरित करण्यात आलेली सरासरी मुद्रांक शुल्क उपकराची रक्कम खालीलप्रमाणे आहे.

तक्ता १७ : मुद्रांक शुल्काचे सरासरी वितरण :

| अनु.क्र. | जिल्हा परिषद | सरासरी वितरित रक्कम ( रुपये लाखात) | राज्यात वितरित मुद्रांक शुल्काची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गडचिरोली | १८ | ०.०७ |
| २ | गोंदिया | ८० | ०.२९ |
| ३ | हिंगोली | ९६ | ०.३५ |
| ४ | भंडारा | ११२ | ०.४० |
| ५ | वाशिम | ११७ | ०.४२ |
| ६ | यवतमाळ | १४७ | ०.५३ |
| ७ | धुळे | १५३ | ०.५५ |
| ८ | परभणी | १६७ | ०.६० |
| ९ | उस्मानाबाद | १७५ | ०.६३ |
| १० | चंद्रपूर | १८१ | ०.६५ |
| ११ | सिंधुदूर्ग | १९६ | ०.७१ |
| १२ | अकोला | २२४ | ०.८१ |
| १३ | जालना | २३१ | ०.८३ |
| १४ | लातूर | २३६ | ०.८५ |
| १५ | नंदुरबार | २६३ | ०.९५ |
| १६ | वर्धा | २७६ | ०.९९ |
| १७ | नांदेड | २७६ | १.०० |
| १८ | बीड | ३१३ | १.१३ |
| १९ | सांगली | ३१५ | १.१४ |
| २० | बुलढाणा | ३२३ | १.१६ |
| २१ | रत्नागिरी | ३३३ | १.२० |
| २२ | जळगाव | ३६२ | १.३१ |
| २३ | कोल्हापूर | ४१० | १.४८ |
| २४ | अमरावती | ४४६ | १.६१ |
| २५ | सोलापूर | ५६० | २.०२ |
| २६ | अहमदनगर | ५८६ | २.१२ |
| २७ | नाशिक | ६४८ | २.३४ |

| | | | |
|---|---|---|---|
| २८ | औरंगाबाद | ६८२ | २.४६ |
| २९ | सातारा | ८२४ | २.९८ |
| ३० | पालघर | ८६० | ३.१० |
| ३१ | नागपूर | १६२२ | ५.८५ |
| ३२ | ठाणे | २२६२ | ८.१७ |
| ३३ | रायगड | ४७१२ | १७.१२ |
| ३४ | पुणे | ९४६६ | ३४.१७ |
| | **एकूण** | **२७७००** | **१००.००** |

वरील माहितीवरून असे दिसते की पुणे (३४%), रायगड (१७%), ठाणे (८%) आणि नागपूर (६%) या चार जिल्ह्यांना एकूण ६५% किंवा जवळजवळ दोन तृतियांश मुद्रांक शुल्क उपकर प्राप्ती होते. याचे कारण म्हणजे मुंबई, पुणे आणि नागपूर या प्रमुख शहरांजवळ असल्याने या जिल्ह्यांच्या ग्रामीण भागातील जमिनींच्या किंमतीही जास्त आहेत. यामुळेच या जिल्हातील जिल्हा परिषदांना अधिक उत्पन्न प्राप्त होते. अशा प्रकारे या उपकराचे स्वरुपच असे आहे की काही विशिष्ट (सद्य स्थितीमध्ये) जिल्हा परिषदांना इतरांपेक्षा अधिक लाभ होतो आहे.

**(अ.) जिल्हापरिषदांना वितरित करण्याच्या मुद्रांक शुल्कातील अनुशेष:**

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांचे पत्र क्र.आ.क्र.का.७/नॉमनि/जि.प./११७/२०१९ दिनांक १ फेब्रूवारी २०१९ मध्ये नमूद केले आहे की जिल्हा परिषदांचा रुपये ५०९ कोटी रुपयांचा अनुशेष शिल्लक आहे. हे होण्याचे कारण म्हणजे नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांनी निर्देशित केलेल्या संपूर्ण रकमेचे अर्थसंकल्पन करण्यात आले नाही.

**(ब.) संकलित करताना शासकीय वसुली आणि जिप उपकर असा भेद नाही.**

शासनाकरीताचे मुद्रांक शुल्क आणि अतिरिक्त १% जिप उपकर यांची वसूली एकत्रच करण्यात येते आणि एकाच खाते प्रति संदर्भ संकेतांक (सीआरसी३६०४०३०७) मध्ये जमा करण्यात येते आणि जिल्हा परिषदेकरीता स्वतंत्र खाते आहे. त्यामुळे जिपच्या नावाने नेमकी किती वसुली करण्यात आली ते समजणे कठीण आहे. सद्य स्थितीत ही आकडेवारी विभागातंर्गत मोजण्यात येते आणि ज्या जिल्हा परिषदेकरीता वसुली करण्यात येते त्या जिपला आकडेवारी कळविण्यात येत नाही.

## ६.१०.२ राविआच्या शिफारशी:

### (अ.) नियुक्त कराकरीता कोणतीही “अर्थसंकल्पीय कपात” करू नये.

शासनाच्या कायद्यातंर्गत निर्देष्टित केलेल्या आणि ज्या कराची आधीच वसुली करण्यात आलेली आहे अशा नियुक्त कराकरीता कोणतीही “अर्थसंकल्पीय कपात” करू नये. ग्राम विकास आणि पंचायत राज विभाग, महसूल विभाग आणि वित्त विभाग यांनी हे तत्व समजून घेऊन त्याचे अनुसरण केले पाहिजे.

**(ब.)** या आधीच वसूल केलेल्या आणि अजूनही वितरित न केलेल्या रुपये ५०९ कोटी (ऑक्टोबर, २०१८पर्यंत) रुपयांचा अनुशेष तातडीने भरून काढण्याची आवश्यकता आहे.

जनतेकडून १% जिप मुद्रांक शुल्क उपकर म्हणून आधीच वसूल करण्यात आलेला आणि अर्थसंकल्पीय कपात आणि इतर कारणामुळे अजूनही जिपंना देण्यात न आलेला रुपये ५०९ कोटींचा अनुशेष शक्य तितक्या लवकर जिपंना देण्यात यावा.

### (क.) ग्राम विकास विभागाकडून वितरणाची प्रक्रिया बदलण्याची आवश्यकता

ग्राम आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकडून नोंदणी व मुद्रांक नियंत्रक कार्यालय १% मुद्रांक शुल्क वसूल करते. तथापि ग्राम विकास विभाग आणि नगर विकास विभागाच्या निधी वितरणाची पद्धत भिन्न आहे. नविविमध्ये रकमेचे अर्थसंकल्पन केल्यानंतर नविविकडूनच थेट नगरपालिकांना वितरीत केली जाते.तथापि ग्राविवि मध्ये रक्कम थेट जिल्हापरिषदांना वितरीत करण्याऐवजी अनावश्यकपणे पुन्हा नोंदणी व मुद्रांक नियंत्रकांमार्फत वितरीत करण्यात येते. या अनावश्यक पायरीमुळे फक्त विलंब होतो. ग्राविवि मधील सदर पद्धत बंद करण्यात येऊन नविविप्रमाणे ग्राविविमधून देखील नोंदणी व मुद्रांक नियंत्रक कार्यालयामार्फत न देता थेट जिल्हापरिषदांना रक्कम वितरीत करण्यात यावी.

### (ड.) स्वतंत्र अर्थसंकल्प शीर्षकाची आवश्यकता:

नोंदणी व मुद्रांक नियंत्रक कार्यालयाने १% जिप उपकराकरीता स्वतंत्र अर्थसंकल्प लेखा शीर्ष (प्रति संदर्भ संकेतांक (सीआरसी)) उघडणे इष्ट होईल. अशा प्रकारे जेव्हा जनता मुद्रांक शुल्क अदा करते तेव्हा ते पहिल्या पायरीवरच स्वतंत्रपणे दोन विभिन्न शीर्षकांतर्गत जमा करण्यात येईल. या प्रमाणे दोन स्वतंत्र जमा शीर्ष (प्रति संदर्भ संकेतांक (सीआरसी))असतील, एक राज्य शासनाच्या मुद्रांक शुल्काकरीता आणि एक स्वतंत्र १% जिप उपकराकरीता असेल.

**(इ.) मुद्रांक शुल्काबाबत प्रतिकूल परिस्थितीमध्ये असलेल्या जिल्हा परिषदांना सहाय्याची आवश्यकता आहे.**

जसं की निरिक्षणामध्ये निदर्शनास आणून दिले आहे की चार जिल्हा परिषदांना १% उपकरातील दोन तृतियांश हिस्सा मिळतो कारण त्यांना भौगोलिक स्थितीमुळे लाभदायक होत आहे. या जिल्हापरिषदा पुणे किंवा नागपूर किंवा मुंबई सारख्या मोठ्या शहरांत किंवा लगत आहेत (ठाणे जिल्हा किंवा रायगड जिल्हा). यामुळेच या जिल्ह्यामधील जमिनींच्या किंमती खूप जास्त आहेत आणि म्हणूनच या जिल्ह्यांना १% मुदांक शुल्कातून लक्षणीय उत्पन्न प्राप्त होते. त्याचवेळी दुसऱ्या बाजूला गडचिरोली, वाशिम, हिंगोली अशा जिल्ह्यामध्ये मुद्रांक शुल्क उपकरातून अगदी थोडेच उत्पन्न प्राप्त होते. ही तफावत काही वर्षामध्ये अधिकच वाढली, कारण शहरांचा विस्तार झाला आणि काही निवडक शहरांमध्ये जमिनीच्या किंमतीं खूपच वाढल्या आहेत. जिप आणि पंस कायद्यामध्ये मुद्रांक शुल्क उपकर प्रस्तुत करण्यात आला तेव्हा कदाचित १९६१ मध्ये ही परिस्थिती नसेलही. यामुळेच भौगोलिक दृष्ट्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये असलेल्या कमकुवत जिल्ह्यांना सापेक्ष अनुदान देऊन भरपाई करण्याची आवश्यकता आहे. कमकुवत जिल्ह्यांना सहाय्य करण्याकरीता आम्ही खालील सूत्राची शिफारस करतो: सर्वाधिक १% मुद्रांक शुल्क उपकर प्राप्ती करणाऱ्या सर्वोच्च तीन जिल्हे घ्या आणि त्यानंतर उर्वरीत ३१ जिल्ह्याच्या मुद्रांक शुल्क उपकराची सरासरी काढा. ज्या जिल्ह्यांना सरासरीपेक्षा कमी प्राप्ती होत असेल त्यांना सरासरीपर्यंत पोहचण्याकरीता रक्कम द्यावी. अशा प्रकारे जर प्राप्त सरासरी मुद्रांक शुल्क उपकर जर ३ कोटी (सर्वोच्च तीन जिल्ह्यांव्यतिरिक्त), ज्या जिल्ह्यांना मुद्रांक शुल्क उपकरामधून रु.३ कोटीपेक्षा कमी उत्पन्न प्राप्त होत असेल अशांना रु. ३ कोटी आणि त्यांना प्रत्यक्ष प्राप्त झालेली रक्कम यातील तफावत देण्यात यावी. या प्रमाणे जिल्हा परिषदांना वरील वितरणाच्या आधारे, रुपये ३३.७९ कोटींचे तफावत किंवा सापेक्ष अनुदान देणे हा वित्तीय भार असेल.

आकडेमोड खालीलप्रमाणे:

तक्ता १८: कमकुवत जिल्हा परिषदेसाठी सुचविलेली मुद्रांक शुल्क वितरणाची परिगणना:

| जिल्हा परिषद | तीन वर्षाची सरासरी जमा (२०१५-२०१६, २०१६-२०१७ आणि २०१७-२०१८ | एकूण मुद्रांक शुल्काची टक्केवारी | ज्या जिल्ह्यांचा हिस्सा राज्याच्या सरासरीपेक्षा कमी आहे त्याच्यासाठी सुचविलेले जुळणारे अनुदान (रुपये लाखात) |
|---|---|---|---|
| लातुर | २३६ | ०.८५ | १२६ |
| नंदुरबार | २६३ | ०.९५ | ९९ |

| | | | |
|---|---|---|---|
| वर्धा | २७६ | ०.९९ | ८६ |
| नांदेड | २७६ | १.०० | ८६ |
| बिड | ३१३ | १.१३ | ४९ |
| सांगली | ३१५ | १.१४ | ४७ |
| बुलढाणा | ३२३ | १.१६ | ३९ |
| रत्नागिरी | ३३३ | १.२० | २९ |
| जळगाव | ३६२ | १.३१ | ०० |
| कोल्हापूर | ४१० | १.४८ | एकूण आर्थिक बोजा = ३३.७९ कोटी रुपये |
| अमरावती | ४४६ | १.६१ | |
| सोलापुर | ५६० | २.०२ | |
| अहमदनगर | ५८६ | २.१२ | |
| नाशिक | ६४८ | २.३४ | |
| औरंगाबाद | ६८२ | २.४६ | |
| सातारा | ८२४ | २.९८ | |
| पालघर | ८६० | ३.१० | |
| नागपूर | १६२२ | ५.८५ | |
| ठाणे | २२६२ | ८.१७ | |
| रायगड | ४७४२ | १७.१२ | |
| पुणे | ९४६६ | ३४.१७ | |
| एकूण | २७७०० | १००.०० | |

आकडेमोड तपशील:

*जिल्हा= सरासरी (सर्व जिल्हे- सर्वोच्च ३ जिल्हे) तीन वर्षांची सरासरी (२०१५-१८)=(३६२- स्तंभ २)

**(फ.) १% हिस्सा वाटपाच्या सुत्रामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.**

राज्याच्या सामाजिक-आर्थिक स्थितिमध्ये बदल झाल्याने ५८ वर्षापूर्वी तयार करण्यात आलेल्या कलम १५८ मध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. जसे की यापुर्वीच निदर्शनास आणून देण्यात आले आहे की ज्या जिल्ह्यामध्ये या वर्षांमध्ये व्यवहार मूल्य किंवा व्यवहार होण्याचे प्रमाण अधिक नाही अशा ठिकाणी विद्यमान १% हिस्से वाटप त्यातही ०.५०% जिपला आणि ०.०५% ग्रामपंचायतीला (ज्या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात स्थावर मालमत्ता स्थित आहे) त्यांना विशेष मदत होत नाही. पंचायत समित्यांना देखील कोणत्याही प्रकारचा महसूल मिळत नाही, त्यांना तर वगळण्यातच आले आहे.

यामुळेच राविआ काळजीपूर्वक विचार करून पुढील सुधारित सुत्राची शिफारस करीत आहे.

तक्ता १९ : सुधारित १% हिस्सा विभागणी सूत्र :

| श्रेणीमध्ये | कायद्यातील कलम १५८ नुसार टक्केवारी सूत्र | शिफारस केलेले सुधारीत सूत्र |
|---|---|---|
| जिल्हा परिषद | ०.५% | ०.२५% |
| पंचायत समिती | शून्य | ०.२५% |
| ग्राम पंचायत | ०.५% | ०.२५% |
| राज्य स्तरीय सर्व ग्रामपंचायतीमध्ये वितरीत करणे | शून्य | ०.२५% |

या शिफारशीवरुन असे दिसून येते की जिल्हा परिषदांना ०.५ % ते ०.२५% असे अंशत: नुकसान होणार आहे. पंचायत समित्यांना स्वत:च्या उत्पन्नाच्या स्त्रोतांची अत्यंत आवश्यकता असून त्यांना ०.२५% प्राप्ती होणार आहे. ग्रामपंचायतींना ०.५० % मिळणार असले तरी त्याना वेगळया पध्दतीने वितरीत होतील. त्यांना ०.२५% पूर्वीप्रमाणेच मिळणार आहेत म्हणजे जेथे व्यवहार झाला तेथे. पण उर्वरीत ०.२५% राज्य स्तरावर संकोषित करण्यात येतील आणि सर्व ग्रामपंचायतींना लोकसंख्येनुसार वितरित करण्यात येतील. या सुधारित सूत्राचा परिणाम असा होईल की दूरस्थ, गरिब जिप, पंस आणि ग्राप यांना अधिक चांगला हिस्सा प्राप्त होईल.

अर्थातच याकरीता राज्य विधिमंडळाद्वारे कलम १५८ मध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही!

**६.११ वन अनुदान (कलम १८१ (अ) आणि जिल्हा परिषद कायदा):**

जिल्हा परिषद कायद्याच्या कलम १८१ (अ) मध्ये जिल्हा परिषदांना वन अनुदान देण्याची तरतूद केली आहे. या तरतुदीचा उद्देश असा की ज्या जिल्हा परिषदांच्या अधिकारक्षेत्रात वनक्षेत्राने लक्षणीय प्रमाणात भाग व्यापला आहे आणि त्यामुळेच त्यांना शेतजमिनीवरील जमीन महसूल स्वरुपात होणाऱ्या स्वत:चे उत्पन्न च्या मोठ्या स्त्रोताला मुकावे लागते. चंद्रपूर जिल्ह्याचेच उदाहरण घ्या, येथील ४०% क्षेत्र वनक्षेत्र आहे. अशा जिल्ह्यामधील वनक्षेत्राने शेत जमीन महसूल उत्पन्न मर्यादित होते, अशा जिल्ह्याच्या सहाय्याकरीता वन अनुदान लागू करण्यात आले.

सुरुवातीला या कायद्यान्वये ५% वन अनुदानाची तरतूद होती  मात्र १९९३ मध्ये जिल्हा परिषद कायद्यामध्ये सुधारणा करून ते जिल्ह्यातून वसूल करण्यात आलेल्या वन महसूलाच्या ७% इतके करण्यात आले.

राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या दिशानिर्देशानुसार, जिल्हा परिषदेला प्राप्त झालेले वन अनुदान संबंधित जिल्ह्याच्या वनक्षेत्रातील 'कार्य आणि विकास योजना' याकरीता [कलम १८१ (अ)(२)अनुसार] खर्च करण्यात येते.

यानुसार राज्य शासनाने क्र.एफआरजी १०९३/प्र.क्र.२४२६/२४, दिनांक १२.११.१९९३ नुसार तपशीलवार मार्गदर्शक तत्वे निर्गमित  केली आहेत,  सन १९९३ मध्ये देण्यात आलेल्या या मार्गदर्शक तत्वांमध्ये मागील सव्वीस वर्षामध्ये कोणत्याही स्वरुपाचा बदल करण्यात आलेला नाही.

**६.११.१ राविआंची निरीक्षणे:**

**अ. वन महसूल उत्पन्नामध्ये आणि परिणामी जिल्हा परिषदांकरीता लागू  केलेल्या ७% वितरणामधील सर्वसाधारण कुंठीतता/ उतरती कळा.**

सर्वात पहिले निरिक्षण म्हणजे वर्षागणिक जिल्हा परिषदेच्या वन महसूल उत्पन्नाला उतरती कळा लागलेली आहे. याचे कारण म्हणजे वन विकासाच्या धोरणामध्ये बदल झाले असून आता वने काही महसूलाचा स्त्रोत राहिलेली नाहीत. १९९० पर्यंत ही अशीच विचारसरणी असावी. आता पर्यावरणीय तसेच आणि सजीव सृष्टी आणि सभौवतालच्या परिस्थितीचे शास्त्र याकरीता वने संरक्षित केली जातात आणि त्यांमुळे वन विभागाकरीता महसूल निर्मिती ही अत्यंत कमी प्राधान्याची बाब आहे. परिणामी वर्षागणिक जिल्हापरिषदांना वितरीत करणारा निधी कमी कमी होत चालला आहे.

जिल्हा परिषदांना वितरित करण्यात येणारी रक्कम खालीलप्रमाणे आहे.

तक्ता २०: जिल्हा परिषदेसाठी वितरित वन अनुदान रक्कम:

| अनु.क्र. | वर्ष | वितरित रक्कम ( रु.कोटी मध्ये) |
|---|---|---|
| १ | २०००-०५ (३रा राविअ वार्षिक) | ८.७६ |
| २ | २०१४-१५ | १६.११ |
| ३ | १०१५-१६ | १४.५० |
| ४ | २०१६-१७ | ९.७६ |
| ५ | २०१७-१८ | ९.०८ |
| ६ | २०१८-१९ | ७.०६ |

सन २०१४-१५ कालावधी दरम्यान 'पेसा' शासन निर्णयाच्या प्रस्तुतीनंतर, येत्या काही वर्षामध्ये पारंपारिक वन महसुलामध्ये आणखी घट दिसून येण्याची शक्यता दिसते. खालील विश्लेषणावरून असे दिसते की वन अनुदान लक्षणीय प्रमाणात कमी झाले आहे.

तक्ता २१: या वर्षामध्ये वन अनुदानामध्ये आलेली घट (रुपये कोटीमध्ये)

| अनु.क्र. | वर्ष | ७% अनुदानानूसार परिमोचित केलेली अनुदान रक्कम | आधार वर्षा नुसार अनुदानात आलेली कमतरता |
|---|---|---|---|
| १ | २०१४-१५ | १६.११ | १००% (आधारीत वर्ष) |
| २ | २०१५-१६ | १४.५० | ९०% |
| ३ | २०१६-१७ | ९.७३ | ६०.४०% |
| ४ | २०१७-१८ | ९.०७ | ५६.३०% |
| ५ | २०१८-१९ | ७.०६ | ४३.८२% |

या प्रकारे पाच वर्षाच्या कालावधीत वन अनुदान ५०% पेक्षाही अधिक प्रमाणात कमी झाले आहे आणि आगामी वर्षामध्ये वन अनुदानामध्ये वाढ होण्याची काही शक्यता दिसत नाही.

**ब. ७% वन महसूल केवळ निवडक जिल्ह्यामध्येच लक्षणीय प्रमाणात आहे.**

खालील तक्त्यामध्ये सन २०१४-१५ ते २०१८-१९ या पाच वर्षाच्या कालावधीतील ७% वन अनुदानाचे जिल्हानिहाय वितरण दाखविले आहे.

| वन अनुदान वितरण | | | (रुपये हजारात) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. क्र. | जिल्हा परिषद नाव | वन विभाग | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ |
| १ | नागपूर | नागपूर | २,९८२ | १,५१६ | २,५८४ | २,५२० | १,६३७ |
| २ | वर्धा | वर्धा | ३,१९४ | १,३२१ | २,२८४ | २,४७५ | १,७५३ |
| ३ | भंडारा | भंडारा | ७८७ | ७१२ | १,४७४ | १,४७३ | ४३२ |
| ४ | गोंदिया | गोंदिया | ४,२०६ | १,६५३ | ३,०४३ | ३,५३८ | २,३०९ |
| ५ | अमरावती | अमरावती | १३,५२० | ९१,७१९ | ७,१४१ | ५,०७८ | ४,७३५ |
| ६ | बुलढाणा | बुलढाणा | ११६ | ८५३ | ५३ | १७ | १५ |
| ७ | यवतमाळ | यवतमाळ | १९,९६० | ५,९३७ | १०,३२५ | ६,८४० | ४,८१८ |
| ८ | अकोला | अकोला | ८७४ | ४५८ | १,०२० | १,०११ | ६२३ |
| ९ | वाशिम | अकोला | ३४२ | ११३ | २१२ | १७५ | १६९ |
| १० | चंद्रपूर | मध्य चंद्रपूर | १४,९६४ | ५,४९३ | १२,१०३ | ११,१५२ | ७,५९९ |
| ११ | गडचिरोली | सिरोंचा | ९३,७०१ | ३२,८१३ | ५१,९६० | ५१,७११ | ४३,६६२ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | पुणे | पुणे | ९९ | ५२ | १२० | १०१ | ५७ |
| १३ | सोलापूर | सोलापूर | ८ | २३ | ८२ | १०२ | ४९ |
| १४ | ठाणे | ठाणे | १,४४० | ६९८ | १,४७३ | १,२०१ | ३८९ |
| १५ | रायगड/आलिबाग | आलिबाग | ४२५ | १६० | ३७७ | ३४५ | २१७ |
| १६ | पालघर | पालघर | - | - | १६४ | ३०९ | ३०९ |
| १७ | नाशिक | नाशिक | ८०४ | २३० | ४५६ | २९५ | १६५ |
| १८ | अहमदनगर | अहमदनगर | ६८ | २३ | ८१ | ८७ | ५७ |
| १९ | धुळे | धुळे पश्चिम बाजू | ५३ | ५ | ८ | २७ | ३३ |
| २० | नंदुरबार | शहादा,नंदुरबार उत्तर बाजू | ७६ | ६ | ११ | १६ | १७ |
| २१ | जळगाव | जळगाव | ४०१ | २९ | ५१ | २०२ | २५३ |
| २२ | कोल्हापूर | कोल्हापूर | ९१४ | ३२५ | ५३३ | ४४२ | २८३ |
| २३ | सातारा | सातारा | १९१ | ८८ | १७३ | १६५ | ५९ |
| २४ | सिंधुदुर्ग | सिंधुदुर्ग | ३८६ | १४३ | २३६ | १९३ | १२० |
| २५ | सांगली | सांगली | ४८ | १७ | ३० | २७ | १५ |
| २६ | रत्नागिरी | चिपळुण | ३४२ | १२४ | २११ | १८२ | १०६ |
| २७ | औरंगाबाद | औरंगाबाद | ७५ | २५ | ५६ | ५७ | ४४ |
| २८ | जालना | औरंगाबाद | ३४ | १४ | ३२ | ३४ | २७ |
| २९ | नांदेड | नांदेड | ७०३ | ३०८ | ७०९ | ७३२ | ४७१ |
| ३० | बीड | बीड | २७ | १३ | २९ | ३० | १६ |
| ३१ | उस्मनाबाद | उस्मनाबाद | १३१ | ४७ | ७५ | ४० | ३० |
| ३२ | लातूर | लातूर | ९१ | ३४ | ५३ | २७ | २२ |
| ३३ | परभणी | परभणी | १२३ | ४४ | ७१ | ३७ | १५ |
| ३४ | हिंगोली | परभणी | ५८ | ३३ | १०३ | १३९ | १०१ |
| | | **एकूण (हजारात)** | **१,६१,१४३** | **१,४५,०२९** | **९७,३३९** | **९०,७८०** | **७०,६०७** |
| | | **एकूण ( कोटी मध्ये)** | **१६.११** | **१४.५** | **९.७३** | **९.०७** | **७.०६** |

असे दिसून येईल की ४८% अनुदान गडचिरोलीस, २१.६३% अमरावतीला, ९% चंद्रपूरला जाते. सर्वोच्च ५ जिल्ह्यांना मिळून ९०% अनुदान प्राप्त होते. हे नैसर्गिकच आहे कारण वनक्षेत्र याच जिल्ह्यामध्ये (आणि परिणामी वन महसूल) आहेत.

**क. बावीस (२२) जिल्ह्यांना ५.० लाखापेक्षाही कमी प्राप्ती होते.**

याउपर विश्लेषण केल्यावर आढळले की, १३ जिल्ह्यामध्ये रुपये १.०० लाखापेक्षाही कमी, सात जिल्ह्यांना रु.१ ते ३ लाखा दरम्यान आणि २ जिल्ह्यांना रु.३ ते ५ लाख रुपये तसेच ५ पेक्षा जास्त जिल्ह्यांना रु.५ ते १० लाखा दरम्यान अनुदान मिळते. खाली अनुदानाचे टप्प्यानुसार विश्लेषण केले आहे.

तक्ता २२: टप्प्यानुसार वन अनुदान मिळणाऱ्या जिल्ह्यांची संख्या:

| अनु.क्र. | मिळणाऱ्या अनूदानाचा हप्ते | जिल्ह्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | < १ लाख | १३ |
| २ | >१ लाख - ३ लाख | ७ |
| ३ | > ३ लाख - ५ लाख | २ |
| ४ | >५ लाख - १० लाख | ५ |
| ५ | >१० लाख - १ कोटी | ६ |
| ६ | १ करोडपेक्षा जास्त | १ |

## ड. गुंतागुंतीची वितरणाची प्रक्रिया:

वितरणाची प्रक्रिया खालीलप्रमाणे गुंतागुंतीची आहे:

आलेख २० : वन अनुदानाची वितरणाची प्रक्रिया




यातील गुंतागुंतीच्या कार्यालयीन काम आणि लिपीकीय कामकाज याकरीता होणारा खर्च प्रत्यक्ष दिलेल्या रक्कमेपेक्षा अधिक आहे (१३ जिल्ह्यामध्ये रुपये १ लाखापेक्षा कमी). यामुळे फार विलंब देखील होतो. अशा अत्यंत तूटपुंज्या निधिमुळे गावांना काय लाभ प्राप्त होईल हे देखील स्पष्ट होत नाही.

## इ. ७% वन अनुदान निधितील 'अर्थसंकल्पीय कपात':

७% वन महसूल आणि प्रत्यक्ष अर्थसंकल्पित रक्कम आणि दिलेला निधी यामध्ये फरक असल्याचे निरीक्षणात आले आहे. या संदर्भात खालील माहिती पाहता येईल.

तक्ता २३ : वन महसूल आणि वितरीत (प्रत्यक्ष मुक्त) केलेला निधी याचा फरक

| २०१८-१९ | |
|---|---|
| मागील तीन वर्षातील सरासरी वन महसूल वसुली (२०१४-१५, १२१५-१६, २०१६-१७) | रु.१६९.०९ कोटी |
| जिल्हा परिषदेला ७% हिस्सा | रु.११.८३ कोटी (रु.१६९.०९ कोटीचे ७%) |
| ग्राविविने प्रत्यक्षात मुक्त केलेला निधी | रु.७.०६ कोटी फक्त ( म्हणजेच त्यांच्या हक्काच्या निधीपैकी ६०% फक्त) |

जसे की इतर नियुक्त कर/अनुदानाबाबतीत होते त्याच प्रमाणे याबाबतीतही ४०% 'अर्थसंकल्पीय कपात' करण्यात आली आहे. अशा प्रकारे जिल्हा परिषदांना जितका मिळायला हवा होता त्यापेक्षा खूपच कमी म्हणजे केवळ रुपये ३.७७ कोटी रुपये इतकाच निधी प्राप्त झाला.

### ६.११.२ वन अनुदानासंदर्भातील राविआच्या शिफारशी:

अ. जसे की यापुर्वीच विश्लेषणातून समोर आले आहे की १३जिल्ह्यांना रु.१ लाखाहुन कमी निधी प्राप्त होतो, तर २२ जिल्ह्यांना रु.५ लाखापेक्षा कमी आणि ३४ पैकी २७ जिल्ह्यांना रु.१० पेक्षा कमी निधी प्राप्त होतो. म्हणूनच १९९८ च्या शासना निर्णयामध्ये आमुलाग्र सुधारणा करणे आवश्यक आहे. असे सुचविण्यात येत आहे की ग्राम विकास विभागाने मुख्य वन संरक्षक, नागपूर यांच्या सल्ल्याने व्यवहार्य आणि प्रत्यक्ष अमंलात आणण्याजोगा नवा शासन निर्णय तयार करावा. **ज्या जिल्ह्यांना दोन लाखापेक्षा कमी वन अनुदान मिळते, त्यांच्याकरीता वन अनुदान बंद करण्यात यावे कारण या लाभापेक्षा त्याकरीता होणारा प्रशासकीय खर्च जास्त असतो.**

ब. अशी शिफारस करण्यात येत आहे की, ज्या जिल्ह्याकरीताचे वन अनुदान रुपये १० लाखापेक्षा कमी आहे तेथे जिल्हा परिषदेने जे एफ एम समितीकडे किंवा उप वन संरक्षक यांच्या सल्यानुसार जिल्हा परिषदेला निधी हस्तांतरित करावा. रकमा अगदीच कमी आहेत आणि जंगलामधील कोणात्याही गावातील कोणत्याही प्रकल्पाकरीता वितरित करावयाच्या अर्थसंकल्पीय रकमेपेक्षा अनुज्ञेय खर्च अधिक असतो.

क. पुन्हा एकदा प्रधान मुख्य वन संरक्षक, उपवन संरक्षक इ. मार्फत न देता ग्राविविने रक्कम थेट जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करावी.

ड. हा नियुक्त कर असल्याने तसेच रकमा आधीच वसूल केलेल्या असल्याने शासनाने यावर कोणतीही अर्थसंकल्पीय कपात करु नये. कोणत्याही प्रकारची कपात म्हणजे जिल्हा परिषद कायद्याचे उल्लघंन ठरेल आणि जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाचा स्त्रोत कमकुवत होईल.

### ६.१२ सिंचित जमिनीवरील उपकर उत्पन्न (जिप आणि पंस कायद्याचे कलम १४६, १४८ आणि १५०):

जिप आणि पंस कायद्यातंर्गत सिंचन विभाग किंवा सिंचन विकास महामंडळाच्या पाणी दरावर २०% अतिरिक्त जिप उपकराची तरतूद केली असून सदर उपकर जिल्हा परिषदेला हस्तांतरित करण्याचीही तरतूद केलेली आहे. जिप सिंचन उपकर संबंधित भौगोलिक क्षेत्रातील जिल्हा परिषदेला देण्यात येतो. जर सिंचन क्षेत्र एकाच जिल्ह्यामध्ये असेल तर सिंचन विभागाचे कार्यालय कोठेही असले तरी त्याच जिल्ह्याला उपकर देण्यात येतो. असे आहे कारण बहुदा सिंचन लाभक्षेत्र दोन जिल्ह्यामध्ये पसरलेले असते.

जल संपदा (पाटबंधारे) विभागाने दिलेल्या माहिती अनुसार, शेतीसाठी केलेल्या पाणी पुरवठ्यातून रुपये ९३.७२ कोटीचे संकलन झाले तसेच रुपये ७३५.०६ कोटी इतके संकलन बिन शेती (औद्योगिक आणि पिण्याचे पाणी) उद्देशाकरीताच्या पाणीपुरवठ्यातून, एकूण रुपये ८२८.७८कोटी इतकी वसुली झाली. याप्रमाणे आपण जर २०% उपकराची परिगणना केली तर तो १६५ कोटी रुपये इतका येतो.

#### ६.१२.१ राविआची निरीक्षणे

**अ. संकलित केलेला आणि जिल्हा परिषदेला देण्यात आलेल्या उपकर रकमेबाबत पारदर्शकतेचा अभाव:**

या उपकराबाबतची प्रमुख अडचण अशी आहे की क्षेत्रीय कार्यकारी अभियंत्याकडून याची वसुली करण्यात येते आणि त्यानंतर संबंधित क्षेत्रीय सिंचन महामंडळामध्ये रक्कम जमा करण्यात येते. त्यानंतर संबंधित अधीक्षक/ कार्यकारी अभियंत्याकडून ती जिल्हा परिषदेला देण्यात येते. याप्रमाणे सर्व गणना सिंचन विभागाच्या शाखा स्तरावर करण्यात येते आणि जिल्हा परिषदांना (ज्यांच्याकरीता कायद्यान्वये सदर उपकर लादण्यात आला आहे) नेमकी किती रक्कम संकलित करण्यात आली आणि किती वितरित करण्यात आली याबाबतचा तपशील समजत नाही. लाभार्थ्याच्या म्हणजेच जिल्हापरिषदेच्या दृष्टीकोनातून यामध्ये कोणत्याही प्रकारची पारदर्शकता नाही.

**ब.सिंचन विभागाकडून करण्यात येणारी एकतर्फी कपात:**

असे आढळून आले आहे की  सिंचन विभागातील अनेक अधिकारी स्वेच्छेने धरणातून ग्राम पंचायतीच्या पाणी पुरवठा योजनांना केलेल्या पाणी पुरवठ्याकरीताची देय रक्कम कापून घेतात. काही प्रकरणांमध्ये तर जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार उन्हाळ्यामध्ये पाणी राखून ठेवण्याकरीताचे (दुष्काळ कालावधीत) शुल्क देखील जिल्हा परिषदेकडून आकारतात आणि जिल्हा परिषदेला रक्कम देण्यापूर्वी रक्कम समायोजित करतात. यामागील वरकरणी कारण हे की जिप ने पाणी राखून ठेवण्याचा ठराव केला म्हणून त्याचा खर्चही जिपवरच लादायचा. परंतु हे न्यायिक नाही, कारण दुष्काळ सदृश परिस्थितीमध्ये पाणी पुरवठा करणे किंवा पाणी राखून ठेवणे याची जबाबदारी (मदत आणि पुनर्वसन) जिल्हाधिकाऱ्यावर असते आणि म्हणूनच केवळ औपचारीकता म्हणून जिप ठराव करते. वस्त्यांना पाणी पुरवठा एकतर ग्राम पंचायती (ज्या भिन्न कायदेशीर संस्था आहेत) किंवा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकडून करण्यात येतो. यामध्ये जिप कुठे नसते. अशा प्रकारे 'राखीव पाणी' बद्दलचा खर्च जिपवर लादणे कायद्याला धरून नाही.

**६.१२.२ राविआच्या शिफारशी:**

**अ. कपात न करणे:**

सिंचन विभाग किंवा क्षेत्रीय सिंचन महामंडळ यांनी ग्राम पंचायतींना केलेल्या पाणी पुरवठ्याबद्दल जिल्हापरिषदेच्या रकमेतून एकतर्फी कपात करु नये कारण ग्राम पंचायती या स्वतंत्र भिन्न कायदेशीर संस्था आहेत. दुसरे असे की  दुष्काळी परिस्थिती किंवा अन्य कारणास्तव राखीव पाणी ठेवण्याकरीता कोणतीही कपात करू नये. ही रक्कम जिल्हाधिकाऱ्यांनी २२४५ मदत आणि पुनर्वसन निधी  मधून स्वतंत्रपणे अदा करावयाची असते. शासन निर्णयानुसार प्रक्रियात्मक औपचारीकता म्हणून पारीत केलेल्या ठरावाबद्दल जिपवर बोजा लादता कामा नये.

**ब. अधिक पारदर्शकता**

लाभार्थी म्हणजेच जिल्हा परिषदेला पाणी उपकर म्हणून काय मिळते आहे आणि कशाच्या आधारे समजण्याची आवश्यकता आहे.  सर्वच स्तरावर अधिकाधिक पारदर्शकतेची आणि माहितीची आवश्यकता.

**क. सिंचन उपकर २०% हून ४०% असा वाढवावा.**

हा उपकर सिंचित पीकावर आहे. हे दर अत्यंत मामुली असून अनेक दशकांपासून वाढविण्यात आलेले नाहीत. यामुळेच सिंचन उपकराचा दर २०% हून ४०% करणे सयुक्तिक असून याप्रकारे जिल्हा परिषदेचे उत्पन्न वृद्धींगत करावे.

**६.१३ जिल्हा परिषदेचा स्वत:चा निधी- करेतर महसूल स्त्रोत:**

वर दिलेल्या तपशीलानुसार जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत राज्य शासनाने केलेल्या 'नियुक्त कर' यामधून होतो. तथापि जिल्हा परिषदांना इतर स्त्रोतातून करेतर महसूल उत्पन्न प्राप्त होतो, जसे की:

अ.निविदा अर्ज विक्री.

ब. बाजरपेठ संकुले भाडे तत्वावर देणे

क. जिल्हा परिषद अतिथी गृहांचे भाडे उत्पन्न

ड. जिल्हा परिषदांच्या तळ्यातील माशांचा लिलाव

इ. बँकेत ठेवलेल्या विविध प्रकारच्या (शासकीय आणि जिपचे स्वत:चे) निधीतून मिळणारे व्याज उत्पन्न.

येथे काही जिल्हा परिषदांनी निर्माण केलेल्या करेतर उत्पन्नाचा नमुना दिला आहे. प्रत्येक महसूल क्षेत्रातून एक या प्रकारे जिल्ह्याची निवड केली आहे जेणे करून एंकदरीत संपूर्ण राज्याचा नमुना प्रतिबिंबीत होईल:

तक्ता २४ :जिल्हा परिषदेचे करेतर उत्पन्नाचे स्त्रोत:

( रुपये लाखात)

| अनु.क्र. | जिल्हा | पालघर | नाशिक | सातारा | लातुर | अमरावती | वर्धा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बँक व्याज | ८२२ | १८५८ | ११२५ | ३४६ | ६३० | ८२९ |
| २ | ईमारत आणि जमीन भाडे | ४ | १६ | ३० | १२ | ३ | १४ |
| ३ | अभिकरण शुल्क | ३६ | ३२ | २१ | २ | ११ | ४७ |
| ४ | निविदा शुल्क | ३६ | ३२ | २१ | २ | ११ | ४७ |
| ५ | दंड | ३८ | २० | ४४ | ३ | १ | ४ |
| ६ | भंगार सामान ( जुने सामान इ. विक्री) | १ | ४ | २ | ० | २ | ० |
| ७ | अतिथी गृह शुल्क | १ | ० | १ | ० | १० | ० |
| ८ | गोदाम शुल्क | ० | ० | ० | १ | ३ | ४ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | जिप तलावातील मासेमारी इ. भाडे | ० | ० | ० | १ | ३ | ४ |
| १० | कंत्राटदार नोंदणी शुल्क | ४१ | २२ | १२ | ५ | १० | ० |
| ११ | परवाना शुल्क | ५० | ० | ० | ० | ० | ८ |
| १२ | नदी बोट वाहतूक कंत्राट | ० | ० | १५ | ० | ० | ० |
| १३ | शैक्षणिक शुल्क | ० | २२ | ४ | ० | २ | ० |
| १४ | पशु दवाखाना शुल्क | ९ | ५ | ४६ | ० | ० | ० |
| १५ | जिप हाद्दितील गाळे व बाजार भाडे | ० | १ | ० | ० | २० | ४ |
| १६ | जत्रा व यात्रा यांचे उत्पन्न | ० | ० | ० | ० | १६ | ११ |
| १७ | शेती व झाडे संवर्धन यांचे उत्पन्न | ० | ० | २ | ० | ५ | ३ |
| १८ | तेंदू पाने ई लिलाव उत्पन्न | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १९ | जिपने प्राप्त केलेले पुरस्कार | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २० | प्राथमिक आरोग्य नोंदणी शुल्क | २२ | २ | ३५ | १७ | ८ | १५ |
| २१ | शेती, मोकळी जागा इ. पासून उत्पन्न | ० | ० | १ | ० | १५ | ० |
| २२ | बिन-शेती कर | २ | ० | ० | ० | ० | ० |
| २३ | जिप जल पुरवठा योजना पाणी कर | ४० | ० | ० | ० | १ | ४५ |
| २४ | जिपचे स्वत:चे उद्योग जसे मुद्राणालय इ. चे उत्पन्न | ० | २ | ० | ० | ६ | २३ |
| २५ | जिप ईतर कर/शुल्क | ० | ० | ५८ | ० | १६ | ४३८ |
| | **एकूण उत्पन्न** | **१०९६** | **२०१३** | **१४२५** | **४१४** | **८६८** | **१४६६** |

यावरून दिसून येईल की उत्पन्नाचे स्त्रोत आणि करेतर उत्पन्न सर्व जिल्हा परिषदांचे भिन्न आहे, तर व्याजातून मिळणारे उत्पन्न लक्षणीय प्रमाणात असून इतर सर्व उत्पन्न स्त्रोतापेक्षा अधिक आहे.

जिल्हा परिषदेला प्राप्त होणारी शासकीय अनुदाने जिल्हा परिषद त्वरीत खर्च करीत नाही. कामाचा अंदाज घेणे, निर्वाचित सदस्य मंडळाकडून मंजूरी मिळविणे, निविदा प्रक्रिया, कंत्राटदार निश्चित करणे आणि कार्यादेश जारी करणे या प्रक्रियेला साधारण सहा महिने ते एक वर्ष असा कालावधी लागतो. कार्यादेश काढल्यानंतर देखील कंत्राटदार प्रकल्प पूर्ण करण्याकरीता त्याचा वेळ घेतो. संकेतानुसार कामाची प्रगती पाहूनच टप्प्या टप्प्याने पैसे देण्यात येतात. अशा प्रकारे सर्व निधी एकाच वेळी खर्च करण्यात येत नाही आणि यास मोठा कालावधी लागतो. त्यामुळेच शासनाने दिलेल्या मात्र अजूनही खर्च न केलेल्या बँकेत ठेवलेल्या निधीवर देखील जिल्हा परिषदांना उत्पन्न मिळते. तांत्रिकदृष्ट्या हे काही नियमित किंवा खात्रीशीर उत्पन्न नाही तर हे बँकेच्या भाषेत 'चल उत्पन्न' आहे. परंतु असे दिसून येते की आश्वासित उत्पन्न वर्षागणिक कमी होत जात असले तरी नेमके पणाने व्याज हे उत्पन्नाचे एक मोठा स्त्रोत म्हणून सामोरे आले आहे. खाली अलिकडील काही वर्षातील जिल्हा परिषदांचे सरासरी व्याज उत्पन्न दिले आहे.

तक्ता २५: जिल्हा परिषद एकूण उत्पन्न विरुध्द जिल्हा परिषद व्याज उत्पन्न: ( रुपयेलाखात)

| अनु.क्र. | जिल्हा परिषद नाव | व्याज उत्पन्न | जिल्हा परिषद एकूण उत्पन्न | जिल्हा परिषदेचे एकूण उत्पन्नापैकी व्याज उत्पन्नाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | पालघर | ८२२ | २८५१ | २८.८२ |
| २ | रायगड | १३३ | ७६९७ | १.७३ |
| ३ | रत्नागिरी | १२८ | १३७० | ९.३६ |
| ४ | सिंधुदूर्ग | ८२९ | १९६५ | ४२.२० |
| ५ | ठाणे | ८६९ | ४७०० | १८.४८ |
| ६ | अहमदनगर | ६०६ | २११७ | २८.६२ |
| ७ | धुळे | ९६ | ७५२ | १२.८० |
| ८ | जळगाव | १२४२ | २३३७ | ५३.१३ |
| ९ | नंदुरबार | १४६५ | ३०८० | ४७.५६ |
| १० | नाशिक | १८५८ | ३९८९ | ४६.५७ |
| ११ | कोल्हापूर | १२९९ | ३४०८ | ३८.१० |
| १२ | पुणे | २१५८ | १५१५२ | १४.२४ |
| १३ | सांगली | ७९१ | २१८२ | ३६.२५ |
| १४ | सातारा | ११२५ | ३२२७ | ३४.८५ |
| १५ | सोलापूर | २१३२ | ३८२६ | ५५.७२ |
| १६ | औरंगाबाद | १०५२ | १९५४ | ५३.८३ |
| १७ | बीड | ८७८ | २११४ | ४१.५२ |
| १८ | हिंगोली | २५२ | ५९१ | ४२.५८ |
| १९ | जालना | ९८२ | २०८५ | ४७.१० |
| २० | लातुर | ३८६ | ९४० | ३६.८७ |
| २१ | नांदेड | ९४६ | १७६४ | ५३.६३ |
| २२ | उस्मनाबाद | ४९८ | ८४७ | ५८.८७ |
| २३ | परभणी | २५९ | १०६१ | २४.४२ |
| २४ | आकोला | ५४४ | १५३३ | ३५.४९ |
| २५ | आमरावती | ६३० | १९६६ | ३२.०६ |
| २६ | बुलढाणा | ९३८ | ३६०९ | २५.९८ |
| २७ | वाशिम | ३८२ | ६७४ | ५६.७१ |
| २८ | यवतमाळ | २४५५ | ३३१४ | ७४.०८ |
| २९ | भंडारा | २९५ | ८०९ | ३६.४० |
| ३० | चंद्रपूर | ३५२ | ३१०२ | ११.३५ |
| ३१ | गडचिरोली | ३०७ | १४१६ | २१.६५ |
| ३२ | गोंदिया | ३८४ | १२६८ | ३०.२७ |
| ३३ | नागपूर | १३४ | २५९६ | ५.१५ |
| **सरासरी** | | **८२४** | **२७२०** | **३०.२९** |

### ६.१३.१ जिल्हा परिषदेच्या स्वत:च्या करेतर उत्पन्नाचे विश्लेषण:

जसे की वर निदर्शानास आणून दिले आहे की जिल्हा परिषदांकरीता व्याज उत्पन्न हा नव्याने सामोरा आलेला उत्पन्नाचा अपारंपारीक स्त्रोत आहे. या व्यतिरिक्त जिल्हा परिषदांना अन्य कोणत्याही स्त्रोतातून उत्पन्न मिळविण्यास फार कमी वाव आहे. वस्तुत: या स्त्रोतांना मर्यादा आहेत आणि त्यातून खूप उत्पन्न मिळत नाही. काही जुन्या जिल्हा परिषदांकडे व्यापारी संकुल आहेत किंवा काही भाड्यातून मिळणारे उत्पन्न आहे. संस्था योजनाकरीता कलम १२३ अंतर्गत वसूल करण्यात येणारे अभिकरण शुल्क (याबाबत नंतर चर्चा करण्यात आलेली आहे.) आता काही जास्त नाही. अधिकारेतर जनांसोबतच्या बैठकांमध्ये त्या सर्वांनी एकमुखाने विनंती केली की, जिल्हा परिषदांच्या शहरातील मोक्याच्या ठिकाणी असलेल्या मालमत्तेचा पूर्ण क्षमतेने अतिरिक्त निधी उभारण्याकरीता उपयोग करण्याबाबत परवानगी मिळालीच पाहिजे. आम्ही ही समस्या स्वतंत्रपणे हाताळली आहे तसेच कलम १५७ अंतर्गत ठाणे जिल्ह्याने कशाप्रकारे अतिरिक्त निधी स्त्रोत निर्माण केल्याबद्दलचे अभ्यासपूर्ण विवेचन दिले आहे.

### ६.१४ सहायकता अनुदान:

### ६.१४.१ राज्य शासनाकडून प्राप्त अनुदान:

नियुक्त कर (परिच्छेद २.१) आणि करेतर उत्पन्ना व्यतिरिक्त (परिच्छेद२.२) जिल्हा परिषदांना स्वत:चे उत्पन्न वृद्धीगंत करण्याकरीता काही अनुदान प्राप्त होते.

### ६.१४.२ व्यवसाय कराच्या (प्रति संदर्भ संकेतांक (सीआरसी) ३६०४०४२३) बदल्यात काही निवडक जिल्हा परिषदांना नुकसान भरपाई देण्यात येते, एकूण १५ जिल्हा परिषदांना मिळून रुपये २५.६८ लाख:

ही इक जुनी नुकसान भरपाई आहे जी सन १९७५-७६ मध्ये जिल्हा परिषदांचा व्यवसाय कर आकारण्याचा अधिकार काढून घेण्यात आला तेव्हा पासून त्यांना ती देण्यात येत आहे. त्यावेळी निवडक जिल्हा परिषदा व्यवसाय कर आकारत होत्या आणि वसूल करत होत्या.

प्रत्येक जिल्हा परिषदेच्या वाट्याला सरासरी रुपये १.७१ लाख प्रति वर्ष (रुपये २५.६८ लाख भागिले १५ जिल्हे) अशी तूटपूंजी नुकसान भरपाई येते. सर्वाधिक रक्कम प्राप्त करणारा जिल्हा हा ठाणे जिल्हा (रु.५.६४ लाख) आहे आणि हिंगोली जिल्हा (रुपये २६६०) सर्वात कमी रक्कम प्राप्त करणारा जिल्हा आहे.

आठ जिल्ह्यांना एक लाखापेक्षाही कमी रक्कम प्राप्त होते. सदर निधी नेहमीच्या पद्धतीनुसार वितरित करण्यात येतो.

### ६.१४.२.१ राविआच्या शिफारशी:

राविआची शिफारस अशी आहे की, ही नुकसान भरपाई अत्यंत तूटपूंजी असल्याकारणाने ती बंद करण्यात यावी. राविआ प्रति संदर्भ संकेतांक (सीआरसी) देखील बंद करण्याची शिफारस करतो. अशा तूटपूंज्या रकमेने जिल्हा परिषदांच्या उत्पन्नात काहीही फरक पडत नाही. बदलत्या परिस्थितींमध्ये ज्या बाबींकरीता नुकसान भरपाई देण्यात येत होती ती बाब आता निरर्थक ठरते आहे. याऐवजी जिल्हा परिषदांना अधिक योग्य पद्धतींनी मदत करणे इष्ट होईल, जसे की या प्रकरणामध्ये पुढे दर्शविण्यात आले आहे.

### ६.१४.३ वाहन कर रद्द करण्याबद्दल निवडक जिल्हा परिषदांना नुकसान भरपाई, १४ जिल्ह्यांना रुपये ५ लाख (प्रति संदर्भ संकेतांक ३६०४०२९२)

ही आणखी एक जुनी नुकसान भरपाई आहे, दशकांपूर्वी जेव्हा जिप गठीत करण्यात आल्या होत्या तेव्हा जिल्हा परिषद स्तरावर वसुल होणारा वाहन कर रद्द करण्यात आला आणि राज्य शासनाकडे सुपुर्द करण्यात आला.  अनेक वर्षापूर्वी जिपच्या उत्पन्नात झालेले नुकसान भरून देण्याकरीता अजूनही ती देण्यात येतेच आहे. १४ जिल्ह्यांना मिळून वर्षाकाठी एकूण रुपये ३-५ लाख रुपये देण्यात येतात. प्रत्येक जिल्ह्याकरीता सरासरी रुपये ३५,००० देण्यात येतात. कोल्हापूरला सर्वात जास्त रक्कम रुपये १.४४ लाख मिळते आणि सर्वात कमी नंदूरबार जिल्ह्याला मिळतात अवघे रुपये २९००!

### ६.१४.३.१ राविआच्या शिफारशी:

राविआची शिफारस अशी आहे की ही नुकसान भरपाई अत्यंत तूटपूंजी असल्याकारणाने ती बंद करण्यात यावी. राविआ प्रति संदर्भ संकेतांक (सीआरसी) देखील बंद करण्याची शिफारस करते. अशा तूटपूंज्या रकमेने जिल्हा परिषदांच्या उत्पन्नात काहीही फरक पडत नाही. बदलत्या परिस्थितींमध्ये ज्या बाबींकरीता नुकसान भरपाई देण्यात येत होती ती बाब आता निरर्थक ठरते आहे. या बाबतीतील प्रशासकीय बाबीं हाताळण्याचा  (लिपीकीय प्रक्रियेवरील) खर्च कदाचित नुकसान भरपाईच्या रकमेपेक्षा जास्त असू शकतो.  याऐवजी जिल्हा परिषदांना अधिक योग्य पद्धतींनी मदत करणे इष्ट होईल, जसे की या प्रकरणामध्ये पुढे दर्शविण्यात आले आहे.

## ६.१५ केंद्रिय वित्त आयोगाकडील अनुदान:

पंचायत राज संस्थांना केंद्रिय वित्त आयोगाकडून सुद्धा निधी प्राप्त होतो.

### ६.१५.१ तेराव्या केविआच्या कालावधी दरम्यान प्राप्त अनुदान(२०१०-१५):

महाराष्ट्रातील पंचायत राज संस्थांना २०१०-१५ या पाच वर्षांच्या कालावधी दरम्यान रुपये ५५८९ कोटी रुपये प्राप्त झाले. सदर रक्कम पंचायत राज संस्थाच्या तीन स्तरांमध्ये खालील प्रमाणे वितरित करण्यात आली:

तक्ता २६: जिप, पंस आणि ग्रामपंचायत साठी १३वे केंविआ अनुदान:

| पंचायत राज संस्था स्तर | वाटप टक्केवारी | मिळालेली रक्कम ( रुपये कोटीत ) |
|---|---|---|
| जिल्हा परिषद | १०% | ५५६ |
| पंचायत समिती | २०% | १११२ |
| ग्रामपंचायत | ७०% | ३९२१ |

जिप अंतर्गत वितरणाचे सूत्र देण्यात आले होते, त्यामुळे काही जिपंना कमी तर काहींना जास्त निधी प्राप्त झाला. परंतु ढोबळमानाने प्रत्येक जिपला सरासरी रुपये १६.३५ कोटी पाच वर्षांच्या कालावधी दरम्यान (रुपये ५५६/३४) किंवा ३.२७ कोटी दरवर्षी प्राप्त झाले(१६.५/५). आपल्या दिसून येइल की प्रत्येक जिपचे सरासरी वार्षिक उत्पन्न रुपये २७ कोटी इतके आहे. अशा प्रकारे अतिरिक्त उत्पन्न स्रोतातून मिळालेले हे ३.२७ कोटी रुपयांचे उत्पन्न, जिपच्या एकूण उत्पन्नाच्या १२% इतके होते. सुरुवातीच्या काळात हे उत्पन्न ग्राम विकास विभागाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार (शासन निर्णय १३ वा विआ/प्र.क्र.२२/ वित्त ४, दिनांक ३० ऑगस्ट २०१०) प्राथमिकत: संगणकीकरण, रस्ते देखभाल, घन कचरा व्यवस्थापन आणि इतर काही बाबींवर खर्च केले जात असे. जिपच्या काही विशिष्ट क्षेत्रांच्या उन्नतीकरीता प्राथमिकत: संगणकीकरणाकरीता हे अनुदान फारच उपयोगी ठरले.

### ६.१५.२ चौदाव्या केविआच्या कालावधी दरम्यान प्राप्त अनुदान (२०१५-२०):

चौदाव्या केंद्रिय वित्त आयोगाने , तथापि अशी शिफारस केली की पंचायत राज संस्थांकरीताचे सर्व अनुदान केवळ ग्रामपंचायतीना देण्यात यावे आणि वरील दोन स्तरावरील पंचायत राज संस्था म्हणजेच जिल्हा पंचायती किंवा मधल्या पंचायतींकरीता कोणताही निधी निश्चित करण्यात आला नव्हता. **यामुळेच २०१५-१६ पासून ते २०१८-१९ पर्यंत जिपंना कोणत्याही प्रकारचा निधी प्राप्त झाला नाही.**

आमच्या दौऱ्यांदरम्यान, सर्व अधिकारेतर जनांनी निदर्शनास आणून दिले की १४ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या कालावधी दरम्यान (सन २०१५-२०१९) कडून पंचायत राज संस्थेच्या दोन स्तरांना कोणत्याही प्रकारचे अनुदान प्राप्त झाले नाही.  त्याच वेळी याच पाच वर्षांच्या कालावधी दरम्यान महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींना रुपये १५,००० कोटी इतके अनुदान प्राप्त झाले. याचाच अर्थ ग्रामपंचायतींना दर वर्षी जवळपास रुपये ३,००० कोटी इतके रुपये प्राप्त होतात.

असे समजते की राज्य शासनाने पंधराव्या केंद्रिय वित्त आयोगाला दिलेल्या निवेदनामध्ये अशी विनंती केली आहे की या हस्तांतरित हिश्श्यातून जिप आणि पंस यांना देखील निधी देण्यात यावा. तथापि, आपल्याला त्या करता पंधराव्या केंद्रिय वित्त आयोगाच्या अहवालाची वाट पाहावी लागेल, अहवाल आल्यावर त्यांनी नेमकी काय शिफारस केली आहे ते समजेल.

परंतु पंचायत राज व्यवस्था बळकट करण्याकरीता काही विशिष्ट उपक्रम जिल्हा पातळीवर आणि तालुका पातळीअर राबविणे आवश्यक असते त्यामुळे त्यांना यातील योग्य प्रमाणात वाटा मिळणे महत्वाचे आहे.

### ६.१६ जिल्हा परिषदेच्या स्वत:च्या उपकराच्या उत्पन्नाचे एकंदर विश्लेषण:

### ६.१६.१ उपकर उत्पन्नाच्या विविध स्त्रोतांचे घटक:

**तक्ता २७: जिल्हा परिषद उपकर उत्पन्नाच्या विविध स्त्रोतांचे घटक:** (रुपये लाखामध्ये)

| अनु.क्र. | जिल्हा | जमीन महसूल | मुद्रांक शुल्क | वन अनुदान | सिंचन उपकर | बँक व्याज | ईतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पालघर | ६८७ | ८६० | १ | १९९ | ८२२ | २८२ | २८५१ |
| २ | रायगड | १२०१ | ४७४२ | ३ | १४६५ | १३३ | १५३ | ७६९७ |
| ३ | रत्नागिरी | ८०७ | ३३३ | ३ | ० | १२८ | ९९ | १३७० |
| ४ | सिंधुदूर्ग | ८५७ | १९६ | २ | ० | ८२९ | ८२ | १९६६ |
| ५ | ठाणे | ६२६ | २२६२ | १६ | ८७ | ८६९ | ८४१ | ४७०१ |
| ६ | अहमदनगर | ६९३ | ५८६ | ० | २ | ६०६ | २२९ | २११६ |
| ७ | धुळे | ४२५ | १५३ | ० | ० | ९६ | ७८ | ७५२ |
| ८ | जळगाव | ६१८ | ३६२ | ० | ० | १२४२ | ११६ | २३३८ |
| ९ | नंदुरबार | १२५३ | २६३ | ० | ० | १४६५ | ९९ | ३०८० |
| १० | नाशिक | १२२७ | ६४८ | ९ | ९२ | १८५८ | १५४ | ३९८८ |
| ११ | कोल्हापूर | ९१८ | ४१० | ३ | १६ | १२९९ | ७६२ | ३४०८ |
| १२ | पुणे | २२२७ | ९४६६ | १ | ४५५ | २१५८ | ८४६ | १५१५३ |
| १३ | सांगली | ७५२ | ३१५ | ० | ५१ | ७९१ | २७२ | २१८१ |
| १४ | सातारा | ९३८ | ८२४ | ० | ३९ | ११२५ | ३०० | ३२२६ |
| १५ | सोलापूर | ६६१ | ५६० | ० | १४१ | २१३२ | ३३२ | ३८२६ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६ | औरंगाबाद | १०३ | ६८३ | ० | ० | १०५२ | ११७ | १९५५ |
| १७ | बीड | ५३४ | ३१३ | ० | ३०४ | ८७८ | ८६ | २११५ |
| १८ | हिंगोली | १०७ | ९६ | १ | ० | २५२ | ४५ | ५९१ |
| १९ | जालना | ७७४ | २३१ | ० | १ | ९८२ | ९८ | २०८६ |
| २० | लातूर | २८९ | २३६ | ० | ० | ३४६ | ६८ | ९३९ |
| २१ | नांदेड | २७० | २७१ | ६ | १ | ९४६ | २६६ | १७६० |
| २२ | उस्मानाबाद | ५७ | १७५ | ० | ० | ४९८ | ११७ | ८४७ |
| २३ | परभणी | ३७१ | १६७ | ० | १ | २५९ | २६४ | १०६२ |
| २४ | आकोला | ३५७ | २२४ | ८ | २५७ | ५४४ | १४३ | १५३३ |
| २५ | आमरावती | २८३ | ४४६ | ३७० | १ | ६३० | २९६ | २०२६ |
| २६ | बुलढाणा | ७३८ | ३२३ | ३ | ० | ९३८ | १६०८ | ३६१० |
| २७ | वाशिम | ११७ | ११७ | १ | २ | ३८२ | ५४ | ६७३ |
| २८ | यवतमाळ | ५१५ | १४७ | ५५ | ० | २४५५ | १४१ | ३३१३ |
| २९ | भंडारा | २१३ | ११२ | ० | ० | २९५ | १८९ | ८०९ |
| ३० | चंद्रपूर | १३८१ | १८१ | ९६ | ७७ | ३५२ | १०१५ | ३१०२ |
| ३१ | गडचिरोली | २८ | १८ | ४५६ | ४१५ | ३०७ | १९३ | १४१७ |
| ३२ | गोंदिया | ९७ | ८० | २४ | ८ | ३८४ | ६७६ | १२६९ |
| ३३ | नागपूर | ४१३ | १६२२ | १ | २३९ | १३४ | १८९ | २५९८ |
| ३४ | वर्धा | ३१६ | २७५ | २० | ९७ | ८२९ | ६३६ | २१७३ |
| | **भव्य एकूण** | **२०९४३** | **२७६९७** | **१०७९** | **३९५०** | **२८०१६** | **१०८४६** | **९२५३१** |
| | **भव्य सरासरी** | **६१६** | **८१५** | **३२** | **११६** | **८२४** | **३१९** | **२७२२** |

## ६.१६.२ महाराष्ट्रातील जिप चे प्रत्यक्ष स्वत:चे उत्पन्न:

याप्रमाणे असे दिसून येईल की हल्लीच्या वर्षांमध्ये जिपचे सरासरी स्वत:चे उत्पन्न रुपये २७.२० कोटी रुपये इतके आहे. तथापि ही सरासरी फसवी आहे कारण यामध्ये पुणे (१५१ कोटी), रायगड (७६ कोटी) आणि ठाणे (४७ कोटी) या सर्वोच्च प्राप्तीच्या जिपंचा समावेश आहे. यांस कारण म्हणजे मुंबई किंवा पुणे यांच्यापासुन भौगोलिक दृष्ट्या जवळ असल्याने मुद्रांक शुल्काचे उत्पन्न खूप जास्त आहे. आपण जर या तीन जिल्ह्यांना वगळून सरासरी मोजली तर महाराष्ट्रातील जिपंचे स्वत:चे सरासरी वार्षिक उत्पन्न केवळ रुपये २०.९४ कोटी इतके आहे, हा आकडा त्यांच्या उत्पन्नाचे अधिक चांगले प्रतिबिंब दर्शवितो.

**आलेख २१: टक्केवारी नुसार जिल्हा परिषदेच्या स्वत:च्या एकूण उत्पन्नाचे भाग:**

एकूण स्वत:च्या उत्पन्नाचे घटक




### ६.१६.२ नियुक्त कर जिपच्या स्वत:च्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत असणे अपेक्षित होते

सन १९६० मध्ये जेव्हा जिप आणि पंस यांची संस्था म्हणून निर्मिती करण्यात आली होती, तेव्हा अगदी जाणीवपूर्वक त्यांच्या आर्थिक उपजिविका आणि स्वायत्ततेकरीता ग्रामीण लोकसंख्येतून अतिरिक्त विशिष्ट कर किंवा उपकर म्हणून विशिष्ट रक्कम हस्तांतरित करुन त्यांना द्यायची असे निश्चित केले होते. अशा प्रकारे जमीन महसुलासोबत आणि जमीन व्यवहारावरील मुद्रांक शुल्कासोबत उपकर जोडला गेला (त्याकाळातील उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत). याव्यतिरिक्त सिंचित जमिनीवर उपकर लादण्यात आला. उपकर उत्पन्नाच्या या सर्व तरतुदींचा जिप आणि पंस कायद्यामध्येच अंतर्भाव करण्यात आला, जेणेकरून त्यामध्ये तत्कालीन शासनाला कोणत्याही प्रकारचे त्यांच्या इच्छेप्रमाणे बदल करता येऊ नयेत. जिपकडे व्यवसाय करासारखे इतर काही स्वत:च्या उत्पन्नाचे स्त्रोत त्यावेळी होते. जेव्हा नियुक्त करांमधून जिपंना पुरेसे उत्पन्न होणे थांबले तेव्हा हळू हळू परिस्थिती बदलली.

### ६.१६.३ जिपचे स्वत:चे उत्पन्न गेल्या अनेक वर्षांमध्ये पुरेशा प्रमाणात वृद्धीगंत झाले नाही.

उपकर उत्पन्न प्राथमिकत: नियुक्त करांवर अवलंबून आहे. राज्य शासनाने वसूल केलेले उपकर आणि त्यानंतर जिप आणि पंस ला हस्तातरित केलेले उपकर म्हणजे नियुक्त कर होय. नियुक्त कराव्यतिरिक्त उत्पन्नाचे इतर स्त्रोत म्हणजे करेतर उत्पन्न स्त्रोत आणि शासकीय अनुदान तसेच वित्तीय आयोगाचे अनुदान होय. असे निदर्शनास आले आहे की या सर्व स्त्रोतांमध्ये एकप्रकारची कुंटीतता आलेली आहे. याचाच अर्थ अनेक वर्षांमध्ये उत्पन्न काही वृद्धींगत होत नाही. याची कारणे खालीलप्रमाणे आहेत:

**(अ.) नियुक्त कर कुंठीत जमीन महसुलाशी संलग्न केला आहे:**

जेव्हा जिप आणि पंस कायदा करण्यात आला तेव्हा कलम १४४ (मुलभूत जिप उपकर), कलम १५५ (वृद्धीगंत जिप उपकर), कलम १८५ (सापेक्ष अनुदान), कलम १८६ (प्रोत्साहन अनुदान) अंतर्गत नियुक्त करांची तरतूद 'जमीन महसूल' आधारे करण्यात आली होती. तथापि, आता ६० वर्षे उलटून गेल्यावर मूळ जमीन महसुलाची रक्कम महसुलाचा स्त्रोत म्हणून अगदी तूटपूंजी झाली आहे. याउपर दुष्काळामुळे शेतकऱ्यांना जमीन महसुलामध्ये सूट दिली जाते अथवा माफ करण्यात येतो. इतकेच नाही तर छोट्या शेतकऱ्यांना जमीन महसूल कायम स्वरूपी माफ करण्यात आला आहे. अधिक महत्वाचे म्हणजे 'जमीन महसूल' आकडेवारी तालुका पातळीवर एकत्रित करण्यात येते. त्यानंतर जिपला जिप उपकर म्हणून द्यावयाच्या रकमेची परिगणना जिल्हाधिकारी पातळीवर करण्यात येते. परिगणनेच्या वा आकडेमोडीच्या पद्धती जिल्ह्यानुसार बदलतात. त्यापुढे विभागीय पातळीवर केवळ आकडेवारी एकत्रित करण्यात येऊन त्या ग्राम विकास विभागाला कळविण्यात येतात. तसेच मागणी आधारे देण्याऐवजी प्रत्यक्ष वसुलीच्या आधारे जिपला हा निधी देण्यात येतो, याचा अर्थ जिल्हाधिकारी कार्यालयाकडून संकलनामध्ये काही ढिलाई झाल्यास त्याची किंमत जिपला मोजावी लागते. अखेर रुढिगत अर्थसंकल्पीय कपातीमुळे संपूर्ण रक्कम अर्थसंकल्पित करण्यात येत नाही. या सर्व समस्या आणि अडचणी परिच्छेद ६.९.३ मध्ये या आधीच तपशीलवार मांडलेल्या आहेत.

थोडक्यात काय तर नियुक्त कर जमीन महसूलासह संलग्न असल्याने उत्पन्नाचा हा स्त्रोत कुंठित होत आहे आणि जोपर्यंत यामध्ये सुधारणा होत नाही तोपर्यंत वर्तमान आवश्यकतांची पूर्ती करण्याकरीता वाढण्याची शक्यताही दिसत नाही. ही समस्या तसेच ती सोडविण्याकरीताच्या आमच्या शिफारशी परिच्छेद ६.९.५ मध्ये या आधीच मांडलेल्या आहेत.

**(ब.) मुद्रांक शुल्काशी संलग्न असलेला नियुक्त कर-उपकर केवळ काही जिल्ह्यांनाच सहाय्यभूत ठरतो आहे.**

सकृत दर्शनी मुद्रांक शुल्क उपकर हा सर्व जिल्हा परिषदांकरीता उत्पन्नाचा विश्वसनीय आणि चांगला स्त्रोत आहे असे वाटते. तथापि राज्यामध्ये अधिकाधिक प्रमाणात नागरीकरण होत असून पुणे, रायगड, ठाणे आणि नागपूर या चार जिल्ह्यामध्ये जमिनीचे भाव फार झपाट्याने वाढत आहेत आणि हे चार जिल्हे ६५% मुद्रांक शुल्क उपकर प्राप्त करत आहेत. याउलट, आतल्या बाजूला असलेल्या हिंगोली, गडचिरोली किंवा वाशिम सारख्या जिल्ह्यांना तुलनात्मक दृष्ट्या मुद्रांक शुल्क म्हणून खूप कमी रक्कम मिळते आणि ती देखील कुंठित होत आहे. त्यामुळे त्यांना याचा लाभ मिळत नाही. याउपर सन २०१५

मधील निर्णयान्वये ११५ गाव पंचायतीना, ज्यामध्ये तालुका मुख्यालयांचाही समावेश होतो, नगर पंचायतींचा दर्जा देण्यात आला. या मोठ्या गावांमध्ये जमिनीचे व्यवहार मोठ्या प्रमाणात होत होते (ज्यातून मुद्रांक शुल्क उत्पन्न होत होते). आता या ग्राम पंचायती नगर पंचायती झाल्याने जिपंना त्यांच्याकडून काही उत्पन्न मिळत नाही.

थोडक्यात १% मुद्रांक शुल्क उपकर हा उत्पन्नाचा चांगला स्त्रोत होता परंतु आता असे निरिक्षणात आले आहे की, राज्याच्या बदललेल्या आर्थिक संरचनेमुळे त्याचा लाभ केवळ काही जिल्ह्यांना होतो आहे आणि अनेक मागासलेल्या, दुर्गम भागातील जिल्ह्यांना यातून पुरेशा रक्कमा प्राप्त होत नाहीत आणि त्यामुळे जिपमध्ये असमानता वाढते आहे. आम्ही परिच्छेद ६.१०.२ मध्ये काही सुधारणात्मक उपाय सुचविले आहेत.

**(क.) ७% वन अनुदान कुंठीत होत आहे.**

हे आणखी एक कुंठीत होणारे उत्पन्न आहे कारण आता शासन वनांकडे महसूल निर्मितीचा स्त्रोत म्हणून पाहत नाही. हे उत्पन्न स्त्रोत महाराष्ट्रातील अधिक प्रमाणात जंगल असलेल्या अगदी थोड्या जिल्ह्याकरीता उपयोगी आहे. आम्ही परिच्छेद ६.११.१ मध्ये यावर विस्तृत स्पष्टीकरण केले आहे.

**(ड.) सिंचित जमिनीवरील उपकर**

पुन्हा एकदा हेच निदर्शनास येते की मागील अनेक वर्षांमध्ये सिंचित जमिनीवरील उपकर वाढविण्यात आलेला नाही, यामागील कारण म्हणजे जरी शेतकऱ्यांची जमीन सिंचित असेल तरीही एकंदर धोरण शेतकऱ्यांवर कोणताही अतिरिक्त भार टाकू नये असे आहे. हा उत्पन्नाचा स्त्रोत देखील कुंठीत होत आहे. पुन्हा जिल्ह्या जिल्ह्यातील सिंचन क्षेत्राखालील जमिनीचे क्षेत्र भिन्न आहे आणि काही जिल्ह्यांना या नियुक्त कराने अधिक लाभ होत आहे. आम्ही परिच्छेद ६.१२.२ मध्ये उपकराचे दर वाढविण्याची शिफारस केली आहे.

**(इ.) करेतर उत्पन्नाच्या स्त्रोतामध्ये देखील वाढ होत नाही.**

जिपंना १९८९ पासून जिप आणि पंस कायद्याच्या कलम १२३ अंतर्गत संस्था योजनांकरीता ‘५% अभिकरण शुल्क’ म्हणून भरीव उत्पन्न मिळत होते. तथापि या मागील अनेक वर्षामध्ये, कार्यालयीन आदेशानुसार, पुर्वीच्या संस्था योजनेच्या यादीतून अनेक योजना काढून टाकण्यात आल्या आहेत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे एकात्मित बालक विकास योजना आहे. याउपर क्षेत्रामध्ये एखादी योजना संस्था योजना यादीतील आहे का याबाबत बरीच गोंधळाची स्थिती आहे. पूर्वी मंत्रालयाच्या शासन निर्णयामध्ये

‘संस्था योजना’ असे स्पष्ट नमूद करायचे. नवीन आदेशामध्ये अशी नोंद केलेली नसते, तर अशाप्रकारे कालानुरुप जिपचा संस्था उत्पन्नाचे (अभिकरण शुल्क) स्त्रोत आकसत चालले आहे.

जिप आणि पंस कायद्याचे कलम १५७ च्या तरतूदीनुसार विविध प्रकारचे कर आकारण्याची तरतूद आहे. कलम १५७(इ) नुसार जमीन आणि इमारतीवर विशेष कर लादण्याची तरतूद आहे. कलम १५९ अंतर्गत जिल्हा परिषदेकडून हे कर आकारण्याची प्रक्रिया दिलेली आहे.

ठाणे जिल्हा परिषदेला, कलम १५७ चे १५९ सह वाचन करून कलम १५७(इ) अन्वये बिनशेती कर आकारण्याचे अधिकार आहेत.

पहिल्या राज्य वित्त आयोगाने त्यांच्या अहवालामध्ये (परिच्छेद क्रमांक १३.२१) शिफारस केली आहे की सर्व जिल्हा परिषदांनी ठाणे जिल्ह्याप्रमाणे बिनशेती कर आकारावा.

सदर शिफारस शासन आणि ग्राम विकास विभागाने स्वीकारुन दि.३.३.१९९९ रोजी मार्गदर्शक तत्वे जारी केली आणि शासन निर्णय क्र. एमव्हीए/१०९९/प्र.क्र. ३४८८/२४, दिनांक १४.६.१९९९ अनुसार सर्व जिपंना निर्देश दिले की त्यांनी ठाणे जिपप्रमाणे पावले उचलावीत. शासनाने त्याबरोबरच ठाणे जिपने कशा रितीने विशेष बिनशेती कर आकारला त्याबाबतची अधिसूचना देखील जोडली. परंतु असे दिसून येते की ठाणे जिल्ह्याचे उदाहरण सर्व जिपंना देऊनही इतर कोणत्याही जिपने कलम १५७ अंतर्गत उपलब्ध संधीचा उपयोग करून घेऊन विशेष बिनशेती कर आकारला नाही.

**कलम १५७(इ) अंतर्गत ठाणे जिल्ह्याचे अलिकडील वसुली खालीलप्रमाणे आहे:**

| अनु.क्र. | वर्ष | बिगर शेती कर जमा (रुपयेलाखात) |
|---|---|---|
| १ | २०११-१२ | ६५.०६ |
| २ | २०१२-१३ | ६३.२७ |
| ३ | २०१३-१४ | ४२.१९ |
| ४ | २०१४-१५ | ३४.२५ |
| ५ | २०१५-१६ | ५.१७ |
| ६ | २०१६-१७ | ५.३८ |
| ७ | २०१७-१८ | ६.०३ |

अशाप्रकारे, असे दिसून येते की जिप ठाणेला उत्पन्नाचा स्त्रोत लाभला असला तरी तो काहीसा अनियमित आहे. यामागील कारणांपैकी एक म्हणजे ठाणे जिप मधील बराचसा भाग नगर पालिकामध्ये गेला असून बऱ्याचशा भागाचे नागरीकरण झाले आहे.

तरी सुद्धा इतर जिपंनी ठाणे जिपचे अनुकरण करावे याकरीता सबळ कारणे आहेत.

**कलम १५७(इ) बाबत राविआच्या शिफारशी:**

राविआ अगदी ठामपणे शिफारस करते की कलम १५७(इ) अंतर्गतच्या संधीचा उपयोग करुन घ्यायलाच पाहिजे आणि ग्राविविने, सर्व जिपना त्यांच्या उत्पन्नाच्या स्त्रोतात वाढ करण्यासाठी अशा प्रकारचा कर आकारण्याबाबत परिपत्रक काढण्यासाठी पावले उचलावीत.

**(फ.) व्यवसाय कर आणि वाहन कराच्या बदल्यात अत्यल्प सहायक अनुदान:**

मागील चाळीस वर्षापेक्षा अधिक कालावधीपासून हे नुकसान भरपाई अनुदान देण्यात येत आहे. त्यावेळी ती रक्कम खूप जास्त असेल पण आता ती रक्कम अगदी तुटपुंजी म्हणजे १५ जिल्ह्यांना रुपये २५ लाख आणि १४ जिल्ह्यांना रुपये ५ लाख अशी आहे. वास्तवात आम्ही हे सहायक अनुदान बंद करण्याची शिफारस केली आहे कारण यातून मिळणाऱ्या लाभापेक्षा लिपिकीय/प्रशासकीय कामावरील खर्चच अधिक होतो. (परिच्छेद ६.१४.२.१ पहा)

**ए. केंद्रिय वित्त आयोगाचे अनुदान २०१५-२० दरम्यान उपलब्ध करून देण्यात आले नाही:**

जिप आणि पंसला १३ व्या केंद्रिय वित्त आयोगाचे अनुक्रमे १०% आणि २०% अनुदान देण्यात आले होते. ते काही मुक्त उत्पन्न नव्हते, ते उत्पन्न संग्राम प्रकल्प (गावांचे संगणकीकरण) आणि इतर उपक्रमाच्या विनिमयाकरीता वापरण्याचे विशिष्ट निर्देश देण्यात आले होते. तथापि १४ व्या केंद्रिय वित्त आयोगाने (सन २०१५-२०) पंचायत राज संस्थेचे सर्व अनुदान केवळ ग्राम पंचायतींसाठीच दिले होते.

थोडक्यात काय तर जिपच्या उत्पन्नाची बाजू कुंठित होते आहे कारण उत्पन्नाचे सर्वच स्त्रोत काही वर्षापासून रोडावत चालले आहेत किंवा नाहीसे होत आहेत.

**(ह.) जिप आणि पंस यांना काय मिळते आहे आणि विशिष्ट रक्कमच का मिळते आहे हे समजून घेण्यास वाव नसणे.**

सर्वसाधारणपणे लाभार्थींना (जिल्हा परिषद आणि पंचायत समिती) परिगणना (आकडेमोड) प्रक्रियेत प्रवेश नसतो, त्यामुळे उत्पन्न कुंठित होण्याचे आव्हान अधिकच तीव्र होते. साध्या भाषेत सांगायचे तर ज्या पद्धतीने प्रक्रिया आणि मार्गदर्शक तत्वांची रचना करण्यात आली आहे, जिपंना जे काही मिळते ते का मिळते आणि त्यामागचा हिशेब (आकडेमोड) काय आहे याबद्दल काहीही कल्पना नसते. तसेच जिप आणि पस कायद्यानुसार आणि शासनाच्या आदेशानुसार त्यांना जितका निधी मिळायला हवा होता त्यापेक्षा कमी मिळाला आहे का, हे कसे माहिती करुन घ्यायचे याबद्दलची सुद्धा त्यांना कल्पना नाही. इतकेच नाही तर त्यांना मिळाणाऱ्या रकमा देखील वेळेवर मिळत नाहीत. दुर्दैवाने पंचायत राज संस्थांच्या तक्रारी सोडविण्याकरीता पुरेशी तक्रार निवारण यंत्रणाही नाही.

### ६.१७ जिल्हा परिषद स्वत:चा निधी- खर्चाची बाजू:

आता आपण जिल्हा परिषदेच्या स्वत:च्या उत्पन्नाच्या खर्चाची बाजू पाहूया.

खालीलप्रमाणे खर्चाच्या बाजूचे ढोबळ विश्लेषण करता येईल:

**आलेख २२: जिप खर्च  घटक**




- महिला आणि बालक कल्याण (१०%)
- अनुसूचित जाती/जमाती/ विमुक्त भटक्या जमाती (२०%)
- शारीरिकदृष्ट्या अपंगाचे (दिव्यागं) कल्याण (५%)
- पाणी पुरवठा योजना देखभाल (२०%)

### ६.१८महिला, बालक, कमकुवत क्षेत्रातील आणि दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणाकरीताचा अनिवार्य खर्च:

सैध्दांतिक दृष्ट्या जिप संस्था त्यांच्या स्वत:च्या उत्पन्न स्त्रोतातून आलेला निधी खर्च करण्याचे निश्चित करु शकते, प्रत्यक्ष, असा खर्च कलम २६१ च्या अंतर्गत मिळालेल्या अधिकारान्वये शासनाच्या निर्देशानुसार करावयाचा असतो, स्वत:च्या उत्पन्नातील जवळ जवळ ३५% निधी या तीन क्षेत्रांसाठी खर्च करणे आवश्यक आहे. तपशील खालीलप्रमाणे आहे:

तक्ता २८: जिल्हा परिषदेचे अनिवार्य खर्च (क्षेत्रनिहाय)

| अनु.क्र. | खर्च करणे आवश्यक आहे ते क्षेत्र | जिपच्या एकूण उत्पन्नाच्या किती टक्के खर्च करावयाचा ती टक्केवारी |
|---|---|---|
| १ | महिला आणि बालक कल्याण | १०% |
| २ | मागासवर्गीयांचे म्हणजे अनुसुचित जाती/जमाती आणि अधिसूचित जमाती आणि भटक्या जमातींचे कल्याण | २०% |
| ३ | अपंग/दिव्यांगाचे कल्याण | ५% |
| ४ | पाणी पुरवठा योजना आणि पिण्याच्या पाण्याची देखभाल (ग्राविवि अधिसूचना क्र.ग्रापापु १०८५/प्र.क्र.-७८०८-३९ दिनांक १७ नोव्हेंबर १९८६) | २०% |
| | वरील चार क्षेत्रांची बेरीज | ५५% |

तक्ता २९ : जिल्हा परिषद अनिवार्य खर्च तीन वर्षाची सरासरी ( २०१५-१८)

( रुपये लाखात)

| जिल्हा | सरासरी अनिवार्य खर्च | टक्केवारी | सरासरी अनिवार्य खर्च |
|---|---|---|---|
| पालघर | ६३४ | २४.३५ | २,६०६ |
| रायगड | ५,८२४ | ९१.३१ | ६,३७८ |
| रत्नागिरी | ७३९ | ४१.०६ | १,८०१ |
| सिंधुदूर्ग | ४६१ | २५.३४ | १,८१७ |
| ठाणे | ८२४ | १४.३६ | ५,७३९ |
| अहमदनगर | १,२८२ | १९.६२४ | ६,५३४ |
| धुळे | १७३ | २५.२३ | ६८७ |
| जळगाव | ७५२ | ४६.९४ | १,६०१ |
| नंदुरबार | २५० | १४.९१ | १,६७६ |
| नाशिक | १.४२९ | २९.६४ | ४,८२२ |
| कोल्हापूर | ९५४ | २६.९७ | ३,५३७ |
| पुणे | ५,०२३ | ३३.४७ | १५,००८ |
| सांगली | ३८५ | ११.६९ | ३,२९२ |
| सातारा | ७७० | ८.३९ | ९,१८३ |

| | | | |
|---|---|---|---|
| सोलापूर | ६८१ | २०.५५ | ३,३१५ |
| औरंगाबाद | २९० | ५०.३९ | ५७६ |
| बीड | ५०३ | ४४.४७ | १,१३२ |
| हिंगोली | १८९ | २२.१४ | ४५५ |
| जालना | ५१८ | १६.४९ | ३,१४३ |
| लातूर | १८० | २४.०० | ७४८ |
| नांदेड | ३३७ | ३०.६३ | १,०९९ |
| उस्मनाबाद | २५४ | २९.२८ | ८६६ |
| परभणी | ५२७ | १२.८९ | ४,०८६ |
| आकोला | १,२१५ | ५६.४५ | २,१५३ |
| आमरावती | २६३ | १७.८५ | १,४७३ |
| बुलढाणा | ४०९ | ७२.०२ | ५६८ |
| वाशिम | १७८ | ७.०४ | २,५३१ |
| यवतमाळ | ८४७ | ६२.६१ | १,३५२ |
| भंडारा | १८७ | २१.०२ | ८९१ |
| चंद्रपूर | ४०३ | ९.१८ | ४,३९३ |
| गडचिरोली | ३२ | १.६९ | १,८९६ |
| गोंदिया | १५३ | ८.६४ | १,७७४ |
| नागपूर | १,०४० | २१.५६ | ४,८२४ |
| वर्धा | ४९४ | २९.१९ | १,६९३ |
| एकूण सरासरी | ८२९ | २८.५७ | ३,०६० |

**६.१८.१ अनिवार्य खर्चावरील टिप्पणी:**

'अनिवार्य' क्षेत्रांच्या बाबतीत जिप आवश्यक टक्केवारी खर्च करीत नसल्याचे दिसून येत असले तरी, वास्तवात ते  फसवे आहे, कारण त्यामध्ये मागील वर्षाचा खर्चाचा अनुशेष देखील असतो. ही समस्या उद्भवते कारण वार्षिक लेख्यामध्ये अतिरिक्त माहिती व्यवस्थित उघड केलेली नसते. वित्त, लेखा आणि संबंधित समस्या या प्रकरणामध्ये ही बाब मांडली आहे.

६.१९ **जिपच्या प्रमुख आस्थापनावरील खर्च**- अधिकारेतर, प्रमुख अधिकाऱ्यांची वाहने, बैठका इत्यादींचा खर्च

तक्ता ३० : जिल्हा परिषदेचा तीन वर्षाचा सरासरी वार्षिक खर्च (२०१५-१६,२०१६-१७ आणि २०१७-१८)

(रुपये लाखात)

| अनु.क्र. | अधिकारेतर जिप | औरंगाबाद जिप | उस्मनाबाद जिप | रत्नागिरी जिप | यवतमाळ जिप | जालना जिप |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जिप अधिकारेतरांचे मानधन | ३० | १० | २९ | ८ | २७ |
| २ | जिप अधिकारेतरांचा कार्यालयीन खर्च | १ | ५ | ९ | ७ | ६ |
| ३ | जिप अधिकारेतरांचा दुरध्वनी खर्च | ० | ५ | ३ | १ | १ |
| ४ | वाहन दुरूस्ती व देखभाल आणि इंधन खर्च | २० | २४ | ३३ | ५३ | १५ |
| ५ | जिप सर्वसाधारण सभा आणि विषय समिती बैठक खर्च | ६ | ४ | ११ | ३ | २६ |
| ६ | कार्यालयीन खर्च (आकस्मिक) | १६ | १६ | ८ | १४ | १० |
| ७ | जिप अधिकारेतरांचे विद्युत देयक | ० | ५ | २ | ० | ० |
| | एकूण | ७३ | ६९ | ९५ | ८६ | ८५ |

## ६.२० जिप पिण्याचे पाणी योजना कार्यान्वित रहाण्यासाठी तसेच हापसणी आणि उर्जा पंपाची देखभाल यांच्या खर्चातील तूट किंवा तफावत भरुन काढण्याकरीताचा खर्च

### ६.२.१ जिप- नळ पाणी योजना*:

पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे ही ग्रामपंचायतीची जबाबदारी असते. तथापि, पर्यवेक्षकीय मंडळ या नात्याने जिप काही क्षेत्रीय नळ पाणी योजनांची हाताळणी करते. त्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने उभारल्या आहेत आणि नंतर वापरण्याकरीता जिपला हस्तांतरित केल्या आहेत.

तक्ता ३१ : क्षेत्रीय पाणी पुरवठा योजनांची संख्या आणि क्षेत्रीय पाणी पुरवठा योजनेत सामाविष्ट ग्राम पंचायती:

| २०१७-२०१८ या वर्षांसाठी | | |
|---|---|---|
| जिल्हा | क्षेत्रीय पाणी पुरवठा योजनांची संख्या | क्षेत्रीय पाणी पुरवठा योजनेत सामाविष्ट ग्राम पंचायतींची संख्या |
| पालघर | ०६ | ६१ |
| रायगड | १३ | ०० |

| | | |
|---|---|---|
| रत्नागिरी | ०८ | ६४ |
| ठाणे | १३ | १४३ |
| अहमदनगर | ०४ | १२४ |
| जळगाव | १२ | १३२ |
| नाशिक | ०३ | ८७ |
| पूणे | ०८ | ८४ |
| सांगली | ३७ | २९९ |
| सातारा | ११ | १३० |
| सोलापूर | १९ | १६१ |
| औरंगाबाद | १६ | ८९ |
| बीड | ०४ | ६४ |
| हिंगोली | ०३ | ७१ |
| लातूर | १४ | १४ |
| उस्मनाबाद | ०१ | ०३ |
| परभणी | ०१ | १६ |
| आकोला | ०६ | १६६ |
| आमरावती | ०१ | ७० |
| बुलढाणा | ११ | १२४ |
| यवतमाळ | ०३ | ०४ |
| भंडारा | ०३ | २३ |
| चंद्रपूर | ३५ | २५८ |
| गडचिरोली | ०४ | २० |
| गोंदिया | ०४ | ८३ |
| नागपूर | ०२ | ०६ |
| वर्धा | ०७ | ३३ |
| **एकूण बेरीज** | **२४९** | **२३२९** |

* योग्य माहिति उपलब्ध करुन दिलेली नसल्याने ग्राम पंचायत- नळ पाणी योजनांच्या आकडेवारीचे पुष्टीकरण आवश्यक आहे.

वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की २८००० ग्रामपंचायतीपैकी २३२९ ग्राम पंचायतीमधील नळ पाणी योजनांची जिप मार्फत देखभाल करण्यात येते. हे प्रमाण एकूण ग्राम पंचायतीच्या सुमारे ८% इतके आहे.

नपायो मध्ये जिप उर्जापंपाचा (वीज बील), प्रचलन कर्मचारी, प्रासंगिक नळ आणि मोटार दुरुस्ती तसेच मुलभूत पाणी प्रक्रिया या खर्चांचा समावेश असतो. तथापि, जिप जेवढी रक्कम खर्च करते तेवढी सर्व ग्राम पंचायती अथवा लाभार्थ्यांकडून वसूल करण्याच्या स्थितीमध्ये नसते. याचे एक कारण म्हणजे ज्या ग्राम पंचायतीकडे जवळपास स्वत:चे पाणी स्रोत उपलब्ध नसतो त्यांच्याकरीता जिप नपायो प्रचलित करते. त्यामुळे ते दूरचे पाणी स्रोत वापरतात. यामुळे वीजेचे बील वाढते. नपायोच्या वसुलीमधील तूट जिप च्या सर्वसाधारण निधिमधून भागविण्यात येते. दुसऱ्या शब्दात जिप कार्यरत रहाण्यासाठी अनुदान देते. याबाबतीत या प्रकरणाच्या नंतरच्या भागात आम्ही काही सूचना केलेल्या आहेत.

### ६.२०.२ हापसणी आण उर्जा पंप

हापसणी आणि उर्जा पंप हे पिण्याच्या पाण्याचे दुसरे स्रोत आहेत. सर्वसाधारणपणे त्यांना इतके महत्व देण्यात येत नाही कारण ते जुन्या पध्दतीचे आहेत. परंतु उन्हाळ्यामध्ये पाण्याच्या स्रोतातील पाणी संपल्यावर नपायोचा उपयोग होत नाही तेव्हा हे हापसणी आणि उर्जा पंपच लोकांच्या मदतीला येतात. हापसणी आणि उर्जा पंपाचे बरेचसे स्रोत अगदी चांगल्या स्थितीत असून खरोखरीच उत्तम पर्यायी व्यवस्था आहेत. बहुदा हे छोट्या वस्त्यांच्या जवळ असतात. सुरुवातीच्या दशकांमध्ये त्यांनी खूप मोठी भूमिका निभावली आहे परंतु आता नपायोमुळे त्यांचा वापर कमी होत आहे.

जिप - जिल्ह्यातील हापसणी आणि उर्जा पंप:

तक्ता : ३२ : हातपंप आणि उर्जा पंप यांच्या वापराचा खर्च आणि कर संकलन :

| एकूण तीन वर्षाची सरासरी ( २०१५-२०१६, २०१६-२०१७, आणि २०१७-२०१८ ) ( लाखात ) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| जिल्हा | हातपंपाची संख्या | उर्जा पंपाची संख्या | हात पंप आणि उर्जा पंपाचा एकूण खर्च | ग्रामपंचायतीने संकलित केलेला कर | तूट |
| पालघर | ४,४५८ | ८ | ५७.४२ | ३०.०१ | -२७.४१ |
| रायगड | २,९०६ | ७६ | ९२.१७ | ३२.९५ | -५९.२२ |
| रत्नागिरी | ३,०२८ | ३१० | १०.८४ | ३.९५ | -६.९० |
| सिंधुदूर्ग | २,९४८ | २९५ | २४.१६ | २.०२ | -२२.१४ |
| ठाणे | २,५३७ | ४८ | ४२.९२ | २६.४७ | -१६.४४ |
| अहमदनगर | ८,८९६ | ० | ४३.८८ | ६८.४२ | २४.५४ |
| धुळे | २,६३७ | ० | १२४.५२ | ५.५५ | -११८.९६ |
| जळगाव | ४,३८१ | ० | २४३.९५ | ३६.३५ | -२०७.६० |
| नंदुरबार | ४०३ | ४०३ | ५७९.९५ | १६.९६ | -५६२.९९ |
| नाशिक | ६,२१८ | ० | २८९.७० | ६४.१४ | -२२५.५६ |
| कोल्हापूर | ४,१८६ | ६५४ | १०५.०० | ५२.४७ | -५२.५२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पूणे | १४,०२५ | ० | ४००.४४ | १३०.८४ | २६९.६० |
| सांगली | ४,१८७ | १३१ | १६०.७० | ९९.१६ | -६१.५४ |
| सातारा | ७,४८८ | ४९४ | ४०२.८९ | १०१.६० | -३०१.२९ |
| सोलापूर | ९,१३५ | ० | ३२३.६१ | १०२.०२ | -२२१.५९ |
| औरंगाबाद | १२० | २७ | ०.०० | २७.२८ | २७.२८ |
| बीड | ८,७७७ | ० | ३३०.३९ | १४७.४२ | -१८२.९८ |
| हिंगोली | ५,०८३ | १६४ | ९२.२५ | ३९.९० | -५२.३५ |
| जालना | ५,८४२ | २१० | ३३९.४८ | ५५.५९ | -२८३.८८ |
| लातूर | ० | १,८७२ | २९९.२१ | १००.८१ | -१९८.४१ |
| नांदेड | ० | ० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| उस्मनाबाद | ४,३२९ | ० | २०५.६८ | ४३.७२ | -१६१.९६ |
| परभणी | ६,५९९ | २०७ | १५६.७५ | २६.२९ | -१३०.४६ |
| आकोला | ४,५३० | १७९ | ८९.८३ | २८.५१ | -६१.३२ |
| आमरावती | ४,८६० | १८३ | २५९.०६ | १२६.३८ | -१३२.६८ |
| बुलढाणा | ५,९२८ | ० | २७३.७४ | ८९.७३ | -१८४.०१ |
| वाशिम | ३,१५६ | ६९ | ७.९६ | ०.०० | -७.९६ |
| यवतमाळ | ८,५०९ | २९२ | १३२.२१ | ४३.३३ | -८८.८७ |
| भंडारा | ५,९०५ | ० | ११८.८८ | ६८.८२ | ५०.०६ |
| चंद्रपूर | ७,६५७ | ४६ | १८२.२५ | १८१.७० | -१००.५५ |
| गडचिरोली | ९,५३३ | ० | २४५.२९ | १६१.६८ | -८३.६१ |
| गोंदिया | ७,८१२ | ५३ | १३४.८४ | ११४.७७ | -२०.०८ |
| नागपूर | ७,८६२ | ० | ६६३.३९ | ७०.७३ | -५९२.६७ |
| वर्धा | ४,४६२ | ८४ | १५२.२१ | १११.४५ | -४०.७७ |
| **एकूण बेरीज** | **१,७८,३९७** | **५,८०५** | **६,६८५.५६** | **२,२११.०२** | **-४,४७४.५५** |

येथे पुन्हा एकदा असे दिसून आले आहे की, जिल्हा परिषदा किंवा त्यांच्या संलग्नित संस्था म्हणजेच पंचायत समित्या हापसणी आणि उर्जा पंपाचे शुल्क वसूल करु शकत नाहीत आणि तुटीची भरपाई सर्वसाधारण निधितून करावी लागते. वरील आकडेवारीवरुन असे दिसून येते की, सर्व जिप मिळून सर्वसाधारण निधितील जवळपास ४४ कोटी रुपये इतकी रक्कम या उद्देशाकरीता खर्च करतात. जिपचे एकूण उत्पन्न ७१२ कोटी रुपये इतके (सर्वोच्च मुद्रांक शुल्क उत्पन्नाच्या तीन जिल्हा परिषदा व्यतिरिक्त) आहे, याचा विचार करता हे **अंतर्गत अनुदान जिपच्या एकूण उत्पन्नाच्या ४% (४४/७१२) इतके होते.**

**६.२१ जिल्हा परिषद संस्थेने निश्चित केलेल्या उपक्रम किंवा योजनावरील खर्च:**

अनिवार्य उपक्रम, स्वत:च्या आस्थापना आणि पिण्याचे पाणी पुरवठ्यावरील (नपयो किंवा हापसणी) वरील अंतर्गत अनुदान यावर खर्च केल्यानंतर आज जिल्हापरिषदेकडे अगदी मोजका निधी शिल्लक राहतो, त्यांचे एकूण सरासरी उत्पन्न अवघे रुपये २०.९४ कोटी इतके आहे (परिच्छेद ६.१६.२ पहा). हा निधी त्यांच्या निवडीच्या विविध उपक्रमांवर खर्च करण्यात येतो. बऱ्याचदा हा निधी दुरुस्ती खर्च जसे की रस्ता दुरुस्ती (राज्य शासनाच्या निधी व्यतिरिक्त) आणि इमारती दुरुस्तीसाठी सुद्धा खर्च करण्यात येतो. आपण जर महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांची सरासरी संख्या पाहिली तर ती जवळपास २० लाख इतकी असून वरील आकडेवारी पाहता रुपये ५ कोटी उपलब्ध असतात, असे पाहता दरवर्षी दरडोई रुपये २५ उपलब्ध होतात.

पूणे, रायगड आणि ठाणे हे तीन सर्वोच्च उत्पन्न असलेले जिल्हे असून त्यांच्याकडे मोठया प्रमाणात रक्कम उपलब्ध आहे आणि वरील टिप्पणीस ते अपवाद आहेत.

**६.२२ जिल्हा परिषदेच्या स्वत:च्या उत्पन्नाच्या एकंदर उत्पन्नाचा आणि खर्चाचा नमुना/पद्धती:**

**६.२२.१ कुंठीत होणारे नियुक्त कराचे उत्पन्न:**

जसे की या आधीच्या परिच्छेदांमध्ये विस्तृतपणे स्पष्ट करण्यात आले आहे, जिल्हा परिषदांचे त्यांच्या मुख्य स्त्रोतापासूनचे म्हणजेच नियुक्त करातून होणारे उत्पन्न कुंठीत होत आहे. याचे कारण म्हणजे यातील सर्व नियुक्त कर एक मुद्रांक शुल्क सोडल्यास अशा वस्तूंवरील उपकर आहेत ज्यामधून महाराष्ट्रातील बदललेल्या सामाजिक आर्थिक परिस्थितीमध्ये त्यांच्या महसुलात वाढ होत नाही. भविष्यामध्ये देखील त्यांचा वाटा कमी होत जाण्याचीच शक्यता आहे.

**६.२२.२ आकसत चाललेल्य संस्था शुल्कापासून होणारे उत्पन्न:**करेतर उत्पन्नाच्या बाजूमध्ये जिप आणि पंस कायद्याच्या कलम १२३ अंतर्गत जिल्हा परिषदेला 'अभिकरण शुल्क' म्हणून भरीव रकमेची प्राप्ती होत असे. संस्था योजनांच्या संकल्पनेची पार्श्वभूमी आणि इतिहास रंजक आहे. जिप आणि पंस कायद्याच्या कलम १०० अंतर्गत अनुसूची I मध्ये हस्तांतरित केलेल्या योजनांची यादी असते, त्यांस जिल्हा यादी म्हणतात. जिप यंत्रणा कार्यरत झाल्यानंतर शासनाने अनेक नवीन योजनांची अंमलबजावणी करण्याकरीता जिप यंत्रणा उपयोगात आणली, अनुसूची I मध्ये दिलेल्या यादीच्या व्यतिरिक्त. राज्य शासनाने अशा संस्था योजना राबविण्याकरीता कायद्याच्या कलम २६१ अंतर्गत जिप यंत्रणा अधिगृहीत केल्या होत्या. कदाचित त्यावेळी जिल्हा परिषदेचे अधिकारी आणि अधिकारेतरांच्या सातत्याने होणाऱ्या

मागणीमुळेच ग्राम विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. झेडपीए/१०९०/प्र.क./१६५२/२४, दिनांक २९ मे १९८९ अन्वये अतिरिक्त योजनांची अंमलबजावणी जिप यंत्रणेच्या सेवा अधिगृहीत करणाऱ्या सर्व विभागांना निर्देशित केले की त्यांनी जिल्हा परिषदेला ३% अभिकरण शुल्क द्यावे.

यानंतर, पहिल्या राज्य वित्त आयोगाने परिच्छेद १३.१३ मध्ये शिफारस केली की अभिकरण शुल्क ३% वरून १०% इतके वाढविण्यात यावे. तथापि शासनाने (शासन निर्णय क्रमांक एमझेडपी/१०९९/प्र.क्र./३४५८ दिनांक २९ मे, १९९९) निर्णय घेतला की दि. १.४.१९९९ पासून अभिकरण शुल्क ३% वरुन ५% इतके वाढवावे. परंतु त्याच शासन निर्णयामध्ये शासनाने स्पष्ट केले की कलम १२३ अंतर्गत जिपला हस्तांतरित केलेल्या योजनाकरीताच अभिकरण शुल्क ५% इतके असेल तसेच जिप आणि पंस कायद्याच्या कलम २६१ अंतर्गत शासनाने जिपने योजनांची थेट अंमलबजावणी करण्याचे निर्देशित केले असल्यास त्यां योजनांकरीता नाही. **अशा प्रकारे शासनाने या आधीच्या १९८९ च्या शासन निर्णयातील भूमिकेच्या विरुध्द भूमिका घेतली.**

कलम १२३ च्या अंतर्गतचे संस्था योजनेचे उत्तम उदाहरण म्हणजे बायोगॅस योजना होय, ही योजना कृषी विभागाने अगदी शेवटच्या खेड्यापर्यंत पोहचविण्यासाठी जिप वर सोपिवली होती, ज्यामुळे याकरीता जिपला ५% शुल्क प्राप्त होत होते. सन २००० पर्यंत बायोगॅसचे उद्दीष्ट फार मोठे होते आणि केंद्र शासनाकडून बायोगॅस प्रकल्पाकरीता मोठ्या प्रमाणात निधी देण्यात येत होता. या योजनेच्या अंमलबजावणीने जिपच्या शेती विभागाला “अभिकरण शुल्क” म्हणून मोठ्या प्रमाणात रक्कम मिळत होती, या रकमेतून शेतीच्या कामाकरीता वाहन खरेदी आणि इतर कार्यालयीन खर्च भागविण्यात येत होते. एखादा असे म्हणू शकतो की ते ५% अभिकरण शुल्क हे महाराष्ट्रामध्ये बायोगॅस उपक्रम उत्तम चालण्याकरीता प्रोत्साहानात्मक घटक ठरले.

अलिकडील वर्षामध्ये, अशा बायोगॅस सारख्या संस्था योजनांची संख्या रोडावली आहे. याशिवाय सुरुवातीला काही विकास योजनांच्या अंमलबजावणीतून मिळणारी ५% अभिकरण शुल्क रक्कम देखील विविध कार्यकारी अधिकारी आदेशान्वये त्या योजनां कायद्याच्या कलम २६१ च्या चौकटीत बसवून बंद करण्यात आली. एकात्मिक बालक विकास योजना आणि आमदार स्थानिक विकास निधी योजना ही याबाबतची दोन चांगली उदाहरणे आहेत. थोडक्यात काय तर विविध विभागाने कलम २६१ चा उपयोग करुन दिलेल्या कार्यकारी आदेशानुसार, जिपला मिळणारे ५% संस्था शुल्काचे उत्पन्न (कमिशन) देखील जवळ जवळ नाहीसे झाले आणि जे आहे ते अगदी अत्यल्प आहे. अजाणतेपणे जिपचा उत्पन्नाचा चांगला स्रोत देखील कसा कमी होत आहे, याचे हे उत्तम उदाहरण आहे.

संस्था शुल्का संदर्भातील आणखी एक निरिक्षण म्हणजे जिप आणि पंस कायद्याच्या कलम १२३ तसेच कलम २६१ बाबत राज्य आणि जिप पातळीवर जागरुकता कमी कमी होत आहे. जिपला शासनाचे परंपरागत विस्तारीत रुप मानले आहे आणि त्यांनी त्यांच्यावर पडणाऱ्या अतिरिक्त प्रशासकीय तसेच आर्थिक ताणाचा विचार न करता सर्व शासकीय योजनांची अंमलबजावणी केलीच पाहिजे अशी अपेक्षा केली जाते.

### ६.२२.३ केंद्रिय वित्त आयोगाच्या अनुदान निधित जिप आणि पंस ला हिस्सा नाही:

या अनेक वर्षामध्ये केंद्रिय वित्त आयोग स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये आपले योगदान वाढवित आहेत. तथापि १४ व्या केंद्रिय वित्त आयोगाने (सन २०१५-२०) ने पाच वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्राला जवळपास रुपये १५,००० कोटी इतके अनुदान दिले तथापि ते सर्वच्या सर्व केवळ ग्रामपंचायतीसाठीच चिन्हांकीत केले, त्यामध्ये पंचायत राज संस्थांच्या दोन उच्च श्रेणी म्हणजेच जिप आणि पंसला काहीही वाटप करण्यात आले नाही. १३ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या कालावधीमध्ये पंचायत राज संस्थांच्या तीनही पातळीवरील संस्थांना एकूण रुपये ५५८९ कोटी इतके अनुदान प्राप्त झाले होते. यापैकी जिपंना १०% म्हणजेच ५५८ कोटी रुपये, पंचायत समितींना २०% म्हणजेच १११६ कोटी रुपये प्राप्त झाले होते.परंतु त्यांना १४ व्या वित्त आयोगाकडून काहीही प्राप्त झाले नाही.

### ६.२२.४ स्वतःचे उत्पन्न निर्माण करण्याच्या मर्यादित संधी:

जिप आणि पंस जनतेला थेट सेवा पुरवत नाहीत, त्यामुळेच ते ग्राम पंचायत आणि नगर पालिकांप्रमाणे विविध प्रकारच्या करांची वसुली करु शकत नाहीत. वास्तवात, भारताच्या इतर राज्यामध्ये देखील जिप आर्थिक दृष्ट्या पूर्णत: राज्य शासनाच्या सहाय्यावर अवलंबून असतात. थोडक्यात काय तर जिपंना स्वत:चे उत्पन्न निर्माण करण्याची स्वायत्तता आणि स्त्रोत मर्यादित असतात.

### ६.२२.५ जिपचे वाढते अपरिहार्य खर्च:

त्याच वेळी, खर्चाची बाजू वाढतच चालली आहे. त्यातील काही अनिवार्य खर्च आहेत; जसे की त्यांना स्वत:च्या बिगर शासकीय आस्थापनांची देखभाल करावयाची असते. यामध्ये निर्वाचित बिगर शासकीय पदाधिकाऱ्यांना पुरविण्याच्या मुलभूत सोयीसुविधांचा खर्च जसे की आवास, वाहन, प्रवास भत्ता, मानधन इत्यादी. इतरही काही खर्च असतात जसे की जिप सल्लागारांना बैठकांना हजर राहण्याकरीता मानधन, विविध समित्यांवर आणि सर्वसाधारण मंडळावर होणारा खर्च. याशिवाय मुख्य कार्यकारी अधिकारी, सहाय्यक मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी (सीएएफओ) आणि उप मुख्य

कार्यकारी अधिकारी यांच्या वाहनांचा तसेच पेट्रोल, तेल आणि वंगण यांचा खर्च देखील जिपच्या निधितूनच केला जातो.

आणखी शासनाच्या आदेशानुसार जिपच्या स्वत:च्या उत्पन्नातील ३५% रक्कम समाजतील दुर्बल घटक जसे की महिला आणि बालक तसेच अपंग व्यक्ती यांच्यावर खर्च करणे अनिवार्य आहे. यातील बराचसा निधी वैयक्तिक लाभ उपक्रम जसे की शिवण यंत्र, शेतीची अवजारे, पत्रे अशा प्रकारच्या वस्तू पुरविण्याकरीता खर्च होतो.

याउपर जिप नपायो किंवा हापसणी पिण्याच्या पाण्याच्या यंत्रणेच्या देखभालीकरीता २०% निधी खर्च होतो.

अशा प्रकारे जिपच्या स्वत:च्या उत्पन्नाच्या मर्यादित स्रोतातील जवळपास ५५% निधी अनिवार्य क्षेत्र आणि स्वत:च्या आस्थापनाकरीता खर्च करण्यात जातो. यामुळे जिप मंडळाला जिल्ह्यातील त्यांना वाटत असलेल्या अग्रकमाप्रमाणे खर्च करण्याकरीता फारच कमी पैसे शिल्लक राहतात. ठाणे, पूणे, रायगड आणि नागपूर यासारख्या काही जिल्ह्याकडे मुद्रांक शुल्क उपकरामुळे भरपूर प्रमाणात स्वत:चे उत्पन्न असते. या जिल्ह्यांमध्ये शहरातील अनेक श्रीमंत नागरीक शहराजवळपासच्या क्षेत्रात पुढे किंमती वाढतील अशा विचाराने शेत घराकरीता (फ़ार्म हाऊस) जमिनी घेतात आणि चांगला भाव आल्यावर भरपूर नफा घेऊन विकायचे ठरवितात. यामुळेच जमिनीच्या किंमती चढ्या भावात असतात आणि तेथे खूप व्यवहार देखील होतात. परंतु उर्वरीत ३०जिल्ह्यांच्या बाबतीत असे काही होत नाही.

### ६.२२.६ जिपला कमीत कमी स्वत:च्या उत्पन्नाचे काही स्रोत का आवश्यक असतात?

जर राज्य शासना सर्व विकास कामाकरीता आणि कल्याणकारी उपक्रमाकरीता निधी उपलब्ध करून देत असेल आणि जिप केवळ अंमलबजावणी करणाऱ्या आणि देखभाल करणाऱ्या संस्था असतील तर आता असा प्रश्न उपस्थित होतो की जिपला स्वत:च्या उत्पन्नाच्या स्रोतांची काय आवश्यकता आहे का?

या प्रश्नाचे उत्तर दोन पद्धतीने देता येईल. पहिले उत्तर म्हणजे संविधानातच तिसऱ्या पातळीची शासन व्यवस्था निर्माण केली आहे, तर ७३ व्या घटना दुरुस्तीच्या आशयाप्रमाणे त्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे सुद्धा आवश्यक आहे. हे शब्दश: आणि प्रत्यक्ष लोकशाहीचे विकेंद्रीकरण होय.

दुसरे उत्तर अधिक वास्तववादी आहे, जिपंना अगदी मर्यादित प्रमाणात का होईना पण त्यांनी जे करणे अपेक्षित आहे ते करण्याकरीता तरी निधी देण्यात यावा. राविआ वरीलपैकी दुसऱ्या उत्तरातील विचारानुसार काम करते. वित्तीय स्वायत्तता आणि लोकाशाहीत्मक विकेंद्रीकरणाचा मोठा प्रश्न नाकारत

नाही पण आमच्या मते किती विकेंद्रीकरण करावयाचे आणि जबाबदाऱ्या सोपवायच्या ही मोठी धोरणात्मक समस्या आहे. शासनाने यापूर्वीच पंचायत राज्य संस्था यांच्या संरचनेचे नव्याने पुनरिक्षण करण्याकरीता ठाकरे समितीची नेमणूक केलेली आहे. सद्यस्थितीत मात्र आम्ही प्रचलित किंवा दिलेल्या परिस्थितीला अनुसरून काम करत आहोत.

जरी आम्ही वर दिलेल्यापैकी दुसरा दृष्टीकोन अवलंबिला, जिपला स्वत:करीता आणि त्यांच्या स्वत:च्या आस्थापनांच्या खर्चाकरीता आणि ९७% शासकीय निधिचे व्यवस्थित पर्यवेक्षण करण्याकरीता किमान विशिष्ट निधी असणे आवश्यक आहे. म्हणूनच ९७% निधिचा प्रभावीपणे वापर करण्याकरीता ३% 'स्वत:चा' निधी अत्यंत महत्वाचा आहे.

जिपच्या निर्वाचित मंडळाला त्यांच्या दैनंदिन देखभाल आणि पर्यवेक्षणाकरीता निधी आवश्यक आहे. अंमलबजावणीकरीता जिपंना भरपूर प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात येतो, तेव्हा जिपं उत्तम अंमलबजावणी संस्था असणे अपेक्षित आहे. निर्वाचित सदस्यांनी त्यांच्या खर्चाचे प्रभावी पर्यवेक्षण आणि देखरख करणे अपेक्षित आहे. त्यांनी त्यांच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रणालीचे व्यवस्थापन करणे तसेच ग्रामपंचायतींना पाणी पुरवठा हाताळण्याकरीता मदत करणे अपेक्षित आहे. अंतिमत: जिपंनी अनेक वर्षांमध्ये त्यांनी विकसित केलेल्या मालमत्ता आणि त्यांना हस्तांतरित करण्यात आलेल्या मालमत्तांची देखभाल करणे अपेक्षित असते. यामध्ये हजारो शाळेच्या इमारती, वैद्यकीय आणि पशु वैद्यकीय दवाखाने, छोट्या सिंचन टाक्या, ग्रामीण रस्ते इत्यादींचा समावेश होतो. जिल्हा परिषदांनी स्थानिक समस्या ताबोडतोब 'सोडविणे' तसेच स्थानिक गरजांप्रती प्रतिसादक्षम असणे अपेक्षित आहे. परंतु अगदी कमीतकमी काम करायचे असेल तरीसुद्धा जिपंना स्वत:चा प्रशासकीय निधी कमी पडतो.

याउपर, अधिकारेतर जनांना देखील जर स्थानिक प्रशासनमध्ये त्यांच्या इच्छेनुसार काम करण्याची तसेच जिल्ह्यातील त्यांना आवश्यक वाटणाऱ्या प्राधान्यवर खर्च करण्याची वित्तीय स्वायत्तता असेल तरच त्यांना उत्साह (प्रेरक) वाटेल.

**६.२२.७ व्याज उत्पन्न- जिपंकरीता 'उत्पन्नाचा' नवा स्त्रोत :**

वास्तवात जिपचे स्वत:चे उत्पन्न स्त्रोत कुंठीत होत असल्याने आणि आवश्यक खर्चात वाढ होत असल्याने आर्थिक दृष्ट्या जिपंची पिळवणूक होत आहे. अशा आर्थिक अडचणीच्या वेळी, जिल्हा परिषदा 'व्याज-उत्पन्न' वर अवलंबून आहेत, म्हणजे शासनने दिलेला निधी प्रत्यक्ष खर्च करण्यापूर्वीच्या कालावधीत त्यावर मिळालेले व्याज हे मोठ्या प्रमाणात उत्पन्नाचे स्त्रोत आहे. हे उत्पन्नाचे स्त्रोत एकदम अस्वीकाराहार्य आहे. परंतु परिच्छेद ६.१३ मध्ये निर्देष्टित केल्याप्रमाणे जिपच्या स्वत:च्या उत्पन्नामध्ये

याचा वाटा ३६% इतका होतो. सर्वाधिक उत्पन्न असलेले पुणे, ठाणे आणि रायगड हे तीन जिल्हे वगळून ३६% उत्पन्नाची गणना करण्यात आलेली आहे.

शासनने अलीकडे अनेक सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) योजना सुरु केल्या आहेत आणि 'तीर्थक्षेत्र  योजना' इत्यादीकरीता उदारिकृत परतावा योजना (एलआरएस) प्रणाली सुरु केली असल्याने व्याज उत्पन्न देखील धोक्यात आलेले आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर जर सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस प्रणाली) विस्तारीत करण्यात आली तर जिप व्याज उत्पन्नाला देखील मुकेल. तसेही जिप करीता व्याज उत्पन्न हा काही उत्पन्नाचा चांगला मार्ग नाही, कारण तांत्रिक दृष्ट्या हा शासनला झालेला तोटाच असतो.

### ६.२२.८ जिपचे स्वत:चे स्त्रोत वाढविण्याकरीता राविआच्या शिफारशी:

जिपच्या स्वत:चे उत्पन्न आणि खर्च यांचा पडताळा घेतला असता, राविआचा दृष्टीकोन आहे की जिपच्या स्वत:च्या उत्पन्नाचा स्त्रोत किमान रुपये ९ कोटीने वाढला पाहिजे. जिपंचे विद्यमान सरासरी उत्पन्न रुपये २१  कोटी इतके आहे. सदर आकडेवारी आधी स्पष्ट केल्यानुसार आम्ही मुद्रांक शुल्काने सर्वाधिक उत्पन्न असलेल्या पुणे, रायगड तसेच ठाणे या तीन जिपंचे उत्पन्न वगळून आहे.

परंतु जिपचे रुपये २१ कोटींचे स्वत:चे उत्पन्न, म्हणजेच जवळपास ३६% उत्पन्न हे व्याज उत्पन्नातून म्हणजेच 'अनधिकृत' स्त्रोतातून होते. आज जिपचे एकूण व्याज उत्पन्न २८० कोटी रुपये इतके आहे. म्हणजे सरासरी रुपये ८.२४ कोटी इतके व्याज उत्पन्न आहे.  दुसऱ्या प्रकारे मांडायचे तर जर जिपचे विद्यमान उत्पन्न किमान रुपये ९ कोटींनी वाढले तर पुढील काही वर्षाकरीता म्हणजेच किमान राविआच्या सन २०२०-२५ या अहवाल कालावधीत तरी ते सुरक्षित  परिस्थितीत राहतील.

याकरीताच आम्ही काही शिफारशी केल्या आहेत की जेणे करून उत्पन्न स्त्रोत अगदी व्यवस्थितपणे वृद्धींगत होतील आणि त्याच वेळी खर्चाच्या बाजूत कपात करता येईल किंवा त्याची योग्य व्यवस्था करता येईल. जसे  की आम्ही राविआच्या दृष्टीकोनाबाबतच्या प्रकरणामध्ये आधीच सांगितले की इतर राज्यांनी जसे पंचायत राज संस्थांना 'राविआ प्रकांति अनुदान' दिले आहे तसे देण्याची शिफारस केली राविआ ने केली नाही.

राविआने महाराष्ट्र शासनच्या पारंपारिक पद्धती सुरु ठेवून निधिचा विद्यमान प्रवाहात काही लहान सुधारणा करुन निधी मिळण्याच्या ढाच्यात अधिकाधिक उत्पन्न मिळविणे तसेच जिप आणि पंस यांना सक्षम करण्याचे मार्ग सुचविले आहेत.

## ६.२३ जिप उपकर उत्पन्न वाढविण्याकरीताच्या शिफारशी:

### ६.२३.१ **सर्व राज्य शासनच्या योजनांकरीता दोन टक्के व्यवथापन शुल्क प्रस्तुत (वर्तमान अभिकरण शुल्का ऐवजी करणे) आणि ५% अभिकरण शुल्काच्या संदर्भातील जुनी मार्गदर्शक तत्वे (शासन निर्णय झेडपीए/१०९०/प्र.क.१६५२/२४ दिनांक २९ मे १९८९) रद्द करणे (अभिकरण शुल्क).**

जसे की परिच्छेद ४.२ मध्ये विस्ताराने दिलेले आहे, सन १९८९ मध्ये पहिल्यांदा ५% अभिकरण योजना किंवा अभिकरण शुल्क प्रस्तुत करण्यात आले होते, जे आता कालबाह्य झाले आहे. सर्वप्रथम हे संपूर्णपणे बंद करणेच इष्ट होईल. अभिकरण योजनेऐवजी राविआ, व्यवस्थापन सहाय्यक योजना नामक एका नव्या सहाय्यक प्रणाली सुरु करण्याची शिफारस करत आहे, यातंर्गत जिप अंमलबजावणी करत असलेल्या सर्व योजनांकरीता जिपला २% व्यवस्थापन किंवा प्रशासकीय शुल्क प्राप्त होईल, भले त्या योजनां जिप आणि पंस कायद्याच्या कलम १०० किंवा कलम १२३ पैकी कशाच्याही अंतर्गत असोत. हे जिप आणि पंस मध्ये प्रत्येकी १% असे विभागले जाईल. आम्हाला असे वाटते की यामुळे स्वत:चे उत्पन्न कमी पडणाऱ्या जिप आणि पसकरीता हा एक कायमस्वरूपी उत्पन्नाचा आधार होईल. यामुळे जिप आणि पंसच्या अधिकारी बिगर-शासकीय/अधिकारेतर यांना त्यांच्या मार्फत करण्यात येणा-या नवनवीन योजनांची अंमलबजावणी करण्याकरीता प्रोत्साहन मिळेल. ठोबळमानाने हे २% व्यवस्थापन शुल्क योजनेच्या घटकासाठी लागु राहील आणि ते योजनेतर किंवा आस्थापनासाठी (वेतन घटक) लागु नसेल. मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी यांना ते सदर शुल्क अंमलबजावणी किंवा खर्च करतानाच्या वेळी स्वत:हून कापून घेण्याची परवानगी देण्यात यावी.

सदर २% सेवा शुल्क लागू केल्यास किती भार पडेल याबाबत आम्ही काही विश्लेषण केले आहे. ते खालीलप्रमाणे आहेत:

तक्ता ३३ : जिल्हा परिषदेकडून वर्ग केलेल्या एकूण योजनांची रक्कम :

(रु.कोटीत)

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | जिल्हा परिषदेकडून मार्फत गेलेल्या योजनांची एकूण रक्कम (जिनिविप सह)- सूचक आकडेवारी कोटी मध्ये (सन २०१५-१६,२०१६-१७,२०१७-१८) | २% प्रमाणे आकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | नांदेड | ३०५ | ६.१० कोटी |
| २ | रायगड | १०८ | २.१६ कोटी |
| ३ | जालना | १७३ | ३.४६ कोटी |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | नाशिक | ६४९ | १२.९९ कोटी |
| ५ | यवतमाळ | २४९ | ४.९८ कोटी |

वरील कल्पनेप्रमाणे परिकल्पित सहाय्य संयुक्तिक वाटते आणि जिल्ह्यात किती प्रमाणात योजनांची अंमलबजावणी केली जाते त्यानुसार प्रत्येक जिल्ह्याला दरवर्षी रु. २-६कोटी इतका निधी प्राप्त होईल. एकंदर आर्थिक भार रुपये १७० कोटी इतका (रुपये ३४ x ५=१७० कोटी) परंतु कलम १२३ अंतर्गत ५% अभिकरण शुल्क बंद करण्याचे सुचविल्याने रुपये १५.२८कोटीची बचत देखील होईल. अशाप्रकारे आपण म्हणू शकतो की नवीन बांधिलकी साधारण रुपये १५५ ते रुपये १६०कोटी इतकी असेल.

आम्ही शिफारस करतो की शासनने (ग्राविवि) याबाबतीत सर्वसमावेशक शासन निर्णय जारी करावा.

**६.२४ नियुक्त करा संबंधित शिफारशी:**

राविआने आधीच्या परिच्छेदामध्ये नियुक्त करासंबंधित शिफारशी दिलेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे आहेत:

अ. जिल्हा परिषदांना द्यावयाच्या मुंद्राक शुल्काचा मोठ्या प्रमाणातील अनुशेष भरून काढण्याच्या आणि निधी देण्याच्या प्रक्रियेमध्ये सुधारणा

ब. जमीन महसूल अनुदान गणनेची पद्धती नव्याने तयार करणे.

क. भौगोलिक दृष्ट्या विपरीत परिस्थितीमध्ये असलेल्या १% मुद्रांक शुल्क उपकराचे भौगोलिक रचनेमुळे आर्थिक लाभ न मिळाल्याने कमी उत्पन्न असणाऱ्या जिल्ह्यांना नुकसान भरपाई म्हणून सापेक्ष अनुदान देणे.

ड. सिंचन उपकर २०% वरून ४०% करणे.

**६.२५ जिप उप कर निधी खर्चावर नियंत्रण आणणे किंवा अधिक प्रभावीपणे व्यवस्थापित करण्याकरीता शिफारशी आणि सूचित केलेली धोरणे.**

**६.२५.१ जिल्हा परिषदांना रस्ते देखभाली करीता अधिक निधी देण्यात यावा.**

गावातील आणि इतर जिल्हा रस्ते बांधणे, देखभाल करणे आणि दुरुस्त करणे हे काम जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आले आहे. (जिप आणि पंस कायद्याच्या कलम १०० अंतर्गत अनुसूची एक चा मुद्दा

५० पाहा). पूर्वी मोठे जिल्हा रस्ते देखील जिल्हापरिषदेकडे होते परंतु ३१ जानेवारी २०१३ च्या सुधारणे अन्वये  ते या यादीतून काढून टाकले व राज्याकडे घेण्यात आले.

एकूण ३,३६,९९१किमी लांबीच्या रस्त्यापैकी, ग्राम विकास विभागाकडे इतर जिल्हे रस्ते (६१,१५८ किमी) आणि ग्रामीण रस्ते (१७५७३१ किमी) असे एकत्रित २,३६,८८९ किमीचे रस्ते आहेत. हे सर्व जिपच्या अखत्यातरीत आहेत.

जिप रस्त्यांकरीता राज्य अर्थसंकल्प (ग्राविवि मार्फत) आणि जिल्हा (जिल्हा नियोजन समिती) अर्थसंकल्प (नियोजन विभागातून) यामधून खालीलप्रमाणे रकमा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

तक्ता ३४: रस्ते देखभालीसाठी जिल्हा परिषदेस दिलेले अतिरिक्त अनुदान :

(रु.कोटीत)

| अनु.क्र. | शीर्ष | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | देखभाल आणि दुरुस्ती (अनियोजीत ३०५४) राज्य योजना | २२१ | २५५ | २६३ | रस्ता कामगारांच्या ( बिगारी) वेतनासाठी रु.१०० कोटी स्वतंत्रपणे पुरविण्यात आले आहेत. |
| २ | ग्रामीण भागातील रस्त्यांच्या बळकटीसाठी (५०५४) जिल्हा नियोजन आणि विकास निधी | १००४ | १०९८ | ७९० | हे ग्रामीण रस्ते व ईतर जिल्हा रस्त्यांसाठी |
| | एकूण | १२२५ | १३५३ | १०५३ | |

याशिवाय, महाराष्ट्र ग्राम रस्ते विकास संघटनाकडून खालीलप्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

तक्ता ३५:  मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आणि प्रधानमंत्री ग्रामसडक योजनांसाठी दिलेला निधी :

(रुपये कोटी मध्ये)

| अनु.क्र. | शीर्षक | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ |
|---|---|---|---|---|
| १ | मुख्यमंत्री ग्रामसुधार योजना | १०० | ८०४ | २४५९ |
| २ | प्रधानमंत्री ग्रामसुधार योजना | ८०२ | १२२६ | ४७८ |
| | **एकूण** | **९०२** | **२०२६** | **२९३७** |

येथे महाराष्ट्र ग्राम रस्ते विकास संघटनेच्या अभियंत्यांच्या समर्पित गटाने अंमलबजावणी केली आहे.

आमची निरीक्षणे खालीलप्रमाणे आहेत:

**(अ.)** रस्ते देखभाल आणि मजबूतीकरीता ३०५४ आणि ५०५४ अंतर्गत जिपंना उपलब्ध करून दिलेला निधी रस्त्यांच्या लांबीच्या तुलनेत तुटपुंजा आहे. अलीकडच्या काही वर्षांमध्ये १.८० लाख किलोमीटर लांबींच्या रस्त्याकरीता सरासरी वर्षाला रुपये ११७७ कोटी इतका निधी उपलबध करून देण्यात आला आहे. यानुसार दर किलोमीटर रस्त्याला रस्ते देखाभाल व विशेष दुरुस्ती निधी याकरीता केवळ रुपये ६५,००० निधी असतो, याचा देखभालीच्या गुणवत्तेवर परिणाम होतो.

**(ब.)** क्षेत्रात दुरुस्ती आणि देखभाली साठीची प्रचंड (न्यायिक) मागणी आणि मर्यादित उपलब्ध निधी यामुळे उपलब्ध निधी अगदी कमी प्रमाणात वाट्याला येतो. त्यामुळेच जिप रस्त्यांच्या बाबतीत आवश्यक गुणावत्त्ता राखणे शक्य होत नाही.

**(क.)** काही जिल्ह्यामध्ये असेही दिसून आले आहे की, निधी पुरवठा करण्याऱ्या संस्थेच्या विनंतीवरुन सार्वजनिक बांधकाम विभाग जरी रस्ते जिपचे असले तरी जिपच्या मंजूर ठरावान्वये अंमलबजावणी करते. (जसेकी आमदार व खासदार निधी आणि इतर योजना निधी)

**(ड.)** प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (२७००० किमी पेक्षा जास्त रस्ते पूर्ण केले आहेत) आणि मुख्यमंत्री ग्राम सडक योजना (आता पर्यंत ७००० किमी पेक्षा जास्त रस्ते पूर्ण केले आहेत.) जिप रस्त्याचे जिपेतर संस्थे मार्फत मोठ्या प्रमाणात काम पूर्ण झाले आहे.

**(इ.)** राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तुलनेत जिपच्या यंत्रणांना मुलत:च तांत्रिक मर्यादा आहेत.

**(ई.)** इमारतींच्या देखभालीकडे तसेच इतर छोट्या सिंचन प्रकल्पाकडे दुर्लक्ष करून जिपचा रस्त्याच्या कामासाठी प्रमाणाबाहेर उर्जा आणि वेळ खर्ची होत आहे.

**(ए.)** जिल्हा परिषदेच्या उपलब्ध अभियंत्याना जिप रस्त्यांच्या कामाकरीता विरळपणे उपयोगात आणण्यापेक्षा इमारत बांधकाम आणि देखभाल, छोटे सिंचन प्रकल्प यांच्याकरीता उपयोगात आणावे. निरिक्षणात असे आले आहे की पंचायत समिती पातळीवर ग्राम पंचायत भवन, अंगणवाडी, ग्रामीण घरे आणि अशाच काही बांधकामाकरीता अभियंत्याची तीव्र टंचाई आहे.

### ६.२५.२ राविआच्या शिफारशी:

जिप रस्त्याकरीता ३०५४ आणि ५०५४ अंतर्गत अधिक देखभाल निधी देण्याची शिफारस राविआमार्फत करण्यात येत आहे. वर निर्दिष्टित केल्यानुसार वर्तमान अनुदान अत्यंत कमी असल्यामुळे जिप रस्त्यांच्या देखभालीकरीता अत्यंत कमी खर्च करण्यात येतो.

### ६.२६ पाण्याच्या स्त्रोताच्या अंतराच्या आधारभूत धरुन जिल्हापरिषदेला येणाऱ्या अतिरिक्त वीज देयकांकरीता जिपला अनुदान (नुकसान भरपाई) देण्यात यावे:

जसे की परिच्छेद ३.३.१ मध्ये दर्शविल्यानुसार जिप- पाईप पाणी योजनेची संख्या निश्चितच मर्यादित आहे. जवळ जवळ या सर्वच क्षेत्रीय योजना आहेत. तथापि जेथे कुठे त्या कार्यरत आहेत, तेथे पाण्याचा स्त्रोत दूर अंतरावर आहे. यामुळेच एवढ्या लांबून पाणी आणण्याकरीता जिपंना वीज देयकावर खूप मोठी रक्कम खर्च करावी लागते. परिणामी वीज देयके खूप जास्त असतात आणि जिप सेवा देते त्या समाजाकडून देखभाल खर्च आकारु शकत नाही. जिपला सर्वसाधारण निधितून देयके देऊन समाजाला अनुदान द्यावे लागते किंवा वीज विभागाची वीज देयके 'प्रलंबित' ठेवावी लागतात.

अलिकडेच, पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभागाच्या शासन निर्णय क्र. मुपोयो/२०१७/प्र.क.०१/पापू-१९ दिनांक २६ नोव्हे २०१६ अन्वये जिपला त्यांच्या क्षेत्रीय नपायोंच्या वीज देयक समस्याबाबत मोठ्या प्रमाणात मदत होणार आहे.

नवीन शासन निर्णयानुसार, क्षेत्रीय पाणी योजना राबविणा-या जिपला खालील प्रमाणे प्रतिपूर्ती मिळणार आहे.

अ. जर ती गंभीर योजना असेल- देखभालीचा खर्च गुणिले वसुली क्षमता गुणोत्तर ५०% (ते म्हणजे वसुलीचा मागणीसह केलेला भागाकार)

ब. इतर योजनाकरीता, संपूर्ण वीज खर्च, परंतु त्यांस वसुली क्षमता गुणोत्तराने गुणून. (ते म्हणजे क्षेत्रीय नपायोंच्या वसुलीचा मागणीसह केलेला भागाकार)

### ६.२६.१ राविआच्या शिफारशी:

राविआ दिनांक २६.११.२०१८ रोजीच्या विचारपूर्वक केलेल्या वरील शासन निर्णयाचे स्वागत करतो. यामुळे नक्कीच साधारणपणे जिप निधितून देण्यात येणाऱ्या क्षेत्रीय पाणी पुरवठा योजनेवरील वीज देयकांचा भार कमी होईल. याअन्वये वसुलीच्या कार्यक्षमतेशी प्रतिपूर्ती संलग्नित केली आहे, हा एक

चांगला दृष्टीकोन आहे. तथापि, या शासन निर्णयानुसार जिपने वीज देयक भरणा केल्यानंतर प्रतिपूर्ती केली जाते. या उद्देशाकरीता कार्यकारी अभियंता (पर्यावरणीय अभियात्रिकी) जिप यांना फिरता निधी आवश्यक असेल. ज्यामुळे जिपला स्वत:च्या स्त्रोतामधून (जिप निधी) देयकाचा प्रथम भरणा करता येईल आणि त्यानंतर दिनांक २६.११.२०१८ च्या शासन निर्णयानुसार अनुदानाकरीता दावा करता येईल. ग्राविविने पाणी पुरवठा विभागाच्या मार्गदर्शक तत्वांचा लाभ प्राप्त करुन घेण्याकरीता जिप ला फिरता निधी निर्माण करण्याकरीता सुयोग्य निर्देश द्यावेत.

**६.२७ हापसणी आणि उर्जा पंपाचे व्यवस्थापन पंचायत समित्यांना हस्तांतरित करणे:**

आम्ही निदर्शनास आणून दिले आहे की (परिच्छेद ६.२०) जिपने एकुण हापसणी प्रचलनातील आणि उर्जापंप देखभाल एककाचे वापरण्यासाठी होणारे नुकसान कमी करावे. याकरीता जिप जवळपास रुपये ४४ कोटी इतके अनुदान देते (परिच्छेद ६.२०.२).

वर्तमान परिस्थितीमध्ये जिपकडे फिरती दुरुस्ती वाहने आणि यंत्रज्ञ आहेत. ते दुरुस्तीकरीता विविध गावांना भेटी देतात.  यामधील कर्मचारी सर्वसाधारणपणे जिप कर्मचारी असतो, परंतु भूजल सर्वेक्षण आणि विकास संस्थेचा उप अभियंता (यांत्रिकी) पर्यवेक्षक असतो. तो पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्याला अहवाल देतो.

वर्तमानात गट विकास अधिकारी (बीडीओ) पिण्याच्या पाण्याकरीता जबाबदार असतो, हापसणी युनिट जिल्हापातळीवर नियंत्रित करण्यात येतात. हापसणी चालत नसल्याच्या तक्रारींना अगदी कमी किंवा मंद प्रतिसाद मिळत असल्याच्या तक्रारी आलेल्या आहेत.

प्रत्येक हापसणीकरीता ग्रामपंचायतीकडून किंवा समुदायाकडून रुपये २५०/५०० रुपये देखभाल शुल्क वसूल करण्यात येते. तथापि व्यवस्थित देखरेख नसल्याने वसुली जेमतेम ५०% पर्यंत पोहचते. हापसणी पंपाचे देखभाल शुल्क ही कमी आहे. यामध्ये जर केवळ गट विकास अधिकारी आणि ग्रामसेवकांचा समावेश केल्यास समुदायाकडील वसुली शक्य आहे. परंतु आता सर्व काही  जिल्हा पातळीवरून नियंत्रित आणि व्यवस्थापित करण्यात येते.

अशाप्रकारे, अगदी तपशीलवार चर्चा आणि विश्लेषणाअंती पश्चात आम्हाला असे लक्षात आले आहे की हापसणी आणि उर्जापंपाच्या व्यवस्थापन प्रणालीमध्ये सुधारणेला खूप वाव आहे आणि मर्यादित जिप निधितून देण्यात येणारे क्रॉस अनुदान कमी करता येईल.

### ६.२७.१ राविआ शिफारशी

प्रत्येक पंचायत समितीला एक याप्रमाणे हापसणी देखभाल युनिट संपूर्णपणे पंचायत समितीकडे हस्तांतरित करावीत, अशी शिफारस करण्यात येत आहे. पंचायत समिती पातळीवर एक स्वतंत्र तालुका हापसणी आणि उर्जा पंप देखभाल सोसायटीची निश्चितपणे नोंद करावी. क्षेत्र विकास अधिकारी, गट विकास अधिकारी आणि तहसीलदार, उप अभियंता (पापू) यांना या सोसायटीचे पदसिद्ध सदस्य करावे. सदर सोसायटीला औद्योगिक, सामाजिक दायित्व असलेल्या संस्था, स्थानिक नागरीक किंवा पूर्वी त्या भागातील मूळ रहिवासी पंरतु आता मुंबई किंवा परदेशात वास्तव्यास असलेल्या हितचिंतक इत्यादीकडून देणग्या स्वीकारण्याची मुभा असावी. याची मुलभूत निधी (कॉरपस) उभारण्यास मदत होईल. प्रशासकीय दृष्ट्या अर्थातच हे युनिट पंचायत समिती संचालक मंडळ आणि गट विकास अधिकारी यांना अहवाल देईल.

या व्यवस्थेमुळे हापसणी आणि उर्जापंप युनिट अधिक प्रतिसादक्षम होईल तसेच वसुलीत देखील सुधारणा होईल कारण गट विकास अधिकारी अगदी जवळून देखरेख करू शकतील. यामुळे राज्य शासनने अनेक दशकांमध्ये जवळपास रुपये १२६० कोटी रुपयांची मोठी गुंतवणूक केलेल्या हापसणींची प्रतिबंधात्मक देखभालही करता येईल. (१.८० लाख हापसण्या X प्रत्येक बोरींगची विद्यमान किंमत ६०,००० रुपये, यामध्ये प्रत्येकी ३ लाख रुपयांचे ६००० उर्जापंपांची किंमत मिळविली तर एकूण रुपये १२६०कोटी इतकी रक्कम होते). ही अत्यंत महत्त्वाची मत्ता असून उत्तम ठिकाणी स्थित आहे, तेव्हा केवळ दुर्लक्षामुळे तिची हानि होता कामा नये. राज्य शासनने देखील प्रस्तावित तालुका पातळीवरील सोसायटीला एकवेळा रुपये २.५ लाखाचे अनुदान मुलभूत निधी म्हणून द्यावे, त्याच बरोबर जिपने देखील स्वतःच्या निधितून २.५ लाख रुपये अनुदान दिले पाहिजे. अशा प्रकारे प्रत्येक पंचायत समिती पातळीवरील सोसायटीकडे काम सुरु करण्याकरीता रुपये ५ लाखांचा मुलभूत निधी असेल.

जिल्हा परिषद निविदा काढून हापसणी आणि उर्जापंपाच्या सुट्या भागांचे दर निश्चित करण्याची त्यांची भूमिका सुरुच ठेवेल, मात्र खरेदीचे काम तालुका पातळीवरील संचालक मंडळ/पंचायत समिती यांच्याकडे सोपवावे.

आम्ही अशी शिफारस करतो की राज्य शासनने सर्वसमावेशकपणे या दुर्लक्षित पण महत्वाच्या बाबीमध्ये लक्ष घालावे आणि पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभागाने वर नमूद केलेल्या सर्व मुद्द्यांचा समावेश करून एक नवीन शासन निर्णय जारी करावा. यामुळे वापरकर्त्यांकडूनच्या वसुलीमध्ये वाढ होईल आणि जिल्हा परिषदेवर पडणारा अनावश्यक आर्थिक ताण देखील कमी होईल.

६.२८ जिल्हा परिषदेचे 'स्वत:चे स्त्रोत' वाढावेत म्हणून केलेल्या शिफारशींचा सारांश:

तक्ता ३६ : संक्षिप्त शिफारशी :

| जिल्हा परिषदेच्या उत्पन्न वाढीसाठी | जिल्हा परिषदेचा खर्च कमी करण्यासाठी |
|---|---|
| मुद्रांक शुल्क अधिभार- अल्प उत्पन्न जिल्ह्यांसाठी नुकसान भरपाई ( राज्याच्या सरासरी उत्पन्नापेक्षा कमी) | जिप नपायो मध्ये दूर अंतरावरून पाणी आणण्यासाठी होणारा वीज खर्च शासनने द्यावा |
| जिल्हा परिषदेतर्फे कार्यान्वयीत शासकीय योजनांवर २% व्यवस्थापन शुल्क | हापसणी, उर्जापंप उत्पन्न आणि देखभाल पंचायत समितीकडे हस्तांतरित करावी. |
| सिंचन उपकरात २०% ते ४०% वाढ | |
| नियुक्त कराचे सुधारित व्यवस्थापन | |

## ६.२९. जिल्हा परिषदेच्या वित्तीय व्यवस्थापनात सुधारणा करण्याकरीता इतर महत्वाच्या शिफारशी:

## विशिष्ट वित्तीय सुधारणा:

### ६.२९.१ देखभाल निधी सुरु करणे

जिल्हा परिषदेच्या वार्षिक लेखामध्ये, कोणात्याही संस्थेमध्ये केले जाते त्याप्रमाणे उत्पन्नाची विशिष्ट रक्कम घसारा निधी मध्ये हस्तांतरित करण्यात येते. तथापि जिल्हा परिषदांच्या उत्पन्न स्त्रोतानुसार प्रत्येक जिपची हस्तांतरित रक्कम वेगवेगळी असते. अनेक जिल्हा परिषदांकडे त्यांच्या तातडीच्या गरजा भागविण्यासाठी पुरेसा निधी नाही, त्यामुळे घसारा निधिमध्ये पुरेशी रक्कम हस्तांतरित करण्यात येत नाही. परिणामी इमारती बांधकाम किंवा त्यांची देखभाल करणे तसेच सुस्थितीत ठेवणे अशा भांडवली कामाकरीता पुरेसे स्त्रोत उपलब्ध नाहीत.

जिल्हा परिषदांकडे मोठ्या संख्येने असलेल्या इमारती आणि मालमत्तांचा विचार करता, त्यांच्या उप्तन्नाच्या २% रक्कम देखभाल निधिला अनिवार्यपणे हस्तांतरित करणे अत्यंत आवश्यक असते. हा देखभाल निधी उच्च पातळीवर उदा.विभागीय पातळीवर ठेवण्यात यावा. जिल्हा परिषदांना निधी गुंतविल्यापासून तीन वर्षांनंतरच खर्च करण्याची परवानगी द्यावी. आम्ही अशी शिफारस करतो की शासनने प्राधान्याने देखभाल निधिबाबत तपशीलवार मार्गदर्शक तत्वे जारी करावीत. आम्ही लेखा आणि वित्त या प्रकरणामध्ये देखभाल निधिची संकल्पना स्पष्ट करून सांगितली आहे.

### ६.२९.२ जिल्हा परिषदांच्या वार्षिक लेखामध्ये विशिष्ट गुणोत्तरे उघड करण्याची आणि लेखा संकेतांक सुधारणे:

जिल्हा परिषद लेख्याच्या वर्तमान स्वरुपामध्ये केवळ आकडेवारी देण्यात येते. त्यामध्ये रक्कम कोठे आणि कशी खर्च करण्यात आली ते दर्शविले जात नाही. त्यामध्ये अगदी थोडेच विश्लेषण केलेले असते आणि प्रथम दर्शनी तरी कोणतेही अनुमान काढता येत नाही. आपण असे म्हणू शकतो की लेख्यामध्ये जेवढे उघड करण्यात आले आहे तेवढेच लपविण्यातही आले आहे! उद्योग आणि बँकामध्ये वित्तीय आरोग्य उघड करणाऱ्या प्रख्यात वित्तिय गुणोत्तरामुळे मुल्यमापन करणे शक्य होते. आम्ही अशी शिफारस करतो की जिल्हा परिषदांच्या लेख्यांच्या शेवटी जिल्हा परिषदेच्या स्वत:च्या उत्पन्नाच्या संदर्भात काही गुणोत्तर देण्यात यावीत. अशी गुणोत्तरे वार्षिक लेख्यांचा अविभाज्य भाग असायला हवीत. काही निर्देशक गुणोत्तरे पुढीलप्रमाणे आहेत:

- एकूण उत्पन्नामध्ये विविध स्त्रोतांचा एकमेकांसंदर्भातील वाट्याची/हिश्शाची टक्केवारी
- मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षीच्या स्वत:च्या उत्पन्नातील बदल
- खर्चाच्या घटकांचे एकमेकांसोबतची टक्केवारी

'लेखा' वरील प्रकरणामध्ये वित्तीय सुधारणा मिशनने शिफारस केलेले इच्छीत वित्तीय गुणोत्तरे द्यायला हवीत आणि शासनने त्यांस जिप लेख्याचा अविभाज्य अनिवार्य घटक करण्याबाबत शासन निर्णय जारी करायलाच हवा.

### ६.२९.३ लेखा संदर्भातील राजपत्र अधिसूचनेचे वितरण

बदलेल्या परिस्थितीमध्ये जिप आणि पंस कायद्यामध्ये दिलेल्या अनेक प्रक्रियांबाबत पुन्हा एकवार विचार करुन बदलण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्र जिप आणि पंस लेखा संहिता हे कायद्यातंर्गत अधिसूचित केलेले नियम आहेत. जिल्हा परिषदांचे लेखे विधि मंडळात सादर करणे आवश्यक असले तरी काही नियम अगदी निरर्थक आहेत जसे की लेखे शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करणे अनिवार्य असणे. उक्त लेखा संहितेतील नियम ६६(९) खालीलप्रमाणे आहे:

कायद्याच्या कलम १३६(९) संदर्भित लेखा विधानाचा संक्षेप नमुना २१-इ अनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी १५ ऑक्टोबर किंवा त्यापूर्वीतयार करावा आणि त्यासोबत गट विकास अधिकाऱ्याने पाठविलेले जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांचे अग्रेषित केलेले लेखे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी १५ नोव्हेंबर पूर्वी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध करावे. राविआ असे सूचित करतो की आता

संकेतस्थळे (वेबसाईट) जनतेकरीता खुली आहेत, तेव्हा त्या कालावधीसाठी जिपच्या किंवा ग्राविविच्या संकेतस्थळावर लेखे प्रसिद्ध करणे पुरेसे आहे तसेच राजपत्रात प्रसिद्ध करण्याच्या अधिसूचनेची कंटाळवाणी पद्धत (ज्याचे महत्व आधीच्या दशकामध्ये होते) बंद करण्यात यावी.

**६.३० काही संस्थात्मक सुधारणा:**

**६.३०.१ पंचायत राज करीता स्वतंत्र व्यवस्थापन युनिट निर्माण करण्याची आवश्यकता:**

महाराष्ट्रामध्ये ग्राम विकास विभाग आणि पंचायत राज एकाच मंत्रालयाकडून अथवा विभागाकडून हातळण्यात येतात. इतर राज्याप्रमाणे ग्राम विकास किंवा पंचायत राज करीता स्वतंत्र आयुक्तालय किंवा संचालनालय नाही. भारतातील बहुतांशी राज्यामध्ये दोन संचालनालये आहेत, एक ग्राम विकास विभागाकरीता आणि एक पंचायत राज करिता. महाराष्ट्रामध्ये सर्व काही मंत्रालय पातळीवर हाताळण्यात येते. मंत्रालयातील इतर सर्व विभागांना आयुक्तालय किंवा संचालनालय आहे.

ग्राम विकासाकरीता, अलिकडील वर्षामध्ये ग्रामीण गृहनिर्माणाकरीता (राज्य व्यवस्थापन युनिट- ग्रामीण गृह निर्माण) आणि ग्रामीण गरिबी निर्मुलन (राज्य ग्रामीण उपजिविका मिशन) अशी दोन व्यवस्थापन युनिट निर्माण करण्यात आलेले आहेत. यामुळे ग्राम विकास कामाला खूप मदत झाली आहे. तथापि पंचायत राजच्या समस्या सातत्याने हाताळण्याकरीता कायमस्वरुपी संस्थात्मक यंत्रणा नाही.

हे संस्थात्मक बांधणीच्या स्वतंत्र संचलनालयामार्फत अगदी उत्तमरित्या होऊ शकते. तथापि संचलनालया ऐवजी राज्य व्यवस्थापन युनिट- पंचायत राज हा देखील चांगला पर्याय आहे. असे दिसून आले आहे की ग्राम विकास विभागाने राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाच्या अंमलबजावणीकरीता राज्य व्यवस्थापन युनिट- पंचायत राज ची निर्मिती केली होती आणि त्याबाबत क्र. आरजीएसए/२०१८/प्र.क्र. १२१/ आस्था१५, दिनांक २० फेब्रूवारी २०१९ अन्वये तपशीलवार शासन निर्णय निर्गमित केला आहे. याकरीता साधारण ३१ पदे निर्माण केली गेली. त्यातील १८ नियमित तर उर्वरीत कंत्राटी होती. सर्वांना राग्रास्वअ निधीतून निधी पुरवठा करण्यात आला. अर्थात हे अत्यंत चांगले आहे तरीही राविआला असे वाटते की राज्य व्यवस्थापन युनिट- पंचायत राज ही नियमित पदासह कायमस्वरुपी यंत्रणा असावी. अन्यथा राग्रास्वअ प्रकल्प पूर्ण झाल्यावर राज्य व्यवस्थापन युनिट बंद करावे लागेल.

हे करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे मंत्रालयातील कार्यासनामधील पदे या क्षेत्राकडे हस्तांतरित करावीत. मात्र मंत्रालयामध्ये जे काम होते तेच काम राज्य व्यवस्थापन युनिट- पंचायत राज पाहतील. अशा प्रकारे नवीन पद निर्मीतीची आवश्यकताच राहणार नाही.

जर कायमस्वरूपी व्यवस्था करण्यात आली तर वर्तमान स्थितीमध्ये नियुक्त करामधील तफावत आणि इतर समस्या आपोआपच निकालात निघतील .

मंत्रालयाऐवजी निधी पंचायत राजसाठी विमुक्त करण्याच्या कामासाठी देखील या कार्यालयाचा उपयोग करता येईल (जसे इतर विभागात हे काम संचलनालयामार्फत केले जाते).

राविआ पंचायत राज करीता कायमस्वरूपी (राग्रास्वअ सोबत संलग्न तात्पुरत्या स्वरुपाऐवजी) स्वतंत्र व्यवस्थापन युनिट असण्याच्या शिफारशीवर भर देत आहे. कोणत्याही प्रकारे नवीन पदे निर्माण न करता मंत्रालयातील तीन विभाग हस्तांतरित करून हे करता येणे शक्य आहे.

### ६.३०.२ मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी यांना अहवाल देणाऱ्या जिप महसूल अधिकाऱ्याची नियुक्ती

आम्ही केलेल्या विद्यमान प्रणालीच्या विश्लेषणातून असे दिसून येते की जिप उत्पन्नाच्या बाजूच्या व्यवस्थापनामध्ये प्रमुख संस्थात्मक किंवा मनुष्यबळ संसाधनामध्ये कमकुवतपणा आहे. जिल्हा परिषदेच्या स्रोताकडे आणि मालमत्तेकडे लक्ष देण्याकरीता एक विशिष्ट विभाग अथवा अधिकारी नाही. जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी सातत्याने ग्राम विकास उपक्रमांवर लक्ष केंद्रित करून त्यांची अंमलबजावणी करण्यात, लक्ष्य साध्य करण्यात व्यस्त असतात. मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी शासकीय निधिचे व्यवस्थापन करण्यात (जिल्हापरिषदेचे ९३% उत्पन्न) व्यस्त असतात. जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाच्या बाजूचे व्यवस्थापन करणे, सनियंत्रण करणे हा सर्वाधिक दुर्लक्षित भाग आहे. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (उपाध्यक्ष) यांनी हे करणे पारंपारिक दृष्ट्या अपेक्षित असते, तरीही सर्व आकडेवारी नैसर्गिकरित्या केवळ मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी यांच्याकडेच असते.

सर्व प्रथम ही संस्थात्मक त्रूटी प्राधान्याने दूर करण्यात यावी. एकदा या बाबींमध्ये लक्ष घालण्याकरीता पूर्णवेळ व्यक्ती असली की मग आपसुकच कामात सुधारणा होईल.

याकरीताच आम्ही शिफारस करतो की शासनने प्रत्येक जिपकरीता दोन पदांची निर्मिती करावी:

(अ.) जिप आणि पंस महसूल अधिकारी- महाराष्ट्र विकास सेवेमधून वर्ग-२ चा अधिकारी

(ब.) त्याला सहाय्य करण्याकरीता जिप संवर्गाचा सहाय्यक लेखा अधिकारी किंवा उप लेखाधिकारी

यांची नियुक्ती शासनमार्फत करण्यात येणार असली तरी **या अधिकाऱ्यांचे वेतन पहिल्या तीन वर्षांकरीता जिपच्या स्वत:च्या निधितून करण्यात यावे.** तीन वर्षांनंतर जिपला पुननिरिक्षण करण्याचे स्वातंत्र्य असेल, ज्या कारणाकरीता ही पदे निर्माण केली, त्यानुसार जिपचे स्वत:चे उत्पन्न वृद्धीगंत झाले किंवा नाही आणि

त्यानंतर सदर पदे कायम ठेवावीत किंवा निरसित करावीत हे ठरविता येईल. परंतु पहिल्या तीन वर्षांकरीता प्रत्येक जिपने स्वत:च्या संसाधनामधून ही दोन पदे निर्माण केलीच पाहिजेत. याबाबत शासनने कायद्याच्या कलम २६० अंतर्गत निर्देश देणे आवश्यक आहे.

जिप महसूल अधिकाऱ्याने उप मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा अन्य कोणत्याही अधिकाऱ्याला न देता मुख्य लेखा आणि वित्त अधिकाऱ्यास अहवाल देणे आवश्यक आहे .

जिप महसूल अधिकाऱ्याची कर्तव्ये खालीलप्रमाणे असतील:

- जिपच्या स्वत:च्या उत्पन्नाच्या सर्व स्त्रोतांवर सनियंत्रण ठेवणे.
- जिल्हा परिषदेचे उत्पन्न वाढविण्याकरीता पद्धती आणि कल्पना पुरविणे जसे की टाक्यांचा आणि इतर मालत्तेचा लिलाव करणे इत्यादी.
- कायद्यानुसार आवश्यक आहे त्याप्रमाणे जिपच्या मालमत्तेचे रजिस्टर ठेवणे,
- याबाबतीत त्यांनी काय प्रयत्न केले याबाबत दर तीन महिन्यांनी जिप संचालक मंडळाला अहवाल देणे.

आम्हाला खात्री आहे की जिपने सुरुवातीला या दोन पदाकरीता दरमहा रुपये १ लाख किंवा साधारण वर्षाला १२ लाख रुपये खर्च केले असता, जिपचे उत्पन्न इतक्या पटीने वाढेल की हा खर्च एकप्रकारची गुंतवणूकच ठरेल. या संदर्भात आम्ही ग्राम विकास विभागाने तपशीलवार शासन निर्णय निर्गमित करण्याची आम्ही शिफारस करतो.

### ६.३०.३ जिल्हा परिषदांकरीता तक्रार निवारण यंत्रणेची आवश्यकता:

आधीच्या परिच्छेदांवरून असे दिसून येईल की जिल्हा परिषदांना इतकेच नाही तर पंचायत राज संस्थांच्या तीनही स्तरावरील संस्थाकरीता, त्यांना कायद्यानुसार जे काही मिळण्यासाठी हक्कदार ठरतात आणि त्यांना मिळत नाही अशी परिस्थिती असेल तर तक्रार निवारणाकरीता कोणत्याही प्रकारची तक्रार निवारण यंत्रणा अस्तित्वात नाही.

विद्यमान परिस्थितीमध्ये एक सनियंत्रण समिती आहे जी पंचायत राज संस्थांना सर्व नियुक्त कर वेळेत मिळण्याची खातरजमा करते. ही समिती शासन निर्णय क्र.आरडीडी/प्र.क्र.७/१०९३/२४, दिनांक ४ जून १९९३ अन्वये गठित करण्यात आली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी या समितीचे अध्यक्ष आहेत आणि जिल्हाधिकारी कार्यालयातील निवासी जिल्हाधिकारी सदस्य तर उप मुख्य कार्यकारी अधिकारी जिप हे सदस्य सचिव असतात. आमच्या भेटींच्या वेळी आम्हाला आढळले की जवळ जवळ सर्वच जिल्ह्यांमध्ये

या समितीच्या बैठका घेण्यात आलेल्या नाहीत आणि १९९३ चा शासन निर्णय (२६ वर्षापूर्वी जारी करण्यात आलेला) विस्मरणात गेलेला आहे.

पंचायत राज संस्थांना त्यांच्या तक्रारी मांडण्यासाठी केवळ एकच मार्ग उपलब्ध आहे तो म्हणजे नेहमीच्या पद्धतीने जाणे.

आमचा असा दृष्टीकोन आहे की त्यांना त्यांचे कायद्यानुरुप आणि शासन निर्णयानुसार देय प्राप्त होण्याकरीता संस्थात्मक तक्रार निवारण यंत्रणा अस्तित्वात असणे आवश्यक आहे.

**६.३१ इतर संकिर्ण शिफारशी:**

**हा वित्त आयोग असल्याने, संपूर्ण प्रशासकीय सुधारणांवर टिप्पणी करणे हा काही आमचा हेतू नाही.** तथापि, जिप आणि पंसची आर्थिक कामगिरी प्रभावित करणारी, दीर्घकालापासून दुर्लक्षित अशी विशिष्ट क्षेत्र आम्हाला निश्चित करायची आहेत. न्यायालयीन आदेश, देय नुकसान भरपाई, विलंबाचे प्रदानावर व्याज इत्यादी प्रचंड वेळ घेतात आणि त्यांचा वित्तीय परिणाम मोठा असतो.

**जिप आणि पंसमध्ये मनुष्यबळ संसाधन व्यवस्थापना संदर्भातील महत्वाच्या समस्या:**

**६.३१.१. शिस्तविषयक आणि संहिता नियमांमध्ये आमुलाग्र सुधारणा:**

जिल्हा परिषदेचे कर्मचारी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा संहिता १९६७ च्या नियमांचे पालन करण्यास बांधील असतात. हे महाराष्ट्र नागरी सेवा नियमावर आधारून केले आहेत. ते महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्तविषयक आणि अपील) नियम, १९६४ नुसार देखील आहेत. तथापि, हे १९६७ मध्ये केलेले असून आजतागयत अद्ययावत करण्यात आले नाहीत. हे महाराष्ट्र नागरी सेवा नियम आणि शिस्तविषयक नियमानुसार संपुर्णपणे अद्ययावत करणे आवश्यक आहे.

**६.३१.२ शासकीय वेतन श्रेणीनुसार वेतन मिळणाऱ्या जिल्हा परिषद कर्माचाऱ्यांकरीता विविध कामगार कायदे लागू करणे:**

अनेक जिल्हा परिषद कर्मचारी त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरीता कामगार न्यायालयामध्ये जात असल्याचे निदर्शनास आले आहे. प्रत्यक्ष वर सांगितल्याप्रमाणे जिल्हा परिषद कर्मचारी जिप जिल्हा सेवा वर्तणुक आणि शिस्तविषयक नियमांना बांधील असतात. त्यांना शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणेच शासकीय वेतन आणि सर्व सुविधा, जीवनभराकरीता रोजगार सुरक्षा आणि सुविधा प्राप्त होतात. त्यांना निवृत्तीवेतनाचे लाभ देखील प्राप्त होतात. **त्यामुळे कामगार न्यायालये कायद्यान्वये त्यांचे प्रस्ताव का**

**आणि कसे स्वीकारतात, हे स्पष्ट होत नाही.** अलिकडेच जिप संबंधित एक रंजक प्रकरण झाले, यवतमाळ येथील कामगार न्यायालयाने जिप कर्मचारी उपदान कायद्यातंर्गत येतात असे विधान केले आहे, वास्तवात कर्मचाऱ्यांना शासन नियमाप्रमाणे आधीच उपदान मिळत आहे.

राविआस असे वाटते की कामगार कायद्याच्या क्षेत्रामध्ये जिल्हा परिषद कर्मचाऱ्याबाबत संभ्रमाची स्थिती आहे, त्यांना सर्वसाधारण शासकीय कर्मचारी (जेव्हा त्यांना शासनचे सर्व लाभ बरोबरीने मिळतात) किंवा त्यांना कामगार कायदे लागू आहेत? बऱ्याचदा जिप कर्मचाऱ्यांना दोन्हीकडील लाभ प्राप्त होतात. कदाचित संभ्रम दूर करण्याकरीता जिप आणि पंस कायदा अथवा नियमांत अधिक स्पष्टता आणि राज्य कामगार कायदा जिप कर्मचाऱ्यांना लागू नाही अशी स्पष्टता आवश्यक आहे.

राविआ जोरदार शिफारस करते की, कामगार कायद्याच्या दृष्टीकोनात आणि संबंधित समस्यांच्या दृष्टीने **जिप कर्मचाऱ्यांची स्थिती काय आहे याबाबत एका विशेषज्ञ समितीकडून सखोल परिक्षण करण्यात आले पाहिजे,** या समितीमध्ये कामगार विभागातील अधिकारी (सेवेत असलेले अथवा निवृत्त) सदस्य असणे अनिवार्य आहे. संबंधित नियम अथवा कायद्यामध्ये आवश्यक ते बदल करुन या समस्येचे कायमस्वरूपी निराकारण करणे आवश्यक आहे. यामुळे विनाकारण कामगार कायदा न्यायालयात जाण्याने जिल्हा परिषद आणि राज्य शासनचा जो प्रचंड वेळ आणि संसाधने खर्ची पडतात त्याची बचत होऊ शकेल.

### ६.३१.३ जिल्हा परिषद प्रणालीमध्ये राष्ट्रीय निवृत्ती योजना प्रस्तुत करण्यासंदर्भातील समस्या:

सर्व जिप कर्मचारी राज्य शासनच्या कर्मचाऱ्याप्रमाणे निवृत्ती वेतनास पात्र आहेत. तथापि, २००४ मध्ये नव्याने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांसाठीच्या निवृत्ती वेतनाबाबत राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेनुसार बदल करण्यात आले आहेत, ज्यामध्ये कर्मचारी तसेच नियोक्ता दोघांचे योगदान राष्ट्रीय निवृती वेतन निधित हस्तांतरित करण्यात येते.

तथापि, प्रत्यक्षात रानियोच्या (राष्ट्रीय निवृत्ती योजना )अंमलबजावणीमध्ये अनेक त्रूटी आणि पळवाटा आहेत तसेच आम्हाला असे आढळून आले की अनेक जिल्हा परिषदा या अंमलबजावणीच्या बाबतीत भिन्न स्तरावर आहेत. पुन्हा एकदा याबाबतीतही कामगार कायद्यासंदर्भातील अनेक बाबीं हाताळणे आवश्यक आहे. या बाबीं व्यवस्थित हाताळल्या नाहीत तर जिल्हा परिषदांकडून चालू कामगार कायद्यांच्या उल्लघंनाची जोखीम होण्याची शक्यता आहे. राविआ अशी शिफारस करतो की ग्राम विकास विभागाने परिस्थितीचा सर्वसमावेशकपणे अभ्यास करावा आणि सर्व काही सुरळीत करण्याकरीता कालमर्यादेत कार्यवाही कृती करावी.

### ६.३१.४ उपलब्ध जिप अभियंत्याचे अधिक चांगले व्यवस्थापन:

शासनच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्याकरीता जिल्हा परिषद त्यांच्या स्थापत्य अभियंता संवर्गावर खूप अधिक प्रमाणात अवलंबून आहे. या योजना इमारत बांधकाम, ग्राम रस्ते किंवा लहान सिंचन प्रकल्प यापैकी काहीही असू शकते. राज्य शासनच्या कामाचे आकारमान बघता जिप अभियंत्याकडून अगदी छोटा भाग हाताळण्यात येतो.

वर्तमान प्रणाली मध्ये जिल्हा परिषद स्थापत्य अभियंत्याची नेमणूक कनिष्ठ अभियंता किंवा स्थापत्य सहाय्यक अभियंत्याच्या खाली एक पातळीवर करते. जिल्हा परिषदेत कामाच्या अनुभवाने आणि सेवा ज्येष्ठतेनुसार ते शाखा अभियंत्याच्या पदापर्यंत पोहचतात. जिल्हा परिषदेमध्ये सिंचन, पाणी पुरवठा आणि बांधकाम अशा तीन संवर्गात अभियंते आहेत. शाखा अभियंत्याच्या पुढे त्यांना केवळ राज्य संवर्गानुसार बढती मिळते. सार्वजनिक बांधकाम मार्ग/ पाणी पुरवठा/ सिंचन मार्ग अशा तीन भिन्न मार्गांनी बढती मिळू शकते. त्यांची राज्य स्तरीय सेवा ज्येष्ठता सार्वजनिक बांधकाम किंवा सिंचन किंवा पाणी पुरवठा विभागाकडून तयार/अद्ययावत करण्यात येते. त्यांच्या जिल्हा परिषदेतील संवर्गाच्या आधारे त्यांना बांधकाम किंवा पाणी पुरवठा किंवा सिंचन विभागात उप अभियंता पदापर्यंत बढती देण्यात येते. फार थोडे कर्मचारी कार्यकारी अभियंता पदापर्यंत मजल मारतात. सर्वसाधारण अनुभव असा आहे की उप अभियंता किंवा कार्यकारी अभियंता यांना पदोन्नतीने त्यांच्या कारकिर्दीच्या अखेरीस जिपकडे पाठविण्यात येते. निवृत होण्यापूर्वी जिप मध्ये बदली झालेल्या राज्य संवर्गाच्या अधिकाऱ्याला चांगली कामगिरी करून दाखविण्याचा उत्साह अगदी थोडा असतो. या सर्वाचा परिणाम जिप स्थापत्य अभियंता विभागात अगदी निकृष्ट दर्जाच्या मनुष्यबळामध्ये होतो.

असे दिसून आले आहे की जिप कर्मचाऱ्यामध्ये देखील अभियंत्याचा कल जिप (बांधकाम) विभागात काम करण्याचा कल असतो. सर्व साधारणपणे छोट्या सिंचन प्रकल्प/पाणी पुरवठा विभागात (जरी जिपचे छोटे सिंचन प्रकल्प अगदी कमी असले तरी) आणि पंचायत समितीमध्ये अगदी थोड्या संख्येने अभियंते उपलब्ध असतात. वास्तवात सर्वाधिक काम पंचायत समितीमध्ये असते आणि तेथे अभियंत्यांची तीव्र टंचाई भासते. येथे नोंद घेता येईल की अभियंत्यांना विविध ग्रामपंचायतींना कमी मुल्यांच्या विखुरलेल्या शेकडो कामांना पुन:पुन्हा भेटी देणे आवश्यक असते. यामध्ये बराच वेळ खर्ची पडतो. जिल्हा परिषदेमध्ये कामे आणि उपलब्ध निधिचा विनियोग हळू होण्यामागे हे देखील एक कारण आहे.

उपलब्ध अभियंते आणि त्यांचा कार्यभार याचा संपूर्ण अभ्यास आणि व्यवस्थापन होणे आवश्यक आहे.

**जिप च्या संसाधनाच्या अधिक चांगल्या व्यवस्थापनाकरीता राविआ खालीलप्रमाणे शिफारशी करते:**

(अ.) निवृत्त किंवा पात्र असलेल्या बाह्य अभियंत्यांचे एक पॅनल स्थापन करणे - सेवानिवृत्त किंवा योग्य अर्हता असली पाहिजे. त्यांना व्यवस्थित प्रशिक्षण आणि मान्यता देण्याची आवश्यकता आहे. पॅनलवरील हे अभियंते वेळोवेळी अंदाज काढणे आणि निरीक्षण ही कामे करू शकतात. जिपच्या मूळ, नियमित अभियंत्यांनी निविदा काढणे, प्रासंगिक भेटी देणे आणि अंतरीम तसेच अंतिम देयक तयार करणे अशा कामावर लक्ष केंद्रित करावे.

(ब.) सिंचन व पाणी पुरवठा आणि बांधकाम संवर्गातील अभियंत्यामध्ये अनेकदा त्यांच्यामधील असंतुलित कार्यभाराने वाद निर्माण होतात म्हणून त्यांना एकत्रित करणे. अकोल्यामध्ये याची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्यात आली असल्याने हे ‘अकोला पॅटर्न’ म्हणून प्रसिद्ध आहे.

(क.) अभियंत्याच्या व्यवस्थापनाबाबत आणि कार्यभारासंदर्भातच्या सर्व समस्या अभ्यासण्याकरीता आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्याकरीता एक समिती स्थापन करणे.

**६.३२ जिपच्या अचल मालमत्तेचा अधिक चांगला उपयोग:**

१९६० मध्ये जेव्हा जिल्हापरिषदांची स्थापना करण्यात आली तेव्हा शासनकडे खूप जमीन उपलब्ध होती आणि त्यांनी ती जिप आणि पंस ला दिली. आता या जमिनी शहरातल्या महत्वाच्या ठिकाणावर असून त्यात जिल्हा परिषदेची कार्यालये, गोदामे इत्यादी आहेत. त्याच प्रमाणे चांगल्या मोक्याच्या जागा पंचायत समित्यांना आणि प्राथमिक आरोग्य केंद्र, पशुसंवर्धन दवाखाना इत्यादींना मोठ्या गावांमध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. आता इतका कालावधी लोटल्यानंतर जिल्ह्याच्या शहरात, तालुक्याच्या शहरात आणि मोठ्या गावांमध्ये खूप चांगल्या जमिनी अगदी शहराच्या वा खेड्याच्या मध्यवर्ती ठिकाणच्या जागा पंचायत राज संस्थेकडे आहेत मात्र एकूणच त्यांचा पूर्ण वापर होत नाही. तसेच त्यांना अतिक्रमणाचा धोका देखील आहे.

आमच्या क्षेत्र भेटींच्या वेळी अशासकीय पदाधिकाऱ्यांनी वारंवार अशी मागणी केली की जिपला सदर जमिनी विकसित करण्याची परवानगी देण्यात यावी जेणे करून पंचायत राज संस्थेला खात्रीशीर उत्पन्नाचा स्त्रोत प्राप्त होऊ शकेल.

असे दिसून आले आहे की शासन निर्णय क्र.संकुल/२००६/प्रकरण क्र.१९९/पं रा ७ , दिनांक १ सप्टेबंर २००८ अन्वये पंचायत राज संस्थांची मालमत्ता बिओटी मॉडेलनुसार विकसित करण्याकरीता सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्वे सांगितली आहेत. कालातंराने, जिपला उघडून दिलेल्या या नव्या

दालनाच्या गैरवापराच्या तक्रारी समोर आल्याने शासनने या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीवर स्थगिती आणली.

### ६.३२.१ राविआच्या शिफारशी:

राविआच्या मते जिपच्या मालमत्ता बीओटी किंवा अन्य योग्य मॉडेल नुसार अगदी काळजीपूर्वक विकसित करून पंचायत राज संस्थांना खात्रीशीर उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करण्याची वेळ आली आहे. जिल्हा परिषदे पेक्षाही पंचायत समित्यांना हे जास्त आवश्यक आहे कारण त्यांच्याकडे स्वत:चे असे उत्पन्नच नाही. त्याच प्रमाणे पंचायत समिती शहरांमध्ये चांगल्या व्यवसाय मालमत्तांची उणीव आहे.

तथापि, गुंतागुंतीच्या बीओटी मॉडेलनुसार मालमत्ता विकसित करण्याची हाताळणी करण्याकरीता जिल्हा परिषदा सुसज्ज नाहीत. बीओटीकरीता करार कायदे आणि वित्तिय व्यवहार्यता, समस्यांबाबतचे चांगले ज्ञान आवश्यक आहे तसेच या सर्व व्यवहारामध्ये पारदर्शकता असणे देखील आवश्यक आहे. पंचायत राज संस्थाकडे यासाठी आवश्यक असणाऱ्या क्षमता नाहीत.

राविआ शिफारस करते की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ किंवा राज्यस्तरिय सार्वजनिक बांधकाम विभाग यासारख्या शासकीय संस्थानी बीओटी करावे. इतर समर्पित संस्थांचा देखील पर्याय म्हणून विचार करता येईल. अशी शिफारस करण्यात येत आहे की या संबंधातील सर्व पैलू अभ्यासण्याकरीता, तसेच राज्यामध्ये यशस्वीरित्या बीओटी केल्याच्या प्रकरणांचा अभ्यास करण्याकरीता त्याच प्रमाणे शिफारशींच्या आधारे पुढील कार्यवाही करण्याकरीता एक समिती स्थापन करण्यात यावी.

### ६.३३ अशासकीय सदस्यांच्या मानधनामध्ये वाढ करणे:

अशासकीय सदस्याकरीताच्या वर्तमान सुविधामध्ये २०१२ मध्ये ग्राविविची अधिसूचना क्रमांक झेडपीए२०१०/सीएमएस७१/ प्र.क्र. १२२/ पीआर-१ दिनांक २० नोव्हेंबर २०१२ अन्वये सुधारणा करण्यात आली. त्यातील दर खालीलप्रमाणे आहेत.

तक्ता ३७ : जिल्हा परिषद व पंचायत समिती अशासकीय सदस्य विद्यमान मानधन :

| अनु.क्र. | श्रेणी | विद्यमान दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद अध्यक्ष - मानधन | रुपये२०,००० दर महा | ग्राविविची अधिसूचना क्रमांक झेडपीए२०१०/सीएमएस७१/ |
| २ | जिल्हा परिषद उपाध्यक्ष | रुपये१५,००० दर महा | |
| ३ | जिल्हा परिषद विषय समिती अध्यक्ष | रुपये१२,००० दर महा | |
| ४ | पंचायत समिती अध्यक्ष | रुपये१०,००० दर महा | |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | पंचायत समिती उपाध्यक्ष | रुपये८,००० दर महा | प्र.क्र. १२२/ पीआर-१ दिनांक २० नोव्हेंबर, २०१२ |
| ६ | जिल्हा परिषद अध्यक्ष आणि जिल्हा परिषद उपाध्यक्ष- प्रवास भत्ता | रुपये२,२५० दर महा | |
| ७ | जिल्हा परिषद विषय समिती अध्यक्ष प्रवास भत्ता | रुपये१,७५० दर महा | |
| ८ | पंचायत समिती अध्यक्ष प्रवास भत्ता | रुपये१३५० दर महा | |
| ९ | पंचायत समिती उपाध्यक्ष प्रवास भत्ता | रुपये९०० दर महा | |
| १० | जिल्हा परिषद सदस्य प्रवास भत्ता | रुपये३००० दर महा | |
| ११ | पंचायत समिती सदस्य | रुपये१२०० दर महा | |

राविआ जोरदारपणे शिफारस करते अशासकीय सदस्यांच्या मानधनाचे विद्यमान दरांचे, प्रवास आणि बैठकांच्या शुल्कांचे पुनरिक्षण करावे आणि चालू किंमतीच्या प्रमाणानुसार सुधारणा करावी.

**६.३४ पंचायत समित्या:**

**प्रस्तावना:**

जसे की, यापूर्वी विधान केले आहे, महाराष्ट्रामध्ये पंचायत समित्या या काही स्वतंत्र कायदेशीर संस्था नाहीत. त्या महाराष्ट्र जिप आणि पंस कायदा, १९६१ या एका कायद्यातंर्गत समाविष्ट आहेत. आपण त्यांना जिपच्या अंमलबजावणी शाखा म्हणू शकतो. त्या जनतेच्या अधिक जवळच्या आहेत तसेच त्या थेट ग्रामपंचायतींचे पर्यवेक्षण आणि ग्रामपंचायतीवर देखरेख करतात. पंचायत समितीची कार्य कायद्याच्या कलम १०१ अंतर्गत समाविष्ट आहेत. पंचायत समिती योजनांवर आणि आस्थापनांवर (मुख्यत्वे प्राथमिक शाळांच्या शिक्षकांचे आणि जिपने पंस वर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन) दर महिन्याला मोठ्या प्रमाणात खर्च करीत असली तरी तिचे स्वत:चे उत्पन्न मर्यादित आहे. याचे कारण असे की पंचायत समितीच्या उत्पन्नाचा एकमेव स्त्रोत म्हणजे त्यांचा जमीन महसूल उपकरातील हिस्सा/वाटा होय. याबद्दल नंतर चर्चा करण्यात आली आहे.

इतर काही राज्यांमध्ये,जसे की आंध्र प्रदेश किंवा तामिळनाडू मध्ये, मधला स्तर असलेल्या या पंचायती (पंचायत समिती समस्तर) खूप सक्षम आहेत. परंतु महाराष्ट्रामध्ये त्यांना निर्णय प्रक्रियेत काही विशेष भूमिका नाही. तिसऱ्या राविआने (२००६ मध्ये) खालील निरीक्षणे नोंदविली आहेत, ती आजही तितकीच संयुक्तिक ठरतात :

‘पंचायत समितीच्या शासकीय अधिकारी आणि अशासकीय अधिकारी यांच्याशी केलेल्या चर्चेमध्ये, आम्हाला असे लक्षात आले आहे की त्यांची भूमिका आणि अधिकाराबाबत त्यांच्यात एक प्रकारची हतबलता आणि असहाय्यता आहे. पंचायत समितीला कमी महत्व दिले जात असल्याची तक्रार तर सर्वसाधारण आहे. काही अधिकाऱ्यांनी सुचविले की जर पंचायत समित्यांना पंचायत राज संस्थामध्ये महत्वाची भूमिका पार पाडण्याइतपत सक्षम करता येत नसेल तर त्यांना बरखास्त करून टाकावे.’(परिच्छेद ५.२.४)

‘आयोगाला असे वाटते की पंचायत समितीच्या कार्यकारीं सदस्यांचा भ्रमनिरास आणि निराशा पूर्णत: अनाठायी नाही. स्वत:च्या निधिची अनुपलब्धतता असल्याने ते कोणत्याही प्रकारची अर्थपूर्ण भूमिका निभावू शकत नाहीत. ते धोरण तयार करणे, योजनांचे नियोजन आणि अंमलबजावणी यामध्ये कोणत्याही प्रकारचे योगदान देत नाहीत. आयोग असे सुचविते की शासनाने जाणीवपूर्वक पंचायत समितीकरीता निश्चित अशी भूमिका निर्धारीत करायला हवी. त्याच प्रमाणे योजनांच्या आणि प्रकल्पांच्या अंमलबजावणीबाबत जिप आणि पंसच्या भूमिकाबाबत सुस्पष्टता असावी कारण विद्यमान स्थितीमध्ये बरीचशी कार्य आणि उपक्रम परस्परव्याप्त आहेत. जिपला दिलेल्या निधितील काही भाग पंचायत समित्यांकरीता चिन्हाकींत करुन ठेवावा जेणे करून त्यांना जिपच्या हस्तक्षेपाशिवाय योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत नियोजन करता येईल.’ (परिच्छेद ५.२.५)

फार पूर्वी म्हणजे २००६ मध्ये करण्यात आलेल्या या निरिक्षणांशी सहमत राहून आम्ही खालील निरीक्षणे नोंदवितो.

### ६.३५ पंचायत समित्यांच्या स्वत:च्या उत्पन्नाचे स्त्रोत:

पंचायत समित्यांकडे अगदी मर्यादित स्त्रोत आहेत. मुलत: त्यांना जमीन महसूल उपकरा (नियुक्त कर) मधील हिस्सा मिळतो, तो पुढीलप्रमाणे आहे:

तक्ता ३८ : पंचायत समितीच्या स्वत:च्या उत्पन्नाचे स्त्रोत :

| | |
|---|---|
| जमीन महसुलावरील अतिरिक्त उपकर हिस्सा ( कलम १५५) | ४०% जिल्हा परिषदेस व ६०% पंचायत समितीस |
| सापेक्ष अनुदान (कलम १८५) | ४०% जिल्हा परिषदेस व ६०% पंचायत समितीस |
| प्रोत्साहनपर अनुदान (कलम १८६) | ३५% जिल्हा परिषदेस व ६५% पंचायत समितीस |

जमीन महसूल कमी कमी होत चालला असल्याने आणि पंस हिस्सा सर्व पंसमध्ये वाटला जात असल्याने, ठराविक पंचायत समितिला प्रत्यक्षात मिळणारी रक्कम फारच कमी असते. महाराष्ट्रातील विभिन्न भागातील तेरा पंचायत समित्यांचा महसुलाच्या स्वरुपाचा नमुना अभ्यास खालील प्रमाणे आहे.

तक्ता ३९ : पंचायत समितीच्या तीन वर्षाच्या उत्पन्नाची सरासरी (सन २०१५-१८)

(रुपये लाखामध्ये)

| अनु.क्र. | पंचायत समिती | हस्तांतरित योजनामार्फत मिळालेला निधी (कलम १००) | संस्था योजना अंतर्गत मिळालेला निधी (कलम १२३) | पंचायत समिती स्वत:चे उत्पन्न (उपकरा सहीत) | एकूण उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त निधी | प्राप्त निधी | स्वत:चे उत्पन्न | |
| | | टक्केवारी | टक्केवारी | टक्केवारी | |
| १ | वसई | ६,८२३ | २३५ | २४ | ७,०८२ |
| | | ९६.५८ | ३.०७ | ०.३५ | |
| २ | संगमेश्वर | ९,९३२ | ४०२ | १२५ | |
| | | ९४.९६ | ३.८४ | १.२ | १०,४५९ |
| ३ | सातारा | ६३५ | ५ | ६३ | |
| | | ९१.०२ | ०.८७ | ८.११ | ७०३ |
| ४ | करमाळा | ६,७८९ | २६५ | १० | |
| | | ९६.१७ | ३.६९ | ०.१४ | ७,०६४ |
| ५ | धुळे | ११,९२१ | ३४१ | ८६ | |
| | | ९६.५६ | २.७५ | ०.६९ | १२,३४९ |
| ६ | दिंडोरी | ७,०७४ | ३६८ | ६१ | ७,५०३ |
| | | ९४.२५ | ४.९३ | ०.८१ | |
| ७ | नांदुरा | ४,००८ | १७५ | ५३ | |
| | | ९४.६१ | ४.१ | १.२९ | ४,२३५ |
| ८ | मनोरा | २,९९१ | २२६ | १२ | |
| | | ९१.६४ | ७.९९ | ०.३७ | ३,२२९ |
| ९ | गंगाखेड | ५,२७३ | ४२१ | १६ | |
| | | ९२.३८ | ७.३५ | ०.२७ | ५,७०९ |
| १० | भोकरदन | ७,६८९ | ५५२ | ३६ | |
| | | ९३.०५ | ,६.५३ | ०.४२ | ८,२७७ |
| ११ | पातोडा | ४,१४९ | २३४ | १७ | |
| | | ९४.४६ | ५.१५ | ०.३९ | ४,४०० |
| १२ | करंजा | २,४६४ | ११३ | ११ | |

| अनु.क्र. | पंचायत समिती | हस्तांतरित योजनामार्फत मिळालेला निधी (कलम १००) | संस्था योजना अंतर्गत मिळालेला निधी (कलम १२३) | पंचायत समिती स्वत:चे उत्पन्न (उपकरा सहीत) | एकूण उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त निधी | प्राप्त निधी | स्वत:चे उत्पन्न | |
| | | टक्केवारी | टक्केवारी | टक्केवारी | |
| | | ९५.२२ | ४.३५ | ०.४२ | २,५८८ |
| १३ | कल्मेश्वर | ३,४०५ | ३०५ | १३ | |
| | | ९१.४६ | ८.२ | ०.३४ | ३,७२३ |
| | सरासरी | ५,६२७ | २८० | ४१ | |
| | | ९४.०३ | ४.८३ | १.१४ | ५,९४८ |

अशाप्रकारे दिसून येईल की पंचायत समितीला स्व-उत्पन्नातून अगदी थोडी रक्कम प्राप्त होते.

**६.३६ पंसच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्या करीताच्या शिफारशी:**

पंस चे स्वत:चे उत्पन्न वाढविण्याकरीता आम्ही खालील स्त्रोतांची शिफारस करतो:

**६.३६.१ व्यवस्थापन शुल्कातील हिस्सा:**

आम्ही उपरोक्त परिच्छेद ६.२३.१ मध्ये शिफारस केली आहे की जिपंना शासकीय योजनांची अंमलबजावणी करण्याकरीता २% व्यवस्थापन शुल्क आकारण्याची मुभा देण्यात यावी जेणे करून त्यांना त्याचा उपयोग आस्थापना खर्चाकरीता करता येईल. आम्ही अशी शिफारस करतो की या २ टक्क्यांची जिप आणि पंस मध्ये समसमान म्हणजेच प्रत्येकी १% याप्रमाणे वाटणी करण्यात यावी. अर्थात एका जिल्ह्यामध्ये अनेक पंचायत समित्या असल्याने १% रक्कम त्यांच्यात आपापसात विभागली जाईल.

**६.३६.२ ग्रामपंचायतींकडून वसूल करण्यात येणाऱ्या व्यवसाय करातील हिस्सा:**

आम्ही ग्रामपंचायतीवरील प्रकरणामध्ये गुजरातमधील नमुन्याप्रमाणे ग्रामपंचायतींना व्यवसाय कर वसूल करण्याची परवानगी देण्यात यावी, अशी शिफारस केली आहे. आम्ही अशी शिफारस करतो की पंचायत समित्यांना पर्यवेक्षक आणि देखरेख करणारे संचालक मंडळ म्हणून यातील २५% हिस्सा देण्यात यावा.

**६.३६.३ मुद्रांक उपकरामधील हिस्सा:**

आम्ही परिच्छेद६.१०.२ (ई) मध्ये या पूर्वीच शिफारस केली आहे की जिप आणि पंस कायद्यातील कलम १५८ मध्ये सुधारणा करून पंचायत समितीला मुद्रांक शुल्क उपकरातील ०.२५% हिस्सा देण्यात यावा.

**६.३६.४: राज्य शासनकडून किंवा जिपकडून (घसारा निधी) पंचायत समिती अध्यक्ष आणि गट विकास अधिकारी यांना स्वतंत्र वाहन पुरविण्यात यावे.**

पंचायत समिती अध्यक्षांना इतर जिप समिती अध्यक्षांप्रमाणे घसारा निधिमधून वाहनाची परवानगी देण्यात यावी. गट विकास अधिकारी यांना देखील जिप घसारा निधी किंवा योजना निधितून वाहन मिळते. महाराष्ट्रामध्ये प्रत्येक जिप मधील परिस्थिती वेगवेगळी आहे. सर्वसाधारणपणे पश्चिम महाराष्ट्रामध्ये एक पंस अध्यक्ष यांना आणि गटविकास अधिकारी यांच्याकरीता एक अशी दोन स्वतंत्र वाहन असतात. मात्र इतर अनेक जिल्ह्यामध्ये, विशेषत: मराठवाडा आणि विदर्भामध्ये, जेथे जिपचे स्वत:च्या उत्पन्नाचे स्त्रोत कमकुवत आहेत तेथे दोघांमध्ये एकच वाहन असते, त्यामुळे वाद होतात. आम्ही अगदी जोरदारपणे शिफारस करतो की शासनने पंचायत समितीच्या अध्यक्षांची पत आणि गट विकास अधिकाऱ्याचा कार्यभार विचारात घेऊन दोघांनाही स्वतंत्र वाहन असण्याबाबत शासन निर्णय जारी करावा. शासनने याकरीताचा निधी जिप घसारा निधितून देण्याचे निर्देश द्यावेत आणि सर्वोच्च प्राधान्याने दोघांनाही द्यावेत. कामाचा प्रचंड भार असलेल्या गट विकास अधिकाऱ्याकरीता जो गटातील सर्व विकास कामांवर सनियंत्रण करत असतो ही बाब अत्यंत प्रोत्सहनात्मक ठरेल.

---

# प्रकरण -७

## ग्राम पंचायतींच्या वित्त व्यवस्थेचे /अर्थव्यवस्थेचे मुल्यांकन

### ७.१. पार्श्वभूमी:

सन १९५९ मध्ये भारत सरकारने श्री. बलवंत राय मेहता यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्षम स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती करण्यासाठी एक समिती स्थापन केली होती. पंचायत राज संस्थाना कार्ये, वित्तसहाय्य आणि अधिकारी यांच्या हस्तांतरणाद्वारे बळकटी देण्यासाठी समितीने अनेक सूचना केल्या होत्या. संपूर्ण देखरेख, योजनांची आखणी आणि गरज भासल्यास निधी उपलब्ध करून देणे इत्यादी कार्ये स्वत: सरकारने करावयाची होती, त्याचबरोबर ग्रामीण पातळीवरील कार्ये ग्रामपंचायतींकडे सोपवयाची होती. ग्रामपंचायतींची निर्मिती प्रौढ मताधिकार आधारित थेट निवडणूकीने करावयाची होती.

याचा पाठपुरावा करण्यासाठी, बलवंत राय मेहता समितीच्या शिफारशींनुसार, पंचायत राज्य संस्थांच्या निर्मितीकरिता तपशील तयार करण्यासाठी श्री. वसंतराव नाईक, तत्कालीन महसूल मंत्री (नंतरचे महाराष्ट्र राज्याचे मुख्य मंत्री) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७ जून, १९६० रोजी एक समिती गठीत करण्यात आली. ग्रामपंचायतीची प्रस्थापना अंर्तभूत असलेली पंचायत राज संस्थांची त्रिस्तरीय संरचना बलवंत राय मेहता समितीने केलेल्या शिफारशींवर आधारित आहे. नाईक समितीने २०००० पेक्षा कमी परंतु १००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांसाठी किंवा गावांच्या गटासाठी ग्रामपंचायती स्थापना करण्याचा सल्ला दिला आहे आणि तसेच ग्रामपंचायतींसंबंधी तलाठयांद्वारे केली जाणारी सर्व कामे पूर्णवेळ ग्रामसेवकांकडे सोपविण्याचा सल्ला दिला आहे. समितीने ग्रामीण संस्थांचे निधी, अधिकार आणि कार्य कर्तव्ये यांचे विकेंद्रीकरण याबाबत तपशीलवार शिफारशी केल्या आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ मध्ये या शिफारशींचा समावेश करण्यात आलेला आहे.

### ७.२. ग्रामपंचायत -कायदेशीर दर्जा:-

महाराष्ट्रातील ग्रामपंचायती महाराष्ट्र ग्रामपंचायती अधिनियम, १९५९ अन्वये नियंत्रित केल्या जातात. ग्रामपंचायती पूर्वीपासून चालत आलेली परंपरा असून त्या स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व असलेल्या संयुक्त संस्थां आहेत. ग्रामपंचायती जंगम आणि स्थावर मालमत्ता धारण करू शकतात. त्यांना दावा दाखल करता येतो आणि त्यांच्यावर देखील दावा दाखल करता येतो (कलम ९). परंतु त्यांची अशा प्रकारे कार्यात्मक रचना करण्यात आली आहे की ग्रामपंचायती जिल्हा परिषद अधिकारी आणि जिल्हा परिषद यंत्रणेच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असतील.

### ७.३. ग्रामपंचायती आणि ७३वी संविधानात्मक सुधारणा:-

दिनांक २४ एप्रिल १९९३ पासून कार्यान्वित करण्यात आलेल्या ७३व्या संविधानात्मक सुधारणेनंतर ग्रामपंचायतींचा दर्जा चांगल्या प्रकारे उंचावला. आता त्यांना संविधानात्मक दर्जा दिला गेला आहे (अनुच्छेद २४३),त्यामुळे ग्रामपंचायतींना काही विशेष अधिकार आणि मूल्ये प्राप्त झाली. यामध्ये नियमित

निवडणूका, विभागीय स्तरांवर आणि अध्यक्षीय पदावर दुर्बल घटकांसाठी आरक्षण यांचा समावेश आहे. तसेच महिलांसाठी समांतर आरक्षण देखील आहे. तसेच ज्यामध्ये सर्व प्रौढ निवासी सदस्यांना सहभाग घेण्याचा अधिकार आहे, असा ग्रामसभेचा संविधानात निर्देश करण्यात आला आाहे. शिवाय संविधानाद्वारे अनिवार्य केल्याप्रमाणे राज्य निवडणूक आयुक्त यांच्या देखरेखीखाली नियमित निवडणूका आयोजित केल्या जातात.

केरळ आणि पश्चिम बंगाल सारख्या राज्यांनी सशक्त ग्रामपंचायतींना प्राधान्य दिले आहे. त्या राज्यांनी लक्षणीय प्रमाणात हस्तांतरण निधी, कार्यकर्तव्ये आणि अधिकार यांचे विकेंद्रीकरण केले आहे. ग्रामपंचायतींचे आकारमान देखील विस्तृत आहे. महाराष्ट्रात कार्यकर्तव्ये, निधी आणि अधिकार यांच्या विकेंद्रीकरणात थोडे असंतुलन दिसून येते. निधी आणि अधिकारांचे विकेंद्रीकरण कार्यकर्तव्यांच्या विकेंद्रीकरणाशी जुळत नाही, त्यामुळे त्यांना आर्थिकदृष्टया शासन आणि वरिष्ठ संस्थांवर अवलंबून रहावे लागते.

**७.४. ग्रामपंचायतींची लोकसंख्या -एक विश्लेषण:-**

महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींच्या आकारमानात सर्वाधिक भिन्नता आहे. गट ग्रामपंचायतीमधील (जेथे अनेक वसाहतींचा समूह असतो ती गट ग्रामपंचायत) प्रत्येक गावासाठी (वसाहत) ठराव मंजूर करणे आणि स्वतंत्र ग्रामपंचायतीसाठी विनंती करणे असा कल दिसून येतो. ग्राम विकास विभागाचे जुने परिपत्रक क्रमांक व्हीपीएम-११८९/सीआर ३०१०/२२ दिनांक ५ फेब्रुवारी,१९८९ अनुसार नवीन ग्रामपंचायतीच्या स्थापनेसाठी लोकसंख्येचे प्रमाण ६०० किंवा त्यापेक्षा अधिक होते आणि काही अपवादात्मक प्रकरणात, उदा. जर तो आदिवासी पाडा (वसाहत) असेल आणि गावांमधील अंतर जास्त असेल, तर लोकसंख्येचे प्रमाण ३०० होते. ग्राम विकास विभागाचे नवीन परिपत्रक क्रमांक व्हीपीएम-२६०३/सीआर १५४४/पीआर-४, दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ अंमलात येईपर्यंत सदर प्रमाण संपूर्णत: लागू करण्यात येत असे. बहुतांशी नवीन ग्रामपंचायती जुन्या शासन निर्णयाच्या कालावधीत स्थापन करण्यात आल्या होत्या.

नवीन ग्रामपंचायतींच्या स्थापनेसाठी/विभाजनासाठी उपरोक्त शासन निर्णय, दिनांक १२फेब्रुवारी, २००४ मध्ये विहित केलेल्या नवीन मार्गदर्शक तत्वांनुसार, खालील बाबी आवश्यक आहेत:-

क. लोकसंख्या कमीत कमी २००० असणे आवश्यक आहे, परंतु जर तो आदिवासी पाडा (वसाहत) असेल आणि दोन गावांमधील अंतर ३ किलोमीटर पेक्षा जास्त असेल, किंवा प्रकल्प बाधित गाव असेल तर लोकसंख्येचे निकष/प्रमाण १००० पर्यंत कमी करण्यात आले आहे.

ख) नवीन ग्रामपंचायतीत दरडोई उत्पन्न रू.३०/- असणे आवश्यक आहे, परंतु जर ग्रामपंचायत डोंगराळ प्रदेशात असेल तर दरडोई उत्पन्न रू.२५/- असले पाहिजे आणि प्रकल्प बाधित गाव असेल तर दरडोई उत्पन्न रू. २०/- असले पाहिजे.

प्रत्यक्षात अनेक नवीन ग्रामपंचायती “तीन किलोमीटर अंतर” असल्याच्या कारणाखाली स्थापन करण्यात आल्या आहेत. अशा प्रकारे महाराष्ट्रात आता साधारणपणे २८,००० ग्रामपंचायती आहेत

आणि ४५,००० महसुली गावे आहेत. यामुळे ग्रामपंचायतींचे लोकसंख्येचे आकारमान कमी होत आहे.

लोकसंख्येनुसार ग्रामपंचायतींचे व्यापक वर्गीकरण खाली दर्शविण्यात आले आहे -

(जनगणना २०११)

**तक्ता ४० : लोकसंख्येनुसार ग्रामपंचायतींचे प्रवर्ग:-**

| लोकसंख्या<br>जिल्हा:- | ०-१००० | १००१-२००० | २००१-३००० | ३००१-४००० | ४००१-५००० | ५००१-६००० | ६००१-७००० | ७००१-८००० | ८००१-९००० | ९००१-१०००० | १०००० व त्यापेक्षा जास्त | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अहमदनगर | १५९ | ४८५ | २७९ | १५३ | ८९ | ५१ | २७ | १८ | १२ | ५ | ३८ | १३१६ |
| अकोला | १४१ | २४२ | ७३ | ३५ | १३ | १३ | ६ | ४ | १ | ३ | १० | ५४१ |
| अमरावती | १५४ | ३७७ | १७२ | ६६ | २९ | ८ | ७ | ५ | ३ | ४ | १८ | ८४३ |
| औरंगाबाद | १०९ | ३५३ | २०३ | ८८ | ३७ | २४ | १० | ९ | ४ | ५ | १८ | ८६० |
| बीड | २१० | ४५० | २०२ | ७९ | ४० | १७ | ४ | ६ | ४ | २ | १० | १०२४ |
| भंडारा | ११८ | २५९ | ८८ | ४० | १४ | ६ | ३ | १ | २ | ४ | ४ | ५३९ |
| बुलडाणा | ९० | ४३५ | १९२ | ६२ | ३१ | १८ | ४ | ९ | ४ | ३ | १९ | ८६७ |
| चंद्रपूर | १९३ | ४४४ | ११४ | ३५ | २३ | १५ | ३ | ० | २ | ३ | ११ | ८४३ |
| धुळे | ५७ | २०० | १२६ | ७३ | ३७ | २१ | ८ | ८ | ५ | २ | १२ | ५४९ |
| गडचिरोली | ७८ | २१३ | १०५ | ३७ | १४ | ४ | ७ | ३ | १ | ० | ५ | ४६७ |
| गोंदिया | ६८ | २५३ | १६१ | ४० | १० | ११ | २ | २ | ४ | १ | ३ | ५५५ |
| हिंगोली | १४४ | २६८ | १०६ | १७ | १५ | ३ | ३ | १ | १ | ३ | ४ | ५६५ |
| जळगांव | १८२ | ४८० | २२० | ११० | ५२ | ३२ | १६ | १८ | १२ | १० | २० | ११५२ |
| जालना | १०९ | ४०८ | १६० | ५४ | १८ | १० | ५ | ६ | २ | १ | ७ | ७८० |
| कोल्हापूर | २०९ | ३६९ | १८२ | ९१ | ४८ | ३५ | २३ | १६ | ७ | ९ | ३५ | १०२४ |
| लातूर | १२० | ३२५ | १८६ | ६९ | २८ | १६ | १० | ८ | ६ | २ | १३ | ७८३ |
| नागपूर | १७६ | ३६६ | १०९ | ४२ | १८ | १२ | १० | ६ | ७ | ४ | २१ | ७७१ |
| नांदेड | ३२२ | ५७८ | २४३ | ८२ | २८ | १८ | १० | ७ | ५ | २ | ८ | १३०३ |
| नंदुरबार | ६२ | २५८ | १४० | ५१ | २२ | १० | १० | ९ | ५ | ४ | ६ | ५७७ |
| नाशिक | १२९ | ५५५ | ३४९ | १६३ | ६५ | ४७ | २० | १६ | ६ | ७ | २१ | १३७८ |
| उस्मानाबाद | १११ | २८९ | १०४ | ६६ | ४९ | २१ | १२ | ११ | ७ | ५ | १८ | ४७६ |
| पालघर | ३६ | १४७ | १०४ | ६६ | ४९ | २१ | १२ | ११ | ७ | ५ | १८ | ४७६ |
| परभणी | २०६ | २८५ | १२९ | ४२ | २० | ९ | ४ | ४ | १ | १ | ४ | ७०५ |
| पुणे | ३७० | ४४३ | २२३ | १२३ | ५६ | ५३ | २६ | १५ | १२ | ११ | ६० | १३९२ |
| रायगड | २११ | २८४ | १३० | ८५ | ४४ | २८ | १२ | ५ | ५ | ३ | १७ | ८२४ |
| रत्नागिरी | २६४ | ३६९ | १३४ | ४२ | १७ | ७ | ५ | ४ | २ | ० | ३ | ८४७ |
| सांगली | १२८ | २३१ | १२५ | ७१ | ३५ | ३६ | २३ | १२ | ७ | ९ | २७ | ७०४ |
| सातारा | ६५४ | ४५६ | १८३ | ९३ | ४५ | १९ | १६ | ६ | ४ | ८ | १५ | १४९९ |
| सिंधुदुर्ग | १३० | १८० | ७१ | २१ | १३ | ७ | ३ | १ | ३ | २ | २ | ४३३ |
| सोलापूर | १३४ | ३४८ | २१७ | १४६ | ६८ | ३८ | २९ | १२ | ११ | ५ | २४ | १०३२ |
| ठाणे | ७७ | १७७ | ८२ | ४८ | १६ | १४ | १२ | ० | ३ | १ | २५ | ४५५ |
| वर्धा | १५२ | २५५ | ५७ | २२ | ६ | २ | ५ | ४ | ३ | ३ | ९ | ५१८ |
| वाशिम | ५९ | २७१ | ९६ | ३९ | १५ | ७ | १ | ० | १ | १ | ३ | ४९३ |
| यवतमाळ | ३०८ | ५५० | २१२ | ६१ | ३३ | १० | ११ | ४ | ६ | ३ | ११ | १२०९ |
| **एकूण:-** | **५६७०** | **११६०३** | **५२७७** | **२२९२** | **१०७४** | **६३८** | **३५४** | **२३८** | **१६०** | **१२९** | **५१०** | **२७९४५** |

**आलेख २३:- ग्रामपंचायतींचे विश्लेषण -लोकसंख्येच्या आकारमानावर आधारीत**




अशा प्रकारे उपरोक्त आलेखावरून असे दिसून येते की महाराष्ट्रातील ६२% ग्रामपंचायतींची लोकसंख्या ०-२००० मध्ये आहे.

**आलेख २४:- ग्रामपंचायतींच्या विविध प्रवर्गात राहणाऱ्या ग्रामीण लोकसंख्येची टक्केवारी**




अशा प्रकारे असे दिसून येते की, महाराष्ट्राची ३७% ग्रामीण लोकसंख्या ग्रामपंचायत विभागाच्या २००१-४००० श्रेणीत राहत आहे.

## ७.५. ग्रामपंचायतीच्या आकारमानाबाबत राज्य वित्त आयोगाची शिफारस:-

उपरोक्त आकडेवारी वरून असे दिसून येईल की ग्रामपंचायतीच्या लोकसंख्येचे आकारमान कमी होत आहे. गट ग्रामपंचायती यामध्ये समाविष्ट होण्याचे टाळून प्रत्येक वसाहत एक नवीन ग्रामपंचायत म्हणून रुपांतरित करण्याकडे कल असतो. यामुळे व्यवहार्य समस्या निर्माण झाल्या आहेत. प्रत्येक ग्रामपंचायतीला, लहान असली तरीही, वित्तीय नोंदींचा दस्तऐवज ठेवणे, नियमित बैठका घेणे इत्यादी बाबी आवश्यक आहेत. जेथे घरांची संख्या केवळ १००-२०० असते, त्या ५००-१००० श्रेणीच्या लहान ग्रामपंचायतीसाठी पूर्णवेळ सचिव नियुक्त करणे राज्याला आर्थिकदृष्टया उपयुक्त नसते. परंतु अशा ग्रामपंचायती आदिवासी आणि इतर क्षेत्रांत अस्तित्वात आहेत.

सशक्त ग्रामपंचायती असलेली केरळ सारखी राज्ये जेथे ग्रामपंचायतींचे आकारमान १५०००-२०००० असते, तेथे विविध प्रकारच्या सेवा उपलब्ध करून देण्याची आणि स्थानिक नेतृत्व विकसित करण्याची क्षमता निर्माण होते. असे अवगत झाले आहे की, कर्नाटक राज्याने देखील उत्तम प्रशासनाच्या दृष्टीने त्यांच्या ग्रामपंचायतींच्या आकारमानात सुधारणा केली आहे. महाराष्ट्रातील २८,००० ग्रामपंचायतींच्या तुलनेत कर्नाटक राज्यात केवळ ६,०२२ ग्रामपंचायती आहेत.

ग्रामपंचायतीच्या आकारमानाचे सर्वसमावेशकपणे परीक्षण करणे तातडीची गरज आहे, कारण सध्याचे आकारमान आणि लहान आकारमानाची प्रवृत्ती प्रशासकीय व्यवहार्यतेवर परिणाम करते.

## ७.६. ग्रामपंचायतीचीं कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या:

महाराष्ट्र ग्राम पंचायती अधिनियम, १९५८ याचे परिशिष्ट-१ मध्ये ग्राम सूची देण्यात आली आहे, यामध्ये ग्राम पंचायतींवर सोपविण्यात आलेल्या कार्यांच्या यादीचा समावेश आहे. विधीमंडळाच्या पूर्व मान्यतेने राज्य शासनाला या यादीतील कोणतीही नोंद वगळता येईल किंवा त्यामध्ये समाविष्ट करता येईल. या यादीत पुढील बाबींचा समावेश आहे उदा. शेती, पशुपालन, वने, शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, जलसिंचन, इमारती, संपर्क साधने, आणि सामाजिक कल्याण इत्यादी. ग्रामपंचायतींनी यापैकी कोणत्याही किंवा सर्व कार्यांसाठी /बाबींसाठी ग्राम निधी मधून योग्य तरतूद केली पाहिजे, ज्यामध्ये ग्रामपंचायतींना प्राप्त होणारा सर्व निधी ठेवला पाहिजे.

परिशिष्ट -१ मधील सूची फार लांबलचक आणि सर्व समावेशक आहे, तरी ग्रामपंचायतींचे महत्वाचे उपक्रम खालील प्रमाणे आहेत:-

- नागरी सुविधा, सार्वजनिक स्वच्छता, स्थानिक सांडपाणी विसर्जनाची आरोग्यदायक यंत्रणा, मलनि:सारण, आणि घन कचऱ्याचे व्यवस्थापन - संकलन, वाहतूक आणि विल्हेवाट
- पथदिवे आणि त्यांची देखरेख/परिरक्षण
- गावामधील रस्त्यांची देखरेख
- दफनभूमी आणि दहनभूमी यांची देखरेख/परिरक्षण

- जन्म व मृत्युचे दाखले देणे
- स्थानिक रहिवासी दाखले आणि इतर अशा प्रकारचे दाखले देणे
- गावठाणात बांधकाम, दुरूस्ती आणि विस्तार इत्यादींसाठी परवानगी देणे
- वसाहतींसाठी घरगुती पाण्याची तरतूद (पेयजलासह) करणे

अलिकडच्या काळात ग्रामपंचायतींच्या उपक्रमांत वेगाने भर पडल्याचे दिसून येते. ग्रामपंचायत ग्रामीण रोजगार योजना जसे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राबवित आहे आणि विविध कल्याणकारी योजना जसे ग्रामीण गृहनिर्माण, ग्रामीण उपजिविका मोहिम, आणि राज्य पुरस्कृत इतर योजना आणि कार्यक्रम इत्यादी उपक्रमातील लाभार्थींना मंजुरी देते.

**७.६. ग्रामपंचायतीचे अंदाजपत्रक आणि लेखे:-**

**७.६.१. अधिनियमातील तरतूद:-**

प्रत्येक ग्रामपंचायतीकडे 'ग्राम निधी' (कलम ५७) असणे अपेक्षित आहे, ज्यामध्ये शासनाकडून प्राप्त झालेले सहाय्यक अनुदान, नियुक्त कर, कर उत्पन्न आणि करेतर उत्पन्न यांचा समावेश असतो. थोडक्यात, योजनात्मक किंवा प्रयोजनात्मक निधी खेरीज सर्व उत्पन्न या ग्राम निधीत जमा करावयाचा आहे.

ग्रामपंचायतीने वार्षिक आर्थिक अंदाजपत्रक पंचायत समितीला सादर करणे आवश्यक आहे. (कलम ६२)

लेखे आणि ग्रामीण नोंदी ठेवण्यासाठी आवश्यक नमुने शासनाद्वारे विहित केले जातील. ग्रामपंचायतीच्या सचिवाने ग्रामपंचायतीच्या मान्यतेसाठी वार्षिक लेखे सादर केले पाहिजेत आणि सदर लेखे मान्य करून घेतले पाहिजेत. मान्यताप्राप्त लेखे वार्षिक प्रशासकीय अहवालासह जिल्हा परिषदेकडे पाठविले पाहिजेत. (कलम ६२).

**७.७. लेखापरीक्षा व्यवस्था:-**

ग्रामपंचायतीच्या लेख्यांचे लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाद्वारे केले जाते. ग्रामपंचायतीचे उत्पन्न आणि खर्च खूप मर्यादित असतात, आणि ग्रामपंचायतीची मालमत्ता कमी असते, त्यामुळे लेखे मंजूर करण्यासाठी वेगळी व्यवस्था /यंत्रणा नाही. स्थानिक निधी लेखापरीक्षक एकाच वेळी रोकडवही (Cash Book), नोंदी (Records), आणि सर्व इतर वित्तीय बाबींची तपासणी करतात.

**७.८. ग्रामपंचायतीच्या नोंदी आणि त्यांच्या संगणकीकरणासाठी केलेले प्रयत्न:-**

सन २०११ पूर्वी शासनाने २७ नोंदवह्या (registers) विहित केल्या होत्या, ज्या ग्रामपंचायतीला जतन करणे आवश्यक असे. त्यानंतर सन २०११ मध्ये कलम ६२ सह कलम १७६ अंतर्गत शासनाने अधिकाराचा वापर करून ग्रामपंचायत लेखा संहिता २०११ (Grampanchayat Account Code २०११) अधिसूचित केला. या संहिता अनुसार ३३ नोंदवह्यांचा (registers) सुधारित संच विहित करण्यात आला. अशा रीतीने -ग्रामपंचायत लेखा संकेतांक २०११ अनुसार ग्रामपंचायत स्तरावर सदर ३३ नोंदवह्या (registers) जतन करावयाच्या आहेत.

पंचायत राज मंत्रालय, भारत सरकार, पंचायत राज लेखे कार्यक्षम करण्यासाठी प्रयत्नशील आहे, आणि त्यासाठी ई-पंचायत एन्टरप्राईझ सुट (पीईएस आणि राष्ट्रीय पंचायत पोर्टल (National Panchayat Portal) यांचा प्रसार करीत आहे. राष्ट्रीय माहिती केंद्र द्वारे सदर प्रणाल्या विकसित करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये ११ संगणक आज्ञावलींचा (Softwares) समावेश आहे. ग्रामपंचायतीशी संबंधित सर्व

विविध प्रकारच्या माहितींचा त्यात समावेश आहे. इतर गोष्टींबरोबर, त्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे:-

- स्थानिक शासन निर्देशिका- कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी आणि देशातील प्रत्येक ग्रामपंचायतीच्या अनन्य ओळख संकेतांक (Unique ID) यांच्या पूर्ण तपशीलासह
- क्षेत्रीय रूपरेषा (Area Profiler)
- Plan Plus -संगणक आज्ञावली -ग्रामपंचायत योजनांबाबत माहिती.
- PRIA Soft -लेख्यांबाबत संगणक आज्ञावली
- Action Soft -कार्यवाहींबाबत संगणक आज्ञावली
- राष्ट्रीय मालमत्ता निर्देशिका (National Asset Directory)
- सामाजिक लेखापरीक्षा आणि बैठक व्यवस्थापन (Social Audit and Meeting Management)
- Service Plus -नागरिकांना देण्यात येणा-या सेवांबाबत संगणक आज्ञावली
- प्रशिक्षण व्यवस्थापन (Training Management)
- राष्ट्रीय पंचायत पोर्टल (National Panchayat Portal)

सामान्यत: कल्पना अशी आहे की ग्रामपंचायतीची सर्व माहिती ग्रामीण स्तरावर अपलोड करणे सुलभ झाले पाहिजे आणि विश्लेषणासाठी आणि निर्णय घेण्यासाठी विभाग, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरांवर सदर माहिती एकत्रित केली पाहिजे. सर्वाधिक माहिती सार्वजनिक संकेतस्थळी(डोमेनवर) स्थलांतरित होत असल्याने त्याबाबत पारदर्शकता प्रस्थापित करणे हा उद्देश आहे.

पंचायत राज्य मंत्रालयाची PES संगणक आज्ञावली कार्यान्वित करण्यात महाराष्ट् आघाडीवर राहिला आहे आणि त्यासाठी राष्ट्रीय पारितोषके मिळविली आहेत. संग्राम प्रकल्प, ज्या अंतर्गत हे करण्यात आले, तो प्रकल्प फार वर्षापूर्वीच सुरू करण्यात आला होता.

**७.९. ऑनलाईन नोंदींचे महत्व आणि गरज:-**

ग्रामपंचायतींकडून माहितींचे संकलन विशेषत: वित्तीय माहितीचे संकलन करणे सुलभ नाही. ई-लेखे आणि ई-नोंदवह्या असा बदल केल्याने विश्वासार्ह माहिती प्राप्त होण्यासाठी आणि ग्रामपंचायतीच्या कामगिरीवर परिणामकारक रीतीने देखरेख ठेवण्यासाठी मदत होते, तसेच विश्लेषण करण्यासाठी आणि सर्व स्तरांवर जास्त परिणामकारक रितीने निर्णय घेण्यासाठी मदत होते. यामुळे पारदर्शकतेस पुष्टी मिळते, कारण ग्रामपंचायतींच्या सर्वाधिक नोंदी सार्वजनिक डोमेनवर असतात. जेव्हा माहिती तात्काळ उपलब्ध असते तेव्हा राज्य वित्त आयोगाचे कामही सुलभ होते. वस्तुत: सर्व वित्त आयोगांप्रमाणे या राज्य वित्त आयोगाला क्षेत्रातून विश्वासार्ह माहिती मिळविण्यासाठी फार प्रयत्न करावे लागले आहेत.

**७.१०. ग्रामीण नोंदी आणि लेखे यांचे संगणकीकरण करण्यात येणाऱ्या समस्या:-**

ग्रामीण नोंदींचे संगणकीकरण आणि त्या नोंदी ऑनलाईन दाखल करणे हे एक आव्हानात्मक काम आहे, कारण २८००० ग्रामपंचायतींच्या सचिवांची आकलनशक्ती आणि क्षमता याचा स्तर समान असू शकत नाही. तसेच विकास आणि क्षमता याबाबत ग्रामपंचायतीचा स्तरही भिन्न असतो. पुष्कळ दुर्गम आणि जंगल प्रदेशातील ग्रामपंचायतींमध्ये इंटरनेट संबंधन (connectivity) आणि त्याबाबत समस्या असू शकतात.

सध्या राष्ट्रीय माहिती केंद्राने लेख्यांसाठी विकसित केलेली PRIASoft लेखा संगणक आज्ञावली व्यापकतेने वापरली जात आहे, तरी देखील लेखे व्यवस्थापनाची गुणवत्ता अपेक्षेनुसार असेलच असे नाही. तथापि, लेखापरीक्षा आणि तपासणी प्रयोजनांसाठी स्थूल प्रत्यक्ष लेखा नोंदी ठेवणे आवश्यक आहे. या

कारणामुळे पूर्णत: बदल झालेला दिसून येत नाही. त्याचप्रमाणे भारत सरकारच्या पंचायत ई-सॉफ्टवेअरच्या वापरामध्ये, काही नोंदवह्या व्यापकतेने वापरल्या जातात, परंतु काही वापरल्या जात नाहीत.

गेल्या वर्षी शासनाने शासन निर्णय दिनांक २४.१.२०१८ अन्वये ई-ग्रामसॉफ्ट प्रकल्प सुरू केला, ज्यात ग्रामपंचायतींना कागद विरहित होण्यासाठी मदत करण्याकरिता संगणक आज्ञावली (Software) विकसित केली. म्हणजेच ग्रामपंचायती सरतेशेवटी कागद विरहित होतील आणि सर्व नोंदी सॉफ्ट कॉपींच्या रूपात अस्तित्वात राहतील. कथितपणे नजिकच्या भविष्यात अंदाजे १०% ग्रामपंचायती या पध्दतीचा अवलंब करतील.

**७.११. ई-पंचायत उपक्रम संकलित करण्याबाबत राज्य वित्त आयोगाच्या शिफारशी:-**

या अगोदर नमूद केल्याप्रमाणे ग्रामीण नोंदींचे संगणकीकरण आणि त्यांचे ऑनलाईन व्यवस्थापन आव्हानात्मक काम आहे. राज्याच्या काही विकसित क्षेत्रांमध्ये हे सुलभ असेल, परंतु सर्व २८००० ग्रामपंचायतींमध्ये बदल घडवून आणण्यासाठी निरंतर प्रयत्न करणे आवश्यक असेल. महाराष्ट्र इतर राज्यांच्या तुलनेत सुधारलेले आहे आणि १३व्या व १४व्या वित्त आयोगांचे निधी लक्षणीय प्रमाणात संगणकीकरण प्रकल्पावर खर्च केले आहेत. यशस्वी होण्यासाठी निरंतर दिर्घकालिन प्रयत्न आवश्यक आहेत. ग्रामीण स्तरावरील चर्चेतून असे दिसून आले की, एकदा योग्य रीतीने नोंदी करणे अवगत झाले की ग्रामसेवकांना ऑनलाईन नोंदी ठेवणे सुलभ आणि कमी त्रासदायक वाटते. याबाबत राज्य वित्त आयोगाने खालील व्यवहार्य शिफारशी केलेल्या आहेत:-

- PRIASoft -संगणक आज्ञावली मध्ये उत्पन्न आणि खर्च यांच्या विविध बाबींसाठी देण्यात आलेल्या चार अंकी क्रमांकासह काही विशिष्ट प्रमाणभूत लेखा संकेतांक (अर्थसंकल्पीय रूपरेषा -budget line) आहेत. अशा प्रकारचे प्रत्यक्ष उपयुक्त लेखा क्रमांक (अर्थसंकल्पीय रूपरेषा शीर्ष) महाराष्ट्राचे ग्रामपंचायत लेखा संहिता, २०११ मध्येही द्यावेत, यामुळे PRIASoft -संगणक आज्ञावली आणि राज्य नोंदवह्या पूर्णपणे संरेखित/ सुसंगत होतील.
- PRIASoft -संगणक आज्ञावली इंग्रजीमध्ये असल्याने ग्रामपंचायत स्तरावर काही प्रमाणात भाषेचा अडथळा येतो. याबाबतीत वापरकर्त्यास अनुकूल अशी एक लहान मराठी-इंग्रजी मार्गदर्शिका ग्रामसेवकांना त्यांचा मानसिक अवरोध दूर करण्यास मदत करील.
- सामान्यत: माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात तरूण आणि कनिष्ठ कर्मचारी संगणकाचे जास्त जाणकार असतात. ग्रामीण क्षेत्रात देखील असे घडते जेथे शैक्षणिक संस्थामधून आलेले नवशिके कनिष्ठ ग्राम सेवक संगणकीय लेख्यांबाबत जास्त प्रतिसादक्षम असू शकतात, त्याचवेळी त्यांचे वरिष्ठ, जसे वरिष्ठ ग्रामसेवक, विस्तार अधिकारी, गट विकास अधिकारी तेवढे प्रतिसादक्षम असतीलच असे नाही. विस्तार अधिकारी, गट विकास अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी इत्यादीं वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांच्या सखोल प्रशिक्षणाच्याद्वारे सदर समस्या हाताळणे गरजेचे आहे. कारण ग्रामीण नोंदींच्या संगणकीकरणासाठी वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांचा पाठिंबा आवश्यक आहे.
- आवश्यकता असल्यास, स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाने संगणकीय नोंदींची लेखापरीक्षा करणे याबाबीशी परिचित होणे गरजेचे आहे. असे अवगत झाले आहे की महालेखापालांनी सदर बदल सुलभव्हावा यासाठी काही उपक्रम सुरू केले आहेत.
- सांप्रत ई-नोंदी ठेवण्यातील प्रगती काहीशी अनियमित आहे, आणि एकाच पंचायत समिती किंवा

जिल्ह्यातील पुष्कळ ग्रामपंचायती प्रगत आहेत, परंतु इतर ग्रामपंचायती खूपच मागे आहेत. जर पहिल्या टप्प्यात एक पंचायत समिती (प्रति जिल्हा) परिणामकारक आणि निरंतर प्रशिक्षण आणि इतर पाठिंब्यांच्या द्वारे संपूर्णत: ऑनलाईन केली तर ते धोरणात्मकदृष्ट्या जास्त परिणामकारक होईल. या गटांतील ग्रामपंचायती कागदविरहित होऊ शकतील. त्यांनतर प्रत्येक जिल्ह्यातील मार्गदर्शक पंचायत समितींचे अवलोकन केल्यानंतर, इतर पंचायत समित्या देखील एकामागून एक त्यांचे अनुसरण करतील.

## ७.१३. ग्रामपंचायतींची महसूल साधने आणि त्यांचे विश्लेषण (१२२)

**आलेख २५ : ग्रामपंचायतींच्या महसूल साधनांचे पुढील आकृतीद्वारे योग्य स्पष्टीकरण दिले आहे.**




## ७.१४. ग्रामपंचायतीचे स्वत:चे उत्पन्न/महसूल:-

### ७.१४.१. कलम १२४ अंतर्गत आकारण्यात येणारे कर आणि संबंधित उत्पन्न/महसूल:-

अधिनियमाचे कलम १२४ मध्ये ग्रामपंचायतींना आकारता येतील असे विविध प्रकारचे सर्व कर सूचीबध्द करण्यात आले आहेत. तथापि, हा अधिनियम असेही सूचित करतो की, राज्य शासनाद्वारे निश्चित करण्यात येतील अशा किमान आणि कमाल दरांच्या अधीन राहून आणि अशा पध्दतीने आणि विहित करण्यात येणाऱ्या करसवलतींच्या अधीन राहून करांची आकारणी करता येईल. अन्य शब्दात नमूद करावयाचे असल्यास, कर शासनाच्या मार्गदर्शक तत्वांद्वारे नियंत्रित करण्यात येतात. त्यानुसार शासनाने महाराष्ट्र ग्राम पंचायत कर आणि शुल्क नियम, १९६० अधिनियमित केले, ज्यामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत.

### ७.१४.२.इमारती आणि जमिनी यांवरील कर:-

गृह कर किंवा मालमत्ता कर ग्रामपंचायतींच्या स्व-उत्पन्नाचे प्रमुख स्रोत आहेत. ग्रामपंचायत अधिनियम कलम १२४(१) मधील अधिकृत तरतुदीनुसार यांचे संकलन करण्यात येते. पूर्वी सदर कर क्षेत्राधारित संकलित करण्यात येत होते. तथापि, सदर बाबत व्यथित पक्षाने न्यायालयात आव्हान दिले होते आणि न्यायालयाने गृह कर संकलनाच्या पध्दतीबाबतची अस्तित्वात असलेली मार्गदर्शक तत्वांचे पुनर्विलोकन करण्याचे आदेश दिले. (२०१५)

त्यानुसार ग्राम विकास विभागाने ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १७६ अंतर्गत त्यांच्या अधिकाराचा वापर करून दिनांक दिनांक ३१ डिसेंबर,२०१५ रोजीच्या नवीन अधिसूचना निर्गमित केली.

असे दिसून येते की दिनांक ३१.१२.२०१५ रोजीची नवीन मार्गदर्शक सूचना मालमत्तेच्या भांडवली मूल्यावर आधारित आहेत. क्षेत्रीय अहवालांवरून् आम्हाला असे समजले की नवीन व्यवस्था सुरळीतपणे कार्यरत आहे आणि ग्रामपंचायतींच्या गृह कर उत्पन्नात २०१५ नंतर लक्षणीय वाढ झाली आहे. ग्राम विकास विभागाने नमुद केले आहे की आतापर्यंत मालमत्तेच्या भांडवली मूल्याबाबतच्या नवीन मार्गदर्शक तत्वांबाबत कोणताही दावा/आक्षेप दाखल झालेला नाही.

भांडवली मूल्य अंगिकारण्यात आल्यानंतर ग्रामपंचायतींचे उत्पन्न/ महसूल कसे वाढले याबाबतची काही उदाहरणे खाली देण्यात आली आहेत.

प्रत्येक प्रकारच्या ग्रामपंचायतीसाठी मालमत्ता कराची परिगणना पध्दतीत भांडवली मूल्य पध्दती अनुसार बदल केल्यानंतर सन २०१५-१६ आणि सन २०१६-१७ या दोन वर्षात टक्केवारीमध्ये झालेली वाढ खालील तक्ते दर्शवित आहेत.

**तक्ता ४१ : ३००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींमधील मालमत्ता करातील बदल**

(रूपये लाखात)

| अनुक्रमांक | जिल्हा | ग्रामपंचायत | २०१४-२०१५ | २०१५-२०१६ | | २०१६-२०१७ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | एकुण मालमत्ता कर मागणी (जुन्या दराप्रमाणे) | एकुण मालमत्ता कर मागणी (३१ डिसेंबर,२०१५ रोजी सुरू करण्यात आलेल्या नवीन पध्दती अनुसार) | टक्केवारीतील वाढ | एकुण मालमत्ता कर मागणी (३१ डिसेंबर,२०१५ रोजी सुरू करण्यात आलेल्या नवीन पध्दती अनुसार) | टक्केवारीतील वाढ |
| १. | पालघर | लालोंडे | १.३९ | १.७९ | २९.१४ | २.८९ | ६१.१६ |
| २. | अहमदनगर | उंबरगाव | ०.५४ | ०.५९ | ९.१९ | १.२१ | १०४.०० |
| ३. | कोल्हापूर | हसूर | ४.९५ | ५.०० | १.०७ | ९.०८ | ८१.६४ |
| ४. | बीड | तांडेलवाडी भिल्ल | ०.५८ | ०.५९ | १.३५ | १.४४ | १४५.५५ |
| ५. | अमरावती | चांदूरवाडी | ०.७१ | ०.८३ | १६.९४ | १.४९ | ७९.४८ |
| ६. | भंडारा | जाख | ३.६० | ३.८८ | ७.८९ | ६.८० | ७४.९४ |

**तक्ता ४२ : ३०००-५००० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींमधील मालमत्ता करातील बदल**

(रूपये लाखात)

| अनुक्रमांक | जिल्हा | ग्रामपंचायत | २०१४-२०१५ | २०१५-२०१६ | | २०१६-२०१७ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण मालमत्ता कर मागणी (जुन्या दराप्रमाणे) | एकूण मालमत्ता कर मागणी (३१ डिसेंबर,२०१५ रोजी सुरू करण्यात आलेल्या नवीन पध्दती अनुसार) | टक्केवारीतील वाढ | एकूण मालमत्ता कर मागणी (३१ डिसेंबर,२०१५ रोजी सुरू करण्यात आलेल्या नवीन पध्दती अनुसार) | टक्केवारीतील वाढ |
| १. | पालघर | उमराळी | ५.२५ | ५.५० | ४.७६ | १२.५० | १२७.२७ |
| २. | नाशिक | सावरगाव | १.२२ | १.८६ | ५३.२५ | २.९३ | ५७.५६ |
| ३. | सोलापूर | खांडवी | २.३५ | २.५३ | ७.४७ | ५.७२ | १२६.५४ |
| ४. | परभणी | धारासूर | १.४९ | १.५२ | २.५७ | २.०५ | ३४.५८ |
| ५. | अमरावती | पापल | ३.०९ | ३.१५ | १.९० | ४.६९ | ४९.०३ |
| ६. | गोंदिया | कावराबंध | १.३९ | १.९१ | ३७.५२ | ५.३१ | १७८.१३ |

## तक्ता ४३ : ५०००-१०००० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींमधील मालमत्ता करातील बदल

(रूपये लाखात)

| अनुक्रमांक | जिल्हा | ग्रामपंचायत | २०१४-२०१५ | २०१५-२०१६ | | २०१६-२०१७ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण मालमत्ता कर मागणी (जुन्या दराप्रमाणे) | एकूण मालमत्ता कर मागणी (३१ डिसेंबर,२०१५ रोजी सुरू करण्यात आलेल्या नवीन पध्दती अनुसार) | टक्केवारीतील वाढ | एकूण मालमत्ता कर मागणी (३१ डिसेंबर,२०१५ रोजी सुरू करण्यात आलेल्या नवीन पध्दती अनुसार) | टक्केवारीतील वाढ |
| १. | पालघर | कुडूस | ११९.०५ | १४१.४५ | १८.८२ | २५०.२५ | ७६.९२ |
| २. | नाशिक | नयाडोंगरी | ३.०५ | ३.९९ | ३०.९१ | ७.०९ | ७७.७४ |
| ३. | सोलापूर | नगनसूर | २.७२ | २.७३ | ०.२४ | ४.३९ | ६०.६४ |
| ४. | उस्मानाबाद | जलकोट | ७.४८ | ७.४४ | -०.४७ | ८.२८ | १.२६ |
| ५. | अमरावती | वाथोडी शुक्लेश्वर | ८.१४ | ९.१२ | १२.०० | १७.८० | ९५.१९ |
| ६. | गोंदिया | खामरी | ९.४६ | ९.८० | ३.५६ | १८.३४ | ८७.११ |

## तक्ता ४४ : १०००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींमधील मालमत्ता करातील बदल

(रूपये लाखात)

| अनुक्रमांक | जिल्हा | ग्रामपंचायत | २०१४-२०१५ | २०१५-२०१६ | | २०१६-२०१७ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण मालमत्ता कर मागणी (जुन्या दराप्रमाणे) | एकूण मालमत्ता कर मागणी (३१ डिसेंबर,२०१५ रोजी सुरू करण्यात आलेल्या नवीन पध्दती अनुसार) | टक्केवारीतील वाढ | एकूण मालमत्ता कर मागणी (३१ डिसेंबर,२०१५ रोजी सुरू करण्यात आलेल्या नवीन पध्दती अनुसार) | टक्केवारीतील वाढ |
| १. | रत्नागिरी | खेरडी | ६७.९२ | ७४.६७ | ९.९३ | १३४.५६ | ८०.२१ |
| २. | अहमदनगर | घुलेवाडी | ४८.६३ | ५०.६३ | ४.११ | ७९.६६ | ५७.३५ |
| ३. | पुणे | पिरंगुट | १८३.३६ | २०५.३० | ११.९६ | ३४६.४० | ६८.७३ |
| ४. | बीड | काडा | १८.५१ | २०.२५ | ९.४४ | २२.३० | १०.१२ |
| ५. | वाशिम | अनसिंग | ४१.९१ | ५२.३८ | २५.०० | ७४.८३ | ४२.८६ |
| ६. | गोंदिया | कुडवा | ५०.३६ | ८०.५२ | ५९.८७ | १२३.२८ | ५३.१२ |

### तक्ता ४५ : परिनगरीय (पेरी अर्बन) ग्रामपंचायतींमधील मालमत्ता करातील बदल

(रूपये लाखात)

| अनुक्रमांक | जिल्हा | ग्रामपंचायत | २०१४-२०१५ | २०१५-२०१६ | | २०१६-२०१७ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण मालमत्ता कर मागणी (जुन्या दराप्रमाणे) | एकूण मालमत्ता कर मागणी (३१ डिसेंबर,२०१५ रोजी सुरू करण्यात आलेल्या नवीन पध्दती अनुसार) | टक्केवारीतील वाढ | एकूण मालमत्ता कर मागणी (३१ डिसेंबर,२०१५ रोजी सुरू करण्यात आलेल्या नवीन पध्दती अनुसार) | टक्केवारीतील वाढ |
| १. | रत्नागिरी | नाचणे | ६५.१७ | ६६.४९ | २.०३ | १७९.८६ | १७०.४९ |
| २. | नाशिक | ओझर | ८५.४६ | ८९.८८ | ५.१८ | १०७.०४ | १९.०९ |
| ३. | पुणे | वाघोली | ४२८.८६ | ५२०.३५ | २१.३३ | ९७६.३८ | ८७.६४ |
| ४. | उस्मानाबाद | सांजा | २.१५ | ३.२५ | ५१.३० | ५.६८ | ७५.१३ |
| ५. | यवतमाल | भारी | २१.०१ | २२.१० | ५.१९ | २६.०५ | १७.८९ |
| ६. | वर्धा | नाळवाडी | ४२.५६ | ४४.२१ | ३.८८ | ४७.२० | ६.७८ |

### तक्ता ४६ : पंचायती उपबंध अनुसार विस्तारित करण्यात आलेल्या अनुसूचित क्षेत्रांतील (PESA-पंचायती संबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम,१९९६) ग्रामपंचायतींमधील मालमत्ता करातील बदल

(रूपये लाखात)

| अनुक्रमांक | जिल्हा | ग्रामपंचायत | २०१४-२०१५ | २०१५-२०१६ | | २०१६-२०१७ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण मालमत्ता कर मागणी (जुन्या दराप्रमाणे) | एकूण मालमत्ता कर मागणी (३१ डिसेंबर,२०१५ रोजी सुरू करण्यात आलेल्या नवीन पध्दती अनुसार) | टक्केवारीतील वाढ | एकूण मालमत्ता कर मागणी (३१ डिसेंबर,२०१५ रोजी सुरू करण्यात आलेल्या नवीन पध्दती अनुसार) | टक्केवारीतील वाढ |
| १. | पालघर | कारळगाव | ०.४८ | ०.४८ | १.६४ | १.५८ | २२५.२२ |
| २. | ठाणे | टेंबा | ५.९२ | ६.१७ | ४.३५ | १०.७१ | ७३.४६ |
| ३. | नंदुरबार | भागदरी | ३.२१ | ३.७१ | १५.७३ | ४.६६ | २५.६२ |
| ४. | पुणे | पिंपळगाव | २.१७ | २.२० | १.३३ | ३.३९ | ५४.२७ |
| ५. | अमरावती | बिजुधावाडी | १.८८ | १.८८ | ०.०० | २.१० | ११.६५ |
| ६. | चंद्रपूर | मनोली | १.२७ | १.७८ | ४०.५३ | ३.४६ | ९४.४५ |

### ७.१४.३.गृह कर आणि मोकळया जमिनीवरील कर याबाबत राज्य वित्त आयोगाची शिफारस:-

राज्य वित्त आयोगाचे असे मत आहे की, दिनांक ३१.१२.२०१५ रोजीच्या नवीन मार्गदर्शक सूचनांचा सकारात्मक परिणाम झालेला आहे आणि ग्रामपंचायतीमध्ये गृह कराचे संकलन वाढलेले आहे. राज्य वित्त आयोग शिफारस करीत आहे की सध्याची व्यवस्था चालू ठेवावी आणि अभिप्रायासाठी तसेच त्यात अधिक सुधारणा कशाप्रकारे करता येतील याबाबत अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था सारख्या तज्ज्ञ संस्थांमार्फत नैमित्तिक वा ऐच्छिक निरीक्षण करून घ्यावे.

७.१४.४.गृह कराव्यतिरिक्त (दिनांक ३१.**१२.२०१५ रोजीच्या शासन निर्णयात अंतर्भूत असलेले) पंयायत अधिनियम कलम, १२४ अंतर्गत आकारता येतील असे कर**

**तक्ता ४७ : महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम, कलम १२४ मध्ये तरतुद करण्यात आलेले करांचे प्रकार**

| अनुक्रमांक | ग्रामपंचायत अधिनियम कलम १२४ अंतर्गत उपकलम | कर/उपकर प्रकार |
|---|---|---|
| १. | १ (एक) | ग्राम क्षेत्रातील जमीन (कृषि निर्धारणाच्या अधीन नसलेली) आणि इमारती/संरचना यांवरील कर |
| २. | १(एक-अ) | पंचायतीने ग्राम निधीमधून हाती घेतलेल्या परियोजना/प्रकल्पांयोगे लाभप्राप्त जमिनींवरील सुधार आकार |
| ३. | १(तीन) | यात्रेकरुंवरील कर |
| ४. | १(चार) | जत्रा, उत्सव व इतर करमणूक यांवरील कर |
| ५. | (पाच) | दुचाकी/सायकली आणि जनावरांकडून ओढली जाणारी वाहने यांवरील कर |
| ६. | (सहा) | पुढील व्यवसाय, व्यापार, धंदा आणि नोकरी - म्हणजे दुकान आणि हॉटेल चालविणे, यंत्राच्या सहाय्याने किंवा शारीरिक श्रमाने चालणारा कोणताही व्यापार किंवा धंदा, गुरांच्या बाजारातील दलाल यांवरील कर |
| ७. | (सात) | सर्वसाधारण स्वच्छता उपकर |
| ८. | (आठ) | इमारतींवर आणि जमिनींवर निर्धारित करण्यात आलेल्या दराच्या रूपाने किंवा परिस्थितीनुसार योग्य रितीने स्वीकारण्यात आलेल्या अन्य प्रकारे लावण्यात येणारा सर्वसाधारण पाणी उपकर |
| ९. | (नऊ) | राज्य शासनाद्वारे मंजूर करण्यात आलेला कर, उदा. अभ्यागत/पर्यटक कर इत्यादी |
| १०. | (दहा) | बाजारपेठ आणि आठवडी बाजार यांवरील शुल्क |
| ११. | (अकरा) | गाडीतळ आणि टांगातळ यांवरील शुल्क |
| १२. | (बारा) | नळाद्वारे पुरविण्यात येणाऱ्या पाण्यासाठी, कोणत्याही स्वरूपात लावण्यात येणारी विशेष पाणीपट्टी |
| १३. | (तेरा) | घरगुती वापराव्यतिरिक्त आणि गुरांव्यतिरिक्त इतर प्रयोजनांसाठी विहिरी आणि तलाव यांमधून पुरविलेल्या पाण्याची शुल्क |
| १४. | (चौदा) | कोणत्याही सार्वजनिक सडकेवर तात्पुरते बांधकाम उभारणे, प्रक्षेपक ठेवणे किंवा तात्पुरता भोगवटा करणे याकरिता शुल्क |
| १५. | (पंधरा) | पंचायतीकडून साफ करण्यात येणारे शौचकूप, परिवास्तू किंवा आवारे यांवरील विशेष स्वच्छता उपकर |
| १६. | (सोळा) | मलकुंडी साफ करण्यासाठी शुल्क |
| १७. | (सतरा) | पंचायतीकडे निहित असलेल्या चराईच्या जमिनीवर गुरे चरण्यासाठी शुल्क |
| १८. | (अठरा) | बाजारात विकल्या जाणाऱ्या गुरांच्या नोंदीसाठी शुल्क |

**७.१४.५.कलम १२४ मध्ये विविध बदल करण्यासाठी राज्य वित्त आयोगाने केलेल्या शिफारशी:-**

**(क) सुधारणा कर ही संज्ञा बदलणे गरजेचे आहे:-**

पंचायतीने ग्राम निधीतून हाती घेतलेल्या योजनांद्वारे आणि प्रकल्पांद्वारे लाभ घेतलेल्या जमिनींवर अधिनियमाच्या कलम १२४(१)(अ) अंतर्गत सुधारणा कर आकारण्याची तरतूद आहे. सन २००६ मध्ये ३ऱ्या राज्य वित्त आयोगाने स्वत: अचूकपणे निर्देशित केल्याप्रमाणे, ग्राम निधीमधून ग्राम पंचायत राबवित

असेलल्या लहान योजनांचा जमिनीच्या मूल्यावर मोठ्या प्रमाणात परिणाम होणे असंभवनिय आहे. त्यामुळे सुधारणा शुल्क आकारणे कठीण होते. त्यापेक्षा सदर तरतूद महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगर रचना अधिनियम, २०१५ अनुसार तयार करणे जास्त संयुक्तिक होईल. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगर रचना अधिनियम, २०१५ अंतर्गत ग्रामपंचायतीला 'गावठाण क्षेत्रासाठी' नियोजन प्राधिकरण असे घोषित केले आहे, त्यानुसार जमिनीच्या किंवा इमारतीच्या कोणत्याही विकासासाठी, ज्यात बांधकाम आणि सुधारणा यांचा समावेश आहे, त्यावर शुल्क आकारणे शक्य आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ कलम ५२ अंतर्गत एखाद्या व्यक्तिला इमारतीच्या बांधकामासाठी किंवा पुर्नबांधकामासाठी ग्रामपंचायतीची परवानगी घेणे आवश्यक असते. कलम ५२ अंतर्गत सदर परवानगी देतांना ग्रामपंचायतींना काही महसूल मिळणे आवश्यक आहे. यामुळे सुधारणा कर या शब्दाच्या ऐवजी जर विकास कर हा शब्द स्थापित केला तर ग्रामपंचायतीला अधिक उत्पन्न मिळविण्याचा मार्ग मोकळा होईल. कलम १२४ मध्ये तदनुरूप बदल करणे गरजेचे आहे. विकास कराचे दर (किमान आणि कमाल) आदिवासी आणि दुर्गम क्षेत्रांसाठी देण्यात येणाऱ्या सवलतींसह नियम म्हणून स्वतंत्रपणे अधिसूचित करणे आवश्यक आहे.

**(ख) अद्ययावत किमान आणि कमाल निश्चित करणे गरजेचे आहे:-**

३ऱ्या राज्य वित्त आयोगाने असे निर्देशित केले आहे की महाराष्ट्र ग्राम पंचायत कर आणि शुल्क नियम, १९६० मधील कलम १२४ अंतर्गत निश्चित करण्यात आलेले विविध प्रकारच्या करांचे किमान आणि कमाल दर खूप जुने आहेत आणि कालानुरूप त्यात वाढ करणे आवश्यक आहे. आता असे अवगत झाले आहे की ग्राम विकास विभागाने अद्ययावत किमान आणि कमाल दर तयार केले आहेत आणि अधिसूचना निर्गमित करण्यासाठी सदर बाबीला अंतिम स्वरूप देण्यात येत आहे. आम्ही आशा करतो की अधिसूचित झाल्यावर सदर नवीन दर प्रचलित मूल्यांना अधिक समर्पक आणि सुसंगत असतील.

**(ग) बदललेल्या परिस्थितीनुरूप कलम १२४ मधील करांची यादी वाढविणे, कमी करणे आणि सुधारित करणे गरजेचे आहे:-**

अवलोकन केल्यांनतर असे दिसून आले की यादी सन १९६० मध्ये तयार करण्यात आली होती. काळ बदलेला आहे आणि बरीच वर्षे लोटली आहेत. सध्या कर-उपकर आणि वापरकर्ता शुल्क या सारख्या संज्ञा ज्यांचे कायदेशीर अर्थ वेगवेगळे आहेत, त्यांची कलम १२४ मध्ये सरमिसळ झाली आहे आणि यामुळे आगंतुक दावे उद्भवू शकतात. संपूर्ण कलम १२४ अव्यवस्थितपणे शब्दबध्द करण्यात आले आहे.

**या कारणास्तव कलम १२४ मधील विविध उपकलमे, खालील बाबींना स्वतंत्र शीर्षके आणि उप क्रमांक देऊन, पूर्णत: सुधारित करणे आणि त्यांचे पुनवर्गीकरण करणे आवश्यक आहे.**

- कर (मालमत्ता मालक किंवा इतरांकडून संकलित करावयाचे आणि ग्रामपंचायतीने ठरविल्याप्रमाणे कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरावयाचे कर)
- वापरकर्ता शुल्क (विशेषत्वे करून केवळ वापरकर्त्यांकडून संकलित करावयाची शुल्क)
- उपकर (विशिष्ट प्रयोजनासाठी संकलित केलेले आणि दुसरीकडे न वळविता केवळ त्याच प्रयोजनासाठी वापरावयाचे उपकर)

सुधारित कलम १२४ साठी खालील निर्देशक प्रवर्गांची आम्ही शिफारस करतो.

**करांचे प्रवर्ग:-**

- गृह कर
- मोकळया जमिनीवरील कर
- जाहिरात आणि मोबाईल टॉवर कर
- कौशल्य व्यवसाय, सेवा आणि व्यवसाय/धंदा

**वापरकर्ता शुल्क प्रवर्ग (प्रत्यक्ष वापरकर्ता किंवा लाभार्थी यांच्याकडून संकलित करावयाची शुल्क)**

- पर्यावरण व्यवस्थापन शुल्क (यात्रा कर आणि अभ्यागत/पर्यटक कर या शब्दांच्या ऐवजी)
  वर्षातील कोणत्याही महिन्यात किंवा वर्षातील काही कालावधी दरम्यान असणाऱ्या जत्रोत्सवाबरोबर ग्रामपंचायतीमधील पवित्र स्थानाला किंवा निसर्गरम्य स्थळाला भेट देण्यासाठी येणाऱ्या तात्पुरते अभ्यागत/पर्यटक यांना पिण्याचे पाणी आणि स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी. सदर कर वाहने आणि प्रत्येक व्यक्ती यांच्याकडून संकलित करता येईल.
- इंजिनवर चालणारी किंवा इंजिनवर न चालणारी वाहने वाहनतळावर उभी करण्यासाठी वाहनतळ शुल्क (पार्किंग शुल्क) (वापरकर्ता आधारे )
- पंचायतीच्या चराई जमिनीवर गुरे चरण्याबद्दलची शुल्क
- सार्वजनिक रस्त्यावर किंवा जागेवर तात्पुरती उभारणी करणे, प्रक्षेपक ठेवणे, सदर जागा व्यापणे यासाठी शुल्क
- बाजारपेठ आणि आठवडी बाजार यासाठी शुल्क

**उपकर प्रवर्ग (आरक्षित/राखीव करावयाचा आणि ज्या प्रयोजनासाठी संकलित करण्यात आलेला आहे केवळ त्याच्यासाठी वापरायचा उपकर):-**

- स्वच्छता उपकर -शौचालयांच्या संख्येनुसार घरमालकांकडून संकलन (आरक्षित / राखीव स्वच्छता निधीमध्ये जमा करावयाचा उपकर)
- कलम (८) आणि कलम (१२) अंतर्गत सर्वसामान्य पाणी दर आणि विशेष पाणी दर, जे संकलन अधिनियमातील कलम १३२(ब) अंतर्गत केलेल्या तरतुदीनुसार, ग्राम पाणीपुरवठा निधी मध्ये जमा केले पाहिजे.

**कलम १२४ अंतर्गत परिणामकारकरित्या वापरण्यात आलेल्या कराधिकाराची यशोगाथा -गणपतीपुळे (रत्नागिरी जिल्हा) याचे उदाहरण:-**

रत्नागिरी जिल्ह्यात समुद्र किनारी असलेले गणपतीपुळे एक सुप्रसिध्द आणि प्रख्यात स्थळ आहे. मंदिराच्या अलौकिक आणि सुंदर सृष्टिसौंदर्याने परिपूर्ण अशा स्थळामुळे ते एक तीर्थक्षेत्र आणि पर्यटन स्थळही आहे. अभ्यासांती दिसून आले आहे की गणपतीपुळे हे महाराष्ट्रातील सर्वात अधिक भेट देण्यात येणारे पर्यटन स्थळ आहे. पर्यटकांच्या रहदारीमुळे ग्रामपंचायतीच्या साधनसंपत्ती आणि क्षमतेवर ताण पडतो. प्रतिदिन येणाऱ्या पर्यटकांच्या लोढ्यांमुळे वाहनांच्या पार्किंगसाठी आणि तयार होणाऱ्या घन व द्रवरूप कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी ग्रामपंचायतीला अतिरिक्त प्रयत्न करावे लागतात.

**याकारणास्तव महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम कलम १२४(९) मधील तरतुदींच्या अंतर्गत अभ्यागत/पर्यटक कर आकारण्यासाठी ग्राम पंचायतीला शासनाकडून आवश्यक ती मंजूरी मिळाली आहे.** या कलमाचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे की ग्राम पंचायतीला इतर कोणतेही कर आकारता येतील (मोटर वाहन कर किंवा जकात कर नसतील तर) जे आकारण्यासाठी राज्य शासनाला संविधानात्मक अधिकार आहेत. ग्राम पंचायत ऑक्टोबर,२०१३ पासून **-अभ्यागत/पर्यटक कर॰** आकारीत आहे. कराचा दर अतिशय नाममात्र आहे, रू.५/- प्रत्येक प्रौढ व्यक्तिसाठी आणि रू.३/- लहान मुलांसाठी. सन २०१६-१७ मध्ये ग्राम पंचायतीने रू.४९ लाख आणि सन २०१७-१८ मध्ये रू.४७ लाख अभ्यागत/पर्यटकांकडून वसूल केले आहेत. ग्राम पंचायतीच्या एकूण उत्पन्नामध्ये सदर कराचे ८५% योगदान आहे.

असे अवगत झाले आहे की घारापूरीला (एलिफन्टा केव्हज -मुंबईच्या जवळ असलेले) देखील अशीच मंजूरी मिळाली आहे आणि अभ्यागत/पर्यटकांकडून काही रक्कम संकलित करीत आहे.

**७.१४.६.राज्य वित्त आयोगाची शिफारस:-**

**क)** गणपतीपुळे आणि घारापूरी गावांनी अभ्यागत/पर्यटक कर आकारणीला परवानगी मिळविण्यासाठी शासनाशी संपर्क साधण्यात घेतलेल्या पुढाकाराची राज्य वित्त आयोग प्रशंसा करीत आहे. राज्य वित्त आयोग असे सूचित करीत आहे की ग्राम विकास विभागाने सदर घटनांचा इतर ग्राम पंचायतींमध्ये प्रसार करावा, ज्या ग्राम पंचायतींमध्ये भरपूर प्रमाणात अभ्यागत/पर्यटक येतात आणि पर्यटकांच्या रहदारीमुळे ग्राम पंचायत स्वच्छ ठेवण्यासाठी त्यांना अतिरिक्त प्रयत्न करावे लागतात. तसेच गणपतीपुळे आणि घारापूरी येथे वर्षभर पर्यटक येत असले तरी, पुष्कळ अशी स्थळे आहेत जेथे विशिष्ट जत्रा किंवा उरूस असलेल्या कालावधीत मोठया प्रमाणात पर्यटकांचा हंगामी लोंढा येतो. म्हणून वर्षाच्या विशिष्ट कालावधीकरिता देखील पर्यटक शुल्क/कर आकारणीसाठी सक्षम तरतूद असली पाहिजे.

**ख)** राज्य वित्त् आयोग अशी शिफारस करीत आहे की अनेक स्थानांच्या शहरामध्ये पवित्र स्थळ असते, ज्यामुळे वर्षभर किंवा वर्षाच्या काही दिवसात तेथे रहदारी असते. म्हणून यात्रेकरू कर किंवा अभ्यागत/पर्यटक कर हा शब्द फारसा संयुक्तिक नाही कारण त्याचा ध्वन्यर्थ वेगळा आहे. त्यापेक्षा 'पर्यावरण व्यवस्थापन कर' हा शब्द जास्त संयुक्तिक असेल. यामुळे पर्यावरण व्यवस्थापन कर आकारणीची तरतूद करण्यासाठी उप कलम (९) च्या धर्तीवर नवीन कलम अंतर्भूत करण्याकरिता कलम १२४ मध्ये सुधारणा केली पाहिजे. याची नोंद घेण्यात यावी की नगर विकास विभागाच्या मान्यतेने अलिबाग शहर अशा प्रकारचा पर्यावरण व्यवस्थापन कर आधीपासून आकारत आहे.

**ग)** राज्य वित्त आयोग पुढे अशी शिफारस करीत आहे की पर्यावरण व्यवस्थापन कर आकारणीला मान्यता देण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना प्रदान केले पाहिजेत, कारण लहान ग्रामपंचायतींना शासनाशी संपर्क साधणे गैरसोयीचे होईल. आवश्यकतेनुसार अधिनियम किंवा नियमांमध्ये योग्य त्या तरतूदी केल्या पाहिजेत.

**घ)** अंतिमत: अभ्यागत/पर्यटक कर च्यायोगे वसूल करण्यात आलेल्या रकमा खर्च करण्याच्या कार्य पध्दती आणि प्रकार यांच्याशी संबंधित तरतूद महाराष्ट्र ग्राम पंचायतींचे कर आणि शुल्क नियम, १९६० मध्ये देण्यात आली आहे. नियम १४६ (३) अनुसार केवळ २५% अभ्यागत/पर्यटक कर (ज्याला दरडोई कर असेही म्हटले जाते) गावातील स्थानिक रहिवाश्यांच्या फायद्यासाठी असणाऱ्या सुविधांच्या तरतुदींकरिता खर्च करता येईल. अभ्यागत/पर्यटक यांच्यासाठी कोणत्या सुविधा असाव्यात आणि कोणत्या प्रकारचे उपक्रम हाती घेता येतील याकरिता मार्गदर्शनासाठी समन्वय समिती आहे (नियम १४७). सचिव, ग्राम विकास विभाग या समितीचे अध्यक्ष आहेत. सदर समितीत उच्चतम अनुभवी, सुसंस्कृत आणि उच्च पदस्थ अधिकारी व्यक्ती यांचा समावेश आहे, ज्यात सचिव, ग्राम विकास विभाग, उप सचिव, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे सदस्य, वन विभाग, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे प्रतिनिधी, आणि इत्यादी उच्च पदस्थ व्यक्ती आहेत. उपरोक्त सदर अटीच्या परिणामामुळे गणपतीपुळे ग्रामपंचायतीला संकलित करण्यात आलेल्या रकमेच्या ७५% रक्कम खर्च करणे गैरसोयीचे होत आहे. मंत्रालयात राज्य स्तरावर बैठक आयोजित करणे आणि एका ग्राम पंचायतीच्या उपक्रमांसाठी मान्यता देणे यासाठी फारवेळ लागतो. राज्य वित्त आयोगाचे असे मत आहे की अति नियंत्रण आणि अनावश्यक आणि गुंतागंतीचे अधिकृत नियम याचे हे उत्तम उदाहरण आहे.

राज्य वित्त आयोगाने सदर नियम १४७ रद्द करण्याबाबत जोरदार शिफारस केली आहे आणि अध्यक्ष जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या स्थानिक समितीला अधिकार प्रदान करण्याची शिफारस केली आहे ज्यामध्ये जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सदस्य आहेत. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत/जिल्हा परिषद, यांना या समितीचे सदस्य सचिव केले पाहिजे.

**७.१५. करेतर महसूल:-**

ग्रामपंचायतीला विविध दाखले जसे जन्म, मृत्यु, निवासाचा दाखला इत्यादी निर्गमित करतांना शुल्क आकारणीद्वारे काही उत्पन्न प्राप्त होते. असे दिसून आले आहे की संकलित करण्यात येणारी विविध शुल्के बरीच कमी आहेत आणि खूप वर्षापूर्वी निश्चित करण्यात आलेली आहेत. राज्य वित्त आयोग पुनरावलोकन करण्याची आणि महाराष्ट्र ग्राम पंचायतींचे कर आणि शुल्क नियम, १९६० मध्ये योग्य ती सुधारणा करून करेतर महसुलाच्या विविध स्रोतांची सेवा शुल्के वाढविण्याची शिफारस करीत आहे.

**७.१६. नियुक्त कर (Assigned Taxes):-**

ग्रामपंचायतींना दोन प्रकारचे नियुक्त कर प्राप्त होतात. सदर कर ग्रामपंचायतींच्या वतीने राज्य शासनाद्वारे संकलित केले जातात, परंतु नंतर ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित केले जातात.

**७.१६.१.जमीन महसूलावरील उपकराची आकारणी (ग्राम पंयाचत अधिनियम कलम १२७):-**

जमीन महसुलावर अतिरिक्त उपकर म्हणून आकारावयाचा आहे. कृषी जमीन मालकांकडून अदा केल्या जाणाऱ्या रू.१.०० जमीन महसूलाच्या शिवाय ग्राम पंचायत जमीन महसूल उपकर म्हणून अतिरिक्त रू.१.०० आकारावयाचा आहे. म्हणजेच तलाठ्याद्वारे (महसूल विभाग) संकलित केल्या जाणाऱ्या रू.१.०० जमीन महसूलाच्या एक पटीने जास्त रक्कम शेतकरी अदा करतो. सदर अतिरिक्त देय रक्कम ग्रामपंचायतीच्या खात्यात जमा करावयाची आहे.

**७.१६.२. मुद्रांक शुल्कावर (Stamp Duty) १% उपकराची आकारणी -जिल्हा परिषद अधिनियम कलम १५८(१) अनुसार:-**

जिल्हा परिषद अधिनियमांतर्गत जमिनीच्या विक्री मूल्यावर आकारण्यात येणारा १% मुद्रांक शुल्क उपकर आहे. सदर उपकर शासनाद्वारे संकलित केला जातो आणि जिल्हा परिषद व ग्रामपंचायत यांच्यामध्ये ०.५०% दराने विभागला जातो.

**७.१६.३. ग्रामपंचायतींसाठी आकारावयाच्या जमीन महसूल उपकराबाबत राज्य वित्त आयोगाची निरीक्षणे आणि शिफारशी:-**

जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यांच्यासाठी आकारावयाच्या जमीन महसूल उपकराशी संबंधित बाबी/समस्या जिल्हा परिषद प्रकरणात यापूर्वीच तपशीलवारपणे नमूद करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे मुद्रांक शुल्कावरील राज्य वित्त आयोगाची निरीक्षणे देखील यापूर्वीच तपशीलवारपणे 'जिल्हा परिषद' प्रकरणात नमूद करण्यात आलेली आहेत. कलम १५८ अंतर्गत १% मुद्रांक शुल्क उपकर विभागून घेण्याबाबत राज्य वित्त आयोगाने एक वेगळे सुत्राची / नियमाची शिफारस केली आहे.

**७.१७. राज्य शासनाकडून सहाय्यक अनुदान:-**

**७.१७.१.गौण खनिजे -मानधन:-**

ग्रामपंचायतींचे आर्थिक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टिने, संबंधित ग्रामपंचायतीला गौण खनिजांवर कमाल रू. १ लाख पर्यंत मानधनाचा हिस्सा देण्याचा निर्णय शासनाने शासन निर्णय दिनांक १६.१.१९८५ अन्वये घेतला. रक्कमेची अंदाजपत्रकात तरतूद केली जात होती आणि सदर रक्कम ग्राम विकास

विभागाद्वारे अदा केली जात होती. सन २०१६-१७ पर्यंत जवळ जवळ ३० वर्षे सदर व्यवस्था सुरळितपणे कार्यरत होती. अंदाजपत्रक नोंदीवरून असे दिसून येते की अंदाजपत्रक शीर्ष -३६०४०३१६ अंतर्गत खालील रक्कमा प्रत्यक्षपणे देण्यात आलेल्या आहेत.

**तक्ता ४८ : किरकोळ खनिजे -२०१३-१४ ते २०१५-१६ पासून देण्यात आलेले मानधन (१३०)**

| अनुक्रमांक | वर्ष | प्रदत्त रक्कम (आकडे कोटीत) |
|---|---|---|
| १. | २०१३-१४ | १४६.१९ |
| २. | २०१४-१५ | १४७.०७ |
| ३. | २०१५-१६ | ७४.५७ |

परंतु शासनाद्वारे (उद्योग विभाग) दिनांक १.९.२०१६ रोजी जिल्हा खनिकर्म संस्थेच्या स्थापनेमुळे, महसूल विभागाने १९८५ चा जुना शासन निर्णय (उपरोल्लिखित) ११.४.२०१७ रोजी स्थगित केला. या आधारावर ग्राम विकास विभागाने सन २०१७-१८ साठी अंदाजपत्रक शीर्ष ३६०४ ०३१६ अंतर्गत देण्यात येत असलेल्या त्यांच्या रकमांना देखील स्थगिती दिली. तसेच असे निदर्शनास आले आहे की महसूल विभागाने वाळू लिलावाचे उत्पन्न् ग्रामपंचायतीबरोबर वाटून घेण्याबाबत एक सर्वसमावेशक शासन निर्णय दिनांकीत ०३.०१.२०१८ निर्गमित केला आहे. वस्तुत: प्रथम ग्रामपंचायतीने वाळू खनिकर्मास परवानगी दिली पाहिजे. परंतु सदर शासन निर्णयामध्ये वाळू उत्खननाखेरीज खडी करणे आणि इतर गौण खनिजे संबंधित तरतूद नाही.

राज्य वित्त आयोगाचा अहवाल तयार करतेवेळी (मार्च,२०१९), असे दृष्टोत्पत्तीस आले आहे की मागील दोन वर्षात २०१७-१८ आणि २०१८-१९ ग्रामपंचायतींना ३६०४०३१६ अंतर्गत यापूर्वी प्राप्त होणारा निधी मिळालेला नाही किंवा त्यांना प्राप्त झालेले असल्यास, सूत्राधारित रक्कमेच्या ऐवजी जिल्हा उत्खनन संस्थेच्या स्वेच्छानिर्णयानुसार ते बाधित क्षेत्रासाठी प्राप्त झालेले असतील. असे दृष्टोत्पत्तीस येत आहे की हा संपूर्ण विषय बदलामधून जात आहे, परंतु यापूर्वी ज्याप्रकारे त्यांना निधी प्राप्त होत असे, त्याचप्रकारे गौण खनिजे अंतर्गत प्रत्यक्षपणे ग्रामपंचायतींना निधी प्राप्त होणे गरजेचे आहे.

### ७.१७.२. राज्य वित्त आयोगाची शिफारस:-

**क)** महसूल आणि वन विभाग शासन निर्णय क्रमांक गौखनि-१०/०६१५/सीआर क्रमांक २८९/ख दिनांक ०३.०१.२०१८ मध्ये फक्त वाळू खनिकर्म उत्पन्नाचा उल्लेख आहे आणि इतर गौण खनिजांचा उल्लेख नाही. ग्रामपंचायतींना वाळू आणि सर्व गौण खनिजांच्या एकूण लिलाव उत्पन्नातील हिस्सा मिळणे अत्यावश्यक आहे.

**ख)** महसूल विभागाने ग्रामपंचायतींना निधी देण्याची पध्दत आणि प्रकार अधिक कार्यक्षम /सुलभ केले पाहिजेत आणि पुन्हा एकदा निधी उपलब्ध करून देण्याचा प्रघात चालू केला पाहिजे.

**ग)** ग्रामपंचायतींना २०१७-१८ आणि २०१८-१९ या वर्षांची थकबाकी दिली पाहिजे.

**घ)** महसूल आणि वन विभागाचा शासन निर्णय दिनांक ३.१.२०१८ मध्ये दर्शविल्याप्रमाणे लिलावांचा २५% हिस्सा देण्याची आम्ही शिफारस करीत आहोत.

**ङ)** आम्ही अशी देखील शिफारस करीत आहोत की ग्रामपंचायतींना द्यावयाच्या रकमांबाबत कोणताही निर्णयाधिकार असल्यास रद्द करावा आणि सूत्राधारित मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली पाहिजेत.

## ७.१८. निवडक ग्रामपंचायतींना जुने भरपाई सहाय्यक अनुदान:-

सन १९५० आणि सन १९६० मध्ये अनुक्रमे ग्रामपंचायत अधिनियम आणि जिल्हा परिषद अधिनियम अधिनियमित करण्यात येण्यापूर्वी ग्रामपंचायतीं काही जुने कर आकारत असत. ज्या ग्रामपंचायतींचे नुकसान झाले होते, त्या ग्रामपंचायतींची भरपाई करण्यासाठी शासन अजूनही त्या ग्रामपंचायतींना वर्षानुवर्षे अतिशय किरकोळ रक्कम अदा करीत आहे. सदर रकमा अतिशय कमी आहेत आणि त्यांचे व्यवस्थापन करण्याचे प्रशासकीय खर्च ग्रामपंचायतींना मिळणाऱ्या रक्कमेपेक्षा जास्त आहे. याबाबतचे विश्लेषण खालीलप्रमाणे आहे -

**तक्ता ४९ : निवडक ग्रामपंचायतींना दिली जाणारी जुनी भरपाई अनुदाने**

| अनुक्रमांक | सीआरसी कोड | ग्रामपंचायतीच्या अनुदानाचे नाव | वार्षिक प्रदत्त रक्कम (लाखात) | ग्रामपंचायतींची संख्या | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १. | २५२५-००४४ | मागास आणि आदिवासी गावांना आर्थिक सहाय्य | १८ | ८९८० (२४ जिल्हे) | प्रति ग्रामपंचायत सरासरी प्रदत्त रक्कम रू.२०० प्रति ग्रामपंचायत इतकी किरकोळ आहे. |
| २. | ३६०४-०३४३ | यात्रेकरू कराच्या ऐवजी भरपाई | २८ | ४८ (१० जिल्हे) | सरासरी रू.५८,००० इतकी येते. |
| ३. | ३६०४-०५३२ | जकात कराच्या विलोपनासाठी भरपाई | १४२४ | ४९ (११ जिल्हे) | |

### ७.१८.१.राज्य वित्त आयोगाची शिफारस:-

राज्य वित्त आयोग अशी शिफारस करीत आहे की ही सर्व भरपाई अनुदाने बंद करावीत, कारण सदर अनुदाने आता अनावश्यक झालेली आहेत. संबंधित ग्रामपंचायतींना तीन वर्षासाठी एक रकमी अनुदान देऊन शासनाला सदर भरपाई अनुदाने आणि सीआरसी कोड बंद करता येतील. ही एक प्रशासकीय व्यवस्था असल्याने अशा प्रकारची जुनी भरपाई देयके बंद करणे शासनाचा स्वेच्छानिर्णयाधिकार आहे.

## ७.१९. पथ दिवे व्यवस्थेसाठी लागणाऱ्या विजेच्या देयकांच्या बिलांची प्रतिपूर्ती:-

### ७.१९.१. ग्रामपंचायतीना देण्यात येणाऱ्या मदतीची पध्दत आणि रीत/प्रकार:-

ग्रामपंचायतींच्या वतीने राज्य शासन पथ दिव्याच्या व्यवस्थेची विद्युतशक्ती बिले अदा करीत असते. हे सहाय्यक अनुदान आहे. तथापि सदर अनुदान थेट ग्रामपंचायतीला अदा करण्यात येत नाही, परंतु त्या ऐवजी ग्राम पंचायतींच्यावतीने विद्युत पुरवठा करणाऱ्या संस्थेला थेट अदा करण्यात येते -ती म्हणजे - महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (एमएसइडीसीएल). अनुसरली जाणारी कार्यपध्दती अशी आहे की एमएसइडीसीएल बिले थेट ग्राम विकास विभागाला सादर करते. निधीच्या उपलब्धतेनुसार ग्राम विकास विभाग एमएसइडीसीएल ला रक्कम अदा करते. असे दिसून येते की ग्रामपंचायतींच्या वतीने एमएसइडीसीएल ला तात्काळ देयके अदा करण्यासाठी शासन पुरेशा प्रमाणात तरतूद करण्यात असमर्थ ठरत आहे म्हणून ही कमतरता दूर करण्यासाठी, शासनाने अलिकडे ग्रामपंचायतींद्वारे (व्याज आणि दंडाची रक्कम वगळून) एमएसइडीसीएल ला देय रक्कमेच्या ५०% रक्कम १४व्या वित्त आयोगाकडून मिळणाऱ्या अनुदान रक्कमेतून वजा करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार आता ग्रामपंचायतींना १४व्या वित्त आयोगाकडून मिळणारी त्यांची अनुदाने सदर वजावटी नंतर प्राप्त झाली आहेत. एमएसइडीसीएल कंपनीने उपलब्ध करून दिलेले खालील आकडे वस्तुस्थिती दर्शवित आहेत.

**तक्ता ५० : ग्रामपंचायतींचा प्रति वर्ष विद्युत यूनिटस वापर आणि** एमएसइडीसीएल **कंपनीला अदा केलेल्या रकमांचा तपशील (रू. कोटीत)**

| अनु-क्रमांक | आर्थिक वर्ष | ग्राहकांची संख्या | विक्री (यूनिटस मिटरप्रमाणे) | मागणी | संकलन | सांप्रत थकबाकी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | थकबाकीदार ग्राहकांची संख्या | थकबाकीची मूळ रक्कम | व्याजाची रक्कम | एकूण थकबाकी |
| १. | २०१५-१६ | ६२०५६ | १११७ | ५८१ | १६१ | ६०१८९ | १३३७ | ४३८ | १७७५ |
| . | २०१६-१७ | ६३६२० | ११५९ | ६१६ | २३९ | ६२३७३ | १७३५ | ७१५ | २४५० |
| ३. | २०१७-१८ | ६५१०२ | १२२५ | ६७७ | २२९ | ६४११० | २१५९ | १०४६ | ३२०५ |
| ४. | २०१८-१९ | ६७९९० | १३३७ | ८१९ | २०५ | ६५१७९ | २३१२ | १३६४ | ३६७६ |

उपरोक्त आकडेवारीवरून असे दिसून येते की -विद्युत मापक धारणकर्ते ग्रामपंचायत ग्राहक॰ संख्या देखील दरवर्षी वाढत आहे. कारण ग्रामपंचायतीमधील प्रत्येक नवीन वसाहतीला नवीन जोडणी दिली जाते.

**७.१९.२. ग्रामपंचायतीला देण्यात येणाऱ्या पथदिव्यांच्या विद्युतशक्ती देयकांच्या प्रतिपूर्तीबाबत निरीक्षणे:-**

(१) सदर सेवा उपलब्ध करून देण्यासाठी एमएसइडीसीएल द्वारे मागणी करण्यात आलेल्या निधींपैकी केवळ २५% निधीची प्रतिपूर्ती करण्यास शासन सक्षम आहे. त्यामुळे एमएसइडीसीएल द्वारे त्यांच्या थकबाकीचे दावे मिटवण्यासाठी सतत मागणी केली जाते. साप्रंत थकबाकी सुमारे रू. ३६७६ कोटी आहे (देय मुद्दलाची रक्कम रू. २३१२ कोटी आहे).

(२) एमएसइडीसीएल संस्थेला अदा करण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रतिपूर्तीच्या सांप्रत पध्दतीत कोणत्याही प्रकारे एकीकरण किंवा पृथक्करण करता येत नाही. ही शक्यता आहे की ग्रामपंचायती त्यांच्या क्षमतेपेक्षा अधिक उपभोग घेत असतील किंवा काही ग्रामपंचायती सदर आर्थिक मदतीचा गैरवापर करीत असतील.

(३) सौर उर्जेचा (सोलर एनर्जीचा) वापर करून त्यांच्या पथ दिव्यांची देयके कमी करणे यासारखा कार्यक्षम बदल करण्याकरीता ग्रामपंचायतीना प्रोत्साहन भत्ता दिला जात नाही.

(४) विद्युतशक्ती देयके तयार करणे (देयके आधिक्याने परिगणित झाली आहेत किंवा मर्यादेपेक्षा कमी परिगणित झाली आहेत) किंवा त्यांना सौर उर्जेचा (सोलर एनर्जीचा) वापर करण्यासाठी मदत करणे यासारख्या तांत्रिक बाबी हाताळण्यासाठी ग्रामपंचायती स्तरावर क्षमतेची कमतरता आहे.

**७.१९.३.राज्य वित्त आयोगाची शिफारस:-**

राज्य वित्त आयोगाचे असे मत आहे की सदर योजना सुरू ठेवली पाहिजे, परंतु ग्रामपंचायतींना देण्यात येणाऱ्या मदतीची कार्यपध्दती आणि व्यवस्थापन वेगळया प्रकारे हाताळले पाहिजे. **सदर कार्यपध्दतीमुळे ग्रामपंचायती त्यांच्या पथ दिव्यांच्या देयकांच्या व्यवस्थापनाबाबत अधिक जबाबदार आणि विश्वासाहार्य झाल्या पाहिजेत. भविष्यकाळात सदर कार्यपध्दतीमुळे सौर उर्जेचा (सोलर एनर्जीचा) वापर आणि खर्चाची बचत करणे सुलभ झाले पाहिजे.**

या कारणास्तव राज्य वित्त आयोग असे प्रस्तावित करीत आहे की शासनाद्वारे थेट एमएसइडीसीएल संस्थेला एकत्रित रक्कम अदा करण्याऐवजी, शक्यतो देय रकमा ग्रामपंचायतींकडे हस्तांतरित केल्या पाहिजेत. तथापि ग्रामपंचायतींची संख्या फार मोठी आहे आणि उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीत कोणत्याही प्रकारे ग्रामपंचायती द्वारे विलंब, चुका किंवा गैरवापर झाला तर संपूर्ण ग्रामीण लोकांची गैरसोय होईल. संवेदनाशीलतेचा विचार करता, एमएसइडीसीएल संस्थेला देखील वीजपुरवठा

तोडणे कठीण होईल. यावर उपाय म्हणून शासनाने उपलब्ध निधी पंचायत समितीकडे हस्तांतरित केला पाहिजे. पंचायत समितीने ग्रामपंचायतीच्या वतीने ग्रामपंचायतीची सर्व देयके फेडली पाहिजेत. पंचायत समितीचे ग्रामपंचायतींवर पुरेसे नियंत्रण असते कारण विस्तार अधिकारी (पंचायतींचे) आणि गट विकास अधिकारी यांच्याकडे ग्राम सेवक अहवाल देत असतात. ग्रामपंचायतींचे सर्व निधी देखील पंचायती समितीच्या मार्फत दिले जातात, त्यामुळे पंचायत समिती ग्रामपंचायतींवर नियंत्रण ठेवू शकते आणि ग्रामपंचायती कोणत्याही प्रकारे जास्त खर्च किंवा वापर करणार नाहीत अशी तजवीज करू शकतात. एमएसइडीसीएल संस्थेला देखील २८००० ग्रामपंचायती ऐवजी तालुका स्तरावर ३५० पंचायत समिती हाताळणे सुलभ होईल.

तरी असे सूचित करण्यात येत आहे की राज्य शासनाने अंदाजपत्रकात तरतूद करावयाची रक्कम निश्चित करावी, प्रमाणात्मक वापर परिगणित करण्यासाठी, २०१७-१८ या वर्षासाठी राज्य स्तरावर ग्रामपंचायतीने वापरलेले यूनिटस् (अहवालानुसार सदर १२२४.५८ एमयूएस एवढा आहे) याद्वारे किंवा २०१८-१९ हे वर्ष आधारभूत मानावे. सदर वापरलेल्या यूनिटसनां महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने निश्चित केलेल्या प्रचलित दराने गुणल्यावर तरतूद करावयाची किंवा ग्रामपंचायतींना वितरित करावयाची एकूण निधीची रक्कम मिळेल. लोकसंख्येच्या आधारे सदर रक्कम ग्रामपंचायतींना वितरित करावी. (कोणत्याही इतर चांगल्या सूत्राच्या अनुपस्थितीत, लोकसंख्येच्या आधारे रक्कम ग्रामपंचायतींमध्ये वितरित करावी असे सूचित करण्यात येत आहे). सदर रक्कम पंचायत समितीला अदा केली जाईल, त्यानंतर पंचायत समिती एमएसइडीसीएल संस्थेला प्रदाने अदा करील. जर त्यामध्ये काही तूट असली तर, एमएसइडीसीएल संस्थेच्या प्रदानांतील तूट भरून काढण्यासाठी इतर कोणत्याही दायित्व नसलेल्या/मुक्त अनुदानातून प्रदाने अदा करण्याचे अधिकार पंचायत समितीला देण्यात यावेत.

पंचायती समिती आणि ग्रामपंचायतींच्या क्षमता बळकट करण्यासाठी असे सूचित करण्यात येत आहे की पंचायत समितीला करार पध्दतीने दोन कर्मचारी घेण्याची अनुमती देण्यात यावी -उदा. एमएसइडीसीएल संस्थेकडून एक निवृत्त उप/कनिष्ठ अभियंता किंवा समतुल्य कर्मचारी आणि एक तांत्रिक साहायक. पंचायत समितीच्या विद्युत उर्जासंबंधीच्या समस्या हाताळण्यासाठी, एका नियोजित पथकामध्ये किंवा कक्षात (ज्याला ग्रामीण पथ दिवे व्यवस्था कक्ष असे नाव दिले जाईल), सदर कर्मचारी गट विकास अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली काम करतील. सौर उर्जेचा वापर करून पथ प्रकाश व्यवस्थेमध्ये अपेक्षित स्थितंतर हाताळण्यासाठी सदर कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण आणि मार्गदर्शन द्यावे. त्यांचा खर्च, प्रवास खर्चासह, प्रति वर्षासाठी सुमारे १५ लाख येईल. राज्याचे दायित्व सुमारे रू. ५२.५० कोटी (३५० पंचायत समिती x रू. १५ लाख प्रति वर्ष) असेल. सदर पथक ग्रामपंचायतीच्या पथ दिवे खर्चाचा आढावा घेईल आणि खर्च मर्यादेत/नियमांनुसार असल्यास, एमएसइडीसीएल संस्थेला प्रदाने अदा करील. दुसरे म्हणजे, विविध योजनांतर्गत मागील वर्षांमध्ये अनेक ग्रामपंचायतींमध्ये बसविण्यात आलेल्या. सध्याच्या सोलर पॅनेल/यूनिट याची दुरूस्ती करण्यासाठी तांत्रिक साहाय्यामध्ये सदर पथक मदत करील. ज्या ग्रामपंचायतींना सोलर पॅनल्स बसविण्यासाठी जिल्हा ग्राम विकास निधी (DVDF) अंतर्गत कर्ज घ्यावयाचे आहे, त्या ग्रामपंचायतींना सदर पथक प्रस्ताव तयार करून देण्यात मदत करील. तांत्रिक कक्षामध्ये क्षमता विकसित करण्यासाठी आणि त्यावर देखरेख ठेवण्यासाठी एमएसइडीसीएल संस्थेला विशेष व्यवस्था करता येईल. आम्हांला असे वाटते की सदर व्यवस्था ग्रामपंचायतींसाठी त्यांच्या विद्युत उर्जासंबंधीच्या समस्या हाताळण्याकरीता खूप उपयुक्त होईल आणि पंचायत समिती स्तरावर दोन निवृत्त कर्मचारी ठेवण्यासाठी येणाऱ्या रू.५२.५० कोटी अतिरिक्त खर्चामुळे, सध्याच्या रू.६००-८०० कोटी वार्षिक खर्चात कितीतरी जास्त बचत होईल.

**एमएसइडीसीएल संस्थेला देय असलेली रू. ३६१२ कोटीची जुनी थकबाकी शासनाने एकदाची फेडून टाकली पाहिजे.**

**संक्षेपाने:-**

(क) शासनाने एकदाच एमएसइडीसीएल संस्थेला देय असलेल्या सर्व रकमा फेडून टाकल्या पाहिजेत आणि नव्याने सुरूवात केली पाहिजे.

(ख) त्यानंतर, राज्य स्तरावर एमएसइडीसीएल संस्थेला मोठया प्रमाणात सर्व रकमा फेडून टाकण्याच्या ऐवजी, ग्रामपंचायतींनी सन २०१७-१८/२०१८-१९ (राज्य स्तरावर) या आधारभूत वर्षात वापरलेले एकूण दशलक्ष यूनिटस (MUS) या सूत्राचा वापर शासनाने केला पाहिजे. प्रत्येक वर्षी शासनाने वापरलेले यूनिटस (आधारभूत वर्षातील वापर) X प्रचलित दर अनुसार पुरेशा प्रमाणात सदर रक्कमेची तरतूद केली पाहिजे.

(ग) सदर रक्कम पंचायत समितीला दिली पाहिजे, पंचायत समिती, तिच्या अधिकारक्षेत्रातील ग्रामपंचायतींना त्यांच्या लोकसंख्येच्या आधारे प्रदाने (Payments) अदा करील. कोणतीही तूट असल्यास, सदर तूट पंचायत समितीने भरून काढली पाहिजे (ग्रामपंचायतीच्या वतीने) आणि इतर कोणत्याही रकमांमध्ये समायोजित केली पाहिजे किंवा स्वत: ग्रामपंचायतीला सदर तूट अदा करता येईल.

(घ) शासनाने एमएसइडीसीएल संस्थेच्या मदतीने विविध आकारामानाच्या गावांसाठी वापराबाबतचे नियम तयार केले पाहिजेत आणि त्यानुसार प्रदाने द्यावीत. पंचायत समिती स्तरावर प्रदाने करण्यासाठी गावाप्रमाणे नियम तयार करण्यात मदत होईल आणि ग्रामपंचायतीच्या स्तरावर अति वापर किंवा गैरवापरावर निर्बंध घालता येतील.

(ङ) पंचायत समिती एमएसइडीसीएल संस्थेच्या दोन निवृत्त तांत्रिक कर्मचाऱ्यांची सेवा घेईल, जे 'कर्मचारी पंचायत समितीमध्ये ग्रामपंचायत पथ प्रकाश व्यवस्था कक्ष' स्थापन करतील. सदर कर्मचारी एमएसइडीसीएल संस्थेला प्रदाने अदा करण्याबाबत मदत करतील आणि खर्चाच्या पध्दतीचे तसेच त्याच्या विचलनाचे विश्लेषण करतील, ग्रामपंचायतवार नियम तयार करतील. ग्रामपंचायतींच्या सर्व तांत्रिक समस्यांमध्ये लक्ष घालतील आणि सौर उर्जेच्या वापराबाबत मार्गदर्शन करतील.

(च) सर्व तांत्रिक बाबींबाबत आणि सौर उर्जेचा वापर स्वीकारण्याबाबत प्रत्येक ग्रामपंचायतीतील ३५० कक्षांना मार्गदर्शन करण्यासाठी एमएसइडीसीएल संस्थेत स्वतंत्र आधारभूत व्यवस्था असेल.
राज्य वित्त आयोगाला असे वाटते की सदर स्थित्यंतर ग्रामपंचायतींशी संबंधित पथ प्रकाश व्यवस्थेच्या खर्चाची पूर्तता करण्याबाबतच्या समस्येचे लक्षणीय रीतीने निराकरण करील.

**७.२०. सरपंचाचे मानधन आणि बैठक भत्त्यांची प्रतिपूर्ती:-**

सरकार सरपंचाला अदा करण्यात आलेल्या विहित मानधनापैकी ७५% मानधनाची प्रतिपूर्ती ग्रामपंचायतीला करते. त्याचप्रमाणे ग्रामपंचायतीच्या सदस्याला नियमानुसार अदा करण्यात आलेल्या बैठक भत्त्याचीही प्रतिपूर्ती करते. प्रचलित दर रू. २०० प्रति बैठक आहे, सर्वसाधारण मर्यादा एका वर्षात १२ बैठका एवढी आहे. या विषयाबाबतची अंतिम मार्गदर्शक तत्त्वे पाच वर्षापूर्वी ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-२०११/सीआर-४०/पीआर-३ दिनांक ६.९.२०१४ अन्वये निर्गमित करण्यात आली होती.

आमच्या क्षेत्रीय भेटींच्या दरम्यान, ग्रामपंचायतींच्या पदाधिकाऱ्यांनी मानधन आणि बैठक उपस्थिती भत्ता वाढविण्याची एकमताने मागणी केली कारण सदर पदाधिकारी जी कामे करतात आणि

ग्रामपंचायतींच्या उपक्रमांसाठी त्यांना जेवढा वेळ द्यावा लागतो त्याच्या तुलनेत सदर दर खूपच कमी आहेत. विशेषत्वाने नोंद घेतली पाहिजे की ग्रामपंचायतीचे पुष्कळ सदस्य, जे सदस्य म्हणून निवडून आलेले असतात, ते सदस्य अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि उपेक्षित समाजाशी संबंधित असतात. सदर सदस्य अल्पभूधारक शेतकरी किंवा इतर मजूर असून मुश्कीलीने स्वत:चे भरणपोषण करीत असतात. उत्पन्नाचे कोणतेही साधन नसलेल्या महिला प्रतिनिधींचे प्रमाण फार मोठे आहे. ग्रामपंचायतींच्या बैठकांना हजर राहण्यासाठी त्यांना नेहमी त्यांचे रोजंदारी वेतन सोडून द्यावे लागते.

**७.२०.१.राज्य वित्त आयोगाची शिफारस:-**

(क) **ग्रामपंचायती सदस्य बैठक उपस्थिती भत्ता:-** राज्य वित्त आयोग सदर भत्ता रू. २०० वरून रू. ४०० प्रतिदिन पर्यंत वाढविण्याची शिफारस करीत आहे, सदर रक्कम सर्वसाधारणपणे दिलेल्या वेळेची भरपाई आहे. शासनासाठी सदर अतिरिक्त खर्च फार मोठा नाही, परंतु यामुळे ग्रामपंचायतीच्या सदस्यांना सहभाग घेण्यासाठी खूप प्रोत्साहन मिळेल. दुर्बल घटकातील सदस्यांना देखील उपयुक्त होईल, ज्यांना नेहमी त्यांचे रोजंदारी वेतन किंवा इतर उत्पन्न सोडून बैठकांना यावे लागते.

तसेच, अतिरिक्त २५% रक्कम (रू.४०० पेक्षा अधिक) ग्रामपंचायतींच्या स्व-निधीतून गट विकास अधिकाऱ्याच्या मान्यतेने अदा करण्याची परवानगी देण्यात यावी, ज्यांनी ग्रामपंचायतींची साधनसंपत्ती चांगली असल्याचे प्रमाणित केले पाहिजे.

(ख) **सरपंचाचे मानधन:-** राज्य वित्त आयोग सरपंचाच्या मानधनाची सध्याची प्रतिपूर्तीची रक्कम आणि तसेच सर्वसाधारण मर्यादा वाढविण्याची शिफारस करीत आहे. सदर रक्कम ग्रामपंचायतींच्या स्व-साधनसंपत्तीतून अदा करण्याची परवानगी देण्यात यावी. राज्य वित्त आयोग ग्रामपंचायतींच्या लोकसंख्येच्या श्रेणींची पुनर्बांधणी करण्याचे देखील सूचित करीत आहे.

ग्रामपंचायतीला संरपंचाला अधिक मानधन स्व-साधनसंपत्ती आधारे अदा करावयाचे असल्यास, गट विकास अधिकाऱ्याने ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती चांगली असल्याचे प्रमाणित केले पाहिजे. स्वेच्छाधिकार दूर करण्यासाठी, शासन चांगल्या आर्थिक कामगिरीचे काही निकष जसे चांगले गृह कर संकलन, पाणीपट्टीची योग्य वसुली आणि इतर अशाप्रकारचे योग्य निकष निश्चित करू शकते. यामुळे गट विकास अधिकाऱ्याला योग्य निर्णय घेण्यास मदत होईल.

**तक्ता ५१ : सरपंचांचे सध्याचे मानधन आणि शिफारशी करण्यात आलेले मानधन**

| अनुक्रमांक | ग्रामपंचायतींचे प्रवर्ग (लोकसंख्या) | सरपंच मानधनासाठी शासनाकडून देण्यात येणारे सध्याचे सहाय्य | शिफारस करण्यात आलेले शासनाचे सहाय्य | शिफारस केलेली उच्चतम मर्यादा, ग्रामपंचायती कडून अदा केल्या जाणाऱ्या अतिरिक्त रक्कमेसह |
|---|---|---|---|---|
| १. | ०-२००० | रू. ७५० | रू. १००० | रू.२००० |
| २. | २००१-५००० | रू.११२५ | रू.१५०० | रू.२५०० |
| ३. | ५०००-१०००० | रू.१५०० | रू.२००० | रू.४००० |
| ४. | १०,०००+ | रू.१५०० | रू.२००० | रू.५००० |

आमचे असे मत आहे की शिफारशी केल्याप्रमाणे ग्रामपंचायतीना स्वत:च्या ठरावानुसार, काही आर्थिक कामगिरीच्या निकषाच्या अधीन राहून, उच्च मानधन देता आले तर, सदर सूचित करण्यात आलेल्या बदलामुळे निम्न स्तरावर देखील काम करण्याची प्रेरणा आणि जबाबदार वृत्ती देखील वाढेल.

७.२०.२.ग्रामपंचायतीच्या कर्मचारी वेतनाची प्रतिपूर्ती:-

ग्रामपंचायतीच्या कर्मचारी खर्चासाठी, संबंधित ग्रामपंचायतीच्या कर्मचारी आकृतिबंधातील मंजूर पदाच्या मर्यादेत, शासनाने विहित केलेल्या किमान वेतनाच्या ५०% रक्कमेची शासन प्रतिपूर्ती करते. तथापि, यथायोग्यपणे, प्रत्येक ग्रामपंचायतीतील ज्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी शासन सहाय्य (विहित दरानुसार) करील अशा कर्मचाऱ्यांच्या संख्येवर शासनाने मर्यादा घातली आहे. मंजूर कर्मचारी आकृतिबंध बाबतचा अंतिम शासन निर्णय फार काळापूर्वी सन २००० (व्हीपीएम-२६९९/सीआर-२०६(१)/२१ दिनांक २१ जानेवारी २०००) म्हणजेच १९ वर्षापूर्वी निर्गमित केला होता.

मंजूर पदांची संख्या, ज्यासाठी ग्रामपंचायतीला शासन प्रतिपूर्ती करील, खाली देण्यात येत आहे (उपरोक्त २१.१.२००० च्या शासन निर्णयानुसार)

**तक्ता ५२ : शासनाद्वारे ग्रामपंचायतींसाठी वेतनाची प्रतिपूर्ती**

| अनुक्रमांक | ग्रामपंचायतीचा प्रवर्ग (लोकसंख्येनुसार) | कर्मचाऱ्यांची मंजूरसंख्या |
|---|---|---|
| १. | ०-१००० | १ |
| २. | १००१-३००० | २ |
| ३. | ३००१-६००० | ३ |
| ४. | ६००१-१०००० | ४ |
| ५. | १०००० पेक्षा जास्त | ६ |

७.२०.३.राज्य वित्त आयोगाची निरिक्षणे/मते:-

ग्रामपंचायतींची कामे आणि उपक्रम यामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. मागील काही वर्षापासून ग्रामपंचायतीकडे येणाऱ्या निधींमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. सामाजिक आर्थिक विकास वाढीसह, ग्रामपंचायतीकडून नागरिकांच्या अपेक्षाही वाढलेल्या आहेत. शासनाने ग्रामपंचायतीवर काही महत्वाच्या योजना सोपविलेल्या आहेत उदा. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना.

सर्वात महत्वाचे म्हणजे ग्रामपंचायतीच्या आर्थिक विकासाबरोबरोच ग्रामपंचायतीवर घन आणि द्रव कचऱ्याच्या व्यवस्थापनाची आणि प्लास्टिक सारख्या विघटन न होणाऱ्या घटकांचा अति वापर इत्यादींची वाढीव जबाबदारी आहे. या सर्वांसाठी ग्रामपंचायतीकडे अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता असते, विशेषत: मोठ्या ग्रामपंचायतीमध्ये जेथे लोकसंख्या ५००० पेक्षा जास्त असते तसेच आर्थिक उलाढालीचे प्रमाणही जास्त असते. वस्तुत: क्षेत्रीय पातळीवर अनेक ग्रामपंचायतींनी केवळ आवश्यकता म्हणून अधिक कर्मचाऱ्यांची भरती केली आहे आणि स्व-साधन संपत्ती मधून त्यांचे वेतन अदा करतात.

७.२०.४.राज्य वित्त आयोगाची शिफारस:-

**(क)** ग्रामपंचायतीच्या कर्मचारी आकृतिबंधाचे पुनर्विलोकन करणे गरजेचे आहे कारण जवळजवळ वीस वर्षापूर्वी याबाबत अंतिम मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात आली होती. असे अवगत झाले आहे की भारत सरकार, पंचायतराज मंत्रालय, यांनी एक उच्च् स्तरीय समिती नियुक्त केली होती, ज्या समितीने ग्रामपंचायत स्तरावर असणारी कर्मचाऱ्यांच्या आवश्यकतेबाबत त्यांच्या शिफारशी केलेल्या आहेत. **ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांच्या आवश्यकतेचा अभ्यास करण्याकरिता पुन्हा एक समिती नियुक् करण्याची राज्य वित्त आयोग शिफारस करीत आहे.**

**(ख) सध्या** मंजूर कर्मचारी आकृतिबंध पुरेसा नसल्यामुळे, परिणामत: अनेक ग्रामपंचायतीं कामे करून घेण्यासाठी रोजंदारी कर्मचाऱ्यांचा वापर करतात. विशेषत: जर कार्यालयीन कामकाजासाठी देखील रोजंदारी कर्मचाऱ्याचा वापर केला तर, कामाच्या गुणवत्तेवर याचा परिणाम होतो. विशेषत: मोठ्या ग्रामपंचायती अपु-या कर्मचाऱी संख्येमुळे या अत्यंत कमतरतेशी झगडत आहेत.

**या प्रकरणात जास्त लवचिकता असणे गरजेचे आहे. त्यामुळे शासनाकडे अशी शिफारस करण्यात येत आहे की शासनाने यासाठी वेगळी संरचना मंजूर करावी, दोन स्तरीय आकृतिबंधाला परवानगी द्यावी, एक ज्याची प्रतिपूर्ती शासन करील आणि दुसरा ज्याची प्रतिपूर्ती शासन करणार नाही, परंतु ग्रामपंचायतीची स्व-साधन संपत्ती अनुकूल असेल तर, त्यांच्या स्तरावर ग्रामपंचायत वेतन अदा करू शकेल.**

**७.२१. पाणी पुरवठा योजनांसाठी लागणा-या वीजेच्या देयकांच्या ५०टक्के रकमेची प्रतिपूर्ती (पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभागाचा शासन निर्णय):-**

अनेक ग्रामपंचायतींसमोर त्यांच्या नळ पाणी पुरवठा प्रणालीची (Piped Water Supply System -PWS) विद्दयुत देयके भागविण्याबाबत वास्तविक समस्या आहेत. अधिकाधिक, ग्रामपंचायती दूरस्थ जलाशयांमधून पाणी पुरवठा करतात. त्यामुळे भौगोलिकदृष्टया गैरसोयीच्या असलेल्या ग्रामपंचायतींना जलाशयातून पाणी वाहिनीच्याद्वारे (नळाने) वरच्या टाकीत जमा करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणात खर्च येतो. ग्रामपंचायतींना एमएसइडीसीएल संस्थेची सदर प्रदाने फेडणे अवघड होते.

सदर तक्रार दूर करण्याकरीता, पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभागाने (जो विभाग ग्रामीण पाणी पुरवठा योजना हाताळतो) दिनांक १७ ऑक्टोबर, २०१४ रोजी एक शासन निर्णय निर्गमित केला, ज्यामध्ये ग्रामपंचायतींनी विदयुत दयके आकार प्रदान केल्यानंतर, ग्रामपंचायतींना ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या विजेच्या आकाराच्या ५०टक्के रक्कमेची प्रतिपूर्ती केली जाईल. सदर सवलतीचा लाभ घेण्यासाठी, ग्रामपंचायतींना वसूली संबंधित आणि विविध सहपत्रे दाखल करणे आणि संबंधित जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांना सदर कागदपत्रे सादर करणे इत्यादी विविध पूर्व अटींची पूर्तता करावी लागेल. तथापि, या योजनेला अत्यंत अल्प प्रतिसाद मिळत आहे आणि आमचे क्षेत्रीय विश्लेषण असे दर्शविते की ग्रामपंचायतींपैकी बहूतेक ग्रामपंचायती सदर लाभाचा फायदा घेत नाहीत. अर्थसंकल्पीय निर्बंध देखील आहेत आणि सदर लाभ योजना इतर विविध परिरक्षण अनुदानांबरोबर एकत्रित केली आहे. उदाहरणार्थ, ठाणे जिल्हा परिषदेत स्वतंत्र पाणी पुरवठा योजना असलेल्या ३८४ ग्रामपंचायतींपैकी फक्त २ ग्रामपंचायती (मुरबाड पंचायत समिती मधील सजाई आणि शहापूर पंचायत समितीमधील आसनगांव) आर्थिक मदतीचा लाभ घेत आहेत. अशा प्रकारे असे उघडकीस आले आहे की क्लिष्ट प्रक्रियेमुळे अनेक ग्रामपंचायती आर्थिक मदतीची मागणी करीत नाहीत.

**७.२१.१.राज्य वित्त आयोगाच्या शिफारशी:-**

राज्य वित्त आयोग अशी शिफारस करीत आहे की १७ऑक्टोबर,२०१५ अंतर्गत असलेली आर्थिक मदत योजना मागे घेण्यात यावी. त्याऐवजी ग्रामीण क्षेत्रासाठी विभागीय जलवाहिनीद्वारे पाणी पुरवठा व्यवस्थेला लागू करण्यात आलेला दिनांक २६.११.२०१८ रोजीचा नवीन शासन निर्णय ग्रामपंचायतीच्या मालकीच्या आणि त्यांच्याद्वारे देखरेख केल्या जाणाऱ्या पाणी पुरवठा योजनांना देखील लागू करण्यात यावा. एमएसइडीसीएल संस्थेने खालीलप्रमाणे ग्रामपंचायतींची विद्युतशक्ती देयकांची माहिती कळविली आहे.

**तक्ता ५३ : एमएसईडीसीएलद्वारे कळविण्यात आलेली विद्युत शक्तीची देयके**

| अनुक्रमांक | तपशील | २०१७-१८ | २०१८-१९ |
|---|---|---|---|
| १. | अस्तित्वात असलेल्या जोडण्या | ३०,४२२ | ३५,६३२ |
| २. | विद्युत शक्तीचा वापर (यूनिटस मध्ये) | ४४२.६ | ५१९.५ |
| ३. | विद्युत शक्ती देयके (रू. कोटीत) | रू. १६५.२ | रू. २२०.७ |

असे गृहित धरले की उपरोक्त सूत्रांनुसार सुमारे ५०% किंमत आर्थिक मदत म्हणून द्यावी लागणार असेल तर, शासनावर सुमारे ९० कोटीचा वित्तीय भार पडेल (मागील दोन वर्षाची सरसरी १८० कोटी आहे) आणि हजारो ग्रामपंचायतींना लाभ होईल.

राज्य वित्त आयोग अशी शिफारस करीत आहे की जिल्हा परिषदेच्या स्तरावरील कार्यकारी अभियंता, पर्यावरण अभियांत्रिक यांच्या ऐवजी विद्युतशक्ती देयक फेडण्याबाबत गट विकास अधिकाऱ्याने उप अभियंता, पर्यावरण अभियांत्रिकी, यांचे तांत्रिक सहाय्य घेऊन गट स्तरावर ग्रामपंचायतींना निधी उपलब्ध करून देण्याचे काम हाताळावे आणि निधी पंचायत समितीच्या स्तरावर उपलब्ध करून द्यावा. ग्रामपंचायतीने एमएसइडीसीएल संस्थेला पूर्वीच रक्कम अदा केली असेल तर त्याची प्रतिपूर्ती करण्याचे अधिकार गट विकास अधिकाऱ्याला प्रदान केले पाहिजेत. जर ग्रामपंचायतीने एमएसइडीसीएल संस्थेला देयके अदा केली नसतील तर गट विकास अधिकाऱ्याला ग्रामपंचायतीच्या वतीने आणि ग्रामपंचायतीसाठी एमएसइडीसीएल संस्थेला देयके प्रदान करण्यासाठी अधिकृत केले पाहिजे.

**७.२२. केंद्रीय वित्त आयोग (Central Finance Commission -CFC) अनुदाने:-**

अशी एक बाब आहे की जिने ग्रामपंचायतींचा दर्जा/प्रतिष्ठा मध्ये आणि त्यांचे वित्तीय स्वास्थ्य सुधारण्यामध्ये अलीकडच्या वर्षात योगदान दिले आहे, ती म्हणजे केंद्रीय वित्त आयोगाच्या अनुदानात झालेली मोठया प्रमाणातील वाढ आहे. १२ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या तुलनेत १३व्या केंद्रीय वित्त आयोगात (२०१०-१५) स्थानिक संस्थांसाठी (दोन्ही नागरी आणि ग्रामीण) देण्यात आलेल्या अनुदानांमध्ये मोठया प्रमाणात वाढ करण्यात आली होती. १४व्या केंद्रीय वित्त आयोगात (२०१५-२०) आणखी अधिक वाढ करण्यात आली आहे.

आम्ही वाढीव अनुदानांची स्थिती संक्षिप्तपणे खाली देत आहोत:-

**तक्ता ५४ : केंद्र शासनाद्वारे ग्रामपंचायतींना अदा करण्यात आलेली केंद्र वित्त आयोगाची अनुदाने**

| अनुक्रमांक | केंद्र वित्त आयोग | अनुदानाचा कालावधी | संपूर्ण भारतात पंचायत राज संस्थांना करण्यात आलेले वितरण (रू. कोटीत) | महाराष्ट्रातील सर्व पंचायत राज संस्थांना करण्यात आलेले वितरण | पंचायत राज संस्थांच्या अनुदानाचा ग्रामपंचायतींना देण्यात आलेला हिस्सा | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | बारावा | २००५-१० | २०,००० | | | |
| २. | तेरावा | २०१०-१५ | ६३,०६७ | ५५८९* | ७०% | राज्य शासनाद्वारे हिस्सा निश्चित करण्यात आला. |
| ३. | चौदावा | २०१५-२० | २,००,२९३ | १५,०३५* | १००% | स्वत: केंद्र वित्त आयोगाने निश्चित केले आहे, अन्य दोन श्रेणींना अनुदाने देण्यात येणार नाहीत. |

(*मूळ आणि कार्यात्मक अनुदाने दोन्ही समाविष्ट)

यावरून असे निदर्शनास येईल की ज्या ग्रामपंचायतींना सुमारे रू. ३९१२ कोटी (पंचायत राज संस्थांच्या एकूण हिश्शापैकी ७०% रक्कम) १३व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या कालावधीत मिळाले (२०१०-१५), त्या ग्रामपंचायतींना आता २०१५-२० या कालावधीत रू. १५,०३५ कोटी इतकी रक्कम मिळेल. प्रत्येक ग्रामपंचायतीला असाधारण २८५% एवढी वाढ मिळाली आहे. वस्तूत: प्रत्येक ग्रामपंचायतीला सध्या पाच वर्षासाठी सरसरी रू.५३ लाख (रू. १५००० कोटी/२८००० ग्रामपंचायती) मिळत आहेत किंवा

रू.१०.७० लाख (५३/५ वर्षे) एवढी रक्कम एका वर्षासाठी मिळते. यामध्ये मूळ आणि कार्यात्मक अनुदानाचा समावेश आहे. ग्रामपंचायतीचे लेखे योग्य प्रकारे लेखापरीक्षीत ( महाराष्ट्रातील नेहमीचे वैशिष्टय ) असतील तर कार्यात्मक अनुदान दिले जाते आणि ग्रामपंचायत स्वत:च्या कर उत्पन्नात वार्षिक वाढ दाखविते (एकवार, ते साध्य करणे कठिण नाही).

१४ व्या केंद्रीय वित्त आयोगाने त्यांची अनुदाने खर्च करण्याची कार्यपध्दती आणि व्यवस्थापन बाबत तपशीलवार मार्गदर्शक तत्त्वे दिली आहेत. अनुदानाचा काही भाग जुनी पथ दिवे वीजेची देयके फेडण्यासाठी आणि ई-ग्रामपंचायत (आपले सरकार ) प्रकल्पासाठी देखील वापरला आहे.

राज्य वित्त आयोग अशी नोंद घेत आहे की केंद्रीय वित्त आयोगाकडून मिळालेल्या मुबलक अनुदानामुळे ग्रामपंचायतींचे उत्पन्न मोठया प्रमाणात वाढलेले आहे. राज्य वित्त आयोग मागील काही वर्षात केलेल्या गुंतवणूकीचे एका स्वतंत्र संस्थेद्वारे योग्य नमुना मुल्यांकन करून घेण्याबाबत सूचित करीत आहे. भारत सरकारने निर्देशित केल्यानुसार एक सामाजिक लेखापरीक्षण करणे देखील आवश्यक आहे.

**७.२३. ग्रामपंचायतींना प्रयोजनात्मक अनुदाने:-**

वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या अनुदानांखेरीज, ग्रामपंचायतींना विशिष्ट प्रयोजनांसाठी आणि विशिष्ट उपक्रमांसाठी मोठया प्रमाणात अनुदाने प्राप्त होतात. या ठिकाणी ग्रामपंचायत योजना कार्यान्वीत करणारी संस्था आहे. राज्य शासनाने ग्रामपंचायतीला कंत्राटदार किंवा -कार्यान्वीत करणारी संस्था॰ म्हणून रू.१५ लाखापर्यंतच्या प्रकल्पांसाठी प्रत्यक्ष काम करण्याची सुविधा देखील दिली आहे, त्यायोगे ग्रामपंचायतीची प्रत्यक्षपणे काम हाताळण्याची क्षमता देखील वाढविण्यात येत आहे. ग्रामपंचायत जेव्हा थेट काम सुरु करते तेव्हा ग्रामपंचायतीला काही प्रमाणात अतिरिक्त उत्पन्न मिळते.

सदर प्रयोजनात्मक अनुदानांसाठी स्वतंत्र लेखे ठेवणे ग्रामपंचायतींकडून अपेक्षित आहे.

आम्ही खालील आकृतीद्वारे प्रातिनिधिक योजनांची यादी देत आहोत, ज्या अंतर्गत ग्रामपंचायतीला निधी प्राप्त होतात.

आलेख २५अ:- योजनांची प्रातिनिधिक यादी, ज्यासाठी ग्रामपंचायतीला निधी प्राप्त होतात.

| **योजना** | |
|---|---|
| **केंद्र पुरस्कृत** | **राज्य पुरस्कृत** |
| • केद्रीय वित्त आयोग अनुदाने<br>• ग्रामीण गृहनिर्माण (PMAY) (प्रधान मंत्री आवास योजना)<br>• राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम<br>• स्वच्छ भारत अभियान<br>• खासदार स्थानिक विकास निधी | • जनसुविधा योजना-खासदार आणि आमदार स्थानिक विकास निधी<br>• अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती नवबौध्द विकास योजना<br>• ठक्कर बाप्पा योजना<br>• डोंगरी विकास<br>• तीर्थक्षेत्र विकास निधी<br>• रमाबाई आवास योजना<br>• शबरी आवास योजना<br>• अल्पसंख्यांक विकास योजना |

**७.२४. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ( MGNREGS ):-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम (जी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम म्हणून ओळखली जाते) संपूर्ण भारतभर सन २००६ मध्ये अधिनियमित करण्यात आला. महाराष्ट्रात, ऐतिहासिक आणि भावनात्मक कारणास्तव जुना रोजगार हमी अधिनियम अजूनही चालू

ठेवला आहे, आणि त्याच्या अंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना येते. या अधिनियमांतर्गत ग्रामपंचायतींना चांगले प्रोत्साहन मिळाले, या अगोदर (म्हणजे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना पूर्व दिवसात) महाराष्ट्रात कार्यकारी विभाग -कार्यान्वयन संस्था॰ होत्या. त्यामध्ये ग्रामपंचायतीला कोणतेही स्थान नव्हते. परंतु सन २००६ नंतर, ग्रामपंचायती देखील कार्यान्वयन संस्था झाल्या. वस्तुत: अनुभवसिध्द नियमानुसार कार्यान्वयन संस्था म्हणून ग्रामपंचायतींच्या द्वारे योजनांतर्गत ८०% निधी वापरण्यात आला आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची ग्रामपंचायत स्तरावरील खालील एकत्रित आकडेवारी उल्लेखनीय आहे.

**तक्ता ५५ : निम्नलिखित वर्षांमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना (MGNREGS) अंतर्गत करण्यात आलेला खर्च**

| अनुक्रमांक | वर्ष | एकूण खर्च (कोटीमध्ये) | *ग्रामपंचायतीद्वारे करण्यात आलेला खर्च |
|---|---|---|---|
| १. | २००९-१० | २५३ | २०३ |
| २. | २०१०-११ | ३२४ | २५९ |
| ३. | २०११-१२ | १६०१ | १२८१ |
| ४. | २०१२-१३ | २१७७ | १७४२ |
| ५. | २०१३-१४ | १२६६ | १०१३ |
| ६. | २०१४-१५ | १६०१ | १२८१ |
| ७. | २०१५-१६ | १८५३ | १४८२ |
| ८. | २०१६-१७ | २०८८ | १६७० |
| ९ | २०१७-१८ | २२९४ | १६०६ |
| १०. | २०१८-१९ | २३९७ | १६७८ |
| **एकूण** | | **१५८५४** | **१२२१५** |

*ग्रामपंचायतींचे खर्चाचे गुणोत्तर प्रमाण २०१६-१७ मध्ये ८०% आणि २०१७-१८ व २०१८-१९ मध्ये ७०% होते.

अशा प्रकारे ग्रामपंचायतींना मिळालेल्या रकमांपैकी रू. १२२१५ एवढी भरीव रक्कम ग्रामपंचायतींनी खर्च केली आहे. वस्तुत: राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ग्रामीण क्षेत्रातील भांडवली गुंतवणूकीचा प्रमुख स्त्रोत आहे, दोन्ही प्रकारे, सामायिक सार्वजनिक मालमत्ता म्हणून (रस्ते, अंगणवाडी इमारती, तलाव खोल करणे इत्यादी) आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी खाजगी मालमत्तेची वाढ म्हणून देखील (फलोत्पादन, ग्रामीण गृहे, शेततळे तलाव आणि इतर).

**७.२४.१.राज्य वित्त आयोगाच्या शिफारशी:-**

**मागील काही वर्षांपासून काही निवडक ग्रामपंचायती आणि सर्व तालुक्यांमध्ये झालेल्या MGNREGS योजनेच्या परिणामाचे योग्य आणि तपशीलवार मुल्यांकन करण्याची शिफारस राज्य वित्त आयोग करीत आहे.** उदाहरणार्थ, मेळघाट तालुके (धरणी आणि चिखलदरा), भंडारा, गोंदिया आणि इतर जिल्हयांच्या काही भागांनी MGNREGS अंतर्गत मोठया प्रमाणात खर्च केला आहे. या लक्षणीय गुंतवणूकीबाबत कोणतेही विद्वत्तापूर्ण संशोधनात्मक सर्वेक्षण झालेले नाही, सदर सर्वेक्षणाचा अभाव आहे. इंदिरा गांधी विकास संशोधन संस्थेने सन २०१४ मध्ये सुरवातीला एक सर्वेक्षण केले होते, एवढे एक सर्वेक्षण अपुरे आहे. भविष्यकाळात याबाबत निर्णय घेण्यासाठी, ग्रामपंचायतींमधील MGNREGS गुंतवणूकीमुळे झालेल्या सामाजिक आणि आर्थिक परिणामांचे आणखी तपशीलवार विश्लेषण करणे गरजेचे आहे. सदर काम एखाद्या सुप्रसिध्द शैक्षणिक संस्थेकडे सोपविले पाहिजे.

### ७.२५. ग्रामपंचातींच्या स्व-उत्पन्नाचे व्यापक विश्लेषण:-

आता आम्ही ग्रामपंचायतींच्या एकूण उत्पन्न संरचनेचे विश्लेषण करू शकतो. ग्रामपंचायतींना एकसमान पातळीवर प्रमाणित करण्याच्या ऐवजी, आम्ही त्यांचे काही विशिष्ट प्रवर्गात विभाजन करण्याचे ठरविले आहे, म्हणजे ३००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या, ३०००-५०००, ५०००-१००००, १०००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायती, उपनगरीय सीमेलगत (पेरी अर्बन) असलेल्या ग्रामपंचायतीं आणि आदिवासी (PESA -Panchayats (Extension to Scheduled Areas)) गांवे. यामुळे ग्रामपंचायतींच्या उत्पन्न संरचनेबाबत अचूक यथार्थ माहिती ज्ञात होते.

**तक्ता ५६ : ३००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची संरचना**

**(तीन वर्षे -२०१५-२०१६ ते २०१७-२०१८)** **(रू. लाखात)**

| अनु-क्रमांक | जिल्हा | ग्रामपंचायत | नेमून दिलेले कर उत्पन्न | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | कर उत्पन्न | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | करेतर उत्पन्न | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | एकूण उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रायगड | उधार | १.७१ | ४९.६१ | १.४३ | ४१.४२ | ०.३१ | ८.९७ | ३.४५ |
| २. | नाशिक | खडकी | १.२५ | ५०.९२ | १.१९ | ४८.४२ | ०.०२ | ०.६६ | २.४५ |
| ३. | सांगली | धावळी | २.५८ | २६.६६ | ७.०८ | ७३.१३ | ०.०२ | ०.२० | ९.६८ |
| ४. | परभणी | करम | ०.८५ | २४.०४ | १.४३ | ४०.४२ | १.२६ | ३५.५३ | ३.५३ |
| ५. | अकोला | कपाशी रोड | ०.८३ | १३.६५ | ५.०९ | ८३.४८ | ०.१७ | २.८६ | ६.१० |
| ६. | गोंदिया | चिखली | ०.८४ | ३३.६५ | १.६६ | ६६.३५ | ०.०० | ०.०० | २.५० |

**तक्ता ५७ : ३०००-५००० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची संरचना**

**(तीन वर्षे -२०१५-२०१६ ते २०१७-२०१८)** **(रू. लाखात)**

| अनु-क्रमांक | जिल्हा | ग्रामपंचायत | नेमून दिलेले कर उत्पन्न | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | कर उत्पन्न | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | करेतर उत्पन्न | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | एकूण उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सिंधुदुर्ग | आंबोली | २.७४ | १६ | १२.८१ | ७३ | २.०४ | १२ | १७.५९ |
| २. | अहमदनगर | अकोलनेट | १.८७ | ८ | १७.८१ | ७९ | २.७८ | १२ | २२.४७ |
| ३. | सातारा | अपशिंगे | ३.४५ | १८ | १२.५९ | ६७ | २.८७ | १५ | १८.९० |
| ४. | जालना | वळसा वडाळा | १.२३ | ३१ | २.६१ | ६६ | ०.११ | ३ | ३.९६ |
| ५. | यवतमाळ | तळेगाव | १.४८ | २५ | ३.८९ | ६७ | ०.४८ | ८ | ५.८४ |
| ६. | गोंदिया | कावळेवाडा | २.४९ | २२ | ६.५२ | ५८ | २.२२ | २० | ११.२३ |

**तक्ता ५८ : ५०००-१०००० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची संरचना**

**(तीन वर्षे -२०१५-२०१६ ते २०१७-२०१८)** **(रू. लाखात)**

| अनु-क्रमांक | जिल्हा | ग्रामपंचायत | नेमून दिलेले कर उत्पन्न | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | कर उत्पन्न | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | करेतर उत्पन्न | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | एकूण उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रत्नागिरी | जळगाव | २०.६१ | २४ | ५६.३३ | ६६ | ८.५२ | १० | ८५.६६ |
| २. | अहमदनगर | बोधेगाव | ४.२६ | २० | १३.०० | ६० | ४.२४ | २० | २१.५० |
| ३. | कोल्हापूर | अकीवट | २.०३ | ११ | १५.२७ | ८३ | १.०४ | ६ | १८.३४ |
| ४. | उस्मानाबाद | ईट | ३.९८ | १० | १३.६४ | ३६ | २०.४९ | ५४ | ३८.११ |
| ५. | बुलढाणा | जलांब | २.२९ | २० | ५.९७ | ५३ | ३.०७ | २७ | ११.३३ |
| ६. | वर्धा | तळेगाव | २.३९ | १३ | १३.८८ | ७५ | २.२६ | १२ | १८.५२ |

## तक्ता ५९ : १०००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची संरचना (तीन वर्षे -२०१५-२०१६ ते २०१७-२०१८)

(रू. लाखात)

| अनु-क्रमांक | जिल्हा | ग्रामपंचायत | नेमून दिलेले कर उत्पन्न | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | कर उत्पन्न | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | करेतर उत्पन्न | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | एकूण उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रत्नागिरी | खेरडी | १६.६८ | २० | ६४.५९ | ७६ | ३.३० | ४ | ८४.५६ |
| २. | अहमदनगर | लोणी खुर्द | ४.२४ | ८ | ४४.०९ | ८८ | १.७८ | ४ | ५०.११ |
| ३. | पुणे | पिरंगुट | ४९.०६ | १६ | २५१.११ | ८१ | १०.०८ | ३ | ३१०.२४ |
| ४. | उस्मानाबाद | अंदूर | १.६२ | ८ | १७.६५ | ८५ | १.४५ | ७ | २०.७२ |
| ५. | वाशिम | अनसिंग | ८.५० | २६ | २१.१२ | ६५ | २.८० | ९ | ३२.४२ |
| ६. | नागपूर | टेकाडी | १५.१७ | ६० | ९.०० | ३६ | १.१८ | ५ | २५.३६ |

## तक्ता ६० : उपनगरीय सीमेलगतच्या ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची संरचना (तीन वर्षे -२०१५-२०१६ ते २०१७-२०१८)

(रू. लाखात)

| अनु-क्रमांक | जिल्हा | ग्रामपंचायत | नेमून दिलेले कर उत्पन्न | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | कर उत्पन्न | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | करेतर उत्पन्न | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | एकूण उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सिंधुदुर्ग | काळमठ | १४.४७ | २५ | ४२.०५ | ७२ | २.०० | ३ | ५८.५२ |
| २. | नंदुरबार | होळची हवेली | ११.१८ | ३८ | १४.६० | ५० | ३.२६ | ११ | २९.०४ |
| ३. | सातारा | साईदापूर | ३६.२८ | ३६ | ६५.२१ | ६४ | ०.४१ | ० | १०१.८९ |
| ४. | उस्मानाबाद | डिकसळ | ८.९० | ३४ | १६.८१ | ६४ | ०.७१ | ३ | २६.४२ |
| ५. | बुलढाणा | सागवान | २९.४८ | ३३ | ५६.९३ | ६४ | ३.२१ | ४ | ८९.६१ |
| ६. | वर्धा | नळवाडी | ११.७७ | २० | ४६.३१ | ७८ | १.५७ | ३ | ५९.६५ |

## तक्ता ६१ : पंचायती उपबंध अनुसार विस्तारित करण्यात आलेल्या अनुसूचित क्षेत्रांतील (पेसा-पंचायती संबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम,१९९६) ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची संरचना (तीन वर्षे -२०१५-२०१६ ते २०१७-२०१८)

(रू. लाखात)

| अनु-क्रमांक | जिल्हा | ग्रामपंचायत | नेमून दिलेले कर उत्पन्न | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | कर उत्पन्न | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | करेतर उत्पन्न | एकूण उत्पन्नाची टक्केवारी | एकूण उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पालघर | कारळगाव | ५.२८ | ८१ | १.१८ | १८ | ०.०२ | ० | ६.४८ |
| २. | अहमदनगर | शेंडी | ६.७६ | ४३ | ८.९ | ५६ | ०.१४ | १ | १५.७९ |
| ३. | नाशिक | आंबेवाडी | ९.८२ | ९२ | ०.७७ | ७ | ०.०३ | ० | १०.६२ |
| ४. | पुणे | तिरपड | ७.९७ | ८४ | ०.९७ | १० | ०.५७ | ६ | ९.५ |
| ५. | यवतमाळ | जालका | ४.५४ | ६९ | १.६४ | २५ | ०.३६ | ६ | ६.५४ |
| ६. | चंद्रपूर | मनोळी | २.४९ | ५३ | २.०७ | ४४ | ०.११ | २ | ४.६७ |

आलेख २६:- विविध ग्रामपंचायतींच्या प्रवर्गांमधील नियुक्त कर उत्पन्नाचा हिस्सा:-




अशा प्रकारे  वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की ग्रामपंचायतीचे आकारमान वाढले की ग्रामपंचायतीच्या स्वत:च्या कर उत्पन्नातही वाढ होते, त्याऐवजी लहान ग्रामपंचायती मोठया प्रमाणात नियुक्त करांवर (जमीन महसूल उपकर आणि मुद्रांक अनुदान) अवलंबून असतात.

**७.२६.  ग्रामपंचायतींच्या खर्चाची संरचना:-**

**तक्ता ६२ : ३००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीच्या खर्चाची संरचना (तीन वर्षे -२०१५-२०१६ ते २०१७-२०१८)**

(रू. लाखात)

| अनु-क्रमांक | जिल्हा | ग्रामपंचायत | दुर्बल घटकांवरील अनिवार्य खर्च | मानधन आणि कार्यालयीन आणि इतर प्रशासकीय खर्च | पाणीपुरवठा, आरोग्य आणि स्वच्छता | नागरी सेवा/सुविधा आणि नानाविध सेवा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सिंधुदुर्ग | कारूळ | ०.७२ | ०.६४ | २.५६ | ९.३१ | १३.२४ |
| | टक्केवारी | | ५.४७ | ४.८७ | १९.३६ | ७०.३ | |
| २. | सातारा | जकातवाडी | २.५१ | १.३५ | १०.६४ | ४.८८ | १९.३८ |
| | टक्केवारी | | १२.९६ | ६.९७ | ५४.८७ | २५.२ | |
| ३. | नाशिक | खडकी | ०.२७ | ०.२ | ०.०१ | ० | ०.४७ |
| | टक्केवारी | | ५६.३८ | ४२.२ | १.४१ | ० | |
| ४. | जालना | वडगाव वखारी | ०.१३ | ०.०७ | १.१७ | ०.०६ | १.४२ |
| | टक्केवारी | | ८७९ | ५.१८ | ८१.९६ | ४.०८ | |
| ५. | बुलढाणा | पांगरखेड | १.०४ | ०.६८ | ५.४१ | १.५५ | ८.६८ |
| | टक्केवारी | | १२ | ७.८१ | ६२.३ | १७.८९ | |
| ६. | नागपूर | मटकाझरी | १.२७ | ०.९३ | ७.०४ | ११.३८ | २०.६२ |
| | टक्केवारी | | ६.१७ | ४.५२ | ३४.१३ | ५५.१८ | |

## तक्ता ६३ : ३०००-५००० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीच्या खर्चाची संरचना

## (तीन वर्षे -२०१५-२०१६ ते २०१७-२०१८)

(रू. लाखात)

| अनु-क्रमांक | जिल्हा | ग्रामपंचायत | दुर्बल घटकांवरील अनिवार्य खर्च | मानधन आणि कार्यालयीन आणि इतर प्रशासकीय खर्च | पाणीपुरवठा, आरोग्य आणि स्वच्छता | नागरी सेवा/सुविधा आणि नानाविध सेवा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रत्नागिरी | उन्हेरे | ०.७७ | ८.४६ | १०.४४ | ०.५९ | २०.२६ |
| | टक्केवारी | | ३.८२ | ४१.७६ | ५१.५२ | २.८९ | |
| २. | कोल्हापूर | बुबनाळ | १.४ | १.१४ | ९.२७ | ०.९ | १२.७१ |
| | टक्केवारी | | ११ | ९.०१ | ७२.९१ | ७.०८ | |
| ३. | अहमदनगर | अकोलनेर | ३.०७ | ०.७ | ८.१८ | ५.०९ | १७.०५ |
| | टक्केवारी | | १८.०३ | ४.११ | ४८.०१ | २९.८५ | |
| ४. | बीड | धानोरा | १.२५ | ०.२४ | २.३६ | ०.३८ | ४.२३ |
| | टक्केवारी | | २९.६६ | ५.७ | ५५.७७ | ८.८७ | |
| ५. | अमरावती | टाकरखेडा | ०.१८ | ०.८३ | १.९४ | ०.६३ | ३.५८ |
| | टक्केवारी | | ४.९२ | २३.२१ | ५४.२४ | १७.६४ | |
| ६. | गोंदिया | वाडेगाव | ०.३१ | १.१४ | ४.०३ | ०.९४ | ६.४२ |
| | टक्केवारी | | ४.८४ | १७.८ | ६२.७२ | १४.६४ | |

## तक्ता ६४ : ५०००-१०००० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीच्या खर्चाची संरचना

## (तीन वर्षे -२०१५-२०१६ ते २०१७-२०१८)

(रू. लाखात)

| अनु-क्रमांक | जिल्हा | ग्रामपंचायत | दुर्बल घटकांवरील अनिवार्य खर्च | मानधन आणि कार्यालयीन आणि इतर प्रशासकीय खर्च | पाणीपुरवठा, आरोग्य आणि स्वच्छता | नागरी सेवा/सुविधा आणि नानाविध सेवा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पालघर | कुडुस | ४ | ५.५९ | ४०.३५ | ३०.२५ | ८०.१९ |
| | टक्केवारी | | ४.९८ | ६.९७ | ५०.३२ | ३७.७३ | |
| २. | सांगली | तुरची | ०.६५ | १.२ | १०.११ | ०.८४ | १२.८ |
| | टक्केवारी | | ५.११ | ९.३७ | ७८.९९ | ६.५३ | |
| ३. | नाशिक | नामपूर | १.६९ | ८.६ | ४३.८९ | १७.३२ | ७१.५ |
| | टक्केवारी | | २.३७ | १२.०३ | ६१.३८ | २४.२२ | |
| ४. | बीड | लैाल | ०.३९ | ०.८९ | ५.०६ | ३.०८ | ९.४२ |
| | टक्केवारी | | ४.१६ | ९.४९ | ५३.६९ | ३२.६६ | |
| ५. | अकोला | माना | ०.३७ | २.१८ | ८.४४ | ४.३ | १५.२८ |
| | टक्केवारी | | | | | | |
| ६. | नागपूर | कोराडी | २५.६८ | १२.३७ | ४६.९६ | १४८.१६ | २३३.१७ |
| | टक्केवारी | | ११.०१ | ५.३ | २०.१४ | ६३.५४ | |

## तक्ता ६५ : १०००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीच्या खर्चाची संरचना

(तीन वर्षे -२०१५-२०१६ ते २०१७-२०१८) (रू. लाखात)

| अनु-क्रमांक | जिल्हा | ग्रामपंचायत | दुर्बल घटकांवरील अनिवार्य खर्च | मानधन आणि कार्यालयीन आणि इतर प्रशासकीय खर्च | पाणीपुरवठा, आरोग्य आणि स्वच्छता | नागरी सेवा/सुविधा आणि नानाविध सेवा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रायगड | केगाव | १.०९ | २.६१ | १३.२५ | ७.०५ | २४ |
| | टक्केवारी | | ४.५६ | १०.८८ | ५५.१९ | २९.३६ | |
| २. | पुणे | पिंरगुट | ४०.०७ | ४.३५ | १०१.९७ | १३४.३८ | २८०.७७ |
| | टक्केवारी | | १४.२७ | १.५५ | ३६.३२ | ४७.८६ | |
| ३. | नंदुरबार | प्रकाशा | १.७१ | १.५९ | २३.०२ | ५.०५ | ३१.३७ |
| | टक्केवारी | | ५.४४ | ५.०८ | ७३.३८ | १६.१ | |
| ४. | जालना | तीर्थपूरी | ४.३२ | ०.५५ | १२.०५ | ०.९ | १७.८१ |
| | टक्केवारी | | २४.२४ | ३.०९ | ६७.६४ | ५.०४ | |
| ५. | बुलढाणा | अमदापूर | ३.६४ | १.३८ | ६.६३ | १.६ | १३.२५ |
| | टक्केवारी | | | | | | |
| ६. | वर्धा | पिंपरी (मेघे) | ७.८१ | ७.७६ | ६७.१४ | ४७.६८ | १३०.३९ |
| | टक्केवारी | | ५.९९ | ५.९५ | ५१.४९ | ३६.५६ | |

## तक्ता ६६: उपनगरीय सीमेलगतच्या ग्रामपंचायतीच्या खर्चाची संरचना

(तीन वर्षे -२०१५-२०१६ ते २०१७-२०१८) (रू. लाखात)

| अनु-क्रमांक | जिल्हा | ग्रामपंचायत | दुर्बल घटकांवरील अनिवार्य खर्च | मानधन आणि कार्यालयीन आणि इतर प्रशासकीय खर्च | पाणीपुरवठा, आरोग्य आणि स्वच्छता | नागरी सेवा/सुविधा आणि नानाविध सेवा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ठाणे | कोण | ४.४१ | ५.४७ | १३१.१५ | ८०.७५ | २२१.७८ |
| | टक्केवारी | | १.९९ | २.४७ | ५९.१३ | ३६.४१ | |
| २. | सोलापूर | उळे | ०.२५ | ०.६३ | २.५२ | ०.६६ | ४.०६ |
| | टक्केवारी | | ६.२७ | १५.४६ | ६२.०७ | १६.२ | |
| ३. | अहमदनगर | संगमनेर खुर्द | १.६४ | १.२८ | ८.५८ | ३.३७ | १४.८७ |
| | टक्केवारी | | ११.०६ | ८.६ | ५७.७ | २२.६४ | |
| ४. | उस्मानाबाद | सांजा | १.०९ | १.१४ | ७.३५ | २.५४ | १२.१२ |
| | टक्केवारी | | ९ | ९.३९ | ६०.६५ | २०.९६ | |
| ५. | वाशिम | जांब | ४.५ | ०.८८ | ६.२५ | ४.४८ | १६.११ |
| | टक्केवारी | | २७.९४ | ५.४६ | ३८.७८ | २७.८१ | |
| ६. | नागपूर | बेसा | २४.६ | १९.०७ | ११४.९३ | १८८.७४ | ३४७.३३ |
| **टक्केवारी** | | | **७.०८** | **५.४९** | **३३.०९** | **५४.३४** | |

**तक्ता ६७ : पंचायती उपबंध अनुसार विस्तारित करण्यात आलेल्या अनुसूचित क्षेत्रांतील (PESA-पंचायती संबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम,१९९६) ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची संरचना**

**(तीन वर्षे -२०१५-२०१६ ते २०१७-२०१८)** (रू. लाखात)

| अनु-क्रमांक | जिल्हा | ग्रामपंचायत | दुर्बल घटकांवरील अनिवार्य खर्च | मानधन आणि कार्यालयीन आणि इतर प्रशासकीय खर्च | पाणीपुरवठा, आरोग्य आणि स्वच्छता | नागरी सेवा/सुविधा आणि नानाविध सेवा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पालघर | कारळगाव | ०.१४ | ०.६४ | ०.१४ | ०.१२ | १.०४ |
| | टक्केवारी | | १३.८४ | ६१.६४ | १३.१३ | ११.३९ | |
| २. | पुणे | जांभोरी | ०.६३ | ०.५३ | १.८७ | ०.८३ | ३.८६ |
| | टक्केवारी | | १६.३६ | १३.६७ | ४८.४९ | २१.४८ | |
| ३. | नंदुरबार | राजबर्डी | १.४७ | ०.९ | २.३२ | १.५७ | ६.२६ |
| | टक्केवारी | | २३.४४ | १४.४३ | ३७.०२ | २५.११ | |
| ४. | नाशिक | आंबेवाडी | ०.२३ | ०.३९ | १.२७ | ७.४१ | ९.३ |
| | टक्केवारी | | २.५ | ४.२४ | १३.६४ | ७९.६१ | |
| ५. | यवतमाळ | पिसगाव | ०.२८ | ०.३३ | १.०६ | ०.४३ | २.१ |
| | टक्केवारी | | १३.४५ | १५.७३ | ५०.४१ | २०.४२ | |
| ६. | चंद्रपूर | कुकुडसाथ | ०.३७ | ०.७२ | २.७७ | १.२१ | ५.०७ |
| | टक्केवारी | | ७.३५ | १४.१३ | ५४.६४ | २३.८८ | |

### ७.२७. निकटतम वर्षातील ग्रामपंचायतींच्या साधन संपत्तीचे व्यापक विश्लेषण (उत्पन्न आणि खर्च संरचना):-

उत्पन्न आणि खर्च यांच्या विश्लेषणावरून असे दिसून येईल की मागील दशकात, विशेषत: मागील पाच वर्षात, ग्रामपंचायतींनी त्यांच्या उत्पन्नात आणि उपक्रमात लक्षणीय वाढ झाली आहे. सदर झालेले बदल खालील प्रमाणे संक्षिप्तपणे दर्शविता येतील:-

- सन २०१५ पासून भांडवली मूल्य पध्दत सुरू केल्यामुळे गृह कर संकलनातून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ झाली.
- विशेषत: सध्याच्या २०१५-२० संबंधीत १४व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या कालावधीत केंद्रीय वित्त आयोगाच्या अनुदानात लक्षणीय वाढ झाली.
- ग्रामपंचायतींद्वारे MGNREGS कार्यान्वित करण्यात आल्यामुळे मालमत्तेत वाढ झाली.
- आदिवासी भागांतील ग्रामपंचायतींमध्ये (महाराष्ट्रातील एकूण ग्रामपंचायतींपैकी १०% ग्रामपंचायती) PESA (Panchayats (Extension to Scheduled Areas))सामाईक वन अधिकार आणि विशेष आदिवासी योजना राबविण्यात आल्यामुळे साधनसंपत्तीमध्ये वाढ झाली.
- केंद्रीय आणि राज्य शासनांच्या विविध विकास योजनांच्या अंतर्गत निधी वितरणात वाढ झाली.
- अलग ठेवण्यात आलेला अपूरा निधी आणि मागील काही वर्षात निर्माण केलेल्या मालमत्तेची देखभाल आणि जतन याकडे झालेले दुर्लक्ष यामुळे निर्मित मालमत्तेचा जलदगतीने ऱ्हास झाला.

वस्तुत: उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीचा जलदगतीने आणि परिणामकारक रीतीने वापर करणे हे अनेक ग्रामपंचायतीं पुढील आव्हान आहे. विशेषत: आदिवासी क्षेत्र आणि दुर्गम गावांमध्ये अभियंता आणि इतर तार्किक बाबींची कमतरता असल्याने, वेळेत निधीचा वापर करणे एक आव्हान असते.

### ७.२८. ग्रामपंचायतींची वित्तीय स्थिती आणखी सक्षम करण्यासाठी केलेल्या शिफारशी:-

### ७.२८.१.व्यावसायिक कर संकलन ग्रामपंचायतींकडे हस्तांतरित करणे:-

सर्व तज्ञ समिती, ज्यांनी स्थानिक संस्थासाठी उपलब्ध असणा-या साधनसंपत्तींचा तपास केला, त्यांनी असे सूचित केले आहे की स्थानिक संस्थांद्वारेच व्यावसायिक कर संकलन हाताळले गेले पाहिजे. वस्तूत: काही राज्यांनी, जसे केरळ, तामिळनाडू आणि गुजरात या राज्यांमध्ये यापूर्वीच नागरी स्थानिक संस्था आणि पंचायत राज संस्था या दोघांकडे व्यावसायिक कर संकलन हस्तांतरीत केले आहे.

इतर राज्यांमध्ये, पंचायत राज संस्थांच्या तीन स्तरांमधील, ग्रामपंचायत स्तरावर व्यावसायिक कर थेट संकलित केला जातो.

इतर दोन राज्यांनी उपलब्ध करून दिल्याप्रमाणे व्यावसायिक कराचे आकडे खाली दर्शविण्यात आले आहेत.

**तक्ता ६८ : तामिळनाडू आणि गुजरात राज्यांची व्यावसायिक कर संकलन आकडेवारी**

(रू. लाखात)

| राज्याचे नाव | २०१६-१७ आर्थिक वर्षातील व्यावसायिक कर संकलन | २०१७-१८ आर्थिक वर्षातील व्यावसायिक कर संकलन |
|---|---|---|
| तामिळनाडू | १०५ | ११० |
| गुजरात | ९३ | ७५ |

उपरोक्त दोन राज्यांपेक्षा ग्रामीण महाराष्ट्र आणि त्याची अर्थव्यवस्था यांचे आकारमान मोठे आहे. तरी शासनावर कोणत्याही वित्तीय भाराशिवाय, ग्रामीण महाराष्ट्रात लहान व्यावसायिक, व्यापारी आणि इतर यांच्याकडून रू.१००-१५० कोटी संकलित करण्याची क्षमता आहे.

आम्ही यापूर्वीच व्यावसायिक कराचे संकलन स्थानिक संस्थांकडे हस्तांतरित करण्याबाबत नागरी स्थानिक संस्थांची वित्त व्यवस्था या प्रकरणात विस्तृतपणे नमूद केले आहे. तसेच आम्ही असे निदर्शनास आणून दिले आहे की सध्या विक्री कर विभागाकडे ग्रामीण क्षेत्रातून संकलन करण्यासाठी यंत्रणा नाही.

### ७.२८.२.राज्य वित्त आयोगाच्या शिफारशी:-

राज्य वित्त आयोग ठामपणे शिफारस करीत आहे की ग्रामीण क्षेत्रातील व्यावसायिक कर संकलन ग्रामपंचायतींकडे हस्तांतरीत झाले पाहिजे. महाराष्ट्रातील क्षमता मापण्यासाठी, गुजरात आणि तामिळनाडू राज्यांच्या पंचायत राज संकलनाच्या आकडेवारीचा वापर मापदंड म्हणून करून, राज्य वित्त आयोग असे मत व्यक्त करीत आहे की ग्रामपंचायतीद्वारे दरसाल रू. १५०-२०० कोटी एकत्रित करण्याची क्षमता आहे. विशेषत: तेथे व्यावसायिक उद्योजकतेचे सर्वाधिक प्रमाण आहे, तुलनेने आर्थिकदृष्टया सुस्थिती असलेली लोकसंख्या, जी शहरांच्या जवळ किंवा शहरांबाहेर गावठाणांच्या जवळ राहते आणि जी कायदेशीरपणे नागरी संस्था म्हणून अधिसूचित करण्यात आलेली नाही. सदर लोकसंख्या उपनगरीय सीमेलगतच्या गावठाणांत आहे. या उपनगरीय सीमेलगतच्या गावठाणांमध्ये व्यावसायिक कर मिळवून देण्याची मोठी क्षमता आहे.

राज्य वित्त आयोग शिफारस करीत आहे की व्यावसायिक कराचे उत्पन्न ग्रामपंचायत आणि देखरेख करणारी संस्था म्हणजे पंचायत समिती मध्ये ७५ : २५ या प्रमाणात वाटले पाहिजे, म्हणजेच ७५% ग्रामपंचायतीला आणि २५% पंचायत समितीला मिळाले पाहिजे. उच्चस्तरीय देखरेखीमुळे योग्य नियंत्रण ठेवण्यास आणि तसेच कमकुवत ग्रामपंचायतींची कामगिरी सुधारण्यास मदत होते. पंचायत समितींना देखील संकलनाची २५% रक्कम मिळेल, त्यामुळे सदर पंचायत समिती या कामात स्वारस्य घेतील.

## ७.२९. जिल्हा ग्राम विकास निधी (DVDF -District Village Development Fund) :-

ग्राम पंचायत अधिनियम कलम १३३ मध्ये जिल्हा ग्राम विकास निधी स्थापन करण्याची तरतूद आहे. जिल्हा पातळीवर जतन केल्या जाणाऱ्या जिल्हा ग्राम विकास निधीसाठी ग्रामपंचायतींनी त्यांच्या उत्पन्नातील काही रक्कम अपरिहार्यपणे दिली पाहिजे. ग्रामपंचायतींचे वार्षिक अंशदान जिल्हा परिषद पातळीवर निधीत जमा होते, जेथे सदर निधी बँकेच्या मुदत ठेवीमध्ये गुंतविला जातो आणि त्यावर उच्च दराने व्याज मिळते. ग्रामपंचायती जिल्हा ग्राम विकास निधी मधून कमी व्याजदराने कर्ज घेऊ शकतात, ज्या कर्जाची जिल्हा ग्राम विकास निधीमध्ये वार्षिक हप्त्यात परतफेड करायची असते. अधिनियमातील या तरतुदीचा उद्देश ग्रामपंचायतींची एक -सहकारी बँक॰ निर्माण करण्याचा होता, ज्यामधून ग्रामपंचायती भांडवली गुंतवणूक करण्याकरिता कर्ज घेऊ शकतील. त्यावेळी (१९६०) मध्ये ग्रामपंचायतींना मिळणारी अनुदाने फार मर्यादित होती. तर ग्रामपंचायतींना भांडवती मालमत्ता जसे ग्रामपंचायत भवन, समाज मंदिर इत्यादी बांधण्यासाठी निधीची गरज होती. त्यामुळे जिल्हा ग्राम विकास निधी ची कल्पना अस्तित्वात आली. शासनाने देखील बॉम्बे जिल्हा ग्राम विकास निधी नियम, १९६० तयार केले, ज्यामध्ये या संबंधी विविध मार्गदर्शक तत्त्वे देण्यात आली आहे.

सांप्रत जिल्हा ग्राम विकास निधी कक्ष जिल्हा परिषदेच्या कार्यालयात उप मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्राम पंचायत यांच्या नियंत्रणाखालील जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्याद्वारे (लिपिक) सांभाळला जातो.

खालील तक्ता जिल्हा ग्राम विकास निधी अंतर्गत उपलब्ध रक्कम आणि प्रत्येक जिल्हयाला वितरित करण्यात आलेली रक्कम दर्शवित आहे.

**तक्ता ६९ : प्रत्येक जिल्हयात वितरित करण्यात आलेली जिल्हा ग्राम विकास निधीची (DVDF) रक्कम**

(रू. कोटीत)

| अनु-क्रमांक | जिल्हा | उपलब्ध रक्कम | वितरित रक्कम |
|---|---|---|---|
| १. | ठाणे | १५.३८ | ७.८३ |
| २. | पालघर | ८.८९ | ४.९७ |
| ३. | रायगड | २७.२८ | ८.६९ |
| ४. | रत्नागिरी | १७.६० | ४.६१ |
| ५. | सिंधुदुर्ग | ७.२१ | १.४१ |
| ६. | नाशिक | २१.०० | ६.०० |
| ७. | धुळे | ९.१८ | २.३३ |
| ८. | नंदुरबार | ३.१४ | ०.५० |
| ९. | जळगाव | २४.०३ | १.०१ |
| १० | अहमदनगर | २२.१७ | ६.३५ |
| ११ | पुणे | २७.७४ | १५.८५ |
| १२ | सातारा | २९.८१ | ०.९६ |
| १३ | सांगली | २४.१३ | ०.६६ |
| १४ | सोलापूर | १३.७६ | ४.७७ |
| १५ | कोल्हापूर | २४.५६ | ३.४८ |
| १६ | औरंगाबाद | ८.६५ | ५.७० |
| १७ | जालना | १.७९ | १.३३ |
| १८. | परभणी | ३.०२ | २.२८ |
| १९. | हिंगोली | ४.६१ | ०.७७ |
| २०. | बीड | ३.७३ | ०.०० |
| २१. | नांदेड | ३.५० | ०.०० |
| २२. | उस्मानाबाद | २.९४ | २.६२ |
| २३. | लातूर | ७.५२ | ३.०१ |
| २४. | अमरावती | १३.२७ | ०.८६ |
| २५. | अकोला | ६.४७ | २.१३ |
| २६. | वाशिम | ०.५५ | ०.२१ |
| २७. | बुलढाणा | १५.२८ | १.०९ |
| २८. | यवतमाळ | १५.०८ | १.०९ |
| २९. | नागपूर | २०.७७ | ०.५९ |
| ३०. | वर्धा | ९.३३ | १.९८ |
| ३१. | भंडारा | १०.४० | २.६४ |
| ३२. | गोंदिया | ३.१४ | ०.३० |
| ३३. | चंद्रपूर | ५.२२ | १२.६३ |
| ३४. | गडचिरोली | ३.३४ | ०.०० |

| अनुक्रमांक | उपलब्ध रक्कम | वितरित रक्कम |
|---|---|---|
| एकूण -राज्याची रक्कम | २८६.३२ | ७६.४५ |

असे निदर्शनास आले आहे की या बदललेल्या परिस्थितीत, जिल्हा ग्राम विकास निधी काहीसा अनावश्यक झाला आहे. पूर्वी अनेक ग्रामपंचायती व्यापारी संकुलं (शॉपिंग कॉम्पलेक्स) बांधण्यासाठी कर्ज घेत होत्या. हा एक सर्वसाधारण उपक्रम होता ज्यासाठी जिल्हा ग्राम विकास निधी वापरला जात असे. इतर उपक्रम जसे ग्रामपंचायत भवन, आंगणवाडी, समाज मंदिर यांची उभारणी आणि पाणी पुरवठा योजना इत्यादींसाठी आता नियमित शासकीय निधी उपलब्ध आहेत.

**७.३०. राज्य वित्त आयोगाची शिफारस:-**

(क) जिल्हा ग्राम विकास निधीची आणखी जास्त जाहिरात केली पाहिजे आणि निधी बाबत जागरूकता निर्माण केली पाहिजे. आज मोठी रक्कम बँक ठेवींमध्ये अडकलेली आहे आणि अनेक जिल्हा परिषदांच्या शासकीय अधिका-यांना आणि अशासकीय पदाधिकाऱ्यांना जिल्हा ग्रामीण विकास निधी बाबत माहिती नाही.

(ख) जिल्हा ग्राम विकास निधी ज्या उपक्रमांसाठी वापरला गेला पाहिजे, ते उपक्रम/कार्यक्रम कालानुरूप अधिक आधुनिक करावेत. जिल्हा ग्राम विकास निधीच्या वापराबाबत योजनांचा तीव्र अभाव आहे, त्यामुळे ग्रामपंचायती सदर निधीचा वापर करीत नाहीत. ज्यासाठी जिल्हा ग्राम विकास निधी कर्ज वापरता येतील असे काही निर्देशक उपक्रम/ कार्यक्रम खालीलप्रमाणे आहेत:-

१) ग्रामपंचायतीकडून शेतकऱ्यांनी शेतकी अवजारे भाड्याने घेणे

२) ग्रामपंचायतीच्या पडीक जमिनीवर सोलर उर्जा निर्मिती सुरू करणे किंवा सौर उर्जेवर चालणाऱ्या पथ दिव्यांचा वापर करणे

३) महिलांच्या स्वयं सहायता बचत गटांकरीता (Self Help Group)व्यावसायिक उपक्रम चालविण्यासाठी लहान कर्मशाळांची (ग्रामीण औद्योगिक मालमत्ता) उभारणी. अशा प्रकारच्या उपक्रमांसाठी आवश्यक कर्मशाळांची तीव्र टंचाई आहे.

४) लहान कोठारे (warehouses) (स्थानिक शेतकऱ्यांची धान्ये इत्यादी साठविण्याकरीता वापरण्यासाठी )

५) ग्राम पातळीवर लहान शीतगृहे किंवा अशा प्रकारच्या सुविधा

६) ग्राम पातळीवर बालवाडी

७) ग्राम पातळीवर वनीकरण आणि वृक्षारोपण

(ग) आधारभूत यंत्रणेच्या अभावामुळे जिल्हा ग्राम विकास निधीचा वापर झाला नाही. शासनाने एखाद्या खाजगी विभागीय स्तरावर सहाय्य देणाऱ्या संस्थेला परवानगी द्यावी, सदर संस्था योग्य आर्थिक मूल्याचे अंदाज आणि तांत्रिक मार्गदर्शन करेल.

(घ) संपूर्ण जिल्हा ग्राम विकास निधी योजनेचे नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे उपरोक्त धर्तीवर दुरूस्त केले पाहिजेत.

### ७.३१. ग्रामपंचायतींनी त्यांच्या उत्पन्नाच्या २% ते ५% रक्कम विशेष परिरक्षा निधीसाठी राखीव ठेवण्याची आवश्यकता:-

आम्ही निर्देशित केले आहे की विविध योजनांतर्गत ग्रामपंचायतींना मिळणाऱ्या अनुदानांमध्ये मागील दोन दशकांत वाढ झाली आहे. तसेच १४व्या केंद्रीय वित्त आयोगाने ग्रामपंचायतींच्या अनुदानांत भरीव वाढ केली आहे. या खेरीज MGNREGS अंतर्गत अनेक मालमत्ता घेतलेल्या आहेत. तथापि एकदा या मालमत्तांची उभारणी केल्यावर, त्यांचे जतन आणि परिरक्षा करण्यासाठी फार कमी निधी ठेवण्यात आला आहे. त्यामुळे मौल्यवान मालमत्तांचा जलदगतीने ऱ्हास होतो.

मागील काही वर्षापासून, स्वच्छता आणि शौचालये बांधण्याबाबत जोरदार प्रचार मोहिम चालू आहे. शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत भवन आणि सार्वजनिक ठिकाणी शौचालये बांधण्यात आलेली आहेत. त्याशिवाय घरगुती (सेप्टीक) शौचालयांची संख्याही वाढलेली आहे. या सर्वांची देखभाल करावी लागते. शौचालयांची वापरयोग्य (operational) देखभाल करण्यासाठी दरमहा लागणाऱ्या निधीची व्यापक अंदाज खाली देण्यात येत आहे.

**तक्ता ७० : स्वच्छतागृहांच्या देखभालीसाठी दरमहा लागणाऱ्या निधींचे व्यापक अंदाज**

(आकडे रूपयात)

| अनु-क्रमांक | उपक्रम | लोकसंख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १००० पर्यंत | १००१-२००० | २००१-५००० | ५००१-१०००० | १००००+ |
| १. | पाणी पुरवठा योजनांसाठी विद्युतशक्ती आकार | २५०० | ५००० | ७५०० | १४००० | २०००० |
| २. | शुध्दीकरण सामग्री खर्च -उपभोग्य, टीसीएल, किरकोळ सामग्री खर्च | ५०० | ५०० | १००० | १००० | १००० |
| ३. | पर्जन्यजल वाहिनी व जलनि:सारण वाहिनी यांच्या सह सांडपाणी वाहिनींची देखभाल | ५००० | ७००० | १०००० | १५००० | २०००० |
| ४. | पाणीपुरवठा प्रणाली दुरूस्ती / देखभाल (प्रतिबंधकासह) | ४००० | ५००० | ५००० | ८००० | १०००० |
| ५. | घनकचरा व्यवस्थापन -सदर घन कचरा गोळा करणे आणि त्यावर प्रक्रिया करणे अंतर्भूत | ५००० | ५००० | १०००० | १०००० | १५००० |
| ६. | **अंदाजित स्वच्छता सुविधांची देखभाल / परिरक्षण** | | | | | |
| ७. | सार्वजनिक स्वच्छता यंत्रसामग्री / प्रणाली | १००० | १००० | ३००० | ३००० | ५००० |
| ८. | शाळा | १००० | १००० | १००० | २००० | २००० |
| ९. | अंगणवाडी | ५०० | ५०० | ५०० | १००० | १००० |
| १०. | ग्रामपंचायत | ५०० | ५०० | ५०० | १००० | १००० |
| ११. | आरोग्य केंद्रे (उपलब्ध असल्यास) | १००० | १००० | २००० | २००० | ५००० |
| | **एकूण:-** | **२१०००** | **२६५००** | **४०५००** | **५७०००** | **८००००** |

### ७.३१.१.राज्य वित्त आयोगाची शिफारस:-

राज्य वित्त आयोग ठामपणे शिफारस करीत आहे की मालमत्तेच्या परिरक्षेला प्राधान्यक्रम दिला पाहिजे. ज्याप्रमाणे प्रत्येक जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्रामपंचायत यांना दुर्बल घटक, महिला कल्याण यावर खर्च करणे अनिवार्य आहे, त्याप्रमाणे एकूण उत्पन्नापैकी काही रक्कम परिरक्षेसाठी राखीव ठेवली पाहिजे. मालमत्तेची परिरक्षा (Maintenance) आणि जतन (Upkeep) करण्याची वृत्ती व्यवस्था यंत्रणेत खोलवर रूजली पाहिजे.

राज्य वित्त आयोग असे सूचित करीत आहे की याबाबत मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे गरजेचे आहे, जेणेकरून आकारमानाने मोठया गावांमध्ये (५००० पेक्षा जास्त लोकसंख्या) स्व-उत्पन्नाच्या कमीत कमी २% रक्कम आणि लहान गावांमध्ये (५००० पेक्षा कमी लोकसंख्या ) ५% रक्कम दरसाल देखभालीसाठी

राखीव ठेवली पाहिजे. सदर रक्कम जिल्हा पातळीवर जसे जिल्हा ग्राम विकास निधी मध्ये हस्तांतरित केली पाहिजे आणि एका स्वतंत्र खात्यात ठेवली पाहिजे आणि सदर निधीचा केवळ तिसऱ्या वर्षापासून वापर करता येईल. या रीतीने जिल्हा परिरक्षा निधी जतन केला जाईल. जर सदर रक्कम ग्रामपंचायतीच्या पातळीवर ठेवली, तर रक्कम तात्काळ खर्च केली जाण्याची शक्यता आहे. शासनाने जिल्हा ग्रामीण परिरक्षा निधी साठी नियमांच्या स्वरूपात योग्य मार्गदर्शक तत्त्वे तयार केली पाहिजेत.

**७.३२. महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम, २०१५ कलम १२४ अंतर्गत असलेल्या तरतुदींचा प्रभावी वापर:-**

संपूर्ण राज्य प्रादेशिक रचना किंवा महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियमाच्या चौकटीच्या अंतर्गत आले आहे. आम्ही यापूर्वीच निर्देशित केले आहे की ग्रामपंचायत अधिनियम कलम १२४ अंतर्गत असलेल्या सुधार कर तरतूदीला विकास शुल्क असे नाव दिले पाहिजे आणि जेव्हा मालमत्तेच्या मालकाला बांधकामाची परवानगी हवी असते, तेव्हा सदर शुल्क ग्रामपंचायतीने संकलित केले पाहिजे. गावठाण क्षेत्रासाठी हे लागू आहे.

गावातील गावठाण क्षेत्राच्या बाहेर बांधकामाची परवानगी जिल्हाधिकारी यांच्याद्वारे दिली जाते. येथे महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम,२०१५ कलम १२४(के)(१) मधील तरतुदीनुसार जिल्हाधिकारीद्वारे परवानगी देतांना विकास शुल्क आकारले जाते. तथापि अर्जदाराला ग्रामपंचायत देखील विविध सुविधा देत असल्याने, जिल्हाधिकाऱ्यांनी संकलित केलेल्या रकमेचा हिस्सा ग्रामपंचायतीला देखील देणे गरजेचे आहे.

**७.३२.१.राज्य वित्त आयोगाची शिफारस:-**

राज्य वित्त आयोग ठामपणे शिफारस करीत आहे की महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम,२०१५ कलम १२४(के) अंतर्गत आकारण्यात येणाऱ्या विकास शुल्काचा हिस्सा ग्रामपंचायतीला मिळाला पाहिजे. नगर विकास विभागाने इतर संबंधित विभागांच्या सल्ल्याने गावठाणेतर क्षेत्रातील बांधकामाला परवानगी देतांना जिल्हाधिकारी द्वारे संकलित करण्यात आलेल्या शुल्कांतील ग्रामपंचायतींच्या हिश्याचे प्रमाण सूचित केले पाहिजे. ग्रामपंचायतींपर्यंत पोहोचणाऱ्या सदर रकमेसाठी कार्यपध्दत आणि व्यवस्थापन निश्चित केले पाहिजे आणि या विषयाबाबत एक सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमित केला पाहिजे.

**७.३३. जेथे वसूली किंवा कोणत्याही प्रकारची कार्यवाही शक्य नाही असे फार जुने लेखा परीक्षा परिच्छेद निर्लेखित करण्यासाठी विशेष मोहिम:-**

स्थानिक निधी लेखा परीक्षा यांचे फार जुने लेखा परीक्षा परिच्छेद मागील २५ वर्षापासून प्रलंबित आहेत. त्यातील बहुसंख्य परिच्छेदांची पुनर्प्राप्ती अशक्य आहे, कारण कर्मचारी निवृत्त झाले आहेत किंवा मरण पावले आहेत किंवा यापूढे लाभार्थ्यांची देखील ओळख पटविता येणे शक्य नाही. जेथे सर्वात जुने प्रलंबित परिच्छेद १९६० सालातील आहे, त्याबाबत आढावा बैठका घेणे फार हास्यास्पद वाटते. यामुळे सर्व स्तरावरील शासकीय अधिकाऱ्यांचे केवळ कागदोपत्री काम वाढते आणि भरपूर कालापव्यय होतो.

राज्य वित्त आयोग अशी शिफारस करीत आहे की योग्य पध्दतीने जुने परिच्छेद मिटविण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेतला गेला पाहिजे.

**७.३४. इतर लेखापरीक्षा आणि वित्तीय सुधारणा:-**

सध्या सर्व २८००० ग्रामपंचायतींची लेखापरीक्षा वर्षानुवर्ष स्थानिक निधी लेखापरीक्षा विभाग करतो. स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाकडे उपलब्ध असलेले मनुष्यबळ आणि ग्रामपंचायतींच्या कामाचा वाढलेला व्याप विचारात घेता, स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाला एवढ्या संख्येच्या ग्रामपंचायती हाताळणे व्यवहार्यत: अशक्य आहे.

**७.३४.१.राज्य वित्त आयोगाची शिफारस:-**

राज्याच्या सामाजिक आर्थिक वातावरणात परिवर्तन आले आहे आणि लेखा परीक्षा जबाबदारी आणि तत्संबधीत कार्ये, योग्य रीतीने प्रशिक्षित केलेल्या व्यावसायिक सनदी लेखापरीक्षकांच्या (Chartered Accountants) कंपनीला देणे आवश्यक आहे. यापूर्वी जिल्ह्यांमध्ये सनदी लेखापरीक्षकांच्या कंपन्या नव्हत्या, पण आता तशी परिस्थिती नाही. प्रारंभी १०००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या मोठया ग्रामपंचायतींची लेखा परीक्षा जबाबदारी सनदी लेखापरीक्षकांच्या कंपनीकडे सोपविता येईल. जर पूर्ण काम देण्यात काही समस्या असतील तर, काही स्तरांवरील तपासणीचे काम सनदी लेखापरीक्षकांच्या कंपनीकडे देता येईल. वस्तुत: सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS -Public Financial Management System) अस्तित्वात येण्यापूर्वी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGS) मध्ये नेहमीची लेखा तपासणी आणि लेखा परीक्षेचे काम सनदी लेखापरीक्षकांच्या कंपन्या करीत होत्या. त्या सदर कंपन्या अशा प्रकारची कामे काही विशिष्ट ग्रामीण संस्थांमध्ये करीत असत जसे की महाराष्ट्र जलस्त्रोत नियामक प्राधिकरण (MWRRA -Maharashtra Water Resources Regulatory Authority), जिल्हा ग्राम विकास संस्था इत्यादी.

स्थानिक निधी लेखा परीक्षा विभागाने तज्ज्ञांच्या यादीत नावे समाविष्ट करणारी संस्था म्हणून काम करावे. याप्रकारे सनदी लेखापरीक्षकांच्या कंपन्याना लेखा परीक्षा कामात सहाय्यता करता येईल.

आम्ही हा विषय लेखे, वित्तीय आणि आर्थिक माहिती आणि संबंधित समस्या॰ या प्रकरणात देखील नमूद केला आहे.

**७.३५. ग्रामपंचायतींच्या कामकाजात सुधारणा करण्यासाठी सुचविण्यात आलेल्या इतर प्रशासकीय सुधारणा:-**

**७.३५.१.घन आणि द्रवरूप कचऱ्याचे व्यवस्थापन सांभाळण्यासाठी आणि हाताळण्यासाठी तांत्रिक सहाय्य संस्था:-**

विशेषत: मोठया ग्रामपंचायतींमध्ये, ग्रामीण क्षेत्रांत देखील कचरा व्यवस्थापनाची समस्या दिन प्रतिदिन वाढते आहे. उपनगरीय सीमेलगतच्या अनेक ग्रामपंचायतींमध्ये मोठया प्रमाणात व्यापारी आणि लहान औद्योगिक उपक्रम आहेत. या उपनगरीय सीमेलगतच्या क्षेत्रात भाडी स्वस्त असतात आणि कर व नियंत्रणही कमी असते, त्यामुळे तेथे जवळच्या शहरात वस्तू आणि सेवा पुरवठा करणारे एक अनौपचारिक क्षेत्र भरभराटीस आलेले असते. या सर्वांमुळे ग्रामीण क्षेत्रात देखील कचऱ्याची विल्हेवाट आणि स्वच्छतेची समस्या उद्भवलेली आहे. प्लास्टीकचा वापर, खोक्यातले खाद्यपदार्थ आणि इतर जैव विघटन न होणारी सामग्री इत्यादी मुळे ग्रामीण क्षेत्रात देखील विल्हेवाट समस्या उद्भवलेली आहे.

असे दिसून आले आहे की तेथे ग्रामपंचायतींना मार्गदर्शन करण्यासाठी तांत्रिक सहाय्य संस्थेचा अभाव आहे. ग्रामपंचायत आणि कर संकलन करणे, पाणी पुरवठा हाताळणे आणि कचऱ्याची विल्हेवाट लावणे इत्यादी कामांची माहिती असणारे ग्राम सेवक अष्टपैलू असले पाहिजेत अशी अपेक्षा करणे अयोग्य आहे. कचऱ्याची विल्हेवाट लावण्याच्या पध्दती (जसे सेंद्रिय कचऱ्याचे रूपांतर गांडुळे वापरून खतामध्ये करणे) ही अत्यंत कौशल्याची क्षेत्रे आहेत आणि यासाठी या क्षेत्रांचे पायाभूत ज्ञान आवश्यक आहे. या कार्यक्षेत्रात चर्चा करीत असतांना असे स्पष्ट दिसून आले की क्षेत्र अधिकाऱ्यांना पुष्कळ मार्गदर्शन आणि सहाय्याची गरज आहे.

**७.३५.२.राज्य वित्त आयोगाची शिफारस:-**

राज्य वित्त आयोग अशी शिफारस करीत आहे की गट पातळीवर आधारभूत तांत्रिक संस्था असल्या पाहिजेत, ज्या ग्रामपंचायतींना मार्गदर्शन करतील. राज्य स्तरावर एक प्रमुख पालक किंवा तज्ज्ञ तांत्रिक संस्था असावी (NEERI -National Environmental Engineering Research Institute सारखी) शेकडो जिल्हा आणि गट पातळीवरील तांत्रिक सहाय्य संस्थांसह जी ग्रामपंचायतींना सहाय्य करील. सदर संस्था शेतकी महाविद्यालये, तंत्र विद्यानिकेतने आणि अशा प्रकारच्या इतर अनेक संस्था असतील. या प्रकारे सर्वांच्या क्षमतेत वाढ होईल. नागरी स्थानिक संस्थांना करण्यात आलेल्या सुचनांच्या धर्तीवर या सूचना करण्यात आलेल्या आहेत (नागरी स्थानिक संस्था प्रकरण पाहा).

**७.३६. विविध तांत्रिक क्षेत्रांसाठी पंचायत समितीद्वारे मिळणारे सहाय्य वाढविण्याबाबत:-**

पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यांच्या कामकाजाच्या सध्याच्या पध्दतीचा अभ्यास करता असे निदर्शनास आले की संस्थेची संरचना आणि कर्मचारी आकृतिबंध, निर्माण केलेली पदे इत्यादींची १९८० सालातील आवश्यकतेनुसार रचना करण्यात आली आहे आणि वर्तमानकालीन आवश्यकतेसाठी करण्यात आलेली नाही. आधारभूत वास्तविकतेत अमुलाग्र परिवर्तन झाले आहे. काही संगणक कर्मचारी वगळता (मुख्यत: बाह्य सेवा करारावर (outsourcing) किंवा कंत्राटी तत्वावर घेतलेले), तेथे तांत्रिक कर्मचाऱ्यांचा तीव्र तुटवडा आहे.

आम्ही यापूर्वी नमूद केले आहे की पंचायत समिती पातळीवर त्यांच्या पथ दिव्यांची देयके आणि पम्पिंग समस्या सोडविण्यासाठी विद्युत मंडळाकडून विद्युत तंत्राची माहिती असलेले दोन निवृत्त कर्मचारी किंवा तत्सम कर्मचारी नियुक्त करावेत. सदर कर्मचारी ग्रामपंचायतींना सौर उर्जेचा वापर करण्याबाबत मदत करू शकतात जेणेकरून विद्युतशक्ती वापराच्या देयकांच्या खर्चाची बचत होईल. पथ दिवे आणि वॉटर पंपिंग आकारासाठी ग्रामपंचायतींना राज्य शासनाद्वारे देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीत त्यांच्या खर्चाचा समावेश करता येईल. दोन वर्षात परिणाम दिसून येईल. राज्य स्तरावर नियमन करणारा कक्ष देखील असणे गरजेचे आहे.

त्याच प्रमाणे पंचायत समितींना ग्रामीण घन आणि द्रवरूप कचरा व्यवस्थापन योग्य रीतीने हाताळण्यासाठी सक्षम केले पाहिजे. आम्ही यापूर्वीच्या परिच्छेदामध्ये यासाठी भागीदारीमध्ये संस्थेचे तांत्रिक सहाय्य घेण्याबाबत निर्देश केला आहे.

स्थापत्य अभियांत्रिकी कामे या क्षेत्रात देखील सहाय्याची आवश्यकता आहे. अंदाजपत्रके, मोजमाप, निविदा प्रक्रिया, प्रमाणिकरण आणि प्रदाने तयार करण्यासाठी स्थापत्य अभियंत्यांच्या कमतरतेमुळे कामाची गती कमी होते आणि उपलब्ध निधीचा पूर्णत: विनियोग करता येत नाही. अंदाजपत्रके तयार करणे सारखी कामाच्या विशिष्ट क्षेत्रात बाह्य करार तत्वांच्या संधी उपलब्ध आहेत.

### ७.३७. ग्रामपंचायत स्तरावर व्यवस्थापनात आवश्यक सुधारणा आणि प्रशिक्षणावरील खर्च:-

ग्रामपंचायतीचे अधिकारी व कर्मचारी -दोन्ही शासकीय व अशासकीय -यांना प्रशिक्षण देणे हा नेहमी चर्चिला जाणारा विषय आहे. पंचायत राज मंत्रालय देखील नवनवीन क्षेत्रात प्रशिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी भरीव निधी देत आहे. ग्रामसेवकांसाठी देखील प्रशिक्षणासाठी काही जुन्या प्रशिक्षण संस्था आहेत. प्रशिक्षणासाठी आणि क्षमता विकासासाठी विविध लेखा शीर्षांतर्गत खर्च करण्यात आलेला निधी खालील प्रमाणे आहे.

**तक्ता ७१ : ग्रामसेवकांच्या क्षमता विकासासाठी खर्च करण्यात आलेला निधी:-**

| अनुक्रमांक | सीआरसी कोड | अनुदान / उपक्रम यांचा तपशील | प्रत्यक्ष खर्च करण्यात आलेली रक्कम २०१६-१७ (रू.कोटीत) |
|---|---|---|---|
| १. | २०५३-०५७४ | ग्रामपंचायत प्रशिक्षण आणि क्षमता विकास | २.६२ |
| २. | २४१५-०३१२ | कोसबाड-ठाणे प्रशिक्षण केंद्र | ०.२७ |
| ३. | २४१५-०३२१ | गारगोटी प्रशिक्षण केंद्र | ०.७२ |
| ४. | २४१५-०३२९ | शिवाजी शिक्षण संस्थेला देण्यात आलेली अनुदाने | ०.५३ |
| ५. | २४१५-०३२९ | यशदाला देण्यात आलेली अनुदाने | ४.०५ |
| ६. | २४१५-०६२९ | ग्राम सेवक प्रशिक्षण केंद्र | ३.७८ |
| ७. | २५१५-००२६ | गारगोटी प्रशिक्षण केंद्राला देण्यात आलेले अनुदान | ०.७५ |
| | | **एकूण:-** | **१२.७२** |

### ७.३७.१. राज्य वित्त आयोगाची शिफारस:-

**(अ)** संपूर्ण प्रशिक्षण आणि क्षमता विकास -उपलब्ध पायाभूत सुविधा, कर्मचारी आकृतिबंध इत्यादींचा व्यापकतेने आढावा घेणे आणि वर्तमान काळानुरूप त्यात सुधारणा करणे आवश्यक आहे.

(ब) एकसमान उपक्रमांसाठी निधी उपलब्ध करण्याकरिता उपरोक्त प्रमाणे सात विविध **प्रति संकेतांक** (सीआरसी) लेखा शीर्षे आहेत. सदर लेखा शीर्षे ३ ते ४ लेखा शीर्षांमधे संकलित करता येतील.

(क) प्रशिक्षणाच्या कार्यपध्दतीत आणि व्यवस्थापनात अजूनही वर्ग व्याख्यान पध्दतीचा वापर केला जातो. लहान दृकश्राव्य चित्रफितींच्या योगे दृकश्राव्य माध्यमाकडे वळल्यास जास्त चांगले होईल, ज्यामुळे पंचायत राज समितीच्या अशासकीय पदाधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण जास्त सुलभ आणि आनंददायी होईल.

### ७.३८. स्व-निधीच्या नावीन्यपूर्ण आणि परिणामकारक वापरासाठी ग्रामपंचायतींना पुरस्कार:-

चांगली कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना दरवर्षी पुरस्कार प्रदान करण्याची ग्राम विकास विभाग आणि पंचायत राज विभाग यांची एक उत्कृष्ट परंपरा आहे. काही ग्रामपंचायतीं तर पुरस्कार जिंकण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर देखील जातात आणि पुरस्कार प्राप्त करतात.

चांगली कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना प्रोत्साहन देण्यासाठी विभागाने देखील काही शासकीय योजना तयार केल्या आहेत. या आधी पर्यावरण संतुलित ग्राम विकास (Eco Villages) योजना होती. सध्या अद्ययावत/वेगवान गावे (Smart Villages) अशी योजना आहे, जी योजना गट आणि जिल्हा स्तरांवर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायती निर्धारित करते.

स्व-निधीचे परिणामकारकरीत्या व्यवस्थापन करणाऱ्या, जिल्हा ग्राम विकास निधीच्या वापरात आणि तत्सम उपक्रमांत कल्पकता दाखविणाऱ्या ग्रामपंचायतींचा सन्मान करणे आवश्यक आहे. अशा ग्रामपंचायतींचा सन्मानामुळे इतर ग्रामपंचातींना अशा प्रकारचे उपक्रम राबविण्यासाठी प्रेरणा मिळेल.

**७.३९. निष्कर्ष:-**

एकंदरीत अलीकडच्या वर्षात ग्रामपंचायतींच्या उत्पन्नामधे भरपूर प्रमाणात वाढ झाली आहे. अनेक ग्रामपंचायतींसाठी, खर्चामध्ये दिसणारा सर्वात मोठा भार, राखली जाणाऱ्या पंपाद्वारे पाणी पुरवठा पध्दतीत जलवाहिनी देखभालीसाठी येणा-या विजेच्या आकारणीचा सर्वाधिक (Charges) आहे. आम्ही शासनाला याबाबत त्यांना सहाय्य करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

आम्ही ग्रामपंचायतींकडे व्यावसायिक कराचे संकलन वळविण्याचा सल्ला दिला आहे. ग्रामपंचायतींची साधनसंपत्तीत सुधारणा करण्यासाठी आम्ही काही उपाय देखील सुचविलेले आहेत. ग्रामपंचायतींचे सर्व वित्तीय व्यवस्थापन सुधारण्यासाठी इतर पध्दतींची आम्ही शिफारस देखील केली आहे.

आमचे असे मत आहे की जर शिफारशींची अंमलबजावणी झाली तर ग्रामपंचायतींची वित्तीय स्थितीमध्ये आणखी सुधारणा होईल.

---

## प्रकरण - ८

## नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वित्त व्यवस्थेचे / अर्थव्यवस्थेचे मुल्यांकन

### ८.१ प्रस्तावना

महाराष्ट्र हे भारतातील एक सर्वाधिक शहरीकरण झालेले राज्य आहे. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येपैकी ४५.२२% (२०११) लोकसंख्या शहरी आहे. महाराष्ट्राची एकूण शहरी लोकसंख्या ही भारताच्या राष्ट्रीय स्तरावरील एकूण शहरी लोकसंख्येपेक्षा खूपच अधिक आहे. भारताची राष्ट्रीय स्तरावरील एकूण शहरी लोकसंख्या ३१.१६% एवढी आहे. खालील विवेचनामध्ये जनगणनेच्या शहरांचा समावेश नसून सदर विवेचन हे संबंधित कायद्यानुसार -शहरी संस्था म्हणून सूचित केलेल्या वसाहतींपुरतेच प्रतिबंधित करण्यात आले आहे.

### ८.२ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित अधिनियम :

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे संचालन कायदेशीररित्या राज्य विधान मंडळाच्या विशिष्ट कायदयांनुसार केले जाते. ते कायदे पुढीलप्रमाणे आहेत.

तक्ता ७२ : अधिनियमांची अंमलबजावणी :

| अ.क्र. | कायद्याचे नाव | अधिक्षेत्र |
|---|---|---|
| १. | मुंबई महानगरपालिका कायदा | बृहन्मुंबई महानगरपालिका (बी.एम.सी.) |
| २. | महाराष्ट्र महानगरपालिका कायदा | मुंबई वगळून महानगरपालिका म्हणून अधिसूचित करण्यात आलेली सर्व शहरे |
| ३. | महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक वसाहती कायदा १९६५ | सर्व नगरपरिषदा आणि नगरपंचायती |

### ८.३ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रकार, वर्गवारी आणि त्यांची लोकसंख्या

प्रशासकीय सोईसाठी महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एमसीओ/२०१४/प्र.क्र.१५३/न.वि.१४, दिनांक १ सप्टेंबर २०१४ अन्वये महानगरपालिकांचे नव्याने वर्गीकरण केले आहे. हे वर्गीकरण लोकसंख्या (२०११), दरडोई उत्पन्न आणि दरडोई क्षेत्र यांवर आधारित आहे.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र नगर परिषदा कायदाच्या कलम ४ अंतर्गत नगरपरिषदा देखील अ,ब आणि क अशा वर्गीकृत करण्यात आल्या आहेत आणि नगर पंचायती देखील याच कायद्याच्या कलम ३४१ अ अंतर्गत अधिसूचित करण्यात आल्या आहेत.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची (ज्यांना लोकसंख्येच्या आधारे वर्गीकृत करण्यात आले आहे.) श्रेणी आणि नागरिकांना सेवा देण्यासाठी तसेच त्यांच्या समोरची विविध आव्हाने सोडवण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची संसाधने सुसज्ज करण्याची क्षमता यांमध्ये मोठ्या प्रमाणात सहसंबंध असल्याचे दिसून येते. सर्वसाधारणपणे, मोठ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक क्षमता तुलनेने चांगली आहे, कारण सर्वसाधारणपणे मोठ्या शहरांचा आर्थिक पाया मजबूत असतो आणि त्यामुळेच अशी शहरे अधिक संसाधने निर्माण करू शकतात.

खालील आलेख सुस्पष्ट आहेत :

तक्ता ७३ : नागरी क्षेत्रांचे लोकसंख्येवर आधारित वर्गीकरण :

| **नागरी स्थानिक स्वराज्य संस्था वर्गवारी** | **लोकसंख्या** | **आकडेवारी** |
|---|---|---|
| महानगरपालिका | ३ लाख+ | २७ |
| नगर परिषदा | २५,००० ते ३ लाख | २३१ |
| नगर पंचायती | २५,००० च्या खाली | १३५ |
| **एकूण** | | **३९३** |

तक्ता ७४ : महानगरपालिकांचे वर्गीकरण (दिनांक ०१-०९-२०१४ च्या शासन निर्णयानुसार) :

| **अनु.क्र.** | **प्रकार** | **लोकसंख्या** | **शहरांची संख्या** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| १ | अ+ | १ कोटीच्या वर | १ | मुंबई |
| २ | अ | २५ लाख ते १ कोटी | २ | नागपूर आणि पुणे |
| ३ | ब | १५ ते २५ लाख | ३ | पिंपरी-चिंचवड, नाशिक आणि ठाणे |
| ४ | क | १० ते १५ लाख | ४ | नवी मुंबई, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली आणि औरंगाबाद |
| ५ | ड | ३ ते १० लाख | १७ | अहमदनगर, अकोला, अमरावती,चंद्रपूर,धुळे, जळगाव, कोल्हापूर, लातूर, नांदेड - वाघाळा, मालेगाव, परभणी, पनवेल, सांगली-मिरज, सोलापूर, मिरा-भाईंदर, भिवंडी- निजामपूर, उल्हासनगर |
| **एकूण** | | | **२७** | |

तक्ता ७५ : नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रकार आणि त्यांचा २०११ च्या जनगणनेनुसार नागरी लोकसंख्येतील वाटा:

| अ.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची संख्या | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची लोकसंख्या | लोकसंख्येची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | अ+ वर्ग महानगरपालिका | १ | १,२४,४२,३७३ | २५.३८ |
| २ | अ वर्ग महानगरपालिका | २ | ५५,३०,१२३ | ११.२८ |
| ३ | ब वर्ग महानगरपालिका | ३ | ५०,५५,२३३ | १०.३१ |
| ४ | क वर्ग महानगरपालिका | ४ | ४७,६५,३८० | ९.७२ |
| ५ | ड वर्ग महानगरपालिका | १७ | ८५,००,५०८ | १७.३४ |
| ६ | अ वर्ग नगरपालिका | १७ | २५,२४,४२९ | ५.१५ |
| ७ | ब वर्ग नगरपालिका | ७३ | ४४,५१,०७० | ९.०८ |
| ८ | क वर्ग नगरपालिका | १४१ | ३८,९५,२५० | ७.९५ |
| ९ | नगरपंचायती | १३५ | १८,६२,००० | ३.८० |
| एकूण | | ३९३ | ४,९०,२६,३६६ | १०० |

आलेख २७ : वेगवेगळ्या नागरी श्रेणींतील लोकसंख्येचा वाटा दर्शवणारी पाय (pie)आकृती




तक्ता ७६: मुंबई महानगर क्षेत्रातील लोकसंख्या :

| महानगरपालिका | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | महानगरपालिकेचे नाव | भौगोलिक क्षेत्र (चौ. किमी.मध्ये) | लोकसंख्या (जनगणना २०११) |
| १ | मुंबई | * ४३७.७१ | १,२४,४२,३७३ |
| २ | ठाणे | १४७.३४ | १२,६२,५५१ |
| ३ | नवी मुंबई | १६२ | ११,१९,४७७ |
| ४ | कल्याण-डोंबिवली | १०४.५७ | १५,४६,३८१ |
| ५ | उल्हासनगर | १३ | ५,०६,०९८ |
| ६ | मिरा- भाईंदर | ७९.३ | ८,०९,३७८ |
| ७ | भिवंडी- निजामपूर | २६.४१ | ७,०९,६६५ |
| ८ | वसई- विरार | १०५ | १२,२२,३९० |
| **नगर परिषदा** | | | |
| १ | अंबरनाथ | ३८ | २,५४,००३ |
| २ | पनवेल | १२.५ | १,८०,४६४ |
| ३ | कुळगाव-बदलापूर | ३५.६८ | १,७५,५१६ |
| ४ | खोपोली | ३०.१७ | ७१,१४१ |
| ५ | अलिबाग | १.८१ | २०,९१९ |
| ६ | पेण | ९.८२ | ३८,५६० |
| ७ | उरण | २.२९ | २९,१०४ |
| ८ | कर्जत | ७.५३ | ३०,०८७ |
| ९ | माथेरान | ७.२४ | ४,३९३ |
| वरील क्षेत्राव्यतिरिक्त उर्वरित क्षेत्र | | १२२०.३७ | ५,७९,८९८ |
| **एकूण** | | **४३५४.४** | **२,१०,०२,३९८** |

महाराष्ट्राच्या एकूण शहरी लोकसंख्येपैकी **४३% लोकसंख्या मुंबई महानगर क्षेत्रात** राहते, हे नमूद करणे रंजक ठरेल.

## ८.४ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकसंख्येची दशकातील वाढ

तक्ता ७७ : वेगवेगळ्या श्रेणींतील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकसंख्येची दशकातील वाढ

| अ.क्र. | वर्ग | पालिका/परिषदांची संख्या | लोकसंख्या | | लोकसंख्या वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | २००१ | २०११ | |
| महानगरपालिका* | | | | | |
| १ | अ+ | १ | १,१९,७८,४५० | १,२४,४२,३७३ | ३.८७ |
| २ | अ | २ | ४५,९०,५३९ | ५५,३०,१२३ | २०.४७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | ब | ३ | ३३,५२,२५९ | ५०,५५,२३३ | ५०.८० |
| ४ | क | ४ | ३२,८९,४२६ | ४७,६५,३८० | ४४.८७ |
| ५ | ड | १७ | ७१,५६,२६२ | ८५,००,५०८ | १८.७८ |
| नगर परिषदा | | | | | |
| १ | अ | १७ | २१,८९,१७२ | २५,२४,४२९ | १५.३१ |
| २ | ब | ७३ | ३८,७०,९०९ | ४४,५१,०७० | १४.९९ |
| ३ | क | १४१ | ३१,३०,३६४ | ३८,९५,२५० | २४.४३ |
| ४ | नगर पंचायती | १३५ | ११,९७,१४३ | १८,६२,००० | ५५.५४ |

* महानगरपालिकांच्या नावांसाठी तक्ता २ पाहा.

सन २००१ ते २०११ या दशकामधील महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या वाढ १५.९९%होती, तर नागरी लोकसंख्या वाढ २३.६७ %होती. परंतु वरील तक्त्यामध्ये दाखवण्यात आल्याप्रमाणे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतील प्रत्येक गटातील लोकसंख्येची वाढ असमान आहे. ब आणि क श्रेणीतील काही शहरांमधील लोकसंख्या खूप वेगाने वाढल्याचे दिसून येते. एकूण १३५ नगरपंचायतींपैकी ११५ नगरपंचायती २०१५-१६ मध्ये नव्याने स्थापन करण्यात आल्या होत्या.

### ८.५ **महानगरपालिकांमधील लोकसंख्येची घनता :**

शहरांतील, विशेषतः मुंबईतील लोकसंख्येची घनता खूप जास्त आहे, हे सर्वश्रुतच आहे.

तक्ता ७८ : महानगरपालिकांमधील लोकसंख्येची घनता :

| **संख्या लाख/ चौरस कि.मी. मध्ये** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **महानगरपालिका** | **निर्मितीचे वर्ष / दिनांक** | **निर्मितीच्या वेळचे क्षेत्रफळ (चौ. कि.मी. मध्ये)** | **क्षेत्रफळ (जनगणना २०११) (चौ.कि.मी. मध्ये)** | **लोकसंख्या (जनगणना २०११)** | **लोकसंख्येची घनता** |
| १ | बृहन्मुंबई | १८७२ | - | ४३७.७१ | १,२४,४२,३७३ | २८,४२६ |
| २ | पुणे | १९५० | १४४ | २७६.४ | ३१,२४,४५८ | ११,३०४ |
| ३ | नागपूर | १९५१ | उपलब्ध नाही | २१७.५६ | २४,०५,६६५ | ११,०५७ |
| ४ | ठाणे | १९८२ | १२८.२३ | १४७ | १८,४१,४८८ | १२,५२७ |
| ५ | नाशिक | १९८२ | २७८.२२ | २५९ | १४,८६,०५३ | ५,७३८ |
| ६ | पिंपरी- चिंचवड | १९८५ | ८५ | १८१ | १७,२७,६९२ | ९,५४५ |
| ७ | औरंगाबाद | १९८२ | १३८.५ | १३८.५ | ११,७५,११६ | ८,४८५ |
| ८ | वसई- विरार | २००९ | उपलब्ध | ३८० | १२,२२,३९० | ३,२१७ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | नाही | | | |
| ९ | कल्याण-डोंबिवली | १९८२ | १०४.५७ | ११६.०८ | १२,४७,३२७ | १०,७४५ |
| १० | नवी मुंबई | १९९२ | २१०.९७ | २१०.९७ | ११,२०,५४७ | ५,३११ |
| ११ | अहमदनगर | २००३ | ८०.२१ | ८०.२१ | ३,५०,८५९ | ४,३७४ |
| १२ | अकोला | २००१ | २८ | १२४.८२ | ४,२५,८१७ | ३,४११ |
| १३ | अमरावती | १९८३ | १२१.६५ | १२१.६५ | ६,४७,०५७ | ५,३१९ |
| १४ | चंद्रपूर | २०११ | उपलब्ध नाही | ५६ | ३,२०,३७९ | ५,७२१ |
| १५ | धुळे | २००३ | ४६.४६ | ४६.४६ | ३,७५,५५९ | ८,०८३ |
| १६ | जळगाव | २००३ | ६५.९४ | ६८ | ४,६०,२२८ | ६,७६८ |
| १७ | कोल्हापूर | १९७२ | ६६.८२ | ६६.८२ | ५,४९,२३६ | ८,२२० |
| १८ | लातूर | २०११ | उपलब्ध नाही | ११७.७८ | ३,८२,९४० | ३,२५१ |
| १९ | नांदेड- वाघाळा | १९९७ | ७१.७६ | ५८ | ५,५०,४३९ | ९,४९० |
| २० | मालेगाव | २००१ | १२.९५ | २४.२५ | ४,१७,३१२ | १९,४३६ |
| २१ | परभणी | २०११ | उपलब्ध नाही | ५८ | ३,०७,१७० | ५,२९६ |
| २२ | पनवेल | २०१६ | उपलब्ध नाही | १२ | १,८०,०२० | १५,००२ |
| २३ | सांगली- मिरज-कुपवाड | १९९८ | ११८.१८ | ११८.१८ | ५,०२,७९३ | ४,२५४ |
| २४ | सोलापूर | १९६४ | २३.३३ | १७८.५७ | ९,५१,५५८ | ५,३२९ |
| २५ | मिरा-भाईंदर | २००२ | ७९.४ | ७९.४ | ८,०९,३७८ | १०,१९४ |
| २६ | भिवंडी - निजामपूर | २००१ | २६.३६ | २६.३६ | ७,०९,६६५ | २६,९२२ |
| २७ | उल्हासनगर | १९९६ | १३.३४ | १३.३४ | ५,०६,०९८ | ३७,९३८ |

**राज्य वित्त आयोगाचे निरिक्षण :**

महाराष्ट्रातील उल्हासनगर, भिवंडी - निजामपूर, मुंबई आणि मालेगाव ही लोकसंख्येची सर्वाधिक दाटीवाटी असलेली शहरे आहेत.

**८.६ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कर्मचारी संख्या :**

**८.६.१ नगर परिषदा**

नगर परिषदा आणि नगर पंचायतींची एकूण कर्मचारी संख्या २१,३०० आहे. नगर परिषदा आणि नगर पंचायतींची एकूण लोकसंख्या १.२७ कोटी आहे. म्हणजेच प्रति १०० लोकांमागे नियमित कर्मचाऱ्यांचे प्रमाण १%पेक्षाही कमी आहे.

### ८.६.२ महानगरपालिका

२६ महानगरपालिकांमधील मंजूर पदे,भरलेली पदे यांची माहिती खाली दिली आहे. या २६ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची एकूण लोकसंख्या २,३८,५१,२४४ एवढी आहे. म्हणजेच प्रति १०० लोकांमागे असलेल्या कर्मचाऱ्यांचे सरासरी प्रमाण ०.४३ %एवढे आहे.

**तक्ता ७९ : लोकसंख्या आणि कर्मचारी संख्या / १०० व्यक्ती :**

| अ.क्र. | महानगरपालिकेचे नाव | लोकसंख्या (२०११ च्या जनगणनेनुसार) | कायम जागा | | | १०० व्यक्ती प्रती कर्मचारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | |
| १. | ठाणे | १८,४१,४८८ | २८५२ | ११८९ | १६६३ | ०.१५ |
| २. | नवी मुंबई | ११,२०,५४७ | ३९३५ | २२३८ | १६९७ | ०.३५ |
| ३. | पनवेल | १,८०,०२० | ७०७ | ६७६ | ३१ | ०.३९ |
| ४. | भिवंडी - निजामपूर | ७,०९,६६५ | ४३६२ | ३६५४ | ७०८ | ०.६१ |
| ५. | मिरा-भाईंदर | ८,०९,३७८ | २४४२ | १४७८ | ९६४ | ०.३० |
| ६. | कल्याण- डोंबिवली | १२,४७,३२७ | ६४१३ | ४८६४ | १५४९ | ०.५१ |
| ७. | वसई- विरार | १२,२२,३९० | २८५२ | ११८९ | १६६३ | ०.२३ |
| ८. | उल्हासनगर | ५,०६,०९८ | १२१२ | ७१५ | ४९७ | ०.२४ |
| ९. | पुणे | ३१,२४,४५८ | २३७३७ | १६१३५ | ७६०२ | ०.७६ |
| १०. | पिंपरी- चिंचवड | १७,२७,६९२ | ९७६३ | ६९७६ | २७८७ | ०.५७ |
| ११. | सांगली- मिरज- कुपवाड | ५,०२,७९३ | २३७७ | १६२३ | ७५४ | ०.४७ |
| १२. | कोल्हापूर | ५,४९,२३६ | ४६६६ | ३४६३ | १२०३ | ०.८५ |
| १३. | सोलापूर | ९,५१,५५८ | ५३८४ | ३८२५ | १५५९ | ०.५७ |
| १४. | नाशिक | १४,८६,०५३ | लागू नाही. | लागू नाही. | लागू नाही. | लागू नाही. |
| १५. | मालेगाव | ४,७१,३१२ | २६७३ | १०९६ | १५७७ | ०.५७ |
| १६. | धुळे | ३,७५,५५९ | २२७४ | १२०६ | १०६८ | ०.६१ |
| १७. | जळगाव | ४,६०,२२८ | २६७४ | १८३७ | ८३७ | ०.५८ |
| १८. | अहमदनगर | ३,५०,८५९ | २८७० | १८३६ | १०६८ | ०.८२ |
| १९. | औरंगाबाद | ११,७५,११६ | लागू नाही. | लागू नाही. | लागू नाही. | लागू नाही. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २०. | नांदेड- वाघाळा | ५,५०,४३९ | २३२३ | १५९१ | ७३२ | ०.४२ |
| २१. | परभणी | ३,०७,१७० | लागू नाही. | लागू नाही. | लागू नाही. | लागू नाही. |
| २२. | लातूर | ३,८२,९४० | १२४६ | ८०१ | ४४५ | ०.३३ |
| २३. | अमरावती | ६,४७,०५७ | २७९९ | १७१२ | १०८७ | ०.४३ |
| २४. | अकोला | ४,२५,८१७ | २३९७ | १५३१ | ८६६ | ०.५६ |
| २५. | नागपूर | २४,०५,६६५ | १२२२४ | ८१६९ | ४०५५ | ०.५१ |
| २६. | चंद्रपूर | ३,२०,३७९ | ९०३ | ७१५ | १८८ | ०.२८ |
| **एकूण** | | **२,३८,५१,२४४** | **१०३०८५** | **६८५१९** | **३४६००** | **०.४३** |

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अतिरिक्त कर्मचारी आहेत, असा सर्वसाधारण समज आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा महसूल मोठ्या प्रमाणावर कर्मचाऱ्यांचे वेतन आणि निवृत्ती वेतन यांवर खर्च केला जातो, ही वस्तूस्थिती आहे. त्याचवेळी भारतातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उपक्रमांचे स्वरूप लक्षात घेता असे दिसून येते की, त्यांच्याद्वारे पुरवल्या जाणाऱ्या घन कचरा व्यवस्थापन आणि अन्य विविध सेवांसाठी पुरेसे मनुष्यबळ असणे आवश्यक आहे. तसेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे केल्या जाणाऱ्या कामाचे स्वरूप असे आहे की, हे काम न चुकता दररोज करावे लागते.

राज्य वित्त आयोगाने क्षेत्रभेटी दरम्यान असे नमूद केले आहे, की गेल्या दशकात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा कर्मचारी संख्या वाढवण्याचा कल मोठ्या प्रमाणात घटला आहे. वस्तूतः बरेचसे घनकचरा व्यवस्थापनाचे काम आणि अन्य कामे बाह्य स्त्रोत यंत्रणांद्वारे केली जातात.

### ८.६.३ राज्य वित्त आयोगाच्या शिफारसी

नागरी स्वराज्य संस्थांमध्ये कर्मचाऱ्यांच्या आवश्यक संख्येबाबत अतिशय पद्धतशीर आणि तपशिलवार अभ्यास करण्यासाठी शासनाने किंवा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी व्यावसायिक एजन्सींची नेमणूक करणे अत्यावश्यक आहे,असे मत राज्य वित्त आयोगाने नमूद केले आहे. अतिरिक्त कर्मचारी असणे निश्चितच इष्ट नाही कारण यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांचा मोठा निधी आस्थापना किंवा कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च केला जातो. त्याचवेळी कर्मचारी संख्या आवश्यकतेपेक्षा कमी असल्यास नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवांच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. त्याचबरोबर परंपरागतपणे नेमल्या जाणाऱ्या पालिका स्थापत्य अभियंता या पदाच्या जागांऐवजी पर्यावरणीय व्यवस्थापक व तत्सम नवीन श्रेणीची पदे निर्माण करणेही आवश्यक आहे.

### ८.७ वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) आणि संबंधीत समस्या :

दिनांक १ जुलै, २०१७ रोजी ऐतिहासिक असा वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) अस्तित्वात आला. तत्पूर्वी अनेक दशके जकात कर हा महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नांचा मुख्य

स्रोत होता. याने स्थानिक संस्थांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक आणि क्रियात्मक स्वायत्तता दिली. मात्र सर्वांनाच ज्ञात असलेल्या कारणांमुळे टप्प्याटप्प्याने आधी नगर परिषदांमध्ये आणि त्यानंतर महानगरपालिकांमध्ये जकात कर बंद करण्यात आला. जकात कराच्या ऐवजी स्थानिक संस्था कर (एलबीटी) लागू करण्यात आला. मात्र त्यानंतर हा करही रद्द करण्यात आला. महानगरपालिकांना सुयोग्य नुकसानभरपाई देण्यात आली. आता वस्तू आणि सेवा कर आल्याने महानगरपालिकांना या कराऐवजी ऐवजी आर्थिक पाठबळ देण्यात येत आहे. याबाबतच्या घडामोडींचा कालक्रम खाली थोडक्यात मांडला आहे.

### ८.७.१ नगरपरिषदा :

१९९९ मध्ये नगरपरिषदांचा जकात कर रद्द करण्यात आला. जकात उत्पन्नाचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी शासनाने जकात रद्द अनुदानाचा पुरवठा केला. त्याच बरोबर नगरपरिषदांना पाठबळ देण्यासाठी महागाई भत्ता अनुदान (DA Grants) म्हणून ओळखली जाणारी आणखी एक श्रेणी होती. ही श्रेणी शासनाने शिफारस केलेल्या उच्च वेतन दराची भरपाई करण्यासाठी नगरपरिषदांना देऊ करण्यात आली होती. त्यानंतर दि. ३१.८.२००९ च्या शासन निर्णयानुसार जकात नुकसान भरपाई आणि महागाई अनुदान भत्ता विलिन करण्यात आले आणि त्यामध्ये मामुली वाढ करून याचे रुपांतर 'नगरपालिका सहाय्यक अनुदान' या निधीमध्ये करण्यात आले. अशाप्रकारे २००९ पासून आजतागायत जकात उत्पन्नाचे नुकसान आणि महागाई भत्ता अनुदान (DA Grants) यांसाठी सरकारकडून नगरपरिषदांना 'सहाय्यक अनुदान' या नावाने आर्थिक नुकसान भरपाई दिली जात आहे.

### ८.७.२ मुंबई महानगरपालिके व्यतिरिक्त अन्य महानगरपालिका :

- २६ पैकी २० महानगरपालिकांमध्ये २०१३ पूर्वीच जकात कर रद्द करण्यात आला होता. स्थानिक संस्था कर (एलबीटी) या पर्यायाद्वारे महानगरपालिकांना त्यांच्या संसाधनांची सुसज्जता करण्याची परवानगी देण्यात आली.
- दि. ०१.०३.२०१३ रोजी पुणे, नागपूर, ठाणे, नवी मुंबई आणि पिंपरी-चिंचवड या पाच मोठ्या महानगरपालिकांमधून जकात कर रद्द करण्यात आला. याला पर्याय म्हणून स्थानिक संस्था कर (एलबीटी) लागू करण्यात आला.
- सर्व महानगरपालिका स्वतःच्या महसूलाची सुसज्जता करण्यासाठी दि.३१ जुलै, २०१५ पर्यंत स्थानिक संस्था कर (एलबीटी) कार्यान्वित करत होत्या.
- त्यानंतर दि. १ ऑगस्ट, २०१५ पासून महानगरपालिकांच्या स्वतःच्या महसूलाचा स्रोत असलेला स्थानिक संस्था कर (एलबीटी) देखील सरकारने रद्द केला. मात्र ५० कोटींपेक्षा अधिक उलाढाल असलेल्या मोठ्या व्यापाऱ्यांकडून हा कर वसूल करण्यास महानगरपालिकांना परवानगी देण्यात आली. तर ५० कोटींपेक्षा कमी उलाढाल

असलेल्या लहान व्यापाऱ्यांना महानगरपालिकांच्या स्थानिक संस्था कर (एलबीटी) कक्षेच्या बाहेर ठेवण्यात आले.

- स्थानिक संस्था करातून मिळणारे उत्पन्न बंद झाल्यामुळे (एलबीटी) झालेले नुकसान भरून काढण्यासाठी सरकारने महानगरपालिकांना स्थानिक संस्था कर (एलबीटी) नुकसानभरपाई लागू केली.
- दि. ०१.०७.२०१७ पासून वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) लागू झाल्यावर मोठ्या व्यापाऱ्यांकडून केली जाणारी स्थानिक संस्था कर (एलबीटी) वसूलीही रद्द करण्यात आली. अशाप्रकारे पूर्वी वस्तू व सेवांवर लागू असणारे अन्य सर्व स्वरूपाचे स्थानिक कर वस्तू व सेवा कायद्यामध्ये (जीएसटी) सामावून घेण्यात आले.
- दि. ०१.०७.२०१७ पासून महाराष्ट्र सरकार महानगरपालिकांना जीएसटीच्या ऐवजी नुकसान भरपाई म्हणून आर्थिक पाठबळ देते. जीएसटीच्या ऐवजी नुकसान भरपाई म्हणून त्यांना देण्यात आर्थिक पाठबळाचा तपशील या अहवालात पुढे देण्यात आला आहे.

### ८.७.३ बृहन्मुंबई महानगरपालिका :

- मुंबईमध्ये दि. ३० जून, २०१७ पर्यंत जकात कर लागू होता, मात्र एवढ्या दीर्घ कालावधीपर्यंत जकात कर सुरू ठेवणारे मुंबई हे देशातील एकमात्र मोठे शहर आहे.
- दि. ०१.०७.२०१७ पासून जकात कर वस्तू आणि सेवाकरामध्ये (जीएसटी) सामावून घेण्यात आला.
- जकात करातून मिळणाऱ्या उत्पन्नाचे नुकसान भरून काढण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेला शासनाकडून नुकसान भरपाई मिळत आहे.

### ८.७.४: वस्तु व सेवा कराच्या सन २०१८-१९ या कालावधीत त्याऐवजी दिली जाणारी आश्वासित नुकसान भरपाई:

दि. ०१.०७.२०१७ पासून सर्व महानगरपालिकांना जकात कराऐवजी (मुंबई) किंवा स्थानिक संस्था कराऐवजी (मुंबई वगळून इतर सर्व महानगरपालिका ) आश्वासित नुकसान भरपाई देण्यात आली आहे.

जीएसटी लागू झाल्यानंतर महानगरपालिकांना दिलेला निधी (जीएसटी नुकसानभरपाई म्हणून) खालील प्रमाणे:

तक्ता ८० : महानगरपालिकांना वस्तू व सेवा कर (जीएसटी) नुकसान भरपाई (रुपये कोटींमध्ये)

| अ.क्र. | महानगरपालिकेचे नाव | एप्रिल २०१८ ते मार्च २०१९ |
|---|---|---|
| १ | बृहन मुंबई | ८३९० |
| २ | नागपूर | ८६६ |
| ३ | चंद्रपूर | ५९ |
| ४ | अमरावती | ११७ |
| ५ | अकोला | ६४ |
| ६ | औरंगाबाद | २५३ |
| ७ | परभणी | १७ |
| ८ | लातूर | १३ |
| ९ | नांदेड- वाघाळा | ७३ |
| १० | नाशिक | ८७४ |
| ११ | मालेगाव | १४४ |
| १२ | धुळे | ९२ |
| १३ | जळगाव | १११ |
| १४ | अहमदनगर | ८२ |
| १५ | पुणे | १५७३ |
| १६ | पिंपरी- चिंचवड | १५०७ |
| १७ | कोल्हापूर | १२६ |
| १८ | सोलापूर | १८५ |
| १९ | सांगली- मिरज- कुपवाड | १४० |
| २० | मिरा-भाईंदर | १६६ |
| २१ | वसई- विरार | ३०१ |
| २२ | भिवंडी - निजामपूर | २३३ |
| २३ | उल्हासनगर | १६७ |
| २४ | कल्याण- डोंबिवली | १७० |
| २५ | ठाणे | ७२० |
| २६ | नवी मुंबई | १०२५ |
| **एकूण** | | **१७४६८** |

* नुकताच महानगरपालिकेचा दर्जा मिळालेल्या पनवेलसाठी नुकसान भरपाई अद्याप निश्चित करायची आहे.

## ८.८ महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची वाटचाल

सन १८८२ मध्ये लॉर्ड रिपनच्या शासन काळात ब्रिटीशांनी भारतात स्थानिक स्वराज्य संस्था कायदा आणला. सन १८८८ मध्ये सर्वात आधी मुंबई महानगरपालिका कायदा लागू झाला. स्थानिक संस्थांच्या निर्णय प्रक्रियेमधील सहभाग ही आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्याच्या कालावधीत भारतातील पुढाऱ्यांनी केलेली पहिली मागणी होती, हे सर्वांनाच माहित आहे. संपूर्ण भारतभर स्वातंत्र्य लढ्यातील मोठे नेते नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे अध्यक्ष किंवा नगराध्यक्ष होते. त्या काळातील लोकांचा प्रतिनिधी म्हणून निवडणूकीला उभी राहण्याची ही एक पहिली संधी देखील होती.

त्या काळात स्थानिक संस्था आपल्या स्वतःच्या उत्पन्नाच्या स्रोतांचा वापर करुन स्वतःसाठी कर्मचाऱ्यांची नेमणूक करत होत्या. स्थानिक संस्थांच्या स्वतःच्या उत्पन्नामध्ये जकात आणि कर आकारणीच्या अन्य विविध साधनांचा समावेश होता. मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अन्य कर्मचाऱ्यांचे वेतनही स्थानिक संस्था स्वतःच ठरवत होत्या. स्थूलमानाने स्थानिक संस्थांना त्यांचे उत्पन्न आणि खर्च यांचे नियोजन सोपवण्यात आले होते. स्थानिक संस्थांना सरकारी पाठबळ फारच कमी होते. त्याच बरोबर स्थानिक रहिवाशांचा सहभाग आणि किमान नागरी सुविधांच्या देखभालीवर भर देण्यात आला होता.

अशासकीय पदाधिकारी शहराचे नेते होते, त्यातील बरेच नेते राष्ट्रवादी वृत्तीचे होते. या नेत्यांचा कल आणि त्यांना उपलब्ध असणारी स्थानिक संसाधने यांचा मेळ साधून त्यांनी स्वतःच्या मुख्य जबाबदाऱ्यांच्या (पथदिवे पुरवणे,शहर स्वच्छता आणि पेयजल) पलिकडे जाऊन शाळा, सरकारी दवाखाने, टाऊन हॉलचे बांधकाम करणे या आणि अशा अनेक जबाबदाऱ्या पार पाडल्या.

स्थानिक संस्थांचे चांगले काम आणि प्रचलन यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने स्थानिक निधी लेखा परिक्षण (सन १९३०) सुरू केले. मात्र या व्यतिरिक्त सरकारचे नियंत्रण कमीत कमी होते. महाराष्ट्र महानगरपालिका कायद्यामध्ये (कलम ९३) तर असे देखील नमूद केले आहे की, स्थानिक संस्थांनी जी लेखा नोंदणी (वार्षिक लेखे) ठेवायची असते त्याचे स्वरूप कसे असावे, हे स्थायी समितीनेच निश्चित करावे.

सन १९७० च्या उत्तरार्धापासून परिस्थिती बदलली आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संचालनामध्ये सरकारची अधिकाधिक भूमिका असल्याचे दिसून येत आहे.

संसाधनांच्या दृष्टीकोनातून विचार करता, स्थानिक संस्थांकडे भांडवली प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी निधी नाही. यासाठी त्या पूर्णपणे शासनावर अवलंबून आहेत. शासन विविध मार्गांनी स्थानिक संस्थांची संसाधने वाढवत आहे. याबाबत या अहवालात नंतर तपशीलवार चर्चा केली आहे. कायद्यामध्ये विविध तरतूदी आहेत, ज्या तरतुदींद्वारे सरकारला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजावर लक्ष ठेवता येते.

पूर्वी नागरी स्थानिक स्वराज्य संस्था स्वतःच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची नेमणूक करत असत. मात्र सन १९७९ पासून राज्य शासनाचे या नागरी संस्थांच्या प्रक्रिया करण्यात येत आहे आणि आता नगर विकास विभागाद्वारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून निवड झालेल्या उमेदवारांची वर्ग २ चे मुख्याधिकारी म्हणून नेमणूक करण्यात येत आहे. तर विभागीय निवड मंडळांद्वारे वर्ग ३ च्या मुख्याधिकाऱ्यांची नियुक्ती होते. सन १९८७ पासून वर्ग १ च्या मुख्याधिकाऱ्यांची नियुक्ती होते. ही नियुक्ती अन्य कोणत्याही राज्य शासकीय अधिकाऱ्यांप्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे होते. मुख्य अधिकारी संवर्ग हा एक स्वतंत्र संवर्ग आणि कोणत्याही अन्य सरकारी अधिकाऱ्यांप्रमाणेत या संवर्गातील अधिकाऱ्यांची नियुक्ती व बदली एका नगरपालिकेतून दुसऱ्या नगरपालिकेत होते. अलिकडच्या वर्षांमध्ये शासनाने एक पाऊल पुढे जाऊन नगरपालिकांसाठी काही अधिक संवर्ग निर्माण केले आहेत. अशाप्रकारे लेखा कर्मचारी, कर संकलन कर्मचारी, पालिका अभियंते हे राज्य पातळीवरचे अधिकारी असतील, तसेच त्यांची बदली एका नगरपालिकेतून दुसऱ्या नगरपालिकेमध्ये करण्यात येईल.

त्याचप्रमाणे, गेल्या काही वर्षांमध्ये हळूहळू स्थानिक संस्थांमधील कर्मचाऱ्यांचे वेतन राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनाशी संरेखित करण्यात आले आहे. राज्य सरकार दर दहा वर्षांनी आपल्या अधिकाऱ्यांची वेतनश्रेणी निश्चित करण्यासाठी वेतन आयोगाची नियुक्ती करते, हे सर्वश्रुतच आहे. या वित्त आयोगाने वेतनश्रेणी बाबतचा निवाडा दिल्यावर हळूहळू ही वेतनक्षेणी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देखील लागू होते. सरकारने प्रत्येक श्रेणीतील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी कर्मचा-यांचे आकृतिबंध विहित केले आहेत, मग ती संस्था महानगरपालिका असो किंवा नगरपरिषद असो. नागरी स्थानिक संस्थांमध्ये शासकीय पाठबळ असणाऱ्या अधिकाधिक योजना दाखल होत आहेत आणि त्यांवरील सरकारचे संनियंत्रणही दृढ होत आहे.

ऐतिहासिक आणि वारशाच्या कारणांमुळे तसेच महाराष्ट्रात ज्या पद्धतीने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची वाटचाल झाली त्यामुळे एका नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे दैनंदिन कामकाज, लोकांचा सहभाग, प्रतिसाद, अभिलेख नोंदणी, कर्मचाऱ्यांची कामगिरी, सर्वसाधारण कार्यपध्दती आणि फलनिष्पत्ती हे दुसऱ्या नागरी स्वराज्य संस्थेपेक्षा खूप भिन्न असल्याचे आढळून आले.

### ८.९ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची महत्वाची कामे :

#### ८.९.१ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची महत्वाची अनिवार्य कामे:

**साफसफाई :** नाले आणि निस: रण, सांडपाणी, सार्वजनिक स्वच्छतागृहे, शौचालये इ.च्या देखभालींचे काम. मैला सफाई आणि टाकाऊ घटक नष्ट करणे

**सार्वजनिक आरोग्य:** घातक रोगांच्या प्रसारावर प्रतिबंध, सार्वजनिक रुग्णालये आणि दवाखान्यांची देखभाल, सार्वजनिक बाजारपेठा आणि कत्तलखान्यांची देखभाल इ.

**पाणी पुरवठा:** पाणी पुरवठ्यासाठी आवश्यक बांधकामे करणे आणि त्यांची देखभाल करणे.

**अग्निशमन:** आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाचे व्यवस्थापन करणे आणि आगीच्या वेळी जिवित आणि वित्त यांचे रक्षण करणे.

**शिक्षण :** प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळांचे व्यवस्थापन करणे.

महानगरपालिकांच्या अनिवार्य कामांमध्ये ७४ व्या घटना दुरुस्तीनंतर खाली दिलेल्या कामांचा समावेश करण्यात आला आहे.

अ. आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी नियोजन

ब. शहरी वनीकरण आणि पर्यावरणाचे रक्षण

**८.९.२ महत्त्वाची मुखत्यारीची कामे :**

पालिकांनी खालील कामे पालिकेची मालमत्ता आणि निधी यांमधून करावीत :

i. सार्वजनिक रस्ते बांधणी, इमारत उभारणी
ii. सार्वजनिक उद्याने आणि बागांची निर्मिती किंवा देशभाल करणे, ग्रंथालये, संग्रहालये, मनोरुग्णांसाठी आश्रयगृहे, जिमनॅस्टिक्स, स्टेडीयम, मुक्त नाट्यगृहे (ओपन थिएटर्स) इ.ची उभारणी करणे.
iii. अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती आणि भटक्या जमातींसाठी कल्याणकारी उपाययोजना करणे.
iv. रुग्णवाहिका सेवांची तरतूद
v. जलतरण तलाव, सार्वजनिक स्नानगृहे व सोई-सुविधा
vi. घातक प्राणी आणि पक्षी नष्ट करणे.
vii. प्रसुतीगृहे आणि अर्भक कल्याण गृहे उभारणे व चालवणे.
viii. दिव्यांग आणि विकलांग व्यक्तींच्या देखभालीसाठी संस्थांची स्थापना करणे.
ix. आपत्ती निवारण
x. संबंधित पालिकेच्या अधिकार क्षेत्रात यंत्रचलित वाहतूक सुविधा पुरवणे.
xi. पालिकेचे कर्मचारी आणि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींच्या कल्याणासाठी प्रोत्साहन देणे.
xii. गरीब वर्गासाठी स्वच्छतागृहांची उभारणी करणे.

महानगरपालिकांच्या मुखत्यारीच्या कामांमध्ये ७४ व्या घटनादुरुस्तीनंतर खाली दिलेल्या कामांचा समावेश करण्यात आला आहे.

i. झोपडपट्टी सुधारणा आणि श्रेणीवर्धन
ii. नागरी दारिद्र्य निर्मुलन
iii. गुराढोरांसाठी पाणवठे

iv. प्राण्यांवरील क्रौर्याला प्रतिबंध आणि कत्तलखाने व चर्म संस्करणी (कातडी कमावण्याचे ठिकाण) यांचे नियमन.

## ८.१० नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अर्थव्यवस्थेचा सर्वसाधारण नमुना:

ऐतिहासिक आणि अन्य कारणांमुळे नागरी स्वराज्य संस्थांचे वित्तिय स्वास्थ्य एकमेकांहून भिन्न स्वरूपाचे असल्याचे आम्ही याआधीच नमूद केले आहे. **जळगाव सारख्या जिल्हयात जवळपास समान आकाराच्या आणि समान आर्थिक पातळी असलेल्या दोन लगतच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतील व्यवस्थापन, कर वसुली पद्धत आणि अन्य कामकाज यांमध्ये टोकाचा फरक असल्याचे आम्हाला आढळून आले. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे वित्तिय स्वास्थ्य निश्चित करण्यामध्ये स्थानिक अशासकीय पदाधिकाऱ्यांची गुणवत्ता हा घटक देखील अतिशय महत्वाची भूमिका बजावतो.** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अध्यक्षपदासाठी फेरपालट जागांची तरतूद लागू होण्या अगोदर एकाच व्यक्तीने दीर्घ काळापर्यंत अध्यक्षपदावर राहिल्याचे अनेक प्रसंग घडले आहेत. ही एक व्यक्ती किंवा स्थानिक नागरीकांचा गट असे जे पदधारक म्हणून वर्चस्व गाजवत राहीले अशा व्यक्तींनी बरेचदा संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची कार्यसंस्कृती निश्चित केली असून हीच कार्यसंस्कृती अद्याप चालू आहे. थोडक्यात महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा वित्तिय स्वास्थ्य हा उल्लेखनीय घटक स्थानपरत्वे भिन्न आहे.

या प्रकरणामध्ये पुढे आम्ही विविध श्रेणींतील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्न आणि खर्च यांबाबतच्या माहितीचे तपशीलवार विश्लेषण प्रारुप दिले आहे.

## ८.११ जमा खर्च ठेवण्याची सध्याची पद्धत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे नेमके वित्तिय स्वास्थ्य समजण्यासाठी उपयोगी ठरत नाही :

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक स्थिती आणि स्वास्थ्य यांचे मूल्यमापन करणे आणि त्यांच्या सुधारणेसाठी सुयोग्य उपाययोजना सुचवणे हे राज्य वित्त आयोगाच काम आहे.

वित्त लेखे आणि वित्तिय माहिती याविषयावरील प्रकरणमध्ये आम्ही हे विस्तृतपणे मांडले आहे, की दुहेरी नोंद लेख्यांच्या अभावी एका नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या तुलनेत दुसऱ्या नागरी स्वराज्य संस्थेचे वित्तिय स्वास्थ्य नेमकेपणाने नमूद करणे अतिशय अवघड आहे.

एक समानता दाखवण्यासाठी जर आपण बँकींग क्षेत्राचे उदाहरण पाहिल्यास, नियंत्रक (म्हणजेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया) मोठ्या किंवा लहान अशा विविध प्रकारच्या कोणत्याही बँकांचे नियंत्रण आणि त्यांच्या कामगिरीचे तुलनात्मक मूल्यमापन करू शकते, कारण सर्व बँकांसाठी जमा- खर्च ठेवण्याचा विहित पद्धत समान आहे. सर्व बँकांना वित्तिय अहवालाबाबत निश्चित अशा निकषांचे पालन करावे लागते आणि त्यांचे लेखे व्यावसायिक सनदी लेखापालांकडून प्रमाणित केलेले असतात. यामुळे नियंत्रक, सरकार, गुंतवणूकदार आणि नागरीक यांना कोणती बँक उत्तम कामगिरी करत आहे आणि कोणती बॅक उत्तम कामगिरी करत नाही, हे समजू शकते. त्याचबरोबर बँका आपली वार्षिक वित्तीय

कामगिरी विविध सर्वश्रुत वित्तिय गुणोत्तरांच्या माध्यमातून मांडतात. या साऱ्यामुळे वित्तिय विश्लेषण सोपे होते.

हे अद्याप नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांबाबत शक्य होऊ शकलेले नाही. हिशोब खाती लिहिण्याच्या सध्याच्या व्यवस्थेमधील त्रुटी पुढीलप्रमाणे आहेत :

i. वार्षिक वित्तिय विवरण म्हणजेच अर्थसंकल्प लिहिताना एकेरी नोंदणी पद्धती किंवा उत्पन्न व्यय पद्धतीचा अवलंब केल्यामुळे मोठ्या प्रमाणात देय असलेला पण वसूल न झालेला स्थानिक कर याची नेमकी स्थिती कळून येत नाही. त्याचप्रमाणे या पद्धतीमुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे बांधिल खर्च जसे की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महावितरण, कंत्राटदार, पुरवठादार, कर्मचारी (सेवेतील आणि निवृत्त) इ. अशा विविध राज्य शासनाच्या यंत्रणांना देय असलेले मोठे खर्च, दिसून येत नाहीत.

ii. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी दरवर्षी संतुलित अर्थसंकल्प मांडणे अपेक्षित आहे, म्हणजेच प्रस्तावित उत्पन्न आणि खर्च जुळणे अत्यावश्यक आहे आणि राज्य शासनाने निर्देशित केल्यानुसार (पालिका कायद्याचे कलम १०१-५(ड)) किमान रक्कम शिल्लक राहिलीच पाहिजे. म्हणून अपेक्षित खर्च जुळवण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्था प्रस्तावित उत्पन्न फुगवून सांगतात.

iii. अखेरीस, लेख्यांच्या लेखापरिक्षणासाठी किंवा लेख्यांचे प्रमाणित करण्यासाठी कोणतीही व्यवस्था अस्तित्वात नाही. काही वर्षांपूर्वी (सन २०१२) शासनाने (वित्त विभागाने) असे निर्देशित केले होते, की नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखे स्थानिक निधी लेखापरिक्षणात प्रमाणित होणे आवश्यक आहे. मात्र त्यांनी अद्याप लेख्यांचे प्रमाणिकरण करण्यास सुरुवात केलेली नाही.

iv. नवीन दुहेरी नोंदणी आधारित लेखा संहितेच्या वापरा बाबतचे दि. १९.०१.२०१४ रोजी निर्गमित करण्यात आलेले निर्देश अद्याप नगर परिषदांमध्ये परिणामकारकरित्या अवलंबण्यात आलेले नाहीत. 'लेखा, लेखा परिक्षण आणि वित्तिय माहिती' या प्रकरणामध्ये आम्ही याबाबत सविस्तर मांडणी केली आहे.

विश्वसनीय वित्तिय माहितीचा अभाव या समस्येला फक्त याच राज्य वित्त आयोगाला सामोरे जावे लागले आहे असे नाही, तर याआधीच्या सर्वच राज्य वित्त आयोगांना आणि केंद्रीय वित्त आयोगांना या समस्येला तोंड द्यावे लागले आहे. त्यामुळेच मागील दोन केंद्रीय वित्त आयोगांनी लेखा नोंदणीच्या सुधारणेवर मोठ्या प्रमाणात भर दिली. उदा. लेखापरिक्षण केलेले प्रमाणित लेखे ठेवणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिक प्रोत्साहन देणे. आम्ही या समस्येचे निराकरण आणि त्यावरील उपाययोजना यांबाबत 'लेखा, लेखा परिक्षण आणि वित्तिय माहिती' या बाबतच्या राखीव प्रकरणामध्ये मांडले आहे.

यामुळे आम्ही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वित्तिय स्वास्थ्याचा विस्तृत आराखडा मांडताना केवळ त्यांनी दिलेल्या वित्तिय माहितीचा (पूर्ण विश्लेषण करण्यासाठी आणि निष्कर्षाप्रत येण्यासाठी ही माहिती पुरेशी नाही ) वापर केलेला नाही तर त्यासाठी अधिकच्या माहितीचाही वापर केलेला आहे. ही अधिकची माहिती आम्ही अधिकृत कर्मचारी, पदाधिकारी व नगरसेवक यांच्यासह झालेल्या चर्चा आणि आम्ही एकूणच परिस्थितीचे केलेले मूल्यमापन यांमधून मिळवली आहे. पुढील निरिक्षणे आणि कार्यनिती आम्ही याच माहितीच्या आधारे नोंदवली आहेत.

**८.१२ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी सरकारी भांडवली अनुदान आणि महसुली अनुदान वाढवले आहे पण याचा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतील सुधारलेल्या वित्तिय स्थितीशी कोणताही थेट संबंध नाही:**

आम्ही या प्रकरणामध्ये पुढे दिलेल्या अर्थसंकल्पाच्या माहितीवरुन असे दिसून येईल की, अलिकडच्या वर्षांमध्ये एकूणच भांडवली अनुदानामध्ये भरीव वाढ झाली आहे, भारत सरकारनेही स्मार्ट सिटी उपक्रम आणि अमृत योजना आणि अन्य योजनांद्वारे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रोत्साहन देणारे पाऊल ऊचलले आहे. राज्य शासनाने देखील आपल्या स्वतःच्या संसाधनांमधून भांडवली अनुदानाचे प्रमाण वाढवले आहे.

महसुली अनुदानाबाबत असे दिसते की, नगरपालिकांसाठीच्या सहायक अनुदानामध्ये आणि अन्य नियुक्त करांमध्ये काही प्रमाणात तूट झाली आहे. मात्र १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत भरभरून अनुदान देण्यात आले आहे, तरी देखील यातील सुमारे ५० % रक्कम घन कचरा व्यवस्थापनावर खर्च करणे अपरिहार्यपणे आवश्यक आहे. महानगरपालिकांमध्ये वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) अनुदान हे आधीच्या स्थानिक संस्था करापेक्षा (एलबीटी) बऱ्यापैकी जास्त आहे. त्याचबरोबर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वस्तू अणि सेवा कर नुकसान भरपाईमध्ये वार्षिक ८ % वाढ दिली आहे. तरीही क्षेत्रभेटी दरम्यान असे आढळून आले, की अनेक महानगरपालिकांचे असे मत होते की जर जकात कर रद्द झाला नसता तर त्यांचे सध्याचे उत्पन्न अधिक राहिले असते. परंतु कोणत्याही विश्वसनीय माहिती अभावी, सरणाऱ्या वर्षांबरोबर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची एकूणच आर्थिक स्थिती सुधारली आहे किंवा नाही हे सांगणे आम्हाला शक्य नाही.

तथापि, प्रश्न असा आहे की, फक्त वाढत्या अनुदानाच्या आधारावर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वित्तिय स्वास्थ्याचा अंदाज करणे कठीण आहे. हे समजून घेण्यासाठी संपूर्ण निधी प्रवाह आणि व्यवस्थापन यांचे परिक्षण करणे गरजेचे आहे. मात्र विविध कारणांमुळे महसुली उत्पन्न आणि आणि खर्च यांचा समतोल साधण्यामध्ये अडचणी येत आहेत.

**८.१३ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वतःच्या वित्तिय स्थितीची योग्य समज नाही:**

आश्चर्याची बाब म्हणजे, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना आपले नेमके कोठे चुकत आहे याची माहितीच नसते कारण त्यांच्या लेखा पद्धतीमुळे त्याची वित्तिय स्थिती एका दृष्टीक्षेपात कळत नाही आणि त्यामुळे वित्तीय स्थिती पुरेशी स्पष्ट होत नाही. उदाहरण द्यायचे झाल्यास, सन २०१७ च्या सुरुवातीला, शासनाने महानगरपालिकांना त्यांच्या गेल्या काही वर्षातील स्थानिक संस्था कराच्या (एलबीटी) उत्पन्नाचे तपशील सादर करायला सांगितले होते. महानगरपालिकांकडे ही जी माहिती मागण्यात आली होती ती महत्वाची होती, कारण या आधारे त्यांची वस्तू आणि सेवा कराची (जीएसटी) नुकसानभरपाई निश्चित होणार होती. स्थानिक संस्था कर (एलबीटी) दि. ०१.०८.२०१५ पासून रद्द करण्यात आला होता. मात्र तरीही महानगरपालिकांना ५० कोटी रुपयांपेक्षा अधिक उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांकडून हा कर घेण्याची परवानगी देण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर असे दिसून आले की, महत्वाची माहिती सादर करताना काही महानगरपालिकांनी फक्त मोठ्या व्यापाऱ्यांकडून (५० कोटी रु. पेक्षा अधिक उलाढाल असलेले) वसूल झालेल्या रकमेचीच माहिती सादर केली आणि आपल्या महसूलाचा भाग असलेल्या ‘थकित वसुली’ कडे दुर्लक्ष केले. आमच्या क्षेत्रभेटी दरम्यान अनेक महानगरपालिकांनी त्यांना झालेला हा तोटा निदर्शनास आणून दिला. मात्र हा तोटा त्यांच्यातील वित्तिय सक्षमतेचा अभाव आणि योग्य प्रणालीच्या अभाव यांमुळे झाला हे स्पष्ट झाले आहे.

प्रभावी लेखांकन यंत्रणेच्या अभावामुळे अनेक नागरी स्थानिक स्वराज्य संस्था देय रक्कमेचे प्राधान्यक्रम निश्चित करू शकत नाहीत आणि अनेकदा न्यायालयाच्या आदेशांनुसार मोठे दंड, विलंब शुल्क तसेच व्याजाचा भरणा करणे भाग पडते.

### ८.१४ वित्तिय स्वास्थ्य हे देखील शहराची अर्थव्यवस्था आणि प्रादेशिक आर्थिक सामर्थ्य यांचे द्योतक आहे :

चांगल्या आर्थिक स्रोतांच्या पायामुळेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना चांगले उत्पन्न मिळते हे अगदी स्वाभाविक असले पाहिजे. अशाप्रकारे मुंबई महानगर प्रदेशातील (जेथे महाराष्ट्रातील ४३% नागरी लोकसंख्या राहते.) नागरी स्थानिक स्वराज्य संस्था उच्चतम आर्थिक संसाधनांची सुसज्जता ठेऊ शकतात. त्याचप्रमाणे पुणे विभागातील पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना उत्पादन आणि सेवा उद्योग तेथे मोठया प्रमाणात असल्याने त्यांच्या उपक्रमांसाठी उच्चतम कर आकारणी आणि अन्य उत्पन्न जमा करू शकतात.

दुसऱ्या बाजूला या उलट स्थिती म्हणजे दुर्गम, आदिवासी आणि अन्य क्षेत्रांमधील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कमकुवत अर्थव्यवस्था आणि दुर्गम क्षेत्र आहे. म्हणूनच लहान नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाची, ज्या मुख्यतः कृषि बाजारपेठांची शहरे असल्यामुळे नागरीकांची खर्च करण्याची क्षमता अतिशय कमी असते त्यामुळे त्यांच्या उत्पन्नांच्या वाढीवर मर्यादा येतात

साधारणपणे म्हणावयाचे झाल्यास, आर्थिक आणि अन्य कारणांमुळे राज्याच्या अन्य भागांपेक्षा कोकण आणि पुणे या विभागांतील कर संकलनाचे गुणोत्तर, वित्तिय स्वास्थ्य सुस्थितीत आहे.

**८.१५ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे वित्तिय स्वास्थ्य निश्चित करताना भौगोलिक घटकही महत्वाची भूमिका बजावतात:**

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे वित्तिय स्वास्थ निश्चित करताना संबंधित ठिकाणचा भूगोलही महत्वाची भूमिका बजावतो. यासाठी अकोला जिल्ह्यातील तेल्हारा या लहान क वर्ग नागरी संस्थेचे उदाहरण पाहता येईल. ही नागरी संस्था सातपूडा पर्वत रांगांच्या पायथ्याशी मोक्याच्या ठिकाणी वसल्यामुळे त्यांना जवळच्या डोंगर रांगांमध्ये असलेल्या वन धरणामधून गुरुत्वीय बलामुळे पाणी मिळणे शक्य झाले आहे आणि त्यामुळे या जलस्रोतापासून शहरापर्यंत पाणी वाहून आणण्यास अक्षरशः काहीही खर्च येत नाही. या उलट अनेक शहरांना विजेच्या पंपाच्या साहाय्याने २० ते ५० किमी किंवा त्याहूनही अधिक अंतरावरील जलस्रोतापासून पाणी खेचून आणण्यासाठी मोठ्या रक्कमेचे वीज देयके भरावी लागतात. यामुळे त्यांचे वित्तिय स्वास्थ्य बाधित होते.

**८.१६ नागरी स्थानिक स्वराज्य संस्था भांडवली गुंतवणुकीसाठी अतिरिक्त उत्पन्न निर्माण करू शकत नाहीत. हे शासनाकडूनच मिळणे आवश्यक आहे:**

नागरी स्थानिक स्वराज्य संस्था भांडवली गुंतवणूकींसाठी अतिरिक्त उत्पन्न निर्माण करू शकत नाहीत, याबाबत भारतभरातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (काही निवडक नागरी स्थानिक स्वराज्य संस्था वगळता) वित्तीय स्थितीचा वर्षानुवर्षे अभ्यास करणाऱ्या सर्व आयोग आणि समित्यांच्या संशोधनामध्ये जवळपास एकमत झाले आहे. याचे कारण म्हणजे त्यांचे स्वत:च्या उत्पन्नाचे स्रोत जसे घरपट्टी, पाणी पट्टी आणि अन्य उत्पन्न हे त्यांच्या महसुली गरजा पूर्ण करण्यास पुरेसे नाहीत. पूर्वी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे जकात करासारखा उत्पनाचा स्रोत होता, जो गेल्या दशकभरात टप्प्याटप्याने काढून टाकण्यात आला आहे.

अशाप्रकारे प्रचलित वित्तिय व्यवस्था, रस्त्यांसाठीची गुंतवणूक, पाणी पुरवठ्याशी संबंधित कामे आणि तत्सम कामांसाठीची रक्कम केंद्र/ राज्य सरकारकडून मिळणारे अनुदान किंवा कर्ज यांद्वारेच मिळणे आवश्यक आहे.

**८.१७ वित्तिय तुटीच्या व्यवस्थापन आणि नियंत्रणाचे महत्त्व :**

वित्तीय शहाणपण आणि शिस्तीचा मूलभूत नियम म्हणजे कोणत्याही संस्थेचा महसुली खर्च हा तिच्या उत्पन्नांपेक्षा अधिक नसावा. यामुळे महसुली तूट निर्माण होते आणि ही स्वास्थ्यपूर्ण स्थिती मानली जात नाही. सरळ भाषेत सांगायचे झाल्यास वित्तिय तुटीमुळे संस्थेला आपले दैनंदिन खर्च भागवण्यासाठी

देखील कर्ज घ्यावे लागते. अशा परिस्थितीमध्ये संस्थेला एकतर आपल्या उत्पन्नामध्ये वेगाने वाढ करावी लागते किंवा आपल्या खर्चाला आळा घालावा लागतो.

मात्र एखाद्या संस्थेने भांडवली गुंतवणूकीसाठी कर्ज घेतले तर ती वेगळी गोष्ट ठरते. अशा स्थितीमध्ये ती संस्था हे कर्ज महसूल स्रोतांमधून फेडू शकते, जे स्रोत सामान्यपणे भांडवल घातल्यामुळे तत्काळ किंवा काही कालावधी नंतर वाढतात. हे देखील योग्य ठरते.

अशाप्रकारे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने किमान आपले उत्पन्न आणि खर्च यांचे संतुलन राखण्याच्या स्थितीत असलेच पाहिजे. ही वित्तिय स्वास्थ्य राखण्यासाठी किमान अट आहे.

### ८.१८ मोठ्या महानगरपालिकाकडे त्यांच्या महसुली तुटीवर नियंत्रण ठेवण्यासाठी अंगभूत लवचिकता असते:

नागरी स्थानिक स्वराज्य संस्था किमान आपली महसुली तूट नियंत्रित ठेवण्याच्या परिस्थितीत आहेत किंवा कसे, अशा दृष्टीकोनातून आम्ही जेव्हा त्यांच्या वित्तीय स्वास्थ्याकडे पाहीले तेव्हा स्थूलमानाने असे आढळले की, मोठ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, अर्थात अ+,अ,ब आणि क श्रेणी महानगरपालिका (म्हणजेच मुंबईपासून सुरुवात होणाऱ्या राज्यातील सर्वोच्च १० नागरी स्थानिक स्वराज्य संस्था) त्यांच्या वित्तीय तूटीचे व्यवस्थापन करण्यास सक्षम आहेत. वस्तूतः पिंपरी-चिंचवड आणि नवी मुंबई यांसारख्या काही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची निव्वळ महसूल स्थिती खरोखरच प्रशंसनीय आहे. त्याचबरोबर या संस्था त्यांच्या महसुली शिलकीतून अनेक उपक्रमांचा अवलंब करण्यास सक्षम आहेत.

आम्हाला असे आढळून आहे की, अ,ब, क श्रेणीच्या महानगरपालिकांना जरी एखाद्या वर्षी महसुली तूटीच्या परिस्थितीचा सामना करावा लागला, तरीही त्यांच्यामध्ये ही तूट भरून काढण्याची किंवा या आघाडीवर स्वतःला सुधारण्याची अंगभूत क्षमता आणि लवचिकता असते. अशाप्रकारे या महानगरपालिका घरपट्टीच्या थकबाकीची वसूली किंवा कर आकारणी दर वाढवणे अशा विशेष उपक्रमांचा अवलंब करू शकतात. प्राधान्यक्रमात नसलेल्या काही महसुली खर्चावर आळा घालू शकतात. त्याच बरोबर वित्तिय नियोजनात आपण कोठे कमी पडलो हे समजून घेण्यासाठी आणि परिस्थिती सुधारण्यासाठी तज्ज्ञांची नेमणूक करून त्यांचा सल्ला घेऊ शकतात. अशा काही प्रयत्नांद्वारे या महानगरपालिका स्वतःला पुनर्रचित करू शकतात आणि महसुली उत्पन्न आणि खर्च यांमध्ये समतोल साधतात.

अशाप्रकारे मोठ्या शहरांची चांगली संस्थात्मक क्षमता आणि चांगला आर्थिक पाया यांच्या संयोजनातून त्यांना स्वतःच्या महसुली उत्पन्न आणि खर्चाचा प्रवाह संतुलित ठेवण्यास मदत होते. जरी आर्थिक घसरण झाली तरीही या महानगरपालिकांकडे त्यातून बाहेर पडून वित्तिय स्थिती पूर्वपदावर आणण्याची क्षमता आहे.

**८.१९ ड वर्ग पालिका आणि नगरपरिषदांना त्यांचा महसुली तूटीवर नियंत्रण ठेवतानाही सखोल आव्हांनाना सामोरे जावे लागते :**

जर आपण क वर्ग महानगरपालिकांच्या एक टप्पा खाली गेल्यास, म्हणजेच राज्यातील १७ ड वर्ग महानगरपालिका, २३१ नगर परिषदा आणि १३५ नगर पंचायती यांच्या वित्तीय स्वास्थ्याचे चित्र पाहिल्यास ते बदललेले दिसते. यांपैकी बऱ्याच नागरी स्थानिक स्वराज्य संस्था त्यांचे महसुली उत्पन्न आणि खर्च यांचा समतोल साधू शकत नाहीत. निधीचे सुमार व्यवस्थापन, अतिरिक्त कर्मचारी, सुमार कर संकलन आणि यांसारख्या विविध कारणांमुळे हा वित्तिय असमतोल असू शकतो. परंतु, असे निरिक्षणास आले आहे की या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शहराचा आर्थिक पायाही निम्न दर्जाचा आहे आणि त्यांना आवश्यक संसाधनांची उभारणी करणे शक्य नाही, तसेच त्यांची खर्च करण्याची पातळी देखील किमान आहे. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास काही महसुली घटक त्यांच्या नियंत्रणात आहेत, मात्र अनेक घटक त्यांच्या नियंत्रणाच्या बाहेर आहेत, जे सुधारण्यासाठी फक्त शासनच मदत करू शकते.

या प्रकरणामध्ये पुढे मांडलेल्या विश्लेषणामधून आपण हे पाहूया की, -सहाय्यक अनुदान॰ हा नगरपरिषदांच्या उत्पन्नांचा सर्वांत मोठा स्रोत आहे. जर सहाय्यक अनुदान पुरेसे नसेल किंवा वर्षांनुवर्षे पुरेशा प्रमाणात वाढले नसेल तर नगर परिषदांना महसूलाची कमतरता सहन करण्यावाचून पर्याय नसतो. लहान नागरी स्थानिक स्वराज्य संस्था ही कृषी बाजाराची शहरे आहेत. तेथे मुख्यत्वे शेतकरी राहतात आणि स्थूल राष्ट्रीय उत्पन्नांतील कृषी क्षेत्राचा वाटा वेगाने घसरत आहे, याबाबी लक्षात घेता, लहान नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घरपट्टीमध्ये वाढ करण्यास फारसा वाव नसतो.

**८.२० नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सातत्याने महसुली तूट होण्याचे परिणाम:**

वित्तिय स्वास्थ्य सुमार असलेल्या (वर्षानुवर्षे महसुली तूट झाल्यामुळे ) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अधिकाऱ्यांची अधिकाधीक ऊर्जा दाव्यांना प्राधान्य देणे आणि बहुतेक वेळेस देय देण्यास विलंब करणे यांसाठी झगडण्यात खर्च होते. गरीब नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रत्येक उपक्रमावर सुमार वित्तिय स्वास्थ्याचा परिणाम होतो. परिणामी अधिकारी, पुरवठादार आणि नागरीक इत्यादी भागधारकांमध्ये मध्ये दररोज मतभेद आणि असंतोषाची स्थिती निर्माण होते.

सक्षम लेखा कर्मचाऱ्यांचा अभाव, मूलभूत वित्तिय लेखा तत्वांचे कमकुवत आकलन, दैनंदिन रोख रकमेच्या प्रवाहावर सुमार नियंत्रण इ. कारणांमुळे या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची परिस्थिती दिवसेंदिवस बिघडत आहे.  यातून पुढे आर्थिक स्वास्थ कमजोर होत जाते आणि वित्तिय असंतुलनाचे दुष्टचक्र तयार होते.

## ८.२१ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे वित्तिय स्वास्थ्य बळकट करण्यासाठी धोरणात्मक दृष्टीकोन:

राज्य वित्त आयोगने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची वित्तिय स्थिती बळकट करण्यासाठी उपाय सुचविणे अनिवार्य आहे. जकात कर, स्थानिक संस्था कर (एलबीटी) हे उत्पन्नाचे जुने पारंपरिक स्त्रोत अस्तित्वात नाहीत आणि अनेक कर वस्तू आणि सेवाकरामध्ये (जीएसटी) अंतर्भूत करण्यात आले आहेत. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे भांडवली आणि महसुली या दोन्ही खर्चासाठी स्थानिक स्त्रोत सुसज्ज करण्याचे पर्याय घटले आहेत.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकंदरीत वित्तिय स्थितीच्या अवलोकनावरून हे दिसून येईल की, प्रत्येक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील वित्तीय स्थिती एकमेकांहून भिन्न आहे. अशाप्रकारे आम्ही हे पाहिले की, सिंधुदूर्ग जिल्ह्यातील एक क वर्ग नगरपालिका सुनियोजित असून प्रभावीपणे कर वसुली करत आहे, तर या उलट चित्र म्हणजे सुमार कर वसुली, कोणत्याही अंतर्गत व्यवस्थेचा अभाव, सुमार दर्जाचे कर्मचारी इ. कारणांमुळे राज्यातील अन्य क वर्ग नगरपालिका वित्तीय औदासिन्याच्या स्थितीत आहेत.

म्हणूनच सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना One Size Fits All (सर्वांना एकाच साच्यात बसवणारी ) अशी एकच शिफारस करण्याचा उपाय सुचवणे परिणामकारक किंवा योग्य ठरणार नाही. म्हणूनच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रवर्गांवर आधारित शिफारशी देण्याचे धोरण या राज्य वित्त आयोगाने सातत्याने स्विकारले आहे. येथे देखील हे दिसून येईल की, आम्ही शक्य तेवढ्या प्रमाणात स्थाननिष्ठ शिफारशी केल्या आहेत, हे आम्ही पेयजल योजनेच्या विज बील अनुदानासंबंधी केलेल्या शिफारशींवरून स्पष्ट होईल. आम्ही पेयजल योजनेसाठी मिळणारे विज बिल अनुदान हे पंपाने पाणी खेचून आणण्याच्या अंतराशी संलग्न केले आहे.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संसाधनांच्या गरजांचे काम तीन वेगवेगळ्या पातळ्यांवर करता येईल:

(अ) मापदंड पातळीच्या सेवा देण्यासाठी आवश्यक आहे संसाधने : नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या महसुली आणि भांडवली अशा दोन्ही गरजा पूर्ण करण्यासाठी ही आदर्श संसाधने आवश्यक आहेत. या प्रकरणामध्ये पुढे आम्ही नमुन्याच्या आधारे निवडक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी आवश्यक निधी दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. याला नागरी स्वराज्य संस्थांच्या 'प्रमाणानुसार गरजा' असेही म्हटले जाते.

(ब) नागरीकांना वाजवी गुणवत्तेच्या सुविधा देण्यासाठी आणि पाणी पुरवठा, रस्ते, स्वच्छतागृहे इ. महत्वाच्या भांडवली प्रकल्पांच्या उभारणीसाठी आणि विशेष दुरुस्तीसाठीचा महसुली खर्च भागवण्यासाठी संसाधने आवश्यक आहेत.

(क) महत्वाचे महसुली खर्च भागवण्याएवढी तरी किमान संसाधने आवश्यक आहेत, **म्हणजेच किमान एवढ्या प्रमाणात की त्यांना महसुली तूट होणार नाही.**

या दृष्टिकोनातून आपल्या पुढचे पहिले कार्य म्हणजे, सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था किमान (क) स्थितीच्या वर असतील याची खात्री करणे आणि त्यानंतर अधिकाधिक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वर नमूद केलेल्या क्रमवारीतील (ब) आणि त्यानंतर (अ) स्थिती पर्यंत पोहोचण्यासाठी मदत करणे.

सद्यस्थितीत अनेक नागरी स्वराज्य संस्था, विशेषतः 'ड' वर्ग महानगरपालिका, नगरपरिषदा आणि नगर पंचायती (क) च्या खाली आहेत, ही सध्याची स्थिती आहे. ज्या अन्य नागरी स्वराज्य संस्था (क) पातळीच्या वर किंवा किंचितशा वर आहेत, मात्र (ब) पातळीच्या खाली आहेत, त्या कोणत्याही वेळी (क) पातळीखाली घसरू शकतात. त्यामुळे त्यांच्या वित्तिय स्वास्थ्याकडे प्राधान्याने लक्ष देणे आवश्यक आहे. अनेक 'क' वर्ग महानगरपालिका आणि नगरपंचायतींमधील ही वास्तविक स्थिती आहे. विशेषतः मराठवाडा आणि विदर्भ या भागांत अशी स्थिती आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निम्न आर्थिक पाया, सुमार वसुली पद्धत आणि अन्य घटकांच्या एकत्रिकरणातून त्यांची वित्तिय परिस्थिती अतिशय कमकुवत झाली आहे.

परिणामी त्यानुसार शासनाची मर्यादित साधनसंपत्ती विशेष आणि अत्यावश्यक क्षेत्रांमध्ये धोरणात्मकपणे वापरली जावी. याचा अर्थ असा नव्हे की, अन्य नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना संसाधन प्रोत्साहन गरजेचे नाही. अन्य नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांची संसाधने सुसज्जतेच्या क्षमता वाढवण्यासाठी अन्य मार्गांनी प्रोत्साहन द्यावे.

स्वतः राज्य शासनालाही याची जाणीव झाली आहे. म्हणूनच राज्य शासनाने १४ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या अनुदानामधून उपलब्ध संसाधने फक्त ड वर्ग महानगरपालिका आणि नगर परिषदांसाठीच वापरली आहेत आणि यातून उच्च क्षेणीच्या महानगरपालिकांना वगळले आहे.

हे पुन्हा एकदा नमूद करणे आवश्यक आहे की, सगळ्यांच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना निधीची गरज भासत असते. परंतु राज्य शासनाची मर्यादित संसाधने व शासनाचे इतर महत्त्वाचे व गरजेचे खर्च लक्षात घेता, आम्हाला असे वाटते की, ही उपयुक्त संसाधने सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत केल्यास ती कोणत्याही संस्थेला पुरेशी ठरणार नाहीत. या उलट हीच मर्यादित संसाधने देण्यासाठी वर्ग ड आणि त्याखालील पातळ्यावरच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राधान्य देऊन, त्यांच्यावर लक्ष केंद्रित करून त्यांना प्रोत्साहन दिल्यास ते अधिक व्यावहारिक आणि कार्यक्षम ठरेल.

म्हणून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी शिफारशी करताना या राज्य वित्त आयोगाने स्विकारलेला 'धोरणात्मक दृष्टिकोन' खाली दिला आहे :

- शासनाच्या मर्यादित साधनसंपत्तीचा वापर जिथे सर्वाधिक आवश्यकता आहे तिथेच करणे.
- सर्व ड वर्ग नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या वित्तिय स्वास्थ्याचे पुनःस्थापन करण्यावर अशा प्रकारे लक्ष केंद्रित करावे की, येत्या तीन ते पाच वर्षांत महसुली तूटीच्या स्थितीतून त्या हळूहळू बाहेर पडतील .
- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वित्तिय प्रकरणांत क्षमता बांधणी करण्यावर लक्ष केंद्रित करावे जेणेकरून त्यांना स्वतःलाच आपल्या वित्तिय व्यवस्थेमध्ये कोठे चुकत आहे, ते कळू शकेल आणि त्यामुळे निश्चितपणे प्रस्तावित सुधारणा आणि आधाराचा उपयोग होऊ शकेल.
- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची प्राथमिक जबाबदारी असलेल्या पेयजल योजनेच्या वित्तिय व्यवस्थापन दृष्टिकोनात सुधारणा होईल यावर भर द्यावा.
- स्वच्छ भारत अभियानमध्ये झालेल्या कामांचे आणि त्यातून मिळालेल्या यशाचे दृढीकरण करण्यावर भर देणे.
- चांगले व्यवस्थापन असलेल्या आणि मोठ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना कर्जाच्या माध्यमातून अधिकची संसाधने मिळतील (सरकारने जे दिले आहे त्या पलिकडे जाऊन), भांडवली गुंतवणूकीसाठी कर्जाद्वारे अधिकची संसाधने मिळतील यांसाठी सक्षम करणे.
- योग्य कामगिरीसाठी आर्थिक स्वरूपातील प्रोत्साहन देणे आणि अयोग्य कामगिरीसाठी दंड आकारणे.

## ८.२२ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नाचे स्रोत :

आलेख २८ : नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नाचे स्रोत

### नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नाचे स्रोत



आलेख २९ : नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अन्य उत्पन्नाचे स्रोत




## ८.२३ स्वत:चा कर महूसल

### ८.२३.१ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे मालमत्ता कर आणि अन्य स्वकर

तक्ता ८१: एकत्रित मालमत्ता कर उत्पन्न आणि अन्य कर उत्पन्न (रु.लाखांमध्ये)

| अनु.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार | एकत्रित सरासरी मालमत्ता कर उत्पन्न | सरासरी स्वकर अन्यकर उत्पन्न | एकूण सरासरी स्वकर महसूल उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| १ | ड वर्ग महानगरपालिका | ३६६२ | १५६३ | ५२२५ |
| | टक्के | ७०% | ३०% | १००% |
| २ | अ वर्ग नगरपरिषदा | ९२० | १४१ | १०६१ |
| | टक्के | ८७% | १३% | १००% |
| ३ | ब वर्ग नगरपरिषदा | ४१६ | ५३ | ४६९ |
| | टक्के | ८९% | ११% | १००% |
| ४ | क वर्ग नगरपरिषदा | १०९ | ४४ | १५२ |
| | टक्के | ७१% | २९% | १००% |
| ५ | नगर पंचायती | ९७ | १४ | १११ |
| | टक्के | ८७% | १३% | |

(**टीप** : वर दिलेली आकडेवारी ही प्रत्येक महसूल विभागातून एक अशा निवडक ६ महानगरपालिका (ड वर्ग) आणि प्रत्येक महसूल विभागातून दोन नगरपरिषदा/ नगरपंचायतींची चार वर्षांची (सन २०१४-१५ ते २०१७-१८) सरासरी आहे.)

आलेख ३० : स्वकर उत्पन्नाचे विश्लेषण :

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्वकर महसूलाचे विश्लेषण (टक्यांमध्ये)




वरील विश्लेषण असे दाखवते की, लहान नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी बहुदा मालमत्ता कर हा कर उत्पन्नाचा एकमेव स्रोत आहे आणि कर महसूलाचा स्रोत म्हणून लहान नागरी स्थानिक स्वराज्य संस्थां मालमत्ता करावर पराकोटीच्या अवलंबून आहेत.

### ८.२३.२. कर महसुलावरील अभिप्राय :

### ८.२३.२.१ करेतर महसूल

तक्ता ८२: महानगरपालिकांचा करेतर महसूल:

(रु.लाखांमध्ये)

| अनु.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार | करेतर महसुली उत्पन्न |
|---|---|---|
| १ | ड वर्ग महानगरपालिका | ३०६९ |

(टीप: वरील माहिती प्रत्येक महसुली विभागातून एक याप्रमाणे निवडक ६ महानगरपालिकांची चार वर्षांची (सन २०१४-१५ ते २०१७-१८) सरासरी आहे.)

तक्ता ८३: नगरपरिषदांचा करेतरमहसूल : (रु.लाखांमध्ये)

| अनु.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार | सरासरी करेतर महसुली उत्पन्न |
|---|---|---|
| १ | क वर्ग नगर परिषदा | ९३७ |
| २ | ब वर्ग नगर परिषदा | ३४४ |
| ३ | क वर्ग नगर परिषदा | ७२ |
| ४ | *नगरपंचायती | ४२ |

(टीप: वरील माहिती ही प्रत्येक महसूल विभागातील प्रत्येकी २ निवडक नगरपरिषदा/ नगरपंचायती यांची ४ चार वर्षांची (२०१४-१५ ते २०१७-१८) सरासरी आहे.)

स्वकर आणि करेतर महसूल याबाबत आमचे अभिप्राय आणि शिफारशी आम्ही या प्रकरणामध्ये पुढे तपशीलवार दिल्या आहेत.

### ८.२३.३ नियुक्त कर

तक्ता ८४: नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतील नियुक्त करांची गत चार वर्षांतील सरासरी : (रु.लाखांमध्ये)

| अनु.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार | सरासरी मोटर वाहन (जुने) | सरासरी मुद्रांक शुल्क | सरासरी एन.ए.आणि जमीन महसूल | सरासरी गौण खनिजे | सरासरी करमणूक कर (जुना) | नियुक्त करांची सरासरी बेरीज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **महानगरपालिका** | | | | | | | |
| १ | ड वर्ग | ० | १०३९ | ० | १ | २ | १०४२ |
| | टक्के | ० | १०० | ० | ० | ० | १०० |
| **नगरपरिषदा** | | | | | | | |
| १ | अ वर्ग | ० | १६६ | १ | ० | २० | १८७ |
| | टक्के | ० | ८९ | ० | ० | ११ | १०० |
| २ | ब वर्ग | ० | ५६ | २ | ० | ८ | ६६ |
| | टक्के | ० | ८५ | ३ | ० | ११ | १०० |
| ३ | क वर्ग | १ | ११ | ० | ० | २ | १५ |
| | टक्के | ५ | ७५ | १ | ३ | १६ | १०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | नगरपंचायती | ० | ५ | १ | ० | ० | ६ |
| | टक्के | ० | ८२ | १४ | १ | २ | १०० |

आलेख ३१ : अ वर्ग नगरपरिषदांमधील नियुक्त करांचे विश्लेषण




आलेख ३२ : ब वर्ग नगरपरिषदांमधील नियुक्त करांचे विश्लेषण



आलेख ३३ : क वर्ग नगरपरिषदांमधील नियुक्त करांचे विश्लेषण




आलेख ३४ : नगरपंचायतींमधील नियुक्त करांचे विश्लेषण




बऱ्याचशा नगरपंचायती नुकत्याच स्थापन झाल्या असून तेव्हापासून, शेती ते बिनशेती रुपांतरण दर उच्च आहेत. आणि त्यामुळेच बिनशेती (एन.ए.) महसूलाचा वाटा उच्च आहे.

**८.२३.४ नियुक्त करांवर राज्य वित्त आयोगाची अवलोकने आणि शिफारशी :**

**८.२३.४.१ नियुक्त करांवरील अवलोकने**

**(अ) अतिरिक्त मुद्रांक शुल्क :**

महानगरपालिका कायदा कलम १४९ अ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा कायदा कलम १४७ अ, स्थावर मालमत्तेच्या व्यवहारांवर १% अतिरिक्त शुल्क आकारणीचा हक्क प्रदान करतात. अशाप्रकारे हा कर शासनाकडून आकारला जातो मात्र तो नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी संकलित केला जातो आणि अखेरीस या संस्थेकडे हस्तांतरित केला जातो.

नगरपरिषद क्षेत्रातील या १% अतिरिक्त मुद्रांक शुल्काची गेल्या ५ वर्षातील सरासरी वसुली प्रतिवर्ष रु. ११४ कोटींच्या घरात आहे.

गेल्या दोन वर्षांत शासनाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अतिरिक्त मुद्रांक शुल्क म्हणून हस्तांतरित केलेली ही रक्कम खालील प्रमाणे आहे.

तक्ता ८५ : नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरित केलेले अतिरिक्त मुद्रांक शुल्क
(रु. कोटींमध्ये)

| अनु.क्र. | वर्गवारी | संकलन सन २०१७-१८ | प्रकाशन सन २०१७-१८ | संकलन सन २०१७-१८ | प्रकाशन सन २०१७-१८ |
|---|---|---|---|---|---|
| १ | महानगरपालिका (सीआरसी कोड ३६०४०९२४) | - | ६१४.९४ | - | ११७५ |
| २ | नगर परिषदा (सीआरसी कोड ३६०४०१२५ ) | १५५.९३ | ९० | १६९.४७ | ९० |

* सरकारकडून नागरी स्थानिक संस्थांना देय असलेल्या अतिरिक्त मुद्रांक शुल्काच्या थकबाकी आहेत. मुद्रांक शुल्कांचे संपूर्ण संकलन अर्थसंकल्पात आपोआप समाविष्ट होत नाही. परिणामी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना थकबाकी देय आहे. परिच्छेद ५.२.२ (ब) मध्ये याचे तपशील दिले आहेत.

**(ब) करमणूक कर :**

नगरपरिषदांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी, शासनाने (नगर विकास विभाग) दि.०४.१२.१९९६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे की, महसूल विभागाने (हा विभाग दि.३१.०६.२०१७ पर्यंत करमणूक कर वसूल करत होता.) संबंधित नगरपरिषदेला उत्पन्नाचा हिस्सा द्यायलाच पाहिजे. शासन निर्णयामध्ये निश्चित केलेला हिस्सा :

- अ वर्ग परिषदा - ३० %
- ब वर्ग परिषदा - ३५ %
- क वर्ग परिषदा - ४० %

मागील वर्षांमध्ये सर्व नगर परिषदांना वार्षिक सरासरी १४ कोटी रुपये मिळत होते, असे दिसून आले आहे. यासाठी ३६०४ ०१११ हा एक स्वतंत्र संगणक सांकेतांक (सीआरसी कोड) आहे. मात्र वस्तू आणि सेवा करामध्ये (जीएसटी) करमणूक कर सामावून घेतल्यानंतर महसूल विभाग कोणताही करमणूक कर वसूल करत नाही.

कायदेशीरदृष्ट्या जरी करमणूक कर हा जीएसटीमध्ये सामावला गेला असला तरीही, अजूनही स्थानिक संस्था देखील त्यांच्या पातळीवर करमणूक कर आकारू शकतात. मात्र जरी महाराष्ट्र वस्तू आणि सेवा करामध्ये आवश्यक ते बदल केले असून महाराष्ट्र मनोरंजन शुल्क कायदा, १९२३ मध्ये देखील बदल केले असले, तरी तसे करण्यासाठी विविक्षित अधिसूचना काढणे आवश्यक ठरेल. तथापि शासनाने अद्याप या क्षेत्राबाबत कोणताही निर्णय घेतलेला नाही/ धोरण ठरवलेले नाही.

सन २०१३-१४ ते आजपर्यंत १३ कोटी संचित थकबाकी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देय आहे, हे देखील निदर्शनास आले आहे.

**(क) महसुली अनुदान (संगणक सांकेतांक ३६०२००७६)**

शासनाने (महसूल विभाग) पुन्हा एकदा, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्नांचे स्रोत वर्धित करण्याच्या हेतूने आणि पहिल्या राज्य वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार दि. ३१ मार्च, २००० शासन निर्णय निर्गमित केला होता. सदर शासन निर्णयात नागरी क्षेत्रामधील जमीन महसूलाच्या ७५% आणि त्याचबरोबर बिगर शेती कर वसूलीच्या ७५% देण्याची तरतूद होती.

पुन्हा एकदा शासनच या कराचे संकलन करते आणि वर नमूद केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे हस्तांतरणाची कार्यवाही करते. यातून नगर परिषदांना प्रतिवर्षी देय असलेली सरासरी रक्कम रू. २१ कोटी एवढी होते. या हस्तांतरणामध्ये तूट असल्याचे लक्षात आले असून या क्षेत्रामधून (वर नमूद केलेल्या शासन निर्णयाच्या गणनेवर आधारीत ) १२६.२६ कोटी रूपयांची मागणी असताना फक्त रु. १९.७६ कोटी एवढीच रक्कम उपलब्ध करून देण्यात आली आहे.

अशाप्रकारे नगरपरिषदांना रू. १०६ कोटी एवढी मोठी थकबाकी देय आहे. ही रक्कम नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात यावी अशी ठाम शिफारस राज्य वित्त आयोग करत आहे.

**(ड) गौण खनिजे (संगणक संकेतांक ३६०४ ०१७४)**

पुन्हा एकदा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची संसाधने वर्धित करण्याच्या हेतूनेच फार वर्षांपूर्वी १९८५ मध्ये शासनाने एक निर्णय घेतला होता. यानुसार क वर्ग नगरपरिषदांना गौण खनिजांच्या संकलित स्वामित्वधनाचा हिस्सा (महसूल विभाग) देण्याचे निश्चित झाले होते. याबाबत असे निरिक्षणास आले आहे

की, सरासरी मागणी रू.४.५ कोटींच्या टप्प्यात आहे. मात्र मागणीचा केवळ काही भागच देण्यात आला असून  रू. २२.८ कोटी एवढ्या रक्कमेची संचित तूट अद्याप नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देय आहे.

### ८.२३.४.२ नियुक्त करांसाठी राज्य वित्त आयोगाची शिफारस

**(अ) महाराष्ट्र महानगरपालिका कायदा कलम १४९ अ  आणि महाराष्ट्र नगरपालिका कायदा कलम १४७ अ मधील काही परिभाषा दुरुस्त करण्याची गरज :**

महाराष्ट्र महानगरपालिका कायदा कलम १४९ अ  आणि महाराष्ट्र नगरपालिका कायदा कलम १४७ अ नुसार १% अतिरिक्त मुद्रांक शुल्क आकारले जाते. असे निरिक्षणास आले आहे की, संबंधित कलमांच्या शब्दयोजनेमध्ये फक्त ‘विक्री, भेट, फलोपभोग (उपयोगिता) तारण यांची साधने’ एवढेच नमूद केले आहे. नोंदणी महानिरिक्षकांशी चर्चा करताना असे निदर्शनास आले की, या कलमांमध्ये कोठेही ‘विक्रीचा करार ’असे  नमूद करण्यात आलेले नाही आणि त्यामुळेच जे भरीव उत्पन्न नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे यायला पाहिजे होते, ते मिळत नाही. मात्र, मुख्य मुद्रांक कायद्यामध्ये  ‘विक्रीचा करार’ ही तरतूद आहे. या प्रकरणाचा तात्काळ आढावा घेऊन कायदयात सुधारणा करणे गरजेचे आहे.

**(ब) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अतिरिक्त मुद्रांक शुल्काची थकबाकी तात्काळ देणे गरजेचे :**

दुसरी बाब म्हणजे, असे निरिक्षणास आले आहे की, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अद्याप अतिरिक्त मुद्रांक शुल्काची रु.५१० कोटींची भरीव थकबाकी देण्यात आलेली नाही. या थकबाकीमध्ये महानगरपालिकांचे २१४.६० कोटी रुपये आणि नगरपरिषदांचे २९६.१४ कोटी रुपये देय असून यांमधून ही थकबाकी निर्माण झाली आहे. अलिकडच्या वर्षांमध्ये ही थकबाकी प्रलंबित राहिली आहे, निधीचे वितरण नेहमीप्रमाणेच मागणीपेक्षा कमी आहे. हे कर शासनाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी आणि त्यांच्यावतीने अगोदरच वसूल  केले आहेत. ही अनुशेषाची रक्कम महानगरपालिकांना तत्काळ हस्तांतरीत करणे गरजेचे आहे, अन्यथा याबाबत न्यायालयीन दावा उद्भवू शकतो.

**(क) वसूल  करण्यात आलेले अतिरिक्त मुद्रांक शुल्क राज्याच्या कोषागारात न वळवता थेट महानगरपालिकांकडे हस्तांतरित करणे गरजेचे :**

लोकांनी जेव्हा स्थावर मालमत्तेचे व्यवहार केले तेव्हा नोंदणी महानिरिक्षकांनी १% अतिरिक्त मुद्रांक शुल्क वसूल  केले. हा उपकर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वतीने शासनाकडून वसूल केला जातो. तसेच हा कर महानगरपालिका आणि नगरपरिषद कायद्याच्या तरतूदीनुसार संकलित केला जातो, म्हणजेच याला कायद्याचे पूर्णपणे पाठबळ आहे.

सध्याच्या पध्दतीनुसार १% रक्कम (जो तांत्रिकदृष्ट्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा पैसा आहे.) राज्याच्या कोषागारामध्ये (एकत्रित निधी) जमा करणे, त्यानंतर ती रक्कम अर्थसंकल्पित करणे आणि

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपवणे ही व्यवस्था नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विरोधात जाणारी आहे. हे त्यांना देय असलेल्या अतिरिक्त मुद्रांक शुल्काच्या मोठ्या थकबाकीवरुन दिसून येईल. **म्हणूनच यावर नोंदणी महानिरिक्षकांकडून वसूलीच्या वेळीच ही रक्कम राज्याच्या कोषागारामध्ये जमा न करता थेट महानगरपालिकांकडे हस्तांतरित करणे, हीच महत्वाची उपाययोजना ठरेल.**

केंद्रीय वित्त आयोगाच्या अनुदानामध्ये केंद्र सरकारने वसूल केलेल्या मात्र राज्यांना वाटून दिलेल्या करांचा समावेश होतो, हे सर्वश्रुतच आहे. विभागणीयोग्य संचयामध्ये असलेले कर केंद्र सरकारच्या एकत्रित निधीचा भाग असत नाहीत.

म्हणून याच धर्तीवर, १% अतिरिक्त मुद्रांक शुल्क राज्याच्या कोषागारामध्ये फिरवण्याऐवजी वसुलीच्या वेळीच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात यावे.

म्हणूनच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी संकलित केलेल्या अतिरिक्त मुद्रांक शुल्कासाठी स्वतंत्र संगणक सांकेतांक (सीआरसी कोड) असणे हे देखील इष्ट आहे. अशा प्रकारे मुद्रांक शुल्क वसुलीच्या वेळी जमा झालेली रक्कम केंद्रिय वस्तू आणि सेवा कर + राज्याचा वस्तू आणि सेवा कर यांप्रमाणेच राज्य मुद्रांक शुल्क कर आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी उपकर अशा दोन स्वतंत्र लेखा शीर्षकांखाली मांडली जाईल. सध्या यासाठी फक्त एकच लेखा असल्यामुळे वापरताना अडचणी येतात.

### (ड) करमणूक कर, गौण खनिजे आणि जमीन महसूल यांच्या थकबाकी तत्काळ चुकती करणे आवश्यक आहे :

त्याचप्रमाणे क वर्ग नगरपालिकांना गौण खनिजांची रुपये २२.८२ कोटींची थकबाकी देय असल्याचे दिसून आले आहे. जमीन महसूलाची १०६ कोटींची थकबाकी आणि करमणूक कराची रुपये १३.२४ कोटींची थकबाकी स्थानिक संस्थांना देय आहे. या तिन्ही थकबाकींची बेरीज केल्यास एकूण रुपये १४२ कोटींची रक्कम नगर परिषदांना देय आहे. ही भरभक्कम रक्कम असून आणि यातून परिषदांना आर्थिक भारातून दीर्घकाळ दिलासा मिळू शकतो.

### (इ) तीनही नियुक्त कर संपृष्टात आणणे आणि त्याऐवजी साहायय्क अनुदान वाढवणे गरजेचे :

वर नमूद केलेल्या चार नियुक्त करांपैकी, फक्त एक अतिरिक्त मुद्रांक शुल्क हा कर कायद्यामध्ये अंतःस्थापित आहे. म्हणूनच तो वैधानिकरित्या देय आहे. अन्य तीन कर म्हणजेच i)करमणूक करातील हिस्सा ii) गौण खनिजांच्या स्वामित्वधनाचा हिस्सा iii) जमीन महसुलाचा हिस्सा या रक्कमा शासन निर्णयाच्या स्वरूपातील कार्यकारी सूचनांनुसार दिलेल्या आहेत. हे शासन निर्णय खूप काळापूर्वी म्हणजेच १९८० आणि १९९० च्या दशकात जारी करण्यात आले. त्यावेळी नगरपरिषदांची संसाधने

वर्धित करण्यासाठी हे शासन निर्णय प्रस्तावित करण्यात आले होते. याला आता पुरेसा काळ लोटला आहे. पुढे असे दिसून आले की, ह्या रकमा देण्याची पद्धत खूपच गुंतागुंतीची आहे. यामध्ये आधी क्षेत्रातून आकडे गोळा केले जातात, त्यानंतर नगर विकास विभाग वित्त विभागाकडे त्यांची मागणी मांडते, ही मागणी अर्थसंकल्पित केले जाते, अशा प्रकारे ही पद्धत चालते. तीन करांपैकी करमणूक कर आता जीएसटी मध्ये अंतर्भूत करण्यात आला आहे. जिल्हा खनिज निधीच्या निर्मिती बरोबर गौण खनिजांच्या बाबतीतही, गेल्या काही वर्षांपासून महसूल आणि उद्योग या दोन्ही विभागांनी निर्गमित केलेल्या नवीन शासन निर्णयानुसार प्रोत्साहनाची व्यवस्था बदलली आहे. हे तीनही नियुक्त कर आता अवशेष म्हणून उरले आहेत आणि वर नमूद केल्याप्रमाणे त्यांची मोठी थकबाकी आहे.

या पार्श्वभूमीवर **राज्य वित्त आयोग ठामपणे अशी शिफारस करते की, अतिरिक्त मुद्रांक शुल्क वगळता अन्य तीन नियुक्त कर पूर्णपणे काढून टाकावेत आणि त्याऐवजी वरील तीन नियुक्तकरांमध्ये झालेल्या नुकसानाची रक्कमे एवढी अतिरिक्त रक्कम सहायक अनुदानांमध्ये जमा झालीच पाहिजे आणि नगरपरिषदेला एक मोठी रक्कम देण्यात यावी.** यामुळे वर्षानुवर्षे पाय रोवून राहिलेल्या अनेक गुंतागुंतीच्या प्रक्रियांचा गोंधळ दूर होईल आणि प्रशासकीय कामकाजात सुधारणा होईल.

## ८.२५ भरपाई अनुदान

### ८.२५.१ एलबीटी रद्द केल्याच्या बदल्यात दिलेली अनुदाने

तक्ता ८६ : स्थानिक संस्था कर (एलबीटी) रद्द केल्याच्या बदल्यात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात आलेली अनुदाने: (रू. लाखांमध्ये)

| अनु.क्र. | पालिकेचा प्रकार | जकात कर/ स्थानिक संस्था कर (एलबीटी) रद्द केल्याच्या बदल्यात अनुदान | टक्के |
|---|---|---|---|
| १ | अ+ वर्ग महानगरपालिका (बृहन मुंबई) | ८३९० | ४८ |
| २ | अ वर्ग (पुणे,नागपूर) | २४३९ | १४ |
| ३ | ब वर्ग (पिंपरी चिंचवड, नाशिक, ठाणे) | ३१०१ | १८ |
| ४ | क वर्ग (नवी मुंबई, वसई-विरार, औरंगाबाद, कल्याण डोंबिवली महानगरपालिका) | १७५० | १० |
| ५ | ड वर्ग | १७९० | १० |
| | एकूण | १७४७० | १०० |

आलेख ३५ : महानगरपालिकांना मिळालेली अनुदाने

जकात कर /एलबीटी रद्द केल्याबद्दल त्याऐवजी महानगरपालिकांना मिळालेल्या अनुदानांची टक्केवारी




सन २०१८-१९ मध्ये प्रत्येक महानगरपालिकेला दिलेल्या जीएसटी नुकसान भरपाईचा पूर्ण तपशील परिच्छेद ८.७.४ मध्ये याआधीच दिला आहे.

### ८.२५.२ सहायक अनुदान आणि अन्य महसुली अनुदाने

तक्ता ८७ : चार वर्षांसाठी (सन २०१४-१५ ते २०१७-१८) वितरीत करण्यात आलेली सरासरी सहायक अनुदाने आणि अन्य महसुली अनुदाने : (रुपये लाखांमध्ये)

| अनु. क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार | प्रति नगरपरिषद सरासरी सहायक अनुदान | प्रति महानगरपालिका/परिषद सरासरी अन्य महसुली अनुदाने | एकूण |
|---|---|---|---|---|
| **महानगरपालिका** | | | | |
| १ | ड वर्ग | - | २१०९ | २१०९ |
| **नगरपरिषदा** | | | | |
| १ | अ वर्ग | २१२८ | ८ | २१३६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | टक्के | ६२ | | |
| २ | ब वर्ग | ९६० | ४ | ९६४ |
| | टक्के | २८ | | |
| ३ | क वर्ग | २५५ | ३ | २५८ |
| | टक्के | ७ | | |
| ४ | नगरपंचायती | ९१ | २ | ९३ |
| | टक्के | ३ | | |

(**टीप** : वर दिलेली आकडेवारी ही प्रत्येक महसूल विभागातून एक अशा निवडक ६ महानगरपालिका (ड वर्ग) आणि प्रत्येक महसूल विभागातून दोन नगरपरिषदा/ नगरपंचायतींची चार वर्षांची (सन २०१४-१५ ते २०१७-१८) सरासरी आहे.)

आलेख ३६ : विविध श्रेणीच्या नगर परिषदांना मिळालेल्या एकूण सहायक अनुदानाचा भाग टक्केवारीमध्ये

विविध श्रेणीच्या नगर परिषदांना मिळलेल्या एकूण सहायक अनुदानाचा भाग टक्केवारीमध्ये




## ८.२६ केंद्रीय वित्त आयोग अनुदाने

तक्ता ८८: नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात आलेली केंद्रीय वित्त आयोग अनुदाने (रुपये लाखांमध्ये)

| अ.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार | १४व्या वित्त आयोगाच्या | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे |
|---|---|---|---|

| | | अनुदानांची सरासरी | एकूण सरासरी उत्पन्न |
|---|---|---|---|
| **महानगरपालिका** | | | |
| १ | ड वर्ग | ३४४२ | २१७८८ |
| | त्यांच्या एकूण उत्पन्नाची टक्केवारी | १६ | |
| **नगर परिषद** | | | |
| १ | अ वर्ग | १११३ | ७५३० |
| | त्यांच्या एकूण उत्पन्नाची टक्केवारी | १५ | |
| २ | ब वर्ग | ६६८ | ३२३८ |
| | त्यांच्या एकूण उत्पन्नाची टक्केवारी | २१ | |
| ३ | क वर्ग | २३४ | २०६१ |
| | त्यांच्या एकूण उत्पन्नाची टक्केवारी | ११ | |
| ४ | नगरपंचायती | ११३ | ८३८ |
| | त्यांच्या एकूण उत्पन्नाची टक्केवारी | १३ | |

(**टीप** : वर दिलेली आकडेवारी ही प्रत्येक महसूल विभागातून एक अशा निवडक ६ महानगरपालिका आणि प्रत्येक महसूल विभागातून दोन नगरपरिषदा/ नगरपंचायतींची चार वर्षांची (सन २०१४-१५ ते २०१७-१८) सरासरी आहे.)

आलेख ३८ : नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकूण सरासरी उत्पन्नात १४व्या वित्त आयोगाच्या अनुदानांचा वाटा (टक्क्यांमध्ये)




नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकूण उत्पन्नात १४ व्या वित्त आयोगाच्या अनुदानांचा टक्केनिहाय वाटा

### ८.२७ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या महसुली उत्पन्नाचे सर्वकष विश्लेषण

तक्ता ८९ : नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या महसुली उत्पन्नाचे सर्वकष विश्लेषण : (रुपये लाखांमध्ये)

| अ.क्र | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार | एकत्रित सरासरी व्यवसाय कर उत्पन्न | सरासरी अन्य स्वकर उत्पन्न | स्वतःचे सरासरी करेतर उत्पन्न (व्याज वगळून) | सरासरी नेमून दिलेले कर उत्पन्न | सरासरी मदत अनुदान/ एलबीटी/ जीएसटीच्या ऐवजीचे अनुदान | सहायक अनुदान वगळून सरासरी सरकारी अनुदाने | सरासरी एकूण महसुली उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ड वर्ग महानगरपालिका | ३६६२ (१७%) | १५६३ (७%) | ३०६९ (१४%) | १०४२ (५%) | १०३४६ (जीएसटी अनुदान) (४७%) | २१०९ (१०%) | २१७८८ |
| २ | अ वर्ग नगर परिषदा | ९२० (२१%) | १४१ (३%) | ९३७ (२२%) | १८७ (५%) | २१२८ (४९%) | ८ (०%) | ४३२२ |
| ३ | ब वर्ग नगर परिषदा | ४१६ (२२%) | ५३ (३%) | ३४४ (१८%) | ६६ (४%) | १०१५ (५३%) | ४ (०%) | १८९९ |
| ४ | क वर्ग नगर परिषदा | १०९ (२२%) | ४४ (९%) | ७२ (१४%) | १५ (३%) | २५५ (५१%) | ३ (१%) | ४९८ |
| ५ | नगर पंचायती | ९७ (३१%) | १४ (५%) | १०२ (३३%) | ६ (२%) | ९१ (२९%) | २ (०%) | ३१३ |

(**टीप** : वर दिलेली आकडेवारी ही प्रत्येक महसूल विभागातून एक अशा निवडक ६ महानगरपालिका आणि प्रत्येक महसूल विभागातून दोन नगरपरिषदा/ नगरपंचायतींची चार वर्षांची (सन २०१४-१५ ते २०१७-१८) सरासरी आहे.)

तक्ता ३९ : ड वर्ग महानगरपालिकांच्या महसूली उत्पन्नाचे विश्लेषण




ड वर्ग महानगरपालिकांमध्ये आर्थिक पाठबळ हे सहायक अनुदानाऐवजी जीएसटी नुकसान भरपाईच्या स्वरूपात आहे.

**शेरा** : वरील आलेख असे दर्शवतो की, ड वर्ग महानगरपालिकांच्या एकूण महसुली उत्पन्नापैकी सर्वाधिक वाटा हा ४७% नुकसान भरपाई अनुदानाचा आहे. त्या खालोखाल एकत्रित मालमत्ता कराचा क्रमांक लागतो, जो १७% एवढा आहे. एकूण सरकारी पाठबळ हे ६२% आहे. (नुकसान भरपाई अनुदान + अन्य महसुली अनुदाने + नियुक्त कर)

तक्ता ४० : अ वर्ग नगरपरिषदांच्या महसुली उत्पन्नाचे विश्लेषण



शेरा : वरील तक्ता असे दर्शवतो की, अ वर्ग नगरपरिषदांच्या एकूण महसुली उत्पन्नामध्ये सर्वाधिक म्हणजेच (४९%) वाटा हा सहायक अनुदानाचा आहे. तर स्वतःचे करेतर उत्पन्न हे २२% आणि एकत्रित मालमत्ता कर उत्पन्न २१ % आहे. हा तक्ता असेही दाखवतो की, करेतर महसूल हा एकत्रित मालमत्ता करापेक्षा जास्त आहे.

तक्ता ४१ : ब वर्ग नगरपरिषदांच्या महसुली उत्पन्नाचे विश्लेषण




शेरा : वरील तक्ता असे दर्शवतो की, ब वर्ग नगर परिषदांच्या एकूण महसुली उत्पन्नात सर्वाधिक म्हणजेच ५३ % वाटा हा सहायक अनुदानांचा असून एकत्रित मालमत्ता कराचा वाटा २२% टक्के व स्वतःचे करेतर उत्पन्न १८ % आहे.

तक्ता ४२ : क वर्ग नगरपरिषदांच्या महसुली उत्पन्नाचे विश्लेषण




शेरा : वरील तक्ता असे दर्शवतो की, क वर्ग नगर परिषदांच्या एकूण महसुली उत्पन्नात सर्वाधिक म्हणजेच ५२ % वाटा हा सरकारी अनुदानांचा ( ५१ % सहायक अनुदान + १% अन्य महसुली अनुदाने ) असून एकत्रित व्यवसाय करा चा वाटा २२% टक्के व स्वतःचे करेतर उत्पन्न १४ % आहे.

### ८.२८ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे भांडवली उत्पन्न

### ८.२८.१ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राप्त झालेली भांडवली अनुदाने

तक्ता ९० : नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची सरासरी भांडवली अनुदाने : (रुपये लाखांमध्ये)

| अनु.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार | सरासरी एकूण भांडवली अनुदाने |
|---|---|---|
| १ | ड वर्ग महानगरपालिका | ७२२४ |
| २ | अ वर्ग नगरपरिषदा | २३७३ |
| ३ | ब वर्ग नगरपरिषदा | ८३९ |
| ४ | क वर्ग नगरपरिषदा | ८०५ |
| ५ | नगरपंचायती | ४१३ |

(**टीप** : वर दिलेली आकडेवारी ही प्रत्येक महसूल विभागातून एक अशा निवडक ६ महानगरपालिका आणि प्रत्येक महसूल विभागातून दोन नगरपरिषदा/ नगरपंचायती यांची चार वर्षांची (२०१४-१५ ते २०१७-१८) सरासरी आहे.)

## ८.२९ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा सरासरी महसुली खर्च

तक्ता ९१: नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा सरासरी महसुली खर्च : (रुपये लाखांमध्ये)

| अ. क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार | आस्थापना | पाणी पुरवठा कार्यवाही आणि देखभाल | घनकचरा व्यवस्थापन कार्यवाही आणि देखभाल | पथदिवे कार्यवाही आणि देखभाल | गटारे कार्यवाही आणि देखभाल | रस्ते आणि इमारती कार्यवाही आणि देखभाल | अग्निशमनसेवा कार्यवाही आणि देखभाल | अन्य सेवा कार्यवाही आणि देखभाल | सरासरी एकूण महसुली खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ड वर्ग महानगरपालिका | ७४४४ (३७%) | १४०९ (७%) | १५२९ (७%) | ८०६ (४%) | ११६ (१%) | २०१३ (१०%) | ३६ (०%) | ६८६६ (३४%) | २०२१९ |
| २ | अ वर्ग नगर परिषदा | १९४१ (५५%) | ३६६ (१०%) | १४८ (४%) | ११८ (३%) | ५४ (२%) | ९२ (३%) | ४ (०%) | ८२१ (२३%) | ३५४३ |
| ३ | ब वर्ग नगर परिषदा | ७३८ (५२%) | १३० (९%) | १५५ (११%) | ४७ (३%) | १५ (१%) | ७० (५%) | ३ (०%) | २७६ (१९%) | १४३५ |
| ४ | क वर्ग नगर परिषदा | २८३ (६२%) | ५४ (१२%) | ३३ (७%) | २१ (५%) | ० (०%) | ७ (२%) | ० (०%) | ५५ (१२%) | ४५३ |
| ५ | नगर पंचायती | ७० (२५%) | ७१ (२६%) | २२ (८%) | १९ (७%) | ८ (३%) | ५४ (२०%) | ० (०%) | ३० (११%) | २७४ |

(**टीप** : वर दिलेली आकडेवारी ही प्रत्येक महसूल विभागातून एक अशा निवडक ६ महानगरपालिका आणि प्रत्येक महसूल विभागातून दोन नगरपरिषदा/ नगरपंचायतींची चार वर्षांची (सन २०१४-१५ ते २०१७-१८) सरासरी आहे.)

आलेख ४३ : ड वर्ग महानगरपालिकेचा महसुली खर्च



आलेख ४४ : ‘अ’ वर्ग नगर परिषदेचा महसुली खर्च




**शेरा** : वरील आलेख असे दर्शवतो की, अ वर्ग नगरपरिषदांचा आस्थापना खर्च ५०%हून जास्त आहे. दुसरे निरिक्षण म्हणजे, ‘अ’ वर्ग नगरपरिषदा त्यांच्या उत्पन्नाचा मोठा भाग (म्हणजेच २३% ) मुख्य सेवांव्यतिरिक्त इतर सेवांवर खर्च करतात.

**आलेख ४५** : ‘ब’ वर्ग नगर परिषदेचा टक्केवारीनिहाय महसुली खर्च



**शेरा :** वरील आलेख असे दर्शवतो की, ब वर्ग नगरपरिषदांचा आस्थापना खर्च ५०%हून जास्त आहे.

**आलेख ४६ :** क वर्ग नगर परिषदेचा टक्केवारीनिहाय महसुली खर्च




**शेरा :** वरील आलेख असे दर्शवतो की, क वर्ग नगरपरिषदांचा आस्थापना खर्च ५०%हून जास्त आहे.

**आलेख ४७ :** नगरपंचायतींचा टक्केवारीनिहाय महसुली खर्च



**शेरा :** नगरपंचायती अजूनही संक्रमण अवस्थेत आहेत. आवश्यक कर्मचारी अद्याप रुजू झालेले नाहीत आणि त्यामुळेच महत्वाची पदे रिक्त आहेत. नगरपंचायती त्यांच्या मर्यादित कर्मचाऱ्यांसह कामाचे व्यवस्थापन करत आहेत. हे कर्मचारी नगरपंचायतींना ग्रामपंचायतींचा दर्जा असल्यापासून त्यांच्यासह काम करत आहेत.

### ८.३०: नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सरासरी वित्तिय स्थितीचे एकूण विश्लेषण

तक्ता ९२ : नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे सरासरी उत्पन्न आणि खर्च (आय-व्यय) : (रुपये लाखांमध्ये)

| अनु. क्र | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार | सरासरी एकूण महसुली उत्पन्न | सरासरी एकूण भांडवली उत्पन्न | नगर परिषदांचे सरासरी एकूण उत्पन्न | व्याजाचा हिस्सा (तक्ता ९) | सरासरी महसुली खर्च | सरासरी भांडवली खर्च | सरासरी एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ड वर्ग महानगरपालिका | २१७८८ | ९८०६ | ३१५९४ | ४८० | २०२१९ | १२२७४ | ३२४९२ |
| २ | अ वर्ग नगर परिषदा | ४३२२ | ३२०९ | ७५३० | १०९ | ३५४३ | ३५९५ | ७१३७ |
| ३ | ब वर्ग नगर परिषदा | १८९९ | १३३९ | ३२३८ | ७४ | १४३५ | १२१७ | २६५२ |
| ४ | क वर्ग नगर परिषदा | ४९८ | ९८० | १४७८ | २७ | ४५३ | ६१० | ८६८ |
| ५ | नगर पंचायती | ३१३ | ५२६ | ८३९ | २३ | २७४ | ३७७ | ४६२ |

**(टीप** : वर दिलेली आकडेवारी ही प्रत्येक महसूल विभागातून एक अशा निवडक ६ महानगरपालिका आणि प्रत्येक महसूल विभागातून दोन नगरपरिषदा/ नगरपंचायतींची चार वर्षांची ( सन २०१४-१५ ते २०१७-१८) सरासरी आहे. नगरपंचायतींसाठी ही आकडेवारी २ वर्षांची सरासरीची आहे.)

### ८.३१ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दरडोई उत्पन्न आणि खर्चाचे विश्लेषण

तक्ता ९३: नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा दरडोई उत्पन्न आणि खर्च

(रुपये जवळपास हजाराच्या पूर्णांकात)

| अनु.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे दरडोई उत्पन्न | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा दरडोई खर्च |
|---|---|---|---|
| महानगरपालिका | | | |
| १ | ड वर्ग | ५००० | ५००० |
| नगरपरिषदा | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अ वर्ग | ५००० | ५००० |
| २ | ब वर्ग | ५००० | ४००० |
| ३ | क वर्ग | ५००० | ५००० |
| ४ | नगर पंचायती | ३००० | २००० |

ड वर्ग महानगरपालिका आणि नगर परिषदांचे दरडोई उत्पन्न आणि खर्च २००० ते ५००० च्या टप्प्यात आहे, असे आमच्या नमुना अभ्यासात दिसून आले आहे.

### ८.३२ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रमाणानुसार खर्च

काही महत्वाच्या सेवांशी निगडीत मापदंडात्मक सेवांची आवश्यक पातळी गाठण्यासाठी किती गुंतवणूक गरजेची असेल, हे निश्चित करण्यासाठी राज्य वित्त आयोगाने नमुन्याच्या आधारे (खाली दिलेला तक्ता ९४ पाहा) काम केले आहे. यामध्ये प्रत्येक वर्गवारीतील एक निवडक नागरी स्थानिक स्वराज्य संस्था निर्धारित केली आहे आणि आदर्श सेवा पातळी गाठण्यासाठी आवश्यक असलेल्या पाठबळाच्या पातळीवर काम केले आहे. त्यानंतर त्यांनी समान श्रेणी असणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संख्येशी योग्यरित्या गुणाकार करून ते मागील कल पाहून अंदाज घेण्यात आले आहे.

**दिलेल्या रक्कमा या अंदाजित आहेत, तरीही यावरून एखाद्याला जर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना संपूर्ण गुणवत्तापूर्ण सेवा द्यायच्या असतील तर त्यासाठी किती मोठ्या रक्कमेची भांडवली गुंतवणूक आवश्यक आहे, याचा अंदाज येऊ शकेल.**

तक्ता ९४ : पूर्ण पायाभूत विकासासाठी प्रमाणानुसार किंमत

(रुपये कोटींमध्ये)

| पायाभूत विकासासाठी प्रमाणानुसार खर्च | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची वर्गवारी | नमुना नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या वर्गवारीमधील एकूण लोकसंख्या (लाखांमध्ये) | मुलभूत सेवांकरिता दर्शक खर्च ( सेवा स्तर संदर्भचिन्ह एसएलबी) | | | | | |
| | | | | पाणी पुरवठा आणि देखभाल | घन कचरा व्यवस्थापन | सांडपाण्याची (गटारांची) व्यवस्था | रस्ते आणि देखभाल | पथदिवे | विकास आराखड्याची (डीपी) अंमलबजावणी |
| महानगरपालिका | | | | | | | | | |
| १ | ड वर्ग | भिवंडी-निझामपूर | | ६८५ | ६२ | ४४८ | ८८२ | ८९ | २०० |
| | | सर्वांसाठी अंदाजे खर्च | ८५.०१ | ११६४९ | १०४६ | ७६१६ | १५००० | १५१२ | ३३९७ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दरडोई खर्च (रु.लाखांमध्ये) | | | | | ४७.३१ | | | |
| नगरपरिषदा | | | | | | | | |
| १ | अ वर्ग | इचलकरंजी | | ३३४ | ४८ | ३४३ | ११७ | १३ | ६६० |
| | | सर्वांसाठी अंदाजे खर्च | २५.२४ | ५६७२ | ८१५ | ५८२३ | १९८० | २२२ | १२२१३ |
| दरडोई खर्च (रु.लाखांमध्ये) | | | | १०१.९ | | | | |
| २ | ब वर्ग | मनमाड | | १०८ | १८९ | १९१ | ९९ | १५० | १७ |
| | | सर्वांसाठी अंदाजे खर्च | ४४.५१ | ७९०० | १३८१८ | १३९३५ | ७२०६ | १०९३२ | १२२७ |
| दरडोई खर्च (रु.लाखांमध्ये) | | | | १२३.६ | | | | |
| ३ | क वर्ग | एरंडोल | | ३२ | २० | ३३ | २६ | ९ | ३१ |
| | | सर्वांसाठी अंदाजे खर्च | ३८.९५ | ४५५१ | २८५६ | ४६०४ | ३५९६ | १२७६ | ४३७१ |
| दरडोई खर्च (रु.लाखांमध्ये) | | | | ५४.५६ | | | | |
| ४ | नगर पंचायत | दापोली | | १ | ६ | १ | १ | ० | १०० |
| | | सर्वांसाठी अंदाजे खर्च | १८.६२ | १८५ | ७६० | ९७ | १६९ | १६ | १३५१४ |
| **दरडोई खर्च (रु.लाखांमध्ये)** | | | | ७९.१६ | | | | |

** सर्वांसाठी अंदाजे खर्च- म्हणजे त्या वर्गवारीतील सर्व शहरांसाठी

तक्ता ९५ : प्रमाणानुसार किंमतीच्या गणनेसाठी शहरे निवडीसाठीचे निकष:

| **अनु.क्र.** | **नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची वर्गवारी** | **निवडलेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | ड वर्ग महानगरपालिका | भिवंडी- निझामपूर | राज्य वित्त आयोगाने या नागरी स्थानिक स्वराज्य संस्था प्रत्येक वर्गवारीतून सहजगत्या निवडल्या आहेत. |
| २ | अ वर्ग नगरपरिषदा | इचलकरंजी | |
| ३ | ब वर्ग नगरपरिषदा | मनमाड | |
| ४ | क वर्ग नगरपरिषदा | एरंडोल | |
| ५ | नगरपंचायती | दापोली | |

**८.३३ मागील तीन वर्षांमध्ये (सन २०१६-१९) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राप्त झालेल्या सरकारी अर्थसंकल्पीय अनुदानाचे विश्लेषण**

नगर विकास विभागाने मागील तीन वर्षात खालील रक्कम खर्च केली आहे :

तक्ता ९६ : मागील तीन वर्षासाठीचा अर्थसंकल्पीय खर्च : (रुपये कोटींमध्ये)

| अनु.क्र. | वर्ष | अर्थसंकल्पीय खर्च (रुपये कोटींमध्ये) |
|---|---|---|
| १ | २०१६-१७ | १८६२२ |
| २ | २०१७-१८ | २८६३२ |
| ३ | २०१८-१९ | ३३३७१ |

वरील आकडेवारीमध्ये मंत्रालयीन स्तरावर विभागाची आस्थापना, संचालक, नगर परिषद संचालनालय,क्षेत्रिय अधिकारी, नगर रचना संचालनालय आणि त्याची कार्यालये तसेच सर्व प्रकारची अनुदाने (भांडवली आणि महसुली), कर्जे इ. अशा सर्व प्रकारच्या खर्चांचा समावेश आहे.

आम्ही आता खाली भांडवली आणि महसुली अनुदाने आणि मुख्य घटकांवरील कर्जे दिली आहेत. (काही अगदी लहान बाबी आहेत ज्या वर्षानुवर्षे असमान देखील आहेत. या विस्तृत विश्लेषणासाठी आम्ही विचारात घेतलेल्या नाहीत.)

तक्ता ९७ : नागरी स्थानिक संस्थांना दिलेली भांडवली अनुदाने : (रुपये कोटींमध्ये)

| नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची श्रेणी | योजना | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | शेरे |
|---|---|---|---|---|---|
| महानगरपालिका | नियमित योजना | २१९८ | २०६८ | १९८९ | केंद्रीय योजनांचा समावेश |
| | विशेष योजना (स्मार्ट सिटी) | १२५५ | १५०० | ९८४ | केंद्रीय योजना |
| | विशेष योजना-दलित वस्ती सुधारणा | १८३ | -- | -- | २०१७-१८ पासून ही योजना जिल्हा योजनेमध्ये वळविण्यात आली आहे. |
| नगरपरिषदा | नियमित योजना | १७९३ | २४७१ | २६८६ | |
| | विशेष योजना - तीर्थक्षेत्र शहरे | ४९ | ७० | १०६ | निवडक तीर्थक्षेत्र शहरे आणि पवित्र स्थळे |
| | विशेष - दलित वस्ती सुधारणा | ३३४ | -- | -- | २०१७-१८ पासून ही योजना जिल्हा योजनांमध्ये वळविण्यात आली आहे. |
| नगरपंचायती | नियमित योजना | ११६ | २०५ | १६४ | |
| सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी सर्वसाधारण | रस्ता अनुदाने | ४०५ | ४५० | ४०५ | |
| मेट्रो शहरे (मुंबई, | मुंबई नागरी वाहतूक | ३१० | ४५० | १०५२ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पुणे आणि नागपूर) | प्रकल्प- एमयुटीपी (केंद्रीय अनुदान) मेट्रो प्रकल्पासाठीच्या समन्यायासह | | | | |
| **एकूण भांडवली अनुदाने** | | **६६४३** | **७२१४** | **७३८६** | |

## ८.३५ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना महसुली अनुदाने :

तक्ता ९८ : नागरी स्थानिक संस्थांना दिलेली महसुली अनुदाने : (रुपये कोटींमध्ये)

| नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची श्रेणी | योजना | सन २०१६-१७ | सन२०१७-१८ | सन २०१८-१९ | शेरे |
|---|---|---|---|---|---|
| महानगरपालिका | एलबीटी/जीएसटी साठी नुकसान भरपाई | ५४०० | १३३५६* | १७४६९ | * यामध्ये एलबीटी आणि जीएसटी या दोन्हींच्या ऐवजीच्या अनुदानाचा समावेश आहे. |
| | नेमून दिलेले कर - अतिरिक्त मुद्रांक शुल्क | ९०० | १००० | ११७५ | |
| | १४ वा वित्त आयोग | ८५५ | ९८३ | १०९१ | फक्त ड वर्ग म.न.पां.साठी |
| **महानगरपालिकांसाठी एकूण महसुली अनुदाने ( मुक्त )** | | **७१५५** | **१५३३९******** | **१९६६३******** | ** दि. ०१.०७.२०१७ पासून मुंबई महानगरपालिकेला जकात कराऐवजी मिळालेल्या नुकसान भरपाईचा समावेश |
| महानगरपालिका - तेजस्विनी योजनेसाठी विशिष्ट उद्दीष्ट अनुदान | तेजस्विनी योजना | ४० | ५० | १६ | महिलांसाठी विशेष बस सेवा चालवण्यासाठी |
| नगर परिषदा- सहायक अनुदान | सहायक अनुदान | १४९१ | १४९१ | १६९१ | |
| नेमून दिलेले कर- मुद्रांक शुल्काचा वाटा | मुद्रांक शुल्काचा वाटा | ९० | १०० | ९० | |
| नेमून दिलेले कर - | मुद्रांक शुल्का | १७ | १८ | १७ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मुद्रांक शुल्का व्यतिरिक्त | व्यतिरिक्त | | | | |
| **नागरी स्वराज्य संस्थेची श्रेणी** | **पाठबळाची योजना** | **२०१६-१७** | **२०१७-१८** | **२०१८-१९** | **शेरे** |
| केंद्रीय वित्त आयोग अनुदाने | | २१८१ | १४७३ | १५२८ | खालील टीप पाहा. |
| **एकूण नगरपरिषदा** | | **२८७९** | **३०८२** | **३३२६** | **यामध्ये नगरपंचायतींच्या अनुदानाचा समावेश** |
| सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी सर्वसाधारण | **नागरी उपजिविका अभियान** | ५९ | १०५ | ८४ | **केंद्रीय योजना** |
| **एकूण महसुली अनुदान** | | **१०१३३** | **१८५७६** | **२३०८९** | |

* वित्त आयोगाची अनुदाने ड वर्ग महानगरपालिका आणि सर्व नगरपरिषदा तसेच नगरपंचायतींसाठी देण्यात आली आहेत. ही अनुदाने ९०:१० (लोकसंख्या: क्षेत्र) सूत्रावर महानगरपालिका (ड वर्ग) आणि नगर परिषदा यांमध्ये परस्पर वाटप करण्यात आली आहेत. हे वाटप वरील तक्त्यांच्या आधारावर केले आहे.

### ८.३६ मेट्रो रेल्वे प्रकल्पांसाठी मेट्रो पालिकांना (मुंबई, पुणे, नागपूर) कर्ज :

तक्ता ९९ : अ + आणि अ वर्ग महानगरपालिकांना मेट्रो रेल्वे प्रकल्पांसाठी कर्ज :

| अनु.क्र. | वर्ष | दिलेली कर्ज (रुपये कोटींमध्ये) |
|---|---|---|
| १ | २०१६-१७ | ११६ |
| २ | २०१७-१८ | २२० |
| ३ | २०१८-१९ | ११५७ |

### ८.३७ विशेष कार्यक्रम - स्वच्छ भारत अभियान :

तक्ता १०० : स्वच्छ भारत अभियानासाठी दिलेले निधी : (रुपये कोटींमध्ये)

| अनु.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची श्रेणी | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ |
|---|---|---|---|---|
| १ | महानगरपालिका | ५५० | ६०० | ४५० |
| २ | नगरपरिषदा | ७० | ६०० | ४५० |
| ३ | नगरपंचायत | ८५ | ४०५ | २८० |
| **एकूण** | | **७०५** | **१६०५** | **११८०** |

### ८.३८ केंद्रीय वित्त आयोग अनुदाने :

१४ व्या केंद्रीय वित्त आयोगाने महाराष्ट्रासाठी वर्ष २०१५ -२० या कालावधीसाठी खालील रक्कमांची शिफारस केली आहे :

तक्ता १०१ : केंद्रीय वित्त आयोगाने दिलेले निधी : (रुपये कोटींमध्ये)

| अनु.क्र. | वर्ष | मूळ अनुदान | कार्यात्मक अनुदान | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | २०१५-१६ | ११९१ | ० | ११९१ |
| २ | २०१६-१७ | १६४९ | ४८७ | २१३६ |
| ३ | २०१७-१८ | १९०६ | ५५१ | २४५७ |
| ४ | २०१८-१९ | २२०५ | ६२६ | २८३१ |
| ५ | २०१९-२० | २९७९ | ८१९ | ३७९८ |
| **एकूण** | | **९९३०** | **२४८३** | **१२४१३** |

१४ व्या वित्त आयोगांतर्गत वाटप करण्यात आलेली १२४१३ कोटी रुपयांची रक्कम, ही १३ व्या वित्त आयोगाच्या कालावधीत (सन २०१०-१५) वाटप करण्यात आलेल्या ३१७७ कोटी रुपये रकमेच्या पुढे घेतलेली एक मोठी झेप आहे. पुढील तीन अटी पूर्ण केल्यावर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना १४ व्या वित्त आयोगाची कार्यात्मक अनुदाने देण्यात येतात.

i) ज्या वर्षासाठी नगरपालिका कार्यात्मक अनुदानासाठी दावा करत आहे, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने त्या वर्षाच्या दोन वर्षाहून आधीचे नसलेले असे संबंधित लेखापरिक्षित लेखे सादर करावेत.

ii) पालिकेला लेखापरिक्षित लेख्यांमध्ये प्रतिबिंबित झाल्याप्रमाणे तिच्या स्वतःच्या महसुलामध्ये मागील वर्षांच्या तुलनेत झालेली वाढ दाखवावी लागते. महसूलांमध्ये झालेली सुधारणा ही फक्त या लेखापरिक्षित लेख्यांच्या आधारावर निश्चित केली जाईल आणि यासाठी अन्य कोणताही आधार ग्राह्य धरला जाणार नाही.

iii) पालिकेने पुरस्काराच्या कालावधीमध्ये प्रत्येक वर्षी मूलभूत नागरी सुविधांशी संबंधित सेवा स्तर मानक मोजावेत आणि प्रसिद्ध करून ते सार्वजनिकरित्या उपलब्ध करून द्यावेत. यासाठी नगर विकास मंत्रालयाचे सेवा स्तरीय मानक वापरले जाऊ शकते.

आतापर्यंत हे पाहिले आहे की, सन २०१५-१६ ते सन २०१७-१८ पर्यंतचे मूळ अनुदान प्राप्त झाले आहे. मात्र मागील दोन वर्षातील म्हणजेच २०१७-१८ आणि २०१८-१९ या वर्षांचे कार्यात्मक अनुदान, हा अहवाल तयार करण्याच्या वेळेपर्यंत (एप्रिल २०१९) प्राप्त झालेले नव्हते.

१४ वा वित्त आयोगाचे वाटप शासनाने फक्त ड वर्ग महानगरपालिका आणि नगरपरिषदांसाठी केले आहे आणि उच्च पातळीच्या महानगरपालिकांना वगळले आहे.

दि. ०३.०८.२०१५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना १४ व्या वित्त आयोगाचा विनियोग करण्याचे तंत्र आणि पद्धत यासंबंधीच्या तपशिलवार मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. किमान ५०% अनुदान खाली नमूद केलेल्या बाबीवर खर्च करणे आवश्यक आहे, असे या शासन निर्णयामध्ये निर्देशित करण्यात आले आहे.

- घन कचरा व्यवस्थापन
- स्वच्छ भारत अभियानातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा वाटा
- नागरी वनीकरण आणि हरितीकरण

उर्वरित ५०% रक्कम खालील बाबींवर खर्च होऊ शकेल :

- हुडको, एलआयसी आणि अन्य यंत्रणांकडून घेतलेल्या कर्जांची परतफेड
- केंद्राच्या/ राज्याच्या प्रकल्पांमध्ये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्वतःच्या हिश्शाचे योगदान
- वीज आणि पाणी बिले निकाली काढणे.

**क्षेत्रभेटी दरम्यान, राज्य वित्त आयोगाच्या असे निदर्शनास आले की, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना केंद्रीय वित्त आयोगाच्या अनुदानांचा मोठा फायदा झाला आहे आणि त्यांपैकी बऱ्याच संस्थांनी त्यांची घन कचरा व्यवस्थापनाची पद्धत सुधारली आहे. खरतर अगदी लहानात लहान नगरपालिकेमध्ये देखील घरोघरी जाऊन घरगुती घन कचरा गोळा करण्याची पद्धत रुजू लागली आहे, जी एक सर्वांत स्वागतार्ह अशी सुधारणा आहे. दि. ०३.०८.२०१५ च्या शासन निर्णयामध्ये ठरवण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना व प्राधान्यक्रम आणि फक्त ड वर्ग महानगरपालिकांसाठी आणि त्या खालच्या पातळीसाठी अलग राखून ठेवलेले निधी सुयोग्य असल्याचे दिसून आले, कारण त्यांनाच निधींची आवश्यकता होती.**

**८.३८.१ राज्य वित्त आयोगाची शिफारस :**

राज्य वित्त आयोग अशी शिफारस आणि पुनरुच्चार करतो की, कार्यात्मक अनुदान मिळवण्यासाठी नमूद केलेल्या अटींपैकी एक “लेखापरिक्षित लेखा” या अटीला भविष्यात अत्यंत महत्व देणे आवश्यक आहे. मग ती वित्त आयोगाची अट असो किंवा नसो. व्यावसायिक सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षण करणे आवश्यक आणि त्याचबरोबर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संपूर्ण लेखांकन पद्धतीचे सुव्यवस्थापन करणे आवश्यक आहे. लेखा, लेखा परिक्षण आणि वित्तिय माहिती या प्रकरणामध्ये आम्ही हे विस्ताराने मांडले आहे.

**८.३९ राज्याच्या स्वतःच्या करांची टक्केवारी (सन २०१८-१९) म्हणून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना पुरवलेला मुक्त निधी (महसुली अनुदाने)**

तक्ता १०२: नागरी स्थानिक संस्थांना मिळालेले मुक्त निधी: (रुपये कोटींमध्ये)

| अनु.क्र. | प्रोत्साहनाचा प्रकार | महानगरपालिका | नगर परिषदा |
|---|---|---|---|
| १ | जीएसटीच्या ऐवजी देय रक्कम | १७,४६८* | - |
| २ | सहायक अनुदाने | - | १,६९१ |
| ३ | सर्व नियुक्त कर (मुख्यतः अतिरिक्त मुद्रांक शुल्काद्वारे) | १,१७५ | १०७ |
| **एकूण** | | **१८,६४३** | **१,७९८** |
| | शासनाच्या स्वतःच्या कर महसुलाची टक्केवारी म्हणून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रोत्साहनातील वाटा (रु.१८८९३१ कोटी) | **९.८६%** | **०.९५%** |

* यामध्ये जकात कराऐवजीच्या नुकसान भरपाईचा समावेश आहे.

**८.४० नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्वतःच्या संसाधनांत वाढ करणे:**

**८.४०.१ व्यवसाय कर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे हस्तांतरीत करणे/वळवणे:**

**८.४०.१.१ पार्श्वभूमी :**

राज्यघटनेच्या २७६ या कलमान्वये राज्य शासन किंवा स्थानिक संस्थांना व्यवसाय, व्यापार, आजीविका किंवा रोजगार यांवर कर आकारणीसाठी सक्षम केले आहे. या करासाठी राज्यघटनेनेच प्रतिवर्ष रु. २५,०० ही मर्यादा घालून दिली आहे. महाराष्ट्रामध्ये सर्वश्रुत अशा रोजगार हमी योजनेला पाठबळ देण्यासाठी १९७५ मध्ये व्यवसाय कर लागू करण्यात आला. या कायद्याला -महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका आणि रोजगार कायदा, १९७५◦, असे म्हटले जाते. व्यवसाय कर हा प्रत्येक नियोक्त्याने (रोजगार देणारा मालक) आपल्या कर्मचाऱ्यांकडून वसूल करणे आणि सरकारकडे भरणा करणे अपेक्षित आहे. व्यापारी, डॉक्टर, सी.ए. आणि यांसारखे स्वतंत्र व्यवसाय असणाऱ्या व्यक्तींकडून देखील व्यवसाय कर आकारला जातो. महाराष्ट्रामध्ये, हा कर विक्रीकर विभागाकडून वसूल करण्यात येतो.

**८.४०.१.२ सध्याची वसुली पातळी आणि कल :**

तक्ता: १०३ : व्यवसाय कराचे संकलन :

(रुपये कोटींमध्ये)

| अनु.क्र. | वर्ष | व्यवसाय कर जमा (रु.कोटींमध्ये) |
|---|---|---|
| १ | २०१३-१४ | २१६५ |
| २ | २०१४-१५ | २१७५ |
| ३ | २०१५-१६ | २१९३ |

| | | |
|---|---|---|
| ४ | २०१६-१७ | २३१४ |
| ५ | २०१७-१८ | २२०५ |

महाराष्ट्रामध्ये एकूण ४.०१ लाख एवढे नोंदणीकृत व्यवसाय कर प्रदाते आहेत.

स्थानपरत्वे विचार करता, मुंबई शहर व्यवसाय करामध्ये रु. ९०० कोटी एवढे (जे एकूण व्यवसाय कराच्या सुमारे ४०% एवढे आहे.) योगदान देते. ठाणे, रायगड (मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण विभाग ) हे मुंबई भोवतालचे भाग व्यवसाय करामध्ये पुढील १०% योगदान देतात. तर पुणे आणि सभोवतालच्या भागांचे या करामध्ये अजून २०% योगदान आहे. म्हणजेच ७०% व्यवसाय कर मुंबई-पुणे पट्ट्यातून संकलित होतो.

वरील तक्त्यावरून हे दिसून येईल की, वर्षानुवर्षे व्यवसाय कर हा रु. २२०० कोटींच्या आसपासच स्थिर राहीला आहे आणि त्यात वृद्धी होत नाही. यासाठी काही कारणे आहेत. यांपैकी पहिले कारण म्हणजे, प्रतिव्यक्ती व्यवसाय करामध्ये वाढ होण्यास कोणताही मार्ग नाही कारण राज्यघटनेने स्वतःच यासाठी रू. २५०० ची मर्यादा घालून ठेवली आहे. दुसरे कारण म्हणजे, संघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना (सरकारी किंवा खाजगी क्षेत्रातील) फार आधीच व्यवसाय करांतर्गत घेण्यात आले आहे. भविष्यामध्ये व्यवसाय कर वाढवण्याची खरी शक्यता म्हणजे रस्त्याच्या कडेचे व्यावसायिक, फिरस्ते व्यापारी आणि तालुक्याच्या शहरांमध्ये राहणारे लोक आणि त्याखालचे परिणामकारकपणे व्यवसाय कराच्या कक्षेमध्ये न येणारे लोक यांच्या पर्यंत पोहोचून व्यवसाय कराची पातळी विस्तारणे होय. तिसरे कारण म्हणजे, विक्री कर (आत्ताचा जीएसटी) विभागाची कार्यालये फक्त जिल्ह्याच्या पातळीपर्यंतच आहेत. या पातळीखाली त्यांची यंत्रणा कार्यान्वित नाही. याशिवाय त्यांचे मुख्य लक्ष जीएसटी सारख्या मोठ्या करावर असते. हा कर त्यांना प्रतिवर्ष ९०,००० कोटी रु. आणून देतो. व्यवसाय कर हे नैमित्तिक काम आहे. अशा प्रकारे व्यवसाय कराच्या विस्तारासाठी विक्रीकरामध्ये संघटनात्मक मर्यादा आहे.

**८.४०.१.३ व्यवसाय करावरील तज्ज्ञांचा दृष्टिकोन आणि राष्ट्रीय कल :**

केंद्रीय वित्त आयोगासह सरकारने नियुक्त केलेल्या सर्व तज्ज्ञ समित्या आणि त्याच बरोबर अन्य अर्थतज्ज्ञांनी असे नमूद केले आहे की, व्यवसाय कर स्थानिक संस्थांकडे सोपवणे हेच उत्तम ठरेल. हे त्यांच्या कर आकारणीचे क्षेत्र आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्था त्यांच्या कामाच्या सखोल स्वरुपामुळे शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचू शकतात आणि लहान परंतु लक्षणीय कर वसुली करू शकतात.

खरतर केरळ, तमिळनाडू, गुजरात यांसारख्या राज्यांनी अगोदरच व्यवसाय कर आकारणी आणि वसुली स्थानिक संस्थांकडे सोपवली आहे.

### ८.४०.१.४ महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेची (रोहयो) बदललेली भूमिका

महाराष्ट्र रोजगार हमी कायद्यानुसार, रोजगार हमी योजनेसाठी संसाधने वाढवण्यासाठी महाराष्ट्रात खूप काळापूर्वी १९७५ मध्ये व्यवसाय कर लागू करण्यात आला. मात्र भारत सरकारचा, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००६ लागू झाल्यापासून रोजगार हमीसाठी थेट भारत सरकारकडून भरीव निधी मिळत आले आहेत. राज्याने अलिकडच्या वर्षांत राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील राज्याचा वाटा म्हणून प्रति वर्ष  ५०० कोटी रु. (सरासरी) खर्च केले आहेत. या राज्याच्या वाट्यामध्ये कामगारांचे १०० दिवसांच्या पलिकडील वेतन, अतिरिक्त वेतन आणि कौशल्यपूर्ण घटकांच्या २५% चा समावेश होतो. या व्यतिरिक्त महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) समावेश न झालेल्या शेतकऱ्यांसाठी रोजगार हमी योजना विभागा द्वारे सरासरी सुमारे रु.५०० कोटी खर्च करण्यात आले. यालाच सर्वतोमुखी/लोकप्रियपणे राज्य रोजगार हमी योजना (रोहयो) असे म्हटले जाते. सन २०१८-१९ मध्ये राज्य रोजगार हमी योजनेवर (रोहयो) ८०० कोटी रुपये खर्च झाले पण या वर्षी खर्च अपवादात्मकरित्या खूप जास्त आहे. मात्र राज्य रोजगार हमी योजना (रोहयो) ही मूलतः एक अर्थसहाय्य योजना आहे.

अशा रीतीने आम्ही असे म्हणू शकतो की, राज्याचा हिस्सा एकत्र करून राज्य रोजगार हमी योजनेसाठी (रोहयो) आणि मनरेगासाठी स्वतःच्या स्रोतांमधून सुमारे १३०० कोटी रुपये खर्च करते. म्हणूनच व्यवसाय कराचे २२०० कोटी रुपये हे उत्पन्न आता, ज्यासाठी सर्वप्रथम व्यवसाय कर लावण्यात आला होता, त्या रोजगार हमीसाठी राज्याचा वाटा म्हणून आवश्यक असलेल्या १०००-१२०० कोटी रु.पेक्षा खूपच जास्त आहे.

### ८.४०.१.५ गुजरातच्या प्रकरणाचा अभ्यास जिथे व्यवसाय कर स्थानिक संस्थांकडे वळविण्यात आला आहे:

व्यवसाय कर स्थानिक संस्थांकडे हस्तातंरीत केल्यावर या कराचे उत्पन्न कसे वाढले, हे समजून घेण्यासाठी गुजरात हे एक अभ्यास प्रकरण आहे. महाराष्ट्राने व्यवसाय कर लागू केला त्याच्या जवळपासच्या काळातच त्यांनी गुजरात विक्री कर व्यावसायिक, व्यापारी, आजीविका आणि रोजगार कायदा, १९७६ लागू केला.

त्यानंतर सन २००८ मध्ये, गुजरातने जुना कायदा पूर्णपणे पुनर्रचित केला. या पुनर्रचनेनंतर गुजरात राज्य सरकारने केंद्र व राज्य सरकारी कर्मचारी, केंद्र व राज्य सरकारचे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, तसेच केंद्र आणि राज्य सरकारी अनुदानीत संस्था यांकडून व्यवसाय कर वसूल करणे सुरु ठेवले. मात्र अन्य सर्व श्रेणींसाठी म्हणजेच, सरकारी/सार्वजनिक क्षेत्रात नसलेले व्यावसायिक, व्यवसाय संस्था, उद्योजक, दुकान मालक, लहान व्यापारी आणि अन्यांसाठीचा व्यवयास कर हा पूर्णपणे नागरी आणि ग्रामीण स्थानिक संस्थांकडे हस्तांतरित करण्यात आला आहे.

परिणामी सन २००८ मध्ये घेतलेल्या या निर्णयामुळे गुजरातमधील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व्यवसाय कराने उसळी घेतली आहे. आमच्या दिनांक २० फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या वडोदरा येथील क्षेत्रभेटी दरम्यान, आम्ही वडोदरा महानगरपालिकेचे अधिकारी आणि गुजरात सेंट्रल डिस्ट्रीक्ट पालिका अधिकाऱ्यांशी दीर्घ चर्चा केली होती. **वडोदरा महानगरपालिकेत सहा वर्षांत व्यवसाय करामध्ये २७.१४ कोटींपासून १६६% एवढी वाढ कशी झाली** ते खालील तक्त्यामध्ये दाखवले आहे.

तक्ता १०४ : वडोदरा महानगरपालिकेने केलेली व्यवसाय कर वसुली :

(रुपये कोटींमध्ये)

| अनु.क्र. | वर्ष | एकूण व्यवसाय कर वसुली |
|---|---|---|
| १ | २०११-१२ | २७.१४ |
| २ | २०१२-१३ | ३०.६९ |
| ३ | २०१३-१४ | ३१.७८ |
| ४ | २०१४-१५ | ३५.३० |
| ५ | २०१५-१६ | ३८.०५ |
| ६ | २०१६-१७ | ४१.३८ |
| ७ | २०१७-१८ | ४५.२० |
| ८ | २०१८-१९ | ४०.८६<br>(जाने.२०१९ पर्यंत) |

**पेटलाड नगरपालिका, आणंद जिल्हा - आणखी एक अभ्यास प्रकरण**

पेटलाड ही आणंद जिल्ह्यातील ५५००० लोकसंख्या असलेली एक मध्यम आकाराची नगरपालिका आहे. सन २००८ मध्ये, राज्य सरकारद्वारे व्यवसाय कर नागरी स्वराज्य संस्थाकडे सोपविल्यानंतर नगरपालिकेकडून वसूल करण्यात आलेल्या व्यवसाय करामध्ये झालेली वाढ खालील तक्त्यात मांडली आहे.

तक्ता १०५ : पेटलाड नगरपालिकेने केलेली व्यवसाय कर वसुली (रुपये लाखांमध्ये)

| अनु.क्र. | वर्ष | एकूण व्यवसाय कर वसुली |
|---|---|---|
| १ | २००६-०७ | ०.९९ |
| २ | २००७-०८ | ७.१३ |
| ३ | २००८-०९ | १५.७४ |
| ४ | २००९-१० | १७.६३ |
| ५ | २०१०-११ | १८.२५ |
| ६ | २०११-१२ | १९.६७ |

| | | |
|---|---|---|
| ७ | २०१२-१३ | २२.१५ |
| ८ | २०१३-१४ | २३.०३ |
| ९ | २०१४-१५ | २३.४१ |
| १० | २०१५-१६ | २४.९० |
| ११ | २०१६-१७ | ३२.२९ |
| १२ | २०१७-१८ | ३३.०१ |
| १३ | २०१८-१९ | ३१.००<br>(जाने.२०१९ पर्यंत |

अशाप्रकारे, पेटलाडमध्ये व्यवसाय कराच्या वसुलीमध्ये भरीव वाढ झाली आणि स्थानिक संस्थेकडे सोपविण्यात आला तेव्हापासून व्यवसाय कराने ३१००% उसळी घेतली. हे दिसून येईल की, पहिल्या दोन वर्षांमध्ये करदात्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली, या आधी हे करदाते विक्री कर विभागाच्या कक्षेच्या बाहेर होते, **पण व्यवसाय कर नगरपालिकांकडे सोपवण्यात आल्याबरोबर नगरपालिका या कराचा पाया विस्तारू शकल्या.**

गुजरातच्या नगर विकास विभागाने उपलब्ध करून दिलेल्या माहितीनुसार, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकूण रू.४७५ कोटी वसूल केले, त्यांपैकी महानगरपालिकांनी ३५९ कोटी रू. (७६%) वसूल केले आणि नगरपरिषदांनी रू.११६ कोटी (एकूण वसुलीच्या २४%) वसूल केले. वडोदरा महानगरपालिका किंवा पेटलाड नगरपालिकेच्या प्रकरण अभ्यासामध्ये नमूद केल्यानुसार वर्षागणिक कराचा पाया विस्तारत आहे, हा महत्वाचा सकारात्मक निदर्शक आहे.

हे नमूद करणे विशेष महत्वाचे ठरेल की, नागरी स्थानिक संस्थांना अतिरिक्त कर्मचारी उपलब्ध करून देण्यात आले नव्हते. या कामासाठी त्या प्रभाग पातळीवरील कर्मचारी आणि कर निरिक्षक अशी विद्यमान यंत्रणा वापरत आहेत.

खालील तक्त्यामध्ये गुजरातमधील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतील अलिकडच्या वर्षांतील वसुलीची आकडेवारी दाखवली आहे :

तक्ता १०६ : गुजरातमधील व्यवसाय कर वसुली:

(रुपये लाखांमध्ये)

| अनु.क्र. | महानगरपालिकेचे नाव | व्यवसाय कराची एकूण मागणी | | |
|---|---|---|---|---|
| | | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ |
| १ | अहमदाबाद | १२७४२ | १४७४८ | १६३५९ |
| २ | गांधीनगर | ५३५ | ६०८ | ६६४ |
| ३ | वडोदरा | ० | ० | ४८०० |
| ४ | सुरत | १२७५० | १३००० | १३८०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | राजकोट | १४४९ | १७७० | १८६६ |
| ६ | भावनगर | ६०० | ७०० | ९०० |
| ७ | जुनागढ | २५४ | २८४ | ३३८ |
| ८ | जामनगर | १३४६ | १७४६ | १९९४ |
| **महानगरपालिकांची रक्कम** | | **२९६७६** | **३२८५६** | **३५९२०** |
| **नगर परिषदांची रक्कम** | | **९७२६** | **१०५९७** | **११६३४** |
| **एकूण व्यवसाय कर वसुली** | | **३९४०२** | **४३४५३** | **४७५५३** |
| नगरपरिषदांचे योगदान | | २५% | २४% | २४% |
| महानगरपालिकांचे योगदान | | ७५.३२ | ७५.६१ | ७६% |

(* स्रोत गुजरात: सरकार)

गुजरातमधील सरकारी कर्मचारी हे कोषागारामार्फत विक्रीकर विभागाला रक्कमेचा भरणा करत असल्यामुळे, आम्ही गुजरातच्या व्यवसाय कराची आकडेवारी खालीलप्रमाणे मांडू शकतो. (सन २०१६-१७ आणि सन २०१७-१८ ची सरासरी)

तक्ता क्र १०७ : गुजरातमधील वसुली यंत्रणांची व्यवसाय कर रक्कमेची जमा

(रुपये कोटींमध्ये)

| अनु.क्र. | वसुली करणारी यंत्रणा | वसुली रक्कम (रुपये कोटींमध्ये) | लोकांची वर्गवारी | रक्कम कोण राखून ठेवते |
|---|---|---|---|---|
| १ | विक्री कर विभाग | २५० | फक्त सरकारी आणि सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचारी | राज्य सरकार |
| २ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | ४७५ | सरकारी कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त अन्य कर्मचारी | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था |
| ३ | ग्रामपंचायती | ८० | | ग्रामपंचायती |
| | **एकूण** | **८०५** | | |

(* स्रोत गुजरात: सरकार)

**८.४०.२ महाराष्ट्राच्या व्यवसाय कराबाबत राज्य वित्त आयोगाने केलेली शिफारस:**

**राज्य वित्त आयोग अशी ठाम शिफारस करतो की, व्यवसाय कर सरकारकडून (म्हणजेच विक्रीकर विभागाकडून) स्थानिक संस्थांकडे वळवणे अत्यावश्यक आहे, म्हणजेच हा कर स्थानिक संस्थांनी वसूल करून त्यांच्याकडेच ठेवावा.** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वित्ताचा अभ्यास केलेल्या विविध तज्ज्ञ समित्यांच्या (वारंवार) शिफारशींना अनुसरूनच ही शिफारस असेल. ही शिफारस विविध केंद्रीय वित्त आयोगांच्या शिफारशींसी देखील संलग्न आहे. अलिकडेच, भारत सरकारने प्रसारित केलेला, नवीन

नागरी योजना आराखडा अहवाल (फेब्रुवारी, २०१९) देखील अशी शिफारस करतो की, व्यवसाय कर हा नागरी स्थानिक संस्थाद्वारे वसूल केला जावा. जगभरात, व्यवसाय कर हे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिक्षेत्र आहे.

वर दाखवलेल्या गुजरात प्रकरणाच्या अभ्यासानुसार, व्यवसाय कर हा असा कर आहे की, जो नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाद्वारेच उत्तमरित्या वसूल केला जातो, कारण या संस्था समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचू शकतात. विक्री कर विभागा सारख्या राज्य सरकारी यंत्रणांची तेवढी पोहोच नाही आणि त्याचबरोबर या यंत्रणांकडे जिल्हा पातळीच्या खाली कर्मचारी देखील नाहीत.

राज्य वित्त आयोग शिफारस करतो की, महाराष्ट्रामध्ये सुरुवातीला हे गुजरातच्या नमुन्यानुसार राबवता येईल. **या शिफारसीत व्यवस्थेमध्ये, सरकारने सर्व सरकारी, निम सरकारी, सार्वजनिक क्षेत्रातील व्यवसाय करदाते स्वतःशीच टिकवून ठेवावेत आणि फक्त अन्य वर्गवारींचे खासगी क्षेत्रातील व्यवसाय करदाते स्थानिक संस्थांकडे वळवावेत.** अशाप्रकारे नागरी स्थानिक स्वराज्य संस्था कालांतराने करदात्यांची संख्या विस्तृत करून आपले उत्पन्न वाढवतील, जसे की गुजरातच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये घडून आले आहे.

आम्ही येथे पुन्हा अशी शिफारस करतो की, शासन या सुधारणा तीन टप्प्यांमध्ये आमलात आणू शकते.

**टप्पा I :-** यामध्ये ड वर्ग महानगरपालिका,सर्व नगरपरिषदा आणि नगर पंचायतींकडे व्यवसाय कर वळवता येईल. टप्पा II मध्ये हा दोन वर्षांनी सुरू होऊ शकेल आणि तो अन्य महानगरपालिकांमध्ये देखील विस्तारित करता येईल. अशाप्रकारे कर संक्रमण सुरळीत होईल आणि करामध्ये अचानक संक्रमण झाल्यामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान देखील होणार नाही, **कारण मोठ्या संख्येने असणारे शासकीय व्यवसाय करदाते शासनाकडेच टिकून राहतील.**

ड वर्ग महानगरपालिका आणि त्याखालील पातळ्यांवर व्यवसाय कराचे मूल्यांकन फारच कमी असल्यामुळे, या प्रस्तावाद्वारे राज्य सरकारला टप्पा I मध्ये फारच थोड्या रक्कमेचा तोटा होण्याची शक्यता आहे. मात्र नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी दुपट्ट किंवा तिपट्ट या प्रमाणात नवीन करदाते व्यवसाय कराच्या टप्प्यामध्ये आणल्याने या तोट्याची भरपाई होईल.

**टप्पा II :-** पहिल्या टप्प्याचा अनुभव पाहिल्यानंतर/ घेतल्यानंतर, बृहन मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून अन्य अ,ब आणि क वर्ग महानगरपालिकांमध्ये हा कर विस्तारित करता येईल.

**टप्पा III :-** पुढील समीक्षेनंतर, हा कर बृहन मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये विस्तारित करण्याचा विचार करता येईल.

**तक्ता १०८ : व्यवसाय करासाठीचे प्रस्तावित बदलाचा सारांश:**

| टप्पा | काय बदलेल | काय बदलणार नाही |
|---|---|---|
| टप्पा I | सर्व नगरपालिकांमधील आणि ड वर्ग महानगरपालिकांमधील बिगर सरकारी करदाते | सर्व उर्वरीत करदाते विक्रीकर विभागाकडे राहतील |
| टप्पा II | अ,ब,क वर्ग महानगरपालिकांमधील बिगर सरकारी करदाते | सर्व उर्वरीत करदाते विक्रीकर विभागाकडे राहतील |
| टप्पा III | बृहन्मुंबई महानगरपालिकेतील बिगर सरकारी करदाते | सरकारी, राज्य सरकारी कर्मचारी आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम |

अशाप्रकारे टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करणाच्या दृष्टीकोनाचे अनुसरण केल्यास, या बदलांपासून राज्यांना असणारी वित्तिय जोखिम कमीतकमी राहील, कारण आम्ही ड वर्ग महानगरपालिका आणि त्याखालील पातळीपासून या बदलांची सुरुवात करत आहोत आणि त्याचबरोबर सरकार अजुनही सरकारी ग्राहकांना स्वतःसोबत टिकवून ठेवत आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्था या व्यवसाय कराचे जाळे विस्तारून, या योजनेमध्ये नवीन व्यवसाय करदात्यांचा समावेश करून त्यांचे उत्पन्न वाढवतील.

यासाठी काहीसा वेगळा दृष्टिकोन मांडणारा असा दुसरा एक पर्याय देखील आहे. यामध्ये सरकार नागरी आणि ग्रामीण या दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांकडे व्यवसाय कर एकाच वेळा पूर्णपणे हस्तांतरित करेल. यामध्ये मूलतः व्यवसाय कर हा नागरी भागांतून वसूल केला जात असल्यामुळे, विक्रीकर विभागाकडून नागरी भागातून वसूल केली जाणारी रक्कम ही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना दिल्या जाणाऱ्या जकात कर/ जीएटी अनुदानातून वळती करण्यात येईल. अशाप्रकारे सुरुवातीस नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी अशा हस्तांतरणाने -ना नफा ना तोटा॰ अशी परिस्थिती झाली तरी, भविष्यात मात्र त्यांनी आपली व्याप्ती वाढवल्यामुळे जोडले गेलेले नवे करदाते हे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचे अतिरिक्त उत्पन्न राहील. नेमके याच पद्धतीने गुजरातमधील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपल्या उत्पन्नात वाढ केली आहे.

वर दिलेल्या दोन दृष्टिकोनांपैकी सुयोग्य किंवा व्यावहारिक वाटेल तो दृष्टिकोन सरकारने स्विकारावा. वरील पैकी दुसऱ्या दृष्टिकोनामध्ये अवस्थांतरणाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो कारण त्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षमता विकसित कराव्या लागतील अन्यथा या दृष्टिकोनामुळे सुरुवातीच्या काळात महसुली नुकसान होऊ शकते.

कोणत्याही दृष्टिकोनातून (टप्प्याटप्प्याने किंवा एकाचवेळी ) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे व्यवसाय कर हस्तांतरित करणे ही या राज्य वित्त आयोगाच्या महत्वाच्या शिफारशींमधील एक महत्त्वाची गंभीर शिफारस आहे.

**८.४०.३ महाराष्ट्र दुकाने आणि आस्थापना कायदा, २०१७ अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अंमलबजावणी यंत्रणा बनवणे**

आमच्या गुजरातच्या क्षेत्रभेटी दरम्यान असे दिसून आले की, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना दुकाने आणि आस्थापना कायद्यांतर्गत अंमलबजावणी आणि निरिक्षण यंत्रणा म्हणून घोषित करण्यात आले आहे. अशाप्रकारे यामुळे व्यवसाय करामध्ये वृद्धी होण्यासही मदत होते. नगरपालिका अधिकाऱ्यांना एकाच निरिक्षण भेटी दरम्यान दुकान कायदा आणि व्यवसाय कर वसुली या दोन्हीचे नियंत्रण करणे शक्य होते.

महाराष्ट्र दुकाने आणि आस्थापना कायदा, २०१७ च्या कलम २७ अंतर्गत अशी तरतूद आहे की, राज्य सरकार असे जाहिर करू शकते की "अधिसुचनेमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या दिनांकापासून कोणतीही स्थानिक संस्था या कायद्याच्या तरतूदींची अंमलबजावणी करण्याचे कर्तव्य बजावू शकते".

राज्य वित्त आयोग अशी शिफारस करतो की, दुकाने कायद्यांतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अंमलबजावणी यंत्रणा बनवून, या सक्षम करणाऱ्या तरतूदी कार्यान्वित करणे आवश्यक आहे. यामुळे फक्त दुकाने कायद्याचे अनुपालनच वाढेल असे नाही तर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या व्यवसाय कराचे जाळे देखील विस्तारीत करता येईल.

**८.४१ मालमत्ता कर वसुलीचे बळकटीकरण:**

**८.४१.१ मालमत्ता कर आकारणीचा सध्याचा पाया:**

मालमत्ता कर हा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत आहे, हे सर्वश्रुत आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे सर्व अभ्यास आणि राज्य वित्त आयोग (उदाहरणार्थ पाहा, तिसऱ्या राज्य वित्त आयोगातील या बाबतची परिपूर्ण मांडणी) आणि केंद्रीय वित्त आयोगाने यांमध्ये मालमत्ता कर महसूल आवर्धित करण्यासाठीच्या सूचनांचा पुनरुच्चार पुन्हा पुन्हा केलेला आहे.

करयोग्य मूल्यानुसार किंवा भांडवली मूल्यानुसार मालमत्ता कर वसूल केला जाऊ शकतो. या दोन पद्धतींपैकी कोणतीही एक पद्धत निवडण्याचा सुयोग्य पर्याय पालिका कायद्याच्या कलम १०५ मध्ये २०१० साली नमूद करण्यात आला आहे. स्थानिक पातळीवर, बऱ्याचशा नगरपरिषदा अजूनही करयोग्य मूल्य पद्धतीचा अवलंब करत आहेत. काही नगरपरिषदा भांडवली मूल्य पद्धतीकडे वळल्या आहेत. (बदलापूर आणि जळगावमधील सावडा). महानगरपालिकांमध्ये, मुंबई महानगरपालिकेसह बऱ्याचशा महानगरपालिका मालमत्ता कर वसुलीच्या भांडवली मूल्य पद्धतीकडे वळल्या असून त्यामुळे त्यांना आपल्या संसाधनांचे आवर्धन करण्यास मदत झाली आहे.

**८.४१.२ मालमत्ता ओळखण्यासाठी जीआयएस पद्धत :**

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मालमत्ता कर वसुलीची कार्यक्षमता कमी आहे, असे सर्व अभ्यासांनी दर्शवले आहे. अनेक नगर परिषदांनी कित्येक वर्षांपासून त्यांची मालमत्ता कर नोंदवही सुधारित आणि अद्ययावत केलेली नाही. त्यामुळेच तेथे अनेक मालमत्ता निर्धारण न झालेल्या किंवा अपुऱ्या निर्धारित झालेल्या आहेत. राज्य शासनाने आता राज्यभरातील नगरपरिषदांना मालमत्तांचे सर्वेक्षण करण्यासाठी उपग्रहावर आधारित जीआयएस सर्वेक्षण पद्धती उपलब्ध करून दिली आहे.

आत्तापर्यंत १५० जीआयएस सर्वेक्षणे पूर्ण झाली आहेत आणि मूल्यमापन यंत्रणेद्वारे ४० अहवाल सादर करण्यात आले आहेत.

**८.४१.३ : मालमत्ता करासाठी राज्य वित्त आयोगाच्या शिफारशी :**

**(अ) अगोदरच सुरू झालेल्या जीआयएस सर्वेक्षणाच्या कामाचे एकत्रिकरण करणे आणि नव्याने स्थापन झालेल्या नगर पंचायतींना जीआयएस व्यवस्था पूर्णपणे स्थापित होईपर्यंत संक्रमण मार्गदर्शक सूचना उपलब्ध करून देण्याची गरज:**

नगर विकास विभागाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मालमत्ता योग्यप्रकारे ओळखण्यासाठी आणि त्यांना करकक्षेमध्ये आणण्यासाठी जीआयएस सर्वेक्षणाला सुरुवात केली, ही स्वागतार्ह बाब असून या कामाचे एकत्रिकरण करणे आणि त्याला वेग देणे गरजेचे आहे. जीआयएस हे अजूनही प्रगतीपथावरील काम असून, त्याचे परिणाम दिसायला काही काळ जावा लागेल. पण असे दिसून येते की, नव्याने स्थापन झालेल्या अनेक नगर पंचायतींनी, मालमत्ता मूल्यमापन जीआयएस पद्धतीद्वारे होणार आहे या कारणास्तव ग्रामपंचायतींमधून नागरी संस्थांमध्ये परावर्तीत झाल्यावरही मालमत्ता कर आकारलेला/ वसूल केलेला नाही. याचा त्यांच्या संसाधनांच्या स्थितीवर मोठा परिणाम झाला आहे. **परिपूर्ण जीआयएस व्यवस्था आकारास येईपर्यंत, नगर विकास विभागाने नगर परिषदांसाठी त्यांच्या मालमत्ता कर आकारणीबाबत संक्रमण मार्गदर्शक सूचना जारी केल्या पाहिजेत.**

**(ब) अधिकृत मूल्यांकन अधिकारी नेमण्याची गरज :**

पालिका कायद्याच्या कलम ११३ मध्ये नव्याने निर्माण केलेल्या नगर पंचायतींमधील मालमत्तांचे मूल्य ठरवण्यासाठी नगर रचना संवर्गातील अधिकृत मूल्यांकन अधिकारी नेमण्याची तरतूद आहे. तरीही आत्तापर्यंत असे दिसून आले आहे की, अधिकृत मूल्यांकन अधिकाऱ्यांची नेमणूक अद्याप व्हायची आहे. त्यांची नेमणूक होणे गरजेचे आहे.

**(क) एकक क्षेत्र पद्धतीचा समावेश करण्यासाठी कायद्यामधील तरतूदींमध्ये सुधारणा :**

सध्या मालमत्ता कर आकारणीसाठी पालिका कायदा करयोग्य मूल्य किंवा भांडवली मूल्य अशा दोन्ही पद्धती उपलब्ध करून देतो. करयोग्य मूल्य पद्धतीच्या मर्यादा सर्वश्रुत आहेत. ‘वार्षिक करयोग्य मूल्य॰ काय असावे हे मुख्याधिकाऱ्यांना ठरवावे लागते, त्यामुळे यामध्ये मोठ्या प्रमाणात स्वेच्छानिर्णय समाविष्ट आहे (कलम ११४). पालिका कायद्याच्या कलम ११४ (१) मध्ये

तरतूद असून देखील शासनाकडून अद्याप 'वाजवी अपेक्षित भाडेपट्टी' च्या कार्यन्वयाच्या पद्धतीबाबत विशिष्ट नियम किंवा मार्गदर्शक सूचना जारी केलेल्या नाहीत. अशाप्रकारे करयोग्य मूल्य पद्धतीमुळे भरमसाठ याचिकांना सामोरे जावे लागते.

करयोग्य मूल्याच्या ऐवजी भांडवली मूल्य हा एक पर्याय सुचवण्यात आला आहे आणि तो काही महानगरपालिका आणि नगरपरिषदांमध्ये यशस्वीपणे कार्यरत आहे. यामुळे मालमत्ता कराच्या दरात मोठा बदल (वाढ) झाला असला तरी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाजूने भांडवली मूल्य पद्धतीकडे वळण्याबाबत अनिच्छा दिसून येत आहे. सध्या बदलापूर आणि सावडा यांसारख्या फक्त काही मर्यादित नगरपरिषदाच भांडवली मूल्य पद्धतीकडे वळल्या आहेत. त्यांचे भांडवली मूल्य पद्धतीकडे वळणे आणि त्यांच्या वाढलेल्या उत्पन्नाच्या एका प्रकरण अभ्यासाचा तपशील आम्ही या अहवालात स्वतंत्रपणे दिला आहे.
आमच्या गुजरात भेटी दरम्यान, आम्हाला असे आढळून आले की, तेथील विविध पालिकांमध्ये 'एकक क्षेत्र पद्धत' यशस्वीरित्या कार्यरत आहे. या पद्धतीबाबतचा अभिप्राय म्हणजे याबाबत कमी याचिका आहेत आणि स्वेच्छा निर्णयाला मर्यादित वाव आहे.

हे देखील समजले की, दिल्ली, अहमदाबाद आणि अन्य मोठ्या शहरांमध्ये 'एकक क्षेत्र पद्धत' (युएएस) कार्यक्षमपणे कार्यान्वित आहे.
म्हणून नगरपालिका कायदा कलम १०५ आणि महानगरपालिका कायदा कलम १२९ मध्ये आवश्यक सुधारणा करून 'एकक क्षेत्र पद्धत'हा पर्याय समाविष्ट करणे आवश्यक आहे.

**(ड) एकक क्षेत्र किंवा भांडवली मूल्य पद्धतीकडे वळण्यासाठी आणि वसुली वाढविण्यासाठीही प्रोत्साहन :**

राज्य शासनाने अगोदरच (नगर विकास विभाग) 'मालमत्ता कर वसुलीमध्ये सुधारणा' या मुद्द्याचा मुख्याधिकाऱ्यांसाठीच्या मुख्य जबाबदारीच्या क्षेत्रामधील (केआरए) एक घटक म्हणून आणि त्यांच्या वार्षिक कामगिरी मूल्यमापन लिहिण्यासाठी समावेश केला आहे. (शासन निर्णय दि. ०८.०१.२०१९). मालमत्ता कराच्या वाढलेल्या वसुलीमुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्वतःच्या मुक्त उत्पन्नात वाढ होणार असली तरीही कदाचित मालमत्ता कर व्यवस्था सुधारण्यामध्ये प्रतिबंध करणारे स्थानिक घटक असू शकतात, जे मालमत्ता कर वसुली पद्धत बदलणे किंवा मालमत्तांचे वसुलीचे जाळे विस्तृत करणे या दोन्हींबाबत प्रतिबंधक ठरू शकतात.
म्हणूनच या क्षेत्रातील मुख्याधिकाऱ्यांच्या कामगिरीवर संनियंत्रण ठेवण्याव्यतिरिक्त संपूर्ण नागरी संस्थेला प्रोत्साहीत करणे आवश्यक आहे. अन्यथा आम्ही असे सुचवले आहे की, निश्चित कामगिरी मापदंडांवर आधारित १०% भांडवली अनुदाने देण्यात आलीच पाहिजेत. यांमध्ये भांडवल आधारित व्यवस्थेकडे वळणे हा एक मापदंड असणे अत्यावश्यक आहे.

**(इ) झोपडपट्ट्यांवरील मालमत्ता कराबाबत :**

झोपडपट्ट्यांवरील मालमत्ता कराशी संबंधीत समस्यांकडे लक्ष देण्याची गरज आहे. यासाठी झोपडपट्ट्यांचे तपशिलवार सर्वेक्षण आवश्यक आहे. झोपडपट्टीच्या कोणतीही कायदेशीर स्थिती विचारात न घेता, पालिका अधिकारिता क्षेत्रातील बांधकामाखालील कोणत्याही मालमत्तेवर मालमत्ता कर आकारणी करणे हे कायदेशीर आहे. अर्थात, हा कर आकारण्यासाठी आम्ही नेहमीच्या भांडवली मूल्य पद्धतीचा (औपचारिक मालमत्तेप्रमाणे) उपयोग करत नाही. मात्र पूर्वअट म्हणून दोन गोष्टी घडणे आवश्यक आहे. यातील पहिली अट म्हणजे काही मूलभूत सेवा अग्रक्रमाने ( कोणत्याही प्रकारे यांपैकी काही सेवा पुरवणे न्यायालयाने अनिवार्य केले आहे.) पुरवणे गरजेचे आहे, ज्यामुळे झोपडपट्टीवासियांमध्ये स्वीकार्यता प्राप्त होण्यासाठी मदत होईल आणि यामुळे ऑप्टीकल केबलप्रमाणे दुहेरी उद्दिष्ट साध्य होतील. दुसरी पूर्वअट म्हणजे, झोपडपट्टीमधून वसूल झालेल्या सर्व मालमत्ता कराचा विनियोग हा त्या झोपडपट्टीच्या परिघामध्येच झोपडपट्टी सुधारणेसाठीचा अतिरिक्त स्रोत म्हणून करण्यात यावा, याबद्दल सरकारने स्वबांधिलकीसह वचनबद्ध असणे आवश्यक आहे. झोपडपट्टीमधील मालमत्ता कर वसुलीसाठी सुयोग्य अशा स्वयंसेवी संस्थेचा वापर करता येऊ शकतो, ज्यामुळे अधिकाऱ्यांना खूप संख्येने देयके तयार करणे तसेच त्यांची वसुली करण्याचे कठीण काम करावे लागणार नाही.

**८.४२ अन्य कर आणि करेतर उत्पनाबाबत राज्य वित्त आयोगाचे निरिक्षण आणि शिफारस :**

**८.४२.१ उपनियम अद्ययावत करणे :**

महानगरपालिका कायदा आणि महाराष्ट्र नगर परिषदा कायद्यांखालील तरतूदींनुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेला विविध प्रकारचे उपयोगिता शुल्क, फी, दंड आकारण्याचा अधिकार आहे. यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांचे अंतर्गत उपनियम आखणे आणि त्यांना राज्य सरकारची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

राज्य सरकारने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सोयीसाठी ३८ नमुना उपनियम तयार केले आहेत. त्यांपैकी काही उपनियम हे वित्तिय संसाधनांच्या सुसज्जतेशी संबंधित आहेत. यामध्ये रस्ते आणि मोकळ्या जागा तात्पुरत्या स्वरूपात वापरणे/Occupation, फेरीवाल्यांचे शुल्क, पार्कींग शुल्क, कत्तलखान्यांचे दर, साठवण परवाना शुल्क आणि यांसारख्या संबंधित उपनियमांचा समावेश आहे. हे उपनियम खूप आधी म्हणजेच सन १९६० च्या दशकात तयार करण्यात आले आहेत. हे उपनियम वर नमूद केलेल्या बाबींची कमाल आणि किमान निर्धारण पातळी दर्शवतात.

असे निरिक्षणास आले आहे की, बऱ्याचशा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी हे जुने उपनियम स्विकारलेले नाहीत किंवा त्यांच्यामध्ये कायदेशिरदृष्ट्या टिकाव धरतील असे उपनियम तयार करण्याच्या क्षमता नाहीत, या कारणामुळे त्यांनी बऱ्याच क्षेत्रांबाबत विशेषतः जी संसाधने अद्ययावत होऊ शकतात त्यांच्याबाबत पुनर्रचित उपनियम तयार केलेले नाहीत. किचकट प्रक्रिया स्वीकारल्यामुळे खरतर हे क्षेत्र खूपच दुर्लक्षित राहिले आहे.

**८.४२.२ पालिका उपनियमांवर राज्य वित्त आयोगाची शिफारस :**

राज्य वित्त आयोग अशी ठामपणे शिफारस करतो की,सरकारने विशेष पावले उचलली पाहिजेत आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांचे उपनियम अद्ययावत करण्यासाठी मार्गदर्शन केले पाहिजे. नमुना उपनियमांचे (अद्ययावत) वितरण करून आणि किमान व कमाल शुल्क तसेच दंड सुचवूनही सरकार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना आधार देऊ शकते. आमच्या क्षेत्रभेटी दरम्यान शासकिय आणि अशासकीय अशा दोन्ही लोकांकडून सरकारच्या निर्देशाने दरांमध्ये वाढ व्हावी अशा विनंत्या एकमताने करण्यात आल्या. कोणतेही शुल्क वाढविण्यास स्थानिक पातळीवरून विरोध होतो, कारण शुल्क वाढविणे ही अप्रिय अशी उपाययोजना आहे. मात्र वरच्या पातळीवरून ही उपाययोजना केल्यास ते स्वीकार्य होते. अशाप्रकारे फी आकारणे, सेवा किंवा उपयोगिता शुल्क व दंड इ. शी संबंधित उपनियमांच्या संपूर्ण परिप्रेक्षामध्ये पुनर्रचना करून व अद्ययावत दरांबाबत नवीन मार्गदर्शक सूचना जारी करून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्न वाढविता येऊ शकते.

त्याचबरोबर शासनाने कायद्यांतर्गत निदेश देण्यासाठी स्वतःची ताकद वापरावी आणि विविध करांच्या आकारणीसाठी नवीन कमाल आणि किमान दर निश्चित करावेत.

गुजरात पालिका वित्त मंडळाद्वारे नगरपालिकांच्या विविध सेवांसाठी आकारणी करावयाचे कमाल आणि किमान दर वितरीत करून गुजरात राज्याने या क्षेत्रामध्ये परिणामकारक सुव्यवस्थापन केले आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून या दरांचे काटेकोरपणे पालन केले जात आहे.

### ८.४२.३ कर, शुल्क, उपकर अशा संज्ञा पुन्हा परिभाषित करणे

-लेखा, लेखा परिक्षण आणि वित्तिय माहिती॰ या प्रकरणामध्ये आम्ही या अगोदरच नमूद केले आहे की, महानगरपालिका आणि नगरपरिषदा कायदा या दोन्हीमध्ये संबंधित स्थानी फेरबदल करणे आवश्यक आहे. जेणेकरून कर, शुल्क, उपकर यांसारखे शब्द अगदी अचूक व नेमक्या अर्थाने वापरता येतील. कर म्हणजे एक सर्वसाधारण कर आकारणी जी वसूल केल्यानंतर नागरी स्थानिक स्वराज्य संस्था त्याचा वापर कोणत्याही उद्देशासाठी करू शकते. तर उपकर म्हणजे अशी कर आकारणी जी विशिष्ट उद्देशासाठी केली जाते आणि फक्त त्याच उद्देशासाठी वापरता येऊ शकते. फी किंवा उपयोगिता शुल्क हे उपयोगकर्त्यावर आकारले जाते. मात्र क्षेत्र पातळीवर कर हा शब्द नागरी संस्थांच्या कोणत्याही प्रकारच्या उत्पन्नासाठी मुक्तपणे आणि अदलाबदलीने वापरला जातो. महसूल/ कर आकारणीशी संबंधित शब्दांचा असा बंधनरहित वापर याचिकेला आमंत्रण देऊ शकतो आणि यामुळे संपूर्ण वसुली प्रक्रियेमध्ये पुष्कळदा अडथळा निर्माण होऊ शकतो. कायद्यामधील तरतूदींची आणि संबंधित नियमांची छाननी करण्यासाठी तसेच कायद्याच्या कलम २ मध्ये आणि असे शब्द वापरले गेले आहेत अशा अनेक स्थानी आवश्यक परिभाषित स्पष्टता आणण्यासाठी एका लहान समितीची आवश्यकता आहे.

### ८.४२.४ महाराष्ट्र महानगरपालिका कायद्याचे पालिका कर आकारणीवरील प्रकरण ११ (विशेषतः कलम १२७,१२८,१२९) आणि नगरपरिषद कायद्याचे प्रकरण ९ ( कलम १०५,१०६,१०७,१०८) यांचे प्रारूप नव्याने तयार करणे :

महानगरपालिका आणि नगरपरिषद कायद्याशी संबंधित वर नमूद केलेल्या दोन प्रकरणांवर ओझरती नजर टाकल्यास असे दिसून आले की, काळाच्या विविध टप्प्यांवर कायद्याच्या

तरतूदींमध्ये घातलेली भर व हटवलेल्या बाबींमुळे झालेला गोंधळ, विविध उपपरिच्छेदांचे केलेले समावेशन यांमुळे या प्रकरणांचे वाचन व त्यातून होणारा अर्थबोध क्लिष्ट झाला आहे. म्हणूनच हे आवश्यक आहे की, विधी व न्याय विभागाच्या मार्गदर्शनासह संपूर्ण विभाग वापरकर्त्यांना अधिकाधिक सोपे होईल अशा पद्धतीने लिहिणे अपेक्षित आहे.

**८.४२.५ मालमत्ता कर मंडळाला सक्रीय करण्याची आणि त्याला नियामक मंडळामध्ये रूपांतरित करण्याची गरज :**

१३ व्या केंद्रीय वित्त आयोगाने असे सूचवले आहे की, मालमत्ता करांसाठी केंद्रीय मूल्यमापन मंडळ असावे आणि त्यासाठी उदाहरणादाखल पश्चिम बंगाल केंद्रीय मूल्यमापन मंडळाचे नाव उद्धृत केले आहे. या मंडळाने मालमत्ता मूल्यनिर्धारण आणि मूल्यांकन प्रमाणित करणे अपेक्षित आहे. (परिच्छेद १०.८१)

महाराष्ट्र सरकारने अगोदरच महाराष्ट्र पालिका मालमत्ता कर मंडळ कायदा, २०११ संमत केला आहे. या कायदयाने न्यायिक किंवा प्रशासनिक पार्श्वभूमी असलेल्या अध्यक्ष आणि त्यांच्याकडून अन्य सदस्यांचा समावेश असलेल्या स्वतंत्र मंडळाची तरतूद केली आहे. या मंडळाला महानगरपालिकांनी केलेल्या मूल्यनिर्धारणाचे लेखापरिक्षण करणे आणि सुधारणा सुचविण्याचे हक्क प्रदान करण्यात आले आहेत. हे मंडळ सरकारच्या विनंतीवरून मालमत्ता कर व्यवस्थेचे परिक्षण करू शकते आणि त्याचबरोबर मालमत्तेचे मूल्यनिर्धारण करण्यासाठी सुयोग्य पद्धत सुचवणे, मूल्यांकन प्रक्रियेचे निर्धारण करते वेळी गुणवत्ता व पारदर्शकतेची हमी देणारे पारदर्शक कार्यपद्धतीचे आरेखन आणि मांडणी करणे, त्याचबरोबर मूल्यनिर्धारणेचे प्रकटन सोयीचे करणे अशी कार्ये करू शकते. त्याचबरोबर हे मंडळ मालमत्ता कर मूल्यांकनाची कालबद्ध पुनर्रचना करण्यासाठी अन्वय रीतींची शिफारस करू शकते. हे मंडळ सरकारला मालमत्ता कराशी निगडीत बाबींसाठी सल्लागाराची भूमिका बजावेल.

हा कायदा संमत झाला असला तरीही, मालमत्ता कर मंडळ सक्रीय करण्यात आलेले नाही, म्हणजेच हा कायदा अद्याप कार्यान्वित झालेला नाही.

**८.४२.६ राज्य वित्त आयोगाचे निरिक्षण :**

क्षेत्र अधिकाऱ्यांशी झालेल्या आमच्या संवादामध्ये सर्व शासकीय अधिकाऱ्यांनी मालमत्ता कर मंडळ सक्रीय करण्याच्या गरजेवर भर दिला. सामान्य पातळीवर कर आकारणी हा नेहमीच एक अप्रिय उपाय आहे. अशासकीय लोकांचा कार्यकाळ मर्यादित असतो आणि कर आकारणीत वाढ करण्यासाठी किंवा कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त वापरकर्ता शुल्क, फी, उपकर इ. वाढवण्यास ते काहीसे नाखूश असतात. अशा प्रशुल्कांवर जर तटस्थ यंत्रणेने काम केले आणि शिफारस केली तर कदाचित अधिक विरोध किंवा आक्षेप असू शकत नाही.

**८.४२.७ राज्य वित्त आयोग शिफारस :**

राज्य वित्त आयोग ठामपणे शिफारस करतो की, महाराष्ट्र पालिका मालमत्ता कर मंडळ कायद्याच्या उद्देशाप्रमाणे मालमत्ता कर मंडळ सक्रीय करणे आवश्यक आहे. खरतर फक्त मालमत्ता करच नव्हे तर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे आकारले जाणारे सर्व प्रकारचे कर जसे की वापरकर्ता फी, उपकर,

दंड इ. यांची कालबद्ध पुनरावलोकन आणि पुनरिक्षण करण्यात यावे. गुजरात राज्यामध्ये, असे निरिक्षणास आले की, पालिका वित्त मंडळाने विविध वर्गवारीतील अशा आकारणी करावयाच्या विविध कराचे कमाल आणि किमान दर अधिसूचित केले आहेत. त्यामुळे पालिका संस्थांना हे कर कार्यान्वित करणे आणि स्थानिक नाराजीवर मात करणे सोपे होते.

म्हणून राज्य वित्त आयोग अशी शिफारस करते की, पालिका कर मंडळ कार्यान्वित करणे आवश्यक आहे आणि त्याचबरोबर एक स्वतंत्र नियामक यंत्रणा म्हणून पालिका कर मंडळाची व्याप्ती विस्तारणे,जी यंत्रणा केवळ मालमत्ता कराची किमान आणि कमाल श्रेणी निश्चित करणार नाही तर उपयोगकर्ता शुल्क, फी, दंड, उपकर आणि अशा अन्य करांची श्रेणी देखील निश्चित करेल.

महाराष्ट्र हा नेहमीच अनेक प्रशासकीय सुधारणांचा आद्यप्रवर्तक आणि अन्य राज्यांसाठी सुधारणांचा पायंडा घालून देणारा ठरला आहे. राज्य वित्त आयोग अशी जोरदारपणे शिफारस करतो की, महाराष्ट्राने एक असा प्रभावी नियामक म्हणून पुढे आलेच पाहिजे की, जो नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मालमत्ता कर आणि अन्य महसुली स्रोत न्याय आणि वस्तूनिष्ठ पद्धतीने निश्चित करण्यास मार्गदर्शन करेल. ही एकमेव शिफारस जर प्रभावीपणे अंमलात आली तर राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संसाधनांच्या स्थितीमध्ये लक्षणीय बदल होतील.

### ८.४३ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना राज्य शासनाच्या वतीने वसूल करावयाच्या शिक्षण आणि रोजगार हमी उपकराच्या सध्याचा सवलत दरात वाढ करणे :

राज्य सरकारने पन्नास वर्षाहून अधिक काळापूर्वी महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी उपकर कायदा, १९६२ हा कायदा लागू केलेला आहे. राज्याच्या शिक्षण आणि रोजगार हमीच्या उपक्रमांसाठी संसाधने सुसज्ज करणे हा या कायद्याच्या उद्देश आहे. राज्याने शिक्षण उपकर या श्रेणीखाली सन २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७ या वर्षांमध्ये प्रतिवर्षी सरासरी ७७५ कोटी रूपये वसूल केले आहेत. ही लहान रक्कम नगदी पिकांखाली असणारी कृषी जमीन आणि सिंचनाखालील जमीन यांच्यावर लावलेल्या उपकराद्वारे वसूल करण्यात आली आहे. मात्र मोठ्या प्रमाणात शिक्षण आणि रोजगार हमी उपकर हा राज्याच्या नागरी भागात वसूल करण्यात येणाऱ्या दोन प्रवाहातून प्राप्त होतो:

तक्ता १०९ : शिक्षण आणि रोजगार हमी योजना उपकर वसुली : (रुपये कोटींमध्ये)

| अ.क्र. | वर्गवारी/ वर्ष | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | तीन वर्षांची सरासरी |
|---|---|---|---|---|---|
| १ | नागरी क्षेत्रातील जमीन आणि इमारतींवर शिक्षण उपकर | ६६९ | ६३४ | ६०१ | ६३४ |
| २ | नागरी बिगर रहिवासी जागा आणि इमारतींवर रोजगार हमी उपकर | ११७ | १०२ | १०३ | १०७ |
| **एकूण** | | **७८६** | **७३६** | **७०४** | **७५१** |

पूर्वी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सरकारकडून २% वसुली शुल्क दिले जात असे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकडून अशा तक्रारी होत्या की, त्यांना त्यांच्या २% वसुली शुल्काची भरपाई वेळेवर मिळत नाही, त्यामुळे सरकारने (महसूल आणि वन विभाग) दिनांक २० जानेवारी, २००३ रोजी असा शासन निर्णय जारी केला की, नागरी स्थानिक स्वराज्य संस्था त्यांनी केलेल्या वसुलीच्या २ % रक्कम स्वतःकडे ठेवू शकतात आणि त्यांनी फक्त उर्वरित ९८% रक्कम शासनाच्या कोषागारामध्ये जमा करणे आवश्यक आहे. म्हणजेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्था त्यांच्या सेवा किंवा वसुली शुल्काची २% रक्कम वजा करू शकते आणि त्यानंतर ९८% शिल्लक रक्कम सरकारला जमा करू शकते. खरतर यामुळे नागरी स्वराज्य संस्थांसाठी गोष्टी सोप्या झाल्या आहेत. आता नागरी स्वराज्य संस्थांना त्यांचे सेवा शुल्क म्हणून एकत्रितपणे सुमारे १५ कोटी रुपये (त्यांनी राज्य सरकारच्यावतीने वसूल केलेल्या ७५१ कोटी रुपये रक्कमेच्या २%) मिळत आहेत.

मात्र, क्षेत्रभेटीं दरम्यान अनेक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी अशी विनंती केली की, त्यांच्या सेवा शुल्कात वाढ करून प्रोत्साहन वृद्धी करावी. आमचे परिस्थितीचे मूल्यमापन देखील असे दर्शवते की, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना जर त्यांच्या कामासाठी अधिक सेवा शुल्क / सूट दिले गेले तर ते त्यांच्यासाठी अधिक प्रोत्साहनात्मक ठरेल. यामुळे वसुलीच्या रक्कमेत आणि सरकारच्या एकंदरीत फायद्यात होणारी वाढ ही खाली प्रस्तावित केलेल्या अतिरिक्त सवलतीपेक्षा अधिक असणे संभाव्य आहे.

तसेच एकूणच वसूलीचे प्रमाण कमी असलेल्या क वर्ग नगरपालिका आणि नगरपंचायतींसाठी २% ची रक्कम फारच कमी आहे आणि त्यांनी केलेल्या अधिक परिश्रमांच्या प्रमाणाशी ते अनुरूप नाहीत.

### ८.४३.१ राज्य वित्त आयोगाच्या शिफारशी :

(अ) सवलत वाढवल्यास नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना उपकर चांगल्याप्रकारे वसूल करण्यास प्रोत्साहन मिळेल आणि राज्य सरकारला फायदा होईल.

राज्य वित्त आयोग खाली नमूद केल्याप्रमाणे वटाव दर वाढविण्याची शिफारस करत आहे.

तक्ता ११० : शिफारस केलेले वटाव दर :

| **अनु.क्र.** | **नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची वर्गवारी** | **सद्य उपलब्ध वटाव टक्केवारी** | **प्रस्तावित वटाव दर** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| १ | नगर पंचायती आणि क वर्ग नगरपालिका | २% | १०% | यामुळे वसुलीला प्रोत्साहन मिळेल आणि वसुलीच्या प्रशासकीय किंमतीत कपात होईल. |
| २ | ड वर्ग महानगरपालिका, अ आणि ब वर्ग नगर पालिका | २% | ५% | वरील प्रमाणे |

### ८.४४ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे महसुली खर्च भागविण्यासाठी सरकारकडून अतिरिक्त वित्तिय पाठबळ :

### ८.४४.१ सर्व नगर परिषद प्रशासन संचालनालय श्रेणींचे वेतन पूर्णपणे सरकारकडून भागवले जावे :

नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या मनुष्यबळाला बळकटी देण्यासाठी शासनाने महाराष्ट्र नगरपालिका राज्य श्रेणी निर्माण केली आहे. याला सर्वतोमुखी -नगर परिषद प्रशासन संचालनालय श्रेणी◦ म्हणून ओळखले जाते. यामध्ये पालिका अभियंता संवर्ग (काही वर्गवारी), पालिका लेखा संवर्ग, पालिका कर आणि प्रशासन संवर्ग, नगर रचना संवर्ग आणि अग्निशमन संवर्ग यांचा समावेश होतो. एकूण ५५४५ पदे मंजूर करण्यात आली आहेत आणि ३५०० पदे भरण्यात आली आहेत. उर्वरित पदे भरण्याची प्रक्रिया सुरू आहे.

क्षेत्रभेटी दरम्यान आम्हाला असे आढळून आले की, या संवर्गाच्या निर्मितीचे स्वागत झाले असले तरी या श्रेणींच्या विशेषतः लहान नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमधील प्रतिनिधीत्वामध्ये पुनरावृत्ती आढळते कारण त्यांच्या  पालिकांमध्ये त्यांच्या वेतनाचा खर्च भागविण्याची क्षमता नाही. प्रत्यक्षामध्ये रोकड प्रवाहाच्या समस्येमुळे, त्यांचे वेतन विलंबाने मिळत होते.

### ८.४४.२ राज्य वित्त आयोगाची शिफारस :

राज्य वित्त आयोग ठामपणे शिफारस करतो की, राज्य पातळी पालिका श्रेणीच्या ५५४५ पदांचे वेतन राज्याच्या अर्थसंकल्पातून करणे आवश्यक आहे आणि नगर परिषदांना हा वेतन खर्च भागविण्यासाठी विचारणा केली जाऊ नये. राज्य वित्त आयोग असे नमूद करतो की, नगर परिषद प्रशासन संचालनालय श्रेणीतील कर्मचारी हे मूलतः शासकीय कर्मचारीच आहेत,ज्यांची नेमणूक नगर परिषदांवर तांत्रिक तज्ञ म्हणून केली आहे. नगर परिषदांच्या क्षमता भिन्न असल्यामुळे हे शक्य आहे की, एका परिषदेत काम करणाऱ्या राज्य पातळी श्रेणी कर्मचाऱ्याला त्याचे वेतन योग्य रितीने मिळत आहे, तर त्याचवेळी शेजारील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेत काम करणाऱ्या त्याच्या सहकाऱ्याला,कोणतीही चूक नसताना त्या संस्थेच्या वाईट आर्थिक स्थितीमुळे किंवा अन्य कारणामुळे वेळेवर वेतन मिळत नाही. त्यामुळे त्याला आणि परिणामतः संपूर्ण संवर्गाला नैराश्य येईल. त्यामुळे अशी शिफारस आहे की, त्यांच्या वेतनाचा भार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांवर असू नये.

राज्य वित्त आयोग अशी देखील शिफारस करतो की, सर्व वर्गवारीच्या नगरपरिषदांमधील मुख्याधिकाऱ्यांचे वेतन (अ, ब व क या सर्वांचे आणि आत्ताप्रमाणे फक्त क वर्गाचे नव्हे ) राज्याच्या अर्थसंकल्पातून भागविणे आवश्यक आहे.

ही एकच सुधारणा ज्यामुळे ७०-१०० कोटी रुपयांचा बोजा होऊ शकतो, संवर्ग कर्मचाऱ्यांना उत्तम प्रकारे प्रोत्साहित करेल आणि त्याहून अधिक म्हणजे यामुळे पालिका प्रशासनामध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा होईल.

### ८.४५ नगर परिषदांच्या सहाय्यक अनुदानात सुधारणा करणे :

दिनांक ०१.०४.१९९९ पासून नगरपरिषदांसाठीचा जकात कर रद्द करण्यात आला आहे. या नुकसानाची भरपाई करण्यासाठी सरकारने जकातकर नुकसानभरपाई अनुदान जाहिर केले. एका टप्प्यावर नगर

परिषदांनी प्रातिनिधीकरित्या असे सांगितले की, सतत वाढणारा वेतनाचा भार भागवण्यासाठी, विशेषतः वाढत्या महागाई भत्त्यामुळे,जो वेळोवेळी देय होतो, तो भागवण्यासाठी जकात कर अनुदान पुरेसे ठरत नाही. पालिकांना हातभार लावण्यासाठी सरकारने 'महागाई भत्ता अनुदान' देणे देखील सुरू केले आहे.

सन २००९ मध्ये शासनाने (शासन निर्णय युडीडी/एमआयएससी /२००९/प्र.क्र. १०६/०९/न.वि.१४ दिनांक ३१ ऑगस्ट, २००९) जकात कर (नुकसान भरपाई) अनुदान आणि महागाई भत्ता अनुदान एकत्रित करण्याचा आणि त्याऐवजी सहायक अनुदान नावाने एकच अनुदान देण्याचा एक महत्त्वाचा निर्णय घेतला. हे अनुदान दर वर्षी १०% असे वाढवायचे होते. (दि. ३१.०८.२००९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ३)

शासना निर्णय असेही नमूद करतो की, सहायक अनुदानातून प्राधान्याने वेतन आणि निवृत्ती वेतन हे नगर परिषदांचे बांधिल खर्च भागवावेत. हे वेतन अनुदान नसले तरी त्यातून आस्थापना खर्च प्राधान्याने भागविला जावा असे सामान्यतः मानले जाते.

सन २००९-१० मध्ये ८२४ कोटी रुपयांचे नवीन एकत्रित अनुदान तयार करण्यात आले. दिनांक ३१.०८.२००९ च्या शासन निर्णायामध्येच प्रत्येक नगर परिषदेला वितरीत करायच्या रकमेचे तपशील देखील दिले आहेत.

सहायक अनुदानांतर्गत नगर परिषदा आणि नगर पंचायतींना प्रत्यक्षपणे देण्यात आलेले अनुदान खालील प्रमाणे आहे. **(संगणक संकेतांक २२१७८०६६)** :

तक्ता १११ : प्रत्यक्ष देण्यात आलेले साहायक अनुदान :

(रुपये कोटींमध्ये)

| अनु.क्र. | वर्ष | देण्यात आलेले सहायक अनुदान |
|---|---|---|
| १ | २०१६-१७ | १४९१ |
| २ | २०१७-१८ | १४९१ |
| ३ | २०१८-१९ | १६८४ |

तक्ता ११२ : सहायक अनुदानाचा वार्षिक सीएजीआर :

(रुपये कोटींमध्ये)

| अनु.क्र. | गणनेची पद्धत | २०१८-१९ | २००९-१० (मूळ वर्ष) | फरक | वार्षिक वृद्धी (सीएजीआर) |
|---|---|---|---|---|---|
| १ | मागणी केलेल्या रक्कमेवर आधारित | १८०० | ८२४ | ९७६ | ९.०७% |
| २ | देण्यात आलेल्या रक्कमेवर आधारित | १६८४ | ८२४ | ५८५ | ७.२१% |

### ८.४५.१ राज्य वित्त आयोगाची निरिक्षणे :

(अ) सहायक अनुदान हे थेट वेतन अनुदान आहे, असे औपचारिकपणे नमुद केलेले नसले तरी दिनांक ३१.०८.२००९ चा शासन निर्णय असे स्पष्टपणे नमूद करतो की, या अनुदानाचा सर्वप्रथम उपयोग पालिका कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यासाठी करण्यात यावा. त्यानंतर दुसरा प्राधान्यक्रम म्हणजे निवृत्ती वेतनावरील खर्च भागविणे. म्हणूनच नगरपरिषदा या निधीचा उपयोग प्रामुख्याने वेतन आणि निवृत्ती वेतन खर्चासाठी करतात.

(ब) वरील तक्त्यामध्ये दिसत असल्याप्रमाणे दृष्य वृद्धी १०% असली तरीही वास्तव वृद्धी ही फक्त ७.२१% एवढी आहे. क्षेत्र भेटींदरम्यान, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी अशी तक्रार केली आहे की, सहायक अनुदानाची वार्षिक वाढ ही वार्षिक वेतनवाढ दर आणि महागाई भत्ता वाढ (चलनवाढ) यांच्या बरोबरीने ठेवली जात नाही.

(क) **अधिक महत्वाचे म्हणजे, सन २००९-१० हे आधारभूत वर्ष ठेवून नगर परिषदांसाठी निश्चित करण्यात आलेली रक्कम सर्व नगरपरिषदांसाठी फायदेशीर ठरलेली नाही. जकात कर वसुली चांगली होते, अशा नगर परिषदांना (विशेषतः पश्चिम महाराष्ट्रातील) जास्त रक्कम मिळाली, पण बऱ्याच नगरपरिषदांना फायदा मिळाला नाही. आधारभूत वर्षापासून वार्षिक वाढ होत गेल्याने, वर्षानुवर्षे वाढत्या तफावतीमुळे अनेक नगरपरिषदांचे फक्त नुकसानच होत आहे.**

### ८.४५.२ राज्य वित्त आयोगाची शिफारस:

राज्य वित्त आयोग अशी ठामपणे शिफारस करतो की, संपूर्ण सहायक अनुदानाचा शासन निर्णय, २००९ हा नवीन सुत्रासह प्रतिस्थापित करण्यात यावा, मूलतः पूर्वीचे सूत्र जकात कर नुकसान भरपाईशी जोडले होते आणि ते त्या वेळी सुसंबद्ध होते. नगर परिषदांमधून जकात कर रद्द करून आता सुमारे २० वर्षे झाली आहेत.

सहायक अनुदान हे जरी वेतन अनुदान नसले तरीही, या निधीतून नगर परिषदांच्या आस्थापना अनुदानाचा खर्च भागवावा असे सर्वसाधारणपणे स्विकारण्यात आले आहे. सन २००९ च्या मूळ शासन निर्णयात नमूद करण्यात आल्या प्रमाणे देखील हा निधी सर्वप्रथम आस्थापना खर्च भागविण्यासाठी वापरणे आवश्यक आहे.

आता, राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांना ७ व्या वित्त आयोगाच्या संदर्भात वेतनश्रेणी अगोदरच देण्यात आली असल्याने नजिकच्या कालावधीत नगर परिषदांच्या कर्मचाऱ्यांना देखील ही वेतनश्रेणी प्रत्यक्षात लागू होईल.

म्हणूनच आम्ही खालीलप्रमाणे सुधारीत सूत्र देत आहोत:

- नगर परिषदांचे वेतन आणि निवृत्तीवेतन विषयक बांधिल खर्च ७ व्या वित्त आयोगाच्या धर्तीवरच परिगणित करावेत. हे अर्थातच फक्त मान्यताप्राप्त कर्मचारी आकृतीबंधानुसारच असणे आवश्यक आहे. (अ)

- त्याच बरोबर आम्ही अशी शिफारस केली की, विशिष्ट नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये विशिष्ट अनुदानांची भर घालावी जी करमणूक कर, जमीन महसूल आणि गौण खनिजांचे स्वामित्वधन शुल्क यांचा वाटा म्हणून देण्यात यावी. (फक्त क वर्ग पालिकांसाठी). आधीच्या वर्षांच्या रक्कमेवर आधारीत ही रक्कम प्रतिवर्ष सुमारे ४० कोटी रुपये एवढी आहे. (ब)
- वरील अ आणि ब ची बेरीज हाच पुनर्रचित सहायक अनुदानाचा पाया असणे आवश्यक आहे.
- यावर मसुदा पातळीवर काम करताना, कोणत्या परिषदेला तीव्र तफावत किंवा नुकसान सहन करावे लागत आहे का, हे पाहणे आवश्यक आहे आणि अशा परिस्थितीत सुयोग्य समायोजन करावे.
- रक्कमेपेकी ८०% रक्कम निश्चित घटक म्हणून वितरीत करण्यात आलीच पाहिजे.
- शिल्लक २०% रक्कम तुलनायोग्य कामगिरी दर्शकावर जसे की 'स्वत:चे दरडोई स्व उत्पन्न' वर देणे आवश्यक आहे. प्रत्येक श्रेणीच्या नगरपालिकेसाठी 'दरडोई स्व उत्पन्न' मापदंड काढावा आणि या मापदंडाच्या आधारे नगर परिषदांच्या स्थितीवर आधारित शिल्लक रक्कम देऊ करता येऊ शकेल. मराठवाडा आणि विदर्भ विभागातील नगर परिषदांना दोन ते तीन वर्षांची सवलत देऊन, हा मापदंड किंचित लवचिकही ठेवता येऊ शकेल, ज्यामुळे येथील नगर परिषदाना स्वतःमध्ये सुधारणा करण्यासाठी वेळ देता येईल.
- सहायक अनुदान हा नगर परिषदांच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत आहे आणि त्याचबरोबर हे अनुदान त्यांच्या महसुली उत्पन्नाचा ४५- ५०% भाग आहे, त्यामुळे सरकारने यामध्ये कोणतीही अर्थसंकल्पीय कपात करू नये आणि पुनर्रचित सूत्रानुसार दरवर्षी हे पूर्ण अनुदान नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात यावे. हे अनुदान वितरीत करण्यामध्ये झालेल्या कोणत्याही कमतरतेमुळे नगर परिषदांच्या,विशेषतः लहान नगर परिषदांच्या दैनंदिन कामकाजावर अतिशय गंभीर परिणाम होतो.
- वाढलेला आस्थापना खर्च आणि भविष्यातील अन्य खर्च यांच्याशी ताळमेळ साधण्यासाठी दरवर्षी सुमारे ८ % वाढ करण्याची तरतूद असलीच पाहिजे.

**८.४६ शिक्षकांच्या वेतनामधील सरकारचा हिस्सा वाढवण्याची गरज :**

नागरी स्थानिक स्वराज्य संस्था प्राथमिक शाळा चालवतात. मात्र सरकार शिक्षकांच्या पूर्ण वेतनाची प्रतिपूर्ती करत नाही. ते खाली दिलेल्या सूत्रानुसार वेतन देते. उलटपक्षी जिल्हा परिषद शाळा किंवा अनुदानीत (खाजगी शाळा) शाळांना सरकार १००% वेतन प्रतिपूर्ती करते. कदाचित यामागे अशी कल्पना आहे की, नागरी संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत आणि शिक्षकांच्या वेतनाचा हिस्सा सहज निर्माण करू शकतात.

अन्यत्र नमूद करण्यात आल्याप्रमाणे, ड वर्ग महानगरपालिका आणि नगरपालिका हा भार सहन करण्यास सक्षम नाहीत. विशेषतः ड वर्ग महानगरपालिकांना, शिक्षकांच्या वेतनांच्या आणि अन्य बांधिल

खर्चाच्या ५०% रक्कमेची जुळवाजुळव करावी लागते.बऱ्याचशा ड वर्ग स्थानिक संस्था या खरतर मोठ्या पालिका आहेत. याची प्रतिष्ठित उदाहरणे म्हणजे, परभणी, लातूर, अकोला आणि अशी इतर शहरे.

आमच्या क्षेत्रभेटी दरम्यान, ड वर्ग महानगरपालिकांनी या मुद्द्यावर आपली बाजू अतिशय ठामपणे मांडली होती. त्यांनी या मुद्द्याकडे लक्ष वेधले की, शहराची लोकसंख्या वाढल्यामुळे महानगरपालिकेचा दर्जा मिळालेल्या या शहरांना प्रथम पुढे येऊन नवीन झोपडपट्ट्यांसाठी आणि स्थलांतरीत लोकसंख्या वसाहतींसाठी शाळा सुरु करून चालविणे आवश्यक आहे.

### ८.४६.१ राज्य वित्त आयोगाची शिफारस :

राज्य वित्त आयोग शिक्षकांच्या वेतनामधील राज्य सरकारच्या प्रतिपूर्तीचा दर वाढवण्याची ठामपणे शिफारस करतो. यामुळे ड वर्ग नगर महानगरपालिका आणि त्या खालील पातळीवरील आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी होईल.

तक्ता: ११३: शिक्षकांच्या वेतनाच्या प्रतिपूर्तीची शिफारस केलेली टक्केवारी

| अनु क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची वर्गवारी | सरकारद्वारे शिक्षकांच्या वेतनामध्ये होत असलेल्या सध्याच्या प्रतिपूर्तीची टक्केवारी | शिफारस केलेली टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ड वर्ग महानगरपालिका | ५०% | ७५% |
| २ | अ वर्ग नगर परिषदा | ८०% | ९०% |
| ३ | ब वर्ग नगर परिषदा | ९०% | १००% |
| ४ | क वर्ग नगर परिषदा | १००% | बदल नाही |
| ५ | नगर पंचायती | १००% | बदल नाही |

### ८.४७ शासनाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नळ पाणी पुरवठा योजनांमधील उर्जा पंपाचा खर्च भागविणे:

नागरीकांना घरगुती पाणी पुरवठा करणे हे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची एक महत्वाची जबाबदारी आहे. महाराष्ट्रामध्ये नागरी क्षेत्रातील बऱ्याचशा पाणी पुरवठा योजना पालिका संस्थांच्या स्वतःच्या मालकीच्या असून त्यांचे व्यवस्थापनदेखील पालिका संस्थांद्वारे केले जाते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण २७ योजना चालवते, बहुधा पाणी पुरवठा योजनांमध्ये नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि नजिकची गावे या दोहोंचा अंतर्भाव आहे. पण आपण एकूणच आकडेवारी पाहिल्यास, नळाद्वारे पाणी पुरवठा

होणाऱ्या एकूण नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांपैकी अगदी थोड्या टक्के भागात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पाणी पुरवठा करते.

आमच्या क्षेत्रभेटी दरम्यान, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शासकीय आणि अशासकीय पदाधिका-यांकडून प्राप्त झालेल्या निवेदनांमध्ये, पेयजलाच्या योजनेसाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना भराव्या लागणाऱ्या मोठ्या रक्कमेच्या वीज देयाचा मुद्दा वारंवार उपस्थित करण्यात आला होता.

ता आम्ही तीन उत्कृष्ट उदाहरणे देऊन दूर अंतरावरच्या स्रोतामधून नळाद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी नागरी संस्थांनी कशाप्रकारे प्रचंड आणि अवाजवी रक्कम भरली आहे, हे दर्शवित आहोत. खालील तक्ता ही परिस्थिती अतिशय स्पष्टपणे मांडतो.

तक्ता ११४ : नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी नळाद्वारे पाणी पुरवठ्याचा खर्च

| अनु.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव आणि वर्गवारी | पाण्याचा स्रोत आणि स्रोत - इएसआर (उन्नत पृष्ठभागीय जलाशय) अंतर | मासिक खर्च | वार्षिक खर्च | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | सोलापूर महानगरपालिका (ड वर्ग) | उजनी धरण - १०० किमी. वर | ४+ कोटी | ४८ + कोटी | सोलापूरची लोकसंख्या ५ लाखांच्यावर आहे त्यामुळे पाण्याचा वापर भरपूर आहे. अंतर आणि पाणी उपशाचे प्रमाण या दोन्ही कारणांमुळे जास्त बिल येते. |
| २ | जालना (अ वर्ग नगर परिषद) | जायकवाडी | ४५ ते ५० लाख | ६+ कोटी | पाणी जायकवाडीपासून अंबडपर्यंत पंपाने खेचले जाते, तेथे पाणी प्रक्रिया संयंत्र आहे. त्यानंतर हे पाणी पुन्हा पंपाद्वारे जालना येथे आणले जाते. पाणी पट्टीची वसुली २.७ कोटी रूपये एवढी आहे तर विजेचा खर्च ६ कोटी रुपये एवढा आहे आणि त्यांच्या नागरीकांकडून याहून अधिक वसुली करणेही शक्य नाही. म्हणून पाणी पुरवठा योजनेमध्ये होणाऱ्या खर्चाच्या तूटीसाठी सर्वसाधारण निधीमधून अनुदान दिले आहे. या नागरी स्वराज्य संस्थेचे स्वतःचे उत्पन्न १५ कोटी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | रुपये आहे तरी देखील पाण्याच्या पंपिंगसाठी खर्च होणारी प्रचंड रक्कम या एकमेव घटकामुळे नगरपालिकेची आर्थिक स्थिती पूर्णपणे त्रस्त झाली आहे. |
| ३ | मनमाड (ब वर्ग नगर परिषद) | पालखेड धरण - ९० किमी दूर आहे- सुमारे ६५ किमी अंतर पाणी कालव्यामधून येते आणि त्यानंतर २५ किमी अंतरावरील पाटोदामधून पाणी पंपाद्वारे उचलले जाते. | प्रति महिना २० लाख रू | प्रति वर्ष २.५ कोटी रुपये | नागरी प्रशासन नागरीकांकडून पंपाद्वारे पाणी पुरवठा योजनेच्या खर्चाचा फक्त काही भाग वसूल करू शकते. खर्च हा उत्पन्नाच्या २.५ पट आहे. त्यामुळेच ही नुकसान भरपाई नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्वसाधारण उत्पन्नातून भरून काढणे आवश्यक आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे एकंदरीत उत्पन्न सुमारे ९ कोटी रुपये एवढे आहे. |

वरील उदाहरणांवरून असे दिसून येईल की, नळाद्वारे पाणी पुरवठा योजनेच्या वीज बिलाच्या प्रचंड रकमेमुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची अर्थव्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. यासाठी त्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची भौगोलिक प्रतिकूलता कारणीभूत ठरते.

वाढत्या लोकसंख्येबरोबर प्रत्येक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या दूरच्या अंतरावरून पाणी वाहून आणण्याच्या खर्चात वाढ होत जाते.

### ८.४७.१ राज्य वित्त आयोगाची शिफारस :

राज्य वित्त आयोग अशी ठामपणे शिफारस करतो की, अशा भौगोलिकदृष्ट्या प्रतिकूल स्थिती असलेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक स्थिती परिरक्षित करण्यासाठी त्यांच्या वीज पंपांच्या रक्कमांची प्रतिपूर्ती झाली पाहिजे. इएसआर (उन्नत पृष्ठभागीय जलाशय) निश्चित करण्यासाठी पंपिंग केलेल्या पाण्याचे स्त्रोतापासून अंतर आणि उंची हे संलग्न केले पाहिजे. म्हणूनच आम्ही, वितरणामधील अकार्यक्षमतेला अनुदान किंवा पाठबळाची शिफारस करत नाही, कारण अकार्य्क्षमता ही बाब पाणी इएसआर कडे पंप केल्यानंतर घडते. म्हणूनच आमचे प्रस्तावित अनुदान हे पंपाने पाणी खेचण्याच्या रक्कमेशी थेट संलग्न आहे.

राज्य वित्त आयोगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना पाठबळ देऊ शकेल असे एक योग्य सूत्र तयार करण्याची विनंती केली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने काळजीपूर्वक अभ्यास केल्यावर, दरडोई १०० लिटर पाणी वापर आणि वीजेचा दर ९ रुपये प्रति युनिट असे गृहीत

धरून सूत्र तयार केले आहे. या आधारावर, त्यांना शासनाकडून खालीलप्रमाणे पाठबळाची शिफारस केली आहे:

तक्ता ११५ : पंपाने पाणी खेचण्यासाठी ऊर्जेचा वापर

| बँड | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे विशिष्ट ऊर्जा वापर किलो वॅट/ मिली मध्ये | शिफारस केलेल्या अनुदानाची टक्केवारी | एका शहरासाठी एका वर्षासाठी दरडोई निर्देशक अनुदान (रुपयांमध्ये) |
|---|---|---|---|
| १ | २०० पर्यंत | काही नाही | काही नाही |
| २ | २०१- २५० | २०% | १९.५ |
| ३ | २५१-३०० | ३३% | ३८ |
| ४ | ३०१-३५० | ४३% | ५८ |
| ५ | ३५१-४०० | ५०% | ७७.५ |
| ६ | ४०१-४५० | ५६% | ९६.८ |
| ७ | ४५० आणि त्यावरील | ६०% | ११६.१ |

राज्य वित्त आयोग या धर्तीवर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना पाठबळ द्यावे, अशी ठामपणे शिफारस करतो. या शिफारस केलेल्या अनुदानास पात्र होण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून विशिष्ट ऊर्जा वापर प्रमाणपत्र मिळवणे आवश्यक आहे. केवळ जलस्रोत दूर अंतरावर असल्याच्या भौगोलिक प्रतिकूलतेमुळे येणाऱ्या प्रचंड रक्कमेच्या वीज बिलामुळे अनेक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थिती विस्कळीत झाली आहे आणि कोलमडली आहे. या अनुदानामुळे ही अंगभूत प्रतिकूलता अंशतः भरून निघेल. आमची शिफारस ही विशिष्ट आणि लक्षित आहे आणि आमची अशी अपेक्षा आहे की, या एकमात्र पाठबळातून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक स्थिती मोठ्या प्रमाणात सुधारणा होईल. आम्ही फक्त ड वर्ग महानगरपालिका आणि सर्व वर्गवारीतील नगर परिषदा आणि नगर पंचायतींसाठी या अनुदानाची शिफारस करत आहोत.

### ८.४८ सरकारने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या देयकाचे निर्लेखन करणे :

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सुमारे २७ नळपाणी योजना चालवते. पाइपद्वारे (नळ) पाणी योजना चालवण्याचा खर्च आदर्शदृष्ट्या वापरकर्त्यांकडूनच वसूल झाला पाहिजे, वापरकर्ते म्हणजेच या प्रकरणामध्ये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकडूनच हा खर्च वसूल झाला पाहिजे. मात्र नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे देय बाकी असणे हे नेहमीचेच आव्हान झाले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने असे कळवले केले आहे की, महानगर पालिकांकडून रूपये ६३९.६० कोटी आणि नगर परिषदांकडून रूपये ४२७.४१ कोटी रक्कम पाणी पुरवठा योजना चालवणे

आणि देखभाल करणे यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला देय आहेत. यामध्ये विलंब देय शुल्काचाही समावेश आहे.

तर दुसऱ्या बाजूना, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी असे नमूद केले आहे की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पाणी पुरवठ्यासाठी आकारली जाणारी रक्कम ही खूपच जास्त आहे आणि ही रक्कम पूर्णपणे नागरीकांकडून वसूल करणे त्यांना शक्य नाही. त्यांना असे वाटते की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे पाईपद्वारे (नळ) पाणी योजनेचे कर्यान्वयेन आणि व्यवस्थापनाच्या कामासाठी त्यांच्यावर प्रचंड रक्कम लादत आहे.

पाणी हा एक संवेदनशील विषय आहे त्यामुळे, देय भरणा झाला नाही तरी देखील, पाणी पुरवठा खंडीत करणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला कठीण जाते. याची निव्वळ फलनिष्पत्ती म्हणजे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची थकबाकी वाढत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जुनी थकबाकी वसूल करू शकत नाही आणि जेव्हा ते दरवर्षी विलंब देय शुल्क आकारतात तेव्हा, ते भरणे नंतर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी कठीण होऊन बसते, अशी कोंडीची परिस्थिती निर्माण झाली आहे.

महाराष्ट्र वीज वितरण कंपनी (एमएसईडीसीएल) च्या संदर्भात विचार करता, या कंपनीला देय असलेली रक्कम प्रासंगिकतः केंद्रीय स्रोत असलेल्या वित्त आयोगामधून आणि अन्य सरकारी अनुदानांमधून वजा करण्यात आली आहे. अशाप्रकारे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून थकबाकी वसूल करण्याचे मोठे आव्हान असणाऱ्या अनेक राज्यांनी केंद्रातून संबंधित यंत्रणांकरिता परस्पर प्राप्त रक्कम वजा करण्याची पद्धत अवलंबिली आहे.

दूर अंतरावरून पाणी नळाद्वारे वाहून आणण्यासाठी येणाऱ्या प्रचंड वीज बिलासाठी सरकारने अनुदान देण्याच्या गरजेबाबत आम्ही आधीच्या परिच्छेदामध्ये (८.४७) अगोदरच शिफारस केली आहे.

**८.४८.१ राज्य वित्त आयोगाची शिफारस :**

परिस्थितीचा आढावा घेतल्यावर राज्य वित्त आयोग शिफारस करतो की, सरकारने दोन्ही बाजूंचे प्रश्न एकाचवेळी मार्गी लावून दोन्ही पक्षांसाठी विजयी स्थिती निर्माण करणारी एक-वेळ सशर्त निर्लेखन (तडजोड) योजना आमलात आणावी. या योजनेमध्ये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना भागीदारी सूत्राने प्रोत्साहन देऊन त्यांची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला द्यावयाची जुनी देयके निकालात काढली जातील. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वर्गवारीनुसार निर्लेखनाचे गुणोत्तर भिन्न असू शकते. आम्ही खालीलप्रमाणे शिफारस केली आहे:

तक्ता ११६ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासाठी शिफारस केलेले निर्लेखन :

| अनु. क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची वर्गवारी | शिफारस केलेले निर्लेखन | पूर्वअटी |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | महानगरपालिका गट ड | ५०% | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सर्वप्रथम ५०% भरावेत किंवा त्याऐवजी निर्लेखन भरलेल्या रक्कमेच्या समप्रमाणात राहील. |
| २ | नगरपालिका अ वर्ग | ७५% | वर नमूद केल्याप्रमाणे निर्लेखन भरलेल्या रक्कमेच्या तिप्पट राहील |
| ३ | नगरपालिका ब वर्ग | ८०% | हा फायदा मिळवण्यासाठी नगरपालिकांनी सर्वप्रथम २०% रक्कम भरावी लागेल. |
| ४ | नगरपालिका क वर्ग | ८०% | हा फायदा मिळवण्यासाठी नगरपालिकांनी सर्वप्रथम २०% रक्कम भरावी लागेल. |

सरकारने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला निर्लेखन रक्कमेची शासनाने सुयोग्यपणे प्रतिपूर्ती करणे आवश्यक आहे.

**८.४९ : लहान नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अत्यावश्यक भूसंपादनाची रक्कम भागविणे :**

आमच्या क्षेत्रभेटी दरम्यान आम्हाला असे आढळून आले की, नवीन नुकसान भरपाई सूत्र स्विकारण्यात आल्यामुळे गेल्या काही वर्षांत भूसंपादनाच्या रकमेत चक्रीय वाढ झाली आहे. परिणामी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे मुख्य पायाभूत प्रकल्प आणि आवश्यक उपक्रम ठप्प झाले आहेत. **असे दिसून आले की, पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध आहे, मात्र या प्रकल्पांसाठी पूर्व आवश्यकता असलेल्या भूसंपादन करण्यासाठी निधी उपलब्ध नाही.** अशाप्रकारे अनेक नागरी स्थानिक स्वराज्य संस्था नळाद्वारे पाणी पुरवठा (PSW) सारखे निर्णायक प्रकल्प हाती घेण्यास असमर्थ आहेत, कारण निर्णायक इएसआर साठी जमीन उपलब्ध नाही. (किंवा खूप महाग आहे.)

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विशेषतः लहान क वर्ग आणि नगरपंचायतींच्या जगण्याच्या गुणवत्तेवर याचा मोठ्या प्रमाणावर परिणाम झाला आहे. नव्याने निर्माण झालेल्या नगर पंचायतींसाठी ही बाब फारच स्पष्ट आणि गंभीर आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकाऱ्यांनी या बाबीकडे लक्ष वेधले की, शहर स्वच्छतेसारखी दैनंदिन कामे देखील, दररोजचा कचरा टाकण्यासाठी कचराभूमी उपलब्ध असेल तरच शक्य होतात. वेंगुर्ल्यासारखे शहर घन कचरा व्यवस्थापन यशस्वीपणे करू शकले कारण त्यांनी शहराच्या बाहेर शहरातील कचऱ्याचे वर्गीकरण आणि व्यवस्थापन करण्यासाठी स्वतःच्या मालकीची जागा विकत घेतली. पण जर जागाच नसेल तर काय? अशा अनेक लहान नागरी संस्था आहेत जेथे साधी कचराभूमी देखील उपलब्ध नाही आणि अशी जागा उपलब्ध असली तरी नागरी स्थानिक स्वराज्य संस्था अशी मालमत्ता घेण्याच्या परिस्थितीत नाही.

**८.४९.१ राज्य वित्त आयोगाची शिफारस :**

म्हणूनच राज्य वित्त आयोग अशी ठामपणे शिफारस करतो की, ब वर्ग,क वर्ग नगर परिषदा आणि नगर पंचायतींसाठी खाली नमूद केलेल्या आवश्यक सामाजिक पायाभूत सुविधा देण्यासाठी आवश्यक भूसंपादनाचा खर्च सरकारने भागवलाच पाहिजे:

- एका कचराभूमी/ कंपोस्ट खड्यासाठीसाठी जमिनीचा खर्च
- सांडपाणी प्रक्रिया केंद्रासाठी जमिनीचा खर्च
- पाणी पुरवठा य़ोजनेच्या इएसआरसाठी जमिनीचा खर्च
- एका स्मशानभूमीसाठी खर्च
- एका उद्यानासाठीचा खर्च
- एका सार्वजनिक रुग्णालयाचा खर्च

सरकार या भूसंपादनाचा खर्च भागवण्यासाठी नवीन योजना विचारात घेऊ शकेल किंवा कोणत्याही चालू योजनेची व्याप्ती रुंदावून हे शक्य करू शकेल.

**८.५० सरकारने लहान नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या खर्चाची मानके निश्चित करणे आणि तो खर्च भागवणे :**

नागरी आणि ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनाखाली आणि देखरेखीखाली घेतल्या जातात. क्षेत्र पातळीवर राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकाऱ्याद्वारे निवडणूका घेतल्या जातात. ग्राम विकास विभागाने या निवडणूका घेण्यासाठी पंचायतराज संस्थांसाठी काही खर्चाची मानके निश्चित केली आहेत, ज्यांची प्रतिपूर्ती जिल्हाधिकाऱ्यांकडे करायची आहे. ही रक्कम प्रति ग्राम पंचायत ५० हजार रुपये एवढी आहे.(ग्रा.वि.वि.शासन निर्णय दि. १४.०६.२०१६). त्याचप्रमाणे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणूकांसाठी आर्थिक मानक प्रति मतदार ४० रूपये एवढे आहे. (शासन निर्णय दि. १४.०६.२०१६)

मात्र नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांचा संपूर्ण खर्च फक्त नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनीच पेलणे अपेक्षित आहे. याप्रमाणे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना जिल्हाधिकाऱ्याने केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करावी लागते किंवा जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या आवश्यकतेनुसार आणि त्याला जेव्हा गरज असेल तेव्हा निधीची गरज भागवावी लागते. क्षेत्रभेटी दरम्यान लहान नगर परिषदांकडून एकमताने अशा विनंत्या करण्यात आल्या की, निवडणूकीचा खर्च हा त्यांच्यासाठी मोठा बोजा ठरतो. निवडणूक हा पाच वर्षातून एकदा होणारे कार्य असले तरीही हा खर्च एकाच वेळी करावा लागतो. या खर्चासाठी कोणतेही मानक किंवा मर्यादा नसल्यामुळे जिल्हाधिकाऱ्याच्या आवश्यकतेनुसार त्यांना बहुतेकवेळेस खूप अधिक

रक्कम खर्च करावी लागते. त्याचप्रमाणे पोटनिवडणूकी दरम्यानही जिल्हाधिकारी कार्यालय स्थानिक संस्थांकडून भरीव रक्कमेची मागणी करते.

### ८.५०.१ राज्य वित्त आयोगाची शिफारस

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणूकंचा खर्च शासनाच्या अर्थसंकल्पातून करण्यात येत असताना नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी मात्र निवडणूकीचा खर्च स्वत: का करावा याचे कोणतेही स्पष्टीकरण राज्य वित्त आयोगाला दिसले नाही. ब वर्ग, क वर्ग नगरपरिषदा आणि नगर पंचायतींच्या संसाधनांची स्थिती हे अतिरिक्त ओझे पेलण्यास सक्षम नाही, त्यासाठी राज्य वित्त आयोग शिफारस करतो की :

(अ) जिल्हा परिषदेप्रमाणे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी देखील प्रति मतदार निवडणूक खर्चाचे मानक निश्चित करण्यात आलेच पाहिजे.

(ब) त्यानंतर खाली दिलेल्या प्रमाणात खर्च वाटून घेणे आवश्यक आहे.

तक्ता ११७ : निवडणूक खर्चासाठी शिफारस केलेला खर्च :

| अनु. क्र. | नगर परिषदांची वर्गवारी | सरकारने भागवायच्या खर्चाचा वाटा | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संसाधनामधून भागवायच्या खर्चाचा वाटा |
|---|---|---|---|
| १ | अ | काही नाही | १००%(सध्याच्या व्यवस्थेत कोणत्याही बदलाची शिफारस करण्यात आलेला नाही.) |
| २ | ब | ७५% | २५% |
| ३ | क | १००% | काही नाही |
| ४ | नगर पंचायत | १००% | काही नाही |

अशाप्रकारे फक्त ज्यांच्याकडे कमीत कमी आर्थिक स्रोत आहेत, अशा लहान वर्गवारीतील नागरी स्थानिक संस्थांचा निवडणूक खर्च सरकारने करावा अशी शिफारस राज्य वित्त आयोगाने केली आहे.

## ८.५१ पर्यटन स्थळे, तीर्थस्थळे आणि अन्य शहरांच्या विशेष गरजा आणि त्यांच्या संसाधनांची वृद्धी करण्याचे मार्ग :

### ८.५१.१: गिरीस्थाने, पर्यटन आणि तिर्थक्षेत्र शहरांशी संबंधीत समस्या:

राज्य वित्त आयोगाला त्याच्या क्षेत्रभेटी दरम्यान अस्थायी लोकसंख्या असलेल्या बऱ्याचशा शहरांमध्ये विविध अभिवेदने प्राप्त झाली. ही लोकसंख्या हंगामी असू शकते (गिरीस्थानांप्रमाणे) किंवा काही विशिष्ट सणांच्या हंगामात असू शकते किंवा जत्रा/ नवरात्र, वर्षअखेर अशा

पर्यटनाच्या हंगामाच्या वेळी जेव्हा प्रचंड लोक संबंधीत शहरातील तिर्थस्थानाना भेट देते त्यावेळची लोकसंख्या असू शकते. ऐतिहासिक किंवा सांस्कृतिक महत्व लाभल्यामुळे जेथे वर्षभर नेहमीच पर्यटकांची प्रचंड गर्दी असते, अशी देखील काही शहरे आहेत. खरतर आता चागल्या वाहतूक सुविधा उपलब्ध झाल्यामुळे, बऱ्याचशा शहरांमध्ये वर्षाचे बाराही महिने पर्यटक येत असतात. यामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व्यवस्थेवर प्रचंड ताण पडतो, कारण त्यांना पर्यटक/ यात्रेकरूंसाठी पाणी पुरवठा, स्वच्छता आणि अन्य सुविधा पुरवाव्या लागतात, मात्र त्यासाठी पुरेशा संसाधनांची सुसज्जता करण्यास स्थानिक संस्था सक्षम नसतात.

सध्या, अशा शहरांना दोन प्रकारे पाठबळ मिळत आहे:

(अ) **थेट सरकारी अनुदान :**

यात्रेकरूंच्या गर्दीमुळे नागरी संस्थावर पडणारा अतिरिक्त आर्थिक भार अंशतः कमी करण्यासाठी विशिष्ट तिर्थक्षेत्र शहरांसाठी नगर विकास विभाग थेट अनुदान पुरवतो. खाली दिलेल्या सात शहरांना अशा प्रकारचे अनुदान मिळते:

**तक्ता ११८ : तीर्थस्थळांसाठी थेट सरकारी अनुदान**

**(रुपये कोटींमध्ये)**

| **अनु.क्र.** | **नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव** | **अनुदान** |
|---|---|---|
| १ | त्र्यंबक | १.२५ |
| २ | आळंदी | १.६२ |
| ३ | जेजुरी | १.८७ |
| ४ | पंढरपूर | ५.०० |
| ५ | तुळजापूर | ३.७५ |
| ६ | रामटेक | ०.६३ |
| ७ | पैठण | १.२५ |
| | **एकूण** | **१५.३७** |

तिर्थक्षेत्र करांच्या यादीत नुकताच अक्कलकोटचा समावेश करण्यात आला आहे. शासनाकडून मिळणारी ही थेट अनुदाने भांडवली काम किंवा देखभालीचे काम अशा दोहोंसाठी वापरता येऊ शकतात. जिल्हाधिकाऱ्यांच्या अंतर्गत काम करणारी समिती या उपक्रमांना मान्यता देते.

**(ब) उपनियम पारित करुन स्थानिक कर किंवा सेवा देणे. शुल्क आकारण्यास परवानगी**

महाराष्ट्र पालिका कायद्याचे कलम १०८(जी) असे नमूद करते की, नगर परिषदेच्या हद्दीत असलेल्या तीर्थस्थळाला नियमितपणे भेट देणा-या यात्रेकरुंच्या बाबतीत **राज्य शासन जो कोणताही सर्वसाधारण किंवा विशेष आदेश तयार करेल त्यास अधिन राहून या कायद्याच्या उद्देशासाठी नगर परिषद कर लागू करु शकते** , तसेच कलम १०८(i) नुसार नगर परिषद अन्य एखादा कर ही लागू करु शकते. कलम ३२२ नुसार नगर परिषदेला

स्वत:चे उपनियम तयार करुन, त्यांना राज्य शासनाची परवानगी घेतल्यानंतर, काही विशिष्ट कर लागू करता येतात.

काही ठराविक नगर परिषदांनी गेल्या अनेक वर्षांपासून उपनियम तयार करुन व राज्य शासनाच्या परवानगीने शहराला भेट देणा-या अनिवासी व्यक्तींना असे कर अथवा शुल्क लागू केले असल्याचे दिसून येते, उदाहरणार्थ

(i.) चिखलदरा हे गिरिस्थान या शहराला भेट देणाऱ्या वाहनांकडून आणि त्याचबरोबर प्रत्येक व्यक्तीकडून विशिष्ट रक्कम वसूल करते. या शहराचा प्रवेश सुयोग्य तपासणी केंद्रांद्वारे नियंत्रित केलेला असल्यामुळे ही वसुली करणे त्यांना सुलभ होते. याद्वारे या शहराने प्रतिवर्षी ३० लाख रुपये कर वसुली केली आहे.

(ii.) माथेरान आणि पाचगणी ही गिरिस्थाने वाहनांकडून विशिष्ट रक्कमा वसूल करतात.

(iii.) अलिबाग नगरपालिकेला सन २००५ मध्ये अभ्यागतांवर (पर्यावरण शुल्क) लागू करण्यासाठी सरकारमान्य उपनियम प्राप्त झाला आहे. ही पालिका शहरात प्रवेश करणाऱ्या अस्थायिक वाहनांवर विशिष्ट रक्कम आकारते. या शहराने या वर्षी सुमारे ९.५ लाख रुपये वसूल केले आहेत.

### ८.५१.२ राज्य वित्त आयोगाचे निष्कर्ष :

अस्थायी लोकसंख्या हंगामी जत्रेच्या वेळची असो किंवा संपूर्ण वर्षभराची असो (त्र्यंबकप्रमाणे) पालिका प्रशासनाला या लोकसंख्येचा भार सहन करावाच लागतो. पर्यटकांच्या गर्दीमुळे शहरातील दुकानांना आणि उपक्रमांना व्यावसायिक उत्पन्न मिळण्यास मदत होऊ शकते, मात्र नगर पालिकांना या उत्पन्नाचा काही हिस्सा मिळण्याची गरज आहे. सध्या काही नगर परिषदांकडे मान्यताप्राप्त उपनियम असले आणि त्या पर्यटक वाहनांकडून आणि अगदी प्रत्येक पर्यटकाकडून (चिखलदऱ्याप्रमाणे) निधी सुसज्ज/संकलन करत असल्या तरीही, यासाठी काही अधिक हितकारक सक्षम रचना आवश्यक आहे. असे कर आकारण्यासाठीची मान्यता प्रत्येक प्रकरणाच्या आधारावर दिली आहे.यासाठी पुष्कळ वेळ लागतो. कलम १०८ मधील यात्रेकरूंवरील कर हा शब्द आता कालबाह्य झाला आहे, त्याला अन्य लक्षितार्थ आहेत आणि त्याची प्रतिस्थापना करण्याची गरज आहे. अशाच प्रकारे, प्रत्येक अभ्यागतावर कर आकारणे ही संकल्पना देखील काहीशी कालबाह्य झाली आहे.

### ८.५१.३ राज्य वित्त आयोगाची शिफारस :

आम्ही अशी शिफारस केली आहे की, ज्या शहरांमध्ये हंगामी किंवा वर्षभर भरपूर अस्थायी लोकसंस्था आहे, अशा शहरांनी (पर्यावरण व्यवस्थापन शुल्क) वसूल करावे, यासाठी सुयोग्य तरतूद कलम १०८ मध्ये समाविष्ट करण्यात यावी. स्वच्छता राखणे, पाणी पुरवणे आणि असेच संबंधित खर्च करणे, हा या

शुल्काचा उद्देश आहे. पर्यटक तीर्थस्थळाला भेट देण्यासाठी किंवा गिरीस्थळांवर आनंद लुटण्यासाठी शहराला भेट देऊ शकतात. पर्यावरण शुल्क दोन प्रकारे वसूल करण्यास परवानगी दिली पाहिजे : पहीले म्हणजे शहरात प्रवेश करणाऱ्या स्वयंचलित वाहनांकडून आणि दुसरे म्हणजे लॉजमध्ये रात्रभर वास्तव्य करणाऱ्या लोकांकडून याबाबतचा नमुना उपनियम आणि एक समग्र अद्ययावत मार्गदर्शक शासन निर्णय, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी मोठ्या प्रमाणात उपयुक्त ठरेल.

**८.५२ भांडवली अनुदाने :**

**८.५२.१ सूत्राधारित अनुदाने वाढविण्याची आणि स्वेच्छाधीन अनुदाने कमी करण्याची गरज :**

या प्रकरणाच्या सुरुवातीला केलेल्या (परिच्छेद ८.३४ पाहा) अर्थसंकल्पीय अनुदानांच्या विश्लेषणामधून असे दिसून येईल की, गेल्या काही वर्षांत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या भांडवली अनुदानांमध्ये भरीव वाढ झाली आहे. यामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना विविध प्रकल्प हाती घेण्यास मोठी मदत झाली आहे.

असे असतानाही आमच्या क्षेत्रभेटी दरम्यान, भांडवली अनुदाने सुत्राधारित करावीत आणि अनुदाने उपलब्ध करून देण्यामधील स्वेच्छाधिकारांची मर्यादा कमी करावी, अशा विनंत्या करणारी अभिवेदने आम्हाला वारंवार प्राप्त झाली.

**८.५२.२ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची कामगिरी, भांडवली अनुदानाशी संलग्न करण्याची गरज :**

मागील दोन केंद्रिय वित्त आयोगांनी कामगिरी अनुदानांचे वितरण काही विशिष्ट अटींशी संलग्न केले आहे. हा राज्यांसाठी आणि त्यांच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी उद्दिष्टा प्रमाणे फलित मिळवण्यासाठी **कामास प्रवृत्त करण्याचा** एक मार्ग आहे. हे मान्यच केले पाहीजे की, कामगिरी अनुदान लागू केल्यामुळे अतिशय सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत.

अशाच प्रकारे, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची विविध क्षेत्रांमधील इच्छित कामगिरी भांडवली अनुदानांशी संलग्न करण्याची गरज लावून धरली पाहिजे.

**८.५२.३ राज्य वित्त आयोगाची शिफारस :**

i) राज्य वित्त आयोगाने याची नोंद घेतली आहे की, स्वेच्छाधीन असणाऱ्या भांडवली अनुदानांमध्ये वर्षानुवर्षे मंद गतीने वाढत होत आहे. ही अनुदाने अधिकाधिक सूत्राधारित करण्याची शिफारस राज्य वित्त आयोग करत आहे, यामुळे सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना भांडवली अनुदानाचे पाठबळ स्विकारण्याच्या रांगेत आपण नेमके कोठे आहोत हे समजेल.

ii) राज्य वित्त आयोग अशी ठामपणे शिफारस करतो की, चांगली कामगिरी दाखवणाऱ्या आणि आर्थिक शिस्तीचे पालन करणाऱ्या उत्तम नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना योग्यप्रकारे प्रोत्साहित करणे अत्यावश्यक आहे. यासाठी भांडवली अनुदान कामगिरीशी संलग्न करण्याहून चांगला पर्याय दिसत नाही. राज्य वित्त आयोग असे सुचवतो की, ५ ते १० % अतिरिक्त अनुदान हे ‘कामगिरी अनुदान’ म्हणून वेगळे ठेवावे आणि लक्षित कामगिरीचे मापदंड साध्य केल्यावर याचे वितरण करण्यात यावे.

हे काम एका स्वतंत्र त्रयस्थ पक्षाद्वारे वस्तूनिष्ठपणे केले जाणे आवश्यक आहे. यामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामामध्ये सुसुत्रता येईल आणि त्यांच्या कामकाजात मोठ्या प्रमाणात सुधारणा होईल.

**८.५३ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी कर्जाद्वारे निधी सुसज्ज करणे :**

**८.५३.१ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना आपली संसाधने सुसज्ज करण्यासाठी कर्जाचा आधार घेताना तोंड द्यावी लागलेली आव्हाने:**

नागरी वित्त पुरवठ्याच्या साहित्यावरील अवलोकन असे दाखवते की, सर्व तज्ज्ञ समित्या, आयोग यांनी त्यांच्या अहवालांमध्ये तसेच अभ्यासांतून अशी शिफारस केली आहे की,नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पायाभूत सुविधांच्या विकासासाठी संसाधने सुसज्ज करण्यासाठी कर्जाचे मार्ग धुंडाळण्याची गरज आहे. एकाबाजूला म्हणजेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत कर्जांसाठी वास्तविक आणि सुप्त मागण्या होत आहेत. तर दुसऱ्या बाजूला म्हणजेच पुरवठ्याच्या बाजूला वित्तिय संस्था चांगल्या आणि सुरक्षित गुंतवणूक संधींच्या प्रतिक्षेत आहे. विशेषतः १५ ते २० वर्षांच्या दीर्घकालिन प्रकल्पासाठी असलेला पुरेसा निधी निवृती वेतन निधी, विमा निधी इ. साठी गुंतवणूकीच्या चांगल्या संधी आहेत. थोडक्यात येथे वास्तविक व सुप्त मागणी आहे, संसाधनाची उपलब्धता आहे आणि सुयोग्य वित्तिय संस्था व वित्तिय उत्पादने यांची देखील उपलब्धता आहे.

तरी देखील हे मान्यच केले पाहिजे की, मेट्रो परिवहन (ट्रान्सपोर्टेशन) सारखे महाप्रकल्प किंवा पुणे महानगर पालिकेने जारी केलेले बंधपत्र अशा प्रासंगिक घटना (या बद्दलचा विषय अभ्यास या अहवालामध्ये स्वतंत्रपणे देण्यात आला आहे.) सोडल्यास भांडवली प्रकल्पांसाठीच्या कर्जाचे मार्ग महाराष्ट्रामध्ये अद्यापी जास्त प्रमाणात अवलंबिले गेले नाहीत.

वेगवेगळ्या भागधारकांशी चर्चा केल्यावर आम्हाला यासाठी खालील कारणे आढळून आली:

i) नागरी स्थानिक स्वराज्य संस्था- विशेषतः मध्यम आणि लहान आकाराच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अलिकडच्या वर्षामध्ये भांडवली सहायक अनुदान म्हणून भरपूर निधी मिळत आहे. त्यामुळे त्यांना कर्जाकडे वळण्यासाठी प्रोत्साहन नाही.

ii) कर्ज उपलब्ध होण्याची पूर्व आवश्यकता म्हणजे, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची लेखा प्रणाली व्यवस्थित ठेवणे आवश्यक आहे, यामुळे पत पात्रता निर्धारण यंत्रणा वित्तिय आरोग्याचे त्वरित -मापन॰ करू शकतील. अन्यत्र नमूद केल्याप्रमाणे, सध्या दुहेरी नोंद लेखा पद्धतीच्या अभावी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे वित्तिय आरोग्य मापन करणे अशक्य आहे.

iii) प्रकल्प अहवाल, दस्तऐवजीकरण, वित्तिय विश्लेषण, करार तयार करणे इ. अशा कर्ज मिळवण्यामधील पूर्व आवश्यकता हे विशेषीकृत उपक्रम आहेत आणि क वर्ग व ड वर्ग महानगरपालिकांच्या आयुक्तांना हे उपक्रम त्यांच्या पातळीवर करणे अत्यंत कठीण आणि आव्हानात्मक वाटते. यासाठी एका सल्लागाराची नेमणूक केल्यास तो नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी वर नमूद केलेल्या सर्व सेवा देऊ शकेल. मात्र (स्पर्धात्मक बोलीद्वारे) प्रत्येक बाबतीत मदत करणाऱ्या सल्लागाराची नेमणूक करणे हे देखील नागरी व्यवस्थापकांसाठी बोजड आणि कठीण आहे.

म्हणूनच बऱ्याचशा नागरी स्थानिक स्वराज्य संस्था कर्जाकडे वळू पाहत नाहीत. कर्ज म्हणजे पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी खात्रीचा निधी प्रवाह आहे, तर अनुदान प्रवाह हा विषम आहे, याची त्यांना जाणीव आहे. तरी देखील वर नमूद केलेल्या कारणांमुळे, ते या क्षेत्रामध्ये येण्याचे फार धाडस करत नाही.

### ८.५४ महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा निधी (MUINFRA)

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून सतत वाढती मागणी असणाऱ्या पायाभूत सुविधा निधीला, मदत म्हणून महाराष्ट्र शासनाने सन २००२ मध्ये, महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा निधीची आणि या निधीची व्यवस्था पाहण्यासाठी दोन संस्थांची निर्मिती केली आहे. साध्या भाषेत सांगायचे झाल्यास कर्जाचे पाठबळ पुरवणारी शासनाची अंतर्गत शासकीय संस्था, ज्याला MUINFRA म्हणून ओळखले जाते. याची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे:

- महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा निधीमध्ये सरकार आणि एमएमआरडीए ने एकत्रितपणे सुमारे ५५० कोटी रुपये गुंतवणूक केली आहे.
- सरकारने न्यास निधी परिरक्षक म्हणून, महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा निधी विश्वस्त मर्यादित आणि निधी व्यवस्थापक म्हणून, महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कंपनी मर्यादित या दोन संस्थांची निर्मिती केली आहे.
- यांनी गेल्या वर्षांमध्ये ८४.८५ कोटी रुपये कर्ज आणि १६८ रुपये अनुदान यांचे वितरण केले आहे. अनुदाने ही मूलतः कमावलेल्या व्याजाच्या रक्कमेतून आहेत.
- ५-६% नाममात्र व्याज दरावर पाणी पुरवठा आणि अशाच १२ योजनांसाठी खालील प्रमाणे कर्जे देण्यात आली:

तक्ता ११९ : MUINFRA कडून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत झालेली कर्जे:

(रुपये कोटींमध्ये)

| अ.क्र. | संवितरण वर्ष | प्रकल्पाचे नाव | नगर परिषदेचे नाव | कर्जाची रक्कम | अनुदानाची रक्कम | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०१७-१८ | पाणी पुरवठा | वाशिम | ४ | १ | ५ |
| २ | २०१७-१८ | पाणी पुरवठा | खोपोली | ८ | २ | १० |
| ३ | २०१७-१८ | पाणी पुरवठा | भद्रावती | ५.६ | १.७ | ७.३ |
| ४ | २०१७-१८ | पाणी पुरवठा | सेलू | २.२ | ०.५६ | २.७६ |
| ५ | २०१७-१८ | गटार | मलकापूर | ४.७१ | १.१८ | ५.८९ |
| ६ | २०१७-१८ | पाणी पुरवठा | श्रीरामपूर | ५.०८ | १.२७ | ६.३५ |
| ७ | २०१७-१८ | पाणी पुरवठा | परळी-वैजनाथ | २.६६ | - | २.६६ |
| ८ | २०१७-१८ | जलतरण तलाव, शाळेचे डिजिटलायझेशन (संगणकीकरण) | काटोळ | ४.३ | १.०८ | ५.३८ |
| ९ | २०१८-१९ | पाणी पुरवठा | परभणी महानगरपालिका | १४ | ६ | २० |
| १० | २०१८-१९ | पाणी पुरवठा | सिन्नर | ७ | ३ | १० |
| ११ | २०१८-१९ | मलनिःसारण योजना | कराड | ९.८ | ४.२ | १४ |
| १२ | २०१८-१९ | पोल/पिलर्स हलवणे. | नागपूर महानगरपालिका | १७.५ | ७.५ | २५ |
| | | एकूण | | ८४.८५ | २९.४९ | ११४.३४ |

आलेख ४८: MUINFRA दिलेली कर्जे - क्षेत्रीय विश्लेषण



तक्ता : १२० : महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा निधी (MUIF) द्वारे वितरीत झालेली अनुदाने

| अ क्र | वर्ष | तपशील | दिलेले अनुदान | हाती घेतलेले प्रकल्प |
|---|---|---|---|---|
| १ | २०१०-११ | नगर परिषद प्रशासन संचालनालय | २४.७५ | - |
| २ | २०१२-१३ | नगर परिषद प्रशासन संचालनालय | ३५.६९ | - |
| ३ | २०१५-१६ | बल्लारपूर नगर परिषद | ५ | पाइप लाइन बदलणे आणि सौर ऊर्जा |
| | | भद्रावती नगर परिषद | ५ | UIDSSMT अंतर्गत कामाची पूर्तता |
| | | कामठी नगर परिषद | ५ | रस्त्यांचे काम |
| | | महादूला नगर परिषद | ५ | रस्त्यांचे काम |
| | | मोदा नगर परिषद | ५ | रस्त्यांचे काम |
| | | मूळ नगर परिषद | २.५ | जलतरण तलाव |
| | | पाचोरा नगर परिषद | ५ | फळे आणि भाजीपाला बाजाराची उभारणी |
| | | पोंभूर्णा नगर परिषद | ५ | इमारतींचे बांधकाम आणि तलाव खोलीकरण |
| | | तळेगाव- दाभाडे नगर परिषद | ४.५ | शॉपिंग सेंटरचे बांधकाम |
| ४ | २०१६-१७ | नगर परिषद प्रशासन संचालनालय | ३६ | - |
| ५ | २०१७-१८ | नगर परिषद प्रशासन संचालनालय | ३० | - |
| **एकूण अनुदाने** | | | **१६८.४४** | |

### ८.५४.१ अन्य काही राज्यांमध्ये कर्जाच्या मार्गाला पाठींबा:

असे दिसून आले आहे की, कर्जाचे नियोजन करण्यासाठी तमिळनाडूसारख्या अन्य राज्यांनी नगर विकास निधी आणि महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कंपनी सारख्या कंपन्या निर्माण समान संस्थात्मक व्यवस्था केल्या आहेत. तरीही उपलब्ध माहिती वरून या संस्थात्मक व्यवस्था नागरी संस्थांना १५०० कोटीं रुपयांहून अधिक कर्जे देऊ शकल्या आहेत. त्याचबरोबर त्यांनी १३ लहान नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या गरजेची पूर्तता करण्यासाठी आवश्यक रक्कम उभारणी करणाऱ्या विविध संस्थांमध्ये देखील सहभाग घेतला आहे, त्यांचे एकत्रिकरण केले आहे आणि यासाठी एकल बाजार रोख्याची उभारणी केली. अशा प्रकारचे उपक्रम हाताळण्यासाठी त्यांनी सुयोग्य संस्थात्मक यंत्रणाही निर्माण केली. बाजारामधून तत्सम प्रकारे निधींची सुसज्जता करण्यास निश्चितच खूप मोठा वाव आहे. मुंबई या भारताच्या आर्थिक राजधानीचा महाराष्ट्राला विशेष फायदा आहे आणि या अंगभूत संधीचा उपयोग करून घेणे गरजेचे आहे.

### ८.५४.२ क्षेत्र अधिकाऱ्यांकडून पायाभूत सुविधा प्रकल्पांशी संबंधित अन्य संबंधित अपेक्षा:

आम्ही आधीच निर्देशित केले आहे की, क्षेत्र अधिकाऱ्यांना प्रकल्प प्रस्ताव तयार करणे (विविध आकाराचे), करार, संविदा तयार करणे, व्यवहार्यता अभ्यास करणे, तसेच त्यांच्या दैनंदिन कामासाठी विशेषज्ञ आणि सल्लागार नेमणे या कामांसाठी पाठबळाची आत्यंतिक गरज आहे.  फक्त पाण्याशी संबंधित काम, स्वच्छता प्रकल्प अशा मोठ्या पायाभूत सुविधांच्या बाबतीतच पाठबळाची गरज आहे असे नव्हे तर संयुक्तित आकाराची सार्वजनिक उद्याने उभारणे (यासाठी त्यांना लँडस्केप आर्कीटेक्ट्सची गरज भासू शकते.),सेंद्रिय खते उभारणे आणि अशाच अन्य प्रकल्पांसाठी देखील या पाठबळाची गरज आहे. सर्वसाधारणपणे करारांची (संविदांची) कागदपत्रे इंग्लिशमध्ये तयार केली जात असल्यामुळे, लहान नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना याबाबत भाषिक अडचणीही जाणवतात.

नागरी स्थानिक संस्थांना अशा विविध प्रकारच्या श्रेणीतील सेवा किफायतशीर दरात (ना नफा ना तोटा) पुरवू शकेल अशी नागरी संस्थांतर्गत, मात्र स्वतंत्र सल्लागार यंत्रणा असावी, अशी सातत्यपूर्ण मागणी होती.

### ८.५४.३ पालिका मालमत्तेच्या प्रभावी समुपयोजनाद्वारे संसाधनांच्या सुसज्जतेसाठी  राज्य पातळीवरील व्यावसायिक पाठबळाची गरज :

क्षेत्रभेटी दरम्यान आमच्याकडे नागरी स्थानिक संस्थांमधील अशासकिय लोकांकडून प्रचंड प्रमाणात मागणी करण्यात आली की, त्यांच्या नगरपलिकांनी धारण केलेल्या बहुमोल मालमत्तांचे प्रभावीपणे चलनीकरण करण्यास त्यांना परवानगी द्यावी आणि त्याद्वारे त्यांच्या उत्पन्न वाढीसाठी मदत करावी. अनेक ठिकाणी पालिकेच्या मालकीच्या जमिनी मोक्याच्या ठिकाणी आहेत, ज्यांचा वापर अल्प प्रमाणात होत आहे किंवा त्यांचा सुयोग्य वापर होत नाही.

त्यादृष्टीने आम्ही असे सुचवतो की, यासाठी सर्वसमावेशक राज्य धोरणाची गरज आहे. त्याच बरोबर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना या संबंधातील (एकतर विद्यमान पीडब्ल्यूडी सारख्या विभागाद्वारे, ज्यांनी काही बीओटी प्रकल्प पूर्ण केले आहेत किंवा एक नवीन राखीव यंत्रणाद्वारे किंवा MUINFRA ची भूमिका योग्यरित्या विस्तारित करून ) निविदा, संविदा आणि करार हाताळण्यासाठी व्यावसायिक पाठबळ देण्याची देखील गरज आहे.

**८.५४.४ राज्य वित्त आयोगाची शिफारस :**

(अ) एका स्वतंत्र व्यावसायिक यंत्रणेद्वारे MUINFRA च्या प्रचालन कार्यप्रणालीची नव्याने समग्र पडताळणी होणे गरजेचे आहे (ही यंत्रणा आता सुमारे १७ वर्षे जुनी झाली आहे).

(ब) ज्यांच्याकडे दीर्घ मुदतीचा निधी आहे, अशी भारतीय आयुर्विमा महामंडळासारखी (एलआयसी) एखादी यंत्रणा MUINFRA/ समकक्ष संस्थेच्या मालकीचा आणि व्यवस्थापकीय रचनेचा भाग होऊ शकते का, याची पडताळणी करण्याची गरज आहे. एकाहून अधिक मालक असलेल्या एखाद्या संस्थेला विविध दृष्टीकोन मिळतील आणि अशी संस्था तिच्या कामामध्ये अधिक वेगवान असेल.

(क) समरूप पायाभूत सुविधा निधी आणि कार्यान्वयन पायाभूत सुविधा कंपन्या असणाऱ्या विकसित राज्यांच्या कार्यपध्दतीचा अभ्यास करण्याची गरज आहे आणि त्यांच्या नमुन्याची पूर्णतः किंवा अंशतः प्रतिकृती करता येऊ शकते का, याचा पडताळा घेणे देखील गरजेचे आहे.

(ड) सर्वात महत्वाचे म्हणजे, वर नमुद केलेल्या (परिच्छेद ८.५४) विविध श्रेणीतील सेवा देण्यासाठी -स्वतंत्र तांत्रिक यंत्रणे॰ची गरज आहे. आज या सुलभ सेवा देणाऱ्या यंत्रणांच्या अभावामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्था अधिक प्रतिबंधित झाल्या आहेत. शासन निकाय अनुदान देण्याचा विचार करू शकते किंवा विद्यमान MUNIFRA (कथित १० कोटी) अनुदानामधून ते वेगळे काढू शकते किंवा ते या पाठबळ यंत्रणांसाठी राखून ठेवू शकते. संस्था आपल्या कर्मचाऱ्यांना आधार देऊ शकते आणि १० कोटी रुपयातून मिळालेल्या व्याजाच्या रक्कमेतून प्रशासकीय अनुदान/साहाय्य देऊ शकते. यामुळे संस्थेला सातत्य आणि शाश्वतता प्राप्त होईल. तिचा कार्यन्वयन खर्च नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वर नमूद केलेल्या सेवा पुरवल्याबद्दल प्राप्त होणा-या शुल्कांमधून करता येईल. यामुळे क वर्ग आणि त्या पातळी खालील महानगर पालिकांच्या कार्यान्वयनासाठी खूपच मदत होईल.

**८.५५ भांडवली खर्चाशी संबंधित मान्यता प्रक्रिया सुलभ करणे :**

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी आणि अधिकारी यांच्याशी झालेल्या चर्चे दरम्यान प्रशासकीय आणि तांत्रिक मान्यतेची मार्गदर्शक तत्वे सुलभ करावीत अशी जोरदार मागणी करण्यात आली. सध्याच्या कार्यपद्धतीमध्ये प्रत्येक टप्प्यावर छाननी आणि मान्यतेसाठी प्रचंड वेळ लागतो. क्षेत्र

अधिकाऱ्यांना असे वाटते की, बदलत्या परिस्थितीनुसार मुख्याधिकारी/नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या आर्थिक अधिकारांमध्ये वाढ करण्याची गरज आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (MJP) आणि सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) यांच्याकडून प्रकल्प तयार करण्यासाठी आकारले जाणारे (अत्युच्च) मार्गदर्शन शुल्क कमी करणे, ही क्षेत्र पातळीवरून सातत्याने होणारी दुसरी मागणी होती. काही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी असे नमूद केले की, हे मार्गदर्शन शुल्क प्रकल्प खर्चामध्ये समाविष्ट करण्यास देखील परवानगी नाही आणि त्यांच्या संसाधनांमधून हा खर्च भागवणे त्यांना कठीण जाते.

**८.५५.१ राज्य वित्त आयोगाची शिफारस :**

राज्य वित्त आयोग शिफारस करतो की, प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, मार्गदर्शन शुल्क इ.शी संबंधित संपूर्ण कार्यपद्धतीचे पुनःपरिक्षण करण्याची गरज आहे.नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांवरील, विशेषतः लहान आकाराच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांवरील आकारलेले विविध प्रकारचे वेळेचे आणि खर्चाचे ओझे कमी करण्याची गरज आहे.

**८.५६ वित्तिय भार विरहित प्रशासकीय सुधारणा :**

**८.५६.१ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत सामिल होणाऱ्या पालिका कर्मचाऱ्यांशी संबंधित कार्यन्वयन समस्या मार्गी लावण्याची गरज :**

केंद्र सरकारच्या निर्णयाच्या अनुषंगाने, महाराष्ट्र सरकारने देखील असा निर्णय घेतला आहे की, दि.०१.११.२००५ नंतर जे कर्मचारी सरकारी/ सार्वजनिक क्षेत्रात रुजू झाले आहेत, ते अर्थसंकल्पिय स्त्रोतांमधून निवृत्ती वेतनास पात्र ठरणार नाहीत. त्याऐवजी त्यांचे मासिक अंशदान आणि सरकारचे अंशदान हे राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेमध्ये साठवले जाईल आणि त्यामधून त्यांना निवृत्ती वेतन देण्यात येईल.

बऱ्याचशा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अद्याप कर्मचारी निहाय NPS PRAN क्रमांक मिळालेला नाही. त्याऐवजी त्यांनी स्वतंत्र बँक खाते उघडले आहे, ज्यामध्ये कर्मचाऱ्याचे मासिक अंशदान आणि नगरपालिकेचे (म्हणजेच नियोक्त्याचे) अंशदान दरमहा जमा केले जाते. या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी कार्यालयामध्ये कर्मचाऱ्यांची स्वतंत्र खातेवही ठेवली आहे. थोडक्यात कर्मचारी आणि नियोक्ता यांचे अंशदान नियोक्त्याकडे ठेवले आहे आणि ते राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेत हस्तांतरित केलेले नाही

काही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी ही रक्कम कर्मचारी भविष्यनिर्वाह निधीमध्ये जमा केली आहे.

### ८.५६.२ राज्य वित्त आयोगाची शिफारस :

हा संपूर्ण प्रश्न मार्गी लावणे अत्यंत आवश्यक आहे, कारण वैयक्तिक कर्मचारी हा प्रश्न कामगार न्यायालयात घेऊन जाण्याचा धोका आहे. हे सर्वश्रुत आहे की, भविष्य निर्वाह  निधी (किंवा समकक्ष) अंशदान जमा न करणे आणि तो नेमून दिलेल्या पद्धतीने न ठेवणे यासाठी कामगार कायद्यांतर्गत अत्यंत कठोर दंडाची आणि शिक्षेची तरतूद आहे. एक तर हा निधी भविष्य निर्वाह निधी आयुक्ताकडे असला पाहिजे किंवा राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमध्ये असला पाहिजे आणि या व्यतिरिक्त अन्य कोठेही असता कामा नये.

या प्रश्नाबाबतच्या कामगार कायद्यातील तरतूदींबाबत महानगरपालिका आणि नगर परिषदा अनभिज्ञ असल्याचे दिसून येते.

राज्य वित्त आयोग नगर विकास विभाग/ नगर परिषद प्रशासन संचालनालय यांना ठामपणे शिफारस करतो की, त्यांनी यासाठी या विषयामधील पारंगत अशी सुयोग्य व्यवसाय संस्था किंवा सल्लागार व्यक्तीची नेमणूक करावी, जे या विषयात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना हाताला धरून प्रत्यक्ष मदत करतील आणि अधिक विलंब टाळून हा निधी राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेत हस्तांतरित करण्यात मदत करतील. या व्यवसाय संस्थांना किंवा सल्लागार व्यक्तींना कामगिरीच्या आधारावर मोबदला (पैसे) दिला जाऊ शकतो.

### ८.५६.३ विभागीय, जिल्हा आणि राज्य पातळीवर नगर परिषद प्रशासन संचालनालय (DMA) ची पुनर्रचना करणे आणि त्यांस जिल्हाधिकारी कार्यालयापासून अलग करणे :

सध्या संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय यांचे कार्यालय मुंबई येथे आहे. त्यांना क्षेत्रीय कार्यालय नाही. त्यांचे विभागीय अधिकारी आणि जिल्हास्तरिय अधिकारी हे विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांच्या अंतर्गत काम करतात. विभागीय अधिकारी आणि जिल्हास्तरिय अधिकारी यांचे मदतनीस कर्मचारी जिल्हाधिकारी (महसूल)कार्यालयामधील आहेत.

विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना नगर परिषद कायद्यांतर्गत विविक्षित भूमिका देण्यात आल्या आहेत.

समान नागरीकरण झालेल्या गुजरातमध्ये, नगर परिषद प्रशासन संचालनालय संचालनालयाची पुर्णपणे पुनर्रचना करण्यात आली आहे. यासाठी गुजरातमध्ये तरुण भा.प्र.से. (IAS) अधिकाऱ्यांची स्वतंत्र कार्यालयांसह विभागीय संचालक या पदांवर नेमणूक केली आहे आणि त्यांनी संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय यांना थेट प्रतिवेदन करायचे आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घेण्यापुरती जिल्हाधिकाऱ्याची भूमिका निर्बंधित करण्यात आली आहे.

महाराष्ट्रामध्ये नगर रचना विभागाचे जिल्हा कार्यालय जिल्हाधिकारी कार्यालयावर अवलंबून नाही. सहाय्यक संचालक, नगर रचना यांचे स्वतंत्र कार्यालय आहे मात्र तरीदेखील नियमानुसार जेव्हा गरज पडेल तेव्हा आणि अन्यथाही ते जिल्हाधिकाऱ्याशी संवाद साधतात.

जेव्हा जेव्हा बिगर महसुली अधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी कार्यालयामधून कार्यरत राहावे लागते तेव्हा महसूल विभागातील अधिकाऱ्यांची वृत्ती त्यांना परकेपणाची वागणूक देणारी असते. नगर विकास विभागाच्या जिल्हास्तरिय अधिकाऱ्यांना विविध कार्यन्वयन समस्यांना सामोरे जावे लागते.

जिल्हाधिकाऱ्यांवर देखील अतिशय ताण असतो कारण त्याना अनेक बाबी हाताळाव्या लागतात आणि ते शेकडो समित्यांच्या प्रमुखपदी असतात आणि जिल्हाधिकाऱ्यांवर एक संस्था म्हणून अधिकाधिक जबाबदाऱ्यांचे ओझे लादण्याच्या जुन्या पायंड्याचे पुनः परिक्षण करण्याची गरज आहे.

### ८.५६.३ राज्य वित्त आयोगाची शिफारस :

नगर परिषद प्रशासन संचालनालयाचे विभागीय अधिकारी आणि जिल्हास्तरीय अधिकारी यांना जिल्हाधिकारी कार्यालयामधून वेगळे करणे आवश्यक आहे आणि जिल्हा पातळीवरील सहाय्यक संचालक, नगर विकास यांच्याप्रमाणे त्यांनी एक स्वतंत्र कार्यालयातून कार्यरत झाले पाहिजे. पालिका कायद्यातील तरतूदींनुसार आणि अन्य कार्यकारी अनुदेशांनुसार तो जेव्हा गरज पडेल तेव्हा जिल्हाधिकाऱ्यांना प्रतिवेदन करू शकतो आणि नस्तीला (फाईल) मान्यता घेऊ शकतो मात्र त्याचे प्रशासकीय नियंत्रण नगर परिषद प्रशासन संचालनालयाशी निगडीत राहील.

दीर्घ मुदतीत विभागीय आणि जिल्हास्तरीय कार्यालये तंत्रकुशल कर्मचाऱ्यांनी सुसज्ज करण्याची गरज आहे, हे कर्मचारी त्या क्षेत्रातील लहान नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सेवा देऊ शकतील.

राज्यामध्ये अधिकाधिक नागरीकरण होत आहे, हे लक्षात घेऊन नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्र कर्मचाऱ्यांच्या संपूर्ण व्यवस्थापनाला नवीन चेहरा देण्याची गरज आहे.

राज्य वित्त आयोग अशी देखील शिफारस करतो की, जिल्हास्तरीय अधिकाऱ्याला सध्या दिले जाणारे 'जिल्हा प्रशासकीय अधिकारी' हे पदनाम बदलण्याची गरज आहे, कारण प्रशासन हे कोणत्याही विभागाचे असू शकते. या ऐवजी सहायक संचालक (नगर विकास) अशा एखाद्या सुसंबद्ध नावाचा विचार केला जाऊ शकतो.

### ८.५७ महानगर पालिकांमध्ये कर्मचारी संवर्गाची निर्मिती :

नगर परिषद संचालनालयातील संवर्गांच्या धर्तीवर महानगरपालिकेसाठी देखील कर्मचारी संवर्ग निर्माण करण्याची विनंती क्षेत्रभेटी दरम्यान आम्हाला करण्यात आली. मात्र हे करण्यामध्ये आव्हाने आहेत कारण, महानगरपालिकेमध्ये विद्यमान अधिकारी आहेत आणि जसजसे हे विद्यमान अधिकारी निवृत्त होतील तेव्हा कर्मचारी संवर्ग निर्माण करता येईल. याचबरोबर नगर परिषद प्रशासन संचालनालय संवर्गातील अधिकाऱ्यांची बढती आणि विकास याची तरतूद असणेही आवश्यक आहे, ज्यामुळे हे अधिकारी जसजसे वरिष्ठ पदांवर जातील तसतसे ते नगरपालिकेऐवजी महानगरपालिकांमध्ये कार्यरत राहतील.

### ८.५७.१ राज्य वित्त आयोगाच्या शिफारसी :

राज्य वित्त आयोग अशी शिफारस करतो की, महानगरपालिकांसाठीचा कर्मचारी संवर्ग विचारपूर्वक व काळजीपूर्वक पद्धतीने विकसित करणे आवश्यक आहे. सर्वप्रथम वित्त आणि लेखा संवर्ग निर्माण करून त्यानंतर अन्य प्रवर्ग निर्माण करणे इष्ट आहे.

### ८.५८ स्वच्छ भारत अभियान

स्वच्छ भारत अभियानामध्ये राज्य अग्रभागी आहे. अनेक शहरांनी आणि गावांनी राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर पुरस्कार जिंकले आहेत. शून्य कचरा शहर म्हणून विकसित झालेल्या वेंगुर्ला या लहानशा शहराच्या माहितीचे आम्ही अन्यत्र सादरीकरण केले आहे. आम्ही भेट दिलेल्या बऱ्याचशा शहरांमध्ये सकाळी घरोघरी जाऊन वर्गीकरण केलेला कचरा जमा करणारी **घंटागाडी** ही शहरी जीवनाचा एक भागच झाली आहे.

या अभियानासाठी मागील तीन वर्षात भरीव रक्कम देण्यात आल्याचे दिसून आले आहे:

**तक्ता १२१: स्वच्छ भारत अभियानासाठी वितरीत झालेले अनुदान :** (रुपये कोटींमध्ये)

| अनु.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची वर्गवारी | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ |
|---|---|---|---|---|
| १ | महानगरपालिका | ५५० | ६०० | ४५० |
| २ | नगर परिषद | ७० | ६०० | ४५० |
| ३ | नगर पंचायत | ८५ | ४०५ | २८० |

* राज्य आणि केंद्र या दोन्हींच्या हिश्श्याचा समावेश आहे.

### ८.५८.१ राज्य वित्त आयोगाची शिफारस

क्षेत्रामधून आम्हाला मिळालेल्या अभिप्रायाच्या आधारे आम्ही अधिक एकत्रिकरणासाठी आणि या अभियानाच्या निष्पत्तीला बळकटी देण्यासाठी विविक्षित शिफारसी करत आहोत

## ८.५९ स्वच्छ भारत अभियानासाठी प्रत्यक्ष तांत्रिक पाठबळ

शहरी भागांतील घन आणि द्रव/मल कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी तांत्रिक आणि कार्यक्षेत्राचे चांगले ज्ञान आवश्यक आहे. कचऱ्याचे वर्गीकरण, सेंद्रीय कचऱ्याचे सेंद्रीय खतामध्ये रुपांतर करणे, सांडपाणी प्रक्रिया (लहान शहरांच्या पातळीवर देखील) ही कामे व्यवसायिक दृष्टीने करणे गरजेचे आहे. सध्या मुख्याधिकारी (जो अनेक प्रकारच्या जबाबदाऱ्या लदण्यात आल्या आहेत. )आणि पालिका अभियंता यांनी तांत्रिक समस्या देखील सोडवणे अपेक्षित आहे. आमच्या क्षेत्रभेटी दरम्यान, मुख्याधिकाऱ्यांनी हे मान्य केले की, त्यांना अधिकाधिक प्रमाणात काटेकोर तांत्रिक आणि शास्त्रीय मार्गदर्शनाची गरज आहे. येत्या वर्षांमध्ये **कचरा व्यवस्थापना** च्या तांत्रिक पैलूला उच्च आणि उच्चतम पातळीची व्यावसायिकता आणि हाताळणी कौशल्य यांची गरज भासेल.

### ८.५९.१ राज्य वित्त आयोगाच्या शिफारसी :

राज्य वित्त आयोग अशी शिफारस करतो की, सुयोग्य प्रात्यक्षिक तांत्रिक शिक्षण देणाऱ्या यंत्रणांना (जसे की अभियांत्रिकी महाविद्यालयातील पर्यावरणीय अभियांत्रिकी विभाग किंवा अशा सुयोग्य संस्था) त्या विभागातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मदत करण्यासाठी सोबत घेणे आवश्यक आहे. या प्रादेशिक तांत्रिक पाठबळ यंत्रणा नीरी (NEERI) सारख्या राज्य पातळीवरील तांत्रिक पाठबळ देणाऱ्या मातृसंस्थेच्या छत्राखाली काम करू शकतात. या तांत्रिक पाठबळ यंत्रणांनी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण देऊन आणि खंबीरपणे पाठींबा देणे आवश्यक आहे.

## ८.६० घन कचरा व्यवस्थापन आणि अन्य उपक्रमांसाठीचा सुयोग्य परिव्ययांकन काढणे :

ट्रक, ट्रॉली, ट्रॅक्टर आणि सुयोग्य घनकचरा व्यवस्थापनासाठीची अन्य उपकरणे खरेदी करण्यासाठी देखील अलिकडच्या वर्षांमध्ये भरपूर गुंतवणूक झाली आहे. बदलत्या सामाजिक- आर्थिक परिस्थितीत अधिकाधिक नागरी स्वराज्य संस्था घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी बाह्य यंत्रणांकडे वळत आहेत. मात्र राज्य वित्त आयोगाला घन कचरा व्यवस्थापनावर प्रभागनिहाय, उपक्रमनिहाय झालेल्या खर्चाची (वाहतूक, मनुष्यबळ, प्रक्रिया इ.) एकत्रित माहिती मिळवणे अवघड वाटले.

### ८.६०.१ राज्य वित्त आयोगाची शिफारस :

घन कचरा व्यवस्थापनावरील अधिकाधीक काटेकोर आणि विश्वसनीय माहिती उपलब्ध करून द्यावी अशी राज्य वित्त आयोगाची शिफारस आहे. विशेषतः मोठ्या शहरांमध्ये (अ+, अ,ब आणि क वर्गवारी) या कामासाठी अभिहस्तांकन तत्वावर त्याधुनिक परिव्यय लेखापाल एजन्सीची नेमणूक करता येऊ शकते. यामुळे सुयोग्य कमी खर्चाची पर्यायी उपाययोजना तयार करण्यास मदत होईल.

### ८.६१ घन कचरा व्यवस्थापनामधील रोजगाराच्या संधी

शहर स्वच्छ ठेवण्यासाठी आणि नागरीकांचे आरोग्य राखण्यासाठी घन आणि द्रव कचरा व्यवस्थापनाकडे एक अत्यावश्यक नागरी गरज म्हणून पाहिले जाते. हा मुख्य हेतू असला तरीही, घन आणि द्रव कचरा व्यवस्थापनाच्या प्रभावी हाताळणीमुळे यामधून एक दुय्यम फायदाही होतो. ते 'कचऱ्यातून संपत्ती' निर्माण करू शकतात आणि या प्रक्रियेमध्ये उपजिविकेच्या संधीही मोठ्या प्रमाणात निर्माण होतात. कचऱ्याचे विलगीकरण, त्याचे जैविक खतामध्ये शास्त्रीय पद्धतीने रूपांतरण करणे, काही प्रक्रिया करून असेंद्रीय पदार्थांचा पुनर्वापर करणे यामधून मोठ्या प्रमाणात लोकसंख्येसाठी स्थानिक पातळीवर उपजिविकेच्या संधी निर्माण होतात.

उदारणार्थ, अलिकडेच महाराष्ट्रामध्ये प्लास्टीकच्या पिशव्यावर बंदी आल्यावर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अनेक महिला बचत गटांसाठी कापडी किंवा कागदी पिशव्यांचे उत्पादन करण्याच्या संधीला चालना मिळाली.

### ८.६१.१ राज्य वित्त आयोगाची शिफारस

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पूर्णवेळ सामाजिक कार्यकर्ता आणि काही निधी यासह नागरी उपजिविका अभियान सुरू आहे. घन आणि द्रव कचरा व्यवस्थापनाचे प्रभावी नियोजन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या विविध कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यासाठी नागरी उपजिविका अभियान सक्रिय सहभाग घेवू शकते. यातून सूक्ष्म पातळीवरील पर्यावरणनिष्ठ उद्योजकाना प्रशिक्षण देता येईल, जे शहर स्वच्छ ठेवू शकतील तसेच या प्रक्रीयेमध्ये रोजगारही निर्माण होऊ शकेल.

### ८.६२ शहरे म्हणजे ' आर्थिक वृद्धीची' इंजिन्स :

भारतामध्ये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रमुखपदी असलेल्या लोकांवर म्हणजेच अशासकीय पदाधिकारी तसेच मुख्याधिकारी यांच्यावरील जबाबदारी निश्चित करताना त्यांच्याकडे ' नागरी सुविधांचे' पुरवठादार म्हणून पाहिले जाते. म्हणजेच शहराची स्वच्छता, घरगुती पाण्याचा पुरवठा करणे, रस्ते सुस्थितीत ठेवणे, पथदिव्यांची व्यवस्था इ. कामे करणे.

**या उलट पाश्चिमात्य किंवा अन्य विकसित देशांमध्ये निर्वाचित बिगर शासकीय अधिकारी (मेयर) आणि शासकीय अधिकारी हे आपली जबाबदारी फक्त नागरी सुविधांचे पुरवठादार (जे अपेक्षितच आहे) एवढीच ठेवत नाहीत तर त्यापलिकडे जाऊन ते गुंतवणूक, उच्च गुणवत्तेचे रोजगार, चांगल्या संस्था आणि बुद्धीमान व्यक्ती यांना आपल्या शहरात आकर्षुन घेण्याचेही काम करतात. हे उद्दीष्ट्य साध्य करण्यासाठी ते अनेक सक्रिय पावले उचलतात.**

सध्या तर चांगल्या दर्जाच्या नागरी सुविधा पुरवणे हेच काम बिगर शासकीय आणि शासकीय पदाधिकाऱ्यांसाठी त्रासदायक तसेच पुरेसे ठरत आहे, शहराचा आर्थिक विकास साधण्यास सहाय्यभूत

ठरतील अशी उत्तरलक्षी पावले उचलण्यास नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी कोठेतरी सुरुवात केली पाहिजे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड या नगरपालिकेने पर्यटनाचे क्षेत्रात सक्रिय वाढ करुन त्यांच्या अर्थव्यवस्थेला बळकटी दिली आहे, असे आमच्या क्षेत्र भेटी दरम्यान आढळून आले. देवगडचा या दिशेने झालेल्या प्रगतीचा विषय अभ्यास आम्ही या अहवालामध्ये अन्यत्र दिला आहे.

**८.६२.१ राज्य वित्त आयोगाची शिफारस**

स्थानिक रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी काही वार्षिक पुरस्कार आणि अधिकृत मान्यता मिळावी अशी शिफारस राज्य वित्त आयोग करत आहे. यामुळे अन्य नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना यशस्वी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे अनुकरण करण्यास प्रोत्साहन मिळेल.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्था या दिशेने अनेक उपक्रम घेऊ शकतात जसे की, शहरातील उद्योजकांसाठी कार्यशेड, गोदामे, शितगृहे आणि अशा सामान्य सुविधा उपलब्ध करून देणे. महिला स्वयंसाहाय्यता गटांसाठी लहान छपऱ्या(शेड) उपलब्ध करून देता येतील. इतरही काही मार्ग असू शकतात. सुरुवात करण्यासाठी, निवडक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना पथदर्शी प्रकल्प सुरू करायला मदत करू शकतील असे सल्लागार नेमले जाऊ शकतात. महाराष्ट्राने या क्षेत्रामध्ये अन्य राज्यांना मार्गदर्शन केले पाहिजे.

**८.६३ पुरस्कार आणि मान्यता :**

राष्ट्रीय पातळीवर भारत सरकारकडून राज्य सरकार आणि नागरी संस्थांना वेळोवेळी पुरस्कार आणि मान्यता मिळत आल्या आहेत. विशेषतः स्वच्छ भारत अभियान या उपक्रमामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निकोप स्पर्धेसाठी दरवाजे उघडे झाले आहेत.

नगर विकास विभागामध्ये दरवर्षी मार्च महिन्याच्या सुरुवातीला संस्थात्मक पुरस्कार दिन साजरा केला जातो आणि याचे आयोजन मुंबई येथे केले जाते. यासाठीची तयारी काही महिने आधीच सुरू होते आणि त्यामुळे पुरस्कार सोहळ्याची उत्सुकता शिगेला पोहोचते. हा कार्यक्रम अतिशय सहभागात्मक असतो आणि अशासकीय पदाधिकारी जसे की जिल्हा परिषद अध्यक्ष,पंचायत समिती सभापती, ग्रामपंचायतींचे सरपंच आणि विविध पातळीवरील पदाधिकारी यांना पुरस्कार प्रदान केले जातात. विभागाच्या वार्षिक ताळेबंदामध्ये या पुरस्कार योजनेसाठी आणि सोहळ्यासाठीचा निधी निश्चित केला जातो.

**८.६३.१ राज्य वित्त आयोगाची शिफारस :**

श्रेणीनिहाय नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सर्वोत्तम कार्यापद्धतीला संस्थागत पुरस्कार आणि अधिकृत मान्यता द्यावी अशी राज्य वित्त आयोग शिफारस आहे. नगर विकास विभाग आणि पंचायत राज विभाग यांच्या प्रमाणेच हा कार्यक्रम वर्षातील एखाद्या विशिष्ट दिवशी किंवा आठवड्यामध्ये घेण्यात

यावा. कार्यक्रमाच्या दिवसामध्ये बदल करू नये. श्रेणीनिहाय वित्तिय कामगिरी पुरस्कारही असणे आवश्यक आहे, येथे राज्य वित्त आयोगाला खालील बाबीशी निगडीत पुरस्कार सुचवायचे आहेत :

- स्वतःच्या कर संकलनाच्या पद्धतींमध्ये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी नाविण्यपूर्ण उपक्रम घेणे
- लोकसहभागासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी नाविण्यपूर्ण उपक्रम घेणे
- पूर्ण किंवा पुरेसे उपयोगकर्ता शुल्क वसूल करण्यामध्ये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी नाविन्यपूर्ण उपक्रम घेणे
- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी नगर व्यवस्थापनामध्ये दर्शविलेली प्रतिकृतियोग्य प्रतिमाने
- अधिक चांगल्या लेखा कार्यपद्धतीकडे वळलेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्था
- पालिकेचे उपक्रम शहराच्या आर्थिक विकासाशी संलग्न करणाऱ्या संस्था

मूल्यांकन करण्यासाठी एक स्वतंत्र आणि विश्वसनीय संस्थेची उभारणी करणे, हे देखील शक्य झाले पाहिजे.
यामुळे क्षेत्रिय अधिकाऱ्यांना उत्साह येईल आणि नागरी व्यवस्थांमध्ये हळूहळू सुधारणा होतील.

### ८.६४ माहिती तंत्रज्ञाना (IT) मध्ये गुंतवणूक करणे:

आमच्या क्षेत्रभेटी दरम्यान असे दिसून आले की, प्रशासकिय कामामध्ये माहिती तंत्रज्ञानाच्या वापराबाबत हळूहळू सकारात्मक बदल घडून येत आहे. कंत्राटदार आणि पुरवठादार यांना बरेचसे देय RTGS द्वारे आणि संबंधित यंत्रणेद्वारे दिली जात आहे. मात्र लहान नागरी स्थानिक स्वराज्य संस्था- विशेषत: ब, क वर्ग नगर परिषदा आणि नगर पंचायती यांना माहिती तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधा आणि क्षमता बांधणी या दोन्ही बाबींसाठी पाठबळाची गरज आहे. असे दिसून आले आहे की, सन २०१६-१७ मध्ये संगणक संकेतांक (CRC Code) (२२१७ ८१०१ - महानगरपालिकांच्या संगणकीकरणासाठी अनुदान) द्वारे ४ कोटी रूपयांचे वितरण करण्यात आले आणि त्यानंतरच्या वर्षांमध्ये अर्थसंकल्पीय तरतूद नाही. नगरपालिकांसाठी कोणतेही समांतर अर्थसंकल्पीय लेखाशिर्ष नाही.

### ८.६४.१ राज्य वित्त आयोगाची शिफारस:

राज्य वित्त आयोग शिफारस करतो की, माहिती तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधा आणि लहान नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्या हाताळण्याची क्षमता विकसित करणे या बाबींचे बळकटीकरण करण्यासाठी अविरत आणि केंद्रीत प्रयत्न करणे आवश्यक आहे. यामुळे त्यांची कामगिरी सुधारेल.

### ८.६५ अग्निशमन सेवा:

मागील दशकांशी तुलना करता असे दिसून येते की, केंद्र आणि राज्य या दोन्ही सरकारांनी 'अग्निशमन' हा प्रश्न अलिकडच्याच काळात या प्रश्नाकडे लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. कारण

अगदी नगर परिषदा असलेल्या शहरात देखील अधिकाधीक उंच इमारती उभारल्या जात आहेत, मोठ्या महानगरपालिकाच्या शहरांबाबत तर बोलायलाच नको. रासायनिक आणि औद्योगिक आस्थापनांमध्ये वाढ होत आहे. अग्निशमन केंद्रे आणि अग्निशमनाच्या साधनांनी सुसज्ज असे वाहन (फायर टेंडर) उभारण्यासाठी नागरी संस्थांना भांडवली अनुदाने देण्याचे राज्याचे धोरण आहे.

खाली 'अग्निशमन आणि आपत्कालिन सेवांच्या बळकटीकरण'साठी दिलेल्या निधीचे विमोचन दिले आहे.

तक्ता १२२ : अग्निशमन सेवांच्या बळकटीकरणासाठी विमोचन करण्यात आलेले निधी :

| अनु.क्र. | CRC Code | योजना | २०१७-१८ मधील वितरण | २०१८-१९ मधील वितरण |
|---|---|---|---|---|
| १ | २२१७ ८११९ | महानगरपालिकांमधील अग्निशमन सेवांचे बळकटीकरण करणे | १० | ८ |
| २ | २२१७ ३२१५ | नगरपरिषदांमधील अग्निशमन सेवांचे बळकटीकरण करणे | २० | १६ |

पुढे नव्याने स्थापन करण्यात आलेल्या नगरपरिषद प्रशासन संचालनालय (DMA) राज्य संवर्ग भाग म्हणून 'अग्निशमन सेवा' हा नवीन संवर्ग गठीत करण्यात आला. राज्यातील अग्निशमन सेवांचे व्यावसायिकरण करण्यासाठी खूप काळ जाईल.

आमच्या क्षेत्रभेटी दरम्यान झालेल्या चर्चे दरम्यान आम्हाला असे आढळून आले होते की, भांडवली अनुदाने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. आता नगरपरिषद प्रशासन संचालनालय (DMA) अग्निशमन सेवा संवर्गामधून एक अधिकारी उपलब्ध करून देण्याच्या प्रक्रियेतही आहे. पण अग्निशमन सेवांच्या सहायक कर्मचाऱ्यांचे काय आणि याचे मासिक शुल्क कोण पुरवणार ? हा प्रश्न नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला. हा देखभाल खर्चाशी निगडीत एक ठराविक समस्या आहे ; भांडवली अनुदानांसाठी निधी उपलब्ध आहेत मात्र त्यांचे कार्यन्वयन करण्यासाठी निधी उपलब्ध नाही. म्हणूनच बऱ्याच जागी अग्निशमनाच्या साधनांनी सुसज्ज असे वाहन (फायर टेंडर) पूर्णपणे कार्यक्षम नाही.

### ८.६५.१ राज्य वित्त आयोगाची शिफारस:

राज्य वित्त आयोग शिफारस करतो की, सरकारने लहान नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अग्निशमनाच्या साधनांनी सुसज्ज अशा वाहनासाठी (फायर टेंडर) बहुविध कार्य करणारे सहायक कर्मचारी नेमण्यास परवानगी द्यावी. म्हणजेच हे कर्मचारी नगरपालिकेच्या आवारात किंवा अग्निशमन केंद्राच्या जवळ राहतील, पण सुरक्षेसारखी कामे आणि कार्यालयातील अन्य किरकोळ कामे देखील

करतील. ही कामे करत असतानाही ते बोलावणे आल्यास अतिशय शिघ्रपणे अग्निशमनाच्या साधनांनी सुसज्ज अशा वाहनावर (फायर टेंडर) हजर होऊ शकतील. ही व्यवस्था विकसित करण्याची गरज आहे. लहान नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी पूर्णवेळेसाठी फायर टेंडर कर्मचारी नेमणे किफायतशिर ठरणार नाही. पण त्याचवेळी फायर टेंडर कर्मचाऱ्यांची आवश्यकता देखील आहे. म्हणूनच मध्यम मार्ग सुचवला आहे.

### ८.६६ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी परिरक्षण निधी निर्माण करण्याची गरज :

राज्य वित्त आयोगाने ‘लेखा, लेखा परिक्षण आणि वित्तिय माहिती ’ या प्रकरणामध्ये घसारा आकार आणि संबंधित प्रश्न याबाबत सविस्तरपणे मांडले आहेत. सध्याचा कल असा आहे की, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील भांडवली अनुदाने तसेच भांडवली गुंतवणूकी यामध्ये अलिकडच्या वर्षांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे नागरी स्वराज्य संस्थांची संपत्तीही वाढली आहे. परंतु, त्यांच्या परिरक्षण आणि देखभाल यांसाठी खर्च झालेल्या रक्कमेत प्रमाणशीर वाढ झालेली नाही. लहान आकाराच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची महसूल स्थिती आहे तशीच राहीली आहे, बराचसा निधी आस्थापना आणि अन्य तातडीच्या उपाययोजनांसाठी खर्च होतो. त्यामुळे परिरक्षा पैलू दुर्लक्षिला जातो आणि त्यामुळे मौल्यवान मालमत्तेचा वेगाने ऱ्हास होतो. हे सर्वसाधारणपणे खासगी क्षेत्रात घडत नाही, जेथे मालक त्याच्याकडे असलेल्या मालमत्तेच्या सुयोग्य परिरक्षणाबाबत अतिशय दक्ष असतात.

### ८.६६.१ राज्य वित्त आयोगाची शिफारस

राज्य वित्त आयोग अशी ठामपणे शिफारस करतो की, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या उत्पन्नांच्या स्रोतामधून २% परिरक्षा निधी निर्माण करणे आणि राखीव परिरक्षा निधीसाठी वेगळा राखून ठेवणे आवश्यक आहे असे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना निर्देश दिले पाहिजेत. राज्य वित्त आयोग अशीही शिफारस करू इच्छितो की, हा निधी MUINFRA मध्ये किंवा अशाच यंत्रणांमध्ये ज्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांपासून वेगळ्या आणि दूर आहेत, त्यांच्यामध्ये ठेवला पाहिजे. ही रक्कम जमा केल्यानंतर तीन वर्षांनंतरच ती काढण्यास परवानगी असली पाहिजे.

MUINFRA ची अनुदाने परिरक्षा निधीशी देखील संलग्न करता येतील. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सुयोग्य परिरक्षण निधी निर्माण करण्याची वित्तिय शिस्त उपनियम, कायदे आणि कार्यकारी आदेश यांद्वारे आणणे आवश्यक आहे.

### ८.६७ इमारती आणि अन्य बांधकाम कामगार, कल्याण कायदा, १९९६ अंतर्गत असलेल्या नागरी स्थानिक स्वराज्य प्रकल्पांमधून वसूल केलेल्या १ % उपकराचे प्रभावी उपयोगिता :

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांशी झालेल्या चर्चे दरम्यान असे आढळून आले की, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी कंत्राटदारांना अदा केलेल्या देयकांच्या

रकमेतून १% वसूल करण्याच्या पद्धतीबाबत प्रचंड तक्रारी होत्या. याबाबत नागरी स्वराज्य संस्थांचे (विशेषतः अशासकीय पदाधिकाऱ्यांचे) समर्थन असे आहे की, १% रक्कम तत्परतेने वसूल केली तरीही, जेव्हा कामगार मंडळाकडून १० लाखाच्या वरच्या बांधकाम योजना आणि प्रकल्प घेण्यात आले तेव्हा, संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेला फायदा झाला नाही आणि त्यांच्या नगरपालिकेमध्ये इमारत बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी कोणतेही कार्यक्रम हाती घेण्यात आले नाहीत.

या समस्येची पार्श्वभूमी म्हणजे भारत सरकारने -इमारत आणि अन्य बांधकाम कामगारांचा कल्याण उपकर कायदा सन १९९६ मध्ये लागू केला आहे. सन २००७ पासून या कायदा महाराष्ट्रामध्ये कार्यान्वित आहे. महाराष्ट्र इमारती आणि अन्य बांधकाम कामगार कल्याण मंडळ, मुंबई यांच्याद्वारे या कायद्याची अंमलबजावणी होत आहे. हे मंडळ महाराष्ट्र सरकारच्या कामगार विभागाच्या अंतर्गत येते. कंत्राटदारांना अदा केलेल्या रक्कमेतून वजा केलेली १% वजावट महाराष्ट्र इमारती आणि अन्य बांधकाम कामगार कल्याण मंडळाद्वारे कल्याण निधीमध्ये जमा केली जाते.

या मंडळाने त्यांनी वसूल केलेल्या रक्कमेच्या विनियोगाच्या पर्यायांबद्दल तपशिलवार नियम आणि मार्गदर्शक तत्वे तयार केली आहेत.

कल्याण मंडळाच्या अधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेतून हे उघड झाले की, ही संपूर्ण योजना नवीन असल्यामुळे या प्रकल्पांतर्गत कामाने अद्याप वेग घेतलेला नाही. सुमारे ७००० कोटी रुपये संकलित झाले असून कामगारांसाठी असलेल्या विविध कल्याणकारी योजनांतर्गत कामगारांना अद्याप ३३३ कोटी रुपये रक्कमेचे लाभ देण्यात आले आहेत. यातील बऱ्याचशा कल्याणकारी योजना आहेत.

नगरपालिका पातळीवर या कायद्यातील तरतूदी आणि संबंधित नियम यांबाबतचे पुरेसे आकलन होण्यामध्ये तफावत पडल्याचे दिसून येते. म्हणूनच नगरपालिकांना या क्षेत्रातील कामगारांसाठी या कायद्यामध्ये उपलब्ध असलेले फायदे पूर्णपणे उपयोगात आणणे शक्य होत नाही. कल्याण मंडळही त्यांचा दृष्टीकोन आणि योजना उपयोगकर्त्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवत नाहीत (जरी त्यांनी अलिकडच्या वर्षांत काही प्रसिद्धी आणि जाहिरात केली आहे.) इतके की निधीची भरपूर रक्कम साठून राहीली आहे, असे दिसून येते.

कामगार कल्याण मंडळामध्ये उपलब्ध असलेला निधी हुशारीने सुसज्ज करणे किंवा हस्तगत करणे हे आता प्रत्येक नगरपालिकेवर अवलंबून आहे. नगरपालिकेने दारिद्र्य निर्मूलन कक्षातील उपलब्ध कर्मचाऱ्यांचा उपयोग या कायद्याबाबतचे आपले आकलन वाढवण्याची क्षमता विकसित करण्यासाठी आणि त्यांच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये कामगार कल्याणासाठी उपलब्ध असलेला निधी कसा गतिशील करवा हे जाणून घेण्यासाठी करणे आवश्यक आहे.

### ८.६७.१ राज्य वित्त आयोगाच्या शिफारशी :

(अ) सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये या कायद्यामधील कल्याणकारी तरतूदींबाबत तातडीने जागरूकता निर्माण करण्याची गरज आहे. विशेषतः महानगरपालिकांमध्ये या कायद्याबाबत जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे, कारण या मोठ्या पालिकांमध्ये मोठ्या प्रमाणात बांधकाम प्रकल्प हाती घेतले जातात. जागरूकता निर्माण करण्याचे हे काम स्थानिक स्वराज्य संस्थांची अखिल भारतीय संस्था, यशदा किंवा कामगार कल्याण संस्था किंवा अशाच एखाद्या संघटनेकडे सोपवले पाहिजे.

(ब) दुसरे म्हणजे, कायद्याच्या कलम ३ (३) अंतर्गत तरतूदींनुसार, नगरपालिका भरणा करण्यात आलेल्या उपकराच्या १% रक्कम वसुली शुल्क म्हणून राखून ठेवू शकते( म्हणजेच १% च्या १%). मात्र या तरतूदींबाबत जागरूक नसल्यामुळे कोणतीही नागरी स्थानिक स्वराज्य संस्था ही १% रक्कम वसूल करत नाही आणि राखून ठेवत नाही.

(क) नगरपालिकेच्या आकारावर आधारित कामगार कायद्यातील तरतूदींबाबत परिचित असलेले सामाजिक कार्यकर्ते/ समुदाय विकास अधिकारी किंवा अगदी तरुण वकिल यांचा उपयोग करून कामगार मंडळातून उपलब्ध झालेल्या निधीचे समन्वय आणि प्राप्ती क्षमतेसाठी कामगार मंडळापासून उपलब्ध निधी सुसज्ज करणे इष्ट ठरेल. हे काम कामगारांची नोंदणी करून आणि मंडळामध्ये उपलब्ध असलेल्या विविध कल्याण योजनांसाठी कामगारांच्या वतीने निवेदन करुन करता येऊ शकते. हे काम देखील NULM विभागाकडे सोपवता येऊ शकेल. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे पुरसे कर्मचारी नसतील तर हे काम सामाजिक कल्याण महाविद्यालये किंवा अशाच बाह्य यंत्रणाद्वारेही करून घेता येईल.

(ड) उपलब्ध कल्याणकारी योजनांचे हुशारीने आकलन करणे, समन्वय आणि पाठपुरावा यांच्याद्वारे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील बांधकाम आणि अशाच संबंधित कामगारांच्या कल्याणासाठी बांधकाम कामगार कल्याण मंडळामधून एका वर्षामध्ये किमान ५०० ते १००० कोटी रुपये काढून घेता येणे शक्य आहे.

(इ) अशी शिफारस करण्यात येते की, नगर विकास विभागाने कामगार विभागाशी सल्ला मसलत करून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या फायद्यासाठी एक तपशीलवार शासन निर्णय जारी करावा.

### ८.६८ नागरी व्यवस्थापनाच्या राज्य संस्थेचा विकास :

आमच्या क्षेत्रभेटीदरम्यान वारंवार अशी मागणी करण्यात आली की, उपयोजित संशोधन आयोजित करतील आणि नगर विकास विभागाच्या उपक्रमांना भक्कम पाठींबा देतील अशा सुयोग्य प्रशिक्षण आणि संशोधन संस्था उभाराव्यात. सध्या महाराष्ट्राची ५० % हून अधिक लोकसंख्या शहरांमध्ये राहते आणि नगर व्यवस्थापनामध्ये वेळोवेळी अनेक आव्हाने निर्माण होत आहेत. योजना विकसित करण्यासाठी

मदत व्हावी म्हणून माहिती आणि विश्लेषणात्मक  निविष्टी देणारी एखादी संस्था असण्याची गरज आहे. नगर व्यवस्थापन संवर्गातील लोकांकडून अशा संस्थेची निकड अत्यंत प्रकर्षाने मांडण्यात आली. अगोदरच उपलब्ध असलेल्या संस्थांचा व्यवस्थेचा आढावा घेतल्यावर, यशदा ही नगर विकासाच्या समस्यांसाठी काम करणारी समर्पित बाजू आहे, असे दिसून आले. त्याचबरोबर अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था( ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट) ही एक संस्थादेखील आहे, जी स्वायत्त असली तरी देखील नगर विकास विभागाशी बऱ्याच काळापासून सहयोगी आहे.

### ८.६८.१ राज्य वित्त आयोगाच्या शिफारशी :

या उद्देशाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी एक लहान प्रशिक्षण आणि संशोधन समन्वय कक्ष स्थापन करावा अशी राज्य वित्त आयोगाची शिफारस आहे. या कक्षासाठी स्वतंत्र कार्यालय असावे. हा कक्ष संपूर्ण प्रशिक्षण आणि उपयोजित संशोधन उपक्रम यांचा समन्वय करू शकेल. यशदा,  ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट आणि राज्यामध्ये परिचित असलेल्या  अशाच काही संस्था यांच्यामध्ये  विशेषीकरणाची क्षेत्रे आणि लक्षित प्रशिक्षण श्रेणींची हाताळणी यांचे सुयोग्य वितरण झाले पाहिजे. अशाप्रकारे उदाहरण म्हणून एक संस्था एक संस्था लेखा, वित्त आणि संबंधित क्षेत्रांबाबत विशेषीकृत प्रशिक्षण घेऊ शकेल, तर दुसरी संस्था नागरी व्यवस्थापन आणि अन्य काही क्षेत्रांमध्ये समन्वय करू शकेल. या प्रशिक्षणाचा कालावधी काही दिवसांपासून ते ३ ते ६ महिन्यांपर्यंतचा असू शकतो.

दीर्घकालिन प्रशिक्षण योजना दृष्टिकोन (म्हणजेच ५ ते ७ वर्ष) हा विद्यमान प्रशिक्षण संस्थांना सुयोग्य शिक्षक नेमणे, संसाधने सुसज्ज करणे, प्रशिक्षण देण्याची आणि त्या क्षेत्रामध्ये विशेषीकरण प्राप्त करण्याच्या स्वतःच्या क्षमतेत सुधारणा करणे यासाठी उपयुक्त ठरेल. सध्या बदलत्या प्राधान्यक्रमांच्या अनिश्चिततेमुळे बरेचसे उपक्रम कमी कालावधीचे आणि काहीसे तात्पुरत्या स्वरुपाचे आहेत. महाराष्ट्राच्या लोकसंख्येचा आणि राज्याची प्रतिष्ठा  या बाबी लक्षात घेता नगर विकासाची गरज मोठ्या प्रमाणावर आहे. त्याचबरोबर नगर व्यवस्थापनासाठी समर्पित अशा संस्थेचीही गरज आहे.

## ८.६९ वित्त आयोगाच्या व इतर वितरीत अनुदानाच्या परस्पर वाटपाचे सूत्र

सध्या प्रचलित असलेले लोकसंख्या: क्षेत्रफळ गुणोत्तरावर आधारित ९०:१० हे गुणोत्तर तसेच सुरु ठेवण्याची आम्ही शिफारस करत आहोत. याबाबतची विस्तृत माहिती स्वतंत्र प्रकरणामध्ये देण्यात आलेली आहे.

---

## प्रकरण ९

## नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचे लेखा,  लेखा परिक्षण आणि वित्तीय माहिती सुव्यवस्थित करणे.

### ९.१ पायाभूत आव्हान:

चला समधर्मतेने सुरुवात करुया. समजा एखाद्या व्यक्तीला स्वत:च्या आरोग्याची स्थिती जाणून घ्यायची असेल तर ती व्यक्ती आरोग्य केंद्रात जाईल आणि स्वत:ची तपासणी करून घेईल. वैद्यकीय तपासणीचा अहवाल त्याचा रक्तदाब, रक्त शर्करा, कॉलेस्ट्रॉल (चरबी) इत्यादीबाबतची स्थिती स्पष्ट करतील. प्रत्येक आरोग्याचे निदर्शक सर्वसाधारण पातळीमध्ये आहे की काही विचलन आहे का हे दर्शवतील. त्या व्यक्तीच्या तपासणी अहवालाच्या आधारे डॉक्टर त्याच्यावर उपचार करतील. या सर्वांमध्ये येथे दोन गोष्टी गृहीत धरलेल्या आहेत:

अ) रक्तदाब, रक्त शर्करा पातळी तसेच अशाच इतर आरोग्याचे निदर्शकांची सर्वमान्य अशी 'सर्वसाधारण पातळी' आहे. समजा काही विचलन असलेच तर ते या सर्वस्विकृत सर्वमान्य 'सर्वसाधारण पातळी' च्या तुलनेत मोजले जाते.

ब) सर्वात महत्वाचे म्हणजे मोजमाप करणारी वैद्यकीय उपकरणे सुव्यवस्थित असल्यास एका चिकित्सा केंद्रातील अहवाल दुसऱ्या चिकित्सा केंद्रातील अहवालात तफावत आढळत नाही!

परंतु जेव्हा एखादा स्थानिक स्वराज्य संस्थाच्या 'वित्तीय आरोग्याचा' अभ्यास करतो तेव्हा त्यांस आढळून येते की स्थानिक स्वराज्य संस्थांची वित्तीय परिस्थिती प्रतिबिंबीत करणाऱ्या लेखा ठेवण्याच्या पद्धतीमध्ये कमालीची भिन्नता आहे. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांकडे त्यांचे लेखे आहेत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वार्षिक बैठकीमध्ये अगदी नियमितपणे त्यांचे लेखे (सर्वसाधारणपणे उत्पन्न आणि खर्च विवरणपत्र) सादर करत असले तरी देखील त्याची विश्वसनीयता, गुणवत्ता तसेच अचूकता असमाधानकारक आहे. त्यांच्या वित्तीय लेख्यामध्ये खालीलप्रमाणे त्रूटी निदर्शनास आल्या आहेत:

- महसूल आणि भांडवलाच्या घटकामध्ये चुकीचे वर्गीकरण.
- इतर प्रकारचे चुकीचे वर्गीकरण
- अपेक्षित जमा आणि देयकांबाबत स्पष्टता नसते यामुळे मालमत्ता आणि दायित्वांबाबतची अचूक स्थिती इतरांना समजणे अवघड होते (विशेषत: नागरी स्थानिक स्वराज्य संस्था)
- घसारा तरतूद केली जात नाही किंवा तरतूद जरी केली असली तरी स्वतंत्रपणे 'घसारा निधी' ठेवण्याऐवजी ती केवळ कागदावरची आकडेमोड असते.
- आगामी वर्षाच्या अर्थसंकल्पीय विवरणपत्रामध्ये उत्पन्न आणि खर्च एकमेकांना संतुलित करतील अशाप्रकारे प्रक्षेपित केले जातात (लेख्याच्या आवश्यकता पूर्ण करण्याकरीता) परंतु खरी परिस्थिती वेगळीच असते.

- मत्ता (घसारापश्चात) आणि दायित्वांचे खरे मूल्य उघड करण्यात येत नाही.
- बँकेतील शिल्लकी (जुन्या प्रकल्पासहीत) स्पष्टपणे उघड केलेल्या नाहीत.
- कोणत्याही प्रकारच्या वित्तीय गुणोत्तरांचा अभाव, ज्यान्वये स्थानिक स्वराज्य संस्थांची कामगिरीची एकमेकांच्या संदर्भाने आणि विभिन्न कालावधीत गणना करण्यात येईल.

साध्या भाषेत सांगायचे तर , स्थानिक स्वराज्य संस्थाकडून लेखा प्रणालीत ' कालबाह्य पद्धती ' अवलंबिल्या जातात आणि त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हितसंबंधितांना त्यांच्या चालू वित्तीय आरोग्याचे 'खरे आणि योग्य चित्र' देण्यास अपयशी ठरते.

विशेषत: छोट्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्राम पंचायतीमध्ये लेखांकनाची तत्वे समजू शकतील अशा कर्मचाऱ्यांचा अभाव आहे. त्यांना  फक्त रोकड वही (कॅश बूक) आणि काही नोंदणीपुस्तक तसेच लेजर कसे ठेवायचे याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यांना याबाबत योग्य असे मार्गदर्शन देखील उपलब्ध नाही. कारण त्यांच्या वरिष्ठांना स्वत:लाच लेखाकंन स्वरुप आणि त्यांचे महत्व तसेच ते कसे करायचे याबाबतची काही माहिती नसते.

**संपूर्ण भारतामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये लेखा ठेवणे ही सार्वत्रिक समस्या आहे** आणि याचा अनेक वर्षापासून पाठपुरावा करण्यात येत आहे.  याबाबत पुर्वीच्या केंद्रिय वित्त आयोगाने केलेली काही निरिक्षणे खालील प्रमाणे आहेत:

### ९.१.१ बारावा केंद्रिय वित्त आयोग (२००५-१०)

बहुतांशी राज्यांकडे त्यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वित्तीय बाबींबाबत विश्वसनीय माहिती नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांना माहिती साठा (डेटा बेस) तयार करणे आणि लेखा देखभालीकरीता सतत वित्तीय सहाय करणे आवश्यक राहील.  याबाबतीत राज्यांनी प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थाच्या आवश्यकतांचे मुल्यमापन करावे आणि एकूण निधीमधून आमच्या शिफारशीनुसार त्यांना निधी देण्यात यावा. (परिच्छेद ८.५५)

### ९.१.२ तेरावा केंद्रिय वित्त आयोग (२०१०-१५)

'राज्य शासनाने अकराव्या, बाराव्या आणि या वित्त आयोगाला स्थानिक स्वराज्य संस्थाबद्दल दिलेल्या जमा व खर्चाबाबत दिलेल्या माहिती संदर्भात लक्षणीय विसंगती आहे.  या विसंगतीमुळे माहितीची विश्वासहार्यता कमी होते. दुर्दैवाने, या लागोपाठच्या  वित्तीय आयोगांना अगदी आम्हाला देखील स्थानिक स्वराज्य संस्थाबाबत पुरविलेल्या माहितीची स्वतंत्रपणे पडताळणी करता आली नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वित्तीय आणि कामगिरीच्या माहितीचे लेखापरिक्षण तपासण्याकरीता एक प्रणाली असणे अत्यंत आवश्यक आहे ज्यामुळे सदर लेखे विश्वासार्ह असतील.' (परिच्छेद १०.९३)

'अकराव्या वित्तीय आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांचा माहिती साठा (डेटा बेस) आणि लेखा अद्ययावत करणे तसेच राखणे याबाबतच्या त्रुटी भरून काढण्याकरीता राज्य शासनाने तरतूद करण्याच्या आवश्यकतेबाबत सांगूनही दहा वर्षांचा कालावधी लोटला. बाराव्या वित्त आयोगाने देखील अशाच त्रुटी दाखवून सारख्याच शिफारशी करून देखील पाच वर्षांचा कालावधी लोटला. या महत्वाच्या विषयाबाबत आधीच्या वित्त आयोगांनी बऱ्याच टिप्पण्या केल्या आहेत. इतके सर्व होऊनही या परिस्थितीमध्ये अगदी अत्यल्प सुधारणा दिसून आली आहे. आम्ही यापूर्वीच्या आयोगांनी माहिती साठा, लेखा तसेच लेखापरिक्षणाबाबत दिलेल्या शिफारशी स्वीकारतो, त्यांस पाठींबा देतो तरीही या समस्येला हाताळण्याकरीता केवळ निधी पुरवठ्याव्यतिरिक्त वेगळा दृष्टीकोन अंगिकारणे आवश्यक आहे.' (परिच्छेद १०.९४)

'परिच्छेद १०.९२ ते १०.९४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे, सर्व संस्थांचे वित्तीय आणि प्रचलन कामगिरीबाबतचा माहितीसाठा अजुनही सुमार दर्जाचा आहे.' (१०.१०६)

### ९.१.३ चौदावा वित्तीय आयोग (२०१५-२०)

'लागोपाठच्या वित्तीय आयोगांनी वित्तीय माहिती नसल्याबद्दल आणि जिथे माहिती उपलब्ध आहे तेथील तिच्या सुमार दर्जाबद्दल चिंता व्यक्त केली आहे.' (परिच्छेद ९.५७).

'आमचे असे मत आहे की वित्तीय दायित्वाची सुरुवातच सुयोग्य वित्तीय लेखे ठेवण्याने होते. वार्षिक लेखे न ठेवणे किंवा संकलित करण्यात विलंब करणे याचाच अर्थ वित्तीय दायित्वामध्ये तडजोड करण्यासारखे आहे. याचा अर्थ असाही होतो की स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संसाधनाच्या गरजा निश्चित करण्याकरीता विश्वसनीय वित्तीय माहिती उपलब्ध नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळणाऱ्या सार्वजनिक निधीमध्ये दिवसेंदिवस वाढच होत असतांना देखील त्यांच्याकडे विश्वासाने सुपूर्द केलेल्या निधीच्या दायित्व आणि जबाबदारीच्या कक्षेबाहेर ठेवतात ही बाब अमान्य आणि निश्चितच अस्वीकाराहार्य आहे.' (परिच्छेद ९.६०)

'आम्ही अशी शिफारस करतो की, स्थानिक स्वराज्य संस्थाकडून करण्यात येणाऱ्या वित्तीय लेख्यामध्ये त्यांचे स्वत:चे कर आणि करेतर उत्पन्न, नियुक्त कर, करातील हिस्सा आणि राज्याकडून मिळणारे अनुदान, वित्त आयोगाकडून मिळणारे अनुदान, केंद्र आणि राज्य सरकार यांच्याकडून कोणत्याही संस्थाच्या कार्याकरीता येणारे अनुदान या सर्व उत्पन्नाची सुस्पष्टपणे नोंद असावी. या व्यक्तिरिक्त आम्ही अशीही शिफारस करतो की भारताचे नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांच्याकडून तांत्रिक मार्गदर्शन आणि आधारभूत व्यवस्था सुरु राहावी आणि राज्याने स्थानिक स्वराज्य संस्थांना लेखे संकलित करणे आणि वेळेत लेखापरिक्षण करुन घेणे याबाबीं स्थानिक स्वराज्य संस्थांना सुकर होण्याकरीता कार्यवाही करावी.' (परिच्छेद ९.६१)

'सर्व राज्य वित्त आयोगाकडून उपस्थित करण्यात आलेली सर्व साधारण समस्या म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पातळीवर जमा आणि खर्च यांबाबतच्या विश्वसनीय माहितीच्या अभावामुळे त्यांच्या

कामावर विपरीत परिणाम  झाला आहे. आमच्या मार्फत पंचायत समित्या आणि नगरपालिका यांच्या करण्यात आलेल्या वित्तीय अभ्यासामध्ये देखील अशाच प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागले आहे. मागील तिन्ही वित्त आयोगांनी विश्वसनीय माहिती आणि लेखा तसेच यांकरीता तरतूद करण्याची मागणी करूनही विशेष काहीही झालेले नाही. आमच्या मते ही काही समाधानकारक बाब नाही.' (परिच्छेद ९.७५)

**९.१.४ तिसऱ्या राज्य वित्त आयोगाची निरिक्षणे (जुन २००६):**

'आयोगाच्या वापराकरीता माहिती संकलित करण्यात आलेल्या अडचणी बाबत आम्ही थोडक्यात टिप्पणी करत आहोत...'

- मुक्त न केलेले वेतन आणि निवृत्तीवेतन दायित्व तसेच भविष्य निर्वाह निधी योगदानातील तूट आणि इतर संविधानिक निधी संदर्भातील माहिती सहज उपलब्ध नाही.
- त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य वीज महामंडळ यांना देय असलेल्या थकीत देयकांच्या बाबतीतील माहिती सुस्पष्टपणे उपलब्ध करून दिलेली नाही.
- 'नगर विकास विभागाकरीता एकत्रित माहिती साठा निर्माण करणे ही बाब सर्वोच्च तातडीची असावी.'
- नगरपालिका संस्थाकडून खर्च आणि जमाच्या वर्गीकरणामध्ये आम्हाला बरीच भिन्नता आढळून आली आहे.
- 'स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये देखील लेखा वर्गीकरणाच्या अनेक समस्या आहेत.'

थोडक्यात, वरील निरिक्षणामधून सहजच लक्षात येईल की भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या लेखा पद्धती अपेक्षित स्थितीत नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थांची मुलभूत वित्तीय माहितीच योग्य नसेल किंवा सहजी उपलब्ध नसेल तर राज्य वित्त आयोगासारख्या कोणत्याही संस्थेला तिच्या वित्तिय आरोग्याचे सखोल विश्लेषण करणे किंवा  स्पष्टपणे सांगणे अत्यंत कठीण होते.

इतकेच नाही तर तेराव्या आणि चौदाव्या केंद्रिय वित्त आयोगाने विशिष्ट लेखा विषयक सुधारणा आणि बदल अनिवार्य केले आहेत आणि कार्यात्मक अनुदान मुक्त करण्याकरताच्या पूर्व अटीमध्ये समाविष्ट केल्या आहेत. त्यामुळेच राज्य वित्त आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थाच्या लेखे ठेवण्याच्या पद्धतीमध्ये अपेक्षित बदलांना सुरुवात केली आहे.

१३व्या केंद्रिय वित्त आयोगाने आणि १४व्या केंद्रीय वित्त आयोगाने सुचविलेले बदल, राज्य शासनाने केलेली कार्यवाही आणि आमचे शेरे खाली दिलेले आहेत:

९.१.५ केंद्रिय वित्त आयोगाने लेखाकंन संदर्भातील सुधारणा आणि संबंधित सुधारणा बाबत केलेल्या शिफारशी:

### ९.१.५.१ तेरावा केंद्रिय वित्त आयोग:

तक्ता १२३: १३ व्या केंविआच्या शिफारशींवर शासनाने केलेली कार्यवाही :

| अनु. क्र. | केंद्रिय वित्त आयोगाने केलेल्या शिफारशी | राज्य शासनाने केलेली कार्यवाही (आता पर्यंत) | शेरा |
|---|---|---|---|
| १ | राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (पंचायत राज आणि नागरी स्वराज्य संस्थांना स्वतंत्रपणे) (वित्त लेख्याशी संबंधित नसलेलेही)अर्थसंकल्पीय माहितीची पुरवणी सादर करावी. परिच्छेद-१०.११० | तेव्हापासून राज्य शासनाने अर्थसंकल्पामध्ये आवश्यक ते पुरवणी दस्तऐवज सादर केले आहेत. | तथापि,पुरवणी दस्त -ऐवज वापरकर्त्यांना अधिक सुलभ होईल असे असावे, कारण ग्राविवि आणि नविवि या दोन्ही विभागाकडून नियमित स्वरुपात वापरले जात आहे. |
| २ | भारताचे नियंत्रक आणि महालेखापाल यांनी विहीत केलेल्या स्वरुपामध्ये राज्य शासनाने पंचायत राज संस्थेचे लेखे ठेवले पाहिजेत. भारताचे नियंत्रक आणि महालेखापाल तसेच पंचायत राज मंत्रालयाने नमुना पंचायत लेखाकंन पद्धती तयार केली आहे. सर्व राज्यांनी नमुना पंचायत लेखाकंन पद्धतीशी सुसंगत अशा लेखाकंनाच्या आराखडा आणि संकेतांकाचे नमुन्याचे अनुसरण करणे अपेक्षित आहे. | राज्य शासनाने (ग्राम विकास विभाग) नमुना पंचायत लेखाकंन पद्धती अवलंबिली आहे. | जरी स्वीकृत केली असली तरी अंमलबजावणीमध्ये लक्षणीय त्रूटी आहेत. |
| ३. | इतकेच नाही तर याशिवाय, राज्य पातळीवर पंचायत राज संस्थेच्या अर्थसंकल्पीय तरतुदीच्या वाटपावर योग्य देखरेख तसेच लेखा संकलनाकरीता राज्यांनी | या शिफारशीची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. | |

| अनु. क्र. | केंद्रिय वित्त आयोगाने केलेल्या शिफारशी | राज्य शासनाने केलेली कार्यवाही (आता पर्यंत) | शेरा |
|---|---|---|---|
| | प्रत्येक जिल्हापरिषद, गट पंचायत आणि ग्राम पंचायतीकरीता विशिष्ट संकेतांक द्यावा. | | |
| ४ | राज्य शासनाने सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राष्ट्रीय नगरपालिका लेखा नियमावलीत सूचित संकेतांक नमुन्याशी सुसंगत लेखाकंन आराखडयाची अंमलबजावणी करावी. | राज्य शासनाने जानेवारी २०१३ मध्ये महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता अधिसूचित केली आहेत. ही सर्व नगरपालिकांना लागू आहे. | जरी राज्य शासनाने राष्ट्रीय नगरपालिका लेखा नियमावलीशी सुसंगत अशा नव्या महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता अनुसरल्याचे अधिसूचित केले असले तरी अंमलबजावणीमध्ये बऱ्याच समस्या आहेत. याउपर, महाराष्ट्र महानगर पालिका कायद्यात असलेल्या काही विशिष्ट तरतूदीं मोठ्या महानगर पालिकांना म्हणजेच मोठ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना लागू करण्याकरीता त्यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे |
| ५ | राज्य शासनाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखा परिक्षणाकरीता प्रणाली स्थापित करणे अनिवार्य आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वित्तीय कामगिरीबाबत विश्वसनीय माहिती मिळणे | महाराष्ट्रातील स्थानिक निधी लेखापरिक्षण यांच्याकडून स्थानिक स्वराज्य संस्थाचे नियमितपणे लेखापरिक्षण करण्यात येते. वार्षिक लेखा प्रमाणपत्र देण्यात | तथापि, स्थानिक निधी लेखापरिक्षण विभाग ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थापैकी केवळ जिल्हा परिषदांच्या लेख्यांचे परिक्षण आणि प्रमाणित |

| अनु. क्र. | केंद्रिय वित्त आयोगाने केलेल्या शिफारशी | राज्य शासनाने केलेली कार्यवाही (आता पर्यंत) | शेरा |
|---|---|---|---|
| | अवघड आहे. यामुळे संपूर्ण क्षेत्राचा तसेच प्रत्येक श्रेणीच्या स्थानिक स्वराज्य संस्थाचा अभ्यास करण्यास प्रतिबंध होतो. (परिच्छेद १०.९२, १०.९३ आणि १०.९४ तसेच १०.१२१) | येते. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकरीता स्थानिक निधी लेखा-परिक्षणाकडून लेखा परिक्षण करण्यात येते. परंतु स्थानिक निधी लेखापरिक्षण विभागाकडून 'लेख्याचे प्रमाणन' करण्यात येत नाही. | करते. त्यांना नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या लेख्यांचे प्रमाणित करण्यात काही समस्या येतात त्याबद्दलची कारणे आमच्या अहवालात दिलेली आहेत. |
| ६ | राज्य शासनाने या आयोगाने दिलेले अनुदान केंद्र सरकारकडून प्राप्त झाल्यापासून ५ दिवसांच्या आत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थाना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने त्यांच्या खात्यात हस्तांतरित करण्याकरीता प्रणाली स्थापित करायला हवी. (परिच्छेद १०.१६१.४) | राज्य सरकार स्थानिक स्वराज्य संस्थांना सर्व निधी इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेच हस्तातंरीत करते. | |

### ९.१.५.२ चौदावा केंद्रिय वित्त आयोग:

तक्ता १२४: १४ व्या केंविआच्या शिफारशींवर शासनाने केलेली कार्यवाही:

| अनु. क्र. | केंद्रिय वित्त आयोगाने केलेल्या शिफारशी | राज्य शासनाने केलेली कार्यवाही (आता पर्यंत) | शेरा |
|---|---|---|---|
| १ | आम्ही अशी शिफारस करतो की स्थानिक स्वराज्य संस्थांनी तयार केलेल्या लेखा पुस्तकांमध्ये स्वत:चे कर उत्पन्न, करेतर उत्पन्न, नियुक्त कर, करातील हिस्सा(विचलन) आणि अनुदान, वित्तीय | राज्य शासनाने या पूर्वीच म्हणजे २०१३ पासून नवीन नगरपरिषद लेखा संहिताचा अवलंब केला आहे. | अंमलबजावणी काहीशी घाई गडबडीत करण्यात आलेली आहे. अंमलबजावणी बाबत अनेक कच्चे दुवे राहिलेले आहेत, |

| अनु. क्र. | केंद्रिय वित्त आयोगाने केलेल्या शिफारशी | राज्य शासनाने केलेली कार्यवाही (आता पर्यंत) | शेरा |
|---|---|---|---|
| | आयोगाकडील अनुदान तसेच केंद्र आणि राज्य सरकारांनी नियुक्त केलेल्या संस्था कार्याकरीताचे अनुदान या सर्वाबाबत सुस्पष्टता असली पाहिजे. याशिवाय भारताचे नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांच्याकडून तांत्रिक मार्गदर्शन आणि सहाय व्यवस्था सुरुच ठेवण्यात याव्यात आणि राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांना वेळेत लेखे पूर्ण करून लेखापरिक्षण करून घेण्यास सुलभ होईल याकरीता कार्यवाही करावी. (परिच्छेद ९.६१) | राज्य शासनाने लेखा परिक्षण प्रणाली सुस्थापित केलेली आहे. | याबाबत या अहवालात स्वतंत्रपणे निदर्शनास आणले आहेत. |
| २ | दोन अटींची पूर्तता करण्यात आल्यानंतरच कार्यात्मक अनुदान मुक्त करण्यात यावे अ) लेखापरिक्षित लेखा ब) स्वत:च्या महसुलामध्ये सुधारणा. ही बाब पंचायत राज संस्था तसेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्था या दोन्हींना लागू राहिल. याशिवाय नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी मुलभूत सेवांकरीता सेवा पातळीचे बेंचमार्कचे मोजमाप करून प्रसिद्ध करावेत. (परिच्छेद ९.७५) | राज्याकडे लेखापरिक्षण प्रणाली आहे (स्थानिक निधी लेखापरिक्षण) आणि याशिवाय महालेखापाल लेखापरिक्षण सुद्धा आहेत. | स्थानिक निधी लेखापरिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यात यावी. याउपर अजुनही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरीता प्रमाणन प्रणाली स्थापित करण्यात आलेली नाही. |

**९.६ तांत्रिक कार्यशाळांचे आयोजन:**

या राज्य वित्त आयोगाच्या लक्षात आले आहे की योग्य लेखा ठेवणे म्हणजे ज्यामुळे:

(अ) स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लेख्याचे वास्तविक चित्र प्रतिबिंबीत होईल आणि

(ब) एका स्थानिक स्वराज्य संस्थेची त्याच श्रेणीतील दुसऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेशी तुलना करणे तसेच अनुमान काढणे शक्य होईल. स्थानिक स्वराज्य संस्थांकरीता (आणि विशेषत: नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरीता) ही एकमेव महत्वाची सुधारणा आहे, या सुधारणेशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांचे वित्तीय आरोग्याविषयी योग्य अंदाज करता येणार नाही.

याकरीताच या राविआने १३ डिसेंबर २०१८ रोजी मुंबई येथे तांत्रिक कार्यशाळेचे आयोजन केले होते. महालेखापालांनी या तांत्रिक कार्यशाळेचे उदघाटन केले होते. या समस्येशी संलग्नित विविध विभाग जसे की स्थानिक निधी लेखापरिक्षण, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग यांचे अधिकारी तसेच काही निवडक क्षेत्रिय अधिकारी यांनी देखील या कार्यशाळेत भाग घेतला होता. असे निदर्शनास आले की अनेक लेखा संबंधित समस्यांकडे दुर्लक्षच झाले आहे कारण त्यासाठी विविध विभाग किंवा अधिकाऱ्यांचा समन्वय आवश्यक आहे. स्थानिक निधी लेखापरिक्षण वित्त विभागाच्या अंतर्गत काम करते, त्याच वेळी स्थानिक स्वराज्य संस्था ग्राम विकास विभाग आणि नगर विकास विभागाच्या अखत्यारीत येतात. काही समस्यांबाबत (जसे की प्रति संदर्भ संकेतांक बदलणे) महालेखापालांची मान्यता आवश्यक असते. या कार्यशाळेचा उद्देश सर्व संबंधितांची समोरासमोर चर्चा होणे, प्रत्येकाने दुसऱ्याला समजून टप्प्याटप्प्याने आवश्यक बदल घडवून आणणे हा होता.

डिसेंबर २०१८ च्या कार्यशाळेत झालेल्या चर्चा तसेच याउपर क्षेत्रीय अधिकारी आणि स्थानिक निधी लेखापरिक्षण सोबतच्या चर्चेच्या आधारे, आम्हाला निदर्शनास आलेल्या अत्यंत महत्वाच्या त्रुटी आणि त्यांवर मात करण्याच्या उपाययोजना आम्ही देत आहोत.

**९.६.१ लेखा ठेवण्याच्या पद्धती आणि प्रक्रियेबाबतची निरिक्षणे आणि शिफारशी:**

**९.६.१.१ नगर परिषदा- लेखा ठेवण्याचे स्वरुप:**

१३ व्या केंद्रिय वित्त आयोगाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मुलभूत अनुदान मुक्त करण्याकरीताच्या पुर्वलक्षी अटीमध्ये योग्य लेखा ठेवण्याची अट घातली. यामुळेच याची अंमलबजावणी करण्याकरीता महाराष्ट्र नगर परिषद कायद्याच्या कलम १०२(१) अंतर्गत आपल्या अधिकाराचा उपयोग करून नगर विकास विभागाने दिनांक २३ जानेवारी २०१३ रोजी नवीन महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता अधिसूचित केली. केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या नगरपरिषद लेखा संहितेच्या नमुन्याशी नवीन महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता अनुरुप आहे.

याचा अर्थ नगरपालिका लेखा संहिता सर्व महानगरपालिका परिषदांनी अनुसरणे आवश्यक आहे. महानगरपालिका लेखाकंन संहितेनुसार दुहेरी नोंद पद्धती अवलंबिणे अपेक्षित आहे तसेच काही प्रमुख सेवा जसे की पेयजल पुरवठा, मलनि:सारण प्रक्रिया, घनकचरा व्यवस्थापन इत्यादी यांच्या उत्पन्न खर्चाचे स्वतंत्र विवरणपत्र असावे.

तथापि प्रत्यक्ष नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर २०१३ च्या अधिसुचनेनुसार दुहेरी नोंद पद्धत अनुसरली नाही. यांस केवळ कर्जत महानगरपालिका हा एकमेव अपवाद आहे येथे स्थानिक लेखा अधिकाऱ्याच्या पुढाकाराने आणि उत्साहाने लक्षणीय प्रगती दिसून येत आहे.

एक सोडून बाकीच्या महानगरपालिकांनी दुहेरी नोंद पद्धतीचा अवलंब न करण्याची कारणे पुढील प्रमाणे आहेत.

सर्व प्रथम नगरपालिका कर्मचाऱ्यांना दुहेरी नोंद पद्धतीबद्दल ज्ञान नाही किंवा त्यांना याबाबत प्रत्यक्ष काम करतांना सहाय्य प्राप्त होत नाही. दुसरे असे की तुम्ही नवीन पद्धती अवलंबिली नाही तर त्यांचे नुकसान होईल अशा प्रकारचा दबाव त्यांच्यावर नाही. तिसरे म्हणजे दोन्ही पातळ्यांवर वास्तविक अडचणी आहेत जसे की नागरी स्थानिक स्वराज्य संस्थापातळी (जुनी पद्धतीनुसार काम करण्याकरीता देखील लेखा कर्मचाऱ्यांची कमतरता आहे.) आणि नगरपरिषद प्रशासन संचलनालयामध्ये देखील या क्षेत्रातील तज्ञ नाही आणि महाराष्ट्र वित्त व लेखा सेवांमधील एक किंवा दोन लेखा अधिकारी नियमित निधी वितरण तसेच संबंधित समस्यांमुळे पुरते व्यस्त आहेत. आधीच भरपूर दैनंदिन जबाबदाऱ्या असलेल्या लेखा अधिकाऱ्यांवर अवलंबून राहून, तज्ञ व समर्पित कर्मचाऱ्यांशिवाय अशा प्रकारचा आमुलाग्र तांत्रिक बदल करून सुधारणा घडवून आणणे अशक्यप्राय होते.

नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने लेखा आणि वित्तीय माहितीसाठामध्ये सुधारणा घडवून आणण्याकरीता अंमलबजावणीच्या दिशेने प्रामाणिक प्रयत्न केले आहेत हे सांगणे आवश्यक आहे. संचालनालयाने सन २०१३-१५ दरम्यान नगरपालिका अधिकाऱ्यांकरीता मोठ्या प्रमाणात नवीन नगरपरिषद लेखा संहितेच्या प्रशिक्षणाचे आयोजन केले होते.

त्यानंतर, संचलनालयाने राज्य पातळीवरील सनदी लेखाशास्त्र संस्था (मेसर्स एस. के. पटोदिया ॲन्ड असोसिएटस) आणि अनेक क्षेत्रपातळीवरील सनदी लेखापाल संस्थांची दुहेरी नोंद स्वरुपात नोंदी ठेवण्याच्या चांगल्या पद्धतीमध्ये महानगरपालिकांना स्थित्यंतर करण्यास मदत करण्यासाठी नेमणूका केल्या. क्षेत्रीय पातळीवरील सनदी लेखापाल संस्था एकदंरीत राज्य पातळीवरील सनदी लेखापाल संस्थेच्या दिशादर्शनाखाली काम करतात.

मागील तीन वित्तीय वर्षाकरीता, या क्षेत्रीय पातळीवरील सनदी लेखापाल संस्थांनी नगरपालिकांना भेट दिली आणि त्यांचे (एकल नोंदी) वित्तीय लेखे दुहेरी नोंदी स्वरुपात बदलले आहेत. त्यांनी नगरपरिषद लेखा संहिता, २०१३ च्या प्रमाणकानुसार महसूल आणि खर्चाचे वर्गीकरण सुद्धा केले

आहे. त्यांनी २२५ नगरपालिकांमध्ये वित्तीय वर्ष २०११-१२ ते २०१६-१७ पर्यंतचे लेखा दुहेरी नोंदणी पद्धतीने तयार केले आहेत. या दुहेरी नोंदीची आकडेवारी आता राज्य पातळीवर उपलब्ध असून तुलना करण्याच्या उद्देशाकरीता वर्गीकरण करण्यात येत आहे.

तथापि सनदी लेखापाल संस्थांनी केलेले हे प्रयत्न 'संमातर प्रयत्न' राहिलेत आणि आमच्या क्षेत्र भेटीदरम्यान नगरपालिका अधिकाऱ्यांकडून आम्हाला समजले की त्यांनी या प्रयत्नाचा कामात उपयोग करुन घेतला नाही. काम पूर्ण झाल्यावर सनदी लेखापाल संस्थांना दुहेरी नोंदणीमध्ये रुपातंरीत करण्यासाठी उपलब्ध करून देणेच त्यांना पुरेसे वाटते.

### ९.६.१.२ नगरपरिषदांकरीता राविआच्या शिफारशी:

शासनाने लेख्याची दुहेरी नोंद पद्धत नगरपरिषद लेखा संहिता २०१३ मध्ये लिहिल्यानुसार व समजून सुरु ठेवण्यास प्राधान्यक्रम दिला पाहिजे. शासनाने नगर परिषदांना दुहेरी नोंदणी पद्धतीने लेखा नोंदी ठेवण्याकरीता स्थित्यंतर करण्यासाठी प्रशिक्षण मार्गदर्शन असे सहाय केले पाहिजे आणि सद्य स्थितीतील आधी नेहमी प्रमाणे नोंदी करून नंतर सनदी लेखा संस्थाकडून त्याचे रुपातंर दुहेरी नोंदीमध्ये करण्याची पद्धत निरसित केली पाहिजे. ही पध्दत कितीही प्रशंसनीय उद्देशाने सुरु केली असली तरी या संमातर व्यवस्थेमुळे दुहेरी नोंदी करण्याची परिषदांची (स्वत: बदलण्याची) जबाबदारी सनदी लेखापाल संस्थाकडे हस्तातंरित केली जाते.

दुहेरी नोंदणी लेखा प्रणालीची अंमलबजावणी करण्याकरीता वारंवार केलेले प्रयत्न म्हणजे वेगळया स्वतंत्र कार्यक्रमासारखे असून त्यातून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थावर अपेक्षित एकजिनसी परिणाम झाला नाही. याच बरोबर स्वतंत्र वेगळे दुहेरी नोंदणी लेखांकनाचे व्यासपीठ केवळ ऐतिहासिक लेखाकंनाची खातरजमा करतात. तथापि आताचे डिजिटल तंत्रज्ञान पाहता वास्तविक स्थितीतील लेखांकन ही काळाची आवश्यकता आहे. हे सुनिश्चित करण्याकरीता इआरपी प्रणाली संरेखित करता येईल ज्यामधील वास्तविक लेखाकंनामुळे अपेक्षित परिणाम प्राप्त होतील. प्रत्यक्ष वेळेतील लेखांकन हे व्यवस्थापन तसेच शासनाला देखील योग्य व्यवस्थापन माहिती प्रणाली प्रवाहासाठी उपयुक्त ठरेल.

इआरपी आधारीत प्रणालीत स्थित्यंतर करण्याची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने करता येईल, म्हणजेच १/३ परिषदा दर वर्षी दुहेरी नोंदणी पद्धतीचा अवलंब करू शकतात. अशा प्रकारे पुढील तीन वर्षामध्ये सॉफ्टवेअरवर आधारीत दुहेरी नोंदणी पद्धतीतील स्थित्यंतराची प्रक्रिया पूर्ण होईल. शासन सक्षम आणि चांगले व्यवस्थापन असलेल्या परिषदांपासून या बदलाची सुरुवात करू शकते. प्रत्येक श्रेणीतील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकरीता (अ वर्ग, ब वर्ग, क वर्ग नागरी स्थानिक स्वराज्य संस्था) व्यावसायिक तज्ज्ञांकडून स्थानिक घटक विचारात घेऊन स्वतंत्र विशिष्ट इआरपी प्रणाली संरेखित करता येईल.

प्रमाण लेखांकन परिभाषेसह (इंग्रजी आणि मराठीमधील)नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडून चांगले लेखांकन करणारे इआरपी सॉफ्टवेअरचे पॅकेज उपलब्ध करून द्यायला हवे. असे समजले आहे की इआरपी सॉफ्टवेअरच्या किंमती फारच कमी झाल्या आहेत. बाजारात अगदी छोटे उपहारगृह आणि दुकानांमध्ये देखील हल्ली इआरपी सॉफ्टवेअर वापरले जाते.

इआरपी सॉफ्टवेअर वापरण्यास सुरुवात केली म्हणून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रोत्साहनपर निधी देण्यात येऊ शकतो.

या सॉफ्टवेअर पॅकेजने केवळ दुहेरी नोंदी शक्य होणे इतकेच अपेक्षित नाही तर यामुळे पाणी पुरवठा, स्वच्छता तसेच घन कचरा व्यवस्थापन आणि इतर क्षेत्रातील उत्पन्न आणि खर्चाबाबतच्या परिस्थितीचे(विविध शीर्षकांतर्गत) प्रतिबिंबित झाले पाहिजे.  वर्तमान परिस्थितीमध्ये विविध प्रकारचे खर्च एकत्रच नोंदविले जातात त्यामुळे परिषदेकडून पुरविण्यात येणाऱ्या अनेक सेवांच्या बाबतीत खर्च वसुलीचे प्रमाण किती आहे हे समजणे कठीण होते. चांगल्या लेखांकन पद्धतीमुळे महानगरपालिकांना लक्षात येईल की कोणत्या क्षेत्रामध्ये लक्ष देण्याची आवश्यकता आहे आणि कोठे ते स्वत:मध्ये सुधारणा करू शकतात. आज त्यांना नेमकी अडचण कुठे आहे तेच समजत नाही.

वरील बदलांची अंमलबजावणी करण्याकरीता प्रत्यक्ष सहाय करण्याबाबतच्या पद्धती तपशीलवारपणे या प्रकरणात पुढे दिलेल्या आहेत.

### ९.७ महानगरपालिका- लेखांकन  स्वरुप

### ९.७.१ निरीक्षण:

नवीन  नगरपरिषद लेखा संहिता,२०१३ महानगरपालिकांना लागू करण्यात आलेली नाही. याचे कारण उघड आहे की महाराष्ट्र महानगरपालिका कायद्याच्या कलम ९३ मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की 'महानगरपालिकांच्या जमा आणि खर्चाचे लेखे स्थायी समिती वेळोवेळी जसे सांगतील तशा पद्धतीने आणि स्वरुपात ठेवण्यात येतील'. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर महानगरपालिकांचे लेखे कसे ठेवावेत हे महानगर पालिकांच्या स्थायी समितीवर सोपविण्यात आलेले आहे. कायद्यातील ही तरतूद स्वातंत्र्यपूर्व काळात केलेली असण्याची शक्यता आहे.

तथापि, महानगरपालिकांचा विशेषत: मोठ्या शहरांचा (जसे की अ, ब आणि क श्रेणीच्या महानगरपालिकांचा) उत्पन्न आणि खर्च प्रचंड मोठ्या प्रमाणावर असतो, त्यामुळे ते खालील कारणांसाठी त्यांच्या पातळीवर लेखांकन पद्धती (सॉफ्टवेअर पॅकेज वापरून) सुधारण्याच्या प्रयत्नात असतात:

- चांगल्या मजबूत सॉफ्टवेअरवर आधारीत प्रणालीशिवाय ते वर्तमान गरजा पूर्ण करू शकणार नाहीत. याकरीताच प्रशासकांनी (त्यांच्या निर्वाचित समितीच्या पाठिंब्याने) चांगली प्रणाली

प्रस्तुत केली आहे. (उदाहरणार्थ बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सॅप आधारीत प्रणालीचा वापर केला जातो)

- चांगल्या प्रणालीमुळे पध्दतशीर गळती तसेच वित्तीय घोटाळ्यांना प्रतिबंध होतो आणि शहर व्यवस्थापकाला परिस्थिती नियंत्रणामध्ये ठेवण्यास मदत होते.
- जर महानगरपालिकांना कर्जाची आवश्यकता असेल तर कर्जदात्यांनाही महानगरपालिकेची योग्य वित्तीय स्थिती तसेच क्षमता जाणून घ्यायची असते. यामुळेच महानगरपालिकांनीही लेख्याची दुहेरी नोंद पद्धती अवलंबिणे आवश्यक आहे. पुणे महानगरपालिकेत दुहेरी नोंद पद्धती अवलंबिली आहे त्यामुळेच त्यांना कर्ज घेणे शक्य झाले आहे.

९.७.२ राविआच्या महानगरपालिकांकरीता शिफारशी:

i. राविआ अगदी ठामपणे शिफारस करते की लेख्यात दुहेरी नोंद पद्धती अनिवार्य करण्यासाठी महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ९३ मध्ये सुयोग्य सुधारणा करावी.

ii. इआरपी सॉफ्टवेअर प्रणाली वापरून लेख्यात दुहेरी नोंद करण्याच्या पध्दतीकडे वळण्यासाठी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

iii. महानगरपालिका त्यांच्या पातळीवर सॉफ्टवेअर विक्रेत्याची थेट निवड करू शकतात, सरकार त्याकरीता विशिष्ट तांत्रिक निकष विहित करू शकते.

## ९.८ जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या- लेखा स्वरुप:

### ९.८.१ निरीक्षण:

शासनाने फार पूर्वी म्हणजे १९६८ साली जिल्हा परिषद लेखा संहिता अधिसूचित केली आहे. त्यानंतर १९८४ मध्ये दुरुस्त्या आणि अद्ययावत करण्यात आल्या. यामध्ये जिल्हापरिषदांनी कशा रितीने लेखा नोंदी ठेवाव्यात याबाबतचे स्वरुप आणि संबंधित मार्गदर्शक तत्वे देण्यात आली आहेत. जिल्हापरिषदेच्या जिल्हा निधिमध्ये बराचसा सरकारी निधी जमा होत असल्याने आणि तेथे नेहमीच राज्य शासनाच्या सेवेतील एक दोन सहाय्यक अधिकाऱ्यासह लेखा आणि कोषागरे विभागातील मुख्य लेखाधिकारी असतात, त्यांच्यामार्फत बहुतांशी जिप लेखे अगदी व्यवस्थित ठेवले जातात.

तसेच स्थानिक निधी लेखापरिक्षकांकडून त्यांची वार्षिक तपासणीदेखील करण्यात येते (खाली पाहा).

### ९.८.२ जिल्हा परिषद लेख्याकरीता राविआच्या शिफारशी:

राविआ शिफारस करते की विद्यमान व्यवस्था तशीच सुरु ठेवावी आणि लागलीच कोणत्याही बदलाची आवश्यकता नाही.

## ९.९ ग्रामपंचायती- लेखा स्वरुप:

शासनाने ग्रामपंचायत लेखा संहिता २०११ अधिसूचित केली, त्यामध्ये ग्राम पंचायत स्तरावर कोणती नोंदणीपुस्तके ठेवायची तसेच लेखा कशा रितीने ठेवायचा आहे याची माहिती दिली आहे.

भारत सरकारचे पंचायत राज मंत्रालय आणि राज्य शासनाने ग्रामपंचायत स्तरावर लेखांकनाच्या आणि अहवाल ठेवण्याच्या स्वरुपाला प्रमाणित करण्याकरीता अनेक उपक्रम सुरु केले आहेत. भारत शासनाने ग्राम पंचायत स्तरावर वापरण्याकरीता विविध लेखांकन आणि अहवालाविषयक सॉफ्टवेअर उपलब्ध करुन दिली आहेत. यामुळे उच्च स्तरावर माहितीचे (डेटाचे) संकलन आणि विश्लेषण शक्य होते.

आम्ही या संपूर्ण विषयासंदर्भात ग्राम पंचायतीच्या वित्त व्यवस्थेचे मुल्यांकन या प्रकरणामध्ये तपशीलवार मांडणी केली आहे. (परिच्छेद ७.८ ते परिच्छेद ७.११)

### ९.९.१ राविआ शिफारस:

ग्राम पंचायतीचे उत्पन्न आणि खर्च पातळी मर्यादित असल्याने नवीन उपक्रमांची आवश्यकता नाही. केवळ यापुर्वीच केलेल्या उपाययोजनांचे संकलन करणे आवश्यक आहे.

लेखापरिक्षण आणि प्रमाणन समस्या संदर्भात आम्ही याच प्रकरणामध्ये आमच्या सूचना देत आहोत.

## ९.१० स्थानिक स्वराज्य संस्थाच्या लेख्यांची तपासणी आणि प्रमाणन:

तेराव्या केंद्रिय वित्त आयोगाने निदर्शनास आणून दिले की स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखे व्यवस्थित ठेवले जातात की नाही हे समजणे अत्यंत कठीण आहे. येथे स्वतंत्र तृतीय पक्षाची आवश्यकता आहे जो लेखे व्यवस्थित ठेवले असल्याची खातरजमा करेल.   हे नेहमीची प्रक्रीयेने वर्षानुवर्षे करावे लागेल.

कॉर्पोरेट आणि व्यवसाय जगतात हे काम सनदी लेखापाल असलेल्या व्यावसायिक लेखापरिक्षकांकडून करण्यात येते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत तपासणी आणि प्रमाणान स्वतंत्र प्राधिकरणाकडून करण्यात येत असून राज्यापरत्वे प्राधिकरण भिन्न असते तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रकारानुसारही ते बदलते. ते स्थिर नाही.

महाराष्ट्रामध्ये स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय आहे. सदर विभाग अगदी स्वातंत्र्यपूर्व काळात निर्मित करण्यात आला होता. तो स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० अनुसार संचलित करण्यात येत आहे. स्थानिक निधी लेखापरिक्षण विभाग वित्त विभागाच्या अखत्यारीत येत असून त्यांचे कर्मचारी महाराष्ट्र वित्त आणि लेखा सेवा संवर्गातील असतात.

स्थानिक निधी लेखापरिक्षक नागरी आणि ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्याचे परिक्षण करतात.

पंचायत राज संस्थांच्या बाबतीत, स्थानिक निधी लेखापरिक्षकाचा अहवाल विधिमंडळाला सादर करण्यात येतो आणि त्याचे निष्कर्ष विधिमंडळाची उपसमिती पंचायत राज समिती घेते. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत अशी काही व्यवस्था नाही.

विद्यमान परिस्थिती खालील तक्त्यामध्ये संक्षिप्त स्वरुपात दिलेली आहे:

तक्ता १२३: पंचायत राज संस्था आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत लेखापरिक्षण संस्थांची विद्यमान परिस्थिती

| अनु. क्र. | स्थानिक स्वराज्य संस्थेची श्रेणी | लेखापरिक्षण संस्था | आवश्यकतेनुसार लेखा 'प्रमाणित' करण्यात आले आहेत का आणि केल्यास कोणाकडून? | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | महानगरपालिका | स्थानिक निधी लेखापरीक्षा विभाग नियमित लेखापरिक्षण करते. याशिवाय महालेखापरिक्षक चाचणी लेखापरिक्षण करतात. तसेच नगरपालिका लेखापरिक्षक देखील आहे जो स्थायी समितीसाठी असतो. | नाही. वित्त विभागाने स्थानिक निधी लेखापरिक्षण विभागाला महानगरपालिकांचे लेखे प्रमाणित करण्याचे निर्देश देऊन सुद्धा (शासन निर्णय ३१ मार्च २०११) स्थानिक निधी लेखापरिक्षण विभाग प्रत्यक्षात तसे करू शकला नाही. त्यांना खरोखरच अडचणी असल्यासारखे दिसते आहे. | या प्रकरणामध्ये नंतर आम्ही या समस्येबाबत तपशीलवार स्पष्टीकरण दिलेले आहे. |
| २ | नगर परिषद | स्थानिक निधी लेखापरिक्षण विभाग लेखापरिक्षण करते. त्याशिवायमहालेखापरिक्षक वेळोवेळी चाचणी लेखापरिक्षण करतात. | नाही. वर महानगरपालिकांबाबत असलेल्या परिस्थिती प्रमाणेच परिस्थिती आहे. | या प्रकरणामध्ये नंतर आम्ही या समस्येबाबत तपशीलवारस्पष्टीकरण दिलेले आहे. |
| ३ | जिल्हा परिषद | स्थानिक निधी लेखापरिक्षण विभाग नियमित लेखापरिक्षण करते. तसेच महालेखापाल कार्यालय नेहमीची चाचणी लेखापरिक्षण करते. | होय, जिल्हा परिषदेचे लेखे स्थानिक निधी लेखापरिक्षण विभाग नियमितपणे प्रमाणित करते. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | ग्रामपंचायत | स्थानिक निधी लेखापरिक्षण विभाग नियमित लेखापरिक्षण करते.. | ग्रामपंचायतीचा व्यवहार अगदी मर्यादित असल्याने लेखापरिक्षण म्हणजेच प्रमाणित करणे ठरते. स्वतंत्र प्रमाणन करण्याची आवश्यकता भासत नाही. | |

**९.१०.१ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचे लेखे प्रमाणित करण्याबाबत स्थानिक निधी विभागाला येणाऱ्या अडचणी :**

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचे लेखे स्थानिक निधी लेखापरिक्षकांना २०१४ पुर्वीपर्यंत ॰प्रमाणित॰ करण्याची आवश्यकता नव्हती. तथापि दि.३१.३.२०१४ च्या शासन निर्णयाने वित्त विभागाने स्थानिक निधी परिक्षकांना महानगरपालिका तसेच नगरपालिका दोन्हींचे लेखे ॰प्रमाणित॰ करण्याचे निर्देश दिले आहेत.

प्रत्यक्षात दि.३१.३.२०१४ च्या शासन निर्णयानुसार लेखे ॰प्रमाणित॰ करण्याच्या कामाची स्थानिक निधी परिक्षकांकडून अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. त्यांनी याबाबत खालील कारणे दिली आहेत:

(अ) नगरपालिकांचे लेखे हल्लीच अधिसूचित केलेल्या नगरपालिका नगरपरिषद लेखा संहिता, २०१३ अनुसार ठेवण्यात येत नाहीत. यामुळेच विहित स्वरुपात लेखे न ठेवल्याने स्थानिक निधी परिक्षक विभागाला ती ॰प्रमाणित॰ करण्यात अडचणी येतात.

(ब) त्याच प्रमाणे महानगरपालिकांचे देखील लेखे ठेवण्याचे त्यांची स्वत:ची पध्दत आहे. त्यामुळे महानगर पालिकांची वास्तविक वित्तीय परिस्थिती प्रतिबिबिंत न करणारे असे लेखे स्थानिक निधी लेखापरिक्षण विभागाला ॰प्रमाणित॰ करणे अयोग्य वाटते आणि कठीण जाते. जर त्यांनी ते ॰प्रमाणित॰ केले तर लेख्यांचे अचूकतेचे प्रमाण देणे स्थानिक निधी लेखापरिक्षण विभागाची जबाबदारी ठरते.

(क) तिसरे म्हणजे, चर्चे दरम्यान स्थानिक निधी लेखापरिक्षकांनी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या लेख्यांना प्रमाणित करण्याकरीता प्रथम त्यांच्या स्वत:च्या क्षमता वृद्धीगंत करणे आवश्यक असल्याचे प्रामाणिकपणे कबूल केले आहे. स्थानिक निधी लेखापरिक्षण विभागातील बहुतांश अधिकारी हे महाराष्ट्र वित्त आणि लेखा विभागाचे प्रतिनियुक्तीवरील अधिकारी असतात. कोषागार लेखे आणि पारंपारिक सरकारी लेखाकंन हाताळणे त्यांना सोयीस्कर असते. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचे फक्त पारंपारिक लेखापरिक्षण करणे त्यांना परिचयाचे असते त्यात मुख्यत्वे नागरी स्वराज्य संस्थांनी खरेदीकरीता योग्य प्रक्रिया अनुसरली की नाही किंवा त्यांचे निधी प्रभावीपणे वापरले की नाहीत हे तपासले जाते. परंतु ॰प्रमाणित॰ करण्याकरीता विशेषत: जेव्हा दुहेरी नोंदणीची लेखाकंन पद्धती विहित केलेली असते तेव्हा वेगळ्या प्रकारची कौशल्ये आवश्यक असतात. विद्यमान परिस्थितीमध्ये

स्थानिक निधी लेखापरिक्षण विभागाचे अधिकारी दुहेरी नोंदीचे लेखे हाताळण्याकरीता अंगभूत क्षमतांनी सुसज्ज नाहीत. **वित्त विभागाचा दि.३१.३.२०११ चा शासन निर्णय, क्षेत्रातील अधिकाऱ्यांना दुहेरी नोंद लेखाकंन पद्धती माहिती आहे अशा (चुकीच्या) समजाने निर्गमीत करण्यात आलेला आहे.**

वास्तविकत: स्थानिक निधी लेखापरिक्षण विभागाच्या संचालकांनी दिनांक २२.०८.२०१७ आणि १.२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये वित्त विभागाला त्यांना येणाऱ्या अडचणी तसेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचे लेखे प्रमाणित करण्याकरीता सनदी लेखापालांचा समावेश करण्याची विनंती सादर केली आहे.

### ९.१०.२ राविआच्या शिफारशी

हे अगदी स्पष्टच आहे की वित्त विभागाचा दिनांक ३१.३.२०११ चा शासन निर्णय, ज्यान्वये स्थानिक निधी परिक्षण विभागाला नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरीता ॰प्रमाणन॰ करण्याचे निर्देश, सदर कामाकरीता आवश्यक मनुष्यबळ आणि अधिक महत्वाचे म्हणजे स्था.नि.प. च्या अधिकाऱ्यांची अशा प्रकारचे काम करण्याबाबतची क्षमता याबाबत सखोल विश्लेषण न करताच दिले आहेत. ॰दुहेरी नोंद लेखाकंन म्हणजे काय॰ आणि ॰त्याबाबतच्या पूर्व आवश्यकता॰ काय आहेत याबाबत सर्व पातळीवर कोणालाही समजले नाही हे स्पष्टच आहे आणि त्यामुळेच ते केवळ कागदांवरच राहिले आहे. लेखा ठेवण्यासाठी विशेष तज्ञांची आवश्यकता असते आणि असे दिसून येते की प्रभावी अंमलबजावणी कशी होईल हे विचारात न घेता वरील निर्देश देण्यात आले आहेत.

राविआच्या दृष्टीने आवश्यक बदल घडून येण्यासाठी सखोल आणि अधिक व्यावसायिक पातळीवर प्रयत्न करायला हवेत. याकरीताच या प्रकरणात पुढे सर्वसमावेशक शिफारशी केलेल्या आहेत.

### ९.११ वित्तीय अहवाल- प्रमुख वित्तीय गुणोत्तरे व्यावसायिकांनी प्रमाणित करुन देण्याची तरतूद करणे आवश्यक आहे:

व्यावसायिक जगतामध्ये काही प्रख्यात वित्तिय गुणोत्तरामधून संस्थेची वित्तीय परिस्थितीचे पटकन आकलन होते. संस्थेच्या वित्तीय गुणोत्तरामुळे (जसे की गुंतवणुकीवरील परतावा, कर्ज, भाग भांडवल गुणोत्तर) त्यांची वित्तीय स्थिती समजते. यांच्या आधारे वित्तीय विश्लेषण करण्यात येते, प्रकल्प मंजूर केले जातात, समभागांची किंमती वाढतात आणि कमी होतात. सार्वजनिक वित्तीय बाबतीत देखील सरकारचचे वित्तीय परिस्थिती (आरोग्य) बहुदा महसूल आणि वित्तीय तूट, जीडीपीच्या टक्केवारी नुसार कर्ज घेण्याचे प्रमाण आणि इतर अशाच प्रमाणकांद्वारे दर्शविलि जाते. तथापि, नास्थास्वसंच्या लेख्यांच्या बाबतीत अशी वित्तीय गुणोत्तरे उपलब्ध नाहीत. काही मोठ्या नास्थास्वसंचे महसूल आणि खर्च ५०० कोटीपेक्षाही अधिक आहे. तथापि ना.स्व.संस्थाना तलचिन्ह देता येईल (बेंचमार्क) अशी माहिती उपलब्ध नाही. अशीच परिस्थिती जिपच्या बाबतीत देखील आहे.

### ९.११.१ राविआच्या शिफारशी:

राविआ अशी शिफारस करते की अशा प्रकारची वित्तीय गुणोत्तरे विकसित करून ना.स्वराज्य संस्थाच्या वार्षिक लेखा/अर्थसंकल्प यामध्ये अहवाल द्यायला हवा. यामुळे तृतीय पक्षाला ना.स्व.सं.ची वित्तीय स्थिती (वित्तीय आरोग्य) समजणे शक्य होईल.

### ९.१२ देखभाल निधिची आवश्यकता:

स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये "घसारा" तरतूद आहे परंतु ती केवळ कागदावरच आहे. त्यांच्याकडे दुहेरी नोंद लेखाकंन पद्धती नसल्याने मालमत्तेच्या मूल्यावर घसारा प्रतिबिंबीत होत नाही म्हणजेच मालमत्तेचे घसारा मूल्य दर्शविले जात नाही. ना.स्व.सं. स्वतंत्रपणे मालमत्ता पुनर्स्थित करण्याकरीता घसारा रक्कम "घसारा निधी" म्हणून राखून ठेवत नाही. जिल्हा परिषदांमध्ये त्यांच्या त्या वर्षाच्या आर्थिक परिस्थितीनुसार काही रक्कम घसारा निधी मध्ये बहुदा कार्यालयीन वाहन खरेदीकरीता हस्तांतरीत करतात.

अनेक वर्षामध्ये स्थास्वसंच्या मालमत्तांच्या किंमतीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे परंतु त्यांच्या देखभाली आणि देखरेखीकरीता पुरसा निधी उपलब्ध करून दिला जात नाही. याचा परिणाम मर्यादित सार्वजनिक संसाधनामधून निर्माण केलेल्या अमूल्य मालमत्तेचा शीघ्रपणे ऱ्हास होण्यात होतो.

### ९.१२.१ राविआच्या शिफारशी:

राविआ शिफारस करते की शासनाने (नविवि आणि ग्राविवि या दोन्हीही) संबंधित कायद्याच्या अधिकारातंर्गत स्था.स्व.सं.ना त्यांच्या वार्षिक महसुलाच्या २% ते ५% इतका निधी स्वतंत्र देखभाल निधी म्हणून निर्माण करण्याचे आणि हा निधी मुलभूत निधीत हस्तांतरित करण्याचे निर्देश द्यावेत. सदर मुलभूत निधी उच्च पातळीवर राखण्यात यावा जसे की राज्य पातळीवर किंवा सरकारच्या विभागीय पातळीवर किंवा शक्य असल्यास सुयोग्य स्वतंत्र निधी व्यवस्थापन संस्था जसे की भविष्य निर्वाह निधी कडे ठेवण्यात यावा. सदर निधी स्थास्वसंकडेच ठेवल्यास इतर आवश्यक गरजांकरीता वापरला जाण्याची शक्यता आहे, अशाने देखभाल निधी निर्माण करण्याच्या हेतूलाच हरताळ फासला जाईल.

देखभाल निधी केवळ कार्यकारी आदेशान्वये नाही तर योग्य प्रत्यायुक्त विधिविधानाने नियमांच्या स्वरुपात निर्माण करणे आवश्यक आहे. स्थास्वसं ज्या दिवशी सदर प्रस्तावित देखभाल निधी जमा करतील तेव्हापासून ३-५ वर्षे त्यांना हा निधी काढण्याची अनुमती न देणेच योग्य होईल.

या उपक्रमाने स्थास्वसंमध्ये वित्तीय शिस्त येईल तसेच मालमत्ता देखभाल आणि देखरेखीत देखील लक्षणीय सुधारणा होईल.

राविआ या समस्येचा संपूर्णपणे अभ्यास करण्यासाठी आणि या निधीच्या प्रचलनाकरीता कार्यपद्धती सुचविण्याकरीता 'एका उच्चस्तरीय तज्ज्ञांच्या समिती' ची शिफारस करते. असे सुचविण्यात येत आहे की सरकारबाह्य व्यावसायिक वित्तीय तज्ज्ञांचा मार्गदर्शनासाठी या समितीमध्ये सहभाग असावा.

**९.१३ लेखा परिक्षण व्यवस्थेमध्ये फेरबदल करण्याची आवश्यकता:**

यापुर्वीच उल्लेख केल्याप्रमाणे वित्त विभागाच्या अखत्यारित काम करणारा स्थानिक निधी लेखापरिक्षण विभाग स्थानिक स्वराज्य संस्थाचे लेखापरिक्षण करतो. भारताचे नियंत्रक आणि महालेखापरिक्षक देखील लेखापरिक्षण करतात परंतु ते केवळ चाचणी तपासणी करतात.

ब्रिटीशांच्या कालावधीत केलेल्या स्थानिक निधी लेखापरिक्षण अधिनियम, १९३० या कायद्याच्या कार्यचौकटी अंतर्गत स्थानिक निधी लेखापरिक्षण संचालनालय काम करते, या वर्षांमध्ये त्यात काही मामुली सुधारणा करण्यात आल्या आहेत. याचे अधिकारी महाराष्ट्र वित्त आणि लेखा सेवा संवर्गातून नेमण्यात येतात. त्यांना काही वर्षांकरीता स्थानिक निधी लेखापरिक्षण विभागात नियुक्त करण्यात येते नंतर त्यांची इतर विभागामध्ये बदली केली जाते.

मागील अनेक दशकामध्ये स्थास्वसंच्या संख्येत, आकारमानात तसेच त्यांच्या उपक्रमांच्या प्रमाणामध्ये खूप मोठा बदल झाला आहे. तथापि स्थानिक निधी लेखापरिक्षण संचालनालयाची कार्यप्रणाली पुरेशा प्रमाणात बदलली नाही. उदाहरणार्थ, क्षेत्रिय अधिकारी वारंवार निदर्शनास आणून देतात की स्थानिक निधी लेखापरिक्षणाच्या निष्कर्षांचे स्वरुप 'असफलता' आणि 'बंधन' यांत भेद करत नाही.

प्रंचड प्रमाणातील कामाचे स्वरुप लक्षात घेता, काही निवडक क्षेत्रामध्ये टप्प्या टप्प्याने लेखापरिक्षणाचे काम बाह्यस्त्रोतातून म्हणजेच व्यावसायिक सनदी लेखा परिक्षण संस्थांकडून करवून घ्यावे. उदाहरणार्थ, स्थानिक निधी लेखापरिक्षण विभागाला काही वर्षानंतर सर्व २८००० हजार ग्रामपंचायतींचे काम करणे कठीण आहे. (एका मोठ्या शहरांमध्ये १००० पेक्षाही अधिक ग्राम पंचायती आहेत.) मोठ्या ग्रामपंचायतींचे लेखापरिक्षण पॅनेलवरील सनदी लेखापालांवर सोपवावे. पुर्वीच्या काळी जिल्हा पातळीवर अशा व्यावसायिक सनदी लेखापालांची संख्या मर्यादित होती पण आता सनदी लेखापालांची संख्या पुरेशी आहे.

स्थानिक निधी लेखापरिक्षण विभागात लेखापरिक्षण कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी आहे, तेव्हा बाहेरील संस्था/ बाह्य स्त्रोत व्यवस्थेतून लेखापरिक्षण क्षेत्रात पुरेश्या तज्ज्ञांना या कामी घेता येईल. वर्तमान कर्मचारी आणि बाह्यस्त्रोत व्यवस्थेतील अशा दोन्हींही कर्मचाऱ्यांना मान्यताप्राप्त प्रशिक्षण संस्थेकडून मर्यादीत स्वरुपाच्या अभ्यासक्रमातून प्रशिक्षण देता येईल जेणे करुन एकसारख्या लेखापरिक्षण निष्कर्षांची खातरजमा होईल. दीर्घ कालावधीत स्थानिक लेखापरिक्षण विभागाने सनदी लेखापाल संस्थाचे नामिकाप्रविष्ट करणारी संस्था व्हावे.

आम्ही या प्रकरणामध्ये आधीच उल्लेख केलेला आहे की स्थानिक निधी लेखापरिक्षकांनी शासनाला विनंतीपत्र दिले आहे की नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या लेख्यांचे प्रमाणन करण्याकरीता सनदी लेखापाल संस्थांची नामिका तयार करण्यात यावी.

## ९.१४ प्रचंड प्रमाणातील प्रलंवित लेखापरिक्षण परिच्छेद

क्षेत्र भेटी दरम्यान असे लक्षात आले की निकालात न काढलेले किंवा निराकरण न केलेले हजारो ॰लेखापरिक्षण परिच्छेद॰ प्रलंबित आहेत. त्यापैकी काही तर ४०-५० वर्षांपासून प्रलंबित आहेत. नास्थास्वसं आणि पंचायत राज संस्थांची अशी स्थिती आहे. वर्तमान परिस्थितीमध्ये या परिच्छेदांचे निराकारण करणे केवळ अशक्य वाटते आहे कारण ते अभिलेखच उपलब्ध नाहीत किंवा संबंधित अधिकारेतर जनांचा माग काढता येणार नाही किंवा त्यातील काहींचा मृत्यू झालेला आहे आणि अधिकाऱ्यांच्या बाबतीत तेही उपलब्ध नाहीत कारण ते अनेक वर्षापुर्वीच निवृत्त झाले आहेत किंवा निधन झाले आहे. अशाप्रकारे हे प्रलंबित परिच्छेद कोणत्याही प्रकारची वसूली होण्याची शक्यता नसताना शासनाच्या मौल्यवान वेळेचा, कागदांचा, धारीकांचा आणि संसाधनांचा अपखर्च तेवढा करत आहेत आणि सद्य परिस्थिती अशी आहे की यांवर कोणत्याही प्रकारची सुधारणात्मक किंवा कडक कार्यवाही करता येणार नाही.

### ९.१४.१ प्रलंबित लेखापरिक्षण परिच्छेदांबाबत राविआच्या शिफारशी:

राविआच्या मते उच्चतम पातळीवर रणनिती आखून निर्णयात्मक कार्यवाही करण्यात यावी. योग्य प्राधिकरणाने महत्वाचे अभियान असा दृष्टीकोन ठेवून सर्व परिच्छेदांचे कमी, मध्य आणि उच्च जोखीम असे वर्गीकरण करावे, जेणे करून थकीत प्रकरणे निकाली काढता येईल. अशा प्रकारे जुन्या दशकातील जुन्या लेखापरिक्षण परिच्छेदांचे निराकारण केल्याने हल्लीच्या लेखापरिक्षण आक्षेपांकडे लक्ष केंद्रित करण्यास, सुधारणात्मक आणि दंडात्मक कार्यवाही करणे सोपे होईल आणि ते अधिक प्रभावी ठरेल.

## ९.१५ ग्राम विकास आणि नगर विकास विभागामार्फत मिळणाऱ्या निधी संबंधात अर्थसंकल्पीय दस्त-ऐवज वापरकर्त्यांकरीता आधिक मैत्रीपूर्ण करण्याची आवश्यकता:

१३ व्या केंविआच्या शिफारशीनुसार काही वर्षापासून दोन नवीन दस्त-ऐवज अर्थसंकल्प संबंधित पुस्तकामध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत, जे दरवर्षी विधान मंडळामध्ये सादर करण्यात येतात. ती नगर विकास विभाग आणि ग्राम विकास विभागांकडून तयार करण्यात येतात तसेच त्यामध्ये नागरी स्था.स्वराज्य संस्था आणि पंचायत राज संस्था यांना हस्तांतरित करण्यात आलेल्या सर्व योजना आणि निधीची यादी देण्यात येते.

### ९.१५.१ राविआच्या शिफारशी:

नवीन अर्थसंकल्पीय दस्त-ऐवजांच्या कल्पनेचे सर्वाधिक स्वागत आहे परंतु हे दस्त ऐवज वापरकर्त्यांकरिता अधिक मैत्रीपूर्ण असावेत आणि वापरकर्त्यांना निधी हस्तांतराविषयी कल्पना देणारे असावेत.

### ९.१६ ग्राविवि आणि नविवि मध्ये प्रति संदर्भ संकेतांक (सीआरसी) तर्कसंगत करणे आवश्यक आहे:

प्रत्येक नवीन उपक्रमाकरीता एक नवीन अर्थसंकल्पीय तरतूद किंवा आठ अंकी प्रति संदर्भ संकेतांक (सीआरसी कोड) महालेखापरिक्षक यांच्या संमतीने उपलब्ध करून देण्यात येतो. यामुळे त्या संकेतांकाच्या अंतर्गत केलेला खर्च स्पष्टपणे समजण्यास मदत होते. असे दिसून आले आहे की बरेचसे संकेतांक खूप जुने असून त्यांचे सुसूत्रीकरण करण्याची आवश्यकता आहे. उदाहरणार्थ, पंचायत अधिकारी आणि अधिकारेतर जनांच्या प्रशिक्षणाकरीता सात अर्थसंकल्पीय तरतूदी आहेत २०५३-०५७४, २४१५-०३१२, २४१५-०३२१. २४१५-०३३९,२४१५-०५१७, २४१५-०६२४, २५१५-००२६.

### ९.१६.१ राविआच्या शिफारशी:

राविआ शिफारस करते की दोन्हीही विभागामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था संदर्भातील विविध खाते शीर्षकांचे मुल्यमापनाची क्रिया करण्यात यावी आणि पुनरावृत्ती तसेच गोंधळ कमी करण्याकरीता सुसूत्रीकरण करण्यात यावे.

### ९.१७ 'उपकर', 'कर', 'शुल्क' अशा संज्ञांच्या वापराबाबतचा संभ्रम आणि त्यांची व्याख्या पुन्हा करण्याची आवश्यकता:

महानगरपालिका, नगर परिषदा, जिल्हा परिषद आणि ग्राम पंचायत कायद्यातील कर आकारणी प्रकरण दशकांपूर्वी अधिनियमित करण्यात आले आहे. यासंबंधीचे नियम देखील आहेत. (नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकरीता सुपूर्द केलेले कायदे किंवा उपकायदे). या अनेक वर्षात वेळोवेळी आवश्यकतेनुसार यामध्ये अनेक बदल करण्यात आलेले आहेत. असे दिसून आले आहे की क्षेत्रीय पातळीवर 'उपकर', 'कर', 'शुल्क' अशा संज्ञांची अदलाबदल करुन वापर होत आहे. प्रत्यक्ष वापरात सर्व प्रकारच्या आकारांना मराठीतील 'कर' हा एकच शब्द वापरण्यात येतो. हल्लीच्या दिवसांमध्ये नागरीक अधिकच दक्ष झाले असून न्यायालयात धाव घेऊ लागले असल्या कारणाने सर्वांच्या हिताकरीता कायदा आणि नियमांतील सर्व आकारांची व्यवस्थितपणे व्याख्या करावी आणि अनेक कलम सुस्पष्टतेकरीता बदलण्यात यावीत.

### ९.१७.१ राविआच्या शिफारशी:

राविआ ठामपणे अशी शिफारस करतो की समितीने कायदा आणि संबंधित नियमांच्या संबंधित कलमांचा /नियमांचा अभ्यास करुन विद्यमान तरतुदींचा गुंता सोडवावा. त्यांची अगदी सहजसोपी

रचना करावी आणि त्यात संभ्रम नसावा.  उच्च न्यायालयाच्या आदेशाने किंवा स्थगितीमुळे एका चुकीच्या व्याख्येने हजारो कोटींचा महसूल बुडू शकतो. आम्ही नागरी संस्थाच्या प्रकरणामध्ये आधीच महानगरपालिका कायद्याच्या कलम १४९ अ अंतर्गतच्या अतिरिक्त मुद्रांक शुल्कावरील उपकराबाबत आवश्यक सुधारणा निदर्शनास आणून दिल्या आहेत.

**९.१८ राज्यातील नास्थास्वसंना वित्तीय विशेषज्ञांकडून वित्तीय आणि लेखा बाबतीत समन्वय आधाराबाबत मार्गदर्शनाची आवश्यकता:**

असे दिसून आले आहे की महानगरपालिकांसंदर्भातील समस्या थेट मंत्रालय पातळीवरून हाताळल्या जातात, कदाचित  समस्यांचे आकारमान आणि स्वरुप पाहता असावे. त्याचवेळी नगर परिषदांना नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्यामार्फत निधी मुक्त करण्यात येतो. नगरपरिषद प्रशासन संचालनालयामध्ये संचालकांचे पद असून ते महाराष्ट्र वित्त व लेखा सेवाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमधून ते भरण्यात येते. तेथे काही सहाय्यक पदे देखील आहेत.

तथापि, जर आपण मंत्रालय पातळीवरील परिस्थितीची तपासणी केली तर  जेथून राज्य सरकारच्या पातळीवरून थेट ना.स्था.स्व.सं.ना (विशेषत: महानगर पालिकांना) लक्षणीय प्रमाणात निधी मुक्त केला जातो तेथे मंत्रालयामध्ये लेखा संबंधित पद नाही.

**९.१८.१ राविआच्या शिफारशी:**

वाढत्या नागरी क्षेत्रामुळे सातत्याने वाढत असणारा न.वि.विचा अर्थसंकल्प आणि निधी मुक्त करण्याबाबतच्या वाढलेल्या रकमांचा विचार करता मंत्रालय पातळीवर वित्तीय अधिकाऱ्याचे पद निर्माण करण्याची आवश्यकता आहे, असा अधिकारी व्यावसायिक पध्दतीने सहाय्य करू शकतो. त्याचप्रमाणे, लेखा ठेवण्यामध्ये नगरपालिका  अतिशय मागे असल्याने नगरपरिषद प्रशासकीय संचालनालयाच्या सक्षमीकरणाची देखील आवश्यकता आहे.

**९.१९ पाच वर्षांकरीता समर्पित 'नागरी स्थानिक स्वराज्य संस्था- वित्तीय अहवाल आणि लेखा सुधारणा अभियान' ची आवश्यकता:**

आतापर्यंतच्या निरिक्षणातून हे दिसून येईल की हेतू कितीही उद्दात असला तरी अंमलबजावणीमध्ये आव्हाने आहेत.

सर्वात पहिले म्हणजे लेखाकंन अभिलेख अत्यंत महत्वाचे असले तरी  तांत्रिक क्षेत्र आहे. हे सर्वसाधारणपणे नास्वसंच्या मुख्य लेखा आणि वित्त अधिकाऱ्याकडे सुपूर्द केलेले असते.  इच्छित बदल घडवून आणण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांना सामावून घेण्याची आवश्यकता आहे, विशेषत: संस्थेच्या मुख्याधिकारी जसे की महापालिका आयुक्त आणि मुख्य अधिकारी, सनदी लेखापाल संस्थामधून व्यावसायिक तज्ञांना आणण्याची आवश्यकता आहे.

दुसरे असे की, केवळ सरकारी निर्देश किंवा आदेशाने बदल घडून येत नाहीत. याकरीता काही वर्षे सातत्याने प्रयत्न करण्याची तसेच क्षमता संवर्धनाची आवश्यकता असते.

तिसरे असे की, संस्थात्मक यंत्रणा आणि सुधारणेकरीता पूर्ण वेळ काम करणारे समर्पित अधिकारी तसेच कर्मचारी विद्यमान अधिकाऱ्यावर (ज्यांच्याकडे आधीच इतर कामाचा बोजा आहे) हे काम सोपविल्यास काही उपयोग होणार नाही किंवा अपेक्षित निकाल मिळणार नाही.

### ९.१९.१ राविआच्या शिफारशी:

राविआ शिफारस करते की, नविविने कमीत कमी पाच वर्षाकरीता तरी 'नागरी स्थानिक स्वराज्य संस्था- वित्तिय अहवाल आणि लेखा सुधारणा अभियान' ची स्थापना करावी. स्वच्छ भारत अभियान किंवा अमृत अभियान किंवा स्मार्ट शहर उपक्रमाप्रमाणेच या प्रयत्नाकरीता देखील स्वतंत्र समर्पित कार्यालयाची आवश्यकता आहे.

या अभियानाची संस्थात्मक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे असू शकतील:

- सदर अभियान व्यवस्थापन समितीच्या निर्देशानुसार काम करेल, या समितीमध्ये
    - सचिव- नगर विकास (अध्यक्ष)
    - सचिव (लेखा आणि कोषागारे) वित्त विभाग
    - नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे संचालक
    - सनदी लेखा संस्थेचे एक दोन नाम निर्देशित व्यक्ती(पश्चिम विभाग)
    - संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षण (सदस्य सचिव)
- महालेखापाल (किंवा त्यांचा प्रतिनिधी) विशेष अतिथी असू शकतात (आवश्यकतेप्रमाणे आमंत्रित करावेत)
- अभियानाचे स्वतंत्र कार्यालय असेल तसेच त्याच्या प्रमुखपदी महाराष्ट्र लेखा व वित्त सेवा संवर्गातील वरिष्ठ अधिकारी किंवा नगरपालिका संवर्गातील वरिष्ठ अधिकारी असतील.
- अभियानामार्फत काही व्यावसायिक सनदी लेखापाल संस्था किंवा सल्लागार संस्था नियुक्त करण्यात येतील.
- पाच वर्षांकरीता कर्मचारी, प्रशिक्षण, प्रवास इत्यादीकरीता रुपये २० कोटींचा निधी आवश्यक आहे. अभियानाने उद्योग जगतानुसार काम करणे अनिवार्य राहिल.
- या अभियानाला विभागाने प्राधान्य द्यावे आणि लेखांकनातील सुधारणांच्या कामगिरीचा नगरपालिका अधिकाऱ्यांच्या वार्षिक मूल्यांकन अहवालात समावेश केलाच पाहिजे.

### ९.१९.२ अभियानाकरीता अधिकृत आदेश:

#### ९.१९.२.१ नगरपरिषद लेखा संहिता, २०१३ च्या प्रभावी अंमलबजावणीकरीता सहाय्य:

- नगरपरिषद लेखा संहिता, २०१३ नुसार संपूर्णत: काम करणे. सर्व नगरपालिकांनी येत्या ३-४ वर्षांच्या कालावधीत दुहेरी नोंद लेखाकंन पद्धती अवलंबावी, दरवर्षी २५% ना.स्व.सं.मध्ये हा बदल घडवून आणावा. पहिल्या वर्षी सर्वोत्तम २५% नगरपालिकांची निवड करण्यात यावी आणि दर वर्षी त्यामध्ये आणखी २५% अतिरिक्त नगरपालिका अंतर्भूत कराव्यात.
- बदल घडवून आणणाऱ्या अधिकारी आणि अधिकारेतरांना पुरस्कार आणि मान्यता.
- अभियानाने चांगले इआरपी सॉफ्टवेअर मिळविण्याच्या बाबतीत देखील मदत करावी.
- अभियानाने चांगले इआरपी सॉफ्टवेअर प्राप्त करण्याबाबतच्या तांत्रिक समस्या हाताळण्यास तसेच पुरवठादाराकडून सेवा वॉरंटी आणि प्रशिक्षण देणे इत्यादी बाबतीत आवश्यक ते सहाय्य सुद्धा करावे.

#### ९.१९.२.२ ना.स्व.संच्या लेखा अधिकाऱ्याचे क्षमता संवर्धन:

- याकरीता विशेषत्वाने लेखा कर्मचारी वर्गाला प्रशिक्षण दिलेच पाहिजे. प्रमुख व्यक्ती जसे की मुख्य अधिकारी यांना देखील कमी कालावधीचे प्रशिक्षण दिले पाहिजे.
- अभियानाने विविध पातळीवरील लेखा आणि वित्त बाबींसंदर्भातील नैपुण्य तपासण्याकरीता परिक्षा घेतल्या पाहिजेत. नास्थास्वसंच्या लेखा अधिकारी जोपर्यंत या परिक्षा उत्तीर्ण होत नाहीत तो पर्यंत ते वार्षिक वेतनवाढ किंवा बढती (जसे महालेखापाल यांच्या कार्यालयामध्ये किंवा महाराष्ट्र लेखा व वित्त सेवा संवर्गामध्ये करण्यात येते.) करीता पात्र ठरणार नाहीत. यासंदर्भात वित्त विभागाने यापूर्वीच अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत घेण्यात येणाऱ्या एक वर्षीय 'स्थानिक प्रशासन वित्तीय व्यवस्थापन पदविका' अभ्यासक्रमास मंजूरी आणि मान्यता दिलेली आहे, याचा उल्लेख करणे आवश्यक आहे (शासन निर्णय, संकिर्ण/२०११/प्र.क्र.१२७/कोषा प्र-३, दिनांक ३०.०४.२०१२). यापुर्वी मंजूर केलेल्या प्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या परिणामाचे पुनरावलोकन करून सुधाराणात्मक पावले उचलण्यात यावीत. या प्रकरणाबाबत असे दिसून येते की मंजूरी वित्त विभागाने दिलेली आहे मात्र वापरकर्ते अधिकारी नविविचे आहेत. यामुळे कदाचित यामध्ये समन्वयाची समस्या असू शकते.
- अशा प्रकारच्या समन्वयाच्या समस्या सोडविण्याकरीताच आम्ही व्यवस्थापन समितीची शिफारस केलेली आहे.

#### ९.१९.२.३ सनदी लेखापाल संस्थासोबतचा सहयोग:

- सनदी लेखापाल संस्थासोबत दीर्घकालीन भागीदारीचा सामजंस्य करार करण्यात यावा.

- विविध प्रकारच्या लेखापरिक्षण आणि प्रमाणनाकरीता सनदी लेखापाल संस्था राज्यात सनदी लेखापाल संस्थाची नामिका स्थापन करण्याकरीता मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात यावीत. ज्या सनदी लेखापाल संस्थांना नामिकेत नाम निर्दिष्टीत व्हावे असे वाटत असेल त्यांनी नास्थास्वसंच्या लेखा आणि संबंधित समस्याबाबत प्राथमिक प्रशिक्षण घेणे अनिवार्य राहिल.
- अभियानाने टप्याटप्प्याने नास्थास्वसंच्या प्रमाणनाकरीता सनदी लेखापाल (यथोचितपणे नामिकानिर्दिष्टीत आणि आवश्यक अटींची पुर्तता करणाऱ्या) संस्थांच्या सहभागाकरीता वातावरण तयार करायला हवे.

### ९.१९.२.४ स्थानिक निधी लेखापरिक्षण विभागाच्या भूमिकेची पुनर्व्याख्या करणे:

अभियानाने स्थानिक निधी लेखा परिक्षकांना दुहेरी नोंद लेखापद्धती हाताळता यावी याकरीता त्यांच्या क्षमता संवर्धनावर देखील लक्ष केंद्रित केले पाहिजे. याउपर स्थानिक निधी लेखापरिक्षण विभागाने देखील स्वत:च प्रमाणन करण्यापेक्षा स्वत:ला सनदी लेखापाल संस्था नामनिर्दिष्टीत करणारी संस्था म्हणून स्थित करावे (भारताचे महालेखापाल आणि नियंत्रक संस्थेप्रमाणे).

### ९.१९.२.५ सार्वजनिक निधी व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) ची सुरुवात करणे:

सार्वजनिक निधी व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) ची सुरुवात करावी जेणेकरुन नास्थास्वसं केवळ त्यांच्या प्रमुख प्रकल्पाकरीता लागणारा पैसा काढू शकतीत आणि वर्षानुवर्षे बँकेत पैसा तसाच ठेवणार नाहीत.

### ९.२० सूचित अभियानाची फलनिष्पत्ती:

पाच वर्षांकरीता रुपये २० कोटींच्या अत्यंत कमी खर्चात ( इआरपी सॉफ्टवेअरची किंमत वगळून) सुरु केलेल्या या उपक्रमाने नास्थास्वसंच्या स्वरुपात आमुलाग्र बदल घडून येईल. एकदा का दुहेरी नोंद पद्धती अंमलात आली आणि इआरपी सॉफ्टवेअरचा वापर सुरु झाला तर नास्थास्वसंना स्वत:लाच लक्षात येईल की नेमकी समस्या कोठे आहे. नविविला देखील पाहिजे असलेली व्यवस्थापकीय माहिती पटकन उपलब्ध होईल. यामुळे कर्जाकरीता निधि देण्यास तयार असलेल्या मात्र नास्थास्वसंबाबत विश्वसनीय वित्तीय माहिती उपलब्ध नसल्याकारणाने कर्ज देऊ न शकणाऱ्या वित्तीय संस्थांचे दरवाजे देखील खुले होतील.

महाराष्ट्र राज्य अनेक प्रशासकीय आणि विकास कामात सुधारणा आणण्यात अग्रणी राज्य ठरले आहे. या अभियानामुळे पुन्हा एकदा महाराष्ट्र राज्य कल निर्धारीत करणारे राज्य होईल इतकेच नाही तर महाराष्ट्रातील नगर प्रशासन आणि व्यवस्थापन अतिशय सक्षम (मजबूत) होईल.

---

## प्रकरण १०

## सर्वसाधारण आलोचना आणि अंतिम निष्कर्ष

### १०.१ केंद्रिय आणि राज्य वित्त आयोगासंबंधित सर्व पाठपुराव्याच्या समस्या हाताळण्याकरीता एक कायमस्वरूपी कक्षाची आवश्यकता आहे.

संविधानाच्या ७३ व्या आणि ७४ व्या सुधारणेनंतर दोन संविधानात्मक प्राधिकरणे स्थापित करण्यात आली, राज्य निवडणूक आयोग आणि राज्य वित्त आयोग अशी त्यांची नावे आहेत. राज्य निवडणूक आयोग ही कायमस्वरुपी संस्था आहे आणि त्यांच्याकडे कायमस्वरुपी कर्मचारी पदे असून त्यांच्या कामात सातत्य आहे. परंतु राज्य वित्त आयोगाची वेळोवेळी स्थापना करण्यात येते. एकदा का राज्य वित्त आयोगाने त्यांचा अहवाल सादर केला की त्यांचे तात्पुरते कार्यालय बंद करण्यात येते आणि त्यांनी केलेल्या शिफारशींवर प्रक्रिया करणे आणि आवश्यक ती कारवाई करण्याचे दायित्व राज्य सरकारचे (वित्त विभाग) असते. कामाचे अभिलेख सुरक्षिततेकरीता वित्त विभागाच्या एका कक्षाला हस्तातंरित करण्यात येतात. काही वर्षांनंतर जेव्हा दुसऱ्या राज्य वित्त आयोगाची स्थापना होते, तेव्हा मागील राज्य वित्त आयोगाने काय केले याबाबतची कोणतीही संस्थात्मक अभिलेख उपलब्ध नसतांना, असे आढळून आले आहे की प्रत्येक राविआला क्षेत्रातून माहिती कशी जमविली, कोणती कार्यपद्धती अवलंबिली इत्यादी कामांची सुरुवात अगदी नव्याने शुन्यापासून करावी लागते. आधीच्या राविआचे कामकाज हाताळणाऱ्या अधिकाऱ्यांच्याही बदल्या झालेल्या असतात. अगदी आधीच्या राज्य वित्त आयोगाचे अहवाल आणि इतर संबंधित कागदपत्र संकलनाचे काम करणे देखील नवीन राविआकरीता अगदी जिकरीचे होते आणि त्यात बराचसा अमुल्य वेळ दवडला जातो.

दोन आयोगांच्या दरम्यानच्या कालावधीमध्ये शिक्षणतज्ज्ञ, तज्ज्ञ यांच्याकडून स्थानिक स्वराज्य संस्थांना वित्तीय संसाधने हस्तांतरित करण्यासंदर्भात विविध प्रकारच्या चौकश्या करण्यात येतात. याबाबत केंद्र सरकार आणि इतर राज्य सरकाराकडून आणि सर्वात महत्त्वाचे केंद्रीय वित्त आयोगाकडून देखील संदर्भ आहेत.

केंद्रिय वित्त आयोगासंदर्भातही अशाच प्रकारची आव्हाने असतात ज्यामध्ये राज्याला नवीन केंविआला त्यांचे सादरीकरण करायचे असते तेव्हा असाच गोंधळ उडालेला असतो.

१०.१.१ राविआच्या शिफारशी:

राविआ ठामपणे अशी शिफारस करतो की केंविआ आणि राविआ संबंधातील समस्या हाताळण्याकरीता वित्त विभागामध्ये पुरेशा आणि विशेषज्ज्ञ मनुष्यबळासहीत एका स्वतंत्र कक्षाची स्थापना करण्यात यावी. या कक्षाची राज्य सरकारला खूप मोठी मदत होईल. असे सूचविण्यात येत आहे की यामध्ये स्थूल अर्थशास्त्रीय आणि राजकोषीय समस्या अंतर्भूत असल्याने कक्षाच्या कामकाजामध्ये कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या (जसे की मुंबई विद्यापीठाचा अर्थशास्त्र विभाग)

विद्वत्तापूर्ण सहाय्याचे एकात्मिकरण करण्यात यावे. कक्षाचे प्रमुख वरिष्ठ अधिकारी(सह /उपसंचालक पातळीवरील) असावेत तसेच सदर पद हे विशेषत्वाने नियोजन आणि सांख्यिकी विभागातून काही सहाय्यक कर्मचाऱ्यासह निर्माण करावे. अतिउच्च पातळीवरील उपयोजनाची आवश्यकतेचा विचार करता कक्षाच्या नेतृत्वाकरीता वर उल्लेख केल्याप्रमाणे वरिष्ठ अधिकारी आवश्यक आहे. कक्षाचे अधिकार खालीलप्रमाणे असू शकतात:

- यापुर्वीच्या केंविआ, राविआ यांचे अहवाल आणि इतर संबंधित दस्त-ऐवजांची योग्यप्रकारे अभिरक्षा
- वेळोवेळी केलेली सादरीकरणे आणि अभ्यासांची अभिरक्षा.
- इतर राज्यांचे अहवाल आणि अभ्यासांचे संकलन आणि व्यवस्थापन
- केंविआ आणि राविआ बद्दलची माहिती उपलब्ध करून देणारे सक्रिय संकेतस्थळ. अन्यथा ते वित्त विभागाच्या संकेतस्थळाचा भाग असू शकते.
- इतर संस्थांच्या सहायाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या योग्य माहितीच्या साठ्याचे (डेटा बेस) व्यवस्थापन किंवा समन्वय (याचे महत्व लक्षात घेता इतरत्र याबद्दल विस्ताराने सांगितले आहे)
- केंविआ आणि राविआ संबंधित सर्व समस्यांचा वेळोवेळी पाठपुरावा.

हा कक्ष वित्त विभागाच्या सचिवांच्या अधीन काम करेल, तसेच नियोजन विभागाचे सचिव, ग्राम विकास विभागाचे सचिव आणि नगर विकास विभागाचे सचिव तसेच काही बाह्य शिक्षणतज्ज्ञ यांचा समावेश असलेली सल्लागार किंवा नियंत्रण समिती या कक्षाला अधिक बळकटी देईल.

केंद्रिय कराचा हिस्सा म्हणून जवळपास १५% महसूल प्राप्ती होते (ज्यास केंद्रिय वित्त आयोगाचे हस्तातंरण म्हणतात). याकरीताच केंविआ आणि राविआ संबंधित समस्या हाताळून या कक्षाला होणाऱ्या दिर्घकालीन लाभाचा विचार करता, समर्पित पदासह(वर निर्देशीत केल्याप्रमाणे) तसेच काही मुलभूत सहायक कर्मचाऱ्यासह योग्यरित्या स्थापित केलेल्या कक्षाची निर्मीती आणि त्यांसाठी योग्य जागा यामुळे विभागाची फार मोठी वृद्धी होईल. केंविआ आणि राविआचे महत्व तसेच मुल्याचा विचार करता समर्पित पदासह कक्षाच्या निर्मीतीकरीता होणारा खर्च पूर्णत: न्याय्य आहे.

### १०.२ राविआचा कालावधी/कार्यकाल केंविआच्या कार्यकालासह समक्रमित करण्याची आणि राविआला त्यांचा अहवाल सादर करण्याकरीता १८ महिन्यांचा कालावधी देण्याची आवश्यकता आहे:

याआधीच्या केंद्रिय वित्त आयोगांनी त्यांच्या अहवालामध्ये राज्य वित्त आयोगांच्या अहवालाचा कालावधी त्यांच्या अहवाल सादर करण्याच्या कालावधीशी योग्यपणे समक्रमित करण्याच्या आवश्यकतेबाबत नमूद केले होते. यामुळे केंविआंना त्यांच्या शिफारशी करत असतांना राविआच्या अहवालांवर विचार करता येईल, जसे की संविधानाच्या कलम २८०(३) (बब) अनुसार आवश्यक आहे.

राज्यसरकारने या वेळी अगदी जाणीवपूर्वक याबाबत पावले उचलली आहेत आणि विद्यमान राविआच्या अहवाल सादर करण्याचा कालावधी (पुढील परिच्छेद पाहा) पंधराव्या केंद्रिय वित्त आयोगाच्या(सन २०२०-२५) कालावधीशी समक्रमित केला आहे.

### १०.२.१ आगामी राविआची स्थापना आणि आयोगाकरीता सूचित कार्यकाल:

राविआ अशी शिफारस करत आहे की राविआ आणि केविआ मध्ये समकालीनता सुनिश्चित करण्याकरीता आगामी केंविआच्या( सन २०२५-३०) कार्यकालाच्या दोन वर्षे आधी राविआची स्थापना करण्यात यावी. विद्यमान राविआचा अनुभवावरून तसेच अन्य राज्याच्या राविआच्या कार्यकालाची तुलना केल्यानंतर असे विधान करता येईल की राविआला त्यांचा अहवाल सादर करण्याकरीता अठरा महिन्यांचा कालावधी देणे उचित होईल.

### १०.२.२ आयोगाचा विद्यमान अहवाल सन २०२०-२५ या कालावधीकरीता ग्राह्य धरता येईल:

पाचव्या राविआची स्थापना मार्च २०१८ मध्ये करण्यात आली होती. राविआने दि.१.४.२०१९ पासून पुढील पाच वर्षांकरीता अहवाल सादर करणे अपेक्षित होते. तथापि विद्यमान आयोगाला त्यांचा अहवाल सादर करण्याकरीता वाढवून दिलेला कालावधी आणि शासकीय पातळीवरील प्रक्रियेला लागणारा वेळ पाहता, सदर अहवाल सन २०२०-२५ या कालावधीकरीता ग्राह्य धरणे व्यवहार्य ठरेल. यामुळे १५ व्या केंविआच्या २०२०-२५ या कालावधीशी समन्वयन देखील होईल.

### १०.३ केंविआच्या अनुदानाच्या अंतर्गत वाटपाकरीता आणि इतर उद्देशाकरीता राविआचे शिफारसित सूत्रः

राज्य वित्त आयोगाला सुयोग्य ॰सूत्र॰ शिफारसित करण्याचा आदेश आहे ज्यान्वये केंद्रिय वित्त आयोग किंवा इतर हस्तांतरीत अनुदानाचे नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायत राज संस्था यामध्ये आणि त्यांच्यामध्ये आपापसात आंतरवाटप करता येईल. ज्या राज्यांमध्ये राविआने कोणतेही सूत्र शिफारसित केले नाही अशा राज्यामध्ये १४ व्या केंद्रिय वित्त आयोगाने९०:१० असे सूत्र असेल असे विधान केले आहे, म्हणजे लोकसंख्येला ९०% भारांक आणि क्षेत्राला १०% भारांक देऊन आंतरवाटप करावे.

या राविआने इतर दोन राज्ये वापरत असलेल्या सूत्राचे परिक्षण केले तसेच काही तज्ज्ञांसोबत विस्तृत चर्चा केली. राविआला नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरीता दरडोई खर्च हा एक निकष ठेवायचा होता परंतु सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकडून निश्चित, विश्वसनीय माहिती उपलब्ध न झाल्याने (काही नास्थास्वसंनी माहिती दिली असली तरी) आम्हाला तसे करणे संयुक्तिक वाटले नाही.

यामुळे राविआला उभ्या ( राज्याकडूंन स्थानिक स्वराज्य संस्थाना ) आणि आडव्या ( स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ) वाटपाकरीता काळाच्या कसोटीवर खरं ठरलेल्या लोकसंख्या:क्षेत्र या सुरक्षित सूत्राला धरून राहणे योग्य वाटते. तथापि, ग्राम पंचायतीकरीता सूत्रामध्ये सुधारणा करावीशी वाटते आणि

क्षेत्राऐवजी केवळ लोकसंख्या हा एक निकष ठेवावा असे वाटते. याचे कारण म्हणजे १४ व्या केंविआच्या वेळी पंचायत समिती आणि ग्राम पंचायतींच्या क्षेत्रीय पातळीवरील अधिकाऱ्यांचा ॰क्षेत्र॰ चा अर्थ लावतांना अगदी संभ्रम झाला होता. काहींनी केवळ ॰गावठाण॰(गावाची वस्ती) म्हणजे क्षेत्र तर काहींनी त्यामध्ये सभोवतालचे शेतीच्या क्षेत्राचाही त्यांत अंतर्भाव करून क्षेत्राची व्याख्या केली.

### १०.३.१ आंतर वाटपाबाबत राविआच्या शिफारशीः

केंविआचे अनुदान आणि स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये इतर आंतरवाटपाबाबत राविआ खालील सूत्राची शिफारस करते.

तक्ता १२६: केंविआ अनुदान वाटपाकरीताचे सूत्र

| अनु.क्र. | श्रेणी | लोकसंख्या भारांक | क्षेत्र भारांक |
|---|---|---|---|
| १ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | ९०% | १०% |
| २ | जिल्हापरिषद आणि पंचायत समिती | ९०% | १०% |
| ३ | ग्रामपंचायत | १००% | -- |

* आत्ता २०११ च्या जनगणनेनुसारच्या लोकसंख्येची आकडेवारी वापरता येईल. सन २०२१ च्या जनगणनेनंतर लोकसंख्येची सार्वजनिक क्षेत्रामध्ये आकडेवारी उपलब्ध होईल ती वापरता येईल.

### पंचायत राज संस्था:

तक्ता १२७: पंचायत राज संस्थाना दिलेल्या विमुक्त निधीचा सारांशः

(रुपये कोटीमध्ये)

| अनु.क्र | श्रेणी | जिल्हापरिषद आणि पंचायत समिती | ग्रामपंचायत |
|---|---|---|---|
| १ | नियुक्त केलेला कर - जमीन महसूल | २०० | १०० |
| २ | नियुक्त केलेला कर - वन अनुदान | १० | -- |
| ३ | नियुक्त केलेला कर - मुद्रांक शुल्क | ३०० | ३०० |
| ४ | नियुक्त केलेला कर - सिंचन उपकर | १६५ | -- |
| ५ | कार्यकारी आदेश- गौण खनिजे | -- | ७५ |
| ६ | इतर विमुक्त हस्तांतरण | १ | १३ |
| एकूण | | ६६६ | ४८८ |

| | | |
|---|---|---|
| सन २०१८-१९ मध्ये राज्याच्या स्वकर महसूलाच्या टक्केवारीनुसार विमुक्त हस्तांतरण रुपये १,८८,९३१ कोटी होते. | ०.३५% | ०.२५% |

**नागरी स्थानिक स्वराज्य संस्था:**

तक्ता १२८: नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना दिलेल्या विमुक्त निधीचा सारांश (रुपये कोटीमध्ये)

| अनु.क्र. | श्रेणी | महानगरपालिका | नगरपरिषद |
|---|---|---|---|
| १ | जकात/ स्थानिक संस्था कर बदल्यात भरपाई | १७४६८ | १६९१ ( सहाय्यक अनुदान) |
| २ | नियुक्त कर- मुद्रांक शुल्क | ११७५ | १०७ |
| | एकूण | १८६४३ | १७९८ |
| | राज्याच्या स्वकर महसूलाच्या टक्केवारीनुसार विमुक्त हस्तांतरण | ९.८६% | ०.९५% |

अशाप्रकारे स्थानिक स्वराज्य संस्थाना केलेले एकूण विमुक्त हस्तातंरण जवळपास रुपये २१,६९४ कोटी इतके म्हणजेच राज्याच्या स्वकर महसूलाच्या जवळपास ११.४१% इतके आहे. याशिवाय वेतन अनुदान आणि बांधिल अनुदान म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांना लक्षणीय प्रमाणात निधी निर्गमित करण्यात येतो. अशाप्रकारे जसे की इतर राज्यामध्ये केले आहे तसे दिसून येते की ऐतिहासिक कारणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थाना सूत्राधारे हस्तांतरऐवजी भरपाई अनुदान आणि नियुक्त अनुदान देऊन सहाय्य करण्यात येत आहे. राविआने जाणीवपूर्वक याबाबतीत कोणत्याही बदलाची शिफारस केली नाही, याबाबतची कारणे पुढील वस्तू आणि सेवाकर तसेच त्याचे परिणाम या परिच्छेदात दिली आहेत. याऐवजी राविआने अशी शिफारस केली आहे की संविधानात्मक नियुक्त करांचे पूर्णत: आणि परिणामकारक रित्या हस्तातंरण करण्यात आले तर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचे वित्तीय आरोग्य (विशेषत: जिपंचे) आपोआपच सुधारेल. वास्तवात जिल्हापरिषदांना वित्तीय समस्यांना तोंड द्यावे लागण्याचे कारण म्हणजे वसूल करून देखील त्यांना देय नियुक्त कर पुरेशा प्रमाणात मिळत नाहीत.

### १०.४ स्थानिक स्वराज्य संस्थाचे हस्तांतरण वस्तू आणि सेवा कराच्या वसूलीशी संलग्न करणे- दिर्घ कालीन आवश्यकता

दिनांक १.७.२०१७ रोजी प्रस्तुत केलेला वस्तू आणि सेवा कर अजुनही त्याच्या सुरुवातीच्या काळांमध्ये आहे. या कराने स्थानिक स्वराज्य संस्था पातळीवर मालमत्ता कर वगळता इतर अनेक पारंपारिक कर अधिग्रहित केले आहेत. वस्तू आणि सेवाकर स्थिलस्थावर होण्यास अजून काही वर्षे

लागतील. आपण असे म्हणू शकतो की सुरुवातीची ३ते ५ वर्षाचा काळ हा स्थित्यंतराचा कालावधी असेल, साधारण तो पर्यंत ही प्रणाली स्थिर होईल.

आम्ही स्थानिक स्वराज्य संस्थाना सहाय्य म्हणून देण्यात येणारी भरपाई अनुदाने आणि नियुक्त कर वाटपाच्या विद्यमान पद्धतीमध्ये कोणताही बदल सुचविला नाही, **आम्हाला याबाबीची जाणीव आहे की स्थानिक स्वराज्य संस्थाच्या दिर्घकालीन वित्तीय आरोग्य सूत्राधारीत निश्चित निधी हस्तातंराणामुळेच आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना सहाय्य देण्याच्या विद्यमान वाटपाच्या पद्धतीला पूर्णत: किंवा अंशत: दूर करण्याने साध्य होऊ शकते**. ज्या देशांमध्ये कार्यक्षमतेच्या आणि वित्तीय स्वायत्ततेच्या बाबतीत सक्षम स्थानिक प्रशासन आहे तेथे अशी पद्धती दिसून येते. वस्तू आणि सेवाकराच्या वसूलीशी किंवा राज्याच्या स्थूल ऐतद्देशीय उत्पादनाशी संलग्नित टक्केवारी स्थानिक स्वराज्य संस्थाना देणे निश्चितपणे समर्थनीय आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर राज्याच्या महसूलातून स्थानिक स्वराज्य संस्थाना उत्पन्न प्राप्ती झाली पाहिजे. सूत्राधारीत सहाय्य देण्याची शिफारस करण्यापूर्वी स्थानिक संस्थाबाबत चांगली, विश्वसनीय माहिती (डेटा) असणे आवश्यक आहे.

आम्ही आशा करतो की येत्या काही वर्षात हे प्रत्यक्षात येईल आणि आगामी राविआ वस्तू आणि सेवाकराशी संलग्नित सुत्राधारीत हस्तांतरणाची शिफारस करण्याच्या स्थितीत असण्याची शक्यता आहे.

### १०.५.१ माहिती (डेटा) बाबतची आव्हाने आणि याक्षेत्रात दिर्घकालीन गुंतवणूकीची आवश्यकता:

नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायत राज संस्थाच्या भौतिक तसेच वित्तीय परिस्थिती संबंधित कोणत्याही धोरणाचा आराखडा किंवा मुल्याकंन करतांनाची प्रमुख समस्या म्हणजे सातत्याने विश्वसनीय आणि तुलनात्मक माहितीचा (डेटा) अभाव ही आहे. आम्ही या अहवालामध्ये निर्णय घेण्यास मदत होण्याकरीता स्थानिक स्वराज्य संस्थाकडून विश्वसनीय, गुणवत्तापूर्ण माहिती मिळण्याच्या आवश्यकतेचा वारंवार उल्लेख केला आहे. आत्ता अशा माहितीच्या अभावामुळे राविआला त्यांच्या कामात बऱ्याच अडचणी आल्या होत्या. आम्हाला स्थानिक स्वराज्य संस्थाचा दरडोई खर्च, अशी अगदी साधी माहिती मिळविणे देखील आव्हानात्मक काम ठरले होते. आम्हाला काही स्थानिक स्वराज्य संस्थाकडून माहिती मिळाली तरी सर्व संस्थाकडून मात्र माहिती प्राप्त झाली नाही. किंवा ज्यांनी माहिती पाठविली त्यांनी सर्व आवश्यक आकडेवारीचा समावेश केला नव्हता.

या उद्देशाकरीता राज्यस्तरीय संचालक मंडळाची स्थापना करता येईल, अर्थशास्त्र आणि सांख्यिकी संचलनालयाचा किंवा एखादी धोरण संशोधन संस्था किंवा विद्यापीठाच्या एखाद्या विभागाचा अशा प्रकारची सुविधा निर्माण करण्यासाठीच्या कामाकरिता उपयोग करता येईल. सदर माहिती साठा (डेटाबेस) संग्रहालय संबंधित चल घटकांबाबत आकडेवारी तसेच भौतिक माहिती पुरवेल तसेच संयुक्तिक मार्ग आणि सशुल्क माहिती मिळण्याचे एकच ठिकाण असेल. जर आपणाला वास्तविक खरी निरिक्षणे पुरवायची असतील तर अशी माहिती कशाप्रकारे संकलित करण्यात यावी याबाबत

शिष्टाचाराचे आदेश देण्यात यावेत. अनेक अहवालांमध्ये अगदी ठामपणे शिफारशी केल्या आहेत की जर आपणाला वास्तविक पुराव्यांवर आधारित परिस्थितीवर आधारुन मुल्यांकन करुन निर्णय घ्यायचे असतील तर अशाप्रकारे माहिती संकलित करणे आवश्यक आहे, सद्य परिस्थितीत संदिग्धता आहे.

याकरीताच तातडीने स्थानिक स्वराज्य संस्थाचा विशेषत: नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचा माहिती साठा (डेटाबेस) सक्षम करण्याची आवश्यकता आहे. आम्ही नास्थास्वसंच्या लेख्यामध्ये आणि वित्तीय माहितीमध्ये सुधारणा करण्याकरीता अशी ठामपणे शिफारस करतो की वित्तीय संसाधन आणि समर्पित कर्मचारीवर्गासह समर्पित अभियान सुरु करावे. त्यांचे महत्वाचे काम नास्थास्वसंमध्ये येत्या काही वर्षांमध्ये इआरपी आधारीत लेखाकंन प्रणाली सुरु करणे हे असेल, यामुळे केवळ दुहेरी नोंद लेखा पद्धतीची सुरुवात होइल इतकेच नाही तर आवश्यक व्यवस्थापन माहिती प्रणाली देखील उपलब्ध होईल. त्याच प्रमाणे, पंचायत राज आणि ग्राम पंचायतींचे लेखे सुधारण्याकरीता राज्य व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यास सूचित करण्यात येत असून पंचायत राज विभागासाठी हा संकलित उपक्रम सुरु करणे प्राधान्यक्रम असावा.

आम्हाला असा पूर्ण विश्र्वास वाटतो की या सुधारणांची अंमलबजावणी झाल्यानंतर भविष्यातील राज्य वित्त आयोगाचे काम अधिक सुकर होईल.

---

## प्रकरण - ११

## महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील उल्लेखनीय कार्यप्रणाली

(पुनरावृत्ती करण्याजोगे आदर्श नमुने)

राज्यातील बहुसंख्य स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निम्न स्तरावर जे काही उत्कृष्ट काम पार पाडले जात आहे ते पाहणे औचित्याचे ठरते. ही कामे म्हणजे चांगल्या स्थानिक नेतृत्वाची, अशासकीय नेतृत्व, नगरपालिका अधिकारी दोहोंनी आणि समाजाने दाखवून घेतलेल्या पुढाकाराची उदाहरणे आहेत. या कामांमधून ७४ व्या सांविधानिक सुधारणेचा आशय व्यक्त होतो.

लहानात लहान स्थानिक स्वराज्य संस्थांच्या काही सुशासन कार्यप्रणाली आम्ही सांगत आहोत. आम्ही येथे मुद्दाम लहानातल्या लहान तपशील देत आहोत अशा की क्षेत्रामध्ये राबविलेल्या उपक्रमशिलतेसाठी नगरपरिषदेला जी कार्यवाही करावी लागली ती कार्यवाही आणि त्या प्रक्रीयेमुळे आनंद मिळाला आहे. त्यांनी विकसित केलेले आणि राज्य स्तरावर ज्याची पुनरावृत्ती करता येईल असे आदर्श नमुने खाली देण्यात आले आहेत:-

**<u>प्रकरण अभ्यास : १</u>**

**<u>' क ' वर्ग नगरपरिषदा वेंगुर्ला कर्जत आदर्श नमुना (मॉडेल) यांद्वारे प्रभावी घन कचरा व्यवस्थापन.</u>**

घन कचरा व्यवस्थापनामध्ये वेंगुर्ला (सिंधुदुर्ग जिल्हा) आणि कर्जत (रायगड जिल्हा) ही दोन लहान शहरे उत्कृष्ट काम करीत आहेत आणि विभिन्न ठिकाणांहून लोकांना आकर्षित करीत आहेत.



वेंगुर्ला कर्जत नगरपरिषदांनी अनुसरलेली संकल्पना सोपी आहे. घरोघरचा कचरा गोळा करण्याच्या टप्प्यावर कचऱ्याचे विलग्नीकरण केले जाते. वेंगुर्ला येथे मागेच २०१५-१६ मध्ये विघटनशील व अविघटनशील कचरा गोळा करताना तो २७ विभिन्न प्रवर्गांमध्ये विलग करण्याची व्यवस्था केली होती. श्री. रामदास कोकरे, मुख्य अधिकारी यांची जेव्हा २०१८ मध्ये कर्जत नगरपरिषदेत बदली झाली तेव्हा वेंगुर्ला येथे आलेल्या अनुभवातून आणखी सुधारणा करुन त्यांनी आपला दृष्टिकोन

आणखी प्रगत केला आणि नगरपालिका विभाग कचऱ्याचे ३६ वेगवेगळ्या प्रवर्गांमध्ये विलग्नीकरण करीत आहे. यामुळे अविघटनशील कचरा हा लहान उद्योजकांकडून आणखी प्रक्रिया करण्यासाठी घेतला जात असल्यामुळे तर विघटनशील कचऱ्याचे सेंद्रिय खतामध्ये रूपांतर केले गेल्याने मोठ्या प्रमाणातील भूमि भरावाची गरज कमी झाली आहे.

घरोघरी कचऱ्याचे एकूणच विलग्नीकरण हा या घन कचरा व्यवस्थापन प्रक्रियेचा सर्वात महत्त्वाचा पैलू आहे. हेच मुख्य उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नागरिकांचा तसेच घन कचरा व्यवस्थापन हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मनोवृत्तीतील व वर्तणुकीतील बदल महत्वाचा आहे. हा वर्तणुकीतील बदल साध्य करण्यासाठी कर्जत व वेंगुर्ला नगरपरिषदांनी अंगिकारलेले तंत्र पुढीलप्रमाणे आहे:-

<u>नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे</u> :

सर्व नागरिकांच्या गटांना, विशेषकरून महिला, घन कचरा व्यवस्थापनामध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभागी असलेल्या कामगारांसह विविध संघटनेचे कर्मचारी यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क साधून, चर्चा करून, बैठकी घेऊन, प्रदर्शने भरवून आणि त्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देऊन जाणीव करून दिली गेली.

<u>घन कचरा व्यवस्थापनाच्या कर्मचारी वर्गाची क्षमता उभारणी</u> :

घन कचरा व्यवस्थापनाविषयी नगरपरिषदांच्या सर्व कर्मचारी वर्गाला, घन कचरा व्यवस्थापन हाताळणाऱ्या कंत्राटदारांना व इतरांना कचऱ्याच्या विलग्नीकरणाबाबत प्रशिक्षण देण्यात आले होते. ही मानसिक तयारी झाल्यानंतर, घन कचरा व्यवस्थापन कर्मचारीवर्गाने किंवा त्यांच्या कंत्राटदारांनी घरोघरी कचरा गोळा करतानाच विलग न केलेल्या वस्तू स्वीकारण्यास नकार दिला. त्यामुळे हळूहळू विलग्नीकरणात वाढ होऊन आता ते ३६ प्रवर्गांत केले जाते. या विलग्नीकरणासाठी घरोघरी योग्य प्रकारचे डबे देखील पुरविले गेले होते.

<u>दंड आकारून शिस्त लावणे</u> :

केरकचरामुक्त शहर, प्लॅस्टिक बॅग बंदी, कसूरदारांकडून मोठा दंड आकारून कचऱ्याचे १००टक्के विलग्नीकरण यांसारख्या इष्ट प्रथा घालून देणे शक्य आहे. तसेच नागरिकांकडून वापरकर्ता खर्च गोळा करून शहरांवरील आर्थिक भार कमी होतो.

<u>प्रकल्पाचा परिणाम</u> :

धातू, काच आणि पेपर, प्लॅस्टिक यांसारखे टाकाऊ पदार्थ मिश्र खत यांसारखे विलग्न केलेल्या पुनर्वापरायोग्य कचऱ्याच्या विक्रीतून कर्जत व वेंगुर्ला परिषदांना दरमहा अंदाजे रू. ३०,०००/- एवढे

उत्पन्न मिळत आहे.  तसेच भूमिभरावाच्या ठिकाणी हरित कचऱ्यावर जैव-मिथेन प्रक्रिया करून बायोगॅस (जैववायु) तयार केला जातो व तो कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या संयंत्रासाठी वापरला जातो. यातून वेंगुर्ला नगरपरिषदेने इंधनावरील खर्चात दरवर्षी अदमासे रू. ७२,०००/- एवढी बचत केली आहे. कागदाचा लगदा, रबर, चामडे यांची विक्री करून वेंगुर्ला नगरपरिषदेने वर्षाला रू. १.५ लाखांचे अतिरिक्त उत्पन्न देखील प्राप्त केले आहे. कर्जत नगरपरिषद देखील जवळच्या तीन ग्रामपंचायतींच्या घन कचऱ्यावर त्यांच्याकडून दरमहा प्रत्येकी रू. १०,०००/- एवढी फी/ शुल्क आकारून प्रक्रिया करीत आहे. नजिकच्या गावांतील कचऱ्यावर प्रक्रिया करून अतिरिक्त उत्पन्न मिळविणारा आणि प्रकल्पास वृध्दिंगत करणारा हा आदर्श नमुना (मॉडेल) आगळावेगळा प्रयोग अग्रगण्य ठरणारा प्रयोग आहे.

**अनुकरण करणे :**

भूमि भरावाच्या ठिकाणी जवळ जवळ शून्य कचरा करून वेंगुर्ला नगरपरिषद २.५ मेट्रिक टन घन कचऱ्यावर आणि कर्जत नगरपरिषद ६ मेट्रिक टन घन कचऱ्यावर प्रक्रिया करीत आहे आणि त्यातून या नगरपरिषदा चांगले उत्पन्न मिळवित आहेत.

इतर शहरे या यशस्वी कार्यप्रणालीचे अनुकरण करू शकतील आणि त्यांच्या शहरांसाठी यशस्वी घन कचरा व्यवस्थापन साध्य करू शकतील.

**प्रकरण अभ्यास :२**

**येवला नगरपरिषद - नगरपरिषदेच्या जमिनीवरील अतिक्रमणे हटविणे आणि बेकायदेशीर बांधकामे पाडणे व त्यातून सरकारी जमिनीचे संरक्षण करणे व परिणामी शहराच्या मुख्य भागातील वाहतूक व्यवस्था सुधारणे :**

४९,८२६ एवढी लोकसंख्या असलेली नाशिक विभागातील येवला नगरपरिषद ही 'ब' वर्ग शहर आहे. ही परिषद पारंपारिक सिल्कच्या रेशमी पैठणी साड्यांसाठी व कपड्यांसाठी प्रसिध्द आहे. या लहान शहराच्या जुन्या बाजारक्षेत्रातील रस्त्यांवर अतिक्रमण झाल्याने वाहतुकीची कोंडी होत होती व नागरिकांच्या जाण्या-येण्यावर निर्बंध आले होते. त्यामुळे बाजार क्षेत्रात प्रचंड गोंधळ होत होता. नगरपरिषदेने २०१८ मध्ये डीपी (विकास योजना) अंतर्गत मार्गावरील अतिक्रमणे हटवून आणि बेकायदेशीर बांधकामे पाडून वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याचा निर्णय घेतला आणि आपल्या निर्णयाची शीघ्रतेने अंमलबजावणी केली.

<u>**मोहिमेची व्याप्ती**</u> :

नगरपरिषदेसाठी निवडणूक घेण्याकरिता आदर्श आचार संहिता घोषित केल्यानंतर एका दिवसामधे रस्त्यावरील २५० हून अधिक बेकायदेशीर अतिक्रमणे, दुकानांचे वाढीव भाग हटविण्यात आले. यामुळे वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यास व शहराच्या दाटीवाटी असलेल्या बाजार क्षेत्रातील वाहने उभी करण्याचे प्रश्न सोडविण्यास मदत झाली. या मोहिमेंतर्गत आणखी प्लॅस्टिक बंदीची मोहिम उघडण्यात आली व त्या अंतर्गत ५०० किलोहून अधिक पिशव्या जप्त करण्यात आल्या आणि रू. २५,०००/- एवढा दंड वसूल करण्यात आला.


मोकळा श्वास

<u>मोहिमेचा फायदा :</u>

दुकानदारांकडून रस्त्यांचा मोठ्या प्रमाणात अनधिकृतपणे वापर होत होता. अतिक्रमणे हटविल्यामुळे निर्माण झालेली जास्तीची जागा नियोजन पध्दतीने फेरीवाल्यांना देण्यात आली व त्यातून वाहतूक व्यवस्था सुरळीत झाली. तसेच बेकायदेशीपणे लावलेली पत्रके व फलक हटविण्यात आले. दुकानांची जाहिरात करण्यासाठी अधिकृत परवानगी देऊन त्याद्वारे लायसन फीच्या (शुल्क परवाना) वसुलीमध्ये वाढ होऊन परवाना शुल्काचे नवीकरण करण्यामध्ये वाढ झाली. यामुळे फेरीवाल्यांसाठी नियमन देखील केले गेले व संबंधित नागरिकांचा जिव्हाळ्याचा वाहनतळाचा प्रश्न देखील मार्गी लागला. म्हणून नागरिकांनी या मोहिमेचे कौतुक केले व पाठिंबा दर्शविला.

दोन महिन्यांच्या कालावधीत, नगरपरिषदेने अशी २,५०० अनधिकृत बांधकामे पाडून टाकली. त्यामुळे रस्त्यांचे रुंदीकरण झाले व शहराच्या सौंदर्यात भर पडली.

<u>प्रकरण अभ्यास : ३</u>

**<u>बांधा, वापरा व हस्तांतरित करा योजनेतून दुकानांसाठी संकुल व नगरभवन यांचे बांधकाम (बांधा, वापरा व हस्तांतरित करा तत्वावर भांडवली उत्पन्न निर्माण करणे)</u>**

<u>प्रस्तावना :</u>

जळगाव जिल्ह्यातील 'ब' वर्ग शहर असलेल्या पाचोरा नगरपरिषदेने बांधा, वापरा, हस्तांतरित करा या योजनेतून राजीव गांधी वाणिज्यिक संकुल उभारले. रचना, प्रकल्प व्यवस्थापन, निधी पुरविणे आणि निविदा काढून यशस्वी बोलीदारांची निवड यांसाठी एमयूआयएनएफआरए च्या (शासकीय एजन्सी) मदतीने योजना आखण्यात आली होती. नगर विकास विभागाने १० फेब्रुवारी, २०१५ रोजी या योजनेस मान्यता दिली. त्यासाठी अनुसरलेली कार्यपध्दती पुढीलप्रमाणे आहे :-

<u>कार्यपध्दती :</u>

१. नगरपरिषद लेखा संहितेमध्ये घालून दिल्याप्रमाणे नेहमीची मंजुरी प्रक्रिया पार पाडून पाचोरा नगरपरिषदेने बांधा, वापरा, हस्तांतरित करा योजनेचा प्रस्ताव प्रधान सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे सादर केला.

२. संचालक, नगर रचना, पुणे यांच्याकडून बांधकाम योजनेस मंजुरी देण्यात आली.

३. विद्युतविषयक कामासह अंदाज व आरसीसी संकल्पचित्रास नगर रचना संचालनालयाच्या अंमलबजावणी शाखेकडून मंजुरी मिळाली.

४.	ई-निविदा काढली.

नगरपरिषदेने अशा प्रकारचा व्यवसाय आराखडा तयार केला होता की विकासकाने ९० लहान दुकाने व नगरभवन बांधले पाहिजे व ती सर्व बांधकामे नगरपरिषदेच्या हवाली केली पाहिजेत. त्यांने विकासाचा हक्क मिळविताना पट्टामूल्य देखील द्यावे आणि ६० दुकाने खुल्या बाजारात विक्रीसाठी ठेवावीत.

यशस्वी बोलीचा प्रस्ताव नगर विकास विभागाने शासन निर्णय एमयूएन-२०१४/प्र.क्र. ७२/नगर विकास १७, दिनांक १०.०२.२०१५ द्वारे मंजूर केला.

कार्यादेशानुसार बोलीदाराने दोन वर्षांच्या कराररनिविष्ट कालावधीमध्ये नगरपरिषदेला पूर्ण झालेली दुकाने सुपूर्द केली.

नगरपालिकेने योग्य कार्यपध्दती अनुसरून ९० दुकानांचा लिलाव केला. पाचोरा परिषदेने ३.२२ कोटींची ना परतावा ठेव प्राप्त केली व त्यासोबत भाड्याच्या रूपात रू. १५.१२ लाख इतकी रक्कम अधिक मालमत्ता कराचे उत्पन्न मिळविले.

अशा प्रकारे पाचोरा नगरपरिषदेने एका रूपयाचीही गुंतवणूक न करता रू. ३.२२ कोटींचे भांडवली उत्पन्न व त्यासोबत दरवर्षी रू. १५.१२ लाखांचा वार्षिक महसूल मिळविला.

## प्रकरण अभ्यास : ४

## भांडवली मूल्य पध्दतीवर आधारित मालमत्ता कर आकारणी :

### प्रस्तावना :

कुळगाव बदलापूर नगरपरिषद ही ठाणे जिल्ह्यातील मध्य रेल्वेच्या मुंबई पुणे मार्गावर स्थित असलेली 'अ' वर्ग नगरपरिषद आहे. तिची लोकसंख्या सुमारे दोन लाख एवढी आहे. हे एक वेगाने वाढणारे शहर आहे व येथे मुंबई महानगर प्रदेशात काम करणाऱ्या कामगार वर्गास परवडण्याजोगी जागेची सोय उपलब्ध आहे. मुंबईत पोहोचण्यासाठी निवास करण्याजोगे हे शहर आहे. मात्र ते औद्योगिक शहर म्हणून आपल्या स्वत:च्या मार्गाने हळूहळू विकसित होत आहे.

### विद्यमान मालमत्ता कर पध्दतीची पार्श्वभूमी :

सध्या शहरात १,०५,८३७ एवढ्या मालमत्ता आहेत. तेथे अनेक गृहनिर्माण प्रकल्प बांधकामाधीन आहेत, ज्यातून मालमत्तेच्या संख्येत शीघ्रतेने वाढ होईल याची शाश्वती आहे. सन

२०१८-१९ मध्ये सुमारे ९४,७३७ निवासी, १०,५५६ व्यापारी व ५४४ औद्योगिक मालमत्तेची आकारणी करण्यात आली होती. या मालमत्तांव्यतिरिक्त तेथे शेती लागवडीखालील पुरेशी खुली जमीन आहे. मोठ्या संख्येतील मालमत्ता विचारात घेता, मालमत्ता कराच्या प्रयोजनाकरिता मालमत्तांचे मूल्यांकन हा परिषदेसमोरील मुख्य प्रश्न होता. परिषदेने मालमत्ता कराची गणना करण्यासाठी भांडवली मूल्य आधारित मालमत्तेची आकारणी असा बदल करण्याचे आणि स्थायी समितीमध्ये योग्य विचारविमर्श झाल्यानंतर मागणी करण्याचे ठरविले. या निर्णयामुळे परिषदेला भूतलक्षी प्रभावाने मोठ्या रकमेने लाभांश चुकता झाला.

**<u>प्रक्रिया :</u>**

कुळगाव बदलापूर नगरपरिषदेमधील मालमत्तेची पुनर्आकारणी २०११-१२ मध्ये अपेक्षित होती. प्राधिकृत मूल्यांकन अधिकारी आणि सहायक संचालक, नगर रचना, जिल्हा ठाणे यांनी वेळेत दरांचे वार्षिक दरयोग्य मूल्य निश्चित केले नाही. वार्षिक दरयोग्य मूल्याधारित मूल्यांकन पध्दतीऐवजी भांडवली मूल्याधारीत मूल्यांकन पध्दती असा बदल करण्याचा प्रस्ताव परिषदेच्या कर प्रशासन विभागाने परिषदेच्या सर्व सदस्य मंडळासमोर दिनांक १०.७.२०१३ व दिनांक ०८.०१.२०१४ रोजी प्रस्तावित केला. परिषदेने आपल्या दिनांक २९.०१.२०१४ रोजीच्या ठराव क्रमांक ३०३ द्वारे प्राधिकृत मूल्यांकन अधिकारी व सहायक संचालक, नगर रचना (एडीपी), ठाणे यांच्याकडून लवकरात लवकर वार्षिक दरयोग्य दर मिळण्यासाठी निदेश देऊन वार्षिक दरयोग्य मूल्याधारित पध्दतीने मालमत्ता कर आकारण्याचे ठरविले. दिनांक २९.०५.२०१४ रोजी प्राधिकृत मूल्यांकन अधिकाऱ्याने क्षेत्रनिहाय दर सुचवून त्यास मान्यता दिली व ते दिनांक २९.१२.२०१४ रोजीच्या बैठकीमध्ये विशेष सर्वसाधारण मंडळाच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आले. परिषदेच्या सर्व सदस्य मंडळामध्ये विचारविमर्श होत असतांना, असे निदर्शनास आले होते की वार्षिक दरयोग्य मूल्याधारित पध्दतीने विद्यमान मालमत्ता करात ३-५ पटीने वाढ होईल व त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोष निर्माण होईल. म्हणून त्यात बदल करून भांडवली आधारित मूल्यांकन पध्दतीने आकारणी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. स्थायी समितीने दिनांक २२.०१.२०१५ रोजी विविध प्रवर्गांच्या वापराकरिता गुणन घटकांसाठी ठराव केला. हे दर नागरिकांकडून सूचना व हरकती मागविण्यासाठी योग्यरीत्या प्रसिध्द करण्यात आले होते आणि हे दर दिनांक ०७.०३.२०१५ च्या बैठकीमध्ये निश्चित करण्यात आले होते. मालमत्ता करातील वाढ अत्यंत कमी होती आणि ५०० चौ.फू. च्या मालमत्तांना ५ वर्षांसाठी करवाढीतून सूट देण्यात आली होती. अशाप्रकारे, कुळगाव बदलापूर नगरपरिषदेने दिनांक ०१.०४.२०१४ पासून मालमत्तांचे मूल्यांकन सूरू केले.

**भांडवली मूल्याधारित मालमत्ता कर पध्दतीची महत्त्वाची वैशिष्ट्ये :**

१. या पध्दतीमुळे तात्पुरती गृहीत धरलेली भाडे आधारित आकारणी पध्दतीतील विसंगती दूर होते. सामान्य नागरिकांना समजण्यासाठी सोपी आहे व अधिक पारदर्शक आहे. ते आपल्या मालमत्तेचे मूल्यांकन स्वत: निर्धारित करू शकतील.

२. स्थानिक स्वराज्य संस्थेला दर व पध्दत अंमलात आणण्याचा दिनांक ठरवता येईल. ती ५ वर्षांसाठी निश्चित केलेली आहे. ५ वर्षांच्या कालावधीनंतरच करांमध्ये सुधारणा करता येईल.

३. ५०० चौ.फू. क्षेत्राहून कमी क्षेत्र असलेल्या लहान मालमत्तांना पहिल्या पाच वर्षांसाठी चालू करामध्ये (वार्षिक दरयोग्य मूल्याधारित पध्दती) वाढ करण्यापासून सूट देण्यात आली आहे.

४. ५०० चौ.फू. क्षेत्राहून अधिक क्षेत्र असलेल्या निवासी मालमत्तांची आकारणी करण्यात आली आहे जेणेकरून आधीच्या वर्षाच्या मागणीच्या (वार्षिक दरयोग्य मूल्याधारित) दुपटीहून अधिक एवढी कर मागणीत वाढ होणार नाही.

५. अनिवासी मालमत्तांची आकारणी करण्यात आली आहे जेणेकरून आधीच्या वर्षाच्या मागणीच्या (वार्षिक दरयोग्य मूल्याधारित) तिपटीहून अधिक एवढी कर मागणीत वाढ होणार नाही.

६. त्यानंतर प्रत्येक ५ वर्षांसाठी मालमत्तांची पुनर्आकारणी होईल. मागणीमधील निव्वळ वाढ ही, जेव्हा पुनर्आकारणी करण्यात येईल तेव्हा आधीच्या वर्षाच्या मागणीच्या ४० टक्क्यांहून अधिक असणार नाही.

७. विविध योजनांतर्गत पुनर्रचना केलेल्या मालमत्तांसाठी देण्यात आलेली कर सवलत जशी आहे तशी चालू राहील.

८. बांधकामाचे वर्ष विचारात घेऊन, सर्व मालमत्तांना घसारा (५% ते ७०%) देण्यात आला आहे.

- नोंदणीकृत विक्री करार क्षेत्रानुसार (रेरानुसार) मुल्यांकन करण्यात आले असल्यामुळे नवीन मालमत्तांचे प्रत्यक्ष मुल्यांकन करण्याची गरज नाही.
- नव्याने नोंदणीकृत केलेल्या मालमत्तांचे नियमितपणे मुल्यांकन करण्यात आले आहे.

- स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्थायी समितीला मुल्यांकनासाठी आवश्यक असलेले विविध गुणन घटक ठरविण्यासाठी नियम करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे.
- प्रत्येक मालमत्तेचे भांडवली मूल्य दर ५ वर्षांनी सुधारित करावयाचे आहे.



कुळगाव-बदलापूर नगर परिषदेने ३०.१२.२०१६ पूर्वी सर्व मालमत्तांचे जीआयएस आधारित पध्दतीने सर्वेक्षण केले होते. नगर परिषद प्रशासन संचालनालयाने पुरविलेल्या सॉफ्टवेअर द्वारे मागणी देयके काढण्यात आली होती व त्याबरहुकूम नागरिकांना ऑनलाईन देयके प्रदान पध्दतीची सुविधा दिली होती. मालमत्तेचे ऑनलाईन स्वयं मुल्यांकन करण्यासाठी संगणक प्रणाली उपलब्ध करून दिली होती. याचा परिणाम असा झाला की, नागरिकांनी ती सहजगत्या स्वीकारली आणि मुल्यांकनचा मुद्दा उपस्थित झाल्यानंतर एकही विवाद किंवा अपील झालेले नव्हते.

| मालमत्तांचा तपशील | | | मागणी केलेला मालमत्ता कर (रूपये लाखात) | | |
|---|---|---|---|---|---|
| जुनी मालमत्ता | सुधारित मालमत्ता | मालमत्तांमधील वाढ | जुनी मालमत्ता | सुधारित मालमत्ता | कर मागणी मधील वाढ |
| ६८३९६ | ९५४३२ | २७०३६ | ८२६ | १७३७ | ९११ |
| टक्केवारीतील वाढ | ३९.५% | | ११०% | | |

२०१६-१७ मधील मालमत्तांच्या पुनर्मुल्यांकन सर्वेक्षणानंतर मालमत्ता कर मागणीमधील आणि शासकीय कर मागणीमधील वाढ ही पुढीलप्रमाणे आहे :-

(रूपये लाखात)

| कराचा तपशील | २०१६-१७ मधील मागणी | मूळ मागणी | उत्पन्नातील वाढ | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| मालमत्ता कर | १७३७ | ८२६ | ९११ | ११०% |
| शिक्षण कर | ३७६ | १९६ | १८० | ९१% |
| रोजगार हमी योजना कर | ३६ | १७ | १९ | १११% |

औद्योगिक मालमत्तांच्या पुनर्मुल्यांकनातील मालमत्ता कर मागणीमधील वाढ :-

(रूपये लाखात)

| मालमत्तेचा तपशील | जुनी मागणी | भांडवली मूल्याधारित पुनर्मुल्यांकनानंतर मागणी | वाढ | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| जुनी मालमत्ता | ६० | ८७ | २७ | ४५% |
| नवीन मालमत्ता | - | १२४ | १२४ | १००% |
| **एकूण** | **६०** | **२११** | **१५१** | **२५१%** |
| **अनधिकृत मालमत्तांमधील अतिरिक्त शास्तीची मागणी १५० लाख इतकी आहे.** | | | | |

**प्रकरण अभ्यास : ५**

**<u>पायाभूत प्रकल्पासाठी भांडवल उभारण्याकरिता खुल्या भांडवली बाजारामध्ये नगरपालिका ऋणपत्र काढणे.</u>**




**पार्श्वभूमी :**

पुणे शहराची अत्यंत शीघ्रतेने वाढ होत असून ते वेगाने विस्तार पावत आहे. हे सर्वांना माहीत आहे. या शहराचा भौगोलिक विस्तार व लोकसंख्येतील वाढ यांमुळे पाणी पुरवठ्याच्या मागणीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. भविष्यकालीन विस्तार आणि पाण्याची वाढती मागणी विचारात घेऊन, पुणे महानगरपालिकेने आपल्या नागरिकांसाठी ही महत्त्वाकांक्षी अशी २४ तास पाणी पुरवठा योजना दृष्टिपथात ठेवली आहे.

नगरपालिकेकडून ऋणपत्रे काढून या प्रकल्पासाठी साधनसंपत्ती संघटित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तदनुसार एकूण रू. २०० कोटींचे ७.५९% सवलत दिलेला कुपन दर असलेली नगरपालिका ऋणपत्रे खुल्या बाजारात उभारण्यात आली, जी तात्काळ संमत करण्यात आली होती.

या व्यतिरिक्त या प्रकल्पासाठी अन्य साधनांद्वारे रू. २००० कोटी एवढी रक्कम एकत्रित करण्यात आली होती.

<u>नगरपालिका ऋणपत्रे काढण्याची प्रक्रिया :-</u>




१. <u>राष्ट्रीय नगरपालिका लेखांकन नियम पुस्तिकेचा स्वीकार :</u>

पुणे महानगरपालिकेने यापूर्वीच सन २००६-०७ मध्ये राष्ट्रीय नगरपालिका नियम पुस्तिकेप्रमाणे प्रमाण लेखांकन पध्दती म्हणून दुहेरी नोंद लेखा ठेवण्याचे काम सुरू केले होते आणि २००६-०७ या वित्तीय वर्षापासून ते नफा व तोटा लेख्यात आणि ताळेबंदात दाखवले होते.

२. <u>२४/७ पाणी पुरवठा योजनेसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे :</u>

भविष्यातील पाण्याची मागणी लक्षात घेऊन २४/७ पाणी पुरवठा योजनेसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला होता. विद्यमान पाणी पुरवठा जाळ्यांमधील दोष दुरूस्त करणे व दर्जावाढ करणे हा देखील प्रकल्पाचा एक भाग होता. नवीन योजना आणि जुन्या योजनेंतर्गत विशेष दुरूस्ती, दोहोंना अंतर्भूत करणा-या प्रकल्पाचा एकूण खर्च सुमारे २८०० कोटी एवढा येणार होता.

दिनांक २८.०२.२०१६ रोजी पुणे महानगरपालिकेच्या सर्वसदस्य मंडळाने पाणी पुरवठ्याचे टप्पानिहाय (टेलिस्कोपिक) दर मंजूर केले. प्रकल्पाची आर्थिक तफावत भरून काढण्यासाठी वित्तविषयक निर्णय घेण्याची अत्यंत आवश्यकता होती.

<u>पतमापन :</u>

खुल्या भांडवली बाजारातून निधी एकत्रित करण्यात येण्यापूर्वी पुणे महानगरपालिकेला दरवर्षी ७.५९% एवढ्या सवलतीच्या दराने आपल्या अपरिवर्तनीय ऋणपत्रांचे (१० वर्षांचा कालावधी) दुहेरी पतमापन प्राप्त झाले होते.

दीर्घ मुदती प्राधिकारपत्रासाठीचे भारताचे मापन स्थिर दृष्टिकोन देणाऱ्या एए+ पर्यंत सुधारले होते. त्याचप्रमाणे स्थिर दृष्टिकोन एए+ म्हणून केअर रेटिंग (मापन) झाले होते. पुणे महानगरपालिकेने कर वसुली मोहिमेवर भर दिल्यामुळे हे शक्य झाले होते.

**कार्य गट तयार करणे :**

महाराष्ट्राच्या पुणे महानगरपालिकेचे अधिकारी यांसह वित्तीय सल्लागार, केअरकडील तांत्रिक व विधि तज्ज्ञ, इंडिया रेटिंग, एनएसडीएल, सीडीएसएल, इत्यादीं सारख्या विविध संघटनेचे प्रतिनिधी यांचा विविध कार्य गटांमध्ये समावेश करण्यात आला होता. ज्ञापन काढण्यासाठी अनिवार्य असलेली विशिष्ट माहिती उपलब्ध करून देण्यामध्ये भारत सरकारचा देखील सहभाग होता.

**निधी निबंधक आणि बँक व्यवसायी :**

महानगरपालिका रोख्यांमार्फत निधी एकत्रित करणे हे महानगरपालिकेसाठी कामाचे संपूर्ण नवीन क्षेत्र होते. या कामासाठी तज्ज्ञांच्या सहाय्याची गरज होती. भारत शासनाने विशेष शासन निर्णयाद्वारे स्थानिक शासकीय संस्थांसाठी निधी निबंधक व भांडवली गुंतवणूकदार म्हणून काही वाणिज्यिक बँक व्यवसायींची सूची तयार केली होती. ही मार्गदर्शक तत्त्वे अनुसरून पुणे महानगरपालिकेने या योजनेसाठी विनंतीवजा प्रस्ताव मागविला होता.

योग्य निवड प्रक्रिया पार पाडल्यानंतर, जिने सेबीच्या तांत्रिक व वित्तीय निकषांचे पालन केले होते, त्या मेसर्स कॅपिटल मार्केट लिमिटेडची निधी निबंधक व व्यवस्थापक म्हणून निवड करण्यात आली होती.

**कर्ज परतफेड क्षमता विश्लेषण :**

सेबीने अनिवार्य केलेले नसले तरीसुध्दा पुणे महानगरपालिकेने, महानगरपालिका वित्तीय विश्लेषण विचारात घेऊन, विश्लेषणात्मक साधन आधारित सॉफ्टवेअर विकसित केले, ज्यामध्ये महसुली खर्चाचे विश्लेषण, खेळते भांडवल, वार्षिक कर्ज उभारणी क्षमता, मासिक रोख ओघ, मासिक कर्ज परतफेड निधी, राखीव भांडवली ओघ, इत्यादी बाबी विचारात घेण्यात आल्या होत्या.

या साधनात सेबीने जारी केलेले सर्व आवश्यक नियम, सेबीने जारी केलेली कर्जाच्या परतफेडीची मार्गदर्शक तत्त्वे यांचे अनुपालन केले गेले होते.

**<u>सेबीकडून देण्यात आलेल्या सवलती :</u>**

सेबीची मार्गदर्शक तत्त्वे व नियम यांनुसार, भांडवली कर्जदाराला राष्ट्रीय लेखांकन नियम पुस्तिकेनुसार वित्तीय विवरणपत्रे व लेखे सादर करावयाचे असतात. परंतु सेबीने, पुणे महानगरपालिकेला आधीच्या वर्षाच्या लेखापरीक्षित लेख्यांद्वारे लेख्यांचा तपशील सादर करणे अवघड आहे ही वस्तुस्थिती विचारात घेऊन या महानगरपालिकेचे निकष शिथिल केले.

**<u>पुणे महानगरपालिकेच्या सर्वसदस्य मंडळाची व स्थायी समितीची आणि महाराष्ट्र शासनाची मंजुरी</u>** :

मुंबई महानगरपालिका अधिनियमानुसार, स्थायी समिती व पुणे महानगरपालिकेचे सर्वसदस्य मंडळ हे सर्व वित्तीय निर्णयांसाठी मंजुरी देणारे प्राधिकारी आहेत. पुणे महानगरपालिकेच्या सर्वसदस्य मंडळाने आणि स्थायी समितीने, २४/७ पाणी पुरवठा योजनेसाठी प्रशासनाने मूक संमती दिलेल्या उत्पन्न निर्मिती प्रस्तावासह सर्व प्रस्तावांना यथोचित मंजुरी दिली आहे.

महाराष्ट्र शासनाने देखील निधीकरणाची ही योजना प्रथमच मान्य केली आहे.

**<u>गुंतवणूकदारांशी संवाद, ऋणपत्रांची नोंदणी व विक्री :</u>**

निवेदनास मंजुरी मिळाल्यानंतर, ते मूल्यमापनासाठी व गुंतवणुकीसाठी म्युच्युअल फंड, निवृत्ती वेतन निधी, बँका, विमा कंपन्या यांसारख्या क्षमताधारित गुंतवणूकदारांकडे सादर करण्यात आले. आवश्यकता म्हणून पुणे महानगरपालिकेच्या व बॉम्बे स्टॉक एक्सचेंजच्या करारनाम्यानुसार ऋणपत्रे सेबीकडे नोंदणीकृत केली होती. त्यानंतर ऋणपत्रांसाठीची नोंद घेण्याची प्रक्रिया सुरू झाली.

**<u>अनुपालन व तक्रार निवारण यंत्रणा :</u>**

पुणे महानगरपालिकेने, गुंतवणूकदारांच्या सेवेसाठी, अनुपालनासाठी व तक्रार निवारणासाठी निबंधकाच्या कार्यालयामध्ये संव्यवहार एजंट व अनुपालन अधिकारी असलेले विशेष केंद्र निर्माण केले. प्रक्रियेवर संनियत्रण ठेवण्यासाठी बॉम्बे स्टॉक एक्सचेंजने देखील आपले प्रतिनिधी नियुक्त केले होते. या केंद्रामार्फत सातत्याने संनियंत्रण व ग्राहकांच्या तक्रारीचे निवारण करून त्यांचे अनुपालन केले जात होते.

**<u>कर्जाच्या परतफेडीसाठी इसक्रो कार्यतंत्र व रोखा विश्वस्त करारनामा :</u>**

सेबीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, व्याज व भांडवल यांची वेळेवर परतफेड करण्यासाठी पुणे महानगरपालिकेने व विश्वस्त मंडळाने (निधी निबंधक) परतफेड एजन्सी म्हणून बँक ऑफ महाराष्ट्र

येथे इसक्रो खात उघडले होते आणि ते मालमत्ता कर वसुली लेख्यांशी संलग्न केले होते. त्याचे सर्व व्यवहार ऑनलाईन आहेत.

**केंद्र सरकारद्वारे व्याजासाठी अर्थसाहाय्य :**

पुणे महानगरपालिकेला, अमृत योजनेसाठी प्रोत्साहक अनुदान म्हणून भारत सरकारकडून या ऋणपत्रांसाठी व्याजाकरिता अर्थसाहाय्य यास्तव रू. २६ कोटी एवढी रक्कम प्राप्त झाली.

**खुल्या बाजारातून भांडवल उभारणीचे फायदे :**

ऋणपत्राद्वारे खुल्या बाजारातून भांडवल उभारणीचा मोठा फायदा असा आहे की पुणे महानगरपालिकेने जास्त आवश्यकता असलेले भांडवल, बँकामार्फत उपलब्ध असलेल्या वाणिज्यिक कर्जाच्य तुलनेत अत्यंत कमी व्याज दराने (७.५९% कुपन दराच्या दराने) उभारले होते. पुणे महानगरपालिकेने ऋणपत्रांद्वारे रू.२०० कोटी व त्या व्यतिरिक्त इतर साधनांद्वारे रू. २००० कोटी एवढी रक्कम उभारली. वेळेवर भांडवल उभारल्यामुळे २४/७ पाणी पुरवठा योजनेचा मोठा प्रकल्प वेळेत पूर्ण झाला. त्यामुळे महानगरपालिकेच्या वित्तीय शिस्तीची देखील खात्री पटली व तिच्या पतमापनात सुधारणा झाली.

**पुनरावृत्ती :**

विशेषकरून केंद्र सरकारकडून जेव्हा अनुदान घटकासाठी कमी साहाय्य मिळत असेल किंवा राज्य शासनाचे साहाय्य पुरेसे नसेल किंवा तात्काळ उपलब्ध होणार नसेल तेव्हा पायाभूत सुविधा प्रकल्पाचा भांडवली खर्च भागविण्यासाठी ब व क वर्गीय महानगरपालिकांना या आदर्श नमुन्याची पुनरावृत्ती करता येऊ शकेल.

प्रकरण अभ्यास : ६

**देवगड नगर पंचायतीने आपली स्वत:ची खुली जमीन सिनेमागृहासाठी दीर्घ मुदतीकरिता भाडयाने दिल्यामुळे महसूल मिळाला व शहरासाठी करमणुकीची सुविधा उपलब्ध झाली.**

प्रस्तावना :

२०११ च्या जनगणनेनुसार १६९०४ एवढी लोकसंख्या असलेले देवगड हे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तहसील शहर आहे. विजयदुर्ग किल्ला, समुद्र किनारा, दीपगृह, ऐतिहासिक तीर्थयात्रा क्षेत्र असलेली कुणकेश्वर व रामेश्वर मंदिरे यांमुळे हे शहर स्थानिक पर्यटकांचे आवडते ठिकाण आहे. महाराष्ट्राचा पहिला पवन चक्की प्रकल्प हा देवगड नगर पंचायत हद्दीत स्थित आहे. हे शहर हापूस आंब्यासाठी व मासे निर्यात करण्यासाठी प्रसिध्द आहे.

पार्श्वभूमी :

देवगड जामसंडे नगर पंचायत अलिकडे सन २०१५-१६ मध्ये स्थापन झाली आहे. लोकप्रिय पर्यटन केंद्र ठरण्याची या शहराची क्षमता विचारात घेऊन, देवगड नगर पंचायत मत्तांचा स्रोत म्हणून नगरपालिकेची खुली जमीन वापरून सरकारी खाजगी भागीदारीद्वारे आदर्श नमुना तयार करून पर्यावरणस्नेही ठिकाण म्हणून लहान शहर विकसित करण्यावर लक्ष केंद्रीत करण्याचा प्रयत्न करीत आहे.

महसूल निर्माण करण्याच्या कार्यप्रणालीची प्रक्रिया :

महसूल निर्माण करण्यासाठी भांडवली गुंतवणुकीचा स्रोत म्हणून देवगड जामसंडे नगर पंचायतीने नगरपालिकेची खुली जागा वापरली (मोठा आराखडा मंजूर करतांना १०% खुली जागा सुपूर्द करण्याच्या विकास नियंत्रण नियमाच्या तरतुदीनुसार संपादित केली). नगर पंचायतीने सरकारी-खाजगी भागीदारी पध्दतीने करमणूकविषयक प्रस्तावासाठी खुल्या जागेचा लिलाव करण्याचा आपला इरादा वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करून घोषित केला होता. पुनर्वापरयोग्य सामग्री वापरून लहान सिनेमागृह सुरू करण्यासाठी स्टारलाईट बॉक्स सिनेमाज कडून प्रतिसाद मिळाला. नगर पंचायतीने आपल्या दिनांक १२.०७.२०१८ च्या सर्वसदस्य मंडळाच्या बैठकीत या प्रस्तावास मान्यता दिली. नगर पंचायतीला पहिल्या तीन वर्षांसाठी दरमहा रू. २०,०००/- एवढे भाडे मिळणार होते व चौथ्या वर्षापासून पुढे प्रत्येक वर्षी त्यात १० टक्के एवढी वाढ होणार होती. नगर पंचायतीला रू. २,४०,०००/- एवढी प्रतिभूती ठेव देखील मिळाली. कंपनीने सिनेमागृह विकसित केले व उर्वरित क्षेत्रात बगीचा तयार केला.



या अगोदर तालुक्यामध्ये कोणतीही सार्वजनिक करमणुकीची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे तालुक्यातील जवळपासच्या ग्रामपंचायतीत राहणाऱ्या रहिवाशांसह पर्यटक तसेच नगर पंचायतीने नागरिक या सुविधेचा लाभ घेत आहेत.

<u>पुनरावृत्ती :</u>

जेथे सार्वजनिक करमणुकीच्या सुविधा उपलब्ध नाहीत, अशा लहान नगरपरिषदा व नगर पंचायती या प्रकारच्या उपक्रमाचा वापर करू शकतील व त्या द्वारे नागरिकांना अधिक सुविधा निर्माण करण्यासाठी काही महसूल निर्माण करण्याबरोबरच करमणुकीच्या अतिरिक्त सुविधा पुरवू शकतील.

**<u>प्रकरण अभ्यास : ७</u>**

**<u>अधिनियमाच्या तरतुदीनुसार उपविधी अंगीकारून प्रशासकीय फी द्वारे महसूल एकत्र करणे :</u>**

<u>प्रस्तावना :</u>

महाराष्ट्र नगरपरिषदा अधिनियम,१९६५ च्या कलम ३२१ ते ३२४ मध्ये राज्य शासनास आणि नगरपरिषदांना त्यांचे काम सुकर करण्यासाठी नियम व उपविधी तयार करण्याची तरतूद आहे. फार वर्षांपूर्वी नगरपरिषदांच्या ३८ कार्यासंबंधात महाराष्ट्र शासनाने आदर्श उपविधी उपलब्ध करून दिला असला तरीसुध्दा बहुसंख्य नगरपरिषदांनी विविध कारणांस्तव हा आदर्श उपविधी अंगीकारला नाही.

तथापि शिरपूर-वारवडे नगरपरिषदेने (धुळे जिल्हा) आपल्या गरजेनुसार राज्य शासनाची मंजुरी घेऊन या आदर्श उपविधीमध्ये योग्य तो फेरबदल केला, त्यामुळे त्यांच्या दैनंदिन कामकाजासाठी कायदेशीर चौकट प्राप्त झाली. यातून परिषदेच्या कर्मचारीवर्गासाठी कर्तव्याचे पालन करणे सोपे गेले आणि नगरपालिका अधिकारी व नागरिक तसेच अशासकीय अधिकारी यांच्यामधील मतभेद कमी झाले. यामुळे नगरपरिषदेच्या उत्पन्नात देखील वाढ झाली.

शिरपूर-वारवडे नगरपरिषदेने आपल्या कायद्यात योग्य ती सुधारणा करून फी गोळा केली, त्याबाबतची काही उदाहरणे पुढे दिली आहेत.

**१. अभिलेखाच्या तपासणीसाठी आणि प्रमाणित प्रती देण्यासाठी उपविधी.**

अभिलेख्याच्या तपासणीसाठी आणि प्रमाणित प्रती देण्यासाठी शिरपूर-वारवडे नगरपरिषदेने उपविधीचा अंगीकार केला आणि जन्म प्रमाणपत्र, मृत्यु प्रमाणपत्र देण्यासारख्या प्रत्येक कामासाठी प्रशासकीय शुल्क(फी )निश्चित केले.

| अनुक्रमांक | तपशील | शुल्क |
|---|---|---|
| १. | जन्म प्रमाणपत्र | ५०/- |
| २. | मृत्यु प्रमाणपत्र | ५०/- |
| ३. | घरगुती वीज जोडणीसाठी ना हरकत प्रमाणपत्र | २५०/- |
| ४. | घरगुतीतेर वीज जोडणीसाठी ना हरकत प्रमाणपत्र | ४००/- |
| ५. | व्यवसाय करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र | ४००/- |
| ६. | इमारत तपशीलासाठी प्रमाणपत्र | २००/- |
| ७. | कोणतेही देणे नाही प्रमाणपत्रासाठी ना हरकत प्रमाणपत्र | २००/- |
| ८. | इतर प्रमाणपत्रे | २००/- |

वरीलप्रमाणे शुल्क आकारल्यामुळे नगरपरिषदेला पुढील प्रमाणाने उत्पन्न मिळाले.

| वर्ष | प्राप्त झालेले प्रशासकीय शुल्क (प्रत्यक्ष रूपयांमध्ये) |
|---|---|
| २०१५-१६ | ५,९८,०२० |
| २०१६-१७ | ६,८७,४१२ |
| २०१७-१८ | ६,०९,४६० |
| २०१८-१९ | ६,१८,८२० |

**२. विशेष स्वच्छता कर आकारण्याची उप विधी :**

स्वच्छतेसाठी (ज्याकरिता नगरपालिका भूमिगत जलनि:सारण यंत्रणेमार्फत वैयक्तिक प्रसाधनगृह व स्नानगृह यांसाठी पाण्याची जोडणी दिलेली) नगरपरिषदेने सर्व नागरिकांकडून विशेष स्वच्छता कर म्हणून दरमहा रू. १००/- एवढा आकार वसूल करण्याचे ठरविले व मालमत्ता कर देयकात तो आकार समाविष्ट केला. त्यामुळे नगरपरिषदेला खाली दर्शविल्याप्रमाणे अतिरिक्त उत्पन्न मिळाले.

| वर्ष | विशेष स्वच्छता कर (प्रत्यक्ष रूपयांमध्ये) |
|---|---|
| २०१५-१६ | १४,८०,२४२ |
| २०१६-१७ | १४,९३,७०८ |
| २०१७-१८ | १५,६६,२१५ |
| २०१८-१९ | १७,२६,८०० (मागणी) |

## ३. फेरीवाले व हातगाडीवाले यांसाठी उपविधी :

केंद्र शासनाने फेरीवाल्यांसाठी पुर्नवसन योजना राबविण्याचे सक्तीचे करण्यापूर्वी, शिरपूर नगरपरिषदेने फेरीवाले व हातगाडीवाले यांच्याकडून तात्पुरती व्यवसाय फी घेण्यासाठी उपविधी स्वीकृत केला होता. प्रत्येक फेरीवाल्यासाठी दररोज रू. ५/- तर प्रत्येक हातगाडीवाल्यासाठी दररोज रू.१०/- एवढी फी होती. नगरपरिषदेने गोळा केलेला महसूल पुढील प्रमाणे होता :-

| वर्ष | वार्षिक उत्पन्न (प्रत्यक्ष रूपयांमध्ये) |
|---|---|
| २०१५-१६ | १९,८५,००० |
| २०१६-१७ | १९,८५,००० |
| २०१७-१८ | २८,११,१११ |
| २०१८-१९ | २८,११,१११ (मागणी) |

## ४. पाणी पुरवठा दरांसाठी उपविधी :

शिरपूर नगरपरिषदेने, उत्पन्न मिळविण्यासाठी आणि पाणी पुरवठा योजनेचे परिक्षण करताना होणारी हानी भरून काढण्यासाठी उपविधी स्वीकृत केला. जुलै २०१२ पासून सुधारित दर हे दरवर्षी रू. १२००/- (अर्धा इंच जोडणीसाठी) वरून दरवर्षी रू. १५००/- इतके झाले. मागणीमधील वाढ खाली दिलेल्या तक्त्यात दर्शविली आहे. त्यामुळे पाणी पुरवठा योजना टिकून राहिली. आणखी नागरिकांना २४/७ पाणी पुरविताना संपूर्ण योजना सुधारण्यात आली आणि खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे मीटर जोडणीसह दरांमध्ये वाढ झाली. उत्पन्नातील वाढ पुढे दर्शविल्याप्रमाणे आहे:

**नवीन पाणी पुरवठा दर - २०१२**

| वर्ष | दरवर्षीचे पाणी पुरवठा दर | एकूण मागणी | एकूण पाणी जोडण्या |
|---|---|---|---|
| २०११-१२ | रू. १२००/- | १,२९,००,०००/- | १०,४५६ |
| २०१२-१३ | रू. १५००/- | १,६६,५०,४५०/- | ११,११० |

दिनांक ०१.०४.२०१८ पासून सुधारित पाणी पुरवठा दर

| अ. क्र. | जेव्हा मीटर वापरून पाणी पुरवठा केला तेव्हा (मीटर दरमहा) | १००० लिटरसाठी दर (निवासी व अनिवासी) | |
|---|---|---|---|
| | | निवासी | अनिवासी |
| १. | किमान पाणी पुरवठा दर (दरवर्षी १८००० लिटर पर्यंत) दरवर्षीचे रू.३६०/- एवढे मीटर भाडयासह | दरवर्षी रू. १५४८/- प्रत्येक १००० लिटरसाठी रू. ५.५०/- | दरवर्षी रू.२१४२/- प्रत्येक १००० लिटरसाठी रू. ८.२५ |
| २. | १८००१ ते २४००० लिटर | रू. ६.५० | रू. ९.२५ |
| ३. | २४००१ ते ३०००० लिटर | रू. ७.०० | रू. १०.५० |
| ४. | ३०००१ ते ३६००० लिटर | रू. ७.५० | रू. ११.२५ |
| ५. | ३६००१ पासून पुढे | रू. ८.०० | रू. १२.०० |

मागील तीन वर्षांची पाणीपट्टी वसुली

| वर्ष | पाणीपट्टी वसुली |
|---|---|
| २०१५-१६ | १,८०,१६,४५८ |
| २०१६-१७ | १,८३,२८,३५२ |
| २०१७-१८ | १,९९,३९,२९१ |
| २०१८-१९ | १,३५,०४,३८४ (मार्च २०१९ पर्यंत) |

पुनरावृत्ती :

शिरपूर-वारवडे नगरपरिषदेला आलेल्या अनुभवावरून असे स्पष्टपणे दिसून येते की जर नगरपरिषदेने उपविधी स्वीकृत केला आणि फी संरचनेत वेळोवेळी सुधारणा केली तर सेवांचा खर्च वसूल होऊ शकतो आणि नागरिक, परिषदेचे अशासकीय सदस्य व अधिकारी वर्ग यांच्यामध्ये होणारे वाद टाळले जाऊन नागरिकांना उत्तम सेवा देता येऊ शकते.

## कर्ज घेऊन पायाभूत सुविधांसाठी वित्तव्यवस्था करणे (भांडवली गुंतवणूक)

### प्रकरण अभ्यास : ८

### कर्ज घेऊन पायाभूत सुविधांसाठी वित्तव्यवस्था करणे - अंबरनाथ नगरपरिषदेचा प्रकरण अभ्यास :-

प्रस्तावना :

सांडपाणी प्रक्रिया संस्करणासह भूमिगत जलनि:सारण यंत्रणा असलेल्या अगदी कमी नगरपरिषदा महाराष्ट्रामध्ये आहेत. तथापि 'अ' वर्ग नगरपालिका असलेल्या अंबरनाथ नगरपरिषदेने

केंद्र सरकारच्या योजनेमार्फत (जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूत्थान उपक्रम) कर्ज व अर्थसाहाय्याच्या स्वरूपात निधी उभारून मोठा पायाभूत सुविधा प्रकल्प राबविण्याची दिशा दाखवून दिली आहे. ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ नगरपरिषदेने (२,४५,४७५ एवढी लोकसंख्या) चांगल्या प्रकारे वित्तीय व्यवस्थापन करून योजना ठरलेल्या कालावधीत यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे.

**पार्श्वभूमी :**

केंद्र शासनाने, जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूत्थान उपक्रमांतर्गत भारतामधील विविध शहरांमध्ये वेगवेगळे पायाभूत सुविधा प्रकल्प मंजूर केले. अंबरनाथ नगरपरिषदेला जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूत्थान उपक्रम (यूआयजी) योजनेंतर्गत भूमिगत जलनि:सारण योजनेसाठी मंजुरी मिळाली. त्याचा तपशील खाली दिला आहे:-

| अ. क्र. | नगर परिषद | प्रकल्पाचे नाव | प्रकल्पा साठी मंजूर केलेला खर्च | केंद्र सरकार चा हिस्सा (३३%) | राज्य शासनाचा हिस्सा (१७%) | नगर परिषदेचा हिस्सा (५०%) | केंद्र सरकार कडून मंजूरी मिळाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अंबरनाथ | भूमिगत जल नि:सारण | १०९.४१५७ | ३८.२९५५ | १६.४१२३ | ५४.७०७९ | ७.२.२०१२ |

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून कर्ज :-**

भूमिगत जलनि:सारण योजना वेळेत पूर्ण करण्यासाठी स्वत:चा भांडवली हिस्सा (मंजूर मानकानुसार) निर्माण करण्याच्या दृष्टिने आणि आपले स्वत:चे भांडवल उभारण्यासाठी असलेली कमकुवत वित्तीय स्थिती विचारात घेऊन अंबरनाथ नगरपरिषदेला कर्ज उभारण्याचा पर्याय स्वीकारावा लागला. म्हणून, अंबरनाथ नगरपरिषदेच्या सर्वसदस्य मंडळाने ठराव क्र. ०१ दिनांक १०.०४.२०१३ व ठराव क्र. ४८ दिनांक २९.११.२०१५ द्वारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) कर्ज उभारण्यास मंजुरी दिली.

परिषदेच्या वित्तीय स्थितीचे मूल्यनिर्धारण केल्यानंतर, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने अंबंरनाथ नगरपरिषदेच्या रू. ५६.३२ कोटींच्या कर्जाच्या प्रस्तावास दरवर्षी ६% एवढा व्याज दर आकारण्यास मंजुरी दिली.

राज्य शासनाने देखील दि.१३.०३.२०१५ रोजी या प्रस्तावास मान्यता दिली जी महाराष्ट्र नगरपालिका,नगर पंचायत व औद्योगिक नागरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०८ अन्वये अनिवार्य होती.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ६ हप्त्यांमध्ये खाली  दर्शविल्याप्रमाणे कर्ज दिले:-

| अ.क्र. | कर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | कर्जाची रक्कम (रूपयांमध्ये) |
|---|---|---|
| १. | ३०.०३.२०१५ | १९,२१,९७,००० |
| २. | १५.०५.२०१५ | ९,०५,८६,००० |
| ३. | १४.०७.२०१५ | ४,४२,८२,००० |
| ४. | ०६.०८.२०१५ | ११,२६,३८,००० |
| ५. | २१.०१.२०१५ | ७,५२,९०,००० |
| ६. | १४.०८.२०१६ | ३,००,६७,००० |

या कर्जासाठी नगरपालिकेने युनियन बँकेमध्ये इसक्रो खाते उघडले होते व ते मालमत्ता कर वसुली लेख्यांशी संलग्न केले होते. नगरपालिकेने  केलेली  परतफेड खाली दर्शविल्यामाणे आहे.

| अ.क्र. | कर्जाच्या परतफेडीचा दिनांक | परतफेड केलेल्या कर्जाची रक्कम (रूपयांमध्ये) |
|---|---|---|
| १. | ३०.०६.२०१५ | ९७,२२,३५० |
| २. | ३१.१२.२०१५ | २,३०,८५,९१५ |
| ३. | ३०.०६.२०१६ | २,७७,०४,८५२ |
| ४. | ३१.१२.२०१६ | २,९३,३०,८६० |
| ५. | ३०.०६.२०१७ | २,९६,३५,६३८ |
| ६. | ३१.१२.२०१७ | २,९६,३५,६३८ |
| ७. | ३०.०६.२०१८ | २,९६,३५,६३८ |
| ८. | ३१.१२.२०१८ | २,९६,३५,६३८ |
| | **एकूण** | **२०,८३,८६,५२८** |

आतापर्यंत अंबरनाथ नगरपरिषदेने रू. २०.८३ कोटी एवढया कर्जाची परतफेड केली आहे आणि ही परतफेड ठरलेल्या वेळी केली आहे.

**कर्ज उभारण्याचा फायदा :**

प्रकल्प प्रत्यक्ष वेळेत पूर्ण झाला आणि प्रकल्प समाप्ती प्रमाणपत्र शासनाकडे दिनांक २७.०३.२०१७ रोजी सादर केले. कर्जाच्या नियमित हप्त्यामुळे बांधकाम करताना आवश्यक असलेली शिस्त पाळता येऊ शकली. योजनेंतर्गत शहराचे ७०% क्षेत्र समाविष्ट झाले. यामुळे शहराच्या पर्यावरणात सुधारणा झाली आणि वालधुनी नदीचे प्रदूषण कमी झाले.  प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर २७ एमएलडी पैकी २२ एमएलडी एवढया सांडपाण्यावर आता प्रक्रिया केली जाते व ते वालधुनी नदीत सोडले जाते.  याउलट पूर्वीच्या कार्यपध्दतीनुसार प्रक्रिया न करताच सांडपाणी नदीत सोडले जात होते.

नगरपरिषदेने स्वच्छता कर आकारून कार्यचालन खर्च वसूल करण्यास सुरूवात केली. मागील तीन वर्षांमध्ये मिळालेले उत्पन्न खाली दर्शविले आहे.

| अ.क्र. | तपशील | वर्ष | प्रति मालमत्ता दरवर्षी | एकूण मागणी | वसुली |
|---|---|---|---|---|---|
| १. | स्वच्छता कर | २०१६-१७ | रू. १२० | रू. १०९ लाख | रू. ५४.४९ लाख |
| २. | | २०१७-१८ | रू. १२० | रू. १२० लाख | रू. ६४.१९ लाख |
| ३. | | २०१८-१९ | रू. २४० | रू. २०६ लाख | रू. ७९.०४ लाख |

**<u>पुनरावृत्ती :-</u>**

जर वित्तीय प्रस्ताव सुरवातीला योग्य प्रकारे तयार करण्यात आला आणि निलंबलेख (escrow) लेख्याचा वापर करून वेळेत परतफेड केली तर पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी कर्जाद्वारे भांडवल उभारता येऊ शकते हे अंबरनाथ नगरपरिषदेच्या उदाहरणावरून स्पष्टपणे दिसून येते.







**प्रकरण अभ्यास : ९**
**कार्यक्षम पाणी पुरवठा व्यवस्थापन**

इस्लामपूर नगरपरिषद ही पुणे विभागात सांगली जिल्ह्यातील 'ब' वर्ग शहर आहे. २०११ च्या जनगणनेनुसार या परिषदेची लोकसंख्या १४३७६ कुटुंबांसह ६७३९१ एवढी आहे. नगरपरिषदेने पाणी पुरवठा योजना राबविली आहे. नगरपरिषदेने १४० एलपीसीडी पाणी उपलब्ध असताना शहराला ४ एमएलडी पाणी पुरविले. नगरपरिषदेने प्रत्येक घराला जोडणी देण्याची योजना कार्यान्वीत केली. 'बाटलीबंद पाणी दर्जा' मानकाप्रमाणे पाणी गुणवत्तेचा दर्जा आहे. महाराष्ट्रात प्रथम ही योजना राबवली गेली असून त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून विहित संकल्पचित्र मानकांनुसार

काम समाप्ती प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. परिषदेला भारतीय जलसंघाकडून पाणी पुरवण्याची उत्तम व्यवस्थापन कार्यप्रणाली यासाठी पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

**पार्श्वभूमी :**

१९९२ पर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने जुनी योजना चालू ठेवली होती त्याद्वारे १९४७ पासून शहराला दोन एमएलडी पाणी पुरवठा होत होता. १९९२ मध्ये पाणी पुरवठा योजना सुधारण्यात आली आणि जुन्या योजनेबरोबरच शहराला ८ एमएलडी पाणी पुरवठा करण्यासाठी नवीन योजना अंमलात आणण्यात आली होती. म्हणून आज शहराला ६ एमएलडी पाणी मिळत आहे. १९९२ मध्ये जुन्या योजनेत २८०० जोडण्या होत्या तर २०१८ मध्ये ही संख्या ११३०० एवढी आहे.

**सुधारित पाणी पुरवठा योजनेचा तपशील :**

सन २०३८ मध्ये अंदाजित केलेल्या १,३५,००० लोकसंख्येसाठी पाणी पुरवठा करण्याकरिता सुधारित पाणी पुरवठा योजना तयार करण्यात आली आहे. योजनेमध्ये नजीकच्या ठिकाणी असलेल्या ६ एमएलडी पाणी प्रक्रिया संयंत्राशिवाय १०० एचपी (अश्वशक्ती) असलेल्या ३ दहा मीटर्सच्या व्यासाच्या जॅक वेलचे मुख्य २२ एमएस पाईपलाईन उभारून १० एमएलडी स्वयंचलित यांत्रिक प्रक्रिया संयंत्रासाठी तरतूद आहे. केंद्र शासनाने यूआयडीएसएसएमटी अन्वये रू. १४.५४ कोटींचा प्रकल्प खर्च मंजूर केला आहे. राज्य शासनाकडील रू. १.४५ कोटींच्या अनुदानासह केंद्राचा हिस्सा रु.११.६३ कोटी एवढा होता. नगरपरिषदेचे अंशदान रू. १.४५ कोटी एवढे होते. तथापि प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नगरपरिषदेने रू. १.७८ कोटी एवढी अतिरिक्त रक्कम खर्च केली होती व ती मीटर मोजणी खर्चात समाविष्ट केली.

सन १९९३ पासून १००% मीटर जोडण्या देण्यात आल्या आहेत. १०६ गट जोडणीचा अपवाद वगळता शहरामध्ये एकही जोडणी देणे शिल्लक राहिलेली नाही. आज, ११३०० जोडण्या दिल्यामुळे प्रत्येक जोडणीमागे रू. १५६०/- एवढी ठोक रक्कम पाणीपट्टी म्हणून दरवर्षी वसूल केली जाते. यातून नगरपरिषदेला रू. २.८ कोटी एवढे उत्पन्न प्राप्त झाले आहे. तथापि, वीज आकार देयक देखील जास्त असून दरवर्षी रू. २.८ कोटी एवढी रक्कम प्राप्त होते.

नगरपरिषदेने एप्रिल २००६-०७ पासून पाणीपट्टी उपविधीस मान्यता दिली आहे. परिषदेकडून निवासी वापरासाठी १००० लिटरमागे रू. ६.५, शासकीय वापरासाठी १००० लिटरमागे रू.१३ व व्यापारी वापरासाठी १००० लिटरमागे रू. २० एवढे पाणी दर आकारण्यात आले आहेत. पाणीपट्टी वसुली ही नेहमीच ९०टक्क्यांच्या वर राहिलेली आहे.

**योजनेचा लाभ :**

पाण्याचा दर्जा अत्यंत चांगला ठेवला गेला असल्यामुळे मागील वीस वर्षांमध्ये शहरात पाण्यापासून कोणताही रोग उद्भवलेला नाही. १०० टक्के मीटरने मोजणी केल्यामुळे पाणी गळती व चोरी होणार नसल्याची खात्री पटते व त्याचा परिणाम म्हणून नगरपरिषदेला रू. २.८ कोटी उत्पन्न मिळेल.

**पुनरावृत्ती :**

पाणी पुरवठा करण्यावरील होणारा खर्च भागविण्याच्या दृष्टिने पाणीपट्टी दरात नियमितपणे वाढ करण्यासह कार्यक्षम प्रशासनासाठी अन्य नगरपरिषद पाणी पुरवठा व्यवस्थापनाच्या या आदर्श नमुन्याची नक्कल करू शकते.

**प्रकरण अभ्यास : १०**

**भाड्याने देण्यासाठी दुकाने असलेली प्रशासकीय कार्यालय इमारत बांधताना भांडवली उत्पन्नाचा कायमस्वरूपी स्रोत निर्माण करण्यासाठी शासकीय अनुदानांचा प्रभावी वापर.**

**प्रस्तावना :**

कोकण विभागाच्या रायगड जिल्ह्यातील रोहा ही 'क' वर्ग नगरपरिषद आहे. १२व्या वित्त आयोगाचे अनुदान वापरून आणि राज्य शासनाचे विशेष प्रयोजनार्थ असलेले अनुदान वापरून नगर परिषदेने आपली स्वत:ची दोन मजली प्रशासकीय कार्यालय इमारत तळ मजल्यावर दुकानांचे गाळे व मोठ्या प्रमाणात स्टिल्ट वाहनतळ उभारून विकसित केली. परिषदेने २रा मजला भाडे तत्त्वावर राज्य वीज मंडळाच्या कार्यालयासाठी भाड्याने दिला. अशा प्रकारे परिषदेला कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन निर्माण झाले.

**प्रक्रिया :**

या इमारतीमध्ये १९ दुकाने असून त्यापैकी ७ दुकाने २७ चौ.मीटर्सची (चटईक्षेत्र), १ दुकान २४.६० चौ.मीटर्सचे (चटईक्षेत्र) आणि ११ दुकाने १९.९५ चौ.मीटर्सची (चटईक्षेत्र) आहेत. ही दुकाने रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली ३ सदस्यीय मंजुरी समितीकडून किमान भाडे व एकावेळी ना परतावा ठेव यांस मान्यता घेण्याची योग्य कार्यपध्दती अनुसरून ३० वर्षांच्या कालावधीसाठी भाड्याने दिली होती. त्यानुसार, ना परतावा ठेवीसाठी स्पर्धात्मक बोलीकरिता निविदा प्रक्रिया पार पाडण्यात आली.

नगरपरिषदेने वित्तीय वर्ष २०१२ मध्ये ५% वार्षिक वाढीसह रू. ५०० एवढे दर महिन्याचे किमान भाडे ते रू. १७००/- एवढे दर महिन्याचे कमाल भाडे घेऊन ना परतावा ठेव म्हणून एकूण रू. १.५८ कोटी एवढी रक्कम प्राप्त केली.

<u>नगरपरिषदेला झालेला वित्तीय लाभ :</u>

२०१७-१८ पर्यंत नगरपरिषदेला एकूण रू. ११.५८ लाख एवढे भाडे व रू. ९.८३ लाख मालमत्ता कर मिळून एकूण रू. २१.४१ लाख एवढी रक्कम दुकांनामुळे मिळाली. तसेच इमारतीला दुसरा मजला महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाला भाड्याने दिल्यामुळे दरमहा रू.७७,७८६/- याप्रमाणे मागील ८ वर्षांसाठी नगरपरिषदेला रू. ७४.५० लाख एवढी रक्कम प्राप्त झाली. नगरपरिषदेला महसुली उत्पन्न म्हणून एकूण रू. ९५.९२ लाख इतकी रक्कम मिळाली तर ना परतावा ठेव म्हणून रू. १.५८ कोटी इतके भांडवली उत्पन्न मिळाले. याशिवाय नागरिकांच्या सेवांसाठी सुसज्ज नगरपरिषद प्रशासकीय कार्यालय उपलब्ध झाले.

१२व्या वित्त आयोगाच्या अनुदानातून आणि राज्य शासनाच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेखालील अनुदानातून या इमारतीच्या एकूण बांधकामासाठी नगरपरिषदेने रू. ३.०५ कोटी एवढा खर्च केला.

<u>पुनरावृत्ती :</u>

उत्पन्नाचे कायमस्वरूपी साधन निर्माण करण्यासाठी राज्य शासनाच्या व केंद्र सरकारच्या अनुदानाचा प्रभावीपणे वापर करण्याचा मार्ग रोहा नगरपरिषदेने दाखवून दिला आहे. या आदर्श नमुन्याची सर्व नगरपरिषदा पुनरावृत्ती करू शकतात.

---

## प्रकरण १२ (अ)

### शासनावर अतिरिक्त वित्तीय भार येणाऱ्या शिफारशी

| परिच्छेद क्र. | शिफारशी | संबंधित विभाग | वित्तीय भार/ अभिप्राय |
|---|---|---|---|
| ६.९.५ | जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियमाच्या कलम १४४, १५५, आणि कलम १८५ अनुसार नियुक्त उपबंध करासंबंधातील सर्व निधी वसुलीच्या आधारे देण्याऐवजी मागणीच्या आधारे (जमाबंदी) जिल्हा परिषदेला देण्यात यावा, असे निश्चित करण्यात यावे. | महसूल , ग्रामविकास विभाग | जमीन महसूल १९३० मध्ये निश्चित करण्यात आला होता आणि तेव्हा पासून सुधारण्यात आलेला नाही याचा विचार करता प्रस्तावित बदलाचा वित्तीय भार मर्यादित असेल. तथापि यामुळे विद्यमान पद्धतीत क्षेत्रामध्ये वास्तवात गणना कशी करण्यात आली आहे याबाबत स्पष्टता मिळणे शक्य नाही, ही क्लिष्टता कमी होईल. |
| ६.९.५ | आम्ही याप्रमाणे नव्या सूत्राची शिफारस करतो की, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांना देण्यात येणारा उपकर हा मूळ शेतसारा किंवा मूळ आकार (शेती किंवा बिनशेती) म्हणजेच मूळ जमीन महसूलाच्या मागणीच्या २० पट असावा.जमीन महसूल वसूल केला आहे किंवा नाही यावर तो अवलंबून नसावा. | महसूल , ग्राम विकास विभाग | वरीलप्रमाणे |
| ६.९.५ | वसूल केलेल्या निर्धारित करांवर राज्य शासन स्तरावर कोणतीही "अर्थसंकल्पीय कपात" करता येणार नाही अन्यथा ते अधिनियमाचे उल्लंघन ठरेल. | महसूल , ग्राम विकास विभाग वित्त विभाग | पंचायत राज संस्थाच्यावतीने राज्य सरकारने हे कर आधीच वसूल केलेले असल्याने अधिकचा भार नाही. |
| ६.१०.२ | शासनाने पंचायत राज संस्थांच्या वतीने या आधीच वसूल केलेल्या व अद्यापही वितरित न केलेल्या मुद्रांक शुल्क रकमेचा रु. ५०९ कोटी रुपयांचा अनुशेष (ऑक्टोबर २०१८ पर्यंतचा) तातडीने भरुन काढण्याची आवश्यकता आहे. | महसूल , ग्राम विकास विभाग, वित्त विभाग | आधीच जमा करण्यात आलेले रुपये ५०९ कोटी वितरीत करायचे आहेत. |
| ६.१०.२ | मुद्रांक शुल्क रकमांपासून वंचित असणाऱ्या जिल्हा परिषदांना सहाय्य देणे आवश्यक आहे. | महसूल , ग्राम विकास विभाग | कमकुवत जिल्हापरिषदांना द्यावयाचा प्रस्तावाचा वित्तीय भार रुपये ३३.७९ कोटी इतका आहे. (तक्ता १८ पाहा) |

| | | | |
|---|---|---|---|
| ६.१२.२ | सिंचित पिकावरील सिंचन उपकर २०% वरुन ४०% असा वाढवावा. | ग्राम विकास विभाग जलसंपदा विभाग | सध्याचे दर अत्यंत कमी असून अनेक दशकांपासून वाढविण्यात आलेले नाहीत. या उपकराने जिपचे उत्पन्न वृद्धी होईल तसेच सरकारवर कोणताही अतिरिक्त भार पडणार नाही. |
| ६.१४.२ | निवडक जिल्हा परिषदांना सन १९६० पासून जुन्या दराने देण्यात येत असलेली अनुदाने बंद करण्यात यावीत. | ग्राम विकास विभाग | शासनासाठी ही बचत असेल. सर्वात महत्वाची बचत म्हणजे अनावश्यक प्रशासकीय कामे कमी होतील. |
| ६.१६.४ | कलम १५७(इ) अंतर्गतच्या संधीचा उपयोग करुन घ्यायलाच पाहिजे आणि ग्राविविने, सर्व जिपंनी अशा प्रकारचा कर लाऊन त्यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत वृद्धीगंत करण्याबाबत, परिपत्रक काढावे . | ग्राम विकास विभाग | यामुळे स्थानिक पातळीवर जिपची संसाधने वाढतील. सरकारवर कोणताही अतिरिक्त भार नाही. |
| ६.२३.१ | राज्य सरकारच्या सर्व योजनांना दोन टक्के व्यवस्थापन शुल्क (विद्यमान अभिकरण शुल्क ऐवजी) आणि जुन्या ५ टक्के अभिकरण शुल्काच्या संदर्भातील जुनी मार्गदर्शक तत्वे रद्द करावीत (अभिकरण शुल्क) (परि.६.२३.१) | ग्राम विकास विभाग, वित्त विभाग | विद्यमान परिस्थितीमध्ये जिप संसाधनांच्या कमतरतेमुळे व्याज उत्पन्न वापरत आहे. त्याऐवजी २ % व्यवस्थापन शुल्क आणि १२३ कलमातंर्गतच्या योजनांवरील जुने ५% अभिकरण योजना रद्द करणे. शासनाकरीता ही नवीन वचनबद्धता रुपये १५५-१६० कोटी इतकी असेल. (तक्ता ३३ पाहा). तथापि इएफएमएस सुरु करुन सरकार जिपमध्ये अडकून पडलेला पैसा (ज्याचे व्याज जिप उपयोगात आणते) वाचवू शकते आणि २% व्यवस्थापन शुल्काने अतिरिक्त भार कमी करणे. |
| ६.२५.२ | ३०५४ आणि ५.५४ अंतर्गत देखभाल निधी वाढवावा | ग्राम विकास विभाग, वित्त विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग | |
| ६.२६ | जिप योजनांकरिताच्या वीज देयकाच्या अतिरिक्त खर्च जल स्त्रोताच्या अंतरावर आधारीत जिपला भरपाई देण्यात यावी. | ग्राम विकास विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | हा केवळ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजनेचा विस्तार आहे. यामुळे जिपला मोठ्या प्रमाणात सहाय होईल. |
| ६.३३ | अशासकीय सदस्यांच्या मानधनाचे विद्यमान दरांत सुधारणा करावी. | | मानधनामध्ये चालू किंमतीच्या प्रमाणानुसार सुधारणा करावी |

| | | | |
|---|---|---|---|
| ७.१७.२ | ग्रामपंचायतींना २०१७-१८ आणि २०१८-१९ या वर्षांची थकबाकी दिली पाहिजे. | महसूल विभाग | |
| ७.१७.२ | गौण खनिज उत्खनन लिलावांचा २५% हिस्सा देण्यात यावा. | महसूल विभाग | |
| ७.१८ | १९६० पासूनची दयावयाची काही जुनी भरपाई अनुदाने बंद केलीच पाहिजेत. | ग्राम विकास विभाग | शासनासाठी ही बचत असेल. सर्वात महत्वाची बचत म्हणजे अनावश्यक प्रशासकीय कामे कमी होतील. |
| ७.१९.३ | एमएसइडीसीएल संस्थेला देय असलेली रू. ३६१२ कोटीची जुनी थकबाकी शासनाने अदा केली पाहिजे आणि योजनेची नव्याने सुरुवात केली पाहिजे. | वित्त विभाग आणि ऊर्जा विभाग | एमएसइडीसीएल संस्थेला देय असलेली रू. ३६१२ कोटीची जुनी थकबाकी एकदाची अदा केली पाहिजे. |
| ७.२०.१ | ग्रामपंचायती सदस्य बैठक उपस्थिती भत्ता वाढवावा. | ग्राम विकास विभाग | बैठकीला उपस्थित राहण्याकरिता सदस्यांना एक दिवसाचा रोजगार बुडवावा लागतो. या बाबीचा विचार करुन भत्तावाढीची जोरदार शिफारस करण्यात येत आहे, तसेच यामुळे सहभाग वाढेल. |
| ७.२०.१. | सरपंचाचे मानधन वाढवावे | ग्राम विकास विभाग | |
| ७.२१.१ | क्षेत्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला सहाय्यभूत असलेली योजना ग्रामपंचायतीच्या मालकीच्या आणि देखरेखीखाली असणाऱ्या पाणीपुरवठा योजनांना लागू कराव्यात. | | हे ग्रामपंचायतीच्या जलस्त्रोताच्या अंतराशी संलग्नित असावे. हे निरंतर सुरु असणाऱ्या योजनेच्या ऐवजी देखील आहे. वित्तीय भार रु. ९०-१०० कोटी इतका असेल आणि यामुळे हजारो ग्रामपंचायतींना लाभ होईल. |
| ७.२८.२ | आयोग शिफारस करते की, ग्रामीण क्षेत्रातील व्यवसाय कर संकलन ग्रामपंचायतींकडे हस्तांतरीत झाले पाहिजे. | | आता ग्रामीण क्षेत्रामध्ये व्यवसाय कर संकलन अगदी नगण्य आहे. म्हणूनच त्यामुळे शासनाच्या उत्पन्नात काही तोटा होणार नाही.तथापि या करामुळे ग्राम पंचायतीच्या उत्पन्नात वाढ होणार आहे. |
| ८.२३.४.२ (ब) | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अतिरिक्त मुद्रांक शुल्काची थकबाकी तात्काळ देणे गरजेचे आहे. | महसूल आणि नगर विकास विभाग | नास्थास्वंच्यावतीने शासनाकडे जमा केलेल्या मुद्रांक शुल्क रकमेची रुपये ५१० कोटी ही मोठया प्रमाणातील थकबाकी असून नास्थास्वंस ना देणे आवश्यक आहे. |
| ८.२३.४.२ | करमणूक कर, गौण खनिजे व जमीन महसूल यांची थकबाकी तात्काळ देणे आवश्यक आहे. | महसूल आणि नगर विकास विभाग | स्थानिक स्वराज्य संस्थाची एकूण थकबाकी रुपये १४२ कोटी इतकी असून (रुपये २२.८२कोटी गौण खनिजे -क |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | वर्गीय नगरपालिका, जमीन महसूलाची थकबाकी रुपये १०६ कोटी आणि रु. १३.२४ कोटी करमणूक कर) त्यांना तात्काळ देणे आवश्यक आहे. |
| ८.२३.४.२ (इ) | तीनही नियुक्त कर संपृष्टात आणणे आणि त्याऐवजी साहायय्क अनुदान वाढवणे गरजेचे आहे. | महसूल आणि नगर विकास विभाग | मुद्रांक शुल्क वगळता अन्य तीन नियुक्त कर पूर्णपणे काढून टाकावेत आणि त्याऐवजी वरील तीन नियुक्तकरांमध्ये झालेल्या नुकसानाची रकमेएवढी अतिरिक्त रक्कम साहाय्यक अनुदानांमध्ये जमा झालीच पाहिजे आणि नगरपरिषदेला एक मोठी रक्कम देण्यात यावी. |
| ८.४०.२ | व्यवसाय कर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे हस्तांतरीत करणे/वळवणे- याची तीन टप्प्यामध्ये अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. | वित्त विभाग आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | यामध्ये शिफारस करण्यात येते की शासनाने शासकीय, अशासकीय व्यवसाय करदात्यांची जमा स्वत:कडे ठेवावी व खाजगी क्षेत्रातील करदात्यांकडून प्राप्त कर नागरी स्था स्व सं.ला दयावेत. शासनाचा हा अंशता महसुलाची घट होईल मात्र नास्थास्वसं च्या उत्पन्नात वाढ होईल. |
| ८.४३ | राज्य शासनाच्या वतीने शिक्षण आणि रोजगार हमी उपकर गोळा करण्यापोटी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देत असलेल्या सध्याचा सवलतीच्या दरात वाढ करणे. | नगर विकास विभाग | यामुळे राज्य सरकारला कदाचित रु. १५ कोटी खर्च येऊ शकतो. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना जर त्यांच्या कामासाठी अधिक सेवा शुल्क / सवलत दिली तर ते त्यांच्यासाठी अधिक प्रोत्साहनात्मक ठरेल तसेच राज्य सरकारच्या उपकराची वसूलीही चांगली होऊन शासनाला ते लाभदायकच होईल. |
| ८.४४.१ आणि ८.४४.२ | सर्व नगरपरिषद संचालनालय संवर्गाचे वेतन पूर्णपणे शासनाकडून भागवले जावे | नगर विकास विभाग | कदाचित याचा खर्च रु ७०-१०० कोटी दरम्यान होऊ शकतो परंतु महाराष्ट्राच्या नगर प्रशासनामध्ये मोठी सुधारणा होईल |
| ८.४५.२ | संपूर्ण सहाय्यक अनुदान शासन निर्णय २००९ हा नवीन सूत्रासह प्रतिस्थापित करण्यात यावा | नगर विकास विभाग | - |
| ८.४६.१ | शिक्षकांच्या वेतनामधील सरकारचा हिस्सा वाढवण्याची गरज | नगर विकास विभाग | - |
| ८.४७ | सरकारने अशा भौगोलिकदृष्ट्या प्रतिकूल स्थिती असलेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नळ पाणी पुरवठा योजनांमधील उर्जा पंपाचा खर्च भागवणे | नगर विकास विभाग | हे सूत्रानुसार आणि विशिष्ट नास्थासंकरिता आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८.४८ | सरकारने नास्थासंसह सूत्रावर आधारुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या देयाचे निर्लेखन करणे. | नगर विकास विभाग आणि पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | नास्थासं मजीप्राचे रुपये १००० कोटी देणे लागतात.आम्ही शिफारस करतो की, सरकारने एककालिक सशर्त निर्लेखन (तोडगा) योजना अंमलात आणावी. ज्यामध्ये नास्थास्वसंचा सहभाग असेल. |
| ८.४९ | लहान नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या भूसंपादनाची रक्कम भागवणे | नगर विकास विभाग | - |
| ९.१९ | शासनाने पाच वर्षांकरीता समर्पित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था- वित्तिय अहवाल आणि लेखा सुधारणा अभियानाची सुरवात करणे आवश्यक आहे. | नगर विकास विभाग | याकरिता रु. २० कोटींचा निधी आवश्यक आहे परंतु यामुळे नास्थासंच्या कामगिरीमध्ये भरपूर सुधारणा होईल. |

## प्रकरण १२ ब

### शिफारशींचे वर्गीकरण
### (धोरण, प्रक्रिया आणि क्षमता संवर्धन)

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| प्रकरण : ४ राज्य वित्त आयोग- स्वीकृत दृष्टीकोन | | | | |
| १ | राज्य सरकारने पंचायत राज संस्था आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या व्यवस्थापनामध्ये सुधारणा होण्याकरीता श्री.सुधीर ठाकरे समिती (पंचायज राज आणि ग्राम विकास विभाग) आणि श्री. शरद काळे समिती (नगर विकास विभाग) यांच्या अहवालातील शिफारशींचा विचार करावा. | √ | √ | √ |
| प्रकरण : ६ जिल्हा परिषद आणि ग्राम पंचायतींच्या वित्त व्यवस्थेचे/अर्थव्यवस्थेचे मुल्यांकन | | | | |
| १ | ग्राम विकास विभागास यापूर्वीच शासनास सादर झालेला पंचायत राज संस्थामधील सुधारणांबाबतचा श्री.सुधीर ठाकरे समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे.राज्य वित्त आयोगाचे असे मत आहे की, महाराष्ट्रातील पंचायत राज संस्थांच्या संपूर्ण प्रशासनाची नव्या दृष्टीकोनातून रचना करणे आवश्यक आहे.(परि. ६.६) | √ | | |
| २ | जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियमाच्या कलम १४४, १५५, आणि कलम १८५ अनुसार नियुक्त उपबंध करासंबंधातील सर्व निधी वसुलीच्या आधारे देण्याऐवजी मागणीच्या आधारे (जमाबंदी) जिल्हा परिषदेला देण्यात यावा, असे निश्चित करण्यात यावे.(परि. ६.९.५) | | √ | |
| ३ | आम्ही याप्रमाणे नव्या सूत्राची शिफारस करतो की, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांना देण्यात येणारा उपकर हा मुळ शेतसारा किंवा मुळ आकार (शेती किंवा बिनशेती) म्हणजेच मुळ जमीन महसूलाच्या मागणीच्या २० पट असावा.जमीन महसूल वसूल केला आहे किंवा नाही यावर तो अवलंबून नसावा.(परि.६.९.५) | √ | | |
| ४ | ग्राम विकास विभागाने जमीन महसूल उपकराबाबत सर्व विद्यमान शासन निर्णय अधिक्रमित करुन सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना देण्यासाठी नवा शासन निर्णय निर्गमित करावा. (परि.६.९.५) | √ | | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| ५ | वसूल केलेल्या निर्धारित करांवर राज्य शासन स्तरावर कोणतीही "अर्थसंकल्पीय कपात" करता येणार नाही अन्यथा ते अधिनियमाचे उल्लंघन ठरेल. (परि.६.९.५) | | √ | |
| ६ | जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रतिनिधीने जिल्हा परिषदेसमोर प्रत्येक वर्षी ऑक्टोबर मध्ये जिल्हा परिषदेस देय असलेल्या रकमांच्या गणनेची कार्यपध्दती व रित यांचे सादरीकरण करावे. ( परि.६.९.५) | | √ | |
| ७ | दीर्घकालापासून सर्व संबंधित कलमे जसे की १४४, १५५, १८५ व १८६ यांच्यात सुधारणा करुन सोपे सूत्र विकसित करणे आवश्यक आहे.( परि.६.९.५) | √ | | |
| ८ | निर्धारित करांमध्ये कोणतीही "अर्थसंकल्पीय कपात" करु नये.(परि.६.१०.२) | | √ | |
| ९ | शासनाने पंचायत राज संस्थांच्या वतीने या आधीच वसूल केलेल्या व अद्यापही वितरित न केलेल्या मुद्रांक शुल्क रकमेचा रु. ५०९ कोटी रुपयांचा अनुशेष (ऑक्टोबर २०१८ पर्यंतचा) तातडीने भरुन काढण्याची आवश्यकता आहे.(परि.६.१०.२) | | √ | |
| १० | ग्राम विकास विभागाकडून निधी वितरणाची कार्यपध्दत बदलणे आवश्यक आहे. (परि.६.१०.२) | | √ | |
| ११ | स्वतंत्र अर्थसंकल्पीय लेखाशिर्षाची आवश्यकता आहे. (परि.६.१०.२) | | √ | |
| १२ | मुद्रांक शुल्क रकमांपासून वंचित असणाऱ्या जिल्हा परिषदांना सहाय्य देणे आवश्यक आहे. .(परि.६.१०.२) | √ | | |
| १३ | कलम १५८ अंतर्गतच्या १ % हिस्सा वाटपाच्या सूत्रामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. विद्यमान हिस्सा वाटपातील ०.५० % जिल्हा परिषदेला आणि ०.५० % ग्राम पंचायतीला हे सूत्र बदलून, ०.२५ % जिल्हा परिषदेला, ०.२५ % पंचायत समितीला, ०.२५ ग्रामपंचायतीला आणि ०.२५ राज्य स्तरावर संकोषित करुन सर्व ग्रामपंचायतींना वितरीत करण्यासाठी संकलित करणे असे करण्यात यावे. या सुधारित सूत्रामुळे दुर्गम व आर्थिकदृष्टया दुर्बल जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींना अधिक चांगला हिस्सा प्राप्त होईल.(परि.६.१०.२) | √ | | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| १४ | सन १९९८ च्या शासन निर्णयामध्ये अमुलाग्र सुधारणा करणे आवश्यक आहे. सदर शासन निर्णय व्यवहार्य व प्रत्यक्षात अंमलात आणण्याजोगा असावा असे सुचविण्यात येत आहे. ग्राम विकास विभागाने प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांच्याशी सल्लामसलत करुन नवा शासन निर्णय तयार करावा. (परि.६.१०.२) | √ | | |
| १५ | जेथे जिल्हयाकरीता अनुदान १० लाखापेक्षा कमी आहे तेथे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी ते थेट वन व्यवस्थापन समितीकडे हस्तांतरित करणे आवश्यक आहे अथवा उप वनसंरक्षक यांच्या सल्यानुसार कार्यवाही करावी अशी शिफारस करण्यात येत आहे. (परि.६.१०.२) | | √ | |
| १६ | ग्राम विकास विभागाने निधी प्रधान मुख्य वन संरक्षक यांच्यामार्फत न पाठविता थेट मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे हस्तांतरित करावा. (परि. ६.११.२) | | √ | |
| १७ | हा निर्धारित कर असल्यामुळे तसेच आधीच वसूल केला असल्यामुळे शासनाने त्यामध्ये कोणतीही अर्थसंकल्पीय कपात करु नये.अशी कपात केल्यास ते जिल्हा परिषद अधिनियमाचे उल्लंघन ठरेल आणि जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाचा स्त्रोत कमकुवत होईल. (परि.६.११.२) | | √ | |
| १८ | सिंचन विभाग किंवा क्षेत्रीय सिंचन महामंडळ यांनी ग्राम पंचायतींना केलेल्या पाणी पुरवठ्याबद्दल जिल्हापरिषदेच्या रकमेतून एकतर्फी कपात करु नये कारण ग्राम पंचायती या स्वतंत्र भिन्न कायदेशीर संस्था आहेत. दुसरे असे की दुष्काळी परिस्थिती किंवा अन्य कारणास्तव 'राखीव पाणी' करीता कोणतीही कपात करू नये. ही रक्कम जिल्हाधिकाऱ्यांनी मदत आणि पुनर्वसन निधि २२४५ मधून स्वतंत्रपणे अदा करावयाची असते. शासन निर्णयानुसार प्रक्रियात्मक औपचारीकता म्हणून पारीत केलेल्या ठरावाबद्दल जिपवर बोजा लादू नये. (परिच्छेद ६.१२.२) | | √ | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| १९ | सिंचित पिकावरील सिंचन उपकर २०% वरुन ४०% असा वाढवावा. सध्याचे दर अत्यंत कमी असून अनेक दशकांपासून वाढविण्यात आलेले नाहीत. यामुळेच सिंचन उपकराचा दर २०% वरुन ४०% करणे संयुक्तिक असून याप्रकारे जिल्हा परिषदेचे उत्पन्न वृध्दींगत करावे.( परि.६.१२.२) | √ | | |
| २० | राज्य वित्त आयोग अशी शिफारस करत आहे की, निवडक जिल्हा परिषदांना व्यवसाय कराऐवजी, वाहन कराऐवजी सन १९६० पासून जुन्या दराने देण्यात येत असलेली अनुदाने बंद करण्यात यावी.( परि.६.१४.२.२) | √ | | |
| २१ | राज्य वित्त आयोग ठामपणे अशी शिफारस करत आहे की,कलम १५७ (ई) च्या अंतर्गत असलेल्या संधीचा उपयोग करून घ्यायलाच पाहिजे आणि ग्राम विकास विभागाने सर्व जिल्हा परिषदांना त्यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत वृध्दिंगत करण्यासाठी लघु कर लावण्याबाबत विचार करण्याच्या सूचना देण्यासाठी परिपत्रक निर्गमित करावे.(परि.६.१६.४(इ)) | √ | | |
| २२ | जिल्हा परिषदांचे स्वत:चे उत्पन्न आणि खर्च यांचा पडताळा घेतला असता,राज्य वित्त आयोगाचा असा दृष्टीकोन आहे कि जिल्हा परिषदेच्या स्वत:च्या उत्पन्नाचा स्त्रोत किमान रु. ९ कोटी ने वाढला पाहिजे. (परि.६.२२.८) | √ | | |
| २३ | राज्य सरकारच्या सर्व योजनांना दोन टक्के व्यवस्थापन शुल्क (विद्यमान अभिकरण शुल्क ऐवजी) आणि जुन्या ५ टक्के अभिकरण शुल्काच्या संदर्भातील जुनी मार्गदर्शक तत्वे (शासन निर्णय झेडपीए/प्र.क्र./१६५२/२४, दि.२४ मे १९८९ ) रद्द करणे (अभिकरण शुल्क) (परि.६.२३.१) | √ | | |
| २४ | जिल्हा परिषदांना द्यावयाच्या मुद्रांक शुल्काचा मोठ्या प्रमाणातील अनुशेष भरून काढण्याचा आणि निधी देण्याच्या प्रक्रियेमध्ये सुधारणा करणे.(परि.६.२४) | | √ | |
| २५ | जमीन महसूल अनुदान गणनेची पद्धती नव्याने तयार करणे.(परि.६.२४) | | √ | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| २६ | भौगोलिक दृष्ट्या विपरीत परिस्थितीमध्ये असलेल्या १ टक्के मुद्रांक शुल्क उपकराचे कमी उत्पन्न मिळणाऱ्या जिल्ह्यांना नुकसान भरपाई म्हणून सापेक्ष अनुदान देणे.(परि.६.२४) | √ | | |
| २७ | सिंचन उपकर २० टक्के वरून ४० टक्के करणे (परि.६.२४) | √ | | |
| २८ | जिल्हा परिषद रस्त्याकरिता नि ३०५४ आणि ५०५४ करिता अधिक देखभाल निधी देण्याची शिफारस राज्य वित्त आयोग करीत आहे.वर विनिर्दिष्ट केल्यानुसार सद्यस्थितीत वर्तमान अनुदान कमी असल्यामुळे जिल्हा परिषद रस्त्यांच्या देखभालीकरिता अत्यंत कमी खर्च करण्यात येतो. (परि.६.२५.२) | √ | | |
| २९ | प्रत्येक पंचायत समितीला एक याप्रमाणे हातपंप पॉवर पंप देखभाल युनिट पंचायत समितीकडे हस्तांतरित करावी. पंचायत समिती पातळीवर एक स्वतंत्र हात पंप व पॉवर पंप देखभाल सोसायटीची निश्चितपणे नोंद करावी.उपविभागीय अधिकारी, गट विकास अधिकारी आणि तहसीलदार, उप अभियंता (पाणीपुरवठा) हे सोसायटीचे पदसिद्ध सदस्य म्हणून नियुक्त करावे. सदर सोसायटीला कंपन्यांचे सामाजिक दायित्व, स्थानिक नागरिक किवा त्या भागातील मूळ रहिवासी परंतु आता मुंबई किंवा परदेशात वास्तव्य असलेल्या हितचिंतक इत्यादिकडून देणग्या स्वीकारण्याची मुभा असावी. यामुळे मुलभूत निधी (कॉर्पस)उभारण्यास मदत होईल. प्रशासकीय दृष्ट्या अर्थातच हे युनिट पंचायत समिती आणि गट विकास अधिकारी यांना जबाबदार राहील (परि.६.२७.१) | √ | | |
| ३० | आम्ही अशी शिफारस करतो की, राज्य सरकारने हात पंप व वीज पंप देखभाल दुरुस्तीच्या या दुर्लक्षित विषयाकडे सर्व समावेशकपणे लक्ष घालावे.पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने वर नमूद केलेल्या सर्व मुद्यांचा समावेश करून एक नवीन शासन निर्णय निर्गमित करावा. यामुळे वापरकर्त्याकडून वसूल करावयाच्या निधी मध्ये वाढ होईल आणि जिल्हा परिषदेवर पडणारा | √ | | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| | अनावश्यक आर्थिक ताण देखील कमी होईल.(परि.६.२७.१) | | | |
| ३१ | देखभाल दुरुस्ती निधीची ओळख -जिल्हा परिषदांकडे मोठया संख्येने असलेल्या इमारती आणि मालमत्तांचा विचार करता, त्यांच्या उत्पन्नाच्या २ टक्के रक्कम देखभालदुरुस्ती निधीला अनिवार्यपणे हस्तांतरित करणे अत्यंत आवश्यक आहे.(परि.६.२९.१) | √ | | |
| ३२ | **जिल्हा परिषदांच्या वार्षिक लेख्यांमध्ये विशिष्ट गुणोत्तरे उघड करण्याची प्रस्तुती आणि लेखा संहिता सुधारणे-** जिल्हा परिषदांच्या लेख्याच्या वर्तमान स्वरुपामध्ये केवळ आकडेवारी देण्यात येते. त्यामध्ये निधी कधी व कसा खर्च केला याबाबत माहिती दर्शविली जात नाही. त्यात अगदी थोडेच विश्लेषण केलेले असते आणि प्रथमदर्शनी तरी कोणतेही अनुमान काढता येत नाही. आम्ही अशी शिफारस करतो की, जिल्हा परिषदांच्या लेख्यांच्या शेवटी जिल्हा परिषदांच्या लेख्यांच्या संदर्भात काही गुणोत्तरे दर्शविली जावीत.(परि. ६.२९.२) | √ | | |
| ३३ | **लेख्यासंदर्भातील राजपत्र अधिसूचना बंद करण्याबाबत-** राज्य वित्त आयोग असे सादर करतो की, आता संकेतस्थळे (वेबसाईटस) जनतेसाठी खुली आहेत, तेंव्हा जिल्हा परिषदेचे लेखे काही कालावधीकरिता जिल्हा परिषदेच्या किंवा ग्राम विकास विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे पुरेसे आहे. यामुळे राजपत्र अधिसूचनेची कंटाळवाणी पध्दत ( ज्याचे महत्व आधीच्या दशकामध्ये होते) बंद करण्यात यावी. (परि.६.२९.३) | √ | √ | |
| ३४ | राज्य वित्त आयोग पंचायत राज संस्थांकरिता कायमस्वरुपी (राज्य ग्रामीण स्वरोजगार अभियांनासोबत सलंग्न तात्पूरत्या स्वरुपाऐवजी) स्वतंत्र व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्याच्या शिफारशीवर भर देत आहे. कोणत्याही प्रकारे नवीन पदे निर्माण न करता मंत्रालयातील तीन विभाग हस्तांतरित करुन हे करता येणे शक्य आहे.(परि.६.३०.१) | √ | | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| ३५ | **मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना अधिनस्त महसूली अधिकाऱ्याची नियुक्ती**-राज्य वित्त आयोग प्रत्येक जिल्हा परिषदेकरिता खालील दोन पदांची निर्मिती करण्याची शिफारस करीत आहे-<br><br>अ) जिल्हा परिषद आणि पंचायत समिती महसूल अधिकारी-महाराष्ट्र विकास सेवा वर्ग २ च्या अधिकाऱ्यामधून भरावे.<br><br>महसूल अधिकाऱ्यास सहाय्य करण्याकरिता जिल्हा परिषदेमधून सहाय्यक लेखा अधिकारी किंवा उपलेखापाल.<br>या दोन्ही पदावरील खर्च सुरुवातीच्या ३ वर्षासाठी जिल्हा परिषदेच्या निधीमधून करण्यात यावा.<br><br>ब) राज्य वित्त आयोगाला खात्री आहे की, या दोन पदावर दरमहा १ लाख रुपये किंवा साधारणपणे वर्षाला रु. १२ लक्ष खर्च केले असता जिल्हा परिषदेचे उत्पन्न इतक्या पटीने वाढेल की हा खर्च एक प्रकारची गुंतवणूकच ठरेल.(परि. ६.३०.२) | √ | | |
| ३६ | **जिल्हा परिषदांकरिता तक्रार निवारण यंत्रणेची आवश्यकता**-आमचा असा ठाम दृष्टीकोन आहे की, जिल्हा परिषदांना त्यांच्या कायद्यानुरुप आणि शासन निणर्यानुसार त्यांचे देय उत्पन्न प्राप्त होण्यासाठी संस्थात्मक तक्रार निवारण यंत्रणा असणे आवश्यक आहे. | √ | | |
| ३७ | **शिस्तभंगविषयक आणि वर्तणूक नियमांमध्ये अमुलाग्र सुधारणा** - जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या सेवा महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा वर्तणूक नियम १९६४ अन्वये संचलित केल्या जातात.हे नियम महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक नियमावर आधारित आहेत. तसेच सदर कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ हे सुध्दा लागू आहेत. | √ | | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| | तथापि, हे नियम १९६७ मध्ये तयार करण्यात आले असून ते अद्याप अद्ययावत केलेले नाहीत.हे नियम महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक आणि शिस्त व अपील नियमांच्या धर्तीवर पूणपणे अद्ययावत करणे आवश्यक आहे.(परि. ६.३१.२) | | | |
| ३८ | **शासकीय वेतनश्रेणीनुसार वेतन मिळणाऱ्या जिल्हा परिषद** कर्मचाऱ्यांकरिता विविध कामगार कायद्यांची उपयोगिता:- राज्य वित्त आयोग जोरदार शिफारस करतो की कामगार कायद्याच्या दृष्टीकोनात आणि संबंधित समस्यांच्या दृष्टीने जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची स्थिती काय आहे याबाबत एका विशेषज्ञ समितीकडून सखोल तपासणी झाली पाहिजे.या समितीमध्ये कामगार विभागातील अधिकारी (सेवेत असलेले अथवा सेवानिवृत्त) सदस्य असणे अनिवार्य आहे. संबंधित अधिनियिम अथवा नियमांमध्ये आवश्यक ते बदल करुन या समस्येचे कायमस्वरुपी निराकारण करणे आवश्यक आहे. यामुळे कामगार कायदा न्यायालयात विनाकरण दाखल होत असलेल्या प्रकरणांबाबत राज्य शासन आणि जिल्हा परिषदांचा खर्च आणि वेळ याची बचत होईल.(परि.६.३१.२) | √ | | |
| ३९ | **जिल्हा परिषद प्रणालीमध्ये राष्ट्रीय निवृत्ती योजना प्रस्तूत करण्यासंदर्भातील समस्या**:-राष्ट्रीय निवृत्ती योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अनेक त्रुटी आणि पळवाटा आहेत. असे आढळून आले आहे की, अनेक जिल्हा परिषदा या अंमलबजावणीच्या बाबतीत भिन्न स्तरावर आहेत. राज्य वित्त आयोग अशी शिफारस करते की, ग्राम विकास विभागाने सर्वसमावेशक वस्तुस्थितीदर्शक अभ्यास करावा आणि सुरळीतपणे अंमलबजावणीसाठी समयबध्द कार्यक्रम तयार करावा. (परि.६.३१.३) | | √ | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| ४० | **उपलब्ध जिप अभियंत्याचे अधिक चांगले व्यवस्थापन: जिप च्या संसाधनाच्या अधिक चांगल्या व्यवस्थापनाकरीता राविआ खालीलप्रमाणे शिफारशी करते:**<br>अ. निवृत्त किंवा पात्र असलेल्या बाह्य अभियंत्यांचे एक पॅनल स्थापन करणे. त्यांना व्यवस्थित प्रशिक्षण आणि मान्यता देण्याची आवश्यकता आहे. हे पॅनलवरील अभियंते वेळोवेळी अंदाज काढणे आणि परिक्षण अशी कामे करु शकतात. जिपच्या नियमित अभियंत्यांनी निविदा काढणे, प्रासंगिक भेटी देणे आणि अंतरीम तसेच अंतिम देयक तयार करणे अशा कामावर लक्ष केंद्रित करावे.<br>ब. सिंचन/ पाणी पूरवठा आणि बांधकाम श्रेणीतील अभियंत्यामध्ये अनेकदा त्यांच्यामध्ये असंतुलित कार्यभाराने वाद निर्माण होतात म्हणून त्यांना एकत्रित करणे. अकोल्यामध्ये याची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली असल्याने हे "अकोला पॅटर्न" म्हणून प्रसिद्ध आहे.<br>क. अभियंत्याच्या व्यवस्थापनाबाबत आणि कार्यभारासंदर्भातच्या सर्व समस्या अभ्यासण्याकरीता आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्याकरीता एक समिती स्थापन करणे. (परिच्छेद ६.३१.४) | | √ | |
| ४१ | राज्य वित्त आयोगाच्या मते जिल्हा परिषदेच्या मालमत्ता बीओटी किंवा अन्य योग्य मॉडेलनुसार अगदी काळजीपूर्वक विकासित करुन पंचायत राज संस्थांना खात्रीशीर उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण निर्माण करण्याची वेळ आली आहे. राज्य वित्त आयोग शिफारस करते की, महाराष्ट्र राज्य महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ किंवा राज्य स्तरीय सार्वजनिक बांधकाम विभाग यासारख्या संस्थांनी बीओटी करावे.(परि.६.३२.१) | √ | | |
| ४२ | राज्य वित्त आयोग जोरदारपणे शिफारस करते की, अशासकीय सदस्यांच्या मानधनाचे विद्यमान दरांचे, प्रवास आणि बैठक भत्त्यांचे पुनरिक्षण करावे आणि विद्यमान किंमतींच्या प्रमाणानुसार सुधारणा करावी.(परि.६.३३) | √ | | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| ४३ | **व्यवस्थापन शुल्कातील हिस्सा:**-आम्ही अशी शिफारस करतो की,जिल्हा परिषदांना शासकीय योजना राबविण्यासाठी २%व्यवस्थापन शुल्क आकारण्याची परवानगी देण्यात यावी, जेणे करुन त्यांना त्याचा उपयोग आस्थापना खर्चाकरीता करता येईल.आम्ही अशी शिफारस करतो की ही २ टक्के रक्कम जिल्हा परिषद आणि पंचायत समिती मध्ये समसमान म्हणजे प्रत्येकी १ टक्के याप्रमाणे वाटणी करावी. (परि.६.३६.१) | √ | | |
| ४४ | **ग्रामपंचायतीने संकलित केलेल्या व्यावसायिक करातील हिस्सा:**-ग्रामपंचायतींनी संकंलित केलेल्या करातील २५ टक्के इतका हिस्सा पंचायत समित्यांना पर्यवेक्षकीय आणि संनियंत्रण संस्था म्हणून द्यावे अशी शिफारस आम्ही करीत आहेत.(परि. ६.३६.२) | √ | √ | |
| ४५ | राज्य वित्त आयोग जोरदारपणे शिफारस करीत आहे की, पंचायत समिती सभापतीचा दर्जा व गट विकास अधिकारी यांच्यावरील कामकाजाचा भार विचारात घेता त्या दोघांनाही स्वतंत्र वाहन उपलब्ध असण्याबाबत राज्य शासनाने शासन निर्णय निर्गमित करावा.(परि.६.३६.४) | | √ | |
| **प्रकरण : ७ पंचायतींच्या अर्थ व्यवस्थेचे मुल्यांकन** | | | | |
| १ | ग्राम पंचायतीच्या आकारमानाचे व्यापकतेने परीक्षण करणे तातडीची गरज आहे.लहान आकारमानाची प्रवृत्ती शासकीय व्यवहार्यतेवर परिणाम करते. इतर राज्ये मोठया आकारमानाच्या ग्रामपंचायतींकडे वळत असल्याचे दिसून येत आहे.(परि.७.५) | √ | | |
| २ | PRIASoft संगणक आज्ञावलीमध्ये उत्पन्न आणि खर्च यांच्या विविध बाबींसाठी देण्यात आलेल्या चार अंकी क्रमांकासह काही विशिष्ठ प्रमाणभूत लेखा संकेतांक (अर्थ संकल्पीय रुपरेषा शीर्ष-budget line heads) आहेत. अशा प्रकारचे प्रत्यक्ष उपयुक्त लेखा संकेतांक (अर्थ संकल्पीय रुपरेषा शीर्ष) “ग्रामपंचायत लेखा संहिता २०११”मध्येही द्यावेत. त्यामुळे PRIsoft व राज्य नोंदवह्या पूर्णपणे सुसंगत होतील.(परि.७११) | | √ | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| ३ | PRIsoft संगणक आज्ञावली इंग्रजीमध्ये असल्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर काही प्रमाणात भाषेचा अडथळा येतो.याबाबतीत वापरकर्त्यास अनुकूल अशी लहान मराठी-इंग्रजी मार्गदर्शिका ग्रामसेवकांना त्यांचा मानसिक अवरोध दुर करण्यासाठी उपयोगी ठरेल.(परि.७.११) | | √ | |
| ४ | विस्तार अधिकारी, गट विकास अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी इत्यादीं वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांच्या सखोल प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. कारण ग्राम अभिलेखांच्या संगणकीकरणासाठी वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांचा पाठिंबा आवश्यक आहे. (परिच्छेद ७.११) | | | √ |
| ५ | आवश्यकता असल्यास, स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाने संगणकीय नोंदींची लेखापरीक्षा करणे याबाबीशी परिचित होणे गरजेचे आहे. असे अवगत झाले आहे की महालेखापालांनी सदर बदल सुलभ व्हावा यासाठी काही उपक्रम सुरू केले आहेत. (परिच्छेद ७.११) | | | √ |
| ६ | जर पहिल्या टप्प्यात एक पंचायत समिती (प्रति जिल्हा) परिणामकारक आणि निरंतर प्रशिक्षण आणि इतर पाठिंब्यांच्या द्वारे संपूर्णत: ऑनलाईन केली तर ते धोरणात्मकदृष्ट्या जास्त परिणामकारक होईल.या गटांतील ग्रामपंचायती कागदविरहित होऊ शकतील. त्यांनतर प्रत्येक जिल्ह्यातील मार्गदर्शक पंचायत समितींचे अवलोकन केल्यानंतर, इतर पंचायत समित्या देखील एकामागून एक त्यांचे अनुसरण करतील. (परिच्छेद ७.११) | | √ | |
| ७ | राज्य वित्त आयोगाचे असे मत आहे की ३१.१२.२०१५ रोजीच्या नवीन मार्गदर्शक तत्वांचा सकारात्मक परिणाम झालेला आहे आणि ग्रामपंचायतीमध्ये घरपट्टी संकलन वाढलेले आहे. राज्य वित्त आयोग शिफारस करीत आहे की सध्याची व्यवस्था चालू ठेवावी आणि अभिप्रायासाठी तसेच त्यात अधिक सुधारणा कशाप्रकारे करता येतील याबाबत अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थ्या सारख्या | | √ | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| | तज्ज्ञ संस्थांमार्फत नैमित्तिक यादृच्छिक निरीक्षण करून घ्यावे. (परिच्छेद ७.१४.३) | | | |
| ८ | 'सुधारणा कर' ही संज्ञा बदलणे गरजेचे आहे (परिच्छेद ७.१४.५) | √ | | |
| ९ | महाराष्ट्र ग्राम पंचायत कर आणि शुल्क नियम, १९६० अंतर्गत निश्चित करण्यात आलेले विविध प्रकारच्या करांचे किमान आणि कमाल दर खूप जुने आहेत आणि कालानुरूप त्यात वाढ करणे आवश्यक आहे. (परिच्छेद ७.१४.५) | √ | | |
| १० | बदललेल्या परिस्थितीनुरूप कलम १२४ मधील करांची यादी वाढविणे, कमी करणे आणि सुधारित करणे गरजेचे आहे. कलम १२४ मधील विविध उपकलमे, खालील बाबींना स्वतंत्र शीर्षके आणि उप क्रमांक देऊन, पूर्णत: सुधारित करणे आणि त्यांचे पुनवर्गीकरण करणे आवश्यक आहे. (परिच्छेद ७.१४.५) | √ | | |
| ११ | महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १२४(९) अंतर्गत अगदी वर्षाच्या ठराविक (यात्रा कालावधी) कालावधीमध्ये 'अभ्यागत कर' आकारण्याची तरतुद असावी. म्हणून 'पर्यावरण व्यवस्थापन कर' आकारणीची तरतूद करण्यासाठी उप कलम (९) च्या धर्तीवर नवीन कलम अंतर्भूत करण्याकरिता कलम १२४ मध्ये सुधारणा केली पाहिजे. (परिच्छेद ७.१४.६) | √ | | |
| १२ | राज्य वित्त आयोग पुढे अशी शिफारस करीत आहे की 'पर्यावरण व्यवस्थापन कर' आकारणीला मान्यता देण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना प्रदान केले पाहिजेत, कारण लहान ग्रामपंचायतींना शासनाशी संपर्क साधणे गैरसोयीचे होईल. आवश्यकतेनुसार अधिनियम किंवा नियमांमध्ये योग्य त्या तरतूदी केल्या पाहिजेत.(परिच्छेद ७.१४.६) | √ | √ | |
| १३ | राज्य वित्त आयोगाने 'अभ्यागत/पर्यटक कर' च्यायोगे वसूल करण्यात आलेल्या रकमा खर्च करण्याच्या महाराष्ट्र ग्रामपंचायत कर आणि नियमांच्या नियम १४७ रद्द करुन जिल्हा परिषद अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली | | √ | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| | असलेल्या स्थानिक समितीला अधिकार प्रदान करण्याची शिफारस करीत आहे ज्यामध्ये जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सदस्य आहेत. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, यांना या समितीचे सदस्य सचिव केले पाहिजे. (परिच्छेद ७.१४.६) | | | |
| १४ | राज्य वित्त आयोग महाराष्ट्र ग्राम पंचायतींचे कर आणि शुल्क नियम, १९६० मधील तरतुदींचे पुनरावलोकन करुन करेतर महसूलाच्या विविध स्त्रोतांची सेवा शुल्के वाढविण्यासाठी योग्य ती सुधारणा करण्याची शिफारस करीत आहे. (परिच्छेद ७.१५) | √ | | |
| १५ | महसूल आणि वन विभाग शासन निर्णय क्रमांक गौखनि-१०/०६१५/प्र.क्रमांक २८९/ख दिनांक ०३.०१.२०१८ मध्ये फक्त वाळू खनिकर्म उत्पन्नाचा उल्लेख आहे आणि इतर गौण खनिजांचा उल्लेख नाही. ग्रामपंचायतींना वाळू आणि सर्व गौण खनिजांच्या एकूण लिलाव उत्पन्नातील हिस्सा मिळणे अत्यावश्यक आहे. (परिच्छेद ७.१७.२) | √ | | |
| १६ | महसूल विभागाने ग्रामपंचायतींना निधी देण्याची पध्दत आणि प्रकार अधिक कार्यक्षम/सुलभ केले पाहिजेत आणि पुन्हा एकदा निधी उपलब्ध करून देण्याचा प्रघात चालू केला पाहिजे. (परिच्छेद ७.१७.२) | | √ | |
| १७ | ग्रामपंचायतींना २०१७-१८ आणि २०१८-१९ या वर्षांची थकबाकी दिली पाहिजे. (परिच्छेद ७.१७.२) | √ | | |
| १८ | महसूल आणि वन विभागाच्या शासन निर्णय दिनांक ३.१.२०१८ मध्ये दर्शविल्याप्रमाणे लिलावांच्या रकमांच्या २५% हिस्सा देण्याची आम्ही शिफारस करीत आहोत. (परिच्छेद ७.१७.२) | √ | | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| १९ | आम्ही अशी देखील शिफारस करीत आहोत की ग्रामपंचायतींना द्यावयाच्या रकमांबाबत कोणताही निर्णयाधिकार असल्यास रद्द करावा आणि सूत्राधारित मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली पाहिजेत. (परिच्छेद ७.१७.२) | √ | √ | |
| २० | मागासवर्गीय आणि आदिवासी गावांना देण्यात येणारी जुनी भरपाई अनुदाने (२५१५००४४) तसेच यात्रेकरू कर) भरपाई अनुदान(३६०४३४३) आणि जकात कर रद्द करण्याच्या बदल्यात देण्यात येणारे नुकसान भरपाई अनुदान(३६०४५३२ )बंद करावीत, कारण सदर अनुदाने आता अनावश्यक झालेली आहेत. संबंधित ग्रामपंचायतींना तीन वर्षासाठी एक रकमी अनुदान देऊन शासनाला सदर भरपाई अनुदाने आणि सीआरसी कोड बंद करता येतील.(परिच्छेद ७.१८) | √ | | |
| २१ | राज्य वित्त आयोगाचे असे मत आहे की ग्रामपंचायतींच्या पथदिव्यांच्या वीज देयकांची भरपाई करण्याची सदर योजना सुरू ठेवली पाहिजे, परंतु ग्रामपंचायतींना देण्यात येणाऱ्या मदतीची कार्यपध्दती आणि व्यवस्थापन वेगळया प्रकारे हाताळले पाहिजे. सदर कार्यपध्दतीमुळे ग्रामपंचायती त्यांच्या पथ दिव्यांच्या देयकांच्या व्यवस्थापनाबाबत अधिक जबाबदार आणि विश्वासार्ह झाल्या पाहिजेत. भविष्यकाळात सदर कार्यपध्दतीमुळे सौर उर्जेचा (सोलर एनर्जीचा) वापर आणि खर्चाची बचत करणे सुलभ झाले पाहिजे. म्हणून राज्य वित्त आयोग असे प्रस्तावित करीत आहे की शासनाद्वारे थेट महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला एकत्रित रक्कम अदा करण्याऐवजी, शक्यतो देय रकमा ग्रामपंचायतींकडे हस्तांतरित केल्या पाहिजेत. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला देय असलेली रू. ३६१२ कोटीची जुनी थकबाकी शासनाने निर्लेखित करून टाकली पाहिजे आणि नव्याने सुरुवात केली पाहिजे. (परिच्छेद ७.१९.३) | √ | √ | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| २२ | **ग्रामपंचायत सदस्य बैठक उपस्थिती भत्ता:-** राज्य वित्त आयोग सदर भत्ता रू. २०० वरून रू. ४०० प्रतिदिन पर्यंत वाढविण्याची शिफारस करीत आहे, तसेच, अतिरिक्त २५% रक्कम (रू.४०० पेक्षा अधिक) ग्रामपंचायतींच्या स्व-निधीतून गट विकास अधिकाऱ्याच्या मान्यतेने अदा करण्याची परवानगी देण्यात यावी, ज्यांनी ग्रामपंचायतींची साधनसंपत्ती चांगली असल्याचे प्रमाणित केले पाहिजे. (परिच्छेद ७.२०.१) | √ | | |
| २३ | **सरपंचांचे मानधन-** राज्य वित्त आयोग सरपंचाच्या मानधनाची सध्याची प्रतिपूर्तीची (शासन निर्णय दिनांक ०६.०९.२०१४) रक्कम आणि तसेच सर्वसाधारण मर्यादा वाढविण्याची शिफारस करीत आहे तसेच सदर रक्कम ग्राम पंचायतीच्या स्वत:च्या उत्पन्न स्त्रोतातून देण्याची अनुमती देण्यात यावी. (परिच्छेद ७.२०.१) | √ | | |
| २४ | ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांच्या आवश्यकतेचा अभ्यास करण्याकरिता पुन्हा एक समिती नियुक्त करण्याची राज्य वित्त आयोग शिफारस करीत आहे. शासनाकडे अशी शिफारस करण्यात येत आहे की शासनाने यासाठी वेगळी संरचना मंजूर करावी, दोन स्तरीय आकृतिबंधाला परवानगी द्यावी, एक ज्याची प्रतिपूर्ती शासन करील आणि दुसरा ज्याची प्रतिपूर्ती शासन करणार नाही, परंतु ग्रामपंचायतीची स्व-साधन संपत्ती अनुकूल असेल तर, त्यांच्या स्तरावर ग्रामपंचायत वेतन अदा करू शकेल. (परिच्छेद ७.२०.४) | √ | | √ |
| २५ | राज्य वित्त आयोग अशी शिफारस करीत आहे की १७ऑक्टोबर,२०१५ अंतर्गत असलेली आर्थिक मदत योजना मागे घेण्यात यावी. त्याऐवजी ग्रामीण क्षेत्रासाठी विभागीय जलवाहिनीद्वारे पाणी पुरवठा व्यवस्थेला लागू करण्यात आलेला दिनांक २६.११.२०१८ रोजीचा नवीन शासन निर्णय ग्रामपंचायतीच्या मालकीच्या आणि त्यांच्याद्वारे देखरेख केल्या जाणाऱ्या पाणी पुरवठा योजनांना देखील लागू करण्यात यावा. (परिच्छेद ७.२१.१) | √ | | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| २६ | राज्य वित्त आयोग अशी नोंद घेत आहे की केंद्रीय वित्त आयोगाकडून मिळालेल्या मुबलक अनुदानामुळे ग्रामपंचायतींचे उत्पन्न मोठया प्रमाणात वाढलेले आहे. राज्य वित्त आयोग मागील काही वर्षात केलेल्या गुंतवणूकीचे एका स्वतंत्र संस्थेद्वारे योग्य नमुना मुल्यांकन करून घेण्याबाबत सूचित करीत आहे. भारत सरकारने निर्देशित केल्यानुसार एक सामाजिक लेखापरीक्षण करणे देखील आवश्यक आहे. (परिच्छेद ७.२२) | | √ | |
| २७ | मागील काही वर्षापासून काही निवडक ग्रामपंचायती आणि सर्व तालुक्यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या परिणामाचे योग्य आणि तपशीलवार मुल्यांकन करण्याची शिफारस राज्य वित्त आयोग करीत आहे. इंदिरा गांधी विकास संशोधन संस्थेने सन २०१४ मध्ये सुरवातीला एक सर्वेक्षण केले होते, एवढे एक सर्वेक्षण अपुरे आहे. भविष्यकाळात याबाबत निर्णय घेण्यासाठी, ग्रामपंचायतींमधील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या गुंतवणूकीमुळे झालेल्या सामाजिक आणि आर्थिक परिणामांचे आणखी तपशीलवार विश्लेषण करणे गरजेचे आहे. सदर काम एखाद्या सुप्रसिध्द शैक्षणिक संस्थेकडे सोपविले पाहिजे. (परिच्छेद ७.२४.१) | | √ | |
| २८ | राज्य वित्त आयोग ठामपणे शिफारस करीत आहे की ग्रामीण क्षेत्रातील व्यवसाय कर संकलन ग्रामपंचायतींकडे हस्तांतरीत झाले पाहिजे. महाराष्ट्रातील क्षमता मापण्यासाठी, गुजरात आणि तामिळनाडू राज्यांच्या पंचायत राज संकलनाच्या आकडेवारीचा वापर मापदंड म्हणून करून, राज्य वित्त आयोग असे मत व्यक्त करीत आहे की ग्रामपंचायतीद्वारे दरसाल रू. १५०-२०० कोटी एकत्रित करण्याची क्षमता आहे. (परिच्छेद ७.२८.२) | √ | | |
| २९ | राज्य वित्त आयोग शिफारस करीत आहे की व्यवसाय कराचे उत्पन्न ग्रामपंचायत आणि पर्यवेक्षकीय संस्था म्हणजे पंचायत समिती मध्ये ७५:२५ या प्रमाणात वाटले पाहिजे, म्हणजेच ७५% ग्रामपंचायतीला आणि २५% पंचायत समितीला मिळाले पाहिजे.(परिच्छेद ७.२८.२) | √ | | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| ३० | नवीन उपक्रमांचा समावेश करून जिल्हा ग्राम विकास निधीबाबत ग्रामपंचायती आणि निर्वाचीत सदस्यामध्ये अधिक जागरुकता निर्माण करुन जिल्हा ग्राम विकास निधीमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.जिल्हा ग्राम विकास निधीचे सर्व नियम व मार्गदर्शक सूचनामध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. (परिच्छेद ७.३०) | √ | | |
| ३१ | राज्य वित्त आयोग असे सूचित करीत आहे की आकारमानाने मोठया गावांमध्ये (५००० पेक्षा जास्त लोकसंख्या) स्व-उत्पन्नाच्या कमीत कमी २% रक्कम आणि लहान गावांमध्ये (५००० पेक्षा कमी लोकसंख्या ) ५% रक्कम दरसाल देखभालीसाठी राखीव ठेवली जावी याबाबत मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे गरजेचे आहे,. सदर रक्कम जिल्हा पातळीवर जसे जिल्हा ग्रामीण विकास निधी मध्ये हस्तांतरित केली पाहिजे आणि एका स्वतंत्र खात्यात ठेवली पाहिजे आणि सदर निधीचा केवळ तिसऱ्या वर्षापासून वापर करता येईल. या रीतीने जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधी जतन केला जाईल. जर सदर रक्कम ग्रामपंचायतीच्या पातळीवर ठेवली, तर रक्कम तात्काळ खर्च केली जाण्याची शक्यता आहे. शासनाने जिल्हा ग्रामीण देखभाल व दुरुस्ती निधी साठी नियमांच्या स्वरूपात योग्य मार्गदर्शक तत्त्वे तयार केली पाहिजेत. (परिच्छेद ७.३१.१) | √ | | |
| ३२ | राज्य वित्त आयोग ठामपणे शिफारस करीत आहे की महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम,२०१५ कलम १२४(के) अंतर्गत आकारण्यात येणाऱ्या विकास शुल्काचा हिस्सा ग्रामपंचायतीला मिळाला पाहिजे. (परिच्छेद ७.३२.१) | | √ | |
| ३३ | जेथे वसूली किंवा कोणत्याही प्रकारची कार्यवाही शक्य नाही असे फार जुने लेखा परीक्षा परिच्छेद निर्लेखित करण्यासाठी विशेष मोहिम राबवावी.( परिच्छेद ७.३३) | | √ | |
| ३४ | १०००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या मोठया ग्रामपंचायतींची लेखा परीक्षा जबाबदारी सनदी | √ | √ | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| | लेखापरीक्षकांच्या कंपनीकडे सोपविता येईल. (परिच्छेद ७.३४.१) | | | |
| ३५ | राज्य वित्त आयोग अशी शिफारस करीत आहे की गट पातळीवर आधारभूत तांत्रिक संस्था असल्या पाहिजेत, ज्या ग्रामपंचायतींना मार्गदर्शन करतील. राज्य स्तरावर एक प्रमुख पालक किंवा तज्ज्ञ तांत्रिक संस्था असावी (NEERI -National Environmental Engineering Research Institute सारखी) शेकडो जिल्हा आणि गट पातळीवरील तांत्रिक साहाय्य संस्थांसह जी ग्रामपंचायतींना साहाय्य करील. (परिच्छेद ७.३५.२) | √ | | |
| ३६ | पंचायत समिती पातळीवर त्यांच्या पथ दिव्यांची देयके आणि पम्पिंग समस्या सोडविण्यासाठी विद्युत मंडळाकडून विद्युत तंत्राची माहिती असलेले दोन निवृत्त कर्मचारी किंवा तत्सम कर्मचारी उसनवारीने नियुक्त करावेत. सदर कर्मचारी ग्रामपंचायतींना सौर उर्जेचा वापर करण्याबाबतही मदत करू शकतात जेणेकरून विद्युतशक्ती वापराच्या देयकांच्या खर्चाची बचत होईल. पथ दिवे आणि वॉटर पंपिंग आकारासाठी ग्रामपंचायतींना राज्य शासनाद्वारे देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीत त्यांच्या खर्चाचा समावेश करता येईल. दोन वर्षात परिणाम दिसून येईल. राज्य स्तरावर नियमन करणारा कक्ष देखील असणे गरजेचे आहे. (परिच्छेद ७.३६) | | | √ |
| ३७ | स्थापत्य अभियांत्रिकी कामे या क्षेत्रात अंदाजपत्रके, मोजमाप, निविदा प्रक्रिया, प्रमाणिकरण आणि प्रदाने तयार करण्यासाठी स्थापत्य अभियंत्यांच्या कमतरतेमुळे कामाची गती कमी होते आणि उपलब्ध निधीचा पूर्णत: विनियोग करता येत नाही. अंदाजपत्रके तयार करणे सारखी कामाच्या विशिष्ट क्षेत्रात बाह्य करार तत्वांच्या संधी उपलब्ध आहेत. (परिच्छेद ७.३६) | | √ | √ |
| ३८ | संपूर्ण प्रशिक्षण आणि क्षमता विकास -उपलब्ध पायाभूत सुविधा, कर्मचारी आकृतिबंध इत्यादींचा व्यापकतेने आढावा घेणे आणि वर्तमान काळानुरूप त्यात सुधारणा करणे आवश्यक आहे. एकसमान उपक्रमांसाठी निधी उपलब्ध करण्याकरिता उपरोक्त प्रमाणे सात विविध | | √ | √ |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| | 'प्रति संकेतांक (सीआरसी)'लेखा शीर्षे आहेत. सदर लेखा शीर्षे ३ ते ४ लेखा शीर्षांमधे संकलित करता येतील.प्रशिक्षणाच्या कार्यपध्दतीत आणि व्यवस्थापनात अजूनही 'वर्ग व्याख्यान' पध्दतीचा वापर केला जातो. लहान दृकश्राव्य चित्रफितींच्या योगे दृकश्राव्य माध्यमाकडे वळल्यास जास्त चांगले होईल, यामुळे पंचायत राज समितीच्या अशासकीय पदाधिकाऱ्यां-साठी प्रशिक्षण जास्त सुलभ आणि आनंददायी होईल. (परिच्छेद ७.३७.१) | | | |
| ३९ | स्व- निधीचे परिणामकारकरीत्या व्यावस्थापन करणाऱ्या, जिल्हा ग्रामीण विकास निधीच्या वापरात आणि तत्सम उपक्रमांत कल्पकता दाखविणाऱ्या ग्रामपंचायतींचा सन्मान करणे आवश्यक आहे. अशा ग्रामपंचायतींचा सन्मानामुळे इतर ग्रामपंचातींना अशा प्रकारचे उपक्रम राबविण्यासाठी प्रेरणा मिळेल. (परिच्छेद ७.३८) | | √ | |
| **प्रकरण ८: नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अर्थव्यवस्थेचे मुल्यांकन** | | | | |
| १ | राज्य वित्त आयोगाचे असे मत आहे की, नागरी स्वराज्य संस्थांमध्ये कर्मचाऱ्यांच्या आवश्यक संख्येबाबत अतिशय पद्धतशीर आणि तपशिलवार अभ्यास करण्यासाठी सरकारने किंवा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी **व्यावसायिक एजन्सींची नेमणूक करणे** अत्यावश्यक आहे. अतिरिक्त कर्मचारी असणे निश्चितच इष्ट नाही कारण यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांचा मोठा निधी आस्थापना किंवा कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च केला जातो. त्याचवेळी कर्मचारी संख्या आवश्यकतेपेक्षा कमी असल्यास नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवांच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. त्याचप्रमाणे पारंपारिकपणे नेमल्या जाणाऱ्या पालिका स्थापत्य अभियंता या पदांऐवजी पर्यावरणीय व्यवस्थापक व तत्सम नवीन श्रेणीची पदे निर्माण करणे निर्माण करणे सुध्दा आवश्यक आहे. (परि. ८.६.३) | | √ | √ |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| २ | **महाराष्ट्र महानगरपालिका कायदा अधिनियम १४९ अ आणि महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम कलम १४७ अ मधील काही परिभाषा दुरुस्त करण्याची गरज :** महाराष्ट्र महानगरपालिका कायदा कलम १४९ अ आणि महाराष्ट्र नगरपालिका कायदा कलम १४७ अ नुसार १% अतिरिक्त मुद्रांक शुल्क आकारले जाते. असे निरिक्षणास आले आहे की, संबंधित कलमांच्या शब्दयोजनेमध्ये फक्त 'विक्रीची उपकरणे,भेटवस्तू, फलोपभोग गहाण (उपयोगिता तारण)' एवढेच नमूद केले आहे. नोंदणी महानिरिक्षकांशी चर्चा करताना असे निदर्शनास आले की, या कलमांमध्ये कोठेही 'विक्रीचा करार' असे नमूद करण्यात आलेले नाही आणि त्यामुळेच जे भरीव उत्पन्न नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे यायला पाहीजे होते. ते मिळत नाही. मुख्य मुद्रांक कायदयामध्ये विक्रीची कठोर तरतूद आहे. याबाबतचा तात्काळ आढावा व कायदेशिर कार्यवाही करणे आवश्यक आहे.(परि.८.२३.४.२(अ) | √ | | |
| ३ | **नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अतिरिक्त मुद्रांक शुल्काची थकबाकी तत्काळ देण्याची आवश्यकता :** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अद्याप अतिरिक्त मुद्रांक शुल्काची रु.५१० कोटींची भरीव थकबाकी देण्यात आलेली नाही. या थकबाकीमध्ये महानगरपालिकांना रु. २१४.६० कोटी आणि नगरपरिषदांना रु. २९६.१४ कोटी रुपये देय आहेत. ही अनुशेषाची रक्कम नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना तत्काळ हस्तांतरीत करणे गरजेचे आहे, अन्यथा याबाबत न्यायालयीन बाब उद्भवण्याची शक्यता आहे. (परिच्छेद ८.२३.४.२(ब)) | | √ | |
| ४ | **वसूल करण्यात आलेले अतिरिक्त मुद्रांक शुल्क राज्याच्या कोषागारात न वळवता थेट महानगरपालिकांकडे हस्तांतरित करण्याची आवश्यकता :** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी संकलित केलेल्या अतिरिक्त मुद्रांक शुल्कासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष (सीआरसी कोड) असणे हे देखील इष्ट आहे. अशा प्रकारे मुद्रांक शुल्क वसुलीच्या वेळी जमा झालेली रक्कम केंद्रिय वस्तू आणि सेवा कर + राज्याचा वस्तू आणि सेवा कर यांप्रमाणेच राज्य मुद्रांक शुल्क कर आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी अतिरिक्त उपकर अशा | | √ | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| | दोन स्वतंत्र लेखा शीर्षाखाली जमा होईल. सध्या यासाठी फक्त एकच लेखाशीर्ष असल्यामुळे कार्यान्वयामध्ये अडचणी येतात. (परिच्छेद ८.२३.४.२(क)) | | | |
| ५ | **करमणूक कर, गौण खनिजे आणि जमिन महसूल यांच्या थकबाकी तत्काळ चुकती करण्याची आवश्यकता :** क वर्ग नगरपालिकांना गौण खनिजांची रुपये २२.८२ कोटींची तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांना जमीन महसूलाची १०६कोटीं आणि करमणूक कराची रुपये १३.२४ कोटींची थकबाकी देय असल्याचे दिसून आले आहे.. या तिन्ही थकबाकींची बेरीज केल्यास एकूण रुपये १४२ कोटींची रक्कम नगर परिषदांना देय आहे. ही थकबाकी तात्काळ देणे आवश्यक आहे. (परिच्छेद ८.२३.४.२(ड) | | √ | |
| ६ | **तीन निर्धारित कर संपृष्टात आणणे आणि त्याऐवजी सहायय्क अनुदान वाढविण्याची आवश्यकता :** राज्य वित्त आयोग ठामपणे अशी शिफारस करते की, अतिरिक्त मुद्रांक शुल्क वगळता अन्य तीन निर्धारित कर पूर्णपणे काढून टाकावेत आणि त्याऐवजी वरील तीन निर्धारित करांमध्ये झालेल्या नुकसानाच्या रक्कमे एवढी अतिरिक्त रक्कम साहाय्यक अनुदानांमध्ये जमा झालीच पाहिजे आणि (नगरपरिषदेला एक मोठी रक्कम देण्यात यावी.) यामुळे वर्षानुवर्षे पाय रोवून राहिलेल्या अनेक गुंतागुंतीच्या पद्धतींचा गोंधळ दूर होईल आणि प्रशासकीय कामात सुधारणा होईल. (परिच्छेद ८.२३.४.२(इ)) | √ | | |
| ७ | राज्य वित्त आयोग अशी शिफारस आणि पुनरुच्चार करतो की, कार्यात्मक अनुदान मिळवण्यासाठी नमूद केलेल्या अटींपैकी एक 'लेखापरिक्षित लेखा' या अटीला भविष्यात अत्यंत महत्व देणे आवश्यक आहे. मग ती वित्त आयोगाची अट असो किंवा नसो. व्यावसायिक सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षण करणे आवश्यक आणि त्याचबरोबर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संपूर्ण लेखांकन पद्धतीचे सुव्यवस्थापन करणे आवश्यक आहे. लेखा, लेखा परिक्षण आणि वित्तिय माहिती या | √ | √ | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| | प्रकरणामध्ये आम्ही हे विस्ताराने मांडले आहे.(परिच्छेद ८.३८.१) | | | |
| ८ | **राज्य वित्त आयोग अशी ठाम शिफारस करतो की, व्यवसाय कर शासनाकडून (म्हणजेच विक्रीकर विभागाकडून) स्थानिक संस्थांकडे वळवणे अत्यावश्यक आहे, म्हणजेच हा कर स्थानिक संस्थांनी वसूल करून त्यांच्याकडेच ठेवावा.** आम्ही अशी शिफारस करतो की, सुरुवात छोट्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थापासून सुरु करुन सरकार या सुधारणा तीन टप्प्यांमध्ये अंमलात आणू शकते. या शिफारसीत व्यवस्थेमध्ये, शासनाने सर्व सरकारी, निम सरकारी, सार्वजनिक क्षेत्रातील व्यवसाय करदाते स्वत:कडेच ठेवावेत आणि फक्त अन्य वर्गवारींचे खासगी क्षेत्रातील व्यवसाय करदाते स्थानिक संस्थांकडे वळवावेत. (परिच्छेद ८.४०.२) | √ | | |
| ९ | राज्य वित्त आयोग अशी शिफारस करतो की **महाराष्ट्र दुकाने आणि आस्थापना अधिनियमाच्या कलम २७ अंतर्गत** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अंमलबजावणी यंत्रणा म्हणून घडवून, या सक्षम करणाऱ्या तरतूदी कार्यान्वित करणे आवश्यक आहे. यामुळे फक्त दुकाने कायद्याचे अनुपालनच वाढेल असे नाही तर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या व्यवसाय कराचे जाळे देखील विस्तारीत करता येईल. (परिच्छेद ८.४०.३) | √ | | |
| १० | **अगोदरच सुरू झालेल्या जीआयएस सर्वेक्षणाच्या कामाचे एकत्रिकरण करणे आणि नव्याने स्थापन झालेल्या नगर पंचायतींना जीआयएस व्यवस्था पूर्णपणे स्थापित होईपर्यंत संक्रमण मार्गदर्शक सूचना उपलब्ध करून देण्याची आवश्यकता:** नगर विकास विभागाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मालमत्ता योग्यप्रकारे ओळखण्यासाठी आणि त्यांना करकक्षेमध्ये आणण्यासाठी जीआयएस सर्वेक्षणाला सुरुवात केली, ही स्वागतार्ह बाब असून या कामाचे एकत्रिकरण करणे आणि त्याला वेग देणे गरजेचे आहे.परिपूर्ण जीआयएस व्यवस्था | | √ | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| | आकारास येईपर्यंत, नगर विकास विभागाने नगर परिषदांसाठी त्यांच्या मालमत्ता कर आकारणीबाबत संक्रमण मार्गदर्शक सूचना जारी केल्या पाहिजेत. (परिच्छेद ८.४१.३(अ)) | | | |
| ११ | **अधिकृत मूल्यांकन अधिकारी नेमण्याची गरज** :- नव्याने निर्माण केलेल्या नगर पंचायतींमधील मालमत्तांचे मूल्य ठरवण्यासाठी नगर रचना श्रेणीमधून अधिकृत मूल्यांकन अधिकाऱ्यांची नेमणूक होणे गरजेचे आहे.(कलम ११३ खाली). (परिच्छेद ८.४१.३ (ब)) | | √ | |
| १२ | क्षेत्र एकक पद्धतीचा समावेश करण्यासाठी अधिनियमातील तरतूदींमध्ये सुधारणा : नगरपालिका अधिनियमाच्या कलम १०५ आणि महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १२९ मध्ये आवश्यक सुधारणा करून "क्षेत्र एकक पद्धत "हा पर्याय समाविष्ट करणे आवश्यक आहे. (परिच्छेद ८.४१.३(क) | √ | | |
| १३ | क्षेत्र एकक किंवा भांडवली मूल्य पद्धतीकडे वळण्यासाठी आणि वसुली वाढवण्यासाठीही प्रोत्साहन : निश्चित कार्यात्मक मापदंडांवर आधारित १०% भांडवली अनुदाने देण्यात आलीच पाहिजेत. यांमध्ये भांडवल आधारित व्यवस्थेकडे वळणे हा एक मापदंड असणे अत्यावश्यक आहे. (परिच्छेद ८.४१.३(ड) | √ | √ | |
| १४ | **पालिका उपनियमांबाबत राज्य वित्त आयोगाची शिफारस** :राज्य वित्त आयोग अशी ठामपणे शिफारस करतो की,सरकारने विशेष पावले नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांचे उपनियम अद्ययावत करण्यासाठी मार्गदर्शन केले पाहिजे. नमुना उपनियमांचे (अद्ययावत) वितरण करून आणि किमान व कमाल शुल्क तसेच दंड सुचवूनही सरकार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना आधार देऊ शकते. (परिच्छेद ८.४२.२) | √ | | |
| १५ | कर, शुल्क, उपकर अशा संज्ञा पुन्हा परिभाषित करणे: कायद्यामधील तरतूदींची आणि संबंधित नियमांची छाननी करण्यासाठी तसेच कायद्याच्या कलम २ मध्ये आणि असे शब्द वापरले गेले आहेत अशा अनेक स्थानी | √ | | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| | आवश्यक परिभाषित स्पष्टता आणण्यासाठी एका लहान समितीची आवश्यकता आहे. (परिच्छेद ८.४२.३) | | | |
| १६ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे पालिका कर आकारणीबाबतचे प्रकरण ११ (विशेषतः कलम १२७,१२८,१२९) आणि नगरपरिषद अधिनियमातील प्रकरण ९ ( कलम १०५,१०६,१०७,१०८) यांचे प्रारूप नव्याने तयार करण्याबाबत- महानगरपालिका आणि नगरपरिषद अधिनियमांशी संबंधित वर नमूद केलेल्या दोन प्रकरणांवर ओझरती नजर टाकल्यास असे दिसून आले की, काळाच्या विविध टप्प्यांवर कायद्याच्या तरतूदींमध्ये घातलेली भर व हटवलेल्या बाबींमुळे झालेला गोंधळ, विविध उपपरिच्छेदांचे केलेले समावेशन यांमुळे या प्रकरणांचे वाचन व त्यातून होणारा अर्थबोध क्लिष्ट झाला आहे.म्हणून, विधी व न्याय विभागाचे मार्गदर्शन घेऊन संपूर्ण कलमे वापरकर्त्यांना अधिकाधिक सोपे होईल अशा पद्धतीने लिहिणे अपेक्षित आहे. (परिच्छेद ८.४२.४) | √ | | |
| १७ | पालिका कर मंडळ कार्यान्वित करण्याची आणि त्यांस नियामक मंडळामध्ये बदलण्याची आवश्यकता: राज्य वित्त आयोग ठामपणे अशी शिफारस करते की, महाराष्ट्र पालिका कर मंडळ अधिनियमात नमूद केल्यानुसार मालमत्ता कर मंडळ कार्यान्वित करणे आवश्यक आहे. आणि त्याचबरोबर एक स्वतंत्र नियामक यंत्रणा म्हणून पालिका कर मंडळाची व्याप्ती विस्तारणे,जी यंत्रणा केवळ मालमत्ता कराची किमान आणि कमाल श्रेणी निश्चित करणार नाही तर उपयोगकर्ता शुल्क, फी, दंड, उपकर आणि अशा अन्य करांची श्रेणी देखील निश्चित करेल. ही एकमेव शिफारस जर प्रभावीपणे आमलात आली तर राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संसाधनांच्या स्थितीमध्ये लक्षणीय बदल होतील. (परिच्छेद ८.४२.७) | √ | | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| १८ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना जर त्यांच्या कामासाठी अधीक सेवा शुल्क / वटाव दिले गेले ते त्यांच्यासाठी अधिक प्रोत्साहनात्मक ठरेल तसेच राज्य सरकारच्या उपकराची वसूलीही चांगली होऊन सरकारला ते लाभदायकच होईल. (परिच्छेद८.४३) | √ | | |
| १९ | नगरपरिषद प्रशासन संचालयनालयातील सर्व श्रेणीच्या अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन पूर्णपणे राज्य शासनाकडून भागवले जावे :- राज्य वित्त आयोग ठामपणे शिफारस करतो की, राज्य स्तरीय नगरपालिका श्रेणीच्या ५५४५ पदांचे वेतन राज्याच्या अर्थसंकल्पातून करणे आवश्यक आहे आणि नगर परिषदांना हा वेतन खर्च भागवण्यासाठी विचारणा केली जाऊ नये. राज्य वित्त आयोग अशी देखील शिफारस करतो की, सर्व वर्गवारीच्या नगरपरिषदांमधील मुख्याधिकाऱ्यांचे वेतन (अ, ब व क या सर्वांचे आणि आत्ताप्रमाणे फक्त क वर्गाचे नव्हे) राज्याच्या अर्थसंकल्पातून भागवणे आवश्यक आहे. (परिच्छेद ८.४४.१ आणि ८.४४.२) | √ | | |
| २० | राज्य वित्त आयोग अशी ठामपणे शिफारस करतो की, संपूर्ण सहाय्यक अनुदान शासन निर्णय २००९ हा नवीन सूत्रासह प्रतिस्थापित करण्यात यावा. सहाय्यक अनुदान हा नगर परिषदांच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत आहे आणि त्याचबरोबर हे अनुदान त्यांच्या महसूली उत्पन्नाचा ४५-५०% भाग आहे,(याबाबतचे आमचे यापूर्वीचे विश्लेषण कृपया पहावे.) त्यामुळे शासनाने यामध्ये कोणतीही अर्थसंकल्पीय कपात करु नये आणि पुनर्रचित सूत्रानुसार दरवर्षी हे पूर्ण अनुदान नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात यावे. वाढलेला आस्थापना खर्च आणि भविष्यातील अन्य खर्च यांच्याशी ताळमेळ साधण्यासाठी दरवर्षी सुमारे ८ % वाढ करण्याची तरतूद करणे अत्यावश्यक आहे. (परिच्छेद ८ .४५.२) | √ | √ | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| २१ | **शिक्षकांच्या वेतनामधील शासन हिस्सा वाढवण्याची गरज** : राज्य वित्त आयोग शिक्षकांच्या वेतनामधील राज्य शासनाचा हिस्सा वाढवण्याची ठामपणे शिफारस करतो. यामुळे ड वर्ग नगर महानगरपालिका आणि त्या खालील स्थानिक स्वराज्य संस्थांवरील आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी होईल. (परिच्छेद ८.४६ आणि ८.४६.१) | √ | | |
| २२ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नळ पाणी पुरवठा योजनांमधील विद्युत पंपाचा खर्च शासनाने भागवणे: राज्य वित्त आयोग अशी ठामपणे शिफारस करतो की, भौगोलिकदृष्ट्या प्रतिकूल स्थिती असलेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक स्थिती परिरक्षित करण्यासाठी त्यांच्या विद्युत पंपांच्या रक्कमांची प्रतिपूर्ती झाली पाहिजे. ही रक्कम पंपिंग केलेल्या पाण्याचे स्त्रोतापासून अंतर आणि उंची ते अंतिम पाण्याच्या उंच टाकीपर्यंतच्या (जल शुध्दीकरण प्रकल्पाच्या मार्फत) अंतराशी संलग्न केली पाहिजे. आम्ही फक्त ड वर्ग महानगरपालिका आणि सर्व वर्गवारीतील नगर परिषदा आणि नगर पंचायतींसाठी या अनुदानाची शिफारस करत आहोत. (परिच्छेद ८.४७ आणि ८.४७.१). | √ | | |
| २३ | शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या देयकांचे निर्लेखन करणे : राज्य वित्त आयोग शिफारस करतो की, शासनाने दोन्ही बाजूंचे प्रश्न एकाचवेळी मार्गी लावून दोन्ही पक्षांसाठी विजयी स्थिती निर्माण करणारी एकवेळ सशर्त निर्लेखन (समझोता) योजना आमलात आणावी. या योजनेमध्ये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना भागीदारी सूत्राने प्रोत्साहन देऊन त्यांची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला द्यावयाची जुनी देयके निकालात काढली जातील. (परिच्छेद ८.४८ आणि ८.४८.१) | √ | | |
| २४ | लहान नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या भूसंपादनाची रक्कम भागवणे : राज्य वित्त आयोग अशी ठामपणे शिफारस करतो की, ब वर्ग,क वर्ग नगर परिषदा आणि नगर पंचायतींसाठी खाली नमूद केलेल्या आवश्यक सामाजिक पायाभूत सुविधा देण्यासाठी आवश्यक भूसंपादनाचा खर्च शासनाने भागवलाच पाहिजे: | √ | | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| | • एका कचराभूमी/ कंपोस्ट खड्डयासाठी जमिनीचा खर्च<br>• सांडपाणी प्रक्रिया केंद्रासाठी जमिनीचा खर्च<br>• पाणी पुरवठा य़ोजनेच्या पाण्याच्या उंच टाकीसाठी जमिनीचा खर्च<br>• स्मशानभूमीसाठी खर्च<br>• एका उद्यानासाठीचा खर्च<br>• एका सार्वजनिक रुग्णालयाचा खर्च<br>शासन या भूसंपादनाचा खर्च भागवण्यासाठी नवीन योजना विचारात घेऊ शकेल किंवा कोणत्याही चालू योजनेची व्याप्ती वाढवून हे शक्य करू शकेल. (परिच्छेद ८.४९ व ८.४९.१) | | | |
| २५ | **शासनाने लहान नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या खर्चाची मानके निश्चित करणे आणि तो खर्च भागवणे :** लहान वर्गवारीतील नागरी स्थानिक संस्थांचा निवडणूक खर्च शासनाने करावा अशी शिफारस राज्य वित्त आयोग करीत आहे. (परिच्छेद ८.५० आणि ८.५१) | √ | | |
| २६ | पर्यटन स्थळे, यात्रास्थळे आणि अन्य शहरांच्या विशेष गरजा आणि त्यांच्या संसाधनांची वृद्धी करण्याचे मार्ग : राज्य वित्त आयोग शिफारस करतो की ज्या शहरांमध्ये हंगामी किंवा वर्षभर भरपूर अस्थायी लोकसंस्था आहे, अशा शहरांनी “पर्यावरण व्यवस्थापन शुल्क” वसूल करावे, यासाठी सुयोग्य तरतूद कलम १०८ मध्ये समाविष्ट करण्यात यावी. याबाबतचा नमुना उपनियम आणि एक समग्र अद्ययावत मार्गदर्शक शासन निर्णय, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी मोठ्या प्रमाणात उपयुक्त ठरेल (परिच्छेद ८.५१ आणि ८.५१.३) | √ | √ | |
| २७ | **भांडवली अनुदाने**: -<br>अ) राज्य वित्त आयोगाने याची नोंद घेतली आहे की, स्वेच्छाधिन असणाऱ्या भांडवली अनुदानांमध्ये वर्षानुवर्षे मंद गतीने वाढत होत आहे. ही अनुदाने अधिकाधिक सूत्राधारित करण्याची शिफारस राज्य वित्त आयोग | √ | √ | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| | करत आहे, यामुळे सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना भांडवली अनुदानाचे पाठबळ स्विकारण्यामध्ये आपण नेमके कोठे आहोत हे समजेल.<br><br>ब) राज्य वित्त आयोग अशी ठामपणे शिफारस करतो की, चांगली कामगिरी दाखवणाऱ्या आणि आर्थिक शिस्तीचे पालन करणाऱ्या उत्तम नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना योग्यप्रकारे प्रोत्साहित करणे अत्यावश्यक आहे. यासाठी भांडवली अनुदान कामगिरीशी संलग्न करण्याहून चांगला पर्याय दिसत नाही. राज्य वित्त आयोग असे सुचवतो की, ५ ते १० % अतिरिक्त अनुदान हे "कार्यात्मक अनुदान" म्हणून वेगळे ठेवावे आणि ठरवून दिलेले कार्यात्मक मापदंड साध्य केल्यावर याचे अनुदान वितरित करण्यात यावे. हे काम एका स्वतंत्र त्रयस्थ पक्षाद्वारे वस्तुनिष्ठपणे केले जाणे आवश्यक आहे. यामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामामध्ये सुसुत्रता येईल आणि त्यांच्या कामकाजात मोठ्या प्रमाणात सुधारणा होईल. (परिच्छेद ८.५२.३) | | | |
| २८ | एका स्वतंत्र व्यावसायिक यंत्रणेद्वारे महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा कंपनीच्या (MUINFRA) च्या प्रचालन कार्यपद्धतीची नव्याने समग्र पडताळणी होणे गरजेचे आहे (ही यंत्रणा आता सुमारे १७ वर्षे जुनी झाली आहे). (परिच्छेद ८.५४.४ (अ)) | √ | | |
| २९ | ज्यांच्याकडे दीर्घ मुदतीचा निधी शिल्लक आहे, अशी भारतीय आयुर्विमा महामंडळासारखी (एलआयसी) एखादी यंत्रणा ही MUINFRA/ समकक्ष संस्थेच्या मालकीचा किंवा व्यवस्थापकीय रचनेचा भाग होऊ शकते का, याची तपासणी करण्याची गरज आहे. (परिच्छेद ८.५४.४ (ब)) | √ | | |
| ३० | सारखाच पायाभूत विकास निधी आणि कार्यान्वयन पायाभूत कंपन्या असणाऱ्या अन्य विकसित राज्यांच्या कार्यपध्दतीचा अभ्यास करण्याची गरज आहे आणि त्यांच्या कामाची पध्दत पूर्णतः किंवा अंशतः अवलंबता | | | √ |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| | येईल का हे तपासणे देखील गरजेचे आहे. (परिच्छेद ८.५४.४ (क) ) | | | |
| ३१ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकडून वर नमुद केलेल्या (परिच्छेद ८.५४.२) विविध श्रेणीतील सेवा देण्यासाठी स्वतंत्र तांत्रिक यंत्रणेची गरज आहे. शासन यासंदर्भात वेगळा कॉर्पस निधी देण्याचा विचार करू शकते किंवा विद्यमान MUNIFRA (समजा १० कोटी) च्या निधीमधून या यंत्रणांना पाठबळ निधी राखून ठेवू शकते. (परिच्छेद८.५४.४ (ड) ) | √ | | √ |
| ३२ | राज्य वित्त आयोग शिफारस करतो की, प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, सल्लागार शुल्क इ.शी संबंधित संपूर्ण कार्यपद्धतीचे पुनःपरिक्षण करण्याची गरज आहे.नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांवरील, विशेषतः लहान आकाराच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांवरील लादलेले विविध प्रकारचे वेळेचा आणि खर्चाचा भार कमी करण्याची गरज आहे. (परिच्छेद ८.५५.१) | | √ | |
| ३३ | राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत सामिल होणाऱ्या पालिका कर्मचाऱ्यांच्या संबंधित कार्यपध्दतीशी संबंधित समस्या मार्गी लावण्याची गरज :राज्य वित्त आयोग नगर विकास विभाग/ नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना ठामपणे शिफारस करतो की, त्यांनी यासाठी या विषयामधील पारंगत अशी सुयोग्य व्यवसाय संस्था किंवा सल्लागार व्यक्तीची नेमणूक करावी, जे या विषयात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रत्यक्ष मदत करतील आणि अधिक विलंब टाळून हा निधी राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेत हस्तांतरित करण्यात मदत करतील. (परिच्छेद ८.५६.२) | | √ | |
| ३४ | विभागीय, जिल्हा आणि राज्य पातळीवर नगरपरिषद प्रशासन संचालनालय (DMA) ची पुनर्रचना करणे आणि त्यांस जिल्हाधिकारी कार्यालयापासून अलग करणे : | √ | √ | √ |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| | नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे विभागीय अधिकारी आणि जिल्हास्तरीय अधिकारी यांना जिल्हाधिकारी कार्यालयामधून वेगळे काढणे आवश्यक आहे आणि जिल्हा पातळीवरील साहाय्यक संचालक, नगर विकास यांच्याप्रमाणे त्यांनी एक स्वतंत्र कार्यालय म्हणून कार्यरत झाले पाहिजे. राज्यामध्ये अधिकाधिक नागरीकरण होत आहे, हे लक्षात घेऊन नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्र कर्मचाऱ्यांच्या संपूर्ण व्यवस्थापनाला नवीन तोंडवळा देण्याची गरज आहे. राज्य वित्त आयोग अशी देखील शिफारस करतो की, जिल्हा स्तरीय अधिकाऱ्याला सध्या दिले जाणारे 'जिल्हा प्रशासकीय अधिकारी' हे पदनाम बदलण्याची गरज आहे. (परिच्छेद ८.५६.३) | | | |
| ३५ | **महानगर पालिकांमध्ये कर्मचारी संवर्गाची निर्मिती :** राज्य वित्त आयोग अशी शिफारस करतो की, महानगरपालिकांसाठीचा कर्मचारी संवर्ग हळूहळू योग्य त्या शास्त्रीय पद्धतीने विकसित करणे आवश्यक आहे. सर्वप्रथम वित्त आणि लेखा संवर्ग निर्माण करून त्यानंतर अन्य प्रवर्ग निर्माण करणे इष्ट आहे. (परिच्छेद ८.५७ आणि ८.५७.१) | √ | | |
| ३६ | **स्वच्छ भारत अभियान:** राज्य वित्त आयोग अशी शिफारस करतो की, सुयोग्य प्रात्यक्षिक तांत्रिक शिक्षण देणाऱ्या यंत्रणांना (जसे की अभियांत्रिकी महाविद्यालयातील पर्यावरणीय अभियांत्रिकी विभाग किंवा अशा सुयोग्य संस्था) त्या विभागातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मदत करण्यासाठी सोबत घेणे आवश्यक आहे. या तांत्रिक पाठबळ यंत्रणांनी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण देऊन आणि खंबीरपणे पाठींबा देणे आवश्यक आहे. (परिच्छेद ८.५९ आणि ८.५९.१) | | √ | |
| ३७ | **घन कचरा व्यवस्थापन आणि अन्य उपक्रमांसाठीचा सुयोग्य परिव्ययांकन काढणे :** घन कचरा व्यवस्थापनावरील अधिकाधिक काटेकोर आणि विश्वसनीय माहिती उपलब्ध करून द्यावी अशी राज्य | | √ | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| | वित्त आयोगाची शिफारस आहे. विशेषत: मोठ्या शहरांमध्ये (अ+, अ,ब आणि क वर्गवारी) या कामासाठी अभिहस्तांकन तत्वावर विशेषीकृत परिव्यय लेखापाल एजन्सीची नेमणूक करता येऊ शकते. यामुळे सुयोग्य प्रभावी खर्चाची पर्यायी उपाययोजना तयार करण्यास मदत होईल. (परिच्छेद ८.६० आणि ८.६०.१) | | | |
| ३८ | **शहरे म्हणजे 'आर्थिक वृद्धीची' इंजिन्स :** या ( रोजगाराच्या संधी वाढवण्याच्या) दिशेने पुढाकार घेणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी काही वार्षिक पुरस्कार आणि मान्यता केल्या सुरू केल्या जाव्यात अशी शिफारस राज्य वित्त आयोग करत आहे. (परिच्छेद ८.६०आणि ८.६१) | √ | | √ |
| ३९ | **पुरस्कार आणि मान्यता :** श्रेणीनिहाय नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सर्वोत्तम कार्यापद्धतीला संस्थागत पुरस्कार आणि मान्यता द्यावी अशी राज्य वित्त आयोग शिफारस आहे. नगर विकास विभाग आणि पंचायत राज विभाग यांच्या प्रमाणेच हा कार्यक्रम वर्षातील एखाद्या विशिष्ट दिवशी किंवा आठवड्यामध्ये घेण्यात यावा. कार्यक्रमाच्या दिवसामध्ये बदल करू नये. श्रेणीनिहाय वित्तिय कामगिरी पुरस्कारही असणे आवश्यक आहे. (परिच्छेद ८.६३ आणि ८.६३.१) | √ | | √ |
| ४० | **माहिती तंत्रज्ञाना (IT) मध्ये गुंतवणूक करणे:** राज्य वित्त आयोग शिफारस करतो की, माहिती तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधा आणि लहान नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्या हाताळण्याची क्षमता विकसित करणे या बाबींचे बळकटीकरण करण्यासाठी अविरत आणि केंद्रीत प्रयत्न करणे आवश्यक आहे.(परिच्छेद ८.६४ आणि ८.६४.१) | √ | | √ |
| ४१ | **अग्निशमन सेवा:** राज्य वित्त आयोग शिफारस करतो की, सरकारने लहान नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अग्निशमनाच्या साधनांनी सुसज्ज असे वाहनासाठी (फायर टेंडर) बहुविध कार्य करणारे साहाय्यक कर्मचारी नेमण्यास परवानगी द्यावी. पण त्याचवेळी फायर टेंडर | √ | √ | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| | कर्मचाऱ्यांची आवश्यकता देखील आहे. म्हणूनच मध्यम मार्ग सुचवला आहे. (परिच्छेद ८.६५ आणि ८.६५.१) | | | |
| ४२ | **नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी परिरक्षा निधी निर्माण करण्याची गरज :** राज्य वित्त आयोग अशी ठामपणे शिफारस करतो की, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या उत्पन्नांच्या स्रोतामधून २% परिरक्षा निधी निर्माण करणे आणि राखीव परिरक्षा निधीसाठी वेगळा राखून ठेवणे हे आवश्यक आहे, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना निर्देशित केले पाहिजे. राज्य वित्त आयोग अशीही शिफारस करू इच्छितो की, हा निधी MUINFRA मध्ये किंवा अशाच यंत्रणांमध्ये ज्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांपासून वेगळ्या आणि दूर आहेत, त्यांच्यामध्ये ठेवला पाहिजे. ही रक्कम जमा केल्यानंतर तीन वर्षानंतरच ती काढण्यास परवानगी असली पाहिजे. MUINFRA ची अनुदाने परिरक्षा निधीशी देखील संलग्न करता येतील. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सुयोग्य परिरक्षा निधी निर्माण करण्याची वित्तिय शिस्त उपनियम, कायदे आणि कार्यकारी आदेश यांद्वारे आणणे आवश्यक आहे. (परिच्छेद ८.६६ आणि ८.६६.१) | √ | | |
| ४३ | **इमारती आणि अन्य बांधकाम कामगार, कल्याण कायदा, १९९६ अंतर्गत असलेल्या नागरी स्थानिक स्वराज्य प्रकल्पांमधून वसूल केलेल्या १ % उपकराचे प्रभावी उपयोजन :** सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये या कायद्यामधील कल्याणकारी तरतूदींबाबत तातडीने जागरूकता निर्माण करण्याची गरज आहे. विशेषतः महानगरपालिकांमध्ये या कायद्याबाबत जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे, कारण या मोठ्या पालिकांमध्ये मोठ्या प्रमाणात बांधकाम प्रकल्प हाती घेतले जातात. जागरूकता निर्माण करण्याचे हे काम स्थानिक स्वराज्य संस्थांची अखिल भारतीय संस्था, यशदा किंवा कामगार कल्याण संस्था किंवा अशाच एखाद्या संघटनेकडे सोपवले पाहिजे. (परिच्छेद ८.६७ आणि ८.६७.१(अ)) | | √ | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| ४४ | उपलब्ध कल्याणकारी योजनांचे चलाखीने आकलन करणे, समन्वय आणि पाठपुरावा यांच्याद्वारे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील बांधकाम आणि अशाच संबंधित कामगारांच्या कल्याणासाठी बांधकाम कामगार कल्याण मंडळामधून एका वर्षामध्ये किमान ५०० ते १००० कोटी रुपये काढून घेता येणे शक्य आहे. (परिच्छेद ८.६७.१(ड)) | | √ | |
| ४५ | अशी शिफारस करण्यात येते की, नगर विकास विभागाने कामगार विभागाशी सल्ला मसलत करून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या फायद्यासाठी एक तपशीलवार शासन निर्णय जारी करावा. (परिच्छेद ८.६७.१(इ)) | | √ | |
| ४६ | **नागरी व्यवस्थापनाच्या राज्य संस्थेचा विकास :** या उद्देशासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी एक लहान प्रशिक्षण आणि संशोधन समन्वय कक्ष स्थापन करावा अशी राज्य वित्त आयोगाची शिफारस आहे. हा कक्ष संपूर्ण प्रशिक्षण आणि उपयोजित संशोधन उपक्रम यांचा समन्वय करू शकेल. यशदा, ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट (अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था) आणि राज्यामध्ये परिचित प्रसिध्द असलेल्या अशाच काही संस्था यांच्यामध्ये विशेषीकरणाची क्षेत्रे आणि (उदिष्टांप्रमाणे प्रशिक्षणाची वर्गवारी) यांचे सुयोग्य वितरण झाले पाहिजे. अशाप्रकारे उदाहरण म्हणून एक संस्था एक संस्था लेखा, वित्त आणि संबंधित क्षेत्रांबाबत विशेषीकृत प्रशिक्षण घेऊ शकेल, तर दुसरी संस्था नागरी व्यवस्थापन आणि अन्य काही क्षेत्रांमध्ये समन्वय करू शकेल. महाराष्ट्राच्या लोकसंख्येचा आणि राज्याची प्रतिष्ठा या बाबी लक्षात घेऊन नगर विकासाची गरज मोठ्या प्रमाणावर आहे. त्याचबरोबर नगर व्यवस्थापनासाठी समर्पित अशा संस्थेचीही गरज आहे. (परिच्छेद ८.६८ आणि ८.६८.१) | √ | | √ |
| ४७ | **वित्त आयोगाच्या व इतर कर हिश्याच्या परस्पर वाटपाचे सूत्र:** सध्या प्रचलित असलेले लोकसंख्या:क्षेत्रफळ गुणोत्तरावर आधारित ९०:१० हे गुणोत्तर तसेच सुरु ठेवण्याची आम्ही शिफारस करत आहोत. याबाबतची | √ | | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| | विस्तृत माहिती स्वतंत्र प्रकरणामध्ये देण्यात आलेली आहे. (परिच्छेद ८.६९) | | | |
| **प्रकरण ९ – नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचे लेखा, लेखा परिक्षण आणि वित्तीय माहिती सुव्यवस्थित करणे.** | | | | |
| १ | शासनाने नागरी लेखा संहिता अधिसूचना २०१३ नुसार दुहेरी नोंद पद्धती तत्वत: आणि अक्षरश: आद्य प्राथमिकतेने केली पाहिजे. शासनाने नगरपरिषदांना दुहेरी नोंदणी पद्धतीने लेखा नोंदी ठेवण्याकरीता प्रत्यक्ष सहाय्य केले पाहिजे आणि सद्य स्थितीतील आधी नेहमी प्रमाणे नोंदी करून नंतर सनदी लेखा संस्थाकडून त्याचे रुपातंर दुहेरी नोंदीमध्ये करण्याची पद्धत निरसित केली पाहिजे. (परिच्छेद ९.६.१.२) | √ | √ | √ |
| २ | आताचे डिजिटल तंत्रज्ञान पाहता वास्तविक स्थितीतील लेखाकंन ही काळाची आवश्यकता आहे. हे सुनिश्चित करण्याकरीता इआरपी प्रणाली संरेखित करता येईल ज्यामधील वास्तविक लेखाकंनामुळे अपेक्षित परिणाम प्राप्त होतील. वास्तविक स्थितीतील लेखाकंनाने व्यवस्थापन तसेच शासनासाठी देखील योग्य व्यवस्थापन माहिती प्रणाली प्रवाहाची सुनिश्चिती होईल. (परिच्छेद ९.६.१.२) | √ | √ | |
| ३ | इआरपी आधारीत प्रणालीत स्थित्यंतर करण्याची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने करता येईल, म्हणजेच १/३ नगर परिषदा दर वर्षी दुहेरी नोंदणी पद्धतीचा अवलंब करू शकतात(परिच्छेद ९.६.१.२) | | √ | |
| ४ | नगर परिषद प्रशासन संचालनालयाकडून प्रमाण लेखांकन संज्ञासह (इंग्रजी आणि मराठीमधील) चांगले लेखांकन करणारे इआरपी सॉफ्टवेअरचे पॅकेज उपलब्ध करून द्यायला हवे. असे समजले आहे की इआरपी सॉफ्टवेअरच्या किंमती फारच कमी झाल्या आहेत. (परिच्छेद ९.६.१.२) | | √ | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| ५ | राज्य वित्त आयोग अगदी ठामपणे शिफारस करते की महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ९३ मध्ये सुयोग्य सुधारणा करण्यात यावी आणि लेख्यात दुहेरी नोंद पद्धती अनिवार्य करावी. (परिच्छेद ९.७.२) | √ | | |
| ६ | इआरपी सॉफ्टवेअर प्रणाली वापरून लेख्यात दुहेरी नोंद करण्याच्या या विहित पद्धतीला प्रात्यक्षिकासह सहाय्य करणे आवश्यक आहे. (परिच्छेद ९.७.२) | | | √ |
| ७ | राज्य वित्त आयोग शिफारस करते की विद्यमान व्यवस्था तशीच सुरु ठेवावी आणि लागलीच कोणत्याही बदलाची आवश्यकता नाही. (परिच्छेद ९.८.२) | | | |
| ८ | ग्राम पंचायतीचे उत्पन्न आणि खर्च यांची पातळी मर्यादित असल्याने नवीन उपक्रमांची आवश्यकता नाही केवळ यापुर्वीच केलेला उपाययोजनांचे संकलन करणे आवश्यक आहे. (परिच्छेद९.९.१) | | | |
| ९ | राज्य वित्त आयोग अशी शिफारस करतो की अशा प्रकारची वित्तीय गुणोत्तरे विकसीत करून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वार्षिक लेखा/अर्थसंकल्प यामध्ये नमूद करणे आवश्यक आहे. यामुळे तृतीय पक्षाला नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची वित्तीय स्थिती (वित्तीय आरोग्य) समजणे शक्य होईल. (परिच्छेद ९.११.१) | | √ | |
| १० | राज्य वित्त आयोग शिफारस करतो की शासनाने (नगर विकास विभाग आणि ग्राम विकास विभाग यांनी) संबंधित अधिनियमांतर्गत देण्यात आलेल्या अधिकारानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या वार्षिक महसुलाच्या २% ते ५% इतका निधीस्वतंत्र देखभाल दुरुस्ती निधी म्हणून निर्माण करण्याचे आणि हा निधी मुलभूत (कॉर्पस) निधीत हस्तांतरित करण्याचे निर्देश द्यावेत. सदर मुलभूत (कॉर्पस) निधी शासनाच्या वरिष्ठ स्तरावर, राज्य स्तरावर अथवा विभागीय स्तरावर राखण्यात यावा किंवा शक्य असल्यास सुयोग्य स्वतंत्र निधी व्यवस्थापन संस्था जसे की भविष्य निर्वाह निधी कडे ठेवण्यात यावा. सदर निधी स्थानिक स्वराज्य संस्थांकडेच ठेवल्यास इतर आवश्यक तातडीच्या गरजांकरीता वापरला जाण्याची | √ | | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| | शक्यता आहे, अशाने देखभाल निधी निर्माण करण्याच्या हेतूलाच हरताळ फासला जाईल. (परिच्छेद ९.१२.१) | | | |
| ११ | देखभाल दुरुस्ती निधी केवळ कार्यकारी आदेशान्वये नव्हक तर योग्य प्रत्यायुक्त विधिविधानाने नियमांच्या स्वरुपात निर्माण करणे आवश्यक आहे.(परिच्छेद ९.१२.१) | √ | | |
| १२ | राज्य वित्त आयोग या समस्येचा संपूर्णपणे अभ्यास करण्यासाठी आणि या निधीच्या प्रचलनाकरीता कार्यपद्धती सुचविण्याकरीता 'एका उच्चस्तरीय तज्ज्ञांच्या समिती' ची शिफारस करतो. असे सुचविण्यात येत आहे की शासनबाह्य व्यावसायिक वित्तीय तज्ज्ञांचे मार्गदर्शनाचा या समितीमध्ये सहभाग असावा. (परिच्छेद ९.१२.१) | √ | | |
| १३ | **प्रलंबित लेखापरिक्षण परिच्छेदांबाबत राज्य वित्त आयोगाच्या शिफारशी:** राज्य वित्त आयोगाच्या मते मोठया प्रमाणावर प्रलंबित लेखापरिक्षण परिच्छेदांचे निराकारण करण्यासाठी वरिष्ठ स्तरावर काही धोरणात्मक दृष्टीकोनातून निर्णयात्मक कारवाई करण्यात यावी. अशा प्रकारे दशकापासून प्रलंबित जुन्या लेखापरिक्षण परिच्छेदांचे निराकारण केल्याने हल्लीच्या लेखापरिक्षण आक्षेपांकडे लक्ष केंद्रित करण्यास, सुधाराणात्मक आणि दंडात्मक कारवाई करणे सोपे होईल आणि ते अधिक प्रभावी ठरेल.(परिच्छेद ९.१४.१) | √ | √ | |
| १४ | ग्राम विकास आणि नगर विकास विभागामार्फत मिळणाऱ्या निधी संबंधात अर्थसंकल्पीय दस्त-ऐवज वापरकर्त्यांकरीता आधिक मैत्रीपूर्ण करण्याची आवश्यकता. (परिच्छेद ९.१५) | √ | √ | |
| १५ | राज्य वित्त आयोग शिफारस करते की दोन्हीही विभागामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था संदर्भातील विविध लेखाशीर्षकांचे मुल्यमापनाची क्रिया करण्यात यावी आणि पुनरावृत्ती तसेच गोंधळ कमी करण्याकरीता सुसूत्रीकरण करण्यात यावे. (परिच्छेद ९.१६.१) | | √ | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| १६ | **'उपकर', 'कर', 'शुल्क' अशा संज्ञांच्या वापराबाबतचा संभ्रम आणि त्यांची व्याख्या पुन्हा करण्याची आवश्यकता:** राज्य वित्त आयोग ठामपणे अशी शिफारस करतो की समितीने कायदा आणि संबंधित नियमांच्या संबंधित कलमांचा अभ्यास करुन विद्यमान तरतूदींचा गुंता सोडवावा. (परिच्छेद ९.१७.१) | √ | | |
| १७ | **राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वित्तीय विशेषज्ञांकडून वित्तीय आणि लेखा बाबतीत समन्वय आधाराबाबत मार्गदर्शनाची आवश्यकता:** वाढत्या नागरी क्षेत्रामुळे सातत्याने वाढत असणारा नगर विकास विभागाचा अर्थसंकल्प आणि निधी वितरणाच्या वाढलेल्या रकमांचा विचार करता मंत्रालय पातळीवर व्यावसायिक सहाय्य करणाऱ्या वित्तीय अधिकाऱ्याचे सुयोग्य पद निर्माण करण्याची आवश्यकता आहे, (परिच्छेद ९.१८ आणि ९.१८.१) | √ | √ | |
| १८ | **पाच वर्षांकरीता समर्पित 'नागरी स्थानिक स्वराज्य संस्था- वित्तिय अहवाल आणि लेखा सुधारणा अभियान' ची आवश्यकता:** राविआ शिफारस करते की, नविविने कमीत कमी पाच वर्षाकरीता तरी 'नागरी स्थानिक स्वराज्य संस्था- वित्तिय अहवाल आणि लेखा सुधारणा अभियान' ची स्थापना करावी. **अभियानाकरीता महादेश:**<br>अ. तत्वत: आणि अक्षरश: नगरपालिका लेखा संहिता, २०१३ संपूर्णत: कार्यान्वयीत करण्यास सहाय्य करणे.<br>ब. नास्थासंमधील लेखा अधिकाऱ्यांचे क्षमता संवर्धन<br>क. सनदी लेखापाल संस्थासोबत सहकार्य<br>ड. स्थानिक निधी लेखापरिक्षण विभागाच्या भूमिकेची पुनर्व्याख्या करणे.<br>इ. सार्वजनिक निधी व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) ची सुरुवात करणे. .(परिच्छेद९.१९.१) | √ | | √ |
| **प्रकरण १०: सर्वसाधारण आलोचना आणि अंतिम निष्कर्ष** | | | | |
| १ | राज्य वित्त आयोग ठामपणे अशी शिफारस करतो की केंद्रीय वित्त आयोग आणि राज्य वित्त आयोगासंबंधातील कामकाज हाताळण्याकरिता वित्त विभागामध्ये पुरेशा आणि विशेषज्ञ मनुष्यबळासहीत एक समर्पित कक्षाची स्थापना करण्यात यावी. या कक्षाची राज्य सरकारला खूप मोठी मदत होईल. असे सूचविण्यात येत आहे की यामध्ये समष्टि अर्थशास्त्रीय आणि राजकोषीय समस्या अंतर्भूत असल्याने कक्षाच्या कामकाजामध्ये कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या (जसे की मुंबई विद्यापीठाचा अर्थशास्त्र विभाग) विद्वत्तापूर्ण सहाय्याचा उपयोग करण्यात यावा. | √ | | √ |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| | कक्षाचे प्रमुख वरिष्ठ अधिकारी(सह /उपसंचालक पातळीवरील असावे) असावेत तसेच नियोजन आणि सांख्यिकी विभागातून विशेषत्वाने हे पद निर्माण करावे व काही सहाय्यक कर्मचाऱ्यांही समावेश करण्यात यावा. (परिच्छेद१०.१.१) | | | |
| २ | राज्य वित्त आयोग अशी शिफारस करत आहे की राज्य वित्त आयोग आणि केंद्रीय वित्त आयोगाची कालावधीच्या संदर्भात त्यांची स्थापना अशा प्रकारे करण्यात यावी की, आगामी केंद्रीय वित्त आयोगाच्या स्थापनेच्या( २०२५-३०) दोन वर्षे आधी राज्य वित्त आयोगाची स्थापना करण्यात यावी. (परिच्छेद १०.२.१) | √ | | |
| ३ | विद्यमान राज्य वित्त आयोगाच्या अनुभवावरून तसेच अन्य राज्याच्या राज्य वित्त आयोगाच्या कार्यकालाची तुलना केल्यानंतर असे विधान करता येईल की राज्य वित्त आयोगाला त्यांचा अहवाल सादर करण्याकरिता अठरा महिन्यांचा कालावधी देणे उचित होईल. आहेत. (परिच्छेद १०.२.१(१) ) | √ | | |
| ४ | आयोगाचा विद्यमान अहवाल २०२०-२५ या कालावधीकरीता ग्राह्य धरता येईल. (परिच्छेद १०.२.२) | √ | | |
| ५ | राज्य वित्त आयोग केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार प्राप्त अनुदानाचे वाटप आणि स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये आंतर वाटपाकरीता (नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या) ९०:१० (लोकसंख्या: क्षेत्र) सूत्राची शिफारस करते. तथापि, त्यांस ग्राम पंचायतीकरीता १००% आंतरवाटप लोकसंख्येच्या आधारे करण्यात यावे असे सूचित करत आहे. (१०.२.२) | √ | | |
| ६ | राज्य वित्त आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थाना सूत्राधारे राज्यकर हिश्याऐवजी भरपाई अनुदान आणि निर्धारित अनुदान देऊन सहाय्य करण्याची विद्यमान पद्धती सुरु ठेवण्याची शिफारस करीत आहे. राज्य वित्त आयोग अशी शिफारस करीत आहे की संविधानात्मकरित्या निर्धारित करांचे पुर्णत: आणि परिणामकारक रित्या हस्तातंरण | √ | √ | |

| अ.क्र. | शिफारशी | धोरण | प्रक्रीया | क्षमता संवर्धन |
|---|---|---|---|---|
| | करण्यात आले तर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचे वित्तीय आरोग्य (विशेषत: जिल्हा परिषदांचे) आपोआपच सुधारेल. (परिच्छेद १०.३) | | | |
| ७ | स्थानिक स्वराज्य संस्थाकडे करांचे हस्तांतरण वस्तू आणि सेवा कराच्या वसूलीशी संलग्न करणे- दिर्घ कालीन आवश्यकता: आम्हाला याबाबीची जाणीव आहे की स्थानिक स्वराज्य संस्थाचे दिर्घकालीन वित्तीय आरोग्य हे सूत्राधारीत निश्चित निधी हस्तातंराणामुळेच आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना सहाय्य देण्याच्या विद्यमान वाटपाच्या पद्धतीला पूर्णत: किंवा अंशत: दूर करण्याने साध्य होऊ शकते. (परिच्छेद १०.४) | √ | | |
| ८ | सूत्राधारीत सहाय्य देण्याची शिफारस करण्यापूर्वी स्थानिक संस्थाबाबत चांगली, विश्वसनीय माहिती (डेटा) असणे पूर्व-अट आहे. (परिच्छेद १०.४) | √ | - | |
| ९ | आम्ही आशा करतो की येत्या काही वर्षात हे प्रत्यक्षात येईल आणि शक्यतो पुढील राज्य वित्त आयोग वस्तू आणि सेवाकराशी संलग्नित सुत्राधारीत वाटपाची शिफारस करण्याच्या स्थितीत असेल. (परिच्छेद १०.४) | √ | | |
| १० | माहिती (डेटा) बाबतची आव्हाने आणि याक्षेत्रात दिर्घकालीन गुंतवणूकीची आवश्यकता: स्थानिक स्वराज्य संस्थाचा विशेषत: नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचा माहिती साठा (डेटाबेस) सक्षम करण्याची आवश्यकता आहे. त्याच प्रमाणे, पंचायत राज आणि ग्राम पंचायतींचे लेखे सुधारण्याकरीता राज्य व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यास सूचित करण्यात येत असून पंचायत राज विभागासाठी हा उपक्रम सुरु करणे प्राधान्यक्रम असावा. (परिच्छेद १०.४.१) | √ | √ | |
| ११ | आम्हाला असा पूर्ण विश्वास वाटतो की या सुधारणांची अंमलबजावणी झाल्यानंतर भविष्यातील राज्य वित्त आयोगांचे काम अधिक सुकर होईल. (परिच्छेद १०.४.१) | | | |

## Annexure - I

# Maharashtra Finance Commission Act, 1994

MAHARASHTRA ACT No.XXIII of 1994 - An Act to provide for the composition of the qualifications requisite for appointment as member of. the Maharashtra Finance Commission, the manner in which they shall be selected their powers and for matter connected therewith or incidental thereto.

Pages-165.167

---

The following Act of the Maharashtra Legislature, having been assented to.by the Governor on the 22nd April 1994, is hereby published for general information.

D. N. CHAUDHARI
Principal Secretary to the
Government of Maharashtra
Law & Judiciary Department.

-------------------

MAHARASHTRA ACT No. XXIII OF 1994.
(First published after having received the assent of the Governor, in the "Maharashtra Government Gazette" on the 22nd April 1994).

An Act to provide for the composition of the qualifications requisite for appointment as members of the Maharashtra Finance Commission, the manner in which they shall be selected, their powers and matters connected therewith or incidental thereto.

WHEREAS it is expedient to provide for the composition of the qualifications requisite for appointment as members of the Maharashtra Finance Commission. the manner in which they shall be selected, their powers and for matters connected therewith or incidental thereto; It is hereby enacted in the Forty-fifth year of-the Republic of India as follows:

1. This Act may be called the Maharashtra Finance Commission (Miscellaneous Short title provisions) Act. 1994.

Definitions

?. In this Act,

(1) "Chairmen" means the Chairman of the Commission;

(2) "Commission" means the Finance Commission constituted by the Governor pursuant to clause (1) of Article 243-1 of the Constitution.

Composition of Commission

3. The Commission shall consist of a Chairman and four other members

4. The Chairman of the Commission shall be an eminent serving or retired civil servant well versed in Administration and Finance or a person with experience in public affairs and the four other members shall be selected from amongst persons who,

Qualification for appointment as and manner of selection of Chairman & Members of Commission

(a) have special knowledge of the finances and accounts of Government; or (b) have had wide experience in financial matters and in administration; or

(c) have special knowledge and experience about the local self-Government in
urban area; or

(d) have special knowledge and experience about the local self-Government in rural area;

Provided that one of the members shall be a person who is holding or has held the post not lower in rank than that of a Principal Secretary to the Government and he shall be the Member Secretary of the Commission.

5. Before appointing a person to be the Chairman or a Member of the Commission, the Governor shall satisfy himself that that person will have no such financial or other interest as is likely to after prejudicially his function; as the Chairman or a Member of the Commission and the Governor shall also satisfy himself from time to time with respect to every member of the Commission that he has no such interest and any person who is or which the Governor proposes to appoint to be the Chairman or a Member of the Commission shall, whenever required by the Governor so to do. Furnish to him such information as the Governor considers necessary for the performance by him of his duties under this section.

Personal Interest to disqualify Chairman & Members

6. A person shall be disqualified for being appointed as or for being appointed as 'or for being as the Chairman of a Member of the Commission.

Disqualification for being a Chairman or Member of Commission

(a) if he is of unsound mind;

(b) if he is an Undercharged insolvent;

(c) if he has been convicted of an offense involving moral turpitude;

(d) if he has such financial or other interest as is likely to affect prejudicially his functions as the Chairman or a Member of the Commission,

7. The Chairman and every Member. of the Commission shall hold office for such personal as may be specified in the order of the Governor appointing him, but shall be eligible for reappointment;

Term of office of Chairman & Members and eligibility for reappointment

Provided that, he may at any time, by writing under his hand addressed to the Governor, resign his office.

Conditions of service & salaries and allowances of the Chairman & Members.

8. The Chairman and the Members of the Commission shall ready whole time or part time service to the Commission as the Governor may, in each case. specify; and there shall be paid to the Chairman and the Members of the Commission such fees of salary and such allowances the State Government may, by order, from time to time, determine.

Procedure & powers of Commission

9. (1) The Commission shall determining their procedure and in the performances of their functions shall have all the powers of a civil court under the Code of Civil Procedure, 1908 while try a suit in respect of the following matters, namely: -

(a) summoning and enforcing the attendance of witnesses;

(b) requiring the production of any document; and

(c)requisitioning any public record from any court or office.

(2) The Commission shall have power in require any Person to furnish information on such points or matters. in the opinion of the Commission, may be useful or relevant to any matter under he consideration of the Commission and any person so required shall notwithstanding anything contained in any-other law for the time being in force, be deemed to be legally beyond to furnish such information within the meaning of section 176 of the Indian Penal Code;

(3) The Commission shall be demand to be a civil court for ·the purposes of sub-section (1) of Section 545 and of section 116 of the Code of Criminal Procedure, 1973.

*Explanation - For the purpose of enforcing the attendance of witnesses, the local limits of the Commission's jurisdiction shall be the limits of the State of Maharashtra.*

# Annexure - II



**FINANCE DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 28th March 2018

*NOTIFICATION*

No.SFC.2017/C.R.33/FCC.— The following order made by the Governor of Maharashtra is published for general information :—

**Order**

In pursuance of the provisions of Article 243-I read with Article 243-Y of the Constitution of India and the Maharashtra Finance Commission (Miscellaneous Provisions) Act, 1994, the Government of Maharashtra is pleased to constitute the Fifth Maharashtra Finance Commission and appoint Shri Vishwanath Giriraj, Retired I.A.S., as the Chairman of the Fifth Maharashtra Finance Commission. The Member Secretary and other members will be appointed separately.

2. The Chairman shall render whole time service to the Commission.

3. The Chairman shall hold office for a term of ten months from the date of this notification.

4. The Commission shall review the financial position of the Panchayat and the Municipalities and make recommendations to the Governor as to —

(*a*) The principles which should govern—

(*i*) The distribution between the State, the Panchayat and the Municipalities of the net proceeds of the taxes, duties, tolls and fees leviable by the State which may be divided amongst them under part IX and Part IX-A of the Constitution and the allocation between the Panchayats and the Municipalities at all levels of their respective shares of such proceeds.

(*ii*) The determination of the taxes, duties, tolls and fees which may be assigned to or appropriated by the Panchayats and the Municipalities.

(*iii*) The grants-in-aid to the Panchayats and the Municipalities from the consolidated fund of the State.

(*b*) The measures needed to improve the financial position of local bodies.

5. In making its recommendations the Commission shall have regard, among other considerations, to—

(*a*) The projected gap between the revenue receipts and revenue expenditure of the Panchayats and Municipalities in the State for five years from 1st April 2019 , on the basis of their levels of taxation.

(*b*) The measures and the extent to which the Panchayats and the Municipalities have exploited the available and the potential sources of their revenue.

(*c*) The resources of the State Government and the demands thereon, in particular, on account of expenditure on Civil Administration, Police, Social and Economic Services, and all other committed expenditure or liabilities and Non-Plan revenue expenditure ;

(*d*) The maintenance and upkeep of the capital assets of the Panchayats and the Municipalities and work out the norms for the adequate maintenance.

Inmaking its recommendations on the various matters aforesaid, the commission shall adopt the population figures of 2011 Census, where population is regarded a factor for determination of devolution of taxes and duties and grants-in-aid.

6. The Commission shall also make recommendations relating to the following matters—

(*a*) Performance grants and incentive grants to local bodies.

(*b*) Better management of fund management in local bodies.

(*c*) Other related matters being related to prudent financial management of local bodies.

7. The Commission shall indicate the basis on which it has arrived at its finding. It will make available all relevant data on the basis of which it makes its recommendations.

8. The Commission may make recommendations on the basis of recommendations made by the Fourteenth Central Finance Commission.

9. The Commission shall make its report available to the Governor in ten months from the date of this notification, on each of the matters aforesaid, for the period of five years commencing on the 1st day of April, 2019.

CH. VIDYASAGAR RAO,
Governor of Maharashtra.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI

RNI No. MAHBIL/2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष ४, अंक ४१(२)] बुधवार, मार्च २८, २०१८/चैत्र ७, शके १९४० [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक ७६

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ मार्च २०१८

### अधिसूचना

क्रमांक राविआ २०१७/ प्र.क्र.३३/विआक.—महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे खालील आदेश सर्वसाधारण माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

### आदेश

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३ (आय) व २४३ (वाय) च्या तसेच महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतुदी) अधिनियम, १९९४ च्या तरतुदींना अनुसरून महाराष्ट्र शासन पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाची स्थापना करीत असून, श्री. विश्वनाथ गिरीराज (सेवानिवृत्त भा.प्र.से.) यांची आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात येत आहे. आयोगाचे सदस्य सचिव व अन्य सदस्यांची नियुक्ती स्वतंत्रपणे करण्यात येत आहे.

२. अध्यक्ष हे आयोगास पूर्णकालिक सेवा देतील.

३. अध्यक्ष हे, ही अधिसूचना निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून दहा महिन्यांच्या कालावधीसाठी पद धारण करतील.

४. महाराष्ट्र वित्त आयोग पंचायती व नगरपालिका यांच्या आर्थिक स्थितीचे पुनर्विलोकन करील व राज्यपालांकडे पुढील बाबींच्या संबंधात शिफारशी करील :—

(क) (एक) राज्याकडून वसूल करण्यात यावयाच्या कर, शुल्क, पथकर व फी यांच्यापासून मिळणा-या व संविधानाच्या भाग नऊ व नऊ-अ अन्वये, पंचायती व नगरपालिका यांच्यात विभागून द्यावयाच्या निव्वळ उत्पन्नाचे राज्य, पंचायती व नगरपालिका यांच्यात विभागणी करणे व अशा उत्पन्नातील पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व स्तरांवरील त्यांच्या त्यांच्या हिश्श्यांचे वाटप करणे,

(दोन) पंचायती किंवा यथास्थिती, नगरपालिका यांच्याकडे अभिहस्तांकित करण्यात येतील, किंवा यथास्थिती, पंचायती किंवा नगरपालिका यांच्याकडून ज्यांचे विनियोजन करण्यात येईल असे कर, शुल्क, पथकर व फी निर्धारित करणे,

(तीन) पंचायती किंवा यथास्थिती, नगरपालिका यांना राज्याच्या एकत्रित निधीमधून देण्यात यावयाचे सहाय्यक अनुदान यांचे नियमन करणारी तत्त्वे ठरविणे.

(ख) पंचायती व नगरपालिका यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना.

५. आयोग आपल्या शिफारशी करताना पुढील बाबी विचारात घेईल :—

(अ) दिनांक १ एप्रिल २०१९ पासूनच्या पुढील पाच वर्षांमधील राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या महसुली जमांमधील कराधान पातळी जितकी होईल त्या आधारे लागणारा महसुली खर्च व महसुली जमा यांमधील अनुमानित तफावत.

(ब) पंचायती व नगरपालिका यांनी महसूल मिळविण्याच्या कोणकोणत्या उपलब्ध व संभाव्य मार्गांचा कितपत वापर केला आहे.

(क) राज्य शासनाकडील साधनसंपत्ती आणि त्यावरील मागण्या विशेषत: नागरी प्रशासन, पोलीस, सामाजिक आणि आर्थिक सेवा, ऋणविषयक सेवा आणि इतर सर्व अनिवार्य खर्च किंवा दायित्व व योजनेतर महसुली खर्च यांसाठीच्या मागण्या.

(ड) पंचायती व नगरपालिका यांच्या भांडवली मत्तांचे परिरक्षण व निगा आणि त्यांच्या साधनसंपत्तीची स्थिती योग्यरित्या विचारात घेऊन त्यांच्या पर्याप्त परिरक्षणाची मानके.

उपरोक्त निरनिराळ्या बाबींवरील शिफारशी करतेवेळी करातील हिस्सा, शुल्क व सहाय्यक अनुदान निर्धारित करताना लोकसंख्या हा एक आधारभूत घटक असेल, त्याकरिता आयोग सन २०११ च्या जनगणनेतील लोकसंख्येची आकडेवारी विचारात घेईल.

६. आयोगाला पुढील बाबींबाबतही शिफारशी करता येतील :—

(अ) अपेक्षित फलनिष्पत्ती साध्य करणा-या स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी कार्यात्मक तसेच प्रोत्साहनात्मक अनुदान देणे.

(ब) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निधी व्यवस्थापनासाठी चांगल्या कार्यपद्धतीबाबत.

(क) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या चांगल्या आर्थिक व्यवस्थापनासाठी इतर काही संबंधित बाबींसंदर्भात.

७. आयोग, त्यांनी कोणत्या आधारावर त्यांचे निष्कर्ष काढले आहेत ते नमूद करील आणि ज्या आधारे शिफारस केली आहे, त्यापुष्ट्यर्थ आवश्यक माहिती उपलब्ध करून देईल.

८. आयोगास चौदाव्या केंद्रीय वित्त आयोगाने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन त्यांच्या शिफारशी करता येतील.

९. आयोग दिनांक १ एप्रिल २०१९ पासून सुरू होणा-या पुढील पाच वर्षांच्या कालावधी संबंधातील उपरोक्तपैकी प्रत्येक बाबींवरील त्यांचा अहवाल राज्यपालांना ही अधिसूचना निर्गमित केल्याच्या दिनांकापासून पुढील दहा महिन्यांत सादर करील.

चे. विद्यासागर राव,
राज्यपाल.

# Annexure - III

<u>पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या कामकाजाकरीता पद निर्मिती करण्याबाबत....</u>

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक :-पाविआ २०१८/प्र.क्र.६/वित्त आयोग कक्ष
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- २२ मे, २०१८.

<u>पहा</u> :- शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्र. राविआ-२०१७/प्र.क्र.३३/वित्त आयोंग कक्ष, दि. २८ मार्च, २०१८.

<u>प्रस्तावना</u> -

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-आय व २४३-वाय तसेच महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतुदी) अधिनियम, १९९४ च्या तरतुदींना अनुसरून महाराष्ट्र वित्त आयोगाची स्थापना करण्यात येते. महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतुदी) अधिनियम, १९९४ मधील कलम ३ अनुसार आयोगाची संरचना एक अध्यक्ष व सदस्य सचिवांसह चार सदस्य अशी आहे. महाराष्ट्र वित्त आयोगाने अहवाल सादर केल्यावर आयोगाचे समापन करण्यात येते. यापूर्वी स्थापित् केलेल्या चौथ्या महाराष्ट्र वित्त आयोगाचे कामकाज पूर्ण झाल्यावर समापन करण्यात आले आहे. उपरोक्त अधिनियमातील तरतुदींच्या अनुषंगाने पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाची स्थापना करण्याचे प्रस्तावित होते. पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाची स्थापना करण्यास तसेच सदर वित्त आयोगाच्या कामकाजाकरिता आवश्यक पदे निर्माण करण्याचे अधिकार उच्चस्तर सचिव समितीला प्रदान करण्यास दि.३० जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता मिळाली आहे. सदर मान्यतेनुसार संदर्भाधीन दि.२८ मार्च, २०१८ च्या अधिसूचनेनुसार पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.

मंत्रिमंडळाने दि.३० जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाचे कामकाज करण्यासाठी एकूण १८ पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीस मान्यतेसाठी सादर केला होता. सदर प्रस्तावास उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि.१८/०४/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता मिळाली असून सदर पदे ही नियमितपणे भरणे शक्य नसल्यास आवश्यकतेनुसार सेवानिवृत्त कर्मचा-यांमधून अथवा बाह्यस्त्रोताद्वारे अथवा समकक्ष संवर्गातून भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u>

पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या कामकाजाकरीता सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये नमूद केलेली एकूण १८ अस्थायी पदे त्यांच्यासमोर दर्शविलेल्या वेतन संरचनेनुसार निर्माण करण्यास शासन मंजूरी देत आहे. सदर पदे ही नियमितपणे भरण्यात यावी. सदर पदे नियमितपणे भरणे शक्य नसल्यास आवश्यकतेनुसार सेवानिवृत्त कर्मचा-यांमधून अथवा बाह्यस्त्रोताद्वारे अथवा समकक्ष संवर्गातून भरण्यात यावीत. सदर अस्थायी पदे ही पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाचे कामकाज पूर्ण होईपर्यंत चालू राहतील.

२. पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाने पद भरती करताना सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१२, दि.१७ डिसेंबर,२०१६ व वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.पदनि-२०१३/प्र.क्र.११२/१३/ वित्तीय सुधारणा-१, दि. २ डिसेंबर, २०१३ तसेच अनुषंगिक शासन निर्णयामध्ये विहित केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करावा. तसेच सदर पदभरती करण्याचे अधिकार पाचवा महाराष्ट्र वित्त आयोगास राहिल.

३. उपरोक्त मंजूर केलेल्या अस्थायी पदांवरील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनावरील खर्च व भत्ते याकरीता मंजूर करण्यात येणारा खर्च मागणी क्र.जी-२, २०७०, इतर प्रशासनिक सेवा, ८०० इतर खर्च (०३)(०२) राज्य वित्त आयोग (२०७००६३९) या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात मंजूर केलेल्या तरतुदींमधून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५२३१०४२०३६००५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vandana Krishna

Digitally signed by Vandana Krishna
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=[illegible]
serialNumber=[illegible], cn=Vandana Krishna
Date: 2018.05.23 10:42:52 +05'30'

(वंदना कृष्णा)
अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा)

**प्रति,**

१. राज्यपालांचे सचिव
२. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३. सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
४. मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभाग
५. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
६. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा/ विधानपरिषद), मुंबई
९. आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
१०. सर्व विभागीय आयुक्त
११. सर्व जिल्हाधिकारी
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी.
१३. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र,मुंबई.
१४. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा)/ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
१५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१८. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन ,मुंबई.
१९. विशेष आयुक्त, नवीन महाराष्ट्र सदन, कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली-११०००१.
२०. वित्त विभाग, कार्यासन- प्रशासन १, रोख, व्यय २, सेवा ५
२१. निवड नस्ती, वित्त विभाग (वित्त आयोग कक्ष)

---

**शासन निर्णय क्रमांक :- पाविआ २०१८/प्र.क्र.६/वित्त आयोग कक्ष, दिनांक २२ मे , २०१८ चे सहपत्र**
**पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या कामकाजाकरीता पद निर्मिती**

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | सह सचिव/उप सचिव | २ | ३७,४००-६७,६०० ग्रेड पे ८७००/<br>१५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० |
| २ | अवर सचिव | १ | १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० |
| ३ | कक्ष अधिकारी | २ | ९३००-३४८०० ग्रेड पे ४८०० |
| ४ | सहायक कक्ष अधिकारी | २ | ९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० |
| ५ | लिपिक-टंकलेखक/देयक लेखापाल | ४ | ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० |
| ६ | लघुलेखक (उच्च श्रेणी/निम्न श्रेणी इंग्रजी व मराठी) | २ | ९३००-३४८०० ग्रेड पे ४४००/४३०० |
| ७ | सांख्यिकी अधिकारी | २ | ९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० |
| ८ | सांख्यिकी सहाय्यक | १ | ९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० |
| ९ | शिपाई | २ | ४४४०-७४४० ग्रेड पे १३०० |
| | **एकूण** | १८ | |

# Annexure - IV

<u>सदस्य सचिव, पाचवा महाराष्ट्र वित्त आयोग यांना पदसिद्ध सचिव, महाराष्ट्र शासन दर्जा देण्याबाबत....</u>

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :-पाविआ २०१८/प्र.क्र.११७/वित्त आयोग कक्ष**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- २९ ऑगस्ट, २०१८.

<u>पहा</u> :- शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्र. राविआ-२०१७/प्र.क्र.३३/वित्त आयोग कक्ष, दि. २८ मार्च, २०१८.

<u>प्रस्तावना</u> -

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-आय व २४३-वाय तसेच महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतुदी) अधिनियम, १९९४ च्या तरतुदींना अनुसरून महाराष्ट्र वित्त आयोगाची स्थापना करण्यात येते. दि.३० जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाची स्थापना संदर्भाधीन दि.२८ मार्च, २०१८ च्या अधिसूचनेनुसार करण्यात आली आहे. सदस्य सचिव, पाचवा महाराष्ट्र वित्त आयोग यांना पदसिद्ध सचिव, महाराष्ट्र शासन असा दर्जा प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय-</u>

" सदस्य सचिव " , पाचवा महाराष्ट्र वित्त आयोग यांना " पदसिद्ध सचिव ", महाराष्ट्र शासन असा दर्जा प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यांच्या कार्यकक्षा पुढील प्रमाणे राहतील :-

१) " सदस्य सचिव " हे मंत्रालय विभागांप्रमाणेच, त्यांच्याकडे सोपविण्यात आलेले आयोगाचे सर्व विषय आणि बाबींसाठी सर्वथा जबाबदार असतील.

२) " सदस्य सचिव " हे आयोगाच्या कार्यालयातील आस्थापना,सेवा आणि प्रशासकीय बाबींच्या संदर्भात " पदसिद्ध सचिव " म्हणून सर्वथा जबाबदार असतील.

३) " सदस्य सचिव " यांना त्यांच्या कार्यालयीन कामकाजांच्या संदर्भात " पदसिद्ध सचिव " या नात्याने आवश्यकतेनुसार लोकलेखा समितीसमोर साक्ष द्यावी लागेल.

" सदस्य सचिव " , पाचवा महाराष्ट्र वित्त आयोग यांना " पदसिद्ध सचिव ", महाराष्ट्र शासन असा दर्जा देण्यात आल्याने ते प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या सर्व वित्तीय अधिकारांचा वापर करू शकतील.

उपरोक्त शासन निर्णय विनियम कार्यासन, वित्त विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

उपरोक्त शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१८०८२९१५४२००७५०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vaibhav R Rajeghatge

Digitally signed by Vaibhav R Rajeghatge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f453d869c76bb9b100c9474614e3d97070719ea461f32cdef10b55651861f13, cn=Vaibhav R Rajeghatge
Date: 2018.08.29 15:43:32 +05'30'

**( वैभव राजेघाटगे )**
उप सचिव, वित्त विभाग

**प्रति,**

१) राज्यपालांचे सचिव
२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३) सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक.
४) अध्यक्ष, पाचवा महाराष्ट्र राज्य वित्त आयोग,मुंबई.
५) मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभाग
६) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
७) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
८) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
९) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा/ विधानपरिषद), मुंबई
१०) आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
११) सर्व विभागीय आयुक्त
१२) सर्व जिल्हाधिकारी
१३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी.
१४) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र,मुंबई.
१५) महालेखापाल-१ (लेखा परीक्षा)/ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
१६) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१८) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१९) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन ,मुंबई.
२०) विशेष आयुक्त, नवीन महाराष्ट्र सदन, कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली-११०००१.
२१) वित्त विभाग, कार्यासन- प्रशासन १, रोख, व्यय २, सेवा ५, विनियम.
२२) निवड नस्ती, वित्त विभाग (वित्त आयोग कक्ष).

# Annexure - V



**FINANCE DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 14th November 2018

**Order**

MAHARASHTRA FINANCE COMMISSION (MISCELLANEOUS PROVISION) ACT, 1994.

No. SFC. 2017/C.R. 33/FCC.—dated 28th March 2018 and in pursuance of the provisions of Article 243-I read with Article 243-Y of the Constitution of India and the Maharashtra Finance Commission (Miscellaneous Provision) Act, 1994, the Fifth Maharashtra Finance Commission has been constituted.

The Government of Maharashtra is pleased to appoint Principal Secretary U.D.-2, Urban Development Department, Mantralaya, Mumbai and Secretary, Rural Development and Panchayat Raj Department, Bandhkam bhavan, Mumbai and Prof. Abhay Pethe, Economist, Mumbai School of Economics & Public Policy, University of Mumbai, Mumbai as Members of the Fifth Maharashtra Finance Commission upto the term of Fifth Maharashtra Finance Commission.

CH. VIDYASAGAR RAO,
Governor of Maharashtra.

# Annexure - V

RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष ४, अंक १२४] बुधवार, नोव्हेंबर १४, २०१८/कार्तिक २३, शके १९४० [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक २१२

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ नोव्हेंबर २०१८

### आदेश

**महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतुदी) अधिनियम, १९९४.**

क्रमांक राविआ. २०१७/प्र.क्र. ३३/वि.आ.क.—दिनांक २८ मार्च २०१८ अन्वये भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-आय व २४३-वाय च्या तसेच महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतुदी) अधिनियम, १९९४ च्या तरतुदींना अनुसरून पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.

पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगावर सदस्य म्हणून पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या कालावधीकरिता प्रधान सचिव, नवि-२, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई आणि सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, बांधकाम भवन, मुंबई व प्रा. अभय पेठे अर्थशास्त्रज्ञ, मुंबई अर्थशास्त्र व सार्वजनिक धोरण संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

# Annexure - VI



**FINANCE DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated 17th January 2019

**Order**

MAHARASHTRA FINANCE COMMISSION (MISCELLANEOUS PROVISIONS) ACT, 1994.

No. SFC 2017/C.R.33/FCC.—In pursuance of the provisions of Article 243-I read with Article 243-Y of the Constitution of India and the Maharashtra Finance Commission (Miscellaneous Provisions) Act, 1994, the Fifth Maharashtra Finance Commission has been Constituted *vide* Government Notification, Finance Department, No.SFC 2017/C.R.33/FCC, dated 28th March 2018. As per the notification dated 28th March 2018, the Commission will have to submit its report by 27th January, 2019 (ten months from the date of notification).However, the Commission *vide* its letter dated 24th October, 2018 has requested Government to extend tenure of Commission upto 20th April 2019 to submits its report.

Accordingly, extending the tenure of the Fifth Maharashtra Finance Commission upto 20th April 2019 to submits its report. And also Chairman of 5th Maharashtra Finance Commission Shri Vishwanath Giriraj, ( I.A.S. Retired ) will be reappointed (extending tenure) as the Chairman of the Fifth Maharashtra Finance Commission from 28th January, 2019 till 20th April, 2019.

CH. VIDYASAGAR RAO,
Governor of Maharashtra.

## Annexure - VI

RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ५, अंक ७(२)] गुरुवार, जानेवारी, १७, २०१९/पौष २७, शके १९४० [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ जानेवारी २०१९

**आदेश**

**महाराष्ट्र वित्त आयोग (संकिर्ण तरतुदी) अधिनियम, १९९४.**

क्रमांक राविआ २०१७/प्र.क्र.३३/विआक.—शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक राविआ २०१७/प्र.क्र.३३/विआक, दिनांक २८ मार्च, २०१८ अन्वये भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-आय व २४३-वाय च्या तसेच महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतुदी) अधिनियम, १९९४ च्या तरतुदींना अनुसरुन पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. दिनांक २८ मार्च, २०१८ च्या अधिसुचनेअन्वये आयोगास अहवाल सादर करण्यासाठी दिनांक २७ जानेवारी, २०१९ पर्यंत (अधिसूचना निर्गमित झाल्यापासून १० महिन्याची ) मुदत देण्यात आली आहे. तथापि, आयोगाने त्यांच्या दिनांक २४ ऑक्टोबर, २०१८ च्या पत्राअन्वये शासनास अहवाल सादर करण्यासाठी दिनांक २० एप्रिल, २०१९ पर्यंत आयोगास मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे.

त्यानुसार पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगास त्यांचा अहवाल सादर करण्यासाठी दिनांक २० एप्रिल, २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच, आयोगाचे अध्यक्ष श्री. विश्वनाथ गिरीराज (भा.प्र.से. सेवानिवृत्त) यांची दिनांक २८ जानेवारी २०१९ पासून दिनांक २० एप्रिल २०१९ पर्यंत पुनर्नियुक्ती (मुदतवाढ) करण्यात येत आहे.

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

# परिशिष्ट ७

**पाचव्या राज्य वित्त आयोगाच्या कर्मचाऱ्यांचा तपशील**

| अनु. क्र. | कार्यालयीन कर्मचाऱ्यांचे नाव | पद | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री. विश्वनाथ गिरीराज | अध्यक्ष | निवृत्त अपर मुख्य सचिव (वित्त विभाग) |
| २ | डॉ.निधी पांडे | सदस्य सचिव | भारतीय प्रशासन सेवा |
| ३ | श्री.य.द. देशकर | उपसचिव | निवृत्त उपसचिव (वित्त विभाग) |
| ४ | श्री.सी. डब्ल्यु. खंदारे | अवर सचिव | मुख्य अधिकारी, (श्रेणी-१) (नगर विकास विभाग) |
| ५ | श्री.के. डी. संखे | कक्ष अधिकारी | वित्त विभाग |
| ६ | श्री. राजेश डी. कानडे | मुख्य अधिकारी, श्रेणी -१ | नगर विकास विभाग |
| ७ | श्री. मंदार वाडाडेकर | वरीष्ठ सल्लागार | प्राईस वॉटर कूपरर्स (पी.डब्ल्यु.सी.)<br>आय. टी. सल्लागार |
| ८ | श्रीमती.मेघा इंगळे | सांख्यिकी अधिकारी | महाराष्ट्र नियोजन व सांख्यिकी सेवा (नियोजन विभाग) |
| ९ | श्रीमती. सुधा काशेलीकर | सांख्यिकी अधिकारी | प्रतिनियुक्ती (अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था) |
| १० | श्री.दिगंजय रावल | सांख्यिकी अधिकारी | संशोधन तज्ञ,गोखले अर्थशास्त्र संस्था,पुणे. |
| ११ | श्रीमती. योगिता मंडाले | लेखा लिपीक (अतिरिक्त भार) | वित्त विभाग |
| १२ | श्री.मयुर नागरगोजे | लेखा लिपीक (अतिरिक्त भार) | लेखा व कोषागार विभाग |
| १३ | श्रीमती वैशाली औसेकर | लिपिक -टंकलेखक | कंत्राटी नेमणूक |
| १४ | श्रीमती मृन्मयी डी. मोरे | लिपिक- टंकलेखक | अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था |
| १५ | श्री.ए. आर. रेडकर | लिपिक-टंकलेखक | निवृत्त (एम.एस. एफ .सी) |
| १६ | श्री.सी.डी.परळकर | शिपाई | निवृत्त (वित्त विभाग) |

# परिशिष्ट ८

## जिल्हा परिषद व पंचायत समिती यादी:

### १. कोकण विभाग

| कोकण विभाग | | |
|---|---|---|
| **जिल्हा परिषद** | | **पंचायत समिती** |
| पालघर | १ | डहाणू |
| | २ | जव्हार |
| | ३ | मोखाडा |
| | ४ | पालघर |
| | ५ | तलासरी |
| | ६ | वसई |
| | ७ | विक्रमगड |
| | ८ | वाडा |
| रायगड | ९ | अलिबाग |
| | १० | कर्जत |
| | ११ | खालापूर |
| | १२ | महाड |
| | १३ | माणगाव |
| | १४ | म्हसळा |
| | १५ | मुरुड |
| | १६ | पनवेल |
| | १७ | पेण |
| | १८ | पोलादपूर |
| | १९ | रोहा |
| | २० | श्रीवर्धन |
| | २१ | सुधागड |
| | २२ | तळा |
| | २३ | उरण |
| रत्नागिरी | २४ | चिपळूण |
| | २५ | दापोली |
| | २६ | गुहागर |
| | २७ | खेड |
| | २८ | लांजा |
| | २९ | मंडणगड |

| कोकण विभाग | | |
|---|---|---|
| जिल्हा परिषद | | पंचायत समिती |
| | ३० | राजापूर |
| | ३१ | रत्नागिरी |
| | ३२ | संगमेश्वर |
| ठाणे | ३३ | अंबरनाथ |
| | ३४ | भिवंडी |
| | ३५ | कल्याण |
| | ३६ | मुरबाड |
| | ३७ | शहापूर |
| सिंधुदूर्ग | ३८ | देवगड |
| | ३९ | दोडामार्ग |
| | ४० | कणकवली |
| | ४१ | कुडाळ |
| | ४२ | मालवण |
| | ४३ | सावंतवाडी |
| | ४४ | वैभववाडी |
| | ४५ | वेंगुर्ला |

## २. नाशिक विभाग

| नाशिक विभाग | | |
|---|---|---|
| जिल्हा परिषद | | पंचायत समिती |
| अहमदनगर | १ | अकोले |
| | २ | जामखेड |
| | ३ | कर्जत |
| | ४ | कोपरगाव |
| | ५ | नगर |
| | ६ | नेवासा |
| | ७ | पारनेर |
| | ८ | पाथर्डी |
| | ९ | राहाता |
| | १० | राहुरी |
| | ११ | संगमनेर |
| | १२ | शेवगाव |

| नाशिक विभाग | | |
|---|---|---|
| जिल्हा परिषद | | पंचायत समिती |
| | १३ | श्रीगोंदा |
| | १४ | श्रीरामपूर |
| धुळे | १५ | धुळे |
| | १६ | साक्री |
| | १७ | शिंदखेडा |
| | १८ | शिरपूर |
| जळगाव | १९ | अमळनेर |
| | २० | भडगाव |
| | २१ | भुसावळ |
| | २२ | बोडवाड |
| | २३ | चाळीसगाव |
| | २४ | चोपडा |
| | २५ | धरणगाव |
| | २६ | एरंडोल |
| | २७ | जळगाव |
| | २८ | जामनेर |
| | २९ | मुक्ताईनगर |
| | ३० | पाचोरा |
| | ३१ | पारोळा |
| | ३२ | रावेर |
| | ३३ | यावल |
| नंदुरबार | ३४ | अकराणी |
| | ३५ | अक्कलकुवा |
| | ३६ | नंदुरबार |
| | ३७ | नवापूर |
| | ३८ | शहादा |
| | ३९ | तळोदा |
| नाशिक | ४० | बागलाण |
| | ४१ | चांदवड |
| | ४२ | देवळा |
| | ४३ | दिंडोरी |
| | ४४ | इगतपुरी |
| | ४५ | कळवण |

| नाशिक विभाग | | |
|---|---|---|
| जिल्हा परिषद | | पंचायत समिती |
| | ४६ | मालेगाव |
| | ४७ | नांदगाव |
| | ४८ | नाशिक |
| | ४९ | निफाड |
| | ५० | पेठ |
| | ५१ | सिन्नर |
| | ५२ | सुरगाणा |
| | ५३ | त्रंबक |
| | ५४ | येवला |

## ३.पुणे विभाग

| पुणे विभाग | | |
|---|---|---|
| जिल्हा परिषद | | पंचायत समिती |
| कोल्हापूर | १ | आजरा |
| | २ | भुदरगड |
| | ३ | चंदगड |
| | ४ | गडहिंगलज |
| | ५ | गगन बावडा |
| | ६ | हातकंणगले |
| | ७ | कागल |
| | ८ | करवीर |
| | ९ | पन्हाळा |
| | १० | राधानगरी |
| | ११ | शाहूवाडी |
| | १२ | शिरोळ |
| पुणे | १३ | आंबेगाव |
| | १४ | बारामती |
| | १५ | भोर |
| | १६ | दौंड |
| | १७ | हवेली |
| | १८ | इंदापूर |
| | १९ | जुन्नर |

| पुणे विभाग | | |
|---|---|---|
| जिल्हा परिषद | | पंचायत समिती |
| | २० | खेड |
| | २१ | मावळ |
| | २२ | मुळशी |
| | २३ | पुणे शहर |
| | २४ | पुरंदर |
| | २५ | शिरुर |
| | २६ | वेल्हे |
| सांगली | २७ | आटपाडी |
| | २८ | जाठ |
| | २९ | कडेगांव |
| | ३० | कवठेमहांकाळ |
| | ३१ | खानापूर- विटा |
| | ३२ | मिरज |
| | ३३ | पलूस |
| | ३४ | शिराळा |
| | ३५ | तासगाव |
| | ३६ | वाळवा- इस्लामपूर |
| सातारा | ३७ | जावळी |
| | ३८ | कराड |
| | ३९ | खंडाळा |
| | ४० | खटाव |
| | ४१ | कोरेगाव |
| | ४२ | महाबळेश्वर |
| | ४३ | माण |
| | ४४ | पाटण |
| | ४५ | फलटण |
| | ४६ | सातारा |
| | ४७ | वाई |
| सोलापूर | ४८ | अक्कलकोट |
| | ४९ | बार्शी |
| | ५० | करमाळा |
| | ५१ | माढा |
| | ५२ | माळशिरस |

| पुणे विभाग | | |
|---|---|---|
| जिल्हा परिषद | | पंचायत समिती |
| | ५३ | मंगळवेढा |
| | ५४ | मोहोळ |
| | ५५ | पंढरपूर |
| | ५६ | सांगोला |
| | ५७ | सोलापूर उत्तर |
| | ५८ | सोलापूर दक्षिण |

## ४. औरंगाबाद विभाग

| औरंगाबाद विभाग | | |
|---|---|---|
| जिल्हा परिषद | | पंचायत समिती |
| औरंगाबाद | १ | औरंगाबाद |
| | २ | गंगापूर |
| | ३ | कन्नड |
| | ४ | खुलताबाद |
| | ५ | पैठण |
| | ६ | फुलांब्री |
| | ७ | सिल्लोड |
| | ८ | सोईगाव |
| | ९ | वैजापूर |
| बीड | १० | आंबेजोगाई |
| | ११ | आष्टी |
| | १२ | बिड |
| | १३ | धारूर |
| | १४ | गेवराई |
| | १५ | केज |
| | १६ | माजलगाव |
| | १७ | परळी वैजनाथ |
| | १८ | पाटोदा |
| | १९ | शिरूर (का) |
| | २० | वडवणी |
| हिंगोली | २१ | औंढा नागनाथ |
| | २२ | बस्मत |

| औरंगाबाद विभाग | | |
|---|---|---|
| जिल्हा परिषद | | पंचायत समिती |
| | २३ | हिंगोली |
| | २४ | कळमनुरी |
| | २५ | सेनगाव |
| जालना | २६ | अंबड |
| | २७ | बदनापूर |
| | २८ | भोकरदन |
| | २९ | घनसावंगी |
| | ३० | जाफराबाद |
| | ३१ | जालना |
| | ३२ | मंठा |
| | ३३ | पारतूर |
| लातूर | ३४ | अहमदपूर |
| | ३५ | औसा |
| | ३६ | चाकूर |
| | ३७ | देवनी |
| | ३८ | जळकोट |
| | ३९ | लातूर |
| | ४० | निलंगा |
| | ४१ | रेणापूर |
| | ४२ | शिरूर अनंतपाल |
| | ४३ | उदगीर |
| नांदेड | ४४ | अर्धापूर |
| | ४५ | भोकर |
| | ४६ | बिलोली |
| | ४७ | देगलुर |
| | ४८ | धर्माबाद |
| | ४९ | हाडगाव |
| | ५० | हिमायतनगर |
| | ५१ | कंधार |
| | ५२ | किनवट |
| | ५३ | लोहा |
| | ५४ | माहूर |
| | ५५ | मुधखेड |

| औरंगाबाद विभाग | | |
|---|---|---|
| जिल्हा परिषद | | पंचायत समिती |
| | ५६ | मुखेड |
| | ५७ | नायगाव (खुर्द) |
| | ५८ | नांदेड |
| | ५९ | उमरी |
| उस्मानाबाद | ६० | भूम |
| | ६१ | कळंब |
| | ६२ | लोहारा |
| | ६३ | उमरगा |
| | ६४ | उस्मानाबाद |
| | ६५ | परंडा |
| | ६६ | तुळजापूर |
| | ६७ | वाशी |
| परभणी | ६८ | गंगाखेड |
| | ६९ | जिंतूर |
| | ७० | मानवत |
| | ७१ | पालम |
| | ७२ | परभणी |
| | ७३ | पाथरी |
| | ७४ | पुर्णा |
| | ७५ | सेलू |
| | ७६ | सोनपेठ |

५.अमरावती विभाग

| अमरावती विभाग | | |
|---|---|---|
| जिल्हा परिषद | | पंचायत समिती |
| अकोला | १ | अकोला |
| | २ | अकोट |
| | ३ | बाळापूर |
| | ४ | बार्शिटाकली |
| | ५ | मूर्तिजापूर |
| | ६ | पातुर |
| | ७ | तेल्हारा |
| अमरावती | ८ | अचलपूर |
| | ९ | अमरावती |
| | १० | अंजनगाव (स) |
| | ११ | भातकुली |
| | १२ | चांदुर बाजार |
| | १३ | चांदुर रेल्वे |
| | १४ | चिखलदरा |
| | १५ | दर्यापूर |
| | १६ | धामणगाव रेल्वे |
| | १७ | धारणी |
| | १८ | मोर्शी |
| | १९ | नांदगाव खांदेश्वर |
| | २० | तीवसा |
| | २१ | वरुड |
| बुलढाणा | २२ | बुलडाणा |
| | २३ | चिखली |
| | २४ | देऊळगावराजा |
| | २५ | जळगाव (जामोद) |
| | २६ | खामगाव |
| | २७ | लोणार |
| | २८ | मलकापूर |
| | २९ | मेहकर |
| | ३० | मोताळा |

| अमरावती विभाग | | |
|---|---|---|
| जिल्हा परिषद | | पंचायत समिती |
| | ३१ | नांदुरा |
| | ३२ | संग्रामपूर |
| | ३३ | शेगाव |
| | ३४ | सिंदखेडराजा |
| वाशिम | ३५ | कारंजा |
| | ३६ | मालेगाव |
| | ३७ | मंग्रुळपिर |
| | ३८ | मनोरा |
| | ३९ | रिसोड |
| | ४० | वाशिम |
| यवतमाळ | ४१ | अरनी |
| | ४२ | बाभुळगाव |
| | ४३ | दारव्हा |
| | ४४ | दिग्रस |
| | ४५ | घाटंजी |
| | ४६ | कळंब |
| | ४७ | केळापूर |
| | ४८ | महागाव |
| | ४९ | मारेगाव |
| | ५० | नेर |
| | ५१ | पुसद |
| | ५२ | राळेगाव |
| | ५३ | उमरखेड |
| | ५४ | वणी |
| | ५५ | यवतमाळ |
| | ५६ | झरी जामनी |

## ६.नागपूर विभाग

| नागपूर विभाग | | |
|---|---|---|
| जिल्हा परिषद | | पंचायत समिती |
| भंडारा | १ | भंडारा |
| | २ | लाखांदूर |

| नागपूर विभाग | | |
|---|---|---|
| **जिल्हा परिषद** | | **पंचायत समिती** |
| | ३ | लाखनी |
| | ४ | मोहाडी |
| | ५ | पौनी |
| | ६ | साकोली |
| | ७ | तुमसर |
| चंद्रपूर | ८ | बल्लारपूर |
| | ९ | भद्रावती |
| | १० | ब्रह्मपुरी |
| | ११ | चंद्रपूर |
| | १२ | चिमूर |
| | १३ | गोंडपिंपरी |
| | १४ | जिवती |
| | १५ | कोरपणा |
| | १६ | मुल |
| | १७ | नागभिड |
| | १८ | पोंभूर्णा |
| | १९ | राजूरा |
| | २० | सावली |
| | २१ | सिंदेवाही |
| | २२ | वरोरा |
| गडचिरोली | २३ | अहेरी |
| | २४ | अर्मोरी |
| | २५ | भामरागड |
| | २६ | चामोर्शी |
| | २७ | देसाईगंज ( वडसा) |
| | २८ | धानोरा |
| | २९ | ईटापल्ली |
| | ३० | गडचिरोली |
| | ३१ | कोरची |
| | ३२ | कुरखेडा |
| | ३३ | मुळचेरा |
| | ३४ | सिरोंचा |
| गोंदिया | ३५ | आमगाव |

| नागपूर विभाग | | |
|---|---|---|
| जिल्हा परिषद | | पंचायत समिती |
| | ३६ | अर्जुनी मोरगाव |
| | ३७ | देवरी |
| | ३८ | गोंदिया |
| | ३९ | गोरेगाव |
| | ४० | सडक अर्जुनी |
| | ४१ | सालेकसा |
| | ४२ | तिरोरा |
| नागपूर | ४३ | भिवापूर |
| | ४४ | हिंगणा |
| | ४५ | कळमेश्वर |
| | ४६ | कामपटी |
| | ४७ | काटोल |
| | ४८ | कुही |
| | ४९ | मौदा |
| | ५० | नागपूर |
| | ५१ | नरखेड |
| | ५२ | पारसिवनी |
| | ५३ | रामटेक |
| | ५४ | सावनेर |
| | ५५ | उमरेड |
| वर्धा | ५६ | आर्वी |
| | ५७ | आष्टी |
| | ५८ | देवळी |
| | ५९ | हिंगणघाट |
| | ६० | कारंजा |
| | ६१ | समुद्रपूर |
| | ६२ | सेलू |
| | ६३ | वर्धा |

# परिशिष्ट ९- नागरी स्थानिक स्वराज्य संस्था

१.महानगरपालिकाची यादी :

| अनु. क्र. | विभाग | जिल्हा | महानगरपालिकेचे नाव | श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | कोकण | मुबंई | बृहन्मुंबई | अ+ |
| २ | पुणे | पुणे | पुणे | अ |
| ३ | नागपूर | नागपूर | नागपूर | अ |
| ४ | नाशिक | नाशिक | नाशिक | ब |
| ५ | पुणे | पुणे | पिंपरी चिंचवड | ब |
| ६ | कोकण | ठाणे | ठाणे | ब |
| ७ | औरंगाबाद | औरंगाबाद | औरंगाबाद | क |
| ८ | कोकण | रायगड | नवी मुंबई | क |
| ९ | कोकण | ठाणे | वसई-विरार | क |
| १० | कोकण | ठाणे | कल्याण-डोंबिवली | क |
| ११ | नाशिक | अहमदनगर | अहमदनगर | ड |
| १२ | अमरावती | अकोला | अकोला | ड |
| १३ | अमरावती | अमरावती | अमरावती | ड |
| १४ | नागपूर | चंद्रपूर | चंद्रपूर | ड |
| १५ | नाशिक | धुळे | धुळे | ड |
| १६ | नाशिक | जळगाव | जळगाव | ड |
| १७ | पुणे | कोल्हापूर | कोल्हापूर | ड |
| १८ | औरंगाबाद | लातूर | लातूर | ड |
| १९ | औरंगाबाद | नांदेड | नांदेड वाघाळा | ड |
| २० | नाशिक | नाशिक | मालेगाव | ड |
| २१ | औरंगाबाद | परभणी | परभणी | ड |
| २२ | कोकण | रायगड | पनवेल | ड |
| २३ | पुणे | सांगली | सांगली मिरज कुपवाड | ड |
| २४ | पुणे | सोलापूर | सोलापूर | ड |
| २५ | कोकण | ठाणे | मिरा-भाईंदर | ड |
| २६ | कोकण | ठाणे | भिवंडी-निजामपूर | ड |
| २७ | कोकण | ठाणे | उल्हासनगर | ड |

२.'अ' वर्गीय नगरपरिषदांची यादी:

| अनु.क्र. | विभाग | जिल्हा | नगरपरिषदेचे नाव |
|---|---|---|---|
| १ | कोकण | ठाणे | बदलापूर नगरपरिषद |
| २ | कोकण | ठाणे | अंबरनाथ नगरपरिषद |
| ३ | नाशिक | जळगाव | भुसावळ नगरपरिषद |
| ४ | नाशिक | नंदुरबार | नंदुरबार नगरपरिषद |
| ५ | पुणे | कोल्हापूर | इचलकरंजी नगरपरिषद |
| ६ | पुणे | पुणे | बारामती नगरपरिषद |
| ७ | पुणे | सातारा | सातारा नगरपरिषद |
| ८ | पुणे | सोलापूर | बार्शी नगरपरिषद |
| ९ | औरंगाबाद | बीड | बीड नगरपरिषद |
| १० | औरंगाबाद | जालना | जालना नगरपरिषद |
| ११ | औरंगाबाद | लातूर | उदगीर नगरपरिषद |
| १२ | औरंगाबाद | उस्मानाबाद | उस्मानाबाद नगरपरिषद |
| १३ | अमरावती | अमरावती | अचलपूर नगरपरिषद |
| १४ | अमरावती | यवतमाळ | यवतमाळ नगरपरिषद |
| १५ | नागपूर | गोंदिया | गोंदिया नगरपरिषद |
| १६ | नागपूर | वर्धा | वर्धा नगरपरिषद |
| १७ | नागपूर | वर्धा | हिंगणघाट नगरपरिषद |

३.'ब' बर्गीय नगरपरिषदांची यादी:

| अनु.क्र. | विभाग | जिल्हा | नगरपरिषदेचे नाव |
|---|---|---|---|
| १ | कोकण | रायगड | खोपोली |
| २ | कोकण | रत्नागिरी | चिपळूण |
| ३ | कोकण | रत्नागिरी | रत्नागिरी |
| ४ | कोकण | ठाणे | डहाणू |
| ५ | कोकण | ठाणे | पालघर |
| ६ | नाशिक | अहमदनगर | संगमनेर |
| ७ | नाशिक | अमहदनगर | कोपरगाव |
| ८ | नाशिक | अहमदनगर | श्रीरामपूर |
| ९ | नाशिक | धुळे | शिरपूर-वरवडे |
| १० | नाशिक | धुळे | दोंडाईचा-वरवडे |
| ११ | नाशिक | जळगाव | चोपडा |
| १२ | नाशिक | जळगाव | अंमळणेर |
| १३ | नाशिक | जळगाव | चाळीसगाव |
| १४ | नाशिक | जळगाव | पाचोरा |

| अनु.क्र. | विभाग | जिल्हा | नगरपरिषदेचे नाव |
|---|---|---|---|
| १५ | नाशिक | जळगाव | जामनेर |
| १६ | नाशिक | नंदूरबार | शहादे |
| १७ | नाशिक | नाशिक | मनमाड |
| १८ | नाशिक | नाशिक | सिन्नर |
| १९ | नाशिक | नाशिक | येवला |
| २० | पुणे | कोल्हापूर | जयसिंगपूर |
| २१ | पुणे | पुणे | चाकण |
| २२ | पुणे | पुणे | तळेगाव दाभाडे |
| २३ | पुणे | पुणे | लोणावळा |
| २४ | पुणे | पुणे | दौंड |
| २५ | पुणे | सांगली | उरण इस्लामपूर |
| २६ | पुणे | सांगली | विटा |
| २७ | पुणे | सातारा | फलटन |
| २८ | पुणे | सातारा | कराड |
| २९ | पुणे | सोलापूर | पंढरपूर |
| ३० | पुणे | सोलापूर | अक्कलकोट |
| ३१ | औरंगाबाद | औरंगाबाद | कन्नड |
| ३२ | औरंगाबाद | औरंगाबाद | सिल्लोड |
| ३३ | औरंगाबाद | औरंगाबाद | वैजापूर |
| ३४ | औरंगाबाद | औरंगाबाद | पैठण |
| ३५ | औरंगाबाद | बीड | मंजलेगाव |
| ३६ | औरंगाबाद | बीड | परळी |
| ३७ | औरंगाबाद | बीड | अंबेजोगाई |
| ३८ | औरंगाबाद | हिंगोली | हिंगोली |
| ३९ | औरंगाबाद | हिंगोली | बस्मत |
| ४० | औरंगाबाद | लातूर | अहमदपूर |
| ४१ | औरंगाबाद | नांदेड | देगलुर |
| ४२ | औरंगाबाद | परभणी | सेलू |
| ४३ | औरंगाबाद | परभणी | जितूर |
| ४४ | औरंगाबाद | परभणी | गंगाखेड |
| ४५ | अमरावती | अकोला | अकोट |
| ४६ | अमरावती | अकोला | बाळापूर |
| ४७ | अमरावती | अकोला | मूर्तिजापूर |
| ४८ | अमरावती | अमरावती | अंजनगाव |
| ४९ | अमरावती | अमरावती | वरूड |
| ५० | अमरावती | बुलडाणा | शेगाव |
| ५१ | अमरावती | बुलडाणा | नांदुरा |

| अनु.क्र. | विभाग | जिल्हा | नगरपरिषदेचे नाव |
|---|---|---|---|
| ५२ | अमरावती | बुलडाणा | मलकापूर |
| ५३ | अमरावती | बुलडाणा | खामगाव |
| ५४ | अमरावती | बुलडाणा | मेहकर |
| ५५ | अमरावती | बुलडाणा | चिखली |
| ५६ | अमरावती | बुलडाणा | बुलडाणा |
| ५७ | अमरावती | यवतमाळ | दिग्रस |
| ५८ | अमरावती | यवतमाळ | पुसद |
| ५९ | अमरावती | यवतमाळ | उमरखेड |
| ६० | अमरावती | यवतमाळ | वणी |
| ६१ | नागपूर | भंडारा | तुमसर |
| ६२ | नागपूर | भंडारा | भंडारा |
| ६३ | नागपूर | चंद्रपूर | वरोरा |
| ६४ | नागपूर | चंद्रपूर | भद्रावती |
| ६५ | नागपूर | चंद्रपूर | बल्लारपूर |
| ६६ | नागपूर | गडचिरोली | गडचिरोली |
| ६७ | नागपूर | नागपूर | काटोल |
| ६८ | नागपूर | नागपूर | कामपटी |
| ६९ | नागपूर | नागपूर | वाडी |
| ७० | नागपूर | नागपूर | उमरेड |
| ७१ | नागपूर | वर्धा | आर्वी |
| ७२ | नागपूर | वाशीम | कारंजा |
| ७३ | नागपूर | वाशीम | वाशीम |

४.'क' वर्गीय नगरपरिषदांची यादी:

| अनुक्रम | विभाग | जिल्हा | नगरपरिषद नाव |
|---|---|---|---|
| १ | कोकण | रायगड | उरण |
| २ | कोकण | रायगड | माथेरान |
| ३ | कोकण | रायगड | कर्जत |
| ४ | कोकण | रायगड | पेण |
| ५ | कोकण | रायगड | अलिबाग |
| ६ | कोकण | रायगड | मुरुड जंजिरा |
| ७ | कोकण | रायगड | रोहा अष्टमी |
| ८ | कोकण | रायगड | श्रीवर्धन |
| ९ | कोकण | रायगड | महाड |
| १० | कोकण | रत्नागिरी | खेड |
| ११ | कोकण | रत्नागिरी | राजापूर |
| १२ | कोकण | सिंधुदुर्ग | मालवण |
| १३ | कोकण | सिंधुदुर्ग | वेंगुर्ला |
| १४ | कोकण | सिंधुदुर्ग | सावंतवाडी |
| १५ | कोकण | ठाणे | जव्हार |
| १६ | नाशिक | अहमदनगर | राहता पिंपलास |
| १७ | नाशिक | अहमदनगर | पाथर्डी |
| १८ | नाशिक | अहमदनगर | राहुरी |
| १९ | नाशिक | अहमदनगर | देवळाली प्रवरा |
| २० | नाशिक | अहमदनगर | श्रीगोंदा |
| २१ | नाशिक | अहमदनगर | जामखेड |
| २२ | नाशिक | अहमदनगर | शेवगाव |
| २३ | नाशिक | जळगाव | यावल |
| २४ | नाशिक | जळगाव | फैजपूर |
| २५ | नाशिक | जळगाव | सावदा |
| २६ | नाशिक | जळगाव | रावेर |
| २७ | नाशिक | जळगाव | वरणगाव |
| २८ | नशिक | जळगाव | एरंडोल |
| २९ | नाशिक | जळगाव | धरणगाव |
| ३० | नाशिक | जळगाव | पारोळा |
| ३१ | नाशिक | जळगाव | भडगाव |
| ३२ | नाशिक | नंदुरबार | तालोडे |
| ३३ | नाशिक | नंदुरबार | नवापूर |
| ३४ | नाशिक | नाशिक | सटाणा |

| अनुक्रम | विभाग | जिल्हा | नगरपरिषद नाव |
|---|---|---|---|
| ३५ | नाशिक | नाशिक | नांदगाव |
| ३६ | नाशिक | नाशिक | चांदवड |
| ३७ | नाशिक | नाशिक | त्रिंबक |
| ३८ | नाशिक | नाशिक | भगुर |
| ३९ | नाशिक | नाशिक | इगतपुरी |
| ४० | पुणे | कोल्हापूर | पन्हाळा |
| ४१ | पुणे | कोल्हापूर | वडगाव कसबा |
| ४२ | पुणे | कोल्हापूर | हुपरी |
| ४३ | पुणे | कोल्हापूर | कुरुंदवड |
| ४४ | पुणे | कोल्हापूर | कागल |
| ४५ | पुणे | कोल्हापूर | मुरगुड |
| ४६ | पुणे | कोल्हापूर | गडहिंगलज |
| ४७ | पुणे | कोल्हापूर | शिरोळ |
| ४८ | पुणे | कोल्हापूर | मलकापूर |
| ४९ | पुणे | पुणे | जुन्नर |
| ५० | पुणे | पुणे | शिरुर |
| ५१ | पुणे | पुणे | आळंदी |
| ५२ | पुणे | पुणे | राजगुरुनगर (खेड) |
| ५३ | पुणे | पुणे | सासवड |
| ५४ | पुणे | पुणे | जेजुरी |
| ५५ | पुणे | पुणे | भोर |
| ५६ | पुणे | पुणे | इंदापूर |
| ५७ | पुणे | सांगली | आष्टा |
| ५८ | पुणे | सांगली | तासगाव |
| ५९ | पुणे | सांगली | जाट |
| ६० | पुणे | सांगली | पलूस |
| ६१ | पुणे | सातारा | महाबळेश्वर |
| ६२ | पुणे | सातारा | पाचगणी |
| ६३ | पुणे | सातारा | वाई |
| ६४ | पुणे | सातारा | म्हसवड |
| ६५ | पुणे | सातारा | रहीमतपूर |
| ६६ | पुणे | सोलापूर | करमाळा |
| ६७ | पुणे | सोलापूर | कुर्डूवाडी |
| ६८ | पुणे | सोलापूर | सांगोले |
| ६९ | पुणे | सोलापूर | मंगळवेढा |
| ७० | पुणे | सोलापूर | मैंनदर्गी |
| ७१ | पुणे | सोलापूर | दुधाणी |

| अनुक्रम | विभाग | जिल्हा | नगरपरिषद नाव |
|---|---|---|---|
| ७२ | पुणे | सोलापूर | मोहोळ |
| ७३ | औरंगाबाद | औरंगाबाद | खुल्ताबाद |
| ७४ | औरंगाबाद | औरंगाबाद | गंगापूर |
| ७५ | औरंगाबाद | बीड | गेवराई |
| ७६ | औरंगाबाद | बीड | धारुर |
| ७७ | औरंगाबाद | हिंगोली | कळमनुरी |
| ७८ | औरंगाबाद | जालना | भोकरदन |
| ७९ | औरंगाबाद | जालना | अंबड |
| ८० | औरंगाबाद | जालना | पर्तुर |
| ८१ | औरंगाबाद | लातूर | औसा |
| ८२ | औरंगाबाद | लातूर | निलंगा |
| ८३ | औरंगाबाद | नांदेड | किनवट |
| ८४ | औरंगाबाद | नांदेड | हदगाव |
| ८५ | औरंगाबाद | नांदेड | मुदखेड |
| ८६ | औरंगाबाद | नांदेड | भोकर |
| ८७ | औरंगाबाद | नांदेड | पेठ उर्मी |
| ८८ | औरंगाबाद | नांदेड | धर्माबाद |
| ८९ | औरंगाबाद | नांदेड | कुंडलवाडी |
| ९० | औरंगाबाद | नांदेड | बिलोली |
| ९१ | औरंगाबाद | नांदेड | लोहा |
| ९२ | औरंगाबाद | नांदेड | खंदार |
| ९३ | औरंगाबाद | नांदेड | मुखेड |
| ९४ | औरंगाबाद | उस्मानाबाद | परांदा |
| ९५ | औरंगाबाद | उस्मानाबाद | भूम |
| ९६ | औरंगाबाद | उस्मानाबाद | कळंब |
| ९७ | औरंगाबाद | उस्मानाबाद | तुळजापूर |
| ९८ | औरंगाबाद | उस्मानाबाद | नळदुर्ग |
| ९९ | औरंगाबाद | उस्मानाबाद | मुरुम |
| १०० | औरंगाबाद | उस्मानाबाद | उमरगा |
| १०१ | औरंगाबाद | परभणी | मानवथ |
| १०२ | औरंगाबाद | परभणी | पाथरी |
| १०३ | औरंगाबाद | परभणी | सोनपेठ |
| १०४ | औरंगाबाद | परभणी | पुर्णा |
| १०५ | अमरावती | अकोला | तेल्हारा |
| १०६ | अमरावती | अकोला | पातुर |
| १०७ | अमरावती | अमरावती | चिखलदरा |
| १०८ | अमरावती | अमरावती | चांदूरबाजार |

| अनुक्रम | विभाग | जिल्हा | नगरपरिषद नाव |
|---|---|---|---|
| १०९ | अमरावती | अमरावती | मोर्शी |
| ११० | अमरावती | अमरावती | शेंदुरजना |
| १११ | अमरावती | अमरावती | दर्यापूर बनोसा |
| ११२ | अमरावती | अमरावती | चांदुर रेल्वे |
| ११३ | अमरावती | अमरावती | दत्तपूर धामणगाव |
| ११४ | अमरावती | बुलढाणा | जळगाव (जामोद) |
| ११५ | अमरावती | बुलढाणा | देऊळगाव राजा |
| ११६ | अमरावती | बुलढाणा | सिंदखेड राजा |
| ११७ | अमरावती | बुलढाणा | लोणार |
| ११८ | अमरावती | यवतमाळ | नेर नवाबपूर |
| ११९ | अमरावती | यवतमाळ | दारव्हा |
| १२० | अमरावती | यवतमाळ | घाटनजी |
| १२१ | अमरावती | यवतमाळ | पांढरकोडा |
| १२२ | अमरावती | यवतमाळ | अर्णी |
| १२३ | नागपूर | भंडारा | साकोली |
| १२४ | नागपूर | भंडारा | पवनी |
| १२५ | नागपूर | चंद्रपूर | ब्रम्हपुरी |
| १२६ | नागपूर | चंद्रपूर | मुल |
| १२७ | नागपूर | चंद्रपूर | गडचांदुर |
| १२८ | नागपूर | चंद्रपूर | राजौरा |
| १२९ | नागपूर | चंद्रपूर | चिमुर |
| १३० | नागपूर | चंद्रपूर | नागभिड |
| १३१ | नागपूर | गडचिरोली | देसाईगंज |
| १३२ | नागपूर | गोंदिया | तिरोरा |
| १३३ | नागपूर | गोंदिया | आमगाव |
| १३४ | नागपूर | नागपूर | मोवाड |
| १३५ | नागपूर | नागपूर | नारखेड |
| १३६ | नागपूर | नागपूर | कलामेश्वर |
| १३७ | नागपूर | नागपूर | मोहपा |
| १३८ | नागपूर | नागपूर | सावनेर |
| १३९ | नागपूर | नागपूर | खापा |
| १४० | नागपूर | नागपूर | कान्हन (पिपरी) |
| १४१ | नागपूर | नागपूर | रामटेक |
| १४२ | नागपूर | नागपूर | वाणाडोंगरी |
| १४३ | नागपूर | वर्धा | सिंदी |
| १४४ | नागपूर | वर्धा | पुलगाव |
| १४५ | नागपूर | वर्धा | देवळी |

| अनुक्रम | विभाग | जिल्हा | नगरपरिषद नाव |
|---|---|---|---|
| १४६ | नागपूर | वाशिम | मंग्रूलपीर |
| १४७ | नागपूर | वाशिम | रिसोड |

५.नगर पंचायतीच्या नावांची यादी :

| अनुक्रम | विभाग | जिल्हा | नगर पंचायतीचे नाव |
|---|---|---|---|
| १ | कोकण | रायगड | खालापूर |
| २ | कोकण | रायगड | तळा |
| ३ | कोकण | रायगड | म्हसळा |
| ४ | कोकण | रायगड | पोलादपूर |
| ५ | कोकण | रायगड | माणगांव |
| ६ | कोकण | रत्नागिरी | दापोली कॅम्प |
| ७ | कोकण | रत्नागिरी | देवरूख |
| ८ | कोकण | रत्नागिरी | लांजा |
| ९ | कोकण | रत्नागिरी | गुहागर |
| १० | कोकण | रत्नागिरी | मंडणगड |
| ११ | कोकण | सिंधुदूर्ग | कणकवली |
| १२ | कोकण | सिंधुदूर्ग | कुडाळ |
| १३ | कोकण | सिंधुदूर्ग | कसाई-दोदामार्ग |
| १४ | कोकण | सिंधुदूर्ग | देवगड- जामसांडे |
| १५ | कोकण | सिंधुदूर्ग | वैभववाडी |
| १६ | कोकण | ठाणे | विक्रमगड |
| १७ | कोकण | ठाणे | वाडा |
| १८ | कोकण | ठाणे | मोखाडा |
| १९ | कोकण | ठाणे | शहापूर |
| २० | कोकण | ठाणे | मुरबाड |
| २१ | कोकण | ठाणे | तलासरी |
| २२ | नाशिक | अहमदनगर | शिर्डी |
| २३ | नाशिक | अहमदनगर | कर्जत |
| २४ | नाशिक | अहमदनगर | पारनेर |
| २५ | नाशिक | अहमदनगर | नेवासा |
| २६ | नाशिक | अहमदनगर | अकोले |
| २७ | नाशिक | धुळे | साक्री |
| २८ | नाशिक | धुळे | सिंदखेडा |
| २९ | नाशिक | जळगाव | बोडवाड |

| अनुक्रम | विभाग | जिल्हा | नगर पंचायतीचे नाव |
|---|---|---|---|
| ३० | नाशिक | जळगाव | मुक्ताईनगर |
| ३१ | नाशिक | नंदुरबार | वडफाल्या धाडगाव |
| ३२ | नाशिक | नाशिक | निफाड |
| ३३ | नाशिक | नाशिक | दिंडोरी |
| ३४ | नाशिक | नाशिक | कळवण |
| ३५ | नाशिक | नाशिक | सुरगणा |
| ३६ | नाशिक | नाशिक | देवळा |
| ३७ | नाशिक | नाशिक | पेठ |
| ३८ | पुणे | कोल्हापूर | आजरा |
| ३९ | पुणे | पुणे | वडगाव मावळ |
| ४० | पुणे | सांगली | खानापूर |
| ४१ | पुणे | सांगली | शिराळा |
| ४२ | पुणे | सांगली | कवठे महंकाळ |
| ४३ | पुणे | सांगली | कडेगाव |
| ४४ | पुणे | सातारा | लोणंद |
| ४५ | पुणे | सातारा | कोरेगाव |
| ४६ | पुणे | सातारा | मेढा |
| ४७ | पुणे | सातारा | पाटण |
| ४८ | पुणे | सातारा | मलकापूर |
| ४९ | पुणे | सातारा | वडूज |
| ५० | पुणे | सातारा | दहिवडी |
| ५१ | पुणे | सातारा | खंडाळा |
| ५२ | पुणे | सोलापूर | माळशिरस |
| ५३ | पुणे | सोलापूर | माढा |
| ५४ | औरंगाबाद | औरंगाबाद | फुलंब्री |
| ५५ | औरंगाबाद | औरंगाबाद | सोयगाव |
| ५६ | औरंगाबाद | बीड | आष्टी |
| ५७ | औरंगाबाद | बीड | केज |
| ५८ | औरंगाबाद | बीड | शिरुर कासार |
| ५९ | औरंगाबाद | बीड | पाटोदा |
| ६० | औरंगाबाद | बीड | वाडवणी |
| ६१ | औरंगाबाद | हिंगोली | सेनगाव |
| ६२ | औरंगाबाद | हिंगोली | औंढा नागनाथ |
| ६३ | औरंगाबाद | जालना | घणसावंगी |
| ६४ | औरंगाबाद | जालना | मंठा |
| ६५ | औरंगाबाद | जालना | जाफराबाद |
| ६६ | औरंगाबाद | जालना | बदनापूर |

| अनुक्रम | विभाग | जिल्हा | नगर पंचायतीचे नाव |
|---|---|---|---|
| ६७ | औरंगाबाद | लातूर | शिरुर अंनतपाल |
| ६८ | औरंगाबाद | लातूर | चाकूर |
| ६९ | औरंगाबाद | लातूर | रेणापूर |
| ७० | औरंगाबाद | लातूर | देवनी |
| ७१ | औरंगाबाद | लातूर | जळकोट |
| ७२ | औरंगाबाद | नांदेड | नायगाव (खैरगाव) |
| ७३ | औरंगाबाद | नांदेड | हिमायतनगर |
| ७४ | औरंगाबाद | नांदेड | अर्धापूर |
| ७५ | औरंगाबाद | नांदेड | माहूर |
| ७६ | औरंगाबाद | उस्मानाबाद | लोहरा |
| ७७ | औरंगाबाद | उस्मानाबाद | वाशी |
| ७८ | औरंगाबाद | परभणी | पालम |
| ७९ | अमरावती | अकोला | बार्शीटाकळी |
| ८० | अमरावती | अमरावती | धरणी |
| ८१ | अमरावती | अमरावती | तेवसा |
| ८२ | अमरावती | अमरावती | भाटकुळी |
| ८३ | अमरावती | अमरावती | नांदगाव- खांदेश्वर |
| ८४ | अमरावती | बुलढाणा | संग्रामपूर |
| ८५ | अमरावती | बुलढाणा | मोताळा |
| ८६ | अमरावती | वाशिम | मालेगाव |
| ८७ | अमरावती | वाशिम | मनोरा |
| ८८ | अमरावती | यवतमाळ | झारी जमानी |
| ८९ | अमरावती | यवतमाळ | मारेगाव |
| ९० | अमरावती | यवतमाळ | महागाव |
| ९१ | अमरावती | यवतमाळ | राळेगाव |
| ९२ | अमरावती | यवतमाळ | कळंब |
| ९३ | अमरावती | यवतमाळ | बाभुळगाव |
| ९४ | नागपूर | भंडारा | मोहाडी |
| ९५ | नागपूर | भंडारा | लाखनी |
| ९६ | नागपूर | भंडारा | लाखांदूर |
| ९७ | नागपूर | चंद्रपूर | गोंडपिपरी |
| ९८ | नागपूर | चंद्रपूर | कोरपना |
| ९९ | नागपूर | चंद्रपूर | सिंदेवाही |
| १०० | नागपूर | चंद्रपूर | सावली |
| १०१ | नागपूर | चंद्रपूर | जिवती |
| १०२ | नागपूर | चंद्रपूर | पोंभूर्णा |
| १०३ | नागपूर | गडचिरोली | कुरखेडा |

| अनुक्रम | विभाग | जिल्हा | नगर पंचायतीचे नाव |
|---|---|---|---|
| १०४ | नागपूर | गडचिरोली | अहेरी |
| १०५ | नागपूर | गडचिरोली | सिरोंचा आरवाय |
| १०६ | नागपूर | गडचिरोली | चामोर्शी |
| १०७ | नागपूर | गडचिरोली | आरमोरी |
| १०८ | नागपूर | गडचिरोली | धानोरा |
| १०९ | नागपूर | गडचिरोली | एटापल्ली |
| ११० | नागपूर | गडचिरोली | मुळचेरा |
| १११ | नागपूर | गडचिरोली | कोरची |
| ११२ | नागपूर | गडचिरोली | भामरागड |
| ११३ | नागपूर | गोंदिया | अर्जुनी मोरेगाव |
| ११४ | नागपूर | गोंदिया | गोरेगाव |
| ११५ | नागपूर | गोंदिया | देऊरी |
| ११६ | नागपूर | गोंदिया | सडक अर्जुनी |
| ११७ | नागपूर | गोंदिया | सालेकसा |
| ११८ | नागपूर | नागपूर | मौदा |
| ११९ | नागपूर | नागपूर | महादुला |
| १२० | नागपूर | नागपूर | पारशिवणी |
| १२१ | नागपूर | नागपूर | भिवापूर |
| १२२ | नागपूर | नागपूर | कुही |
| १२३ | नागपूर | नागपूर | हिंगणा |
| १२४ | नागपूर | वर्धा | कारंजा |
| १२५ | नागपूर | वर्धा | आष्टी |
| १२६ | नागपूर | वर्धा | सेलू |
| १२७ | नागपूर | वर्धा | समुद्रपूर |

## ऋणनिर्देश:१

## अधिकारेतर

राविआने त्यांच्या क्षेत्र भेटीच्यावेळी खालील पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. त्यांनी अत्यंत मौल्यवान माहिती पूरविली :

### १. जिल्हापरिषद अध्यक्ष

<table>
<tr><th>अनु.क्र.</th><th>जिल्हा</th><th>तारीख</th></tr>
<tr><td>१</td><td>ठाणे</td><td>०५.१२.२०१८</td></tr>
<tr><td>२</td><td>जालना</td><td>१०.१२.२०१८</td></tr>
<tr><td>३</td><td>परभणी</td><td rowspan="2">११.१२.२०१८</td></tr>
<tr><td>४</td><td>नांदेड</td></tr>
<tr><td>५</td><td>अमरावती</td><td rowspan="3">१६.१२.२०१८</td></tr>
<tr><td>६</td><td>बुलढाणा</td></tr>
<tr><td>७</td><td>यवतमाळ</td></tr>
<tr><td>८</td><td>पुणे</td><td>०४.०१.२०१९</td></tr>
<tr><td>९</td><td>सातारा</td><td rowspan="2">०५.०१.२०१९</td></tr>
<tr><td>१०</td><td>कोल्हापूर</td></tr>
<tr><td>११</td><td>रत्नागिरी</td><td>०९.०१.२०१९</td></tr>
<tr><td>१२</td><td>सिंधुदूर्ग</td><td>११.०१.२०१९</td></tr>
</table>

### २. महानगरपालिकांचे महापौर

<table>
<tr><th>अनु.क्र.</th><th>महानगरपालिका</th><th>तारीख</th></tr>
<tr><td>१</td><td>भिवंडी</td><td rowspan="2">०५.१२.२०१८</td></tr>
<tr><td>२</td><td>पनवेल</td></tr>
<tr><td>३</td><td>औरंगाबाद</td><td>१०.१२.२०१८</td></tr>
<tr><td>४</td><td>परभणी</td><td rowspan="3">११.१२.२०१८</td></tr>
<tr><td>५</td><td>नांदेड</td></tr>
<tr><td>६</td><td>लातूर</td></tr>
<tr><td>७</td><td>नागपूर</td><td>१४.१२.२०१८</td></tr>
<tr><td>८</td><td>अमरावती</td><td>१६.१२.२०१८</td></tr>
<tr><td>९</td><td>पुणे</td><td>०४.०१.२०१९</td></tr>
</table>

### ३. अध्यक्ष महानगरपालिका

<table>
<tr><th>अनु.क्र.</th><th>जिल्हा</th><th>महानगरपालिका</th><th>तारीख</th></tr>
<tr><td rowspan="2">१</td><td rowspan="2">ठाणे</td><td>मुरबाड</td><td rowspan="2">०५.१२.२०१८</td></tr>
<tr><td>शहापूर</td></tr>
</table>

| अनु.क्र. | जिल्हा | महानगरपालिका | तारीख |
|---|---|---|---|
| २ | पालघर | पालघर | |
| ३ | नांदेड | बिलोली | ११.१२.२०१८ |
| | | देगलूर | |
| ४ | गोंदिया | गोंदिया | १४.१२.२०१८ |
| ५ | चंद्रपूर | ब्रम्हापुरी | |
| | | चिमूर | |
| ६ | गडचिरोली | गडचिरोली | |
| ७ | भंडारा | साकोली | |
| | | लखाणी | |
| ८ | अकोला | तेल्हारा | १७.१२.२०१८ |
| | | पातूर | |
| ९ | वाशिम | करंजा | |
| १० | अमरावती | मोरशी | |
| | अमरावती | तिवासा | |
| | | वरुड | |
| ११ | यवतमाळ | यवतमाळ | |
| | | राळेगांव | |
| | | मारेगांव | |
| | | कळंब | |
| | | दारव्हा | |
| | | उमरखेड | |
| १२ | सोलापूर | सांगोला | ०४.०१.२०१९ |
| | | अक्कलकोट | |
| | | पंढरपूर | |
| | | मंगळवेढा | |
| १३ | पुणे | तळेगांव दाभाडे | |
| | | लोणावळा | |
| | | आळंदी | |
| | | चाकण | |
| | | वडगांव | |
| १४ | सातारा | सातारा | ०५.०१.२०१९ |
| | | वाई | |
| | | दहिवाडी | |
| | | कराड | |
| | | ईस्लामपूर | |
| | | महाबळेश्वर | |
| १५ | कोल्हापूर | जयसिंगपूर | |
| १६ | सांगली | शिराळा | |

| अनु.क्र. | जिल्हा | महानगरपालिका | तारीख |
|---|---|---|---|
| १७ | रत्नागिरी | दापोली | ०९.०१.२०१९ |
| | | चिपळूण | |
| | | देवरुख | |
| | | रत्नागिरी | |
| | | लांजा | |
| | | गुहागार | |
| | | मंडणगड | |
| १८ | सिंधुदुर्ग | देवगड-जामसांडे | ११.०१.२०१९ |
| | | सावंतवाडी | |
| | | वेंगुर्ला | |

## ऋणनिर्देश:२

## तांत्रिक कार्यशाळेतील सहभागी-

राविआने १३ डिसेंबर २०१८ रोजी वित्तीय, लेखापरिक्षण आणि वित्तीय माहिती (डेटा) याविषयांवर एक तांत्रित कार्यशाळेचे, हॉटेल वेस्ट एंड, मरिन लाईन्स, मुंबई येथे आयोजन केले होते.खालील मान्यवरांनी आणि अधिकाऱ्यांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला होता. सहभागींकडून प्राप्त झालेले मौल्यवान योगदान आणि सूचनांबाबत राविआ ऋणी आहे.

**मान्यवरांची यादी:**

| अनु.क्र. | आदरणीय आतिथी |
|---|---|
| १ | श्री.यशवंत ठाकरे, प्रधान महालेखापाल, लेखापरीक्षण, मुंबई. |
| २ | श्री. रवीकिरण उबाळे, उप महालेखापाल , मुंबई. |
| ३ | श्री.राजगोपाल देवरा, प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई. |

**अधिकाऱ्यांची यादी:**

| अनु.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | हुद्दा /विभाग |
|---|---|---|
| १ | श्री. एस.मुथुक्रिष्णन | आयुक्त/ संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय |
| २ | श्री.पी.जे. जाधव | सहसचिव, नगरविकास विभाग |
| ३ | श्री. सुनिल लहाने | उप संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय |
| ४ | श्री. सतीश कुलकर्णी | उप संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय |
| ५ | श्री. पिसाळ | लेखाधिकारी, नगरपरिषद प्रशासन संचालनालय |
| ६ | श्री.शहापूरकर | उप संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय |
| ७ | श्री. मोहीते | संचालक, स्थानिक निधी आणि लेखापरिक्षण |
| ८ | उप संचालक, महानगरपालिका लेखापरिक्षक | उपसंचालक, स्थानिक निधी आणि लेखापरिक्षण |
| ९ | सहसंचालक, पंचायतराज संस्था | सहसंचालक, स्थानिक निधी आणि लेखापरिक्षण |
| १० | श्री.वैभव राजेघाटगे | उपसचिव, वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई. |
| ११ | श्री. अ.ना.भोसले, | सहसचिव ( निवृत्त), वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई. |
| १२ | श्री.व.कृ. पाटील, | सहसचिव (अर्थसंकल्प ), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| १३ | श्री. संजय बनकर, | उप सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| १४ | श्री.जी. डी. भालेराव, | उप सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| १५ | श्री. एम. डी. जाधव. | उप सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| १६ | श्री. नारायण रिंगणे | उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई |
| १७ | श्री. सुनिल मोने | सनदी लेखापाल |

| अनु.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | हुद्दा /विभाग |
|---|---|---|
| १८ | मे. एस. के. पटोडीया आणि असोसिएटस | सनदी लेखापाल कंपनी |
| १९ | मुख्य वित्त आणि लेखा अधिकारी | जिल्हा परिषद, ठाणे. |
| २० | मुख्य वित्त आणि लेखा अधिकारी | जिल्हा परिषद, रायगड |
| २१ | मुख्य वित्त आणि लेखा अधिकारी | जिल्हा परिषद, पालघर |
| २२ | श्री. बालाजी खतगावकर | आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| २३ | श्री. गणेश देशमुख | आयुक्त, पनवेल महानगरपालिका |
| २४ | श्री. मनोज पाष्टे | लेखापाल,कुळगांव-बदलापूर महानगरपालिका |
| २५ | डॉ. धनराज गरड | मुख्य वित्त व लेखाधिकारी |

ऋणनिर्देश:३

**वित्त आयोगाच्या कार्यालयातील बैठकां दरम्यान आपले मत मांडणाऱ्या / सूचना देणाऱ्या अधिका-यांचे राविआ ऋणी आहे.**

| अनु.क्र. | दिनांक | नाव | हुद्दा आणि विभाग |
|---|---|---|---|
| १ | १८.०८.२०१८ | डॉ. सुहास शिंदे | मुख्य वित्त व लेखाधिकारी, नाशिक महानगरपालिका. |
| | | श्री. सुधीर नाकाडी | उप परिवहन आयुक्त,बांद्रा,मुंबई. |
| | | श्री. शरद बेलवटे | मुख्य लेखाधिकारी, मीरा-भाईंदर महानगरपालिका. |
| | | श्री. दिग्विजय चव्हाण | मुख्य लेखापरिक्षण अधिकारी, मीरा-भाईंदर महानगर पालिका. |
| | | श्री. संजय शिंदे | मुख्य अधिकारी, खोपोली महानगरपालिका |
| २ | २४.०८.२०१८ | श्री. साईनाथ मुटकुळे | लेखा अधिकारी, जालना महानगरपालिका. |
| | | श्री. आर.टी. खरात | कार्यालय अधिक्षक, देगलुर महानगरपालिका |
| | | श्री. शेखर शेट्ये | सहाय्यक लेखापाल, रत्नागिरी महानगरपालिका |
| | | श्री. संतोष परदेशी | सहाय्यक लेखापाल, नंदुरबार महानगरपालिका |
| | | श्री. जे.आर. लाड | लेखापाल, चोपडा महानगरपालिका. |
| | | श्री. प्रविण विलायतकर | लेखापाल, मोरशी महानगरपालिका. |
| | | श्री. सागर ठाकरे | कार्यालय अधिक्षक, मोरशी महानगरपालिका |
| | | श्री. आशिष जोशी | सहाय्यक लेखापाल, वरुड महानगरपालिका |
| | | श्री. इरफान पठाण | लेखापाल, पालघर महानगरपालिका |
| | | श्रीमती प्रियांका गांगुर्डे | सहाय्यक लेखापाल, त्रिबंक महानगरपालिका |
| | | श्री. इ. एस. गवारी | सहाय्यक लेखापाल, सातारा महानगरपालिका |
| | | श्री.आर. बी. शितोळे | सहाय्यक लेखापाल, विटा महानगरपालिका |
| ३ | १७.०९.२०१८ | श्री. सी.एम. कांबळे | अतिरिक्त आयुक्त, राज्य वस्तु व सेवा कर, माझगांव, मुंबई. |
| | | श्री. डी.वाय.अल्वारीस | सहआयुक्त, राज्य वस्तु व सेवा कर, माझगांव, मुंबई. |
| ४ | २६.०९.२०१८ | श्री.पी. जे. जाधव | सहसचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| | | श्री. शरद किरवले | कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई |
| | | श्री. संजय पाटील | अवर सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई |
| | | श्री. एन. जी. आंदळकर | कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई |
| ५ | ०८.१०.२०१८ | श्रीमती. प्रियांका गांगुर्डे | सहाय्यक लेखापाल, त्रिबंक महानगरपालिका |
| | | श्री. एस. एस. मोरे | लेखापाल, बदलापूर महानगरपालिका |
| ६ | ०९.१०.२०१८ | श्री. ए.ए. नातु | लेखापाल, कर्जत महानगरपालिका. |
| | | श्री. फिरोज खान | मे.एस. के. पटोडीया आणि असोसीएटस |
| | | श्री. तुषार विनेरकर | मे.एस. के. पटोडीया आणि असोसीएटस |
| ७ | १७.१०.२०१८ | श्री.आर. आर.शिंगे | संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई |
| | | डॉ. जे. व्ही. चौधरी | सहसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई |
| | | श्री. संजय बनकर | उपसचिव,ग्राम विकास विभाग, मंत्रालय,मुंबई. |

| अनु.क्र. | दिनांक | नाव | हुद्दा आणि विभाग |
|---|---|---|---|
| | | श्री. पंडीत के. जाधव | उपसचिव,ग्राम विकास विभाग, मंत्रालय,मुंबई. |
| | | श्री. विजय चांदेकर | अवर सचिव, ग्राम विकास विभाग,मुंबई |
| ८ | १९.१०.२०१८ | श्री. मनोज पाष्टे | लेखापाल, मुरबाड नगर पंचायत |
| | | श्री. तुशार विनेरकर | मे.एस. के. पटोडीया आणि असोसीएटस |
| ९ | २६.११.२०१८ | श्रीमती. मनिषा म्हैसकर | प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई. |
| | | श्री. ए. के. गुप्ता | सचिव, ग्राम विकास आणि पंचायतराज विभाग,मंत्रालय,मुंबई |
| | | श्री. अभय पेठे | प्राध्यापक, मुंबई विद्यापीठ |
| | | श्री राजगोपाल देवरा | प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई. |
| | | | |
| १० | ०४.१२.२०१८ | श्री. एन.एम.फिरके | उपसंचालक, अर्थ  व सांख्यिकी संचालनालय, मुंबई |
| | | श्रीमती. एम.एम. बेळगांवकर | संशोधन अधिकारी, अर्थ  व सांख्यिकी संचालनालय, मुंबई |
| ११ | २९.१२.२०१८ | श्री. एस.बी. भोर | उपसंचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे संचालनालय,मुंबई. |
| | | श्रीमती. एल.एस. मेहता | लेखा अधिकारी, लेखा व कोषागारे संचालनालय. |
| १२ | ३१.१२.२०१८ | श्री. आर.डी. भगत | सहआयुक्त ,वस्तु व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई. |
| १३ | ०२.०१.२०१९ | श्री. एस.सी. श्रीरंगम | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारती आणि इतर बांधकामे कर्मचारी कल्याण मंडळ, मुंबई |
| | | श्री. राजेंद्र क्षिरसागर | सहसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई |
| | | श्री. विजय चांदेकर | अवर सचिव,ग्रामविकास विभाग,मंत्रालय,मुंबई |
| | | श्री. मदन जी. सोंडे | कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, मंत्रालय,मुंबई |
| | | श्री. सागर ए. मोरे | कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई |
| १४ | ०३.०१.२०१९ | श्री. पी. वेलरासु | सदस्य सचिव,  महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई |
| | | श्री. पी. आर. नंदनवारे | अधिक्ष अभियंता (मुख्य), सीपीडीएम, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई. |
| १५ | ०७.०१.२०१९ | श्री. अतुल कपोले, | उपसचिव,जलसंपदा विभाग, मंत्रालय |
| | | श्री. एस. एन. बोलभांड | मुख्य लेखापरिक्षक, जलसंपदा विभाग, औरंगाबाद. |
| | | श्री. पी.सी. झानकर | लेखा अधिकारी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका |
| | | श्री. बी.बी. तेलगी | उप लेखापाल, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका |
| | | श्रीमती. अश्विनी बी. जोशी | लिपीक, ठाणे महानगरपालिका. |
| | | श्री. रमेश सोनारे | लेखा अधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका. |
| | | श्री. पुरुषोत्तम  घरत | वरिष्ट लिपीक, नवी मुंबई महानगरपालिका. |
| | | श्री. पी. आर. राठोड | मुख्य लेखापाल, अमरावती महानगरपालिका. |
| | | श्री. विद्यारत्न  काकडे | मुख्य लेखापाल, सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका. |

| अनु.क्र. | दिनांक | नाव | हुद्दा आणि विभाग |
|---|---|---|---|
| | | श्री. शैलेंद्र खोत | लिपीक, मुख्य लेखापाल, सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका |
| | | श्री. अनिल रेभानकर | लिपीक, चंद्रपूर महानगरपालिका |
| १६ | १४.०२.२०१९ | श्री. भालचंद्र बेहरे | उपसंचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी,मुंबई. |
| | | श्री. अनिल लाड | कल्याण-डोंबिवली महानगरपालिका. |
| | | श्री. सतिश कुलकर्णी | उपसंचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी,मुंबई. |
| | | श्री. अनिल मुळे | उप आयुक्त, पुणे महानगरपालिका. |
| | | श्री.गणेश देशमुख | आयुक्त, पनवेल महानगरपालिका. |
| १७ | १५.०२.२०१९ | श्री. रमानाथ झा | आयुक्त, भारतीय प्रशासन सेवा (निवृत्त),एमएमआरडीए |
| १८ | २५.०२.२०१९ | श्रीमती स्नेहल पी. शेन्द्रे | लेखापाल, गडचीरोली नगरपरिषद. |
| १९ | २७.०२.२०१९ | श्री. अनिल कुलकर्णी | कार्यकारी अभियंता (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे. |
| २० | ११.०३.२०१९ | डॉ. चेतना केरुरे | मुख्य अधिकारी, त्रिंबक नगरपरिषद, नाशिक. |
| | | श्री. महेश वाघमोडे | मुख्य अधिकारी,लोणार नगरपरिषद. |
| | | श्री. रशिद आर.नौरंगाबादी | पर्यवेक्षक, चिखलदरा नगरपरिषद. |
| | | श्री. रमेश जी. घार्निये | विभाग प्रमुख, नियोजन व पर्यटन , अलिबाग नगरपरिषद. |
| २१ | १४.०३.२०१९ | श्री. आर. बी. भागवत | संचालक (निवृत्त), लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई. |
| २२ | २८.०३.२०१९ | श्री.असीम गुप्ता | प्रधान सचिव, ग्रामविकास आणि पंचायतराज विभाग, मंत्रालय,मुंबई. |
| | | श्री. संजय बनकर | उपसचिव, ग्रामविकास आणि पंचायतराज विभाग, मंत्रालय,मुंबई. |
| | | श्री. प्रविण डी. जैन | उपसचिव, ग्रामविकास आणि पंचायतराज विभाग, मंत्रालय,मुंबई. |
| | | श्री. गिरीश भालेराव | उपसचिव, ग्रामविकास आणि पंचायतराज विभाग, मंत्रालय,मुंबई. |
| २३ | ०३.०४.२०१९ | श्री. चंद्रकांत पाटील | विस्तार अधिकारी, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| | | श्री. श्रीधर ए. कुलकर्णी | विस्तार अधिकारी ,पंचायत समिती, वाळवा, सांगली |

आम्हाला मोलाचे मार्गदर्शन आणि सुचना देणारे वरिष्ठ अधिकारी:

| अनु.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.रामनाथ झा | निवृत्त भारतीय प्रशासन सेवा |
| २ | श्री.जयराज फाटक | निवृत्त भारतीय प्रशासन सेवा |
| ३ | श्री. राजीव अग्रवाल | निवृत्त भारतीय प्रशासन सेवा (AIILSG) |
| ४ | श्री.ए. के. जैन | निवृत्त भारतीय प्रशासन सेवा |
| ५ | श्री. सुधीर श्रीवास्तव | निवृत्त भारतीय प्रशासन सेवा |
| ६ | डॉ. नितीन करीर | प्रधान सचिव(न.वि.१),नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई |
| ७ | श्री. एस.मुथुक्रिष्णन | संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई |
| ८ | श्री.पां.जो.जाधव | सह सचिव,नगर विकास विभाग,मंत्रालय, मुंबई |
| ९ | श्री.रा.द.भगत | सह आयुक्त, वस्तु व सेवा कर भवन, माझगांव, मुंबई |

<u>वित्त विभागाचे अधिकारी ज्यांनी ५ व्या रा विला भरपूर समर्थन दिले :</u>

<u>सचिव</u>

१. श्री. डी.के.जैन

२. श्री. यु.पी.एस. मदान

३. श्रीमती वंदना कृष्णा

४. श्री. राजगोपाल देवरा

५. श्री. राजीव मित्तल

६. श्री. नितीन गद्रे

<u>सह सचिव</u>

श्री. व.कृ.पाटील

<u>उपसचिव</u>

१. श्री. वैभव राजेघाटगे

२. श्री. जमीर शेख

<u>अवर सचिव</u>

१. श्रीमती विद्या वाघमारे

२. श्रीमती रेखा काळसेकर

<u>कक्ष अधिकारी</u>

१. श्रीमती. अनुश्री मोरे

<u>विशेष ऋणनिर्देश:</u>

- ग्राम विकास विभाग आणि नगर विकास विभागाचे सर्व संबंधित अधिकारी.
- श्रीमती अश्विनी भिडे, भारतीय प्रशासन सेवा, व्यवस्थापकीय संचालक,मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ यांनी राविआच्या कार्यालयाकरीता जागा उपलब्ध करुन दिल्याबद्दल त्यांचे विशेष आभार.